**( अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष )**

**पृ. शी.** : सायगाव ( एकबे ) ( ता. कोरेगाव, जि. सातारा) येथील ग्रामस्थांना नवीन शर्त उठवून खातेवारसांना कब्जेपट्टी देणे

**मु. शी. :** सायगाव ( एकबे ) ( ता. कोरेगाव, जि. सातारा) येथील ग्रामस्थांना नवीन शर्त उठवून खातेवारसांना कब्जेपट्टी देणे या संबंधी श्री.महेश शिंदे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. महेश शिंदे ( कोरेगाव ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सायगांव (एकबे) (ता. कोरेगांव, जि.सातारा) येथील ग्रामस्थांना १९७८ पासून गावठाण कब्जेपट्टी देण्यात आली नसून गावठाणाचा सातबारा न होणे, या गावठाणातील ग्रामस्थांना नविन शर्त उठवून संबंधित खातेवारसांना कब्जेपट्टी देण्याबाबत शासनाकडे विनंती करण्यात येणे, तसेच कब्जेपट्टी देण्याकरीता शासनाने २० टक्के विलंब शुल्क लावण्यात येणे, सदरील विलंब शुल्क माफ करण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, या कामास विलंब लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याकरिता नविन शर्त (सातबारावरील) उठवून गावठाणाचा सिटी सर्व्हे तातडीने देण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री विजय वडेट्टीवार ( मदत व पुनर्वसन मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. महेश शिंदे : अध्यक्ष महोदय, सातारा हा धरणांचा जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे. आमच्या जिल्ह्यात बरीच धरणे बांधण्यात आली आहेत. येथील धरणग्रस्तांनी आपल्या जमिनी त्यागाच्या रुपाने धरणांकरिता दिल्या. आज या कोयना धरणातून संपूर्ण महाराष्ट्राला वीज व पाणी मिळाले. ज्या लोकांनी आपल्या जमिनी दिल्या त्यांचे पुनर्वसन सन १९७९ साली माझ्या मतदारसंघातील कोरेगाव येथे केले. येथे २२ गावे पुनर्वसित आहेत. या लोकांनी स्वत:च्या बागायती जमिनी राज्यातील धरणांकरिता दिल्या. मात्र त्यांचे पुनर्वसन डोंगराच्या कडेला माळरानात केले गेले. सायगाव येथे सन १९७९ मध्ये त्यांचे पुनर्वसन झाले. तेव्हा त्यांना दोन प्रकारच्या जमिनी दिल्या गेल्या. त्यांना घरे बांधण्यासाठी प्लॉट देण्यात आले व शेतजमीन देण्यात आली. त्यांना शेत जमीन ३ गटांमध्ये देण्यात आली. काहींना ३ एकर तर काहींना ४ एकर शेत जमीन देण्यात आली. जमीन देताना शासनाने विचार केला नाही की, त्यांना ही जमीन कसण्यासाठी, शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी दिली जाणार आहे. आजही हे गट एकत्रित आहेत. यामुळे जमिनीवर शर्त २, भोगवटा २ ची जमीन आहेत. नवीन शर्तीची जमीन असल्याने या शेतकऱ्यांना कर्ज मिळू शकत नाही, ही सत्य परिस्थिती आहे. सन १९७९ पासून ५० वर्षामध्ये त्यांना शेतीचे कर्ज मिळू शकले नाही. यामुळे ते शेती करु शकत नाही. माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे. त्यांची कब्जापट्टी वेगळी करणार आहे काय ? त्यांना घरासाठी जी जमीन दिलेली आहे ती देखील एकत्रित आहे. या करिता एकच ७/12 केला आहे. याचा परिणाम असा झाला की, केवळ घराची जागा त्यांच्या नावावर झाली शेजारच्या दारातील, उंबऱ्यातील जागा त्यांची होऊ शकली नाही अशी विदारक परिस्थिती आहे. या लोकांना घरे बांधायची आहे, मात्र घराच्या पुनर्बांधणीकरिता कर्ज मिळू शकत नाही. एवढया वाईट अवस्थेत आपण त्यांना ठेवले आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. २ वर्षापूर्वी मी आमदार झालो तेव्हा एक बैठक मी घेतली होती. पुनर्वसन विभागाचे जिल्ह्यातील प्रमुख अधिकरी, महसूल विभागाचे अधिकारी हजर होते. या

श्री. महेश शिंदे ....

बैठकीमध्ये निर्णय झाला. कोणत्याही परिस्थितीत ३ महिन्याच्या आत या कब्जेपट्टया वेगळया करुन देण्यात येतील व मोजणीचे लाख- दीड लाख रु. पुनर्वसन विभाग भरेल. गेल्या दोन अडीच वर्षात आजपर्यंत त्यांच्याकडे शासनाने पाहिले नाही. विधानसभा सदस्याला न विचारण्याची प्रथा जिल्ह्यातील पुनर्वसन विभागातील अधिकाऱ्यांची आहे.

**उपाध्यक्ष :** थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री. महेश शिंदे : अध्यक्ष महोदय, कोयना धरणाच्या पुनर्वसनाच्या जमिनी मुंबईत कशा मिळतील याकडे केवळ लक्ष देणाऱ्या अधिकाऱ्यांचे या सामान्य पुनर्वसित लोकांकडे दुर्लक्ष झाले आहे. विधानसभा सदस्यांनी घेतलेल्या प्रोटोकॉलच्या बैठकीत दिलेले आश्वासन न पाळण्यावर कारवाई केली जाणार काय ? असे तीन प्रश्न मी विचारत आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. महेश शिंदे यांनी त्यांच्या पुनर्वसनाच्या संबंधी प्रश्न विचारला आहे. सायगाव (एकबे )या गावाची जमीन धोम प्रकल्पासाठी संपादित केली होती नंतर कणेर प्रकल्पासाठी त्याचे वाटप झालेले आहे. मोजणी करणे व कब्जापट्टी या संबंधी प्रश्न आहे. गेल्या अनेक वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कोणत्याही परिस्थितीत मोजणीचे पैसे कालच भरण्यास सांगितले आहे. त्यानुसार काल पैसे भरले आहेत. अनेक वर्षांपासून हा प्रश्न आहे. कोणाच्या जमिनी कोणाच्या ताब्यात आहे हे तपासावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत पैसे भरण्यास सांगितले. २० टक्के विलंब शुल्क आकारण्यात आला, या बाबतही प्रश्न आहे. कोणताही विलंब शुल्क आकारण्यात येणार नाही. पुढील एक महिन्याच्या आत स्वतंत्र ७/१२

श्री. विजय वडेट्टीवार .....

आम्ही करुन देऊ. एक महिन्यानंतर हे काम झाले नाही तर सन्माननीय सदस्यांनी आमच्याकडे यायचे. त्यासाठी विशेष बैठक लावू. जो अधिकारी जबाबदार असेल... एवढया वर्षांपासून शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचे काम झालेले आहे. जमिनी दिल्या पण मालकी नाही, मालकी आहे पण कब्जा नाही. हे योग्य नाही. आम्ही हे गांभीर्याने घेतले आहे. मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना आश्वस्त करु इच्छितो. कोणत्याही परिस्थितीत एक महिन्यात ७/१२ करुन कब्जा देऊ, कब्जापट्टी करुन देऊ. न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करु, असा विश्वास मी देतो.

श्री. महेश शिंदे : अध्यक्ष महोदय, एक गोष्ट राहिली आहे. ज्यावेळी सन १९७९ मध्ये कब्जा दिला या नंतर सन १९९२ ते १९९५ मध्ये तेथील तलाठ्याने जाणीवपूर्वक जमिनीवर देवस्थान इनाम वर्ग २ लावले आहे. ते काढण्यासाठी आपल्याला कारवाई करावी लागेल. पुनर्वसनाकरिता जमिनी दिल्या व देवस्थान वर्ग २ लावले आहे. ही चुकीची गोष्ट आहे. या बाबत आपल्याला माननीय महसूल मंत्री यांच्याशी बोलावे लागेल असे मला वाटते.

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, जर या जमिनी देवस्थानच्या असतील व त्यांना मालकी दिलेली असेल तर माननीय महसूल मंत्री यांच्याकडे बैठक लावू. आपण तसे पत्र द्या. मी १०० टक्के खात्रीने सांगतो की, या मधून मार्ग काढण्यात येईल.

------

**पू. शी.** : साक्री तालुक्यातील ( जि. धुळे ) गावांतील शेतकऱ्यांना सन २०१८ खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीतील अनुदानाचे वाटप न होणे

**मु. शी. :** साक्री तालुक्यातील ( जि. धुळे ) गावांतील शेतकऱ्यांना सन २०१८ खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीतील अनुदानाचे वाटप न होणे या संबंधी श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती मंजुळा गावित ( साक्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"साक्री तालुक्यातील (जि.धुळे) म्हसदी, काळगांव, वसमार, घमनार, दातर्ती, ककाणी, भडगाव (वा.), शेवाळी (मा) या गावातील शेतकऱ्यांना सन २०१८ खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीतील अनुदान अद्यापही वाटप करण्यात न येणे, दिनांक ३० जुलै, २०१९ व दिनांक २२ ऑक्टोबर, २०१९ रोजी सहाय्यक संचालक (लेखा), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी शासनाकडे अनुदान मागणी प्रस्ताव सादर केलेला असणे, परंतू अद्यापही साक्री तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सन २०१८ खरीप हंगामातील नुकसानीपोटी अनुदान वाटप करण्याकरीता निधी उपलब्ध नसणे, परिणामी उक्त गावातील शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन करणे, धरणे आंदोलनाच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन शेतकऱ्यांना शासनाकडून निधी प्राप्त होताच अनुदान वाटप करण्यात येईल असे विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी, धुळे यांना कळविल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांना अनुदा

असुधारित प्रत

श्रीमती मंजुळा गावित ....

न वाटपाचे आश्वासन देणे, परंतू शासनाकडून अद्याप अनुदानाची रक्कम जिल्हाधिकारी, धुळे व तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांच्याकडे प्राप्त न होणे, परिणामी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये वाढत असलेली असुरक्षिततेची भावना व त्यामुळे निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाने तातडीने खरीप सन २०१८ हंगामात साक्री तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीत बाधीत शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान वाटप होण्यासाठी आवश्यक तो निधी मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

श्री विजय वडेट्टीवार ( मदत व पुनर्वसन मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्रीमती मंजुळा गावित : अध्यक्ष महोदय, माझ्या साक्री तालुक्यातील जि. धुळे म्हसदी, काळगांव, वसमार, घमनार, दातर्ती, ककाणी, भडगाव (वा.), शेवाळी (मा) या गावातील शेतकऱ्यांना सन २०१८ खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीतील अनुदान रु. ९७ कोटी २१ लाख रुपयांचे अद्यापही वाटप करण्यात आलेले नाही. शासनाकडे वारंवार या निधी वाटपासाठी मागणी सादर केलेली आहे. मात्र अद्यापही यावर आम्हाला उत्तर मिळाले नाही. आता मंत्री महोदयांनी जे लेखी उत्तर दिले आहे ते आम्हाला मान्य नाही. माझ्या तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांवर फार मोठा अन्याय झालेला आहे. वारंवार हे सर्व शेतकरी आंदोलने करीत असतात. शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे. माननीय मंत्री यांना माझी नम्र विनंती आहे की, सन २०१८ मधील खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीमधील ९७ कोटी २१ लाख रुपये अनुदान कधी देणार आहात ?

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, ही दुष्काळी परिस्थिती सन २०१८ मध्ये निर्माण झाली. त्यावेळेस १५१ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्यासाठी ८ सवलतीच्या घोषणा देखील झाल्या. त्या ८ सवलतींबाबत मी या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये नमूद केले आहे.

अध्यक्ष महोदय, ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्यास एसडीआरएफच्या निकषानुसार शासन मदत करीत असते. सन २०१८ मध्ये शेतकऱ्यांना जवळपास ५६८२ कोटी रुपयांची मदत उपलब्ध झाली व त्याचे वाटप देखील केले गेले. धुळे जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यातील काही गावांसाठी देखील २५४ कोटी रुपयांचे वाटप झाले.

अध्यक्ष महोदय, मग ही गावे का सुटली? तत्कालीन राज्य सरकारने सन २०१८ मध्ये स्वतंत्र निकष लावले होते. ते निकष असे होते की, सरासरी पाऊस ७५ टक्के किंवा ७५० मी.मी. पेक्षा कमी पाऊस असणे. त्या निकषात हे गाव बसत नव्हती. त्यामुळे त्यांना मदत मिळाली नाही. परंतु, दुष्काळी गाव, दुष्काळी तालुका म्हणून घोषित केल्यामुळे त्या गावांना जमीन महसूलात सूट देणे. सरकारी कर्जाचे पुनर्गठन करणे, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देणे, कृषी पंपांच्या चालू वीज बिलामध्ये ३३.५ टक्के सूट देणे, शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देणे इत्यादी ८ सवलती देण्याचे काम झाले होते.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर पुन्हा ५० टक्क्यांपेक्षा कमी आणेवारीचा निकष लावला गेला. ५० टक्क्यांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या ५४४९ गावांमध्ये दुष्काळ सदृश परिस्थिती घोषित केली होती. त्यामध्ये ही गावे येतात. तत्कालीन शासनाने सन २०१८ मध्ये तेथे दुष्काळ सदृश परिस्थिती घोषित करुन त्या योजना देण्याच्या घोषणा केल्या होत्या.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंजुळा गावित यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने मी त्यांना एवढेच सांगतो की, ते गाव दुष्काळी घोषित

श्री.विजय वडेट्टीवार ...

केले असले तरी, ३३ टक्क्यांपेक्षा अधिकच्या नुकसानीच्या निकषात मोडत नाही. त्यामुळे त्यावेळेस त्या गावांना मदत केली गेली नाही. मी आपल्याला खात्री देतो की, या संदर्भात मी पुन्हा अधिकची माहिती घेतो.

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेचे उत्तर समर्पकपणे देण्यासाठी, माहिती गोळा करण्याकरिता जो वेळ लागतो तो वेळ मिळाला नाही. अधिकाऱ्यांनी आता माहिती दिली किंवा आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडून ब्रिफिंग घेतले. लक्षवेधी सूचना रात्री लावली जाते व दुसऱ्या दिवशी त्यावर चर्चा होते. त्यामुळे त्या संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून आम्ही चर्चा करु शकत नाही. त्याकरिता वेळ मिळत नाही. आपल्याकडे सन्माननीय सदस्यांचा आग्रह असतो. परंतु, वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता देखील कालावधी लागतो.

अध्यक्ष महोदय, काल रात्री ११.०० वाजता लक्षवेधी सूचना दर्शविण्यात आली व त्यावर आज उत्तर द्यायचे म्हटले तर सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांचे समाधान होईल, अशा प्रकारचे उत्तर देणेही जरा कठीण होते. आमची आपल्याला विनंती आहे की, मंत्री महोदयांना देखील थोडासा कालावधी दिला पाहिजे. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांचे माहिती दिल्यानंतर समाधान झाले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्यावर समाधानकारक उत्तर नसणे यामुळे त्या प्रश्नांना, विषयाला न्याय देण्यामध्ये देखील मोठी अडचण निर्माण होते.

अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्या श्रीमती मंजुळा गावित यांना या निमित्ताने सांगतो की, ही गावे जरी या निकषात बसत नसली तरी, जे काही निकष आहेत ... कारण आम्ही सर्व तपासल्यानंतर आपण उल्लेखित केलेली गावे ही केंद्र सरकारच्या, एसडीआरएफच्या निकषात बसत नाहीत. परंतु, त्या ८ सवलतींमध्ये जर कुठे कमीजास्तपणा झाला असेल, तर त्या सर्व सवलती लागू करण्यासाठी आम्ही पुन्हा संबंधित अधिकाऱ्यांना सांगू. परंतु, निकषात बसत नसल्यामुळे त्यावेळेस

श्री.विजय वडेट्टीवार ...

सन २०१८ मध्ये मदत होऊ शकली नाही आणि आता ही मदत मिळणे नक्कीच अडचणीचे आहे, हे देखील मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

श्रीमती मंजुळा गावित : अध्यक्ष महोदय, माझ्या धुळे जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांना मदत मिळालेली आहे. फक्त एकमेव माझ्या साक्री तालुक्यातील कुठल्याही गावांना मदत मिळालेली नाही. त्यामुळे मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण पुन्हा तपासणी करुन घ्यावी व माझ्या येथील बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा. धन्यवाद.

श्री.विजय वडेट्टीवार : होय अध्यक्ष महोदय.

............

असुधारित प्रत

**पृ. शी. :** शासनाच्या महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेले सुमित कुमार, उप संचालक तथा मुख्य तपास अधिकारी, सुरक्षा व अंमलबजावणी यांच्याकडून महावितरणमधील मिटर रिडींग एजन्सी तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीर पैशाची मागणी करीत असणे

**मु. शी. :** शासनाच्या महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेले सुमित कुमार, उप संचालक तथा मुख्य तपास अधिकारी, सुरक्षा व अंमलबजावणी यांच्याकडून महावितरणमधील मिटर रिडींग एजन्सी तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीर पैशाची मागणी करीत असणेया संबंधी सर्वश्री ज्ञानराज चौगुले, सुनिल प्रभू, अबू आजमी, सुभाष धोटे, अमित झनक, बळवंत वानखडे, वि.स.स., यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स.नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

श्री.ज्ञानराज चौगुले....

"शासनाच्या महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेले सुमित कुमार, उप संचालक तथा मुख्य तपास अधिकारी, सुरक्षा व अंमलबजावणी यांच्याकडून महावितरणमधील मिटर रिडींग एजन्सी तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीर पैशाची मागणी करीत असणे, विविध अधिकारी कर्मचाऱ्यांना धमकावणे, याबाबतची रेकॉडिंग क्लिप तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांना दाखविल्यानंतर त्याची शिक्षा म्हणून त्यांची केवळ बदली करण्यात येणे, परंतु आता परत त्यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी आर्थिक संगनमत करून मुख्य तपास अधिकारी पद बळकावणे, सुमित कुमार यांच्या विरोधात कल्याण परिमंडळाअंतर्गत नैतिक अधिपतनाच्या तक्रारी प्राप्त होणे, यासर्व प्रकरणी पारदर्शक चौकशी होण्यासाठी त्यांना निलंबित करून त्यांची भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यामार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, तसेच यापूर्वी शासनाकडे दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० रोजी तत्कालीन संचालक, दिनेशचंद्र साबु यांचे बाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यांचीही भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यामार्फत चौकशी करण्यात न येणे, याप्रकरणी वरिष्ठ अधिका-यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने याप्रकरणी तातडीने चौकशी करुन दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता."

डॉ.नितीन राऊत (ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..............

श्री.ज्ञानराज चौगुले : अध्यक्ष महोदय, श्री.सुमित कुमार यांच्या विरोधात अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदारांना धमकावण्याच्या बाबतीतील तक्रारी प्राप्त आहेत असे मी या लक्षवेधी सूचनेत नमूद केले होते. या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनात मंत्री महोदयांनी तशा काही तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत, असे नमूद केले आहे. मला यावर उप प्रश्न विचारावयाचा आहे. मंत्री महोदय आपण आपल्या लेखी निवेदनातच नमूद केले आहे की, "श्री.सुमित कुमार सुरुवातीला कोकण परिक्षेत्र नंतर वाशिम मंडळ आणि नागपूर परिक्षेत्र कार्यालयात उप संचालक, सुरक्षा व अंमलबजावणी या पदावर कार्यरत होते".... त्यांची वाशिम येथे बदली करण्यात आली होती की नाही, कोणत्या कारणावरुन त्यांची वाशिम येथे बदली करण्यात आली होती?

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.ज्ञानराज चौगुले यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, ते सुरुवातीला केंद्र सरकारच्या पोलीस सेवेत होते. तेथून सरळसेवेने ते आमच्या येथे आले. त्यानंतर आम्ही त्यांना उप संचालक, सुरक्षा व अंमलबजावणी या पदावर दि. १.१२.२००८ रोजी रुजू केलेले होते.

अध्यक्ष महोदय, वीज चोरीस आळा घालण्याच्या दृष्टीने कार्यप्रणाली नियंत्रित करणे व इतर संलग्न कामकाजाची देखरेख व नियंत्रण ठेवणे ही त्यांची प्रामुख्याने कामे असायची. सन्माननीय सदस्य श्री.ज्ञानराज चौगुले यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्यामध्ये तथ्य आहे. या अगोदर ते कल्याण येथे कार्यरत होते तेव्हा त्यांच्याबद्दल काही तक्रारी आल्या. त्या तक्रारींच्या अनुषंगाने त्यांची बदली वाशिम येथे करण्यात आली होती. ती तक्रार अशी होती की, महावितरणच्या विविध अधिकाऱ्यांकडून पैशाची मागणी करणे. त्याची रेकॉर्डिंग केली गेली होती. त्याची क्लिप देखील तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक व अध्यक्ष यांच्याकडे सोपविण्यात आली होती. परंतु, काही कारणास्तव त्यावेळेस या प्रकरणाची सारवासारव झाल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे. पनिशमेंट पोस्टींग म्हणून त्यांची वाशिम येथे पोस्टींग करण्यात आली होती. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप त्यावेळेस लावण्यात आलेला होता.

असुधारित प्रत

श्री.ज्ञानराज चौगुले : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप होता म्हणून त्यांना वाशिमला पोस्टींग देण्यात आली असे सांगत आहेत. ते आता सध्या कोठे कार्यरत आहेत? त्यांचा कारभार पाहिला तर आपल्या नाशिक विभागात काम करीत असताना ग्रामीण भागात सन २००९ ते २०१९ या कालावधीत फक्त ग्रामीण भागातील ग्राहक ३८६२ असताना त्यांनी ते १८६०८ दाखविले. याचा अर्थ १४७४६ जास्तीचे ग्राहक दाखवून प्रती ग्राहक २ रुपये याप्रमाणे त्याचा फायदा त्यांनी लाटला. ही रक्कम जवळजवळ २५ लक्ष रुपयांपर्यंत जाते. अशा गैरकारभार करणाऱ्या अधिकाऱ्याला तुम्ही पुन्हा क्रिम पोस्टवर देऊन, पुन्हा चौकशी अधिकारी म्हणून नेमून पुन्हा त्याचा फायदा करण्याचे ठरविले आहे काय, मंत्री महोदयांचा त्याला सपोर्ट आहे का, अशा अधिकाऱ्यांना तुम्ही निलंबित का करीत नाही?

अध्यक्ष महोदय, वारंवार वेगवेगळ्या विभागात गैरकारभार करणाऱ्याला प्रथम निलंबित करुन त्याची चौकशी करावी. या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, आता अहवाल आला आहे. हा अहवाल लक्षवेधी सूचना लागल्यानंतर प्राप्त झाला की, तुम्ही त्याची चौकशी लावण्यास सुरुवात आता केली, तुम्ही त्याच्याबाबत नेमके काय करणार?

नंतर श्री.शिंदे ..

श्री.प्रकाश सुर्वे : अध्यक्ष महोदय, श्री.सुमित कुमार हे वारंवार विदेश प्रवास करतात व त्याकरिता विभागातील सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घेत नाहीत, ते शासनाचे पैसे मनमानीपणे खर्च करतात, ही दादागिरी आहे. मंत्री महोदयांनी त्यांचा पासपोर्ट तपासून पहावा. त्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी करण्यात यावी व गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी माझी मागणी आहे. त्यांच्या शिक्षणापेक्षा मोठे पद त्यांना देण्यात आले आहे. हे तर शाळेतील शिपायाला प्राचार्याचे पद देण्यासारखे झाले. मंत्री महोदयांनीही आताच सांगितले आहे की, सदरहू अधिकाऱ्याच्या संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. हा अधिकारी शासनाचा जावई आहे काय, त्याचावर कारवाई का करण्यात येत नाही ?

श्री.अमित झनक : अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने वाशिम जिल्हा हा आकांक्षित जिल्हा घोषित केला आहे. आमच्या जिल्ह्यामध्ये एवढ्या मोठ्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली, हे आम्ही आमचे भाग्य समजले पाहिजे. परंतु तसे झाले नाही. वाशिम जिल्ह्यात सदरहू अधिकाऱ्याच्या स्तराचे पद नसतानाही त्यांना नेमणूक देण्यात आली, हे खरे आहे काय ? त्यांचा उक्त जिल्ह्यास काडीचाही फायदा झाला नाही. शासन व मंत्री महोदय शेतकरी व त्यांच्या वीजेच्या प्रश्नांवर उपाययोजनासाठी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी अशा अधिकाऱ्यांनी मदत केली पाहिजे. सदरहू अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

प्रा. डॉ.अशोक ऊईके : अध्यक्ष महोदय, श्री.सुमित कुमार व श्री.इंदलकर यांना तत्काळ निलंबित करण्यात यावे व त्यांना पाठीशी घालणारे संचालक, मानव संसाधन, उप सचिव, मंत्रालय व सीएमडी यांची चौकशी करुन सदरहू प्रकरण एसीबीकडे देण्यात येईल काय ?

श्री.बळवंत वानखडे : अध्यक्ष महोदय, श्री.सुमित कुमार यांच्यावर फार गंभीर आरोप आहेत. त्यांच्या विरुध्दच्या अनैतिक अध:पतनाच्या तोंडी व लेखी तक्रारींवर विशाखा समितीच्या माध्यमातून चौकशी करण्यात आली नाही, ती करण्यात यावी.

श्री.बळवंत वानखडे...

सदरहू समिती नेमली नसेल तर त्याची कारणे काय आहेत, उक्त समिती नेमून तिच्या माध्यमातून सदरहू अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील काय ? श्री.सुमित कुमार यांचे सख्खे मेव्हणे श्री.रवि प्रकाश यांची डीएसके लिगल ही कंपनी आहे. या कंपनीला काम देऊन कोट्यावधी रुपयांचा घोटाळा श्री.सुमित कुमार यांनी केला आहे. त्यांचेसह सदरहू कंपनीचीही चौकशी करण्यात येईल काय ?

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी देतो. श्री.सुमित कुमार हे उप संचालक, सुरक्षा व अंमलबजावणी, कोकण प्रादेशिक कार्यालय येथे कार्यरत आहेत. त्यांना मुख्य तपास अधिकारी या पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी दुसरा प्रश्न विचारला त्याचे मी उत्तर देतो. श्री.सुमित कुमार यांनी विदेशामध्ये प्रवास केला असेल तर सदरहू बाब तपासून घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांच्या तिसऱ्या प्रश्नात मांडलेल्या बाबींचा विचार करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी चौथा प्रश्न विशाखा समितीच्या संदर्भात उपस्थित केला असून तो ही गंभीर आहे. प्रत्येक कार्यालयामध्ये विशाखा समिती गठीत करण्यात आलेली असते. माननीय उच्चतम न्यायालयाच्या निदेशानुसार महिला अधिकाऱ्यांची समिती नेमलेली असते. त्यामध्ये नैतिक अध:पतन हा महत्त्वाचा विषय हाताळला जातो. अनेक महिला कर्मचारी यांनी श्री.सुमित कुमार यांच्या विरुध्द तक्रारी केल्याचे सकृतदर्शन दिसून येत आहे. यामुळे श्री.सुमित कुमार यांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश देण्यात येत आहेत. त्यांच्या विरुध्द उच्चस्तरीय कारवाई करण्याबाबत आदेश देण्यात येतील.

असुधारित प्रत

डॉ.नितीन राऊत...

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये दुसरा विषय श्री.दिनेशचंद्र साबू, तत्कालीन संचालक, महावितरण यांच्या संदर्भातील आहे. त्यांच्या भ्रष्टाचार, वीज खरेदी घोटाळा, भूखंडात गैरव्यवहार, पावर ट्रेडींग, या प्रकरणांच्या तक्रारी संदर्भात चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. श्री.दिनेशचंद्र साबु आता आमच्या विभागाच्या सेवेत नाहीत. त्यांच्या संदर्भात पहिली तक्रार दिनांक ३ जून, २०२० रोजी, दुसरी तक्रार दिनांक ९ सप्टेंबर, २०२० रोजी, तिसरी तक्रार दिनांक १३ सप्टेंबर, २०२० रोजी, चौथी तक्रार दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये वीज खरेदी घोटाळा, शेतकऱ्यांच्या वीज देयकात घोटाळा, टोरंटो पावर घोटाळा, अपसंपदा भ्रष्टाचार व अपहार इत्यादी बाबत उल्लेख करण्यात आला आहे. त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करुन गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यांनी ३,५०० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचे दिसते. माझ्याकडे अपर महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र आहे. त्यात नमूद करण्यात आले आहे की, सकृतदर्शनी या तक्रारींमधील आरोपांमध्ये तथ्य आढळून येत आहे. मी यापूर्वीच्या एका लक्षवेधी सूचनेस उत्तर देताना सांगितले होते की, पावर ट्रेडींगमध्ये मोठा घोटाळा झाला होता व विकासकाला ॲडजस्ट करण्यात आले होते. ३,५०० कोटी रुपयांचा अपहार केल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले. त्यामुळे मी तत्कालीन संचालक श्री.दिनेशचंद्र साबु यांची प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश देत आहे. ते त्यावेळी महावितरण कार्यालयामध्ये कार्यरत असल्याने त्यांची प्राथमिक चौकशी महावीज निर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली होईल. उक्त चौकशी झाल्यानंतर तो अहवाल तत्काळ ईओडब्ल्यू किंवा एसीबी यांना सादर करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

------------

असुधारित प्रत

## लक्षवेधी सूचना क्रमांक ४,५ व ६ पुढे ढकलण्याबाबत

**उपाध्यक्ष** : आजच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक एक वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक ४,५ व ६ पुढे ढकलण्यात येत आहेत.

श्री.प्रकाश सुर्वे : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक ५ च्या निवेदनामध्ये सभागृहाची दिशाभूल करणारी उत्तरे देण्यात आली आहेत.

**उपाध्यक्ष** : याबाबत मंत्री महोदय आल्यानंतर विचार करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**मु. शी. :** पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना या संबंधी ॲड. राहूल कुल, सर्वश्री. जयकुमार गोरे, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. महेश लांडगे, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

ॲड.राहूल कुल (दौंड) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी दहा किलोमिटर परिसरात रस्त्यांचे सुयोग्य जाळे (रोड नेटवर्क प्लॅन) तयार करण्याचा निर्णय शासनाच्या नगरविकास विभागाने सन २०१३ मध्ये मंजूर केला असणे, या रस्त्यांच्या जाळयानुसार या दोन्ही महापालिका हद्दीलगतच्या परिसरात सुयोग्य रस्त्यांचे जाळे निर्माण करून या महानगरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी एक चांगले पाऊल शासनाने उचलले असणे, तसेच प्लॅन नुसार कित्येक रस्त्यांची कामे शासनाने अद्याप सूरू केलेली नसणे, सुरु केलेली कामे अपूर्ण असल्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत असणे, पुणे शहरात दररोज लाखो वाहने प्रवेश करत असल्याने, प्रवेश करण्याच्या सर्व ठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, तदनंतर सन २०१५ मध्ये स्थापन झालेल्या पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण तसेच महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांनी पुणे महानगरच्या ५०

ॲड.राहूल कुल...

किलोमिटर परिसरात पुणे शहराच्या वर्तुळाकार दोन वेगवेगळे रिंग रोड प्रस्तावीत करून अद्यापही या दोन्ही रिंग रोड बाबत वारंवार फक्त घोषणा झालेल्या असून कोणताही ठोस निर्णय झालेला नसणे, पुणे शहरातील स्वारगेट ते हडपसर, येरवडा ते उबाळे नगर या मार्गावर तयार करण्यात आलेली बीआरटीची योजना संपुर्णपणे फसलेली असल्याने या रस्त्यावर सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असणे, पुण्याच्या खडकवासला येथील वारजे, सिंहगड रोड, भूमकर चौक, नवले पुल ते कात्रज या परिसरात सर्विस रस्त्यावर नागरिकांनी केलेल्या अतिक्रणामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असणे, चुकीच्या ठिकाणी असलेले दुभाजक, नागरिकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी तयार केलेले बेकायदेशीर दुभाजक यामुळे देखील सामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असणे, पुणे युनिव्हर्सिटी परिसरातील पुल तोडल्याने त्या ठिकाणी देखील वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, या रस्त्याचे नव्याने नियोजन करण्याची आवश्यकता असणे, रस्त्यासाठी घोषित केलेल्या उड्डाणपूलाच्या कामासाठी अद्याप कोणतीही तरतूद झालेली नसणे, पुणे व पिंपरी व लगतच्या परिसरात मेट्रो प्रकल्पांची कामे संथ गतीने चालू असून नव्याने मांजरी ते हिंजवडी, फुरसुंगी - स्वारगेट - खडकवासला, वनाज - रामवाडी - वाघोली - रांजणगाव गणपती, निगडी - भोसरी – चाकण, हडपसर – लोणीकाळभोर या प्रस्तावित मेट्रो मार्गांचे बृहत आराखडे तयार करून सदर मेट्रो मार्गांना तातडीने मान्यता मिळण्याची आवश्यकता, नेहमीच्या होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांच्या मनात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

ॲड.राहूल कुल : अध्यक्ष महोदय, पुणे शहर हे देशातील एक मोठे शहर असून ७ व्या क्रमांकाची वाहतूक कोंडी असलेले शहर म्हणून देशात ओळखले जाते. माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये सविस्तर उल्लेख केला आहे. महानगरपालिका स्तरावरुन वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने फारसे नियोजन करण्यात आले नाही. सन २०१३ मध्ये एक रोड नेटवर्क प्लॅन तयार करण्यात आला आहे. परंतु त्यादृष्टीकोनातून पुढील पावले उचलण्यात आली नाहीत. त्यामुळे ही वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. यामध्ये हडपसर येथील उड्डाणपूल नादुरुस्त झाल्याने भर पडली आहे. पुणे विद्यापीठाचा उड्डाणपूल का पाडला हे आम्हाला समजले नाही. प्रशासनाकडून सकारात्मक ऐवजी नकारात्मक निर्णय घेण्यात येत आहेत. यासंदर्भात तातडीने शासनाने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे.

श्री.तेलंग....

असुधारित प्रत

ॲड. राहुल कुल........

माझे तीन प्रश्न आहेत. सन २०१३ मध्ये शासनाने जो रस्ते आराखडा तयार केलेला आहे, त्याबाबतची निविदा कधीपर्यंत काढण्यात येणार आहे, तसेच तो आम्हाला प्रत्यक्षात कधी पाहायला मिळणार आहे, हा माझा पहिला प्रश्न आहे. माझा दुसरा प्रश्न राष्ट्रीय महामार्गासंदर्भात आहे. जे राष्ट्रीय महामार्ग शहराला जोडलेले आहेत, त्यांची वाहतूक कोंडी कमी करण्यासंदर्भात काही गोष्टी करणे आपल्या विचाराधीन आहे काय ? आता सुरू होणारी मेट्रो PMRDA च्या शेवटच्या टोकापर्यंत नेण्यासाठी काही निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सन्माननीय सदस्यांनी विशेष असे तीन प्रश्न विचारलेले आहेत. सन २०१३ साली रस्ते आराखडा तयार करण्यात आला होता. त्यानंतर सन २०१८ साली Comprehensive Mobility Plan (CMP) तयार करण्यात आलेला आहे. PMRDA क्षेत्रातील जे काही अर्बन क्षेत्र आहे त्यासाठी हा CMP आराखडा आहे. त्या अनुषंगानेच भविष्यातील पादचारी वाहतुकीपासून ते मेट्रो, बसेस या सगळ्यांचे पूर्ण नियोजन सदर CMP मध्ये करण्यात आलेले आहे. सन २०१३ च्या आराखड्यापेक्षा हा आराखडा जास्त comprehensive आहे. भविष्यातील जे काही नियोजन केली जातील ती या आधारेच केली जाणार आहेत. सदर आराखडा दर पाच वर्षाला सुधारित केला जाणार असला तरी पुढील सर्व मेट्रोचे जाळे, रस्ते हे त्याआधारेच होणार आहेत, याबाबतची माहिती सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करून दिली जाईल.

सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न अवजड वाहतुकीच्या संदर्भात होता. शहराबाहेर जाणारी अवजड वाहतूक जसे की अहमदनगरहून मुंबईला जाणारी असेल किंवा अहमदनगरहून सातारा, सोलापूरकडे जाणारी असेल त्यामुळे शहरामध्ये जी काही वाहतुकीची कोंडी होते, सदर वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी दोन रिंगरोड प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये बाह्य रिंगरोड आणि आतील रिंगरोडचा समावेश आहे. मला या ठिकाणी सांगायला आनंद होईल की आदरणीय उप मुख्यमंत्री यांच्या इनिशिएटिव्हने, त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे सदर प्रकरणी बऱ्यापैकी

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे........

प्रगती झालेली आहे. अर्थमंत्री महोदय यांनी या अर्थसंकल्पामध्ये बाह्य वळण रस्त्याकरिता जवळपास १ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद देखील केलेली आहे. या संदर्भातील पर्यावरणाच्या बाबतीतील ज्या काही बाबी आहेत त्या बऱ्यापैकी पार पाडण्यात आलेल्या आहेत. ज्या कायद्यानुसार भूसंपादन होणार आहे, त्याचे बरेचसे टप्पे पार पाडलेले आहेत. याबाबतची सविस्तर माहिती निश्चितपणे आपल्याला नेटवर उपलब्ध करून देण्यात येईल. सदर प्रकल्प कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आलेली आहेत. त्यासाठी निधीची तरतूद केलेली आहे. भूसंपादनाची तरतूद देखील झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, मेट्रोच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर सध्या जी महामेट्रोचे दोन मार्ग आणि PMRDA मागील एक मार्ग प्रस्तावित आहेत, त्याचे कामही प्रगतीपथावर आहे. उर्वरित जे विस्तारित आहेत त्याचे DPR तयार करून काही शासनाकडे पाठविण्यात आलेले आहेत. काही केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेले आहेत. शिल्लक असलेले DPR चे काम देखील प्रगतीपथावर आहे.

श्री.सुनिल टिंगरे : अध्यक्ष महोदय, आजच्या लक्षवेधी सूचनेमध्ये उल्लेख केलेला अहमदनगर रोड हा प्रामुख्याने माझ्या मतदारसंघातून जातो. ज्यावेळेस वाहतूक सर्व्हे करण्यात आला होता, त्यावेळेस पुणे शहरातील सर्वात जास्त वाहतूक कोंडीचा रस्ता म्हणून अहमदनगर रस्ता जाहीर करण्यात आला होता. सदर रस्त्यावर एअरपोर्ट, मोठमोठे आयटी पार्क आहेत. पंचातारांकित हॉटेल्स आहेत तसेच रांजणगाव MIDC ला जाणारा रस्ता देखील आहे. सदर रस्त्यावर खूप मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याकारणाने माननीय उप मुख्यमंत्री यांनाही याचा फटका बसलेला आहे.

अध्यक्ष महोदय, माझे स्पेसिफिक तीन ते चार प्रश्न आहेत. महानगरपालिकेच्या हद्दीत असणारा १२ किलोमीटरचा नगर रोड राष्ट्रीय महामार्ग म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे. पुणे ते शिक्रापूर जाणारा श्री टायर उड्डाणपूल हा पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये करण्यासाठी राज्य सरकारकडून पाठपुरावा केला जाईल

श्री.सुनिल टिंगरे........

काय ? नगर रोडवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असल्याकारणाने काही वर्षापूर्वी BRT बांधली गेली होती. वाहतूक मोठ्या प्रमाणावर असून सुद्धा BRT चा मार्ग मोकळा असतो. बाजूचा मार्गावर मात्र वाहतुकीची कोंडी होत असते. सदर वाहतूक कोंडीमध्ये बऱ्याच वेळा रुग्णवाहिका अडकून काहींना आपले जीव गमवावे लागलेले आहेत. मुलांना शाळेत जाण्यासाठी देखील अडचणी निर्माण होतात. काही जणांचे एअरपोर्ट फ्लाईट देखील मिस झालेल्या आहेत. अस्तित्वात असलेल्या BRT चा उपयोग सध्या महानगरपालिकेमध्ये कोणत्याही पद्धतीने केला जात नाही, ती काढली जाईल काय ? तिसरी बाब अशी आहे की, नगर रोडचा भार कमी करण्यासाठी त्याला समांतर असलेला नदीकाठावरील शिवणे-खराडी रस्त्याचे काम मागील १३ वर्षापासून चालू आहे पण ते अजूनही पूर्ण झालेले नाही. काही खाजगी लोकांनी सदर रस्ता अडवून ठेवला आहे. त्यासाठी राज्य सरकार महानगरपालिकेला काही निर्देश देईल काय ? सदर रस्ते ताब्यात घेतले जातील काय ? किंवा रस्ते ताब्यात न दिल्यामुळे विकासकाला खुंट बसते त्यामुळे रस्ते संपादन करण्यासाठी नियमावलीमध्ये काही बदल करून बंधनकारक पद्धतीने संपादन करण्यासाठी काही नियम करण्यात येतील काय ? पुणे – नगर रोडवर असलेली मेट्रो येरवड्यापासून कल्याणनगरला वळविण्यात येऊन ती रामवाडीपर्यंत आहे. सदर मेट्रो वाघोलीपर्यंत प्रस्तावित आहे. सदर मेट्रो शिक्रापूर, शिरूरपर्यंत नेली जाईल काय ? असा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महादोय, महानगरपालिकेने अनेकवेळा आपल्या अर्थसंकल्पामध्ये कुठे उड्डाणपूल तर कुठे अंडर पासेसच्या तरतुदी केलेल्या आहेत. या केवळ दिशाभूल करण्यासाठी आहेत की खरोखरच त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. याबाबत राज्य शासन महानगरपालिकेला काही दिशानिर्देश देणार आहे आहात काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक म्हणता म्हणता बरेच प्रश्न विचारलेले आहेत. पहिला जो विषय शिक्रापूरपर्यंतचा आहे त्यावर राज्य सरकार

श्री.प्राजक्त तनपुरे........

सकारात्मक विचार करीत आहे. दुसरा विषय BRT मुळे वाहतूक कोंडी जास्त प्रमाणात वाढलेली आहे. त्याच मार्गावर जेव्हा मेट्रो कार्यान्वित होईल, त्यावेळेस सदर मार्ग हा BRT म्हणून वापरला जाणार नाही. महानगरपालिकेतील संपादनाच्या बाबतचा आपला जो विषय आहे त्याबाबत महानगरपालिकेसोबत आपली बैठक आयोजित करण्याचा विचार करण्यात येईल. आपण असा मुद्दा मांडला की एअरपोर्टला जाण्यासाठी अडचणी येतात आणि काही लोकांच्या फ्लाईट मिस होतात. आतील रिंगरोडचा एक टप्पा हा प्राथमिकतेने करण्यासाठी त्याबाबतची निविदा एक महिन्याभरापर्यंत प्रसिद्ध करण्यात येणार आहे. सदर रस्ता एअरपोर्टकडे जाण्यासाठीच सोयीचा असणार आहे. केवळ नगरमधील लोकांनाच नाही तर मुंबई, हिंदेवाडीवरून येणाऱ्या लोकांना देखील या रस्त्याची मदत होणार आहे. यादृष्टीने आतील रिंगरोडचा एक टप्पा PPT तत्वावर आधारित एक महिन्यात त्याची निविदा काढली जाईल.

अध्यक्ष महोदय, आपण अजूनही काही प्रश्न विचारलेले आहेत त्या संदर्भात आपल्यासोबत एक बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, पुण्यातून नगरकडे जाण्याच्या बाबतीत ज्यावेळी प्रश्न निर्माण होतो, वाढत्या शहरीकरणामुळे, हद्दवाढ झाल्याचा परिणाम यामुळे वाहतुकीची कोंडी दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. लोकसंख्येची घनता दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. वाघोलीपासून रांजणगाव किंवा शिक्रापूरपर्यंत फ्लायओव्हर करावा असा एक प्रस्ताव होता. ज्यावेळेस सर्व्हेक्षण झाले त्यावेळेस वापरात असलेले रस्ते भूसंपादित केल्या गेले. त्यामुळे सदर रस्त्याची वाहतूक देखील मुख्य रस्त्यावर आलेली आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित फ्लायओव्हरचे काम तत्काळ हाती घेण्यात येणार आहे काय ? ज्या वेगाने शहरीकरण होत आहे त्यासाठी सर्व्हिस रोडची आवश्यकता आहे. सर्व्हिस रोड तयार करण्यासाठी आपण काही विचार करणार आहात काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सन्माननीय सदस्यांनी पुणे शहरापासून नगरकडे जाण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर वाहतूक असल्याचा विषय घेतलेला आहे. व्यक्तिगतरीत्या या बाबीचा अनुभव मी अनेकवेळा घेतलेला आहे. फ्लायओव्हर करण्याचा जो प्रस्ताव आहे त्यावर DPR बनविण्याचे काम चालू आहे. सदर काम अत्यंत जलद गतीने करण्याच्या सूचना देण्यात येतील. तसेच सर्व्हिस रोडचा देखील सकारात्मकपणे विचार करण्यात येईल.

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. भिमराव तापकीर : अध्यक्ष महोदय, पुणे शहर आणि उपनगरामध्ये वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. खरे तर पुणे शहरातून स्वारगेट ते कात्रज मेट्रोच्या प्रस्तावाचा आराखडा तयार करुन नगर विकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे. सदरहू प्रस्तावाला माननीय मंत्री मंजुरी देणार आहेत काय ? पुणे शहरातील सिंहगड रोड याठिकाणी राजाराम पूल ते फ्रंटटाईम थिएटर येथे उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. त्याच्या बाजुला पर्यायी रस्ते तयार करणे अतिशय महत्त्वाचे आहे. जसे आता सांगण्यात आले आहे की, कऱ्हाडी ते शिवनेरी या रस्त्याचे काम मागील १३ वर्षापासून प्रलंबित आहे. या कामाला गती देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत काय ? राजाराम पूल ते फ्रंटटाईम थिएटर येथे उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. या अधिवेशनामध्ये मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, स्वारगेट ते खडकवासला हा मेट्रो प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. येथे उड्डाणपुलाचे काम सुरु आहे आणि तेथे आता मेट्रो प्रकल्प प्रस्तावित आहे. महानगरपालिका आणि मेट्रो प्रकल्पाचे अधिकारी यांचा या कामामध्ये समन्वय नाही. तेथे आता मेट्रो प्रस्तावित आहे. असे असताना सध्या तेथे उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. उड्डाणपुलाचे काम सुरु असताना मेट्रोच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन प्रस्तावित असलेले मेट्रोचे नियोजन कशा प्रकारे करण्यात येणार आहे, याची माहिती घ्यावी. तिसरे असे की, काही गावे पुणे महानगरपालिकेमध्ये सन १९९७ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. या गावांचा डीपीआर तयार करण्यात आला आहे. त्या विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेले रस्ते अद्यपापर्यंत पूर्ण झालेले नाहीत. ते रस्ते पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात येणार आहेत काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय विस्तृतपणे तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. सिंहगड रोडवरील पुलाचे काम सुरु आहेत. तेथे पर्यायी रस्ते करण्याचे काम प्राधान्याने हाती घेण्यात येईल. तसेच त्यांनी सांगितले की, स्वारगेट ते खडकवासला मेट्रो प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. येथे उड्डाणपुलाचे काम सुरु आहे आणि तेथे आता मेट्रो प्रकल्प प्रस्तावित आहे. मेट्रोच्या विस्तारीत प्रकल्पांच्या प्रस्तावांचे डीपीआर तयार करण्याचे काम सुरु आहे. डीपीआर तयार करीत असताना हा विषय लक्षात घेतला असणार आहे. जरी

श्री. प्राजक्त तनपुरे .....

ही बाब लक्षात घेतली नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत पुन्हा एकदा सखोल विचारणा केली जाईल. परंतु मला खात्री आहे की, उड्डाणपूल आणि प्रस्तावित मेट्रो लक्षात घेऊन तो डीपीआर तयार केला असेल. असे झाले नसेल तर आपण सांगितल्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांसोबत मी बैठक आयोजित करतो.

**उपाध्यक्ष :** लक्षवेधी सूचना क्रमांक ८, ९,१० या थोड्या वेळाकरिता पुढे ढकलण्यात येतील. त्यापूर्वी लक्षवेधी सूचना क्रमांक ११ चर्चेला घेण्यात येईल.

------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** कर्नाळा नागरी सहकारी बँक पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आर्थिक अनियमिततेसंबंधी दोषींवर करावयाची कारवाई

**मु.शी. :** कर्नाळा नागरी सहकारी बँक (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आर्थिक अनियमिततेसंबंधी दोषींवर करावयाची कारवाई या संबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

अस्सुधारित प्रत

श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, कर्नाळा नागरी सहकारी बँक पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) यांच्या दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या तपासणीमध्ये बँकेने मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणामध्ये गंभीर आक्षेप नोंदविल्याचे निदर्शनास आले असणे, दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजी कर्नाळा बँकेने केलेल्या कर्ज व्यवहाराचे विशेष लेखा परिक्षण करण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने कळविले असणे, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या आदेशान्वये जिल्हा विशेष लेखा परिक्षक यांनी लेखा परिक्षण करुन बँकेचे अध्यक्ष, संचालक व पदाधिकारी यांनी संगनमताने केलेल्या विनातारणी, गैरविनियोग व गैर व्यवहारामुळे सभासद, बँकेचे ठेवीदार व खातेदार यांच्या ठेवी धोक्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले असणे, महाराष्ट्र अधिनियम १९६० तसेच भारतीय दंड

श्री. प्रशांत ठाकूर ....

संहितेनुसार गुन्हा दाखल करण्याची जिल्हा विशेष लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेली असणे, उक्त बँकेचे अध्यक्ष व संचालक यांच्याविरोधात पनवेल शहर पोलिस ठाणे, गु.र.क्र.७८/२०२० भादवी कलम ४०९, ४१७, ४२०, ४६३, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ सह सहकारी संस्था अधिनियम कलम १४७ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केला असणे, दाखल केलेल्या गुन्ह्यात ६७ बनावट प्रकरणांची व्याजासह रक्कम रू.५४३,६१,४९,३७२/- रूपये व नमुद गुन्हयातील ५०,६८९ ठेवीदारांची रू.५२९,७२,४०,८७९.९३ ठेवी असणे, उक्त बँकेचे ठेवीदार ५०,६८९ असून त्यांचे केवायसी कागदपत्र प्राप्त करण्याचे व त्यांची यादी बनविण्याचे काम सध्या बँक व्यवस्थापनाकडून सुरू असणे, फिर्यादीतील ७६ व निष्पन्न ०९ असे एकूण ८५ आरोपींविरूद्ध पुरावा गोळा करण्याचे काम सुरू असणे, जवळपास ५ ते ६ महिन्यांचा कालावधी होऊनसुध्दा बँकेतील खातेदार व ठेवीदारांना बँकेत ठेवलेली रक्कम मिळाली नसणे, तसेच बँकेतील हजारो रुपयांच्या घोटाळयात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या संचालक व अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई झाली नसणे, त्यामुळे खातेदार व ठेवीदारांमध्ये शासनाच्या विरोधात निर्माण झालेली चिड व असंतोषाच्या भावनेबाबत बँकेतील खातेदार व ठेवीदारांना त्यांची बँकेत ठेवलेली रक्कम तातडीने देण्याबाबत व सदर गैरव्यवहारात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या संचालक व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावयाची नितांत गरज त्यावर शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना.

श्री. बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**(प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. प्रशांत ठाकूर : अध्यक्ष महोदय, मी कर्नाळा नागरी सहकारी बँक, पनवेल संदर्भात यापूर्वीही सभागृहात प्रश्न उपस्थित केलेला आहे. दिनांक १७ फेब्रुवारी, २०२० रोजी यासंदर्भातील गुन्हा दाखल झाला आहे. जवळपास ५१ हजार ६२४ ठेवीदारांच्या ५५३.३२ कोटी रुपयांच्या ठेवी बुडालेल्या आहेत. या सर्व ठेवीदारांना न्यायाची अपेक्षा आहे. यासंदर्भात केंद्र सरकारने ठेवींचा एक लाख रुपयांचा विमा पाच लाख रुपयांपर्यंत केलेला आहे. त्यामुळे डी.आय.सी.जी.सी.कडून ३८६.५१ कोटी रुपये मिळू शकणार आहेत. परंतु याचा अर्थ जवळपास १७० कोटी रुपये त्यांच्याकडून मिळणार नाहीत. मी मंत्री महोदयांना यानिमित्ताने दोन प्रश्न विचारु इच्छितो. डी.आय.सी.जी.सी. कडून १७० कोटी रुपये मिळणार नसतील तर बोगस कर्जदारांच्या जप्त केलेल्या मालमत्तेच्या वसुलीमधून हे पैसे मिळू शकतात. त्यामुळे या मालमत्तांचा लिलाव किती कालावधीत करुन ठेवीदारांचे हे पैसे कधीपर्यंत परत केले जाणार आहेत ? दुसरे असे की, या बँकेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. असे प्रकार पुढील काळात होऊ नयेत, याकरिता जरब बसण्याची आवश्यकता आहे. असे असताना या प्रकरणातील बँकेचे अध्यक्ष, संचालक किंवा तेथील लिपिक, बोगस कर्जदार यापैकी एकाही आरोपीला अटक झालेली नाही. संबंधित बँकेचे अध्यक्ष, संचालक किंवा तेथील लिपिक, बोगस कर्जदार यांना किती कालावधीत अटक केली जाणार आहे ? तसेच असे गुन्हे पुढील काळात घडणार नाहीत, याची शाश्वती राज्याला देणार काय ?

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, रिझर्व्ह बँकेने सर्वेक्षण केल्या नंतर या बँकेत अनियमितता असल्याचे निदर्शनास आले आहे. याची माहिती घेऊन सदर बँकेच्या व्यवहारावर निर्बंध आणले होते. या बँकेत झालेल्या आर्थिक अनियिमततेची चौकशी करण्यासाठी सहकार आयुक्तांनी दिनांक ०४/०२/२०२० रोजी आदेश काढला होता. त्या आदेशानुसार चौकशी करीत असताना संबंधित प्राधिकाऱ्याने एकूण २० दोषी विरुद्ध ५२९.३६ कोटी रुपयांचे दोषारोपपत्र बजाविलेले आहे. संबंधित श्री. विवेकानंद शंकर पाटील, श्री. अभिजीत विवेकानंद पाटील या दोघांच्या मालकीच्या ७० मालमत्तांवर निवाडापूर्व जप्तीचे आदेश निर्गमित केले आहेत. राज्यात अनेक बँकांमध्ये अशा गोष्टी घडत असतात. रिझर्व्ह बँक आणि सहकार

श्री. बाळासाहेब पाटील ....

विभागाच्या माध्यमातून त्यावर नियंत्रण ठेवले जाते. या बँकेबाबत कलम ८८ अन्वये चौकशी सुरु आहे. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर जी मालमत्ता आहे तिची विक्री करुन १७० कोटी रुपये दिले जातील.

श्री. प्रशांत ठाकूर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, कलम ८८ अन्वये कार्यवाही सुरु आहे. या प्रकरणात सद्य:स्थितीत ६३ बोगस कर्जदार आहेत. परंतु मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, बोगस कर्जदारांची संख्या यापेक्षा अधिक आहे. परंतु निष्पन्न झालेले सध्या ६३ बोगस कर्जदार आहेत. त्यांनी स्पेशल ऑडिटर आणि नंतरच्या तपासात सीआयडीकडे मान्य केले आहे की, हे बोगस कर्ज आहे. त्यांनी हे कबूल केले आहे. याचा अर्थ त्यांनी या कर्जाचा वापर स्वत:साठी न करता तो इतरांना करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. त्या कारवाईतून हा पैसे कोठे गेला, हे समजू शकेल. परंतु या प्रकरणात सीआयडी व सहकार विभागाच्या माध्यमातून कोणतीही कारवाई होत नाही. या अनुषंगाने ही कारवाई लवकरात लवकर कशी होईल, यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. तसेच बोगस कर्जदारांना अटक केली जाणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, कलम ८८ अन्वये चौकशी सुरु आहे. या चौकशीमध्ये जे निष्पन्न होईल त्यानुसार कारवाई केली जाईल.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.बाळासाहेब पाटील.....

डीआयसीजीसी च्या माध्यमातून ३९४ कोटी रुपये प्राप्त झाले असून सदर रकमेचे ठेवीदारांना वाटप सुरु आहे. दिनांक १४ मार्च, २०२२ रोजीपर्यंत ४ हजार २०५ ठेवीदारांना ८६ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले असून उर्वरित रकमेच्या वाटपाचे काम देखील सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य वारंवार एक प्रश्न उपस्थित करीत आहेत की, ज्यांनी बोगस कर्जे घेतली आहेत त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ? मी पुन्हा सांगू इच्छितो की, अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये सुरु असलेल्या चौकशीतून सर्व बाबी समोर येतील. त्यानंतर संबंधित सर्व दोषींवर कारवाई केली जाईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील बनावट मुदत ठेव पावत्यांबाबत.

**मु.शी.:** यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील बनावट मुदत ठेव पावत्यांबाबत श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"यवतमाळ जिल्हा परिषद, बांधकाम विभाग क्र. १ यांची विविध तालुक्यातील ११० निविदा प्रक्रिया निश्चित होणे, त्यातील झरी व पांढरकवडा येथील ९ कामांची निविदा १५.०१ टक्के न्युनतम दराने कंत्राटदार श्री. राजीव मल्लारेड्डी येल्टीवार यांना मिळणे, न्युनतम देक्कार असणाऱ्या निविदाकऱ्यांनी निविदा उघडण्याच्या दिनांकापासून कामकाजाच्या आठ दिवसाच्या आत अतिरिक्त सुरक्षा रक्कम, बँक गॅरंटी, मुदतठेव पावती (एफडीआर) च्या स्वरुपात संबंधित विभागात जमा करावी लागणे, त्याकरिता कंत्राटदार जो स्वतः यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचा संचालक आहे त्याने बँक व्यवस्थापकाला हाताशी धरुन संगनमत करुन श्री. यल्टीवार यांनी हातानी लिहिलेल्या एकूण १८.१० लाख रुपयांच्या १६ बनावट मुदत ठेव पावत्या यवतमाळ जि.प. बांधकाम विभाग क्र. १ यांना अतिरिक्त सुरक्षा रक्कम म्हणून ठेवणे, दिनांक २ मार्च, २०२२ रोजी कार्यकारी अभियंता श्री. कुटे हे पाटण शाखेत पावत्या पडताळणीसाठी जाणे, बँक व्यवस्थापकानी कार्यकारी अभियंता यांना सदर पावत्या आमच्या बँकेच्या नाहीत असे लेखी पत्र देणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्याच्या प्रमाणित प्रती मागविल्यानंतर सदर पावत्या बनावट असल्याची बाब उघडकीस येणे, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी बँकेत फक्त रुपये १०,०००/- संकल्प निधी ठेव असताना रुपये १३ लाख १० हजार संकल्प ठेवीबाबत बँकेच्या व्यवस्थापकांनी बनावट अहवाल दिल्याची बाब उघडकीस येणे,

श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार.....

असे असताना देखील यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अन्य संचालक मंडळास काही माहिती नसल्याचे निदर्शनास येणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, सहकार विभाग यांना दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी तक्रार करणे, बँकेच्या पाटण शाखेचे व्यवस्थापक व बँकेचे संचालक श्री. राजीव मल्लारेड्डी यल्टीवार यांनी संगनमताने आणि बनावट पावत्या सादर करुन शासनाची फसवणूक केल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार : अध्यक्ष महोदय, सदर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी माननीय सहकार मंत्री आणि या सभागृहाचे अतिशय महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष वेधू इच्छित आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यातील सहकारी बँकांमध्ये कशा पध्दतीने भ्रष्टाचार होत आहे याचे एक उदाहरण या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी देत आहे. यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकऱ्यांची बँक आहे. कारण शेतकऱ्यांच्या भागभांडवलावर ही बँक उभी राहिलेली आहे. शेतकरी मोठया विश्वासाने या बँकेचे विश्वस्त म्हणून संचालकांची नेमणूक करीत असतात. परंतु जेव्हा संचालक स्वत:च भ्रष्टाचार करतात त्यावेळी या शेतकऱ्यांनी कोणावर विश्वास ठेवायचा हा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा संचालक स्वत: कंत्राटदार आहे. त्याने १८ लाख रुपयांच्या बनावट मुदत ठेव पावत्या तयार करुन त्या यवतमाळ जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागास सादर केल्या. या मुदत ठेव पावत्या हस्तलिखित असल्यामुळे शंका आली व नंतर बनावट असल्याचे लक्षात आले. त्यानंतर मी स्वत: याची शहानिशा करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र देऊन सदर मुदत ठेवींच्या प्रमाणित सत्य प्रती मागितल्या. त्यानुसार त्यांनी मला सत्य प्रती दिल्या. त्यानंतर मी बँकेच्या रिजनल ऑफिसरला पत्र दिले व सदर कंत्राटदार जो की बँकेचा संचालक आहे त्याच्या किती मुदत ठेवी आहेत याबाबत विचारणा केली असता, त्याच्या खात्यामध्ये केवळ १० हजार रुपये शिल्लक असल्याचे निदर्शनास आले. असे असताना सदर संचालकाने १८ लाख १९ हजार रुपये किमतीच्या बनावट १६ मुदत ठेव पावत्या तयार केल्या होत्या. या मुदत ठेव पावत्यांवर बँकेच्या व्यवस्थापकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये म्हटले आहे की, संबंधित शाखा व्यवस्थापकाला बँकेने तात्काळ निलंबित केले आहे. परंतु केवळ शाखा व्यवस्थापकाला निलंबित करुन हा प्रश्न संपणार नाही. संचालकाच्या दबावामुळे या बनावट मुदत ठेव पावत्या तयार करण्यात आलेल्या आहेत.

श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार.....

बनावट मुदत ठेव पावत्या तयार करणे म्हणजे बनावट नोटा छापण्यासारखाच प्रकार आहे. एवढा मोठा गुन्हा केल्यानंतर केवळ शाखा व्यवस्थापकाला निलंबित करुन हा प्रश्न सुटणार नाही.

अध्यक्ष महोदय, सदर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन बनावट मुदत ठेवी सादर करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द एफ.आय.आर. नोंदवून त्याला अपात्र केले पाहिजे. मंत्री महोदय अशी कारवाई करतील का ? तसेच केवळ शाखा व्यवस्थापकाला निलंबित करुन हा प्रश्न संपणार नाही. त्याची विभागीय चौकशी करुन, त्याच्याविरुध्द एफ.आय.आर. दाखल करुन त्याला सेवामुक्त करणार का ? तसेच यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील या भ्रष्टाचाराची सहकार आयुक्तांमार्फत चौकशी करणार का ?

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील टेंडर घेण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा ठेव म्हणून ज्या मुदत ठेव पावत्या देण्यात आल्या त्या बनावट असल्यासंदर्भातील हा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रकरणी बँकेतील कर्मचाऱ्याने गैरव्यवहार करुन श्री.यल्टीवार यांच्या मुदत ठेवी असल्याचे दाखविले. सदर बँक कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य या प्रकरणी सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. यामध्ये कोणी काही स्पष्ट बोलत नाही परंतु सदर कंत्राटदार हेच बँकेचे संचालक आहेत.

अध्यक्ष महोदय, हा गुन्हा गंभीर आहे. दरम्यानच्या काळात संबंधित बँक कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार या कर्मचाऱ्याची खातेनिहाय चौकशी देखील सुरु आहे. तसेच या प्रकरणाची जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, यवतमाळ

श्री.बाळासाहेब पाटील.....

यांचेमार्फत चौकशी सुरु आहे. या चौकशी अहवालाच्या आधारे पुढील कारवाई करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा होता की, सदर संचालकाला अपात्र करणार का ? त्याबाबत मी सांगू इच्छितो की, चौकशीमध्ये दोषी आढळल्यास त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. तसेच या प्रकरणी सहकार आयुक्त यांच्याकडून चौकशी करावी अशी परिस्थिती नाही. कारण जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, यवतमाळ यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. मघाशी कर्नाळा बँकेच्या संदर्भात मंत्री महोदयांनी सांगितले की, अधिनियमाच्या कलम ८३, ८८ अन्वये चौकशी सुरु आहे. परंतु या चौकशांच्या फार्समुळे भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांची भीती संपलेली आहे. कारण चौकशांच्या आडून कितीही काळ ही प्रकरणे पुढे रेटता येतात.

अध्यक्ष महोदय, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रकरणात बँकेचे संचालकच दोषी असल्याचे मंत्री महोदयांनी म्हटले आहे. म्हणजे एका बाजूला आपण भ्रष्टाचार झाल्याचे कबूल करता परंतु दुसऱ्या बाजूला केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्याला निलंबित केले जाते. सन्माननीय सदस्य श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार यांनी मागणी केल्याप्रमाणे संबंधित संचालकाविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. तसेच बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याची आवश्यकता आहे. अधिनियमाच्या कलम ७८, ७३ एफएफ, ८३, ८८ यानुसार कारवाई करणे म्हणजे केवळ वेळकाढूपणा आहे, याची आपल्यालाही कल्पना आहे. तसे न करता यामध्ये प्रत्यक्ष कृती करण्याची गरज आहे. तरी सदर संचालकांच्या विरुध्द तात्काळ कारवाई करणार का, हा माझा प्रश्न आहे.

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे अनेक वर्षांपासून सहकार चळवळीमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांना या व्यवस्थेची चांगली माहिती आहे. तरी देखील ते वारंवार ही मागणी करीत आहेत. मी मघाशी देखील सांगितले आहे की, सदर प्रकरणी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, यवतमाळ यांचेमार्फत चौकशी सुरु आहे. या चौकशीतून ज्या बाबी पुढे येतील त्यानुसार कारवाई केली जाईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा रोख लक्षात घेऊन मी त्याबाबत खुलासा केलेला आहे. कंत्राटदार हेच बँकेचे संचालक आहेत व त्याबाबत मी खुलासा केला आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, चौकशीमध्ये जे निष्पण्ण होईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** संगमनेर तालुक्यात प्रवरा नदीपात्रालगत असलेल्या गावांना होत असलेल्या प्रदूषित पाण्याच्या पुरवठयाबाबत.

**मु.शी.:** संगमनेर तालुक्यात प्रवरा नदीपात्रालगत असलेल्या गावांना होत असलेल्या प्रदूषित पाण्याच्या पुरवठयाबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

“संगमनेर तालुक्यात प्रवरा नदीपात्रालगत असलेल्या गावांना प्रदूषित पाण्याचा पुरवठा होत असणे, मागील काही दिवसांपासून या नदीपात्रात सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, संगमनेर नगरपरिषद तसेच हॉटेल, हॉस्पिटल व इतर औद्योगिक कंपन्या यांचे रसायनयुक्त प्रदूषित पाणी बेकायदेशीरपणे थेट नदीपात्रात सोडण्यात येत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांच्या असणे, याबाबत ग्रामस्थांनी वेळोवेळी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ तसेच जिल्हा प्रशासनाला निवेदन देणे, नदीपात्रालगत असलेल्या सर्वच गावांच्या ग्रामपंचायतीनी या विरोधात ठराव करणे, सेवाभावी संघटना संस्थांनी या विरोधात आवाज उठविणे, या प्रदूषित पाण्यामुळे ग्रामस्थांसह पशुधन, शेतजमिन यांचे आरोग्य धोक्यात येणे, मागणी करुनही एसटीपी प्लॅन्टची उभारणी अनेक वर्षे न करणे या सर्व बाबींमुळे गावांमध्ये निर्माण होत असलेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

असुधारित प्रत

श्री.संजय बनसोडे (पर्यावरण व वातावरणीय बदल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सदर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून अतिशय गंभीर विषयाकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छित आहे.

अध्यक्ष महोदय, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सर्व नियम धाब्यावर बसवून राजकीय दबावाखाली सर्व यंत्रणा काम करीत आहे. प्रदूषित सांडपाण्यामुळे माझ्या मतदारसंघातील सुमारे २० ते २२ गावे प्रभावित झाली आहेत. नगरपालिका कोणतीही प्रक्रिया न करता प्रवरा नदीपात्रामध्ये सांडपाणी सोडते. तसेच दूध संघाकडे देखील ई.टी.पी. प्लांट नाही. या सर्व गोष्टींचा परिणाम सर्वसामान्य माणसांवर होत आहे. अनेक लोकांच्या पिण्याच्या पाण्याचे उद्भव नदीकाठी आहेत. प्रवरा उजव्या आणि डाव्या कालव्यांमधून देखील प्रदुषित पाणी येते.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. राधाकृष्ण विखे पाटील...

याबाबत माझे २ स्पेसिफिक प्रश्न आहेत. या निमित्ताने प्रदुषण नियंत्रण मंडळाचा जो अहवाल आला आहे आणि त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की, पाणी योग्य आहे व त्यामुळे शेतीला नुकसान वगैरे काही झालेले नाही. पण आपल्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, दिनांक ११ मार्च २०२२ रोजी आपण नगरपालिकेला नुकसान भरपाई म्हणून ५ कोटी ४० लाख रुपये इतका दंड केल्याचे माझ्या केले आहे. दिनांक ११ मार्च रोजी प्रश्नाला उत्तर देताना हे आपण नमूद केले आहे. त्यावेळी आपण असेही म्हटले आहे की, तालुका दूध संघाच्या डेअरीमधून पांढऱ्या रंगाच्या पाण्याचा विसर्ग काही प्रमाणात कारखाना परिसरातून थेट चेंबरमधून प्रवरा नदीमध्ये येत आहे. आपण २.५ लक्ष इतकी बँक हमी रक्कम प्रदुषण नियंत्रण मंडळाने जप्त केल्याचेही आपण म्हटले आहे. हे सर्वच मान्य केले असल्याने आपण याबाबतीत नेमकी कोणती कारवाई करणार आहात, खरं म्हणजे या दोन्ही संस्था जबाबदार आहेत. त्यामध्ये साखर कारखान्याची मळी सुध्दा थेट जात आहे.

अध्यक्ष महोदय, १९७४ च्या वॉटर पोल्यूशन ॲक्टच्या कलम ३४ अन्वये कोणताही उद्योग, उद्योगसमूह किंवा संस्था यांनी नैसर्गिक पाण्याच्या पाण्यामध्ये प्रवाहामध्ये शिव्हेज, प्रदुषित पाणी आऊटलेटच्या माध्यमातून सोडू नये, अशी तरतूद आहे. परंतु या नियमांचे उल्लंघन होत आहे. म्हणून कलम २५ नुसार अशा उद्योगांवर आपण कारवाई करणार आहात काय, हा पहिला प्रश्न आहे. अनेक वर्षापासून अशा पध्दतीने जे पाणी सोडले जाते व त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार आहात काय, त्या संस्था चालल्या पाहिजेत हे खरे आहे. परंतु लोकांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. त्यामुळे नगरपालिका, संबंधित दूध संघ आणि तो साखर कारखाना यांना प्रदुषण होऊ नये म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करण्याकरिता त्यांच्याकडून दंडात्मक कारवाई करीत असताना त्यासंबंधी यंत्रणा बसवावयाची यंत्रणा कालबध्द कार्यक्रम आखून किती दिवसात बसविणार आहात, यासंबंधी निर्देश देणार आहात काय ?

श्री. संजय बनवोडे (पर्यावरण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, आदरणीय ज्येष्ठ नेते श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रवरा नदीच्या प्रदुषणासंबंधी लक्षवेधी सूचना या ठिकाणी उपस्थित केली आहे. मी सविस्तर माहिती याबाबत सभागृहासमोर ठेवणार आहे.

अध्यक्ष महोदय, प्रवरा नदीचा उगम सह्याद्रीच्या पर्वत रांगांमधून होतो. त्यांनी कारखान्यासंदर्भात...

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, आपण पर्यावरण मंत्री महोदयांकडे यासंबंधी एखादी बैठक लावावी. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन ती बैठक लावावी. मी आपला सन्मान ठेऊन सांगू इच्छितो की, आपण या लक्षवेधी सूचनेचे उत्तर देऊ शकणार नाही. हे गंभीर प्रकरण असल्यामुळे विनाकारण त्याची सभागृहात चर्चा होण्यापेक्षा आपण पर्यावरण मंत्र्यांकडे बैठक बोलवावी आणि त्या ठिकाणी सविस्तर चर्चा करावी. तोपर्यंत आपल्याला जी कारवाई करायची असेल ती कारवाई करावी. कारण त्या भागातील शेतकऱ्यांनी एक कृती समिती स्थापन केली आहे आणि तेथील लोकांच्या भावना तीव्र आहेत. म्हणून आमची आपल्या माध्यमातून विनंती आहे की, या विषयासंबंधी तात्काळ पर्यावरण मंत्र्यांकडे बैठक लावावी. ही बैठक लवकरात लवकर लावली पाहिजे, असा आमचा आग्रह आहे म्हणून आपण ही बैठक कधीपर्यंत लावणार आहात ते सांगावे.

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार आम्ही माननीय पर्यावरण मंत्री यांच्याकडे लवकरात लवकर बैठक लावू. परंतु मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, प्रवरा नदीच्या दोन्ही बाजूने असणारे सर्व साखर कारखाने...

**उपाध्यक्ष :** आपले बैठक लावण्याचे ठरले आहे.

श्री. संजय बनसोडे : मी माननीय पर्यावरण मंत्री यांच्याशी चर्चा करतो आणि बैठक लावतो. तरी देखील मला सभागृहाला सांगायचे आहे की, प्रवरा नदीच्या दोन्ही बाजूस असलेले सर्व साखर कारखाने, इतर उद्योग, नगरपालिका इत्यादिंमुळे होणाऱ्या

श्री. संजय बनसोडे...

प्रवरा नदीच्या प्रदुषणाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत तपासणी करुन जे दोषी आढळणारे संबंधित सर्व उद्योग असतील किंवा स्थानिक स्वराज्य संस्था असेल तर त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, आपण कारवाई काय करणार, फक्त आपण पुढील आठवड्यात पर्यावरण मंत्री महोदयांची वेळ घ्यावी.

ॲड अनिल परब : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विनंती केल्यानुसार माननीय पर्यावरण मंत्री यांच्याशी चर्चा करुन ताबडतोब बैठक लावण्याची व्यवस्था करु आणि त्या बैठकीत योग्य ते निर्णय होतील.

असुधारित प्रत

**पृ. शी. :** स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) विधेयक
L.A. BILL NO. XIII OF 2022.

(A BILL TO PROVIDE FOR THE USE OF MARATHI LANGUAGE FOR THE OFFICIAL PURPOSES OF THE LOCAL AUTHORITIES IN THE STATE OF MAHARASHTRA)

ॲड अनिल परब (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३, महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या शासकीय प्रयोजनांसाठी मराठी भाषेचा वापर करण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

ॲड अनिल परब : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ मांडतो.

**उपाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

**पृ. शी. :** शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XIV OF 2022

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF FEES) ACT, 2011)

प्रा. वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४, शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

ॲड प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ मांडतो.

**उपाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

------------

**पृ. शी. :** सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ विधेयक

L.A. BILL NO. XV OF 2022

A BILL TO ESTABLISH AND INCORPORATE THE *COEP* TECHNOLOGICAL UNIVERSITY AS A SPECIALISED TECHNOLOGICAL UNITARY PUBLIC UNIVERSITY, TO COLLABORATE WITH RESEARCH INDUSTRIES AND CORPORATE INDUSTRIAL ASSOCIATES, TO PROVIDE VERTICAL MOBILITY TO STUDENTS UNDERGOING TECHNICAL EDUCATION IN HIGH GROWTH SECTORS AND TO PREPARE STUDENTS TOWARDS GAINFUL EMPLOYMENT, TO PROVIDE SCIENTIFIC AND TECHNOLOGY MANAGEMENT AND DEVELOP ORGANISATION OF TEACHING, LEARNING, TRAINING, RESEARCH, CONSULTANCY, TESTING AND EXTENSION, TO ESTABLISH CENTRE OF EXCELLENCE, RESEARCH PARK WITH INDUSTRIES AND TO GIVE EFFECT TO THE OBJECT ENVISAGED IN THE NEW EDUCATION POLICYAND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. प्राजक्त तनपुरे (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५, संशोधन उद्योग समूह व निगम औद्योगिक संघ यांच्याशी सहयोग करण्याकरिता, उच्च वृध्दी असलेल्या क्षेत्रांमध्ये तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता उर्ध्व गतिशीलतेची

श्री. प्राजक्त तनपुरे...

तरतूद करण्याकरिता आणि लाभदायक रोजगार मिळण्याकरिता विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी, अध्यापन, अध्ययन, प्रशिक्षण, संशोधन, सल्ला, चाचणी व विस्तार यांच्या वैज्ञानिक व तंत्रज्ञान व्यवस्थापन व विकास संघटनेची तरतूद करण्याकरिता, उद्योगांच्या सहयोगाने उत्कृष्टता केंद्र, संशोधन पार्क स्थापन करण्यसाठी आणि नवीन शैक्षणिक धोरणामध्ये योजिलेली उद्दिष्टे अंमलात आणण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता एक विशेषीकृत तंत्रज्ञानात्मक एकात्म सार्वजनिक विद्यापीठ म्हणून सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यासाठी व विधिसंस्थापित करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ मांडतो.

**उपाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

यानंतर श्रीमती कोळगिरे..

**पृ.शी.** : नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.** : नियम स्थगित ठेवण्याबाबत माननीय गृह मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने

"म.वि.स. नियम १३० अन्वये सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुद्धच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक, २०२० विचारात घेण्यापूर्वी म.वि.स. नियम ११२ मधील परंतुकातील तरतुद म.वि.स. नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी," असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुद्धच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक,२०२०

L.A. BILL NO. LII OF 2020

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF EXCLUSIVE SPECIAL COURTS FOR THE SPEEDY TRIAL OF CERTAIN SPECIFIED OFFENCES AGAINST WOMEN AND CHILDREN AND CONSTITUTION OF IMPLEMENTATION MACHINERY FOR SUCH OFFENCES AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

असुधारित प्रत

श्री. दिलीप वळसे-पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने संयुक्त समितीच्या प्रतिवृत्तानुसार असलेले सन २०२० चे वि.स.वि.क्रमांक ५२ महिलांच्या व बालकांच्या विरुद्धच्या विवक्षित विनिर्दिष्ट अपराधांची जलदगतीने न्यायचौकशी करण्यासठी अन्नय विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी आणि अशा अपरांधासाठी अंमलबजावणी यंत्रणा घटित करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, महिलांना सुरक्षितता देण्याच्या दृष्टीकोनातून शक्ती विधेयक क्रमांक ५१ मंजूर केलेले होते. परंतु त्या विधेयकाला आवश्यक असणाऱ्या बाकीच्या सुविधा देण्याच्या दृष्टीकोनातून एक व्यवस्था निर्माण करण्यासाठी हे विधेयक आहे. विधेयक क्र. ५१ वर प्रलंबित असणारे विधेयक क्र. ५२ आहे. सदरचे विधेयक दिनांक १४ डिसेंबर, २०२० रोजी मांडण्यात आले. दोन्ही बाजूच्या संयुक्त समितीकडे हे

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

विधेयक चर्चेसाठी पाठविण्यात आले. समितीने एकमताने तयार केलेला अहवाल दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी संमत करण्यात आला.

अध्यक्ष महोदय, महिला व बालकांच्या संदर्भातील विनिर्दिष्ट गुन्ह्याबाबतचे आरोपीवरील दोषसिद्धि न्याय चौकशीद्वारे विनाविलंब करण्यासाठी अनन्य विशेष न्यायालय स्थापित अथवा विनिर्दिष्ट करण्यासाठी प्रस्तुत विधेयक आणण्यात आलेले आहे. सदर विधेयकाद्वारे महिला व बालकाच्या विनिर्दिष्ट गुन्ह्यबाबत आरोपासंदर्भात अनन्य विशेष न्यायालय नव्याने स्थापित करता येतील किंवा अस्तित्वात असलेल्या न्यायालयांना विनिर्दिष्ट देखील करता येईल. प्रस्तुत विधेयकाद्वारे विशेष न्यायालय स्थापन होणार आहेत. तथापी, प्रसंगानुसार उपलब्ध न्यायालयांना देखील हा दर्जा देऊन त्यांनाही निर्देशीत करणे शक्य असल्याने त्यानुसार बदल करण्यात यावे, या अनुषंगाने बदल करण्यात आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, एक सरकारी अभियोक्ता किंवा अधिक सरकारी अभियोक्ता करणे असा शब्दप्रयोग करणे अधिक योग्य होईल. त्यानुसार खंड ७ मधील उपखड १ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. महिला व बालकांवरील अत्याचाराच्या संदर्भात गुन्हेगारांना योग्य शिक्षा करणे अत्यंत आवश्यक असल्याने असाविशेष सरकारी अभियोक्ता बदलण्याची व त्याऐवजी विशेष सरकारी अभियोक्ता नेमण्याच्या संदर्भात खंड ७ मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय,खंड ८ मध्ये विनिर्दिष्ट अपराधांचे अन्वेषण करण्यासाठी राज्य शासनाकडून विशेष पोलीस पथक गठीत करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पोलीस अधिक्षक, पोलीस अधिकारी यांना अपराधाचेगांभीर्य लक्षात घेऊन सदर अपराधाचे अन्वेषण विशेष पथकाकडे सोपविण्याचे अधिकार असतील. साधारणत: या तरतुदी या विधेयकातील आहेत.आपण जे शक्ती विधेयक मंजूर केले आहे त्यामध्ये सिस्टिम अधिक स्ट्रेंदेन करण्याच्या दृष्टीकोनातून लवकर त्याचा निर्णय लागून शास्ती झाली पाहिजे आणि लवकर शिक्षा झाली पाहिजे. अशा भूमिकेतून विधेयक क्रमांक ५२ आणण्यात आले होते. हे विधेयक संयुक्त समितीने एकमताने

श्री. दिलीप वळसे-पाटील....

सभागृहाला सादर केलेले आहे. सभागृहाला माझी विनंती आहे की, आपण या विधेयकाला पाठिंबा देऊन मान्य करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उपाध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते १४(दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ५२ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष** : सन २०२० चे वि.स.वि.क्रमांक ५२ एकमताने संमत झाले आहे.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ विधेयक, २०२०

L.A. BILL NO. XV OF 2022

(A BILL TO ESTABLISH AND INCORPORATE THE *COEP* TECHNOLOGICAL UNIVERSITY AS A SPECIALISED TECHNOLOGICAL UNITARY PUBLIC UNIVERSITY, TO COLLABORATE WITH RESEARCH INDUSTRIES AND CORPORATE INDUSTRIAL ASSOCIATES, TO PROVIDE VERTICAL MOBILITY TO STUDENTS UNDERGOING TECHNICAL EDUCATION IN HIGH GROWTH SECTORS AND TO PREPARE STUDENTS TOWARDS GAINFUL EMPLOYMENT, TO PROVIDE SCIENTIFIC AND TECHNOLOGY MANAGEMENT AND DEVELOP ORGANISATION OF TEACHING, LEARNING, TRAINING, RESEARCH, CONSULTANCY, TESTING AND EXTENSION, TO ESTABLISH CENTRE OF EXCELLENCE, RESEARCH PARK WITH INDUSTRIES AND TO GIVE EFFECT TO THE OBJECT ENVISAGED IN THE NEW EDUCATION POLICYAND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. प्राजक्त तनपुरे (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्र १५ संशोधन उद्योग समुह व निगम औद्योगिक संघ यांच्याशी सहयोग करण्याकरिता, उच्च वृद्धी असलेल्या क्षेत्रांमध्ये

श्री. प्राजक्त तनपुरे.....

तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता ऊर्ध्व गतिशीलतेची तरतूद करण्याकरिता आणि लाभदायक रोजगार मिळण्याकरिता विद्यार्थ्यांना तयार कण्यासाठी, अध्यापन, अध्ययन, प्रशिक्षण, संशोधन, सल्ला,चाचणी व विस्तार यांच्या वैज्ञानिक व तंत्रज्ञान व्यवस्थापन व विकास संघटनेची तरतूद करण्याकरिता, उद्योगांच्या सहयोगाने उत्कृष्टता केंद्र, संशोधन पार्क स्थापन करण्यासाठी आणि नवीन शैक्षणिक धोरणामध्ये योजिलेली उद्दिष्टे अंमलात आणण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता एक विशेषीकृत तंत्रज्ञानात्मक एकात्म सार्वजनिक विद्यापीठ म्हणून सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यासाठी व विधि संस्थापित करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ८८ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्र. १५ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झला.

**उपाध्यक्ष** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १५ संमत झाले आहे.

-------

यानंतर श्रीमती करंदीकर....

**पृ.शी :** स्थानिक प्राधिकरणे ( राजभाषा ) विधेयक

L.A. BILL NO. XIII OF 2022

(A BILL TO PROVIDE FOR THE USE OF MARATHI LANGUAGE FOR THE OFFICIAL PURPOSES OF THE LOCAL AUTHORITIES IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. सुभाष देसाई ( मराठी भाषा मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि.क्र १३- महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या शासकीय प्रयोजनांसाठी मराठी भाषेचा वापर करण्याकरिता तरतूद करण्यासंबंधी विधेयक विचारात घेण्यात यावे,असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उपाध्यक्ष :** आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार ( वांद्रे – पश्चिम ) : अध्यक्ष महोदय, वि.स.वि.क्र १३ संदर्भात माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणात शासकीय प्रयोजनासाठी मराठी भाषेचा वापर करण्याकरिता तरतूद करण्यासाठी हे विधेयक असून यास आमचे समर्थन आहे, या करिता विरोध असण्याचे काही कारण नाही. बरेच वर्षातील चर्चा व अनेक वर्षांपासूनची आवश्यकता लक्षात घेऊन आपण ती टप्प्याटप्प्याने पूर्ण करित आहोत. उद्देश व कारणे यामध्ये स्पष्ट केले आहे. यामध्ये विधेयकाची ठळक वैशिष्टे दिली आहेत. या संबंधी २-४ गोष्टींची स्पष्टता आली तर चांगले काम करता येईल, एवढया पुरते माझे विवेचन आहे.

अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या वैशिष्टांमध्ये असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक प्राधिकरणांची शासकीय भाषा मराठी असेल. महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती यामध्ये शासकीय भाषा मराठी असेल. स्थानिक प्राधिकरणाच्या सर्व कार्यालयांमध्ये सर्व शासकीय प्रयोजनाकरिता तसेच जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित प्रयोजनाकरिता वापर करायची भाषा मराठी असेल अशी तरतूद केली आहे. मान्य आहे. आपल्याला असे करायलाच पाहिजे. स्थानिक प्राधिकरणाच्या सर्व कार्यालयांमध्ये या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित शासकीय प्रयोजनाकरिता इंग्रजीचा वापर करता येईल. या दोन वाक्यांमध्ये आणखी स्पष्टता आली पाहिजे. असा गैरसमज होईल की, अधिकाऱ्यांनी इंग्रजी वापरले तर चालेल. मात्र जनहित व जनसंवादाकरिता मराठी वापरली पाहिजे. स्थानिक प्राधिकरणाच्या सर्व कार्यालयांमध्ये या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित शासकीय प्रयोजनाकरिता इंग्रजीचा वापर करता येईल. म्हणजे असे की, फाईल इंग्रजीतून चालेल. जनतेने मात्र मराठीतून बोलायेच असा माझा गैरसमज होत आहे. तो गैरसमज असेल तर स्पष्ट करा. यात चूक असेल तर ती सुधारा. मराठीच्या वापराचा आग्रह सर्वांसाठी केला पाहिजे. अधिकारी असेल, शासकीय, निमशासकीय, ग्रामपंचायत असेल, जनसंवाद असेल.

ॲड. आशिष शेलार.....

अध्यक्ष महोदय, दुसऱ्या क्रमांकाच्या वैशिष्टयामध्ये स्पष्टता आणणे आवश्यक आहे. मी आपले लक्ष ५ व्या मुद्याकडे वेधतो. या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता कार्यालय प्रमुख जबाबदार असेल अशी तरतूद करणे. महाराष्ट्र राजभाषा १९६४ या अन्वये प्रत्येक जिल्ह्यात स्थापन केलेली जिल्हा मराठी भाषा समिती या अधिनियमाखाली प्राप्त केलेल्या तक्रारींची चौकशी करेल व त्यांचे निवारण करेल, त्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करेल, अशी तरतूद करणे हा आपला हेतू आहे. याचा अर्थ असा होतो की, प्रमुख मराठी भाषेत व्यवहार झाला पाहिजे, याची जबाबदारी त्या त्या कार्यालयाच्या प्रमुखाची आहे. जिल्हा स्तरावर जी मराठी भाषा समिती होईल... माझा समज आहे की, जिल्हा स्तरावर म्हणजे सरकारच्या माध्यमातून समिती होईल, त्याकडे तक्रारी जातील. या अधिनियमाच्या तरतुदीचे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासन राज्य मराठी भाषा समिती, जिल्हा मराठी भाषा समिती, स्थानिक प्राधिकरणाच्या सर्व कार्यालयांना आवश्यक असतील असे निर्देश व अनुदेश देऊ शकतील. याचा अर्थ एका महापालिकेमध्ये मराठी भाषेचे काम होत नाही तर ही जबाबदारी कार्यालय प्रमुखाची. या बाबत तक्रार जिल्हा मराठी भाषा समितीकडे जाईल. या संबंधी निर्देश राज्य मराठी भाषा समिती किंवा जिल्हा मराठी भाषा समिती देईल. याचा अर्थ कार्यालयाच्या कोऑर्डीनेशनमध्ये मराठी भाषेची व्यवस्था निर्माण करताना कार्यालयीन अव्यवस्था निर्माण केली जाणार आहे काय ? किंवा निर्माण होईल काय याची आपल्याला चिंता करावी लागेल. या समित्यांना आपण निर्देश व अनुदेश देण्याचे अधिकार दिले आहेत. ते कदाचित द्यावे लागतील. पण योग्य तक्रार असेल तर. आज सरसकट आरटीआय चुकीचा आहे असे म्हणता येणार नाही. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य, माननीय मंत्री यांना माहीत आहे. आरटीआयचा उपयोग व दुरुपयोग आपण भोगत आहोत. याचा त्रास जनतेलाही आहे. जिल्हा भाषा मराठी समिती कोणी नियुक्त केलेली समिती असेल. जिल्हा मराठी भाषा समितीला आपण

ॲड. आशिष शेलार ....

निर्देश देण्याचे अधिकार दिले आहेत. तेथे एखादे कागदपत्र काढून लोक तक्रार करतील. कार्यालय प्रमुख त्यास जबाबदार असेल या तक्रारीवर तो आदेश देईल. या बाबत व्यवस्था निर्माण होऊ शकते ,काय याचा विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, परवा या ठिकाणी कलम ३३२ व कलम ३५३ या संबंधी चर्चा झाली. तेव्हाची मूळ नस्ती काढली तर आपल्याला दिसून येईल. त्यावेळी येथे गृह मंत्री म्हणून माननीय श्री. देवेंद्र फडणवीस होते. मी ट्रेझरी बेंच बाबत एक तास भाषण केले होते. तेव्ही मी हेच म्हटले होते की, आपण जे निर्णय करीत आहोत त्याचे दूरगामी परिणाम भयंकर आहेत. या विधेयकाच्या हेतूबाबत आमची शंका नाही, आमचे त्यास समर्थन आहे. मराठी भाषेच्या संबंधी निर्देश देण्याचे अधिकार असतील पण ते कामकाजाशी संबंधित आहेत. अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केल्याबद्दल स्थानिक प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची तरतूद आहे. निर्देश, अनुदेश व शिस्तभंग या तिन्ही गोष्टींचे अधिकार आपण त्यांना देत आहोत. ते मराठी भाषेपुरते राहिले तर गोष्ट वेगळी आहे. मात्र मराठी भाषेच्या कामकाजासाठी असल्यामुळे एखाद्याची जेन्युईन चूक किंवा काढून आणलेली चूक या आधारावर कार्यालयामध्ये नवीन व्यवस्था निर्माण होईल. ज्यातून अव्यवस्था निर्माण होऊ शकेल. या पेक्षा आपण असे केले पाहिजे. माझी एक सूचना आहे. मराठी भाषेचे कामकाज १०० टक्के झाले पाहिजे हा आपला हेतू आहे. महिलांना कार्यालयामध्ये संरक्षण आहे, या करिता एक कायदा आहे. त्याची एक समिती असते. त्या त्या कार्यालयामधील अधिकारांच्या संरक्षणासाठी कार्यालयांतर्गत समिती असते. जिल्हा किंवा राज्य मराठी भाषा समितीला अधिकार दिले आहेत या ऐवजी कार्यालयाच्या अंतर्गतच समिती तयार करा. त्यांना अधिकार द्या. म्हणजे अव्यवस्था निर्माण करण्याचे चान्सेस कमी होतील. स्थानिक स्वराज्य

ॲड. आशिष शेलार ...

संस्था महापालिका, नगरपालिका यांच्यामध्ये बाहेरचे शक्तीकेंद्र निर्माण होऊन त्यातून जी अव्यवस्था निर्माण होईल ती टाळता येईल. या विषयामध्ये अधिकची स्पष्टता येणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मी पुन्हा सांगतो. उद्देश व कारणे क्र. २ मध्ये नमूद केले आहे की,शासकीय प्रयोजनाकरिता इंग्रजीचा वापर. याचा अर्थ काय आहे. २) जिल्हा भाषा मराठी समितीचे अधिकार ,निर्देश, अनुदेश व शिस्तभंग बाहेरच्या समितीला देऊन कार्यालयीन व्यवस्था होईल काय ? ३) अशी व्यवस्था टाळायची असेल तर मराठी भाषेतील कामकाजाचा आग्रह पूर्ण करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यालयांतर्गतच अधिकार दिलेले बरे होतील काय या बाबत खुलासा करावा, अशी मी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.योगेश सागर (चारकोप) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ च्या वि.स.वि. क्रमांक १३ वर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणांमध्ये शासकीय प्रयोजनासाठी मराठी भाषेचा वापर करण्याकरिता तरतूद करण्यासाठी मांडण्यात आलेल्या या विधेयकाचे मी स्वागत करतो व या विधेयकाला पूर्णपणे समर्थन देतो. परंतु, माझ्या मनात असा प्रश्न येतो की, जेव्हा जेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येतात तेव्हा तेव्हा मराठी भाषेचा पुळका कसा येतो?

अध्यक्ष महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकी आल्या रे आल्या की, मराठीमध्ये पाटी लावा वगैरे सुरु होते. आपण मराठीमध्ये पाटी लावण्याबाबतचा कायदा कधीच केलेला आहे. आपण त्याबाबत आग्रह देखील करतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगण्याच्या अगोदरपासून मी सही देखील मराठीतच करतो.

अध्यक्ष महोदय, मी स्वप्न देखील मराठीतच पाहतो. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.प्रकाशजी मराठी साहित्य, मराठी भाव गीते, मराठी लोक गीते, मराठी संगित याबाबत आपण एकदा सभागृह संपल्यानंतर येथेच जाहीरपणे चर्चा करु. मग आपण मला स्वप्ने कोणत्या भाषेत पडतात ते पाहू.

अध्यक्ष महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्या की, मराठीचा पुळका येतो, नंतर या विधेयकाचे काय होणार आहे हे मला माहीत नाही. माननीय ॲड.अनिल परब आपण हे काम करावे. मी आपल्याला १०० टक्के समर्थन देत आहे. ज्या सर्व नस्ती आयुक्तांकडे सही करीता जाणार आहेत, त्यावर ज्या ज्या नोंदी जे जे अधिकारी करणार आहेत किंवा आयुक्त त्यावर काही टीप लिहिणार असतील तर ती सुध्दा त्यांनी मराठीतच लिहावी, अशी आपण यामध्ये तरतूद का करीत नाही? सर्व नस्तींबाबत तशी तरतूद करावी.

श्री.योगेश सागर....

अध्यक्ष महोदय, मराठी भाषेत बोलण्याबाबतचा आग्रह तर केलाच पाहिजे. कारण तुम्ही जेथे जन्माला आला, जेथे तुमची कर्मभूमी आहे, जेथून तुम्ही तुमचा व्यवसाय, उद्योग, नोकरी करता त्या राजभाषेला महत्व दिलेच पाहिजे. याकरिता अध्यक्ष महोदयांच्या माध्यमातून मला मंत्री महोदयांना हे विचारावयाचे आहे की, आपण यामध्ये तशा सुधारणा करणार आहात का?

अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणांच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, "स्थानिक प्राधिकरणाच्या सर्व कार्यालयामध्ये या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित शासकीय प्रयोजनाकरिता इंग्रजीचा वापर करता येईल"..... याचे आपण काय स्पष्टीकरण किंवा खुलासा देणार की, हे विर्निदिष्ट आहे. आपण आज हे विधेयकामध्ये नमूद करीत आहात नंतर त्याचे सर्व नियम वेगळे बनतील, त्याचे वेगळे सर्क्युलर निघतील, वेगळे जी.आर. निघतील. परंतु, आपण याचाही खुलासा करण्याची आवश्यकता आहे. अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे की, सर्व नस्त्यांवर मराठीतच लिहिले गेले पाहिजे. त्यांना स्वत:ला लिहिण्यास जमत नसेल तर त्यांनी डिक्टेशन द्यावे. त्यांचे लिहून देणारे मराठीत लिहितील. परंतु, ते मराठीमध्ये लिहिले पाहिजे, असे सांगण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरे असे की, आज मुंबई महानगरपालिकेची परिस्थिती अतिशय डेंजर आहे. विषय याच्याशी संबंधित आहे म्हणून बोलत आहे. जनहिताचे व जनसंवादाचे जर काही उल्लंघन झाले तर, त्याबाबतच्या समितीचा उल्लेख सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी केला आहे की, जी जिल्हास्तरिय मराठी भाषा समिती असेल, त्या कार्यालयचे प्रमुख त्याला जबाबदार असतील. त्याची काय ती पूर्ण कारणमिमांसा शोधून त्यावर कारवाई करावयाची आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये एक नवा ट्रेंड सुरु झाला आहे. जे जे ठेकेदार आहेत त्यांचे मेहुणे, पुतणे, भाचे, भावोजी हे मागील १० वर्षांपासून नोकरीला लागायला सुरु झाले आहे. ते इंजिनिअर होतात, डिप्लोमा, डिग्री होल्डर

श्री.योगेश सागर ....

होतात. आपल्या महाराष्ट्रात भरपूर विद्यापीठे, महाविद्यालये सुरु केलेली आहेत हे चांगले आहे. त्यातून ते डिग्री घेतात व महानगरपालिकेमध्ये ते आता कनिष्ठ अभियंत्यापासून नोकरीला लागले आहेत. काही काही कार्यकारी अभियंत्यांच्या पदापर्यंत आले आहेत. ५-१० वर्षांनी ते उप मुख्य अभियंता व मुख्य अभियंता पदापर्यंत पोहोचतील व टेंडर देखील तेच बनवतील. या सर्व नस्त्या मराठीत नसतील व त्यावरील मत इंग्रजीत असेल तर त्यांना पाहिजे ती व्यवस्था त्या त्या ठिकाणी ते करतील.

अध्यक्ष महोदय, २ डेंजर पॉईंट्स आहेत. भाषेचा डेंजर पॉईंट आहेच शिवाय ठेकेदाराचे नातेवाईक पुढच्या काळात टेंडर देखील बनवणार. कारण उप मुख्य अभियंता व मुख्य अभियंता तेच असणार. मी याबाबत १० वर्षांपासून सांगत आहे. महानगरपालिकेला मी १० पत्रे लिहिली की, कोणत्या ठेकेदाराचे कुठले मेहुणे, पुतणे, भाचे, भावोजी हे महानगरपालिकेच्या कोणकोणत्या विभागात आहेत, याची आपण चौकशी करावी.

अध्यक्ष महोदय, या संदर्भात आपण ज्या ॲक्शन्स सजेस्ट केल्या आहेत, त्या ॲक्शन संदर्भात काय काय नियमावली असेल याची कल्पना देखील सभागृहाला देण्याची आवश्यकता आहे. माझी आग्रहाची विनंती आहे की, आपण महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या सहीकरिता जाणाऱ्या सर्व नस्त्या तसेच, महानगरपालिकेतून जे नियम व सर्क्युलर इशु होणार आहेत ते आपण १०० टक्के मराठीमध्ये करणार आहात काय, या संदर्भात जो अधिकार देण्यात येणार आहे त्याचे जे पूर्ण विवरण या नियमाच्या किंवा कायद्याच्या माध्यमातून करणार, त्याबाबत सभागृहाला अवगत करणार आहात काय?

………..

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, समाननीय सदस्य ॲड.आशिष शेलार व सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी या विधेयकावर आपली मते व्यक्त केलेली आहेत. मी त्यांच्या सूचनांचे नक्कीच स्वागत करेन. परंतु, हे विधेयक इतक्या वर्षांनंतर का आणावे लागले याकडे थोडेसे लक्ष वेधले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, १९६४ चा मराठी राजभाषेचा अधिनियम आहे त्यामध्ये स्थानिक प्राधिकरण हा उल्लेख नाही. ती तांत्रिक चूक आहे. परंतु, तेव्हा ती राहून गेल्यामुळे ही जी स्थानिक प्राधिकरणे म्हणजे महापालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषद यांच्या बरोबरच शासनाने स्थापन केलेली प्राधिकरणे म्हणजे एमएमआरडीए किंवा दुसरी महामंडळे असतील त्यांच्यावर या भाषेच्या अनिवार्यतेचा उल्लेख त्यामध्ये नसल्यामुळे ती अनिवार्यता त्यांना लागू होत नव्हती. अशी एक तांत्रिक गफलत राहून गेली होती. ती दूर करण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. त्यातून ती नक्कीच दूर होईलच.

अध्यक्ष महोदय, नागरिकांच्या काही तक्रारी येत होत्या. मराठी भाषेच्या वापराबाबत खूप बारीक लक्ष असते, अशा नागरिकांनी मराठी भाषा विभागाकडे अनेक तक्रारी केल्या. त्याची आपल्याला दखल घ्यावी लागली. अनेकवेळा असे दिसते की, महानगरपालिकांचे आयुक्त हिंदी किंवा इंग्रजीतून twit करतात. हल्ली हे तंत्रज्ञान आलेले आहे. त्यामुळे त्याचा वापर केला जातो. Twitter किंवा WhatsAap, facebook वरुन काही वेळा जी माहिती दिली जाते, ती हिंदी किंवा इंग्रजीतून असते असे लक्षात आले.

अध्यक्ष महोदय, महानगर प्रदेश पुणे, यांच्या प्राधिकाधीन रिंग रोड प्रकल्पाची माहिती संकेतस्थळावर मराठी भाषेत उपलब्ध करुन द्या, अशी मागणी नागरिकांनी केलेली आहे. मुंबई महागरपालिकेच्या facebook पेजवर हिंदी भाषेतील चित्रफिती प्रसारित केल्या, याबद्दल नागरिकांनी तक्रारी दिलेल्या आहेत. पुणे येथील शनिवारवाडा येथे पर्यटकांसाठी असलेला फलक केवळ हिंदी व इंग्रजीमध्ये आहे. आता मराठी माणसांना, महाराष्ट्रातील माणसांना शनिवारवाड्याची अंर्तबाह्य सर्व माहिती आहे. त्यामुळे त्या दृष्टीने मराठी भाषेत माहिती दिली नाही तरी चालेल. परंतु,

श्री.सुभाष देसाई ...

इतर राज्यांतून किंवा परदेशातून जे पर्यटक येतात त्यांना माहिती व्हावी याकरिता ती माहिती हिंदी व इंग्रजीमध्ये नमूद केली, हा त्यांचा हेतू असला तरी देखील महाराष्ट्रात मराठी भाषेचा अग्रक्रम व मान राहिलाच पाहिजे. त्यामुळे अशा ज्या त्रुटी राहत होत्या त्या दूर करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

अध्यक्ष महोदय, महानगरपालिकांचे सर्व अर्ज हे मराठीतच असले पाहिजेत. मेट्रो रेल्वे हे नवे पर्व आता सुरु झालेले आहे. काही मेट्रो मार्गांची वाहतूक सुरु झाली आहे, आणखी बरेच सुरु होणार आहेत. परंतु, त्यामध्ये पद भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षा इंग्रजी व हिंदी भाषेतून घेतल्या गेल्या ही गंभीर गोष्ट आमच्या लक्षात आली. नवी मुंबई महानगरपालिकेचा मालमत्ता करासंबंधीचा फलक इंग्रजी भाषेत आहे असेही लक्षात आले.

अध्यक्ष महोदय, अशा त्रुटीचा किंवा मूळ १९६४ च्या विधेयकात राहून गेलेल्या अनिवार्य करण्याच्या मुद्दयाचा गैरफायदा अनेक ठिकाणी प्राधिकरणांकडून घेतला जात होता. ते पूर्णपणे बंद करावे व त्याला कुठलाही वाव राहू नये, याकरिता अशाप्रकारचे हे विधेयक आपण तयार केलेले आहे. त्यामुळे आता सर्व पळवाटा बंद होतील. कुठलेही प्राधिकरण मग ते राज्य शासनाने स्थापन केलेले असो, केंद्र शासनाने स्थापन केलेले असो की, महामंडळे असो त्या सर्वांनी लोकांशी संपर्क करताना तसेच अंतर्गत कामकाज करताना देखील मराठीचाच वापर केला पाहिजे. हे करीत असताना अनिवार्यता सांभाळत असताना आपल्याला काही वर्जित प्रयोजनांचा विचार करावा लागतो.

नंतर श्री.शिंदे ...

श्री.सुभाष देसाई ...

विधेयकास न्यायालामध्ये दिले जाऊ शकते, त्यावेळी माघार घेण्याची वेळ येऊ नये यासाठी काही शासकीय प्रयोजनासाठी परवानगी द्यावी लागेल तेवढीच परवानगी देण्यात आली आहे. विधेयकामध्ये ज्या प्रयोजनांसाठी इंग्रजी भाषेचा वापर करता येईल त्याची तपशिलवार माहिती नमूद करण्यात आली आहे. कारण आपल्यावर संविधानाचे बंधन आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३४६ च्या परंतुकामध्ये निर्दीष्ट केल्यानुसार हिंदी किंवा इंग्रजीचा वापर करण्यास परवानगी द्यावी लागते. महानगरपालिकेला किंवा प्राधिकरणाला परराष्ट्रीय राजदूतांशी पत्रव्यवहार करावयाचा असेल तर तो इंग्रजीमध्ये करण्याची मुभा असली पाहिजे. महालेखापाल यांना लेखे किंवा पत्रव्यवहार करण्यासाठी संविधानातील तरतुदीनुसार भाषेच्या वापराची परवानगी द्यावी लागते. वैध अभिप्रायासंबंधीची विवरणपत्रे आणि वैध अभिप्राय याबाबत कायद्यातील तरतुदीमुळे ते इंग्रजीमध्ये सादर करण्याची अनुमती द्यावी लागते. एवढीच वर्जित प्रयोजने आहेत. त्या व्यतिरिक्त इंग्रजी किंवा हिंदीचा वापर करण्याचे बंधन नसल्याने त्यासंदर्भात मराठीचा वापर केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सदरहू विधेयक सर्वानुमते मंजूर होईल, अशी मला आशा आहे. कारण आपल्या सर्वांची भावना एकच आहे. तरी देखील कोणी राजकारण करु इच्छित असेल तर त्यांनी ते करुन नये. निवडणुका जवळ आल्यानंतर मराठी भाषेचे विधेयक कसे आणण्यात येते, असे प्रश्न आपणास पडतात. मी उलट विचारतो की, निवडणुका जवळ आल्या म्हणून आपण आपली कर्तव्ये पार पाडावयची नाहीत काय, हे विधेयक निवडणुका होईपर्यंत पुढे ढकलले पाहिजे का, त्याची आवश्यकता काय आहे ? हे विधेयक आणण्याचा आपला हक्क आहे, अधिकार आहे, कर्तव्य आहे. निवडणुका येतील व जातील. परंतु मराठी भाषेचे महत्त्व, मराठी भाषेची अस्मिता सांभाळण्याचा हा विषय आहे. जसे आपणास मराठीतच स्वप्न सूचतात, तसा हा विषय आहे. आपण यामध्ये राजकारण शोधण्याचा प्रयत्न करु नये.

असुधारित प्रत

श्री.सुभाष देसाई ...

अध्यक्ष महोदय, विधेयकाची अंमलबजावणी करताना सर्वांना दक्ष रहावे लागेल. मराठी भाषा विभागानेही दक्षता पाळण्याचे ठरविले आहे. या विधेयकाची अंमलबजावणी करताना पळवाटा राहू नयेत, यावर लक्ष ठेवण्यासाठी ज्या यंत्रणा उभ्या कराव्या लागतील त्या उभारण्यात येतील. समित्या गठीत करण्याची आवश्यकता असेल तर त्या गठीत करण्यात येतील. या विधेयकाची काटेकोर अंमलबजावणी होईल, याकरिता दक्षता घेण्यात येईल, असे मी आपणास स्पष्ट करतो. हे विधेयक आपण सर्वांनी एकमताने मंजूर करावे, अशी विनंती करतो.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, या विधेयकास आमचा विरोध आहे, असे आम्ही म्हटले नाही. या विधेयकास आमचे समर्थन असून ते एकमताने मंजूर करण्यात येईल. माझा मुद्दा अनुत्तरीत राहिला आहे. आपण इंग्रजी व हिंदी भाषेचा वापर कोणत्या प्रयोजनासाठी करता येईल याबाबतची यादी स्पष्ट केली आहे. हे बरे झाले.

अध्यक्ष महोदय, या विधेयकातील ५, ६, ७, व ८ मधील तरतुदीनुसार जिल्हा मराठी समित्या गठीत करण्यात येणार आहेत. या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यलय प्रमुख जबाबदार असतील, असे विधेयकामध्ये नमूद करण्यात आले आहे. समजा; एमएसआरडीमधील सर्व व्यवहार मराठी भाषेमध्ये चालतो हे पाहण्याची जबाबदारी कार्यलय प्रमुखाची आहे.

अध्यक्ष महोदय, या विधेयकामध्ये ७ व्या तरतुदीमध्ये नमूद करण्यात आले आहे की, सन १९६४ मधील कायद्यान्वये जिल्ह्यात स्थापन केलेली जिल्हा मराठी भाषा समिती ही तक्रारींची चौकशी करील. समजा; मी एमएसआडीसीमध्ये मराठी भाषेत काम सुरु नाही, अशी तक्रार जिल्हा मराठी भाषा समितीकडे केली तर त्याबाबत जिल्हा मराठी भाषा समिती किंवा राज्य मराठी भाषा समिती एमएसआरडीसीला निर्देश व अनुदेश देईल.

ॲड.आशिष शेलार...

अध्यक्ष महोदय, विधेयकातील ८ व्या क्रमांकाच्या तरतुदीमध्ये नमूद करण्यात आले आहे की, अशा प्राधिकरणाच्या कर्मचारी यांच्या विरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

**उपाध्यक्ष** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ ५ मिनिटांसाठी वाढविण्यात येत आहे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सदरहू समिती शिस्तभंगाची कारवाई करणार आहे. परंतु या तरतुदींचा काही लोक दुरुपयोग करु शकतील. प्राधिकरणाच्या कार्यालयात लुडबूड करण्यासाठी दुर्हेतूने स्वत:चे काम करण्यासाठी जिल्हा मराठी भाषा समितीकडे तक्रार करुन संबंधित आस्थापनेला छळण्यात येणार नाही, याची चिंता करावी लागेल. याबाबत माझी सूचना आहे की, निर्देश व शिस्तभंगाचे अधिकार जिल्हा किंवा राज्य भाषा मराठी समितीला देण्यात आले आहेत. त्याऐवजी ज्याप्रमाणे महिलांचे अधिकार संरक्षित करण्यासाठी त्या आस्थापनेत समिती गठीत करण्यात आलेली असते तशीच समिती या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी गठीत करण्यासाठी तरतदू करण्यात यावी. त्यामुळे त्या आस्थापनेच्या बाहेर एक शक्ती केंद्र निर्माण होणार नाही. त्यामुळे भविष्यात कोणी अडथळा करणार नाही याकरिता उक्त तरतूद करण्यात येईल काय ?

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, मराठी भाषेच्या वापरासंदर्भात तक्रारी करण्यासाठी नागरिकांना एक स्थान असणे गरजेचे आहे. त्याकरिता मराठी भाषा समिती काम करणार आहे. परंतु जिल्हाधिकारी हेही त्यांच्या पदानुसार जबाबदारी सांभाळतील व त्यांचेही नियंत्रण राहील. तसेच राज्य शासनाकडे सर्वोच्च अधिकार आहेतच. त्यामुळे सन्माननीय सदस्य यांनी सांगितल्यानुसार या कायद्याचा कोणाला गैरवापर करता येणार नाही किंवा यातून पळवाटा काढण्याची संधी राहणार नाही. अशा पद्धतीने या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येईल, हे मी नमूद करतो.

ॲड.राहुल नार्वेकर : अध्यक्ष महोदय, या विधेयकामध्ये एक तांत्रिक अडचण आहे. मंत्री महोदयांनी आताच माहिती दिली आहे की, सन १९६४ मधील कायद्यात लोकल सेल्फ गव्हर्नमेंट बॉडीची तरतूद नसल्याने हे विधेयक आणण्यात आले आहे. राज्यातील एका कायद्यामध्ये एक तरतूद असेल व दुसरा कायदा आणून दुसरी तरतूद करण्यात आली तर दोन्ही कायद्यांमध्ये कॉन्फ्लीक्ट होईल. याकरिता सन १९६४ मधील कायद्यामध्ये सुधारणा करुन त्यामध्ये उक्त तरतुदी केल्या पाहिजेत किंवा या कायद्यात ओव्हररायडींग इफेक्टची तरतूद केली पाहिजे. This Act shall have overriding effect over the provisions of the Official Languages Act, 1964. या दोन पर्यायांचा वापर केला नाही तर या कायद्याच्या संदर्भात न्यायालयात दावे दाखल होतील त्यावेळी ही अडचण समोर येईल. त्याकरिता उक्त तरतुदी करण्यात याव्यात.

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य यांनी आपले मत मांडले असून ते स्वत: वकील आहेत. त्यांच्या सूचनेची मी दखल घेऊन सांगतो की, हे विधेयक आणण्यासाठी उशीर झाला. कारण आम्ही विविध पातळ्यांवर याची कायदेशीर बाजू पुन्हा पुन्हा तपासून घेतली आहे. अनेक तज्ज्ञ व विधि व न्याय विभागाकडून अभिप्राय घेऊन छाननी करुनच हे विधेयक सभागृहासमोर आणले आहे. या विधेयकाची कायदेशीर तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे मला भविष्यात काही अडचण येईल, असे वाटत नाही. मागील कायद्यामध्ये ज्या बाबी राहून गेल्या होत्या त्या यामध्ये आणून हे विधेयक सर्वंकष मराठी भाषा लागू करण्यासाठी आणण्यात आले आहे. सदरहू विधेयक सभागृहाने एकमताने मंजूर करावे, अशी माझी विनंती आहे.

प्रश्न मतास टाकून एकमताने संमत झाला.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते १२ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १३ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून एकमताने संमत झाला.

**उपाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १३ एकमताने संमत झाले आहे.

---------

**उपाध्यक्ष :** सभागृहाच्या कामकाजाची वेळ सकाळी १०.५५ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

असुधारित प्रत

**पृ.शी. :** शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XIV OF 2022

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF FEES) ACT, 2011)

श्रीमती वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १४ महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : अध्यक्ष महोदय, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १४ वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारच्या हेतुला आमचे समर्थन आहे. सरकारच्या वतीने असे नमूद करण्यात आले आहे की, शैक्षणिक संस्थांकडून भरमसाठ शुल्क आकारण्याची प्रथा आहे. ही बाब आपण देखील मान्य करीत आहात. शिक्षणाच्या व्यापारीकरणास प्रभावीपणे आळा घालण्याकरिता....म्हणजे शिक्षणाचे व्यापारीकरण सुरु आहे यास या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य सहमत असतील. ......आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने या तीन बाबींसाठी आपण या विधेयकामध्ये बदल काय प्रस्तावित केलेला आहे? विभागीय शुल्क नियामक समित्या व पुनरीक्षण समिती यांची अध्यक्ष व सदस्य आहेत, त्यांच्या बैठकांची संख्या व उपस्थिती विचारत न घेता.... पूर्वी शासनाकडून त्यांना वेतन दिले जात होते. परंतु आता आपण त्यांना मानधन देऊन राज्य सरकारचा वित्तीय भार कमी करावा, अशी आपली कल्पना आहे. हे विधेयक मांडण्यामागील हा आपला उद्देश आहे आणि तो आपण या विधेयकामध्ये नमूद केलेला आहे.

ॲड.आशिष शेलार........

अध्यक्ष महोदय, यासंदर्भात माझे फक्त दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. कोरोना काळामध्ये विभागीय शुल्क नियामक समित्या काय करत होत्या? पुनरीक्षण समितीचे अस्तित्त्व होते की नाही ? जर या दोन्ही समिती नव्हत्या तर राज्य सरकारने काय व्यवस्था केली होती? कोरोना काळामध्ये शाळा बंद होत्या. परंतु फी मध्ये वाढ करण्यात आली होती. विद्यार्थी शाळेत जात नव्हते. परंतु कॅन्टींग, बस, वीज व वसतीगृह या सर्वांसाठी फी आकारलेली आहे. त्यामुळे जनआंदोलन झाले होते. त्यावेळी मंत्री महोदयांची देखील अनेक लोकांनी भेट घेतली होती. इतकेच नव्हेतर काही जणांनी माननीय न्यायालयामध्ये याचिका दाखल केलेली आहे. माझ्यासह सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर यांनी देखील माननीय न्यायालयामध्ये याचिका दाखल केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, पुढील वर्षाची फी ठरविण्यासाठी शाळा स्तरावर पालकांची बैठक घेतली जाते. त्या बैठकीमध्ये फी संदर्भात संस्थाचालक प्रस्ताव मांडतात. उक्त प्रस्तावावर त्या बैठकीमध्ये चर्चा होणे अपेक्षित असते. त्यानंतर वाढविण्याची कारणे दिली जातात. त्यानंतर पालक समितीने फी निश्चित केल्यानंतर त्यावर कोणाची तक्रार असेल तर तो विभागीय शुल्क नियामक समितीकडे अपील करतो.

अध्यक्ष महोदय, सन २०२०-२१ मध्ये कोरोनाचे संकट येईल म्हणून सन २०१९ मध्ये कोणालाही माहिती नव्हते.

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार हे या विधेयकावर ऑनलेग राहतील.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी १०.५५ ते ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय शिरसाट)**

**पृ.शी./मु.शी. :** तोंडी उत्तरे

**तालिका सभाध्यक्ष :** आता अल्प सूचना प्रश्न क्र. ४४४७१ चर्चेला घेण्यात येईल.

**अल्प सूचना प्रश्न क्रमांक ४४४७१**

(**प्रेस :** येथे अल्प सूचना प्रश्न क्रमांक ४४४७१ छापावा.)

(श्री. शंभूराज देसाई, श्री. दिलीपराव वळसे-पाटील यांच्याकरिता.)

असुधारित प्रत

अल्प सूचन प्रश्न क्रमांक ४४४७१....

ॲड. राहूल कुल : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील दौंड तालुक्यातील यवत पोलीस स्टेशन अंतर्गत पाच गावठी पिस्तूल, एक रिवोल्वर आणि १९ जिवंत काडतुसे असा शस्त्रसाठा दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी सापडला होता. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी विहित वेळेत काळजी घेतल्यामुळे पुढील प्रसंग टळला आहे, ही बाब खरी आहे. परंतु या निमित्ताने काही प्रश्न निर्माण होतात. या परिसरातील अवैध धंदे बंद करावेत, अशी मी सातत्याने मागणी करीत असतो. त्या भागातील वाळूची गुन्हेगारी आणि त्यातून निर्माण होणारी स्पर्धा व मटका हे गुन्हेगारी निर्माण होण्याचे प्रमुख कारण आहे. हे व्यवसाय बंद करण्याबाबत मी सातत्याने आग्रह करीत असतो. मी याबाबत मंत्री महोदयांना दोन ते तीन प्रश्न विचारणार आहे. वाळू, मटका यांचे अवैध व्यवसाय पुणे जिल्ह्यात सुरु आहेत. हे व्यवसाय बंद करण्याबाबत मंत्री महोदय कोणते निर्देश देणार आहेत ? दुसरे असे की, माझ्या मतदार संघातील वाढती गुन्हेगारी लक्षात घेता, मी सातत्याने माननीय पालकमंत्री व जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या संपर्कात असतो. मी याबाबत यापूर्वी काही सूचना केल्या होत्या. मला वाटणारी भिती खरी ठरली आहे. परराज्यातील लोक व्यवसायाच्या निमित्ताने तेथे येत असतात. त्यांच्या माध्यमातून शस्त्रांचा पुरवठा होत असतो. ग्रामीण भागातील युवकांमध्ये गुन्हेगारीचे आकर्षण वाढत आहे. याबाबत मंत्री महोदय विशेष मोहिम राबविणार आहेत काय ? माझ्या मतदारसंघात पाटस येथे पोलीस स्टेशनची मागणी करण्यात आली आहे. दौंड हा वाढता भाग आहे. तेथेही एक पोलीस चौकी व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे. मागील सहा महिन्यात राज्यात बरेच निर्णय घेतले आहेत. परंतु पाटस पोलीस स्टेशन आणि दौंड पोलीस स्टेशनबाबतचा निर्णय प्रलंबित ठेवण्यात आला आहे. याबाबत शासन सकारात्मक विचार करुन निर्णय घेणार आहे काय ?

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. राहूल कुल यांनी गावठी पिस्तुल आणि सापडलेला शस्त्रसाठा याबाबत अल्प सूचना प्रश्न उपस्थित केला आहे. या प्रकरणाबाबत यवत पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल

असुधारित प्रत

अल्प सूचन प्रश्न क्रमांक ४४४७१....

श्री. शंभूराज देसाई....

करण्यात आला आहे. यात एकूण आठ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ६ आरोपींना अटक केली आहे. त्यातील दोन आरोपींचे नाव निष्पन्न होत असून त्यांची इतर माहिती प्राप्त होत नाही. या दोघांची नावे हनीभाई आणि हपीभाई अशी आहेत. हे दोन्ही आरोपी परराज्यातील आहेत. राहू, ता. दौंड येथील सहा आरोपींना अटक केली आहे. दिनांक ५ मार्च, २०२२ ते दिनांक १० मार्च, २०२२ या कालावधीत हे आरोपी पोलीस कस्टडीमध्ये होते. त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना न्यायालयीन कोठडी मिळाली होती. सध्या ते जामिनावर सुटले आहेत. परराज्यातून अवैध गावठी कट्टे आणण्याचे काम उक्त दोन व्यक्तींनी केले आहे. यात अमोल शिवाजी नवले नावाचा एक आरोपी आहे. त्यांचा कुदळे बंधुसोबत वाद झाला होता. त्याने इन्स्टाग्राम ॲपवरुन हत्यारे हवी आहेत, अशी नोंदणी केली होती व परराज्यात जाऊन हत्यारे आणली आहेत, असे प्राथमिक तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. दोन फरारी आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे एक पथक परराज्यात जाऊन आले आहे. परंतु त्यांचा शोध लागलेला नाही. मी आज माहिती घेत असताना अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत की, पुन्हा एकदा शोध मोहिम राबविण्यात यावी. ज्यांच्याकडून हे हत्यारे घेण्यात आले आहेत त्यांना शोधून त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी, असेही मी सांगितले आहे. या प्रकरणातील सहा आरोपींना अटक करुन गुन्हा दाखल केला असून ते सध्या जामिनावर मुक्त आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या अल्प सूचना प्रश्नाव्यतिरिक्त दोन अधिकचे प्रश्न उपस्थित केले आहेत. वाळुमुळे वाद निर्माण होतात, असे त्यांनी सांगितले आहे. संपूर्ण राज्यात नवीन वाळू उपसा धोरण माननीय महसूल मंत्र्यांनी आणले आहे. त्याला अनुसरुन चोरटी वाळू रोखण्याकरिता पोलिसांनी मदत करण्याची भूमिका स्वीकारली आहे. याबाबतच्या सूचना प्रत्येक जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिल्या आहेत.

अल्प सूचन प्रश्न क्रमांक ४४४७१....

श्री. शंभूराज देसाई....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पाटस पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला आहे. नवीन पोलीस स्टेशन निर्माण करताना काही निकष असतात. जेथे नवीन पोलीस स्टेशन निर्माण करावयाचे आहे, तेथील गावांची संख्या, त्या गावापासून जवळचे पोलीस स्टेशन किती अंतरावर आहे आणि तेथे घडणारे गुन्हे, असे निकष आहेत. जर तेथे गुन्हेगारीचा दर अधिक असेल व लोकांना लांब अंतरावरील पोलीस स्टेशनमध्ये जावे लागत असेल तर तो ही निकष गृहीत धरला जातो. हे निकष तपासून घेतले जातील. सन्माननीय सदस्य ॲड. राहूल कुल यांनी मांडलेल्या या प्रश्नाबाबत सकारात्मक विचार केला जाईल. वाढता पीएमआरडीएचा भाग आणि तेथे सापडणारे गावठी कट्टे, वाळुची तस्करी यांना आळा घालण्यासाठी राज्य पोलीस दलाच्या वतीने निकष ठरविलेले आहेत. ते निकष तपासून या पोलीस स्टेशनबाबत सहानुभूतिपूर्वक विचार केला जाईल.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, या अल्प सूचनेतील गुन्हा अतिशय गंभीर आहे. सहा गावठी पिस्तूल, एक रिवोल्वर आणि १८ जिवंत काडतुसे सापडलेली आहेत. या प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे व पोलीस विभागाने केलेली कार्यवाही देखील दिसून येत आहे. मी यानिमित्ताने दोन विषय उपस्थित करीत आहे. या अल्प सूचना प्रश्नातील अ.क्र. ४ मध्ये 'या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले आहे', याची विचारणा केली आहे. परंतु चौकशीअंती काय आढळून आले आहे, याची सविस्तर माहिती दिलेली नाही. या प्रकरणातील गुन्हा भारतीय हत्यार कायद्यानुसार नोंदविला गेला आहे, असे दिसून येते. या कायद्यानुसार एक रिवोल्वर पकडली गेली तर त्या आरोपीला लगेच जामिन मिळत असतो. हा कायदा केंद्र सरकारचा आहे. अशा प्रकारचा शस्त्रसाठा सापडला असेल तर भारतीय हत्यार कायद्याच्या पुढे जाऊन सीआरपीसी अंतर्गत या कायद्याला सुधारणा सूचविण्याचे काम राज्य सरकार करणार

अल्प सूचन प्रश्न क्रमांक ४४४७१....

श्री. योगेश सागर....

काय ? हा गुन्हा जामिनपात्र असू नये, अशी शिफारस राज्य सरकार केंद्र सरकारकडे करणार आहे काय ? चौकशीअंती काय आढळून आले आहे, याचा उल्लेख नाही. हा मोठा शस्त्रसाठा कशासाठी आणला आहे ? एखादा गावठी कट्टा, रिवोल्वर, दोन ते तीन काडतुसे पकडले असतील तर आपण समजू शकतो. यात सहा गावठी पिस्तूल, एक रिवोल्वर, १८ जिवंत काडतुसे पकडले आहेत. यामुळे याचा तपास सीआयडीकडे वर्ग केला जाणार काय ?

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, यातील आरोपी क्र. – ३ अमोल शिवाजी नवले याचा गावातील कुदळे बंधुसोबत वाद झाला होता. त्याने त्या वादातून इन्स्टाग्रामवर हत्याराची मागणी केली. ही माहिती तपासामधून समोर आली आहे. ही बाब तक्रारीमध्ये नसून ती पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाली आहे. दोन फरार आरोपींना परराज्यात शोधण्यासाठी पोलिसांचे एक पथक जाऊन आले आहे. त्यांना ते आरोपी आढळून आले नाहीत. त्या पथकाचा विस्तार करुन किंवा दुसरे पोलीस अधिकारी पाठवून या दोन फरार आरोपींचा शोध घेण्याचे काम केले जाईल. तसेच इन्स्टाग्रामवरुन हत्याराची मागणी नोंदविणे, जेथे पत्ता दिला तेथे जाणे, अशा प्रकारची माहिती तपासामध्ये आली आहे. हे मी सन्माननीय सदस्य ॲड. राहूल कुल यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल. यात नेमके कोणकोण सामील आहेत, यात कोणती कॉन्पिरन्सी आहे, हे सर्व शोधून काढले जाईल.

------

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

**आमगांव (ता.वाडा, जि.पालघर) येथील जमिनदाराने इनाम म्हणून मिळालेली जागा शासनाची पूर्व परवानगी न घेता विकल्याबाबत**

**(१) * ३९३५४ श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगांव (ता.वाडा, जि.पालघर) येथील एका जमिनदाराने इनामात मिळालेली जागा शासनाची पूर्व परवानगी न घेता मे. विराज प्रोफाईल प्रा.लि. यांना विकल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) मौजे आमगांव, ता.वाडा येथील मे. विराज प्रोफाईल प्रा.लि. कंपनीच्या नावावर असलेले क्षेत्र १०५.७७ हे.आर जमिनीस महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतन ॲक्ट, १९५० च्या तरतूदी लागू असल्याने प्रस्तुत जमिनीच्या गा. न. नं ७/१२ सदरी इतर हक्कात "सदर जमिनीचा उपयोग शेतीकडेच करावा. शेती व्यतिरिक्त उपयोग केल्यास बाजारभावाप्रमाणे ५० टक्के दंड भरावा लागेल" अशी नोंद ठेवण्यात आलेली आहे.

विषयांकित मिळकत मे. विराज प्रोफाईल प्रा. लि. कंपनीने महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी खरेदी केलेली आहे. सदरचे क्षेत्र तत्कालीन तरतुदीअन्वये १० हेक्टर पेक्षा अधिक असल्याने विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक १४.०९.२००६ च्या परवानगीने खरेदी केलेले आहे.

मौजे आमगांव, ता.वाडा येथील मे. विराज प्रोफाईल प्रा. लि. कंपनी व निरज राजू कोचर व इतर यांचे नावे असलेल्या क्षेत्राबाबत विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १४.०९.२००६ रोजी दिलेले परवानगी आदेश हे त्यांच्या दिनांक २४.०४.२०१७ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

**ता.प्र.क्र.३९३५४.....**

**श्री.बाळासाहेब थोरात.....**

मे. विराज प्रोफाईल प्रा. लि. यांनी सदरहू जमीन बिनशेती / बांधकाम परवानगीसाठी अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारचा अर्ज केलेला आढळून आलेला नाही. सबब, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ चा भंग केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांचे स्तरावर सुनावणी सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९३५४.....

श्री.दौलत दरोडा : अध्यक्ष महोदय, मौजे आमगांव, ता.वाडा येथील १०५.७७ हे.आर. भूखंडास महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतन ॲक्ट, १९५० च्या तरतूदी लागू असताना तो मे.विराज प्रोफाईल प्रा.लि. कंपनी व निरज राजू कोचर व इतर यांना कवडीमोल भावाने विकण्यात आला. त्यांना विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १४.०९.२००६ रोजी उद्योग परवानगी आदेश दिले. सदर आदेश दिनांक २४.०४.२०१७ रोजी रद्द का करण्यात आले?

मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, " मे.विराज प्रोफाईल प्रा.लि. यांनी सदरहू जमीन बिनशेती / बांधकाम परवानगीसाठी अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारचा अर्ज केलेला आढळून आलेला नाही." परंतु मी सांगू इच्छितो की, सदर ठिकाणी सपाटीकरणाचे काम सुरु आहे. एखाद्या शेतकऱ्याने टोपलीभर माती काढली तरीही त्याला रॉयल्टी आकारली जाते परंतु सदर विकासक ६०० एकरांमध्ये काम करीत आहे. माझा प्रश्न आहे की, सदर विकासकाला रॉयल्टी आकारली जाईल का? तसेच त्याच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल का ?

अध्यक्ष महोदय, या वतनामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी कुटुंबे राहत आहेत. त्यांना या जमिनीवर कूळ म्हणून लावण्यात येईल का ?

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, आदिवासी कुटुंबांना कूळ म्हणून लावायचे किंवा कसे हे तपासून पाहण्यात येईल. कारण हा प्रश्न प्रथमच उपस्थित करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या क्रमांकाच्या प्रश्नाबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, ही जमीन परगणा व कुळकर्णी वतन संवर्गातील आहे. यामध्ये जुन्या शर्तींचा उल्लेख असल्यामुळे जमिनीच्या शेती प्रयोजनासाठी हस्तांतरास परवानगीची गरज नाही. तसेच खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठीसुध्दा जमीन खरेदी करायची असल्यास परवानगीची गरज लागत नाही. फक्त जमीन खरेदी केल्यानंतर ३० दिवसांच्या आत २ टक्के नजराणा भरावा लागतो.

ता.प्र.क्र.३९३५४.....

श्री.बाळासाहेब थोरात.....

या प्रकरणी असे दिसत आहे की, मे.विराज प्रोफाईल प्रा.लि. या कंपनीने कुळ कायद्याच्या कलम ६१ (१) अन्वये खरेदी केली आहे. उद्योजकाला भोगवटा-२ ची जमीन खरेदी करावयाची असल्यास त्याने ३० दिवसांच्या आत २ टक्के नजराणा भरणे आवश्यक होते. परंतु मी उत्तरामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे सुनावणी सुरु आहे. २ टक्के नजराणा रक्कम मुदतीत भरलेली नसल्यामुळे आता ७५ टक्के रक्कम भरण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्याशिवाय जमिनीचा दर्जा इनाम असल्यामुळे भविष्यकाळात बिन शेती प्रयोजनासाठी वापर करायचा ठरल्यास पुन्हा ५० टक्के नजराणा भरावा लागेल. जिल्हाधिकारी यांनी सदर आदेश परगणा व कुळकर्णी वतन कायदा आणि कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ६३ एक-अ अन्वये दिले आहेत.

अध्यक्ष महोदय, विकास आयुक्त (उद्योग) यांनी दिनांक १४.०९.२००६ रोजी दिलेली परवानगी दिनांक २४.०४.२०१७ रोजी रद्द केली. कारण १० वर्षांमध्ये तेथे कोणतेही काम झाले नव्हते.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दौलत दरोडा यांच्या प्रश्नास विभागाने दिलेले उत्तर पाहता असे दिसते की, वेड पांघरुन पेडगावला जाण्याचा हा प्रकार आहे. माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपण एका वाक्यात सांगावे की, इनाम जमीन असेल तर त्याबाबत काय कार्यवाही झाली पाहिजे ? हे विधीमंडळ आहे. या ठिकाणी एखाद्या प्रश्नाचे उत्तर देताना किमान गांभीर्य बाळगले पाहिजे कारण संपूर्ण राज्यातील जनतेपर्यंत त्यातून संदेश जात असतो. साधी आणि सरळ गोष्ट आहे की, ही इनाम जमीन असेल तर खरेदी रद्द झाली पाहिजे. कारण इनाम जमिनीची खरेदी होत नाही. त्यामुळे अगोदर ही खरेदी रद्द झाली पाहिजे. तसेच ही प्रक्रिया होत असताना ज्यांनी-ज्यांनी डोळेझाक केली त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत मंत्री महोदय आदेश देतील का ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९३५४.....

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, हे प्रकरण अनेक वर्षांपासून सुरु आहे. हा विषय शेवटी जिल्हाधिकाऱ्यांकडे आल्यानंतर त्यांनी संबंधित कंपनीला ७५ टक्के नजराणा भरण्याचे दंडात्मक आदेश दिले आहेत. या कंपनीने मुदतीत २ टक्के नजराणा भरला असता तर हा विषयच पुढे गेला नसता. परंतु कंपनीने वेळेत सदर नजराणा न भरल्याने आता ७५ टक्के नजराणा भरावा लागणार आहे. तसेच पुन्हा बिगर शेती जमीन करायची असेल तर ५० टक्के नजराणा भरावा लागेल.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, जमीनदाराने इनाम म्हणून मिळालेली जागा शासनाची पूर्व परवानगी न घेता विकल्याचे हे प्रकरण आहे. दिनांक १४.०६.२००६ रोजी विकास आयुक्त (उद्योग) यांनी कशाच्या आधारे परवानगी दिली होती ? कारण इनाम जमीन सब लिज करता येत नाही किंवा विक्री करता येत नाही.

अध्यक्ष महोदय, मे.विराज प्रोफाईल प्रा.लि. यांनी जमीन खरेदी केल्यापासून दिनांक २४.०४.२०१७ या कालावधीपर्यंत ५० टक्के दंड भरणे आवश्यक होते. संबंधिताकडून दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. तरी सदर दंडाची रक्कम किती कालावधीत वसूल करण्यात येईल ?

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ एक-अ अन्वये कधी सुधारणा करण्यात आल्या होत्या ? त्यानंतरच सदर जमिनीचा व्यवहार झाला आहे का ? उक्त जमिनीस औद्योगिक कारणासाठी परवानगी देतेवेळी सदर कलमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या होत्या का, असल्यास सदरहू सुधारणेचा तपशिल काय आहे ? तसेच सदरहू जमिनीच्या खरेदीस सन २००६ मध्ये परवानगी देणारे विकास आयुक्त (उद्योग) यांचे नाव काय आहे व सद्यस्थितीत ते कुठे कार्यरत आहेत ?

ता.प्र.क्र.३९३५४.....

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन २००६ मध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचे नाव व त्यांची सध्याची पदस्थापना याबाबत माझ्याकडे आता माहिती नाही.

सन्माननीय सदस्यांना मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी जमीन खरेदी करावयाची असल्यास परवानगीची गरज लागत नाही. फक्त त्यासाठी ३० दिवसांमध्ये २ टक्के नजराणा भरावा लागतो. ही प्रक्रिया अतिशय साधी व सोपी आहे. ही २ टक्के रक्कम भरण्यासाठी देखील खरेदी झाल्यानंतर ३० दिवसांची मुदत देण्यात आलेली आहे. औद्योगिकीकरण वाढण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच औद्योगिकीकरणासाठी आवश्यक परवानग्या विकास आयुक्त (उद्योग) यांनी दिल्या आहेत. त्यावेळी त्यांनी कोणत्या बाबी तपासून पाहिल्या याची माहिती आता माझ्याकडे नाही परंतु सदर माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**गोळेगांव (ता.जामोद, जि.जळगांव) येथे वाळू माफियांनी एका व्यक्तीस जिवे मारण्याचा केलेला प्रयत्न**

**(२) * ३८५१४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोळेगांव (ता.जामोद, जि.जळगांव) येथे वाळू माफियांतर्फे वाळू वाहतूक करण्यास विरोध केल्याने वाळू माफियांनी एका व्यक्तीस विष पाजून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वाळू माफियांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे असून, आरोपीने त्याच्या दोन साथीदारांसह गोळेगाव खुर्द येथे फिर्यादी यास, घरासमोरुन जाणाऱ्या वाहनांमुळे घरात धूळ येत असल्याची तक्रार केल्याने दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजी जीवे मारण्याच्या उद्देशाने विषारी औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.

(२) सदर प्रकरणी गु.र.नं.१९/२०२२, भा.दं.वि. कलम ३०७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना मा. सत्र न्यायालयाने अटकपूर्व अंतरिम जामीन दिला असून तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

ता.प्र.क्र.३८५१४.....

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, गोळेगाव, ता.जामोद, जि.जळगाव येथील वाळू माफियांच्या संदर्भात मी हा प्रश्न विचारलेला आहे.

अध्यक्ष महोदय, तक्रार करणाऱ्या व्यक्तीला दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वाळू माफियाने विष पाजून मारण्याचा प्रयत्न केला. माननीय गृह मंत्र्यांनी छापील उत्तरात म्हटले आहे की, "अंशत: खरे असून, आरोपीने त्याच्या दोन साथीदारांसह गोळेगाव खुर्द येथे फिर्यादी यास, घरासमोरुन जाणाऱ्या वाहनांमुळे घरात धूळ येत असल्याची तक्रार केल्याने दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजी जीवे मारण्याच्या उद्देशाने विषारी औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. सदर प्रकरणी गु.र.नं.१९/२०२२, भा.दं.वि. कलम ३०७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना मा. सत्र न्यायालयाने अटकपूर्व अंतरिम जामीन दिला असून तपास सुरु आहे." तसेच या कारवाईमध्ये विलंब झालेला नसल्याचेही नमूद केले आहे.

अध्यक्ष महोदय, मागील वेळी या विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली त्यावेळी सर्वच पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भागातील वाळू माफियांचे सर्वसामान्य नागरिकांच्या विरोधात सुरु असलेल्या षडयंत्राविषयी अनेक गोष्टी सांगितल्या.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३८५१४...

श्री. सुनील प्रभू...

अध्यक्ष महोदय, सरकार कोणाचेही असो पण या वाळूमाफियांचे प्रचंड प्रमाणात स्थानिक तहसिलदार कार्यालयातील लोक, ग्रामसेवक, पोलीस अधिकारी यांच्याशी संगनमत असून जणू काही ही दोन खाती हे वाळूमाफियाच चालवितात अशा पध्दतीचे वागणे ज्या ठिकाणी अशा तस्करी चालतात त्या ठिकाणी असते.

अध्यक्ष महोदय, दिनांक १२ जानेवारी २०२२ रोजी गुन्हा झाला. परंतु पोलीस ठाण्याने याची दखल घेतली नाही. एबीपी माझा या न्यूज चॅनेलने जेव्हा ही स्टोरी दाखविली. त्यानंतर या विषयाची चर्चा सुरू झाली. त्यानंतर या घटनेचा गुन्हा दाखल झाला. म्हणजे तेथील पोलीस यंत्रणा इतकी हलगर्जी होती की सर्वसामान्य माणसाला जिवे मारण्याचा प्रयत्न करण्याचा गुन्हा दाखल करुन देखील, सातत्याने न्याय मागण्याचा प्रयत्न करीत असताना त्याला शेवटी एबीपी माझाकडे जावे लागले. एबीपी माझाने स्टोरी दाखविली आणि त्यानंतर त्या आरोपींवर गुन्हा दाखल झाला. म्हणजे लोकशाहीमध्ये सर्वसामान्य लोकांना डॉक्टर बाबासाहेबांच्या संविधानाने दिलेला आहे त्यांच्या बाबतीत अशा पध्दतीने दिरंगाई होत असेल तर या महाराष्ट्रात सर्वसामान्य माणसाला न्याय हवा आहे तो मिळण्यासाठी आपण वाळूमाफियांच्या बाबतीत नेमके काय करणार आहात ते समजले पाहिजे. तसेच या प्रकरणातील सत्य का आहे, कदाचित मी अर्धसत्य सांगितले असेल तर आपण ते पूर्णसत्य सांगावे, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

श्री. शंभुराज देसाई (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, उत्तरामधून हे अंशत: खरे आहे असे एवढ्यासाठी म्हटले होते की, गोळेगांव, तालुका जळगांव जामोद असे सन्माननीय सदस्यांनी प्रश्नामध्ये नमूद केले होते. त्याऐवजी ते बुलढाणा जिल्ह्यातील गोळे गांव आहे. म्हणून तसे उत्तर दिले होते. हा गुन्हा त्याच दिवशी दाखल झाला आहे. दिनांक ११.१.२०२२ रोजी गु.र.नं.१९/२०२२ भारतीय दंड विधान कलम ३०७, ३४ अन्वये दाखल झाला आहे. या प्रकरणात एकूण ३ आरोपी आहेत आणि त्या तिन्ही आरोपींना अटक करण्यासाठी आमचे अधिकारी त्यांच्या

ता.प्र.क्र.३८५१४...

श्री. शंभुराज देसाई...

घराची झडती घेण्यासाठी गेले. ते त्या ठिकाणी आढळून आले नाहीत. त्यांच्या जवळच्या नातेवाईकांकडे तपासणी केली असता ते आढळून आले नाहीत. दरम्यानच्या काळात हे तिन्ही आरोपी फरार होते आणि त्यांनी जाऊन अंतरिम जामीन घेतला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना नम्रतापूर्वक सांगेन की हा अंतरिम जामीन रद्द करण्यासाठी पोलीस दलाकडून सर्व प्रयत्न केले जातील. सरकारी वकिलांकडे या संदर्भातील संपूर्ण माहिती आणि वस्तुस्थिती देऊन कोर्टापुढे वेळ प्रसंगी ही माहिती मेन्शन करावी लागली तरी तसे मेन्शन करुन हा अटकपूर्व जामीन रद्द करण्यासाठी जे जे करावे लागेल ते आमच्या पोलीस दलाकडून केले जाईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी २ विभागाशी निगडीत हा प्रश्न असल्याचे नमूद केले असले आणि पुढे ते असेही म्हणाले की, वाळूमाफिया हे दोन विभाग चालवितात की काय, पण मी सांगू इच्छितो की, त्यांच्या बोलण्यात कोणतेही तथ्य नाही.

अध्यक्ष महोदय, यापूर्वीच्या अल्पसूचना प्रश्नाला उत्तर देताना मी सांगितले होते की, वाळूमाफियांचा प्रश्न हा महसूल विभागाशी संबंधित आहे. महसूल विभागाने वाळू उपसण्याबाबत नवीन धोरण निश्चित केले आहे. ज्या ज्या ठिकाणी महसूल विभागाला पोलीस विभागाची मदत लागते त्या त्या ठिकाणी पोलीस दल उपलब्ध करुन दिले जाते. कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा केला जात नाही. महसूल विभागाचे तहसिलदार असतील किंवा प्रांत अधिकारी असतील यांची मागणी आल्या आल्या संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले आहे. त्यानुसार पोलीस दल उपलब्ध करुन दलि जाते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू म्हणाले की ही वाळूची तस्करी रोखण्यासाठी काय करणार, तर याबाबत महसूल विभागाची आणि गृह

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३८५१४...

श्री. शंभुराज देसाई...

विभागाची एक संयुक्त बैठक घेऊन शासनाने या विषयी जे कडक धोरण केलेले आहे त्याची सत्वर अंमलबजावणी करण्यासाठी जी पावले उचलावी लागतील ती पावले पोलीस दलाकडून उचलली जातील.

श्री. राम सातपुते : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी आता जे उत्तर दिले त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, आमच्या सोलापूर जिल्ह्यामध्ये वाळूमाफियांचा मोठ्या प्रमाणात धुमाकूळ सुरू आहे. आश्चर्य म्हणजे काही महिन्यांपूर्वी एका पोलीस कर्मचाऱ्याची वाळूमाफियाची हत्या केली आहे. त्यानंतर माननीय मंत्र्यांनी येऊन सोलापूर जिल्ह्यात बैठक घेतली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु मंत्री महोदय आल्यानंतर आणि त्यांनी सूचना करुनही अधिकारी जुमानत नाहीत. वाळूमाफियांचा मोठ्या प्रमाणात धुमाकूळ सुरू आहे. ज्या मंगळवेढा तालुक्यात मागे पोलीस कर्मचाऱ्याची हत्या झाली त्या ठिकाणी ८०-८० हजार रुपये घेऊन वाळूच्या गाड्या सोडण्याचे काम सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये हे सर्रास सुरू आहे. तेथील एका पोलीस कर्मचाऱ्याची हत्त्या झाली आहे. त्यामुळे मी मंत्री महोदयांना प्रश्न विचारतो की, स्थानिक पोलीस डीवायएसपी आणि पीआय यांच्यावर कोणती कारवाई केली. अशा पध्दतीने जर तेथे वाळूमाफियांचा सुळसुळाट होत असेल तर पोलीस कर्मचाऱ्यांनी तेथे कसे वावरायचे ? म्हणून आपण त्या डीवायएसपी आणि पीआय यांच्यावर आपण कोणती कारवाई केली आहे आणि केली नसल्यास ती कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम सातपुते यांनी जो प्रश्न विचारला आहे तो आजच्या प्रश्नाच्या स्कोपच्या बाहेरचा आहे. तरी सुध्दा मागे सन्माननीय सदस्य श्री. समाधन औताडे यांनी एक लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती आणि त्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मी त्या जिल्ह्यात येऊन बैठक घेईन, अशा पध्दतीचे मी मान्य केले होते. त्याप्रमाणे अधिवेशन संपल्यानंतर मी त्या जिल्ह्यामध्ये गेलो होतो. आमचे त्या विभागाचे रेंज आयजी,

ता.प्र.क्र.३८५१४...

श्री. शंभुराज देसाई...

तेथील एसपी, तेथील अतिरिक्त एसपी, तेथील एसडीपीओ या सर्वांसमवेत एक विस्तृत बैठक घेतली आणि त्यानंतर या वाळूमाफियांवर कडक कारवाई करण्याचे आदेश मी त्या बैठकीत दिले होते. त्यानुसार मला पोलीस दलाकडून जो अहवाल आला आहे त्यामध्ये मोठ्या प्रमाणात कारवाया केलेल्या आहेत असे दिसते. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. राम सातपुते म्हणत असतील तर स्पेसिफिक तक्रार जर त्यांना कोणाबद्दल असेल, कुठल्या ठिकाणाबद्दल असेल, त्याबाबत त्यांनी स्पेसिफिक तक्रार द्यावे, त्या तक्रारीची चौकशी केली जाईल.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय म्हणतात की, स्पेसिफिक तक्रार द्यावी. पण येथे पोलीस ठाण्याचा लिलावच झालेला आहे अशी परिस्थिती आहे. ज्या भागातून ती वाळू उचलली जाते त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, महसूल खाते आणि पोलीस खाते यांच्या संगनमताने हा धुमाकूळ सर्रासपणे सुरू आहे. उच्छाद मांडलेला आहे. गावोगावी यांची प्रचंड दहशत आहे. तक्रार करणाऱ्या माणसावर हल्ले होतात. त्यांची यंत्रणा इतकी सक्षम आहे की, जेव्हा कारवाई करण्यासाठी आपले अधिकारी जातात तर त्यांना आधीच माहिती मिळते.

अध्यक्ष महोदय, या विषयासंबंधी सभागृहात सातत्याने चर्चा होते. कारण या वाळूमाफियांची पाळेमुळे खालून वरपर्यंत गेली आहेत. त्यामुळे आपण खाली सूचना दिल्या आहेत किंवा इतर ठिकाणी सूचना दिल्या आहेत, असे सांगून काही होत नाही. कारण आता गुंडांच्या टोळ्या तयार झाल्या आहेत. राजकारणासाठी अशा प्रकारच्या वाळूमाफियांचा वापर करुन राजकीय दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. अशा लोकांना राजकीय आशिर्वाद असतात. हा विषय तसा या प्रश्नाच्या बाहेरचा जरी असला तरी विचारार्थ मी आपल्यासमोर ठेवला आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या शेजारच्या राज्यांमध्ये म्हणजे तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि गुजरात राज्यामध्ये अशा प्रकारे माफिया राज चालत नाही. हे फक्त आपल्या

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३८५१४...

श्री. राधाकृष्ण विखे पाटील...

राज्यात सर्रासपणे सुरू आहे. मला वाटते की, आपण केव्हा तरी या विषयावर चर्चा करण्याची आवश्यकता आहे. पोलीस विभागाने प्रकरण महसूल विभागाकडे पाठवायचे आणि महसूल विभागाने परत ते पोलीस विभागाकडे पाठवायचे, यावरुन आपण यावरील नियंत्रणच काढून टाकले असे दिसते. म्हणून कायदा व सुव्यवस्थेच्या निर्माण होणाऱ्या प्रश्नाबद्दल तसेच तरुण पिढीच्या व्यसनाधीनतेचा प्रकार अधिक प्रमाणात वाढत चालल्याबद्दल, गावपातळीवरील गुंडगिरी वाढत चालल्याबद्दल आपले समाजाप्रती काही तरी दायित्व आहे. म्हणून या बाबतीत काही धोरण राबविले पाहिजे. नुसते वाळूचे धोरण आणले आणि रात्री अशी वाहने वाहण्याची परवानगी दिली किंवा कडक धोरण घेणार असे म्हटले आहे. कडक धोरण म्हणजे हप्ते वाढवून घेणे आहे. कडक धोरण म्हणजे सर्वांना आपापला मलिदा अधिकचा मिळवून देणे आहे. त्यामुळे आता जो धुमाकूळ चालू आहे किंवा अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये जे पैसे घेतले जातात, या बदल्यांच्या पोस्टींगसाठी वारेमाप पैसे घेतले जातात. मंत्रालयात यासंबंधी रेटकार्ड छापले आहेत. मग अधिकारी त्याने दिलेले पैसे वसूल कसे करणार, म्हणून ते या सर्व वाळूमाफियांना हाताशी धरुन त्यांनी हा सर्व उच्छाद मांडलेला आहे. आज आपण यावर जे नियंत्रण आणले आहे ते हटवून लोकांसाठी वाळू मोकळी करुन द्यावी. त्यासंबंधी महसूल विभागाशी समन्वय साधून आपण काही धोरणात्मक निर्णय करणार आहात काय, हा प्रश्न आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

ता.प्र.क्र. ३८५१४.....

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, माननीय माजी विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो आजच्या स्कोपच्या बाहेरचा असून गृह विभागाशी संबंधीत नाही. कारण नियंत्रण मुक्त करण्याबाबतचा विषय महसूल विभागाचा आहे. त्यामुळे आपल्या भावना मी माननीय महसूल मंत्र्यांना कळवेल. पोलीस दलाच्याबाबत आपण जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मी सभागृहात वारंवार सांगितलेले आहे की, महसूल यंत्रणेकडून जेव्हा जेव्हा पोलीस बंदोबस्त मागितला जातो किंवा पोलिसांची मदत मागितली जाते तेव्हा तेव्हा अशा वाळूच्या रेड करण्यासाठी, चोरटी वाळू रोखण्यासाठी किंवा रस्त्यावर अवैधरित्या वाहतूक करणारी वाहने थांबविण्यासाठी तातडीने वेळोवेळी मदत दिली जाते. अशा पद्धतीने कुठे मदत होत नसेल तर कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी मला सांगावे. अधिवेशन संपल्यानंतर पुन्हा एकदा राज्यातील सर्व पोलीस अधिक्षकांना या बाबतीतील कडक सूचना दिल्या जातील.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, हा सर्व व्यवसाय मुळात पोलिसांच्या प्रोटेक्शन मुळेच सुरु आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये पूर्ण पोलीस त्यामध्ये समाविष्ट आहेत. त्यामुळे माननीय मंत्र्यांना याची माहिती पाहिजे असेल तर मी पुढच्या अधिवेशनात यामध्ये पोलिसांचे आणि महसूल विभागाचा थेट सहभाग असणाऱ्या किमान २० जिल्ह्यातील अशा प्रकारचे पुरावे देतो. त्यामुळे या संदर्भात आपण शेवटी कलेक्टीव उत्तर देत आहात तर आपले म्हणणे बरोबर आहे. आज जर महसुली यंत्रणा आणि पोलीस विभाग एकत्रित येऊन यावर धोरण ठरविणार नसतील तर आज जिल्ह्या जिल्ह्यातील सर्वात मोठा माफिया हा वाळू माफिया आहे. त्याला पोलिसांचे थेट संरक्षण आहे आणि पोलीस सांगतात की, आम्ही यातून पैसे कमवायचे नाही तर कशातून कमवायचे आहेत. ही परिस्थिती आहे. यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, या संदर्भात आपण माननीय मुख्यमंत्री, माननीय महसूल मंत्री आणि माननीय गृह मंत्री यांच्या उपस्थितीत एक बैठक घेऊन एक नवीन धोरण ठरवावे. ज्या ठिकाणी अशा प्रकारचे व्यवसाय सापडतील आणि तिथे पोलिसांचा थेट सहभाग

ता.प्र.क्र. ३८५१४.....

श्री. देवेंद्र फडणवीस ...

असेल त्या पोलीस अधिक्षकांना तात्काळ निलंबित करण्याचा निर्णय करावा. असे केल्यास ५ दिवसांत हा सर्व विषय संपेल. त्यामुळे आपण या संदर्भात गांभीर्यने काही पाऊले उचलणार आहात काय ?

श्री.शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याबाबत आम्ही निश्चितपणे गांभीर्याने विचार करु आणि पोलीस विभागाच्या बाबत मी मघाशीच सांगितले आहे की, तातडीने सर्व जिल्हा पोलीस अधिक्षकांना सूचना दिल्या जातील की, महसूल विभागाने वाळू उपसासाठी किंवा वाळू वाहतुकीचे जे नवीन धोरण आणलेले त्याची १०० टक्के अंमलबजाणणी करण्यात यावी.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, पंतप्रधान आवास योजना किंवा इंदिरा आवास योजनेच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या घरांसाठी लागणाऱ्या वाळूचा जिल्ह्यामध्ये फक्त एका ठिकाणी पॉइंट दिलेला आहे. त्यामुळे गोरगरिब लोकांना घरकुल बांधण्यासाठी १०० किमी वरुन २०० किमी अंतरावर आणावी लागते. वाळू काढण्यासाठी न्यायालयाचे काही आदेश आहेत. या आदेशाप्रमाणे पोर्कलेन मशिनने वाळू काढता येत नाही. तरी देखील १५-१५ फुट वाळू काढली जात आहे. तहसिलदारांच्या अंगावर गाडी घातली तरी देखील आरोपींना अटक होत नाही. अशा प्रकारे वाळू काढणाऱ्या माफियांचा गुंडाराज सुरु आहे. त्यामुळे वाळू माफियावर आपण कठोर कारवाई केली पाहिजे. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे १ मीटरच्या वर वाळू काढता येत नाही. तिथे छोटे रस्ते असल्यामुळे त्याच्या क्षमतेवर १३ टनावेक्षा जास्त लोड टाकता येत नाही. त्या रस्त्यावर ३० टनाचा लोड टाकल्यामुळे सर्व रस्त उद्धवस्त झाले आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट)** : सन्माननीय सदस्य श्री. बबनराव लोणीकर मी आपल्याला सांगू इच्छितो की, हा प्रश्न महसूल विभागाशी

ता.प्र.क्र. ३८५१४.....

**तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय शिरसाट).....**

संबंधीत आहे आणि माननीय महसूल मंत्री आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यामुळे हाप्रश्न स्कोपच्या बाहेरचा आहे.

--------

असुधारित प्रत

**श्री दत्त विशाल मजूर सहकारी संस्थेत (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) झालेला अपहार**

**(३) * ४२८२५ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री दत्त विशाल मजूर सहकारी संस्था गणेशपूर (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) येथील अध्यक्ष व इतर आठ जणांविरोधात पोलीस स्टेशन येथे नऊ कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार दाखल करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार मजूर सहकारी संस्था २५% कमिशन घेवून काम करीत असून त्यातून ९ कोटी रुपयांचा अपहार केल्याबाबत तक्रार केली असूनही कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन दोषी व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभुराज देसाई यांच्याकरीता, श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.
(२) व (३) सदर तक्रार अर्जदार यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था गडचिरोली या कार्यालयात दिली होती. त्यावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था गडचिरोली या कार्यालयाने सखोल चौकशी केली आहे. त्याबाबतचा चौकशी अहवाल स्वत: अर्जदार यांनी पोलीस स्टेशन आरमोरी येथे दिनांक ०३/०२/२०२२ रोजी दाखल केला आहे. सदर चौकशी अहवालात मागिल तीन वर्षात सदर संस्थेस ४४०.७५ लक्ष रुपयांची कामे मिळाली असल्याने ९ कोटीचा अपहार होणे शक्य नसल्याचे नमूद केले आहे.

सदर अर्जावर चौकशी चालु असुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ता.प्र.क्र. ४२८२५.....

डॉ. देवराव होळी : अध्यक्ष महोदय, सदरचा प्रश्न हा गृह विभाग आणि सहकार विभागाशी संबंधीत आहे. आपल्याला सर्वांना माहीत आहे की, मजुरांचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये मजूर सहकारी संस्था निर्माण होतात. परंतु याचा उद्देश १०० टक्के चुकीचा आहे. दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजी संबंधीत संस्थेविषयी तक्रार दाखल केली होती. परंतु ही तक्रार दाखल झालेली नाही. गडचिरोली जिल्ह्यातील १८ मजूर संस्था बेकायदेशीरपणे २५ टक्के कमिशन घेऊन जिल्हा संघांनी अपहार केला आहे. त्यामुळे या १८ ही मजूर सहकारी संस्थांची चौकशी होणार काय आणि त्या माध्यमातून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील काय ? कारण आम्ही गेल्या १ वर्षापासून मजूर सहकारी संस्थेविषयी तक्रार दाखल केलेली आहे. परंतु तेथील एआर आणि डीडीआर चुकीच्या पद्धतीने अहवाल देतात म्हणून विलंब होतो.

अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, त्यामुळे या १८ ही मजूर सहकारी संस्थांची चौकशी होणार काय आणि जिल्हा सहकारी संस्थांना आपण बरखास्त करणार काय ? तसेच याबाबत माननीय गृह मंत्री आणि माननीय सहकार मंत्र्यांसोबत बैठक घेण्यात येईल काय ?

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. देवराव होळी यांनी श्री. दत्त विशाल मजूर सहकारी संस्था गणेशपूर (ता.आरमोरी, जि.गडचिरोली) यांच्या संदर्भातील तक्रार अर्जदार श्री.मक्रु गोविंदा वाघाडे रा. गणेशपूर शिरशी ता. आरमोरी यांनी या विभागाच्या पोलीस स्टेशनला दिली होती. पोलिसांकडे जशी ही तक्रार दिली तसाच या तक्रारीतील संपूर्ण विषय हा सहकार विभागाशी संबंधीत आहे. तसाच एक तक्रारी अर्ज त्यांनी जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे सुद्धा दिला होता. आमच्या विभागाने डीडीआर (जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था), गडचिरोली यांच्याकडून यामध्ये तथ्य असल्यास गुन्हा दाखल करण्याच्या अनुषंगाने अहवाल किंवा अभिप्राय द्यावा, असे सहकार विभागाला म्हटले होते. दिनांक २ फेब्रुवारी, २०२२ रोजीचा सहकार विभागाचा चार पानांचा अहवाल प्राप्त आहे. त्याचा फक्त शेवटचा परिच्छेद मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवतो. "तक्रारी संदर्भातील सर्व मुद्यांना संघाने नाकारलेले असून अर्ज निरंतर करण्याची

ता.प्र.क्र. ४२८२५.....
श्री. शंभुराज देसाई....

विनंती केली आहे. वरीलप्रमाणे माझ्याकडे तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून तक्रारीमध्ये उपस्थित केलेल्या जवळपास सर्वच मुद्यांचा परामर्श घेण्यात आला आहे. चौकशीमध्ये गंभीरपणे नोंद घेता येईल अशी कोणतीही बाब निदर्शनास आली नाही. किंवा तक्रारदाराने मागणी केल्याप्रमाणे समर्पित संस्थेवर किंवा संघावर तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्याची बाब दिसून आलेली नाही." पोलिसांकडे अशा पद्धतीने सहकारी संस्थांची तपासणी करण्याची वेगळी यंत्रणा नाही. सहकार विभाग त्यासाठी सक्षम आहे. सहकार विभागाने यामध्ये तथ्य नाही असे सांगितल्यामुळे यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

श्री. अनिल पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. देवराव होळी यांनी मांडलेला प्रश्न अतिशय योग्य आहे. या संदर्भात सहकार किंवा गृह विभागाने कारवाई केली पाहिजे. हे त्यापेक्षा महत्त्वाचे आहे. मला या बाबीचा आनंद आहे की, सन्माननीय सदस्य डॉ. देवराव होळी यांनी मान्य केले की, मजूर संस्थेमध्ये बोगस कोटयाधीश सभासद असतात. परवाच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यावर जोरदार आक्रमण केले होते. असाच एक गुन्हा सहकार किंवा गृह विभागाकडून दाखल झाला होता. माझी शासनाला तसेच माननीय सहकार मंत्री व माननीय गृह मंत्र्यांना विनंती आहे की, राज्यामध्ये अशा प्रकारचे बोगस मजूर ज्या ज्या संस्थेमध्ये असतील त्याची आपण चौकशी करणार काय ?

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, मजूर सहकारी संस्थांची चौकशी करण्याचा अधिकार सहकार विभागाला आहे. त्यामुळे हा प्रश्न गृह विभागाशी संबंधीत नाही तसेच स्कोपच्या बाहेरचा प्रश्न आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.42825....

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ प्रोसीजर असा आहे की, विधान परिषदेचे माननीय विरोधी पक्ष नेते माननीय श्री. प्रविण दरेकर यांच्या विरुध्द बँकेने तक्रार केलेली नाही. सहकार विभागाने तक्रार केली नाही. स्युमोटो पोलीस विभागाने एफआयआर दाखल केला आहे. तो कसा काय केला आहे ? आपल्याकडे दोन न्याय आहेत काय ? सरकार पक्षाकरिता वेगळा न्याय व विरोधी पक्षाकरिता वेगळा न्याय आहे काय ? या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केलेली मागणी बरोबर आहे. या संबंधी जो न्याय मानीय श्री. प्रविण दरेकर यांना दिला. त्या प्रमाणे अशा सर्वांची चौकशी करुन स्युमोटो एफआयआर दाखल करणार काय ?

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, तपासून निर्णय घेतला जाईल.

--------

असुधारित प्रत

**औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४) * ४३१२८ श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बांधावर सलग पद्धतीने फळबाग लागवडीसाठी सन २०२१-२०२२ या कालावधीत प्रस्ताव सादर केल्याचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिलेली असतानाही डाटा एंट्री ऑपरेटर यांच्यामार्फत अनेक प्रस्ताव (अंदाजपत्रक) ऑनलाईन करण्याचे प्रलंबित ठेवल्याने अनेक शेतकरी या फळबाग लागवड योजना राबवू शकल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करुन सदर प्रस्ताव विहित कालावधीत ऑनलाईन करुन योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे, श्री. संदीपानराव भुमरे यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, या पहिल्या उपप्रश्नाला असे उत्तर दिले आहे की , हे खरे नाही. मुळात हे उत्तरच खरे नाही. दुसऱ्या व तिसऱ्या उपप्रश्नाला असे उत्तर दिले आहे की प्रश्न उद्भवत नाही. हे उत्तर पूर्णपणे असत्य आहे. अशा प्रकारे जर चुकीची उत्तरे दिली जाणार असतील तर मला नाईलाजाने हक्कभंगाचा प्रस्ताव द्यावा लागेल. मनरेगा मधून ग्राम समृध्दी ही संकल्पना माझ्या मतदारसंघात मी मांडली. सधारण १७२ गावे, तांडा, वाड्या, वस्ती येथे रोहयोच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन मी दौरे केले. आंबा,सिताफळ, चिंच या फळबाग लागवडीला प्राधान्य दिले. शेततळे, नाले, कंपोस्ट, रेशीम उद्योग इ. करिता संकल्पना मांडली.

ता.प्र.क्र. ४३१२८....

**तालिका सभाध्यक्ष** : थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री. अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, दिलेले उत्तर चुकीचे आहे, हाच माझा मुद्दा आहे. चुकीच्या उत्तराबाबत काय कारवाई केली जाणार आहे ? अनेक शेतकरी आज देखील चकरा मारत आहेत. फळबाग लागवड होत नाही. दिलेले प्रस्ताव ऑनलाईन केले नाहीत. डेटा ऑपरेटर काम करीत नाहीत. ते शेतकऱ्यांकडे पैसे मागतात. म्हणून त्यांचे ऑनलाईन अर्ज होत नाहीत. या भागात ३ हजार३८ हेक्टरवर फळबाग लागवड आहे. मात्र यातील केवळ ९०० हेक्टरवरील लागवडीला मान्यता मिळाली. या फळबाग लागवडीला कशामुळे मान्यता मिळत नाही ? या प्रश्नाला दिलेल्या उत्तरावर मी समाधानी नाही. माझे चॅलेंज आहे. येथे असलेल्या कोणत्याही माननीय आमदारांची समिती नेमावी. जर हे चुकीचे निघाले तर आयुष्यात मी कधीच विधानसभेत येणार नाही. येथे चुकीचे उत्तर दिलेले आहेत.

**तालिका सभाध्यक्ष** : आपण असे करु नका. आपली सभागृहाला गरज आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांची आम्हाला चिंता आहे. त्यांनी या प्रश्नावर आक्षेप घेतला आहे. या सदनात एखादा सदस्य ज्यावेळी निवेदन करतो तेव्हा ते सत्य मानून त्यावर कार्यवाही करावी असा या सदनाचा निर्णय आहे. सन्माननीय सदस्य अतिशय स्पष्टपणे सांगत आहेत की, ऑपरेटर नसल्यामुळे, दिरंगाई केल्यामुळे अर्ज ऑनलाईन झाले नाहीत. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. प्रश्न उद्भवत नाही असे सांगण्यापेक्षा त्याची चौकशी करुन असे अर्ज जर स्वीकृत झाले नसतील तर ते ऑफलाईनने स्वीकृत करण्यात येतील असे उत्तर शासनाकडून अपेक्षित आहे. या संबंधी शासन चौकशी करणार काय, तसेच कारवाई करणार काय ?

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय, आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री अभिमन्यू पवार यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याची वस्तुस्थिती बरीच मोठी

ता.प्र.क्र. ४३१२८....

श्री.संजय बनसोडे....

आहे, ते मी येथे सांगणार नाही. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर माननीय रोजगार हमी मंत्री व माननीय कृषी मंत्री यांची तत्काळ बैठक आयोजित केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांबाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री. संभाजी निलंगेकर –पाटील : अध्यक्ष महोदय, मला मंत्रीमहोदयांकडून स्पेसिफिक उत्तराची अपेक्षा आहे. जे प्रस्ताव दाखल आहेत त्यांना येत्या ३१ मार्च पर्यंत मंत्री महोदय मंजुरी देतील काय ? ३१ मार्च पूर्वी लातूर जिल्ह्यातील ऑनलाईन, ऑफलाईन जे प्रस्ताव दाखल आहेत, त्या सर्व प्रस्तावांना शासन मान्यता देणार आहे काय तसेच जो उशीर झालेला आहे त्या संबंधी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल काय ?

श्री. संजय बनसोडे : अध्यक्ष महोदय,तपासून घेतले जाईल व कारवाई केली जाईल.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. संजय शिरसाट )** : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. आपण या संबंधी सहकारी मंत्री महोदयांशी चर्चा करुन आजच निवेदन सादर करावे, अशी आपल्याला विनंती आहे.

-----------------

असुधारित प्रत

**पुणे शहरात फायनान्स कंपन्यांचे वसूलीदार**
**नागरिकांना धमकावित असल्याबाबत**

**(५) * ३८९७० श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात फायनान्स कंपन्यांकडून कोरोनाच्या महामारीमुळे तेथील नागरिक हप्ते देऊ न शकल्याने त्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व दमदाटी करीत असून वाहनांची परस्पर विक्री करुन जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या वसूली एजंटांकडून होत असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नागरिक पोलिस ठाण्यामध्ये तक्रार करण्याकरिता गेल्यानंतर त्यांना गुन्हेगाराची वागणूक देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) याबाबत सायबर पोलीस स्टेशन, पुणे येथे ५५८ तक्रारी अर्ज प्राप्त असुन त्यापैकी ५२ अर्ज संबधित पोलीस स्टेशनकडे चौकशीकरिता पाठविले आहेत. तसेच १० अर्ज तक्रारदार यांच्या सहमतीने दप्तरी दाखल करण्यात आले आहेत. उर्वरित ४९६ अर्जामध्ये चौकशी चालु आहे. तसेच चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे येथे वसूली एंजटकडून महिलेचा विनयभंग केल्याबाबत गु.र.क्र. ३५/२०२२ भा.दं.वि. ३५४ प्रमाणे गुन्हा नोंदविला आहे. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

तसेच मुंढवा पोलीस स्टेशन येथे याबाबत गु.र.क्र.०१/२०२२ भा.दं.वि. कलम ३५४, ३५४ (अ), ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

ता.प्र.क्र.३८९७०....

श्री. शंभूराज देसाई...

तसेच असे दोन अन्य प्रकरणी सन २०२२ मध्ये कोरेगाव पार्क येथे अदखलपात्र गुन्हे नोंद आहेत.

पोलीस अधिकारी यांचेकडून फायनान्स कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बैठका घेवून रिकव्हरी करताना घ्यावयाची काळजी व सामान्य जनतेबाबत त्यांची वागणूक याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती माधुरी मिसाळ : अध्यक्ष महोदय, पुणे शहरात फायनान्स कंपन्या एजन्सी नेमतात. त्यांचे एजंट कर्ज वसुजीकरिता अतिशय अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व दमदाटी करतात. उत्तरामध्ये संदिग्धता आहे. एका ठिकाणी त्यांनी कबूल केले आहे की, ५५८ तक्रारी आल्या असून ४९६ तक्रारीची चौकशी सुरु आहे. सन २०२२ मध्ये जो गुन्हा झालेला आहे, या बाबत सांगितले आहे की, हे काही खरे नाही. पुढे असे नमूद केले आहे की, सन २०२२ मध्ये अदखलपात्र गुन्हे दाखल आहेत. या उत्तरात संदिग्धता आहे. शासन कबूल करीत आहे की, अशा प्रकारे तक्रारी आल्या, चौकशी सुरु आहे. म्हणजे एजंट दमदाटी करतात, अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करतात हे खरे आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. उत्तरात असे नमूद केले आहे की, आमची चौकशी सुरु आहे. यावर काय कारवाई केली जात आहे असे विचारले असता असे सांगितले आहे की, फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना बोलावून, चर्चा करुन त्यांना समुपदेशन करतो. ही चौकशी कधी पर्यंत पूर्ण केली जाणार आहे ? चौकशी पूर्ण केल्यानंतर या लोकांवर काय कारवाई केली जाणार आहे ? या फायनान्स कंपन्या आरबीआय कडून लायसन्स घेतात व आरबीआयचे कोणतेही नॉर्म्स पाळत नाही. गेल्या २ वर्षांपासून कामत कमिटीनुसार सर्व कर्ज रिस्ट्रक्चर करायचे होते. ऑटोमोबाईल, क्रेडीट कार्ड व घरांचे जे लहान कर्ज असेल ते रिस्ट्रक्चर करुन, पिनल इंटरेस्ट माफ करण्याचा केंद्र शासनाचे नॉर्म्स होते. ते नॉर्म्स कोणतीही वित्तीय कंपनी पाळत नाही व दमदाटी करतात. हे नॉर्म्स पाळण्याकरिता वित्तीय कंपन्यांना अनिवार्य करणार काय, नसल्यास त्यांची परवानगी रद्द करणार काय ?

ता.प्र.क्र.३८९७०....

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. या बाबत चंदननगर पोलीस स्टेशन येथे वित्तीय कंपनीचा वसुली एजंट किशोर यल्लपा पवार हा आरोपी असून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. उलवे येथे देखील अशीच एक तक्रार झाली. खाजगी वित्तीय कंपनीने दिलेल्या वाहन कर्जाच्या वसुलीकरिता काही एजंट नेमले. ज्यांना कर्ज दिले होते, त्यांच्याशी दमदाटी, दादागिरी किंवा अर्वाच्य भाषेत वर्तवणूक केली. या संबंधी गुन्हा दाखल करुन हा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे दिला आहे.

अध्यक्ष महोदय, खाजगी कंपन्या फायनान्सिंगचे लायसन्स केंद्र शासनाच्या आरबीआयकडून घेतात. त्यांच्यावर थेट नियंत्रण राज्य शासनाचे नाही. अशा प्रकारे तक्रारी प्राप्त झाल्या की, त्यांचे एजंट किंवा वसुली करणारे लोक कायदा हातात घेत आहेत, दमदाटी करीत आहेत, महिलांना अर्वाच्य शिवीगाळ करीत आहेत तर त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेला आहे. तपास सुरु आहे ही वस्तुस्थिती आहे. हा तपास अधिक गतीने करण्याच्या सूचना संबंधित विभागाच्या डीसीपी यांना आजच दिल्या जातील. सन्माननीय सदस्य श्रीमती माधुरी मिसाळ यांनी सांगितले आहे की, लायसन्स रद्द करावे. ते पोलिसांच्या हातात नाही. या करिता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल. अशा कंपन्यांची वेळोवेळी पोलिसांकडे तक्रारी असतील. तर पोलिसांचा वस्तुस्थिती दर्शक अहवाल केंद्र शासनाकडे पाठवला जाईल.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८९७० ...

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो खूप महत्वाचा व गंभीर आहे. पतसंस्था, बँका यांच्या वसुलीबाबत आपण काही तरी रुल्स, रेग्युलेशन करतो व त्याप्रमाणे जातो. त्याला एक शिस्तबध्दता असते. त्याला कायद्याचा आधार असतो, त्याप्रमाणे वसुली होत असताना देखील कुठल्याही कर्जदारावर चुकीच्या पध्दतीची कारवाई होत नाही किंवा अतिरेक होत नाही.

अध्यक्ष महोदय, या मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या माध्यमातून सावकाराच्या पलीकडची सावकारी चाललेली आहे. RBI चे NBFC चे आधार घ्यायचे, केंद्र शासनाची ही सर्व योजना आहे असे म्हणायचे व ज्या पध्दतीने वसुली सुरु आहे त्याला काहीच रुल्स, रेग्युलेशन नाहीत.

अध्यक्ष महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मला मंत्री महोदयांना २ प्रश्न विचारावयाचे आहेत. कोल्हापूर शहरामध्ये गेल्या महिन्याभरामध्ये सर्व महिला या अतिरेकी सावकारी अशा पध्दतीच्या ज्या मायक्रो फायनान्स कंपन्याचे जे कर्ज आहे त्याबाबत सावकारी वसुली करणाऱ्या लोकांवर कारवाई करा, या मागणीकरिता कलेक्टर ऑफिसच्या दारात आंदोलनास बसलेल्या आहेत. मंत्री महोदय आपण पुण्यातील लोकांच्या संदर्भात सांगितलेले आहे. तशाच पध्दतीने कोल्हापूर येथे ज्या महिला आंदोलनाकरिता बसल्या आहेत. त्यांच्या मागणीबाबत चौकशी करण्याचा निर्णय आपण द्याल काय?

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. अलीकडच्या काळात मायक्रो फायनान्सचे पेव प्रचंड वाढले आहे. रुल्स, रेग्युलेशन्स काहीच नाहीत. राज्य शासनाचे त्यावर जर काही मॉनिटरिंग नसेल तर लोकांना अक्षरश: आपणच आपल्या डोळयादेखत लुटत आहोत. यावर काही तरी कायदा, काही तरी निर्बंध, काही तरी नियम असले पाहिजेत. मघाशी आपण एका प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले की, महसूल व संबधितांनी बसून एकत्रित निर्णय केला पाहिजे. त्याप्रमाणे या राज्याच्या मुख्यमंत्री महोदय, उप मुख्यमंत्री महोदय तसेच माननीय गृह

ता.प्र.क्र. ३८९७० ...

श्री.प्रकाश आबिटकर ...

मंत्री यांच्याकडे बसून याबाबत जी वसुली आहे ती कशा पध्दतीने करावी, त्या वसुली अधिकाऱ्याला काही रुल्स, रेग्युलेशन्स असावेत की नाहीत, याबाबतचा नियम, निर्णय होणे अपेक्षित आहे. मंत्री महोदय त्याबाबत सकारात्मक निर्णय घेतील काय?

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश आबिटकर यांनी या ठिकाणी २ प्रश्न उपस्थित केले आहेत. कोल्हापूरमध्ये काही खाजगी कंपन्या किंवा संस्थांकडून बळजबरीने वसुली करण्यासंदर्भात महिलांच्या सुरु असणाऱ्या आंदोलनाबाबतचा विषय त्यांनी उपस्थित केलेला आहे. त्याबाबतची तक्रार जर कोल्हापूर, पोलीस अधीक्षकांकडे दिली असेल तर त्या तक्रारीची चौकशी तत्काळ करण्याचे आदेश अधीक्षक, पोलीस अधिकारी, कोल्हापूर यांना दिले जातील. त्या तक्रारीमध्ये जर तथ्य आढळले, ज्या कोणी वसुली करणाऱ्या यंत्रणेने दादागिरी, बळजबरी, बळाचा वापर केल्याचे आढळून आले तर, चौकशी करुन चौकशीत तथ्य आढळल्यास त्यावर कारवाई करु.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा आहे की, अशा पध्दतीने बळजबरी वसुली करण्यासंदर्भात गृह विभागाचे स्वतंत्र धोरण राज्यासाठी आखणार काय, या संदर्भात मी हे सांगू इच्छितो की, suggestion for action.

श्री.समीर कुणावार : अध्यक्ष महोदय, मायक्रो फायनान्सचा विषय आमच्या वर्धा जिल्ह्यात देखील आहे. याला कंटाळून आमच्या जिल्ह्यात दोन आत्महत्या झालेल्या आहेत. या मायक्रो फायनान्सवाल्यांचे व्याज देखील तपासले पाहिजे. ते चक्रवाढ पध्दतीने जास्तीचे व्याज आकारतात.कर्जाचे पैसे पूर्ण भरल्यानंतर देखील परत तेवढेच पैसे ते आकारतात त्यामुळे त्यांचे व्याज व वसुलीची पध्दत एकदा तपासण्याची आवश्यकता आहे. एक परिपत्रक काढून सर्व जिल्ह्यामध्ये या संदर्भात जर कुठल्याही महिलांच्या तक्रारी आल्या कारण जास्त करुन ते महिलांना टारगेट

ता.प्र.क्र. ३८९७० ...

श्री.समीर कुणावार ...

करतात. महिलांशी अतिशय अर्वाच्य भाषेत बोलतात. अशा आमच्याकडे अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे परिपत्रक काढून महाराष्ट्रातील सर्व पोलीस स्टेशन्सना आपण सांगितले पाहिजे. मायक्रो फायनान्सच्या बाबतीत जर अशी तक्रार करण्यात आली तर, आपण ती प्राधान्याने घेणार काय व तातडीने त्यावर जे काही कलम लागतील ते लावून, एफ.आय.आर. करुन त्याची नोंद करुन घेणार काय?

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितलेले आहे की, अशा पध्दतीने या मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुलीमध्ये बळजबरी, दादागिरी, महिलांच्या संदर्भात गैरवर्तन या संदर्भात एक चांगल्या पध्दतीचे डायरेक्शन्स सर्व राज्यातील पोलीस यंत्रणेला देण्यासाठी लवकरच बैठक आयोजित केली जाईल.

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, चंदननगर पोलीस स्टेशन व मुंढवा पोलीस स्टेशन या दोन्ही पोलीस स्टेशन्समध्ये महिलांचा विनयभंग झाल्याबद्दल गुन्हा दाखल केलेला आहे. मला स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे की, जे आरोपी आहेत ते या फायनान्स कंपनीचे नोकर आहेत काय, जर ते नोकर नसतील तर त्यामध्ये अधिक गंभीर कलमे घालून, आपण त्यावर कारवाई करणार काय?

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, मी मघाशी सांगितले की, चंदननगर मधील आरोपी किशोर यल्लप्पा पवार नावाचा आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल केला. तो जामिनावर मुक्त आहे. मुंढवा येथील प्रकरणामध्ये गुन्हा दाखल झालेला आहे. त्या ठिकाणी आरोपी अद्याप निष्पन्न झालेले नाहीत. परंतु, सिनिअर पी.आय. यांना तातडीने आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. पोलिसांकडे जी नोंद आहे त्यानुसार हे रिकव्हरी एजंट त्या कंपनीने नेमले आहेत. तरी देखील त्यांचे बॅकग्राऊंड काय आहे, ते कंपनीचे एम्प्लॉयी आहेत काय की, कंपनीने त्यांना फक्त वसुलीचे काम दिले आहे, हे तपासून सन्माननीय सदस्यांना निश्चितपणाने अवगत केले जाईल.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८९७० ...

श्री.राजेश पाडवी : अध्यक्ष महोदय, कुठल्याही फायनान्स कंपनीचे फायनान्स करताना ॲग्रिमेंट होते. त्या ॲग्रिमेंटमध्ये क्लिअर नमूद आहे की, त्यांनी त्यांच्यावर न्यायालयीन कारवाई करावी. त्यानंतर त्यांनी वकिलामार्फत नोटिस द्यावी व त्यानंतर न्यायालयात कारवाई करावी, ते घरी जाऊ शकत नाहीत, दमदाटी करु शकत नाहीत. याकरिता मंत्री महोदयांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, जे लोक, ज्या फायनान्स कंपन्या घरी जाऊन दमदाटी करीत असतील, जीवे ठार मारण्याची धमकी देत असतील त्यांच्यावर घरी गेले तर ट्रेसपासचा व दमदाटीचा गुन्हा दाखल करणार काय?

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या सूचना या प्रायव्हेट कंपन्यांच्या वसुलीसंदर्भात केलेल्या आहेत त्या सर्व सूचनांचा विचार त्या बैठकीत करु व अतिशय चांगल्या पध्दतीच्या डायरेक्शन्स .... या वसुली एजंट्सचा त्रास महिलांना किंवा कोणालाच होणार नाही, त्यांनी नियमाने काम करावे अशा पध्दतीच्या डायरेक्शन्स देण्याबाबत जी बैठक घेणार आहे, त्या बैठकीमध्ये सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्यांचा विचार केला जाईल.

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांच्या या प्रश्नावर प्रायव्हेट फायनान्स कंपन्या कशा पध्दतीने त्रास देतात व सावकारापेक्षाही अगदी वाईट पध्दतीने जे कर्जदार असतात त्यांना हिंदीमध्ये जे बोलतो की, 'डंके की चोट पर' तसे जास्त त्रास देऊन ते वसुली करण्याचे काम चालते.

अध्यक्ष महोदय, आपण संपूर्ण सभागृहाचा मूड पाहिला तर, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या प्रायव्हेट फायनान्स कंपन्यांबाबत त्यांच्याकडे ज्या ज्या तक्रारी आल्या त्याबाबतचा उल्लेख या सभागृहात केला. माननीय गृह मंत्री उत्तर देताना असे सांगत आहेत की, पोलीस याची नोंद घेत आहेत. पोलीस प्रत्येक गोष्टींची नोंद घेऊन... या सर्व गोष्टी पोलिसांकडे मागितल्या तर त्या सर्व नोंदी आम्ही देऊ असेही सांगत आहेत.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८९७० ...

श्री.सुनील प्रभू..

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाचा यावर कंट्रोल आहे. रिझर्व्ह बँकेने लायसन्स दिलेले आहे. परंतु, संपूर्ण सभागृहाच्या भावना लक्षात घेतल्या तर या महाराष्ट्रामध्ये अशा प्रायव्हेट फायनान्स कंपन्यांकडून केंद्र शासनाची परवानगी जरी असली, रिझर्व्ह बँकेचे लायसन्स जरी असले तरी, महाराष्ट्रामध्ये ते व्यवसाय करीत आहेत. त्यांना व्यवसायाची परवानगी दिली ...

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट)** : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारावा प्रश्नोत्तराचा तास संपत आलेला आहे.

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, प्रश्नोत्तराचा तास संपण्याकरिता २ मिनिटे आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांना देखील बोलायचे आहे.

श्री.सुनील प्रभू : ठीक आहे. अध्यक्ष महोदय, माझे असे मत आहे की, महाराष्ट्र शासनाने याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक कायदा केला पाहिजे. या सभागृहात अनेक ज्येष्ठ सदस्य आहेत. या सभागृहाचा मूड पाहून याबाबतचा निर्णय घ्यावा. मंत्री महोदय गृह खात्याशी संबधित प्रश्नांचे उत्तर देत आहेत.... याची गरज महाराष्ट्राला आहे, असे माझे मत आहे.

श्रीमती माधुरी मिसाळ : अध्यक्ष महोदय, प्रश्न असा आहे की, या फायनान्स कंपन्या जे रिकव्हरी एजंट नेमतात ते त्यांना कायदेशीरपणे नेमता येतात काय, या एजंटना अशी कारवाई करण्याचा कायदेशीर हक्क आहे काय, हे राज्य सरकारकडे आहे. याबाबत मंत्री महोदयांनी सांगावे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८९७० ...

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू व सन्माननीय सदस्या श्रीमती माधुरी मिसाळ यांनी या ठिकाणी ज्या दोन सूचना केल्या आहेत, त्या अतिशय रास्त आहेत. त्या कंपनीचा जर कर्मचारी असेल तर, त्याला तो अधिकार आहे, परंतु कर्मचारी नसताना कोणाला तरी सांगायचे, याबाबतीत मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ज्या डायरेक्शन्स आम्ही गृह विभागामार्फत देणार आहोत, त्यामध्ये त्याचा अंतर्भाव करण्याचा विचार आम्ही त्या बैठकीत करु. निश्चितपणाने सरकार याबाबतीत सकारात्मक आहे. राज्यातील कोणालाही अशा कंपन्यांच्या वसुलीचा त्रास होणार नाही, याकरिता जे करावे लागेल ते त्या सर्क्युलरमध्ये आम्ही नमूद करु व त्याची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश पोलीस दलाला दिले जातील.

**तालिका सभाध्यक्ष** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

........

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

**उप सचिव** : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.संजय शिरसाट) :** गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

-------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : चंद्रपूर येथील युवतीच्या संशयीत मृत्यू प्रकरणाची चौकशी करणे

**मु. शी.** : चंद्रपूर येथील युवतीच्या संशयीत मृत्यू प्रकरणाची चौकशी करणे या विषयावर श्री .सुधीर मुनगंटीवार यांनी दिलेली स्थगन प्रस्तावाची सूचना

श्री.शंभूराज देसाई ( गृह(ग्रामीण) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी "चंद्रपूर येथील युवतीच्या संशयीत मृत्यू प्रकरणाची चौकशी करणे" या विषयावर दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती. त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत. म्हणून मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस :** येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

-----------

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन

डॉ.संजय कुटे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

अध्यक्ष महोदय, मागील आठवड्यामध्ये सत्तारुढ पक्षाने म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्ताव मांडला होता. त्यावरील चर्चेस सन्माननीय सदस्य श्री.अनिल पाटील यांनी सुरुवात केली होती व त्यांच्यानंतर मी त्यावर माझी मते मांडली. उक्त प्रस्तावावर केवळ दोन सन्माननीय सदस्य यांनी आपली मते मांडली आहेत. सदरहू प्रस्ताव दोन दिवस कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आला. त्यामध्ये ग्रामविकास विभागाशी संबंधित व इतर महत्त्वाचे विषय होते. माननीय प्रधान मंत्री यांच्या व्हीजन असलेल्या केंद्र शासनाच्या योजनांचा त्यामध्ये समावेश होता. त्यावर चर्चा होऊन मंत्री महोदयांचे उत्तर मिळणे आवश्यक होते. परंतु मागील २-३ दिवसांपासून उक्त प्रस्तावावर चर्चा घेण्यात येत नाही. या प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर देण्यात आले नाही. प्रस्ताव कोठे गेला ? केंद्र शासनाच्या योजनांचा समावेश असल्याने उक्त प्रस्तावावरील चर्चा जाणीवपूर्वक थांबविण्यात आली व केंद्र शासनाची वाहवाह करावी लागेल मंत्री महोदयांनी त्याचे उत्तर ही दिले नाही. सदरहू प्रस्ताव चर्चेला येणार आहे काय, त्याचे उत्तर मंत्री महोदय देणार आहेत काय, याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** तपासून घेण्यात येईल.

-------------

**पृ.शी./ मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

ॲड.अनिल परब (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी. /मु.शी. :** महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती सरोज अहिरे (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करते.

**तालिका सभाध्यक्ष :** महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे. सदरहू अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**तालिका सभाध्यक्ष :** आज गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

------------

असुधारित प्रत

**मृतदेहाचे पोस्टमार्टेम करणे व संबंधितां विरुद्ध**

**गुन्हा दाखल करुन घेणे**

श्री.राजेश पवार : अध्यक्ष महोदय, काल रात्री ११.३० वाजता माझ्या मतदारसंघातील श्री.माधव पांचाळ यांची विवाहीत मुलगी श्रीमती रुपाली हिचा संशयास्पद मृत्यू झाला. ही माहिती तिच्या माहेरीच्या लोकांना सासरच्या लोकांनी कळविला नाही, ती त्यांना इतर लोकांकडून मिळाली. तिचे माहेरचे लोक तिच्या सासरी पहाटे ३.३० वाजता पोहोचले त्यावेळी ते स्वत: त्यांच्या मुलीचा मृतदेह घेऊन दवाखान्यात गेले. कंधार येथील रुग्णालयाचे अधिकारी त्या मृतदेहाचे पोस्टमार्टेम करण्यास टाळाटाळ करीत आहेत. याप्रकरणी ते पोलीस स्टेशन येथे गेले त्यावेळी त्यांची तक्रार घेण्यात आली नाही. त्यांना दमदाटी करण्यात येत आहे. सदरहू मृतदेहाचे पोस्टमार्टेम त्वरीत करण्याची सूचना देण्यात यावी व तक्रार न घेणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्यात यावी, अशी माझी गृह मंत्री महोदयांना विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने दखल घ्यावी.

-------

असुधारित प्रत

## पिंपरी चिंचवड शहराचा वीज पुरवठा खंडित झाल्याबाबत

श्री.महेश लांडगे : अध्यक्ष महोदय, पिंपरी चिंचवड शहरात बऱ्याच दिवसांपासून वीज खंडित होण्याची समस्या आहे. सदरहू शहर औद्योगिक नगरी म्हणून ओळखले जाते. तेथे काल दिवसभरामध्ये ४,५०० पेक्षा जास्त उद्योजक, व्यावसायिक व ६० हजार वीज ग्राहक यांचा वीज पुरवठा खंडित झाला होता. मी तेथील लघु उद्योजकांशी चर्चा केली त्यावेळी त्यांनी सांगितले की, त्यांचे १०० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. अनेक दिवसांपासून वीज खंडित केली जात आहे. अशाच पद्धतीचे वातावरण आमच्या भागातील उद्योजक व ग्राहकांच्या बाबतीत आहे. ऊर्जा विभागाची वीज कंपनी अशा पद्धतीने वागणार असेल तर आमच्या भागात फार मोठे आंदोलन होईल. या गोष्टींकडे लक्ष देण्यात यावे, अशी माझी शासनाला विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने नोंद घ्यावी.

-----------

असुधारित प्रत

## सफाई कामगर यांचा सफाई करताना झालेला मृत्यू

श्री.सुनिल कांबळे : अध्यक्ष महोदय, पुणे जिल्ह्यातील लोणी काळभोर या ठिकाणी मागील आठवड्यामध्ये टँकचे सेफ्टी डोअर साफ करीत असताना ४ कर्मचारी यांचा टँकमध्ये गुदमरुन मृत्यू झाला आहे. त्याबाबत मी जिल्हाधिकारी यांची भेट घेतली होती. त्यांनी मृत्यू झालेल्या सफाई कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत द्यावी, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेश दिले. त्यानंतर मी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची या प्रकरणी भेट घेतली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, सामाजिक न्याय खात्याने त्यांना आर्थिक मदत केली पाहिजे. त्यानंतर मी सामाजिक न्याय खात्याचे जिल्ह्याचे अधिकारी यांची भेट घेतली. त्यानंतर मी पुन्हा जिल्हाधिकारी यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी आदेश दिला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे म्हणणे आहे की, सदरहू सफाईचे काम खाजगी मालमत्तेवर सुरु होते. जिल्हाधिकारी यांनी सदरहू खाजगी मालमत्तेवर बोजा चढवून द्यावा.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनिल कांबळे यांनी ४ सफाई कामगर यांचा सफाई करताना झालेल्या मृत्यूचा मुद्दा मांडला आहे. शासनास या प्रकरणी विशेष बाब म्हणून निवेदन व कारवाई करण्याच्या सूचना द्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने दखल घेऊन निवेदन करावे.

---

**प्रधान मंत्री किसान सन्मान योजनेचे अर्ज स्वीकारण्याबाबत**

श्री.हरीभाऊ बागडे : अध्यक्ष महोदय, प्रधान मंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ देण्यासाठी नवीन शेतकऱ्यांचे अर्ज स्वीकारण्यात येत नाहीत, त्यांचे नाव नोंदवून घेण्यात येत नाहीत. याप्रकरणी कृषि विभागाचे व महसूल विभागाचे लोक एकमेकांकडे बोट दाखवून टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे गरीब शेतकरी योजनेपासून वंचित राहत आहे. शेतकऱ्यांना शंका आहे की, मंत्रालयातून कदाचित उक्त अर्ज स्वीकारु नयेत अशा अलिखीत सूचना दिल्या असाव्यात. या प्रकरणी तातडीने महसूल विभाग किंवा योजनेशी संबंधित विभागास तातडीने उक्त अर्ज स्वीकारुन योजनेचा लाभ त्या शेतकऱ्यांना मिळवून देण्याची सूचना करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.हरीभाऊ बागडे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. उक्त योजनेच्या संदर्भात महसूल व कृषि विभाग यांची मतांतरे आहेत किंवा एकमेकांना सहकार्य करण्यात येत नाही, अशा काही बातम्या मी पाहिल्या आहेत. सदरहू प्रकरणी उच्च स्तरावर बैठक घेण्यात येईल व शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्यात येईल.

---

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघाची सीमा व मीरारोडच्या सीमेवरील दहिसर चेकनाका व एनएल चेकनाका याच्या मागील भागात मागील दोन दिवसांपासून मॅन्ग्रोव्हज् मध्ये मोठ्या प्रमाणत आग लावण्याची घटना घडली आहे. काल रात्री त्यामुळे अग्निशमन विभागाची गाडी ती आग विझवण्यासाठी आली होती, पोलीसही आले होते. या आगीच्या धुरामुळे त्या भागातील नागरिकांना त्रास होत आहे. मॅन्ग्रोव्हज् मध्ये रोज आग लावण्याच्या घटना घडत आहेत. मुंबई उप नगराची हद्द आहे की ठाणे जिल्ह्याची हद्द आहे, हे पाहून आग लावण्यात येते. यामुळे वृद्ध लोकांना श्वास घेण्यास त्रास होत आहे. या घटना थांबविण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी माझी विनंती आहे.

-----------

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.रणधीर सावरकर : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून मुद्दा पुढील मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, संप्ूर्ण राज्यात चन्याची खरेदी सुरू आहे. चन्याचा हमी भाव ५ हजार २६५ रुपये एवढा आहे. बाजारात मात्र ४ हजार ३०० रुपये भाव चालू आहे. असे असताना नाफेडमार्फत शासनाची जी खरेदी आहे, त्याऐवजी आमच्या अकोला जिल्ह्यात FCI खरेदी करते आहे. संपूर्ण जिल्हयामध्ये खरेदी बंद झालेली आहे. कारण माथाडी हमाल प्रत्येक पोत्याला सहा रुपये प्रमाणे पैसे मागत आहेत आणि आपले अधिकारी तीन रुपयांच्या वर पैसे द्यायला तयार नाहीत. याबाबत सरकार काही निर्णय घेणार आहे काय ? नाफेड किंवा FCI च्या सेंटरची संख्या वाढविण्यात येणार आहे काय ?

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

-----------

असुधारित प्रत

श्री.कुणाल पाटील : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून पुढील मुद्दा मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मागील काही वर्षापूर्वी राज्यातील विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण मिळावे यासाठी प्रत्येक शाळेमध्ये संगणक लॅब सुरू केली होती. सदर योजनेला केंद्र सरकारने पुरस्कृत केले होते. संगणकाचे शिक्षण देण्यासाठी जवळपास ७ हजार ५०० शिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. आज सदरचे सर्व शिक्षक बेरोजगार झालेले आहेत. कारण केंद्र सरकारकडून मिळणारे अनुदान बंद करण्यात आलेले आहे. सदर शिक्षकांची अशी मागणी आहे की, राज्य सरकारने त्यांना सेवेत सामावून घ्यावे. या विषयाबाबत शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्या दालनात अनेक बैठका झालेल्या आहेत. परंतु त्याबाबत अजून तरी काही निर्णय झालेला नाही. सदर शिक्षकांची उपासमारी टाळण्याकरिता त्यांना राज्य सरकारमध्ये सामावून घेण्यात येणार आहे काय ? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

-----------

असुधारित प्रत

श्री.किशोर पाटील : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून पुढील मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मागील आठवड्यामध्ये ऊर्जा मंत्री महोदयांनी या सभागृहामध्ये घोषणा केली होती की, येणाऱ्या तीन महिन्यांपर्यंत कुठल्याही पाणीपुरवठा योजनेची वीज खंडित केली जाणार नाही, अशा पद्धतीची ग्वाही या सभागृहाला दिली होती. परंतु ग्रामीण भागातील आजची परिस्थिती वेगळी आहे. अजूनही जाहीर केलेल्या निर्णयाची दखल संबंधित अधिकाऱ्यांनी घेतलेली नाही. आजही वीज खंडित करण्याचे प्रकार चालू आहेत.

अध्यक्ष महोदय, १४ व्या वित्त आयोगामध्ये ग्रामपंचायतच्या पाणीपुरवठा योजनेचे वीज देयक भरण्याची तरतूद होती. परंतु १५ व्या वित्त आयोगामध्ये अशा प्रकारची तरतूद नाही. त्यामुळे ग्रामपंचायतने पाणीपुरवठा योजनेचे वीज देयके कसे भरावे हा त्यांच्यासमोर प्रश्न आहे. एकीकडे भर उन्हाळ्यात वीज खंडीत केली जात आहे. अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्या स्तरावरून ऊर्जा मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना पुन्हा सूचना करण्याचे निर्देश द्यावेत.

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

------------

श्री.गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून पुढील मुद्दा मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, MIDC क्षेत्रामध्ये काही गावे होती. त्यामध्ये प्रामुख्याने दीघागाव होते. गावठाणाचा विस्तार न झाल्याकारणाने लोकांनी MIDC च्या जागेमध्ये घरे बांधली. काही RTI कार्यकर्त्यांनी सदर घरे तोडण्यात यावीत, अशी मागणी केली. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तशा प्रकारची कार्यवाही येत्या चार-पाच दिवसामध्ये सुरू होणार आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये राज्य शासनाने सन २०१५ पर्यंतची कुठलीही राहती घरे तोडू नयेत, अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे. आपल्यामार्फत माझी शासनाला अशी विनंती आहे की, सन २०१५ पर्यंतची घरे तोडू नयेत हा घेतलेला निर्णय माननीय न्यायालयाला अवगत करून घरे तोडण्याचा जो आदेश निघालेला आहे, तो थांबविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

------------

असुधारित प्रत

श्री.रविंद्र चव्हाण : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून पुढील मुद्दा मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये गेली दोन वर्षापासून प्रशासक आहे. सदर प्रशासकाने महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या २७ गावांकडे लक्ष देणे अपेक्षित आहे. काल रात्री असा प्रकार घडला की सदर २७ गावांमधील ग्रामीण भागातील ५४ ठिकाणी स्ट्रिट लाईटची कनेक्शन बंद करण्यात आली होती. प्रशासकाला शासनाने निर्देश दिले पाहिजेत की, वीज बिलाचे १ कोटी ५० लक्ष रुपये MSEB ला भरावेत. अंधारात असणाऱ्या सर्व गावांना यामुळे न्याय मिळेल.

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

----------

श्री.सुनिल टिंगरे : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून पुढील मुद्दा मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, वृत्तपत्राच्या ऑनलाईन न्युजमध्ये आताच एक बातमी आलेली आहे की, पुण्यातील जे.एम. रोडवरील शाळेच्या बाथरूममध्ये एका अकरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आलेला आहे. अशा घटना वारंवार घडत असल्याचे दिसून येत आहे. मागील आठवड्यामध्ये अशीच एक घटना वडगावशिरीमध्ये देखील घडली होती. गृहमंत्री महोदयांनी असा एक कायदा करावा जेणेकरून शाळेच्या जबाबदाऱ्या वाढविल्या जातील. लहान मुलांवर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी काय उपाययोजना करता येतील यासाठी निर्देश देण्यात यावेत.

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून अतिशय महत्त्वाची व तेवढीच गंभीर घटनेची माहिती दिलेली आहे. काल पुणे येथे घडलेली घटना खूपच गंभीर स्वरुपाची आहे.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छिते की, या संदर्भात शिक्षण विभागाच्या माध्यमातून येणाऱ्या काळामध्ये शाळांबाबत एक धोरण आणले जाईल. शाळेमध्ये मुलींसाठी सुरक्षित आणि आरोग्यदायक वातावरण राहील यादृष्टिकोनातून प्रयत्न केला जाईल.

----------

असुधारित प्रत

श्री.संजय केळकर : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून पुढील मुद्दा मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, सफाई कामगारांच्या संदर्भामधील हा विषय आहे. कालच ठाणे महानगरपालिकेच्या अंतर्गत जे सफाई कामगार काम करतात त्यांनी माननीय पालकमंत्री यांच्या घरी गेले होते. त्यानंतर महापालिकेवर गेले होते. त्या ठिकाणी त्यांनी अर्धनग्न आंदोलन केले. महापालिकेने किंवा कंत्राटदाराने त्यांना मागील तीन महिन्याचा पगार दिलेला नाही.

अध्यक्ष महोदय, ठाणे महापालिकेमध्ये वारंवार सफाई कामगारांवर अन्याय केला जातो आहे. आजही निरनिराळ्या खात्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनेक सफाई कामगार आहेत, त्यांना त्यांच्या हक्काचे वेतन मिळत नाही. कंत्राटदार मनमानी करून बऱ्याच वेळा त्यांना कामावरून काढून टाकतात. अधिकारी देखील या बाबीकडे दुर्लक्ष करतात. आपल्या माध्यमातून ठाणे महापालिकेला निर्देश देण्यासाठी आपल्याला विनंती करीत आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

----------

श्री.विजय देशमुख : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून पुढील मुद्दा मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, गेल्या आठ ते दहा दिवसांपासून सोलापूर जिल्हा व सोलापूर शहरामध्ये एकही कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आलेला नाही आहे. त्यामुळे कोरोना वाढू नाही यासाठी शासनाने खबरदारी म्हणून ज्या काही अटी व नियम घालून दिले होते त्यामध्ये शिथिलता आणण्याची आवश्यकता आहे. अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करीत आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

---------------

असुधारित प्रत

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून पुढील मुद्दा मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, लातूर जिल्ह्यातील दोन वर्तमानपत्र त्यामध्ये मराठवाडा नेता आणि बातमी मागची बातमी या दोन्ही वर्तमानपत्राच्या मालकांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आलेली आहे. सदर दोन्ही वर्तमानपत्रांच्या कार्यालयाला महानगरपालिकेच्या वतीन कुलूप लावण्यात आलेले आहे. दोन्ही पत्रकारांना शासन संरक्षण देणार आहे काय ? महानगरपालिकेने दोनही वर्तमानपत्राच्या कार्यालयाला लावलेले कुलूप काढण्यात येणार आहे काय ?

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

-----------

असुधारित प्रत

श्री.कृष्णा खोपडे : अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून पुढील मुद्दा मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, नागपूर शहरातील मौजा वाठोडा येथे रस्त्याच्या कामांना शासनाने सन २०१९ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेने सदर कामाच्या निविदा काढल्या. सहा महिने काम सुरू न झाल्यामुळे नागरिकांनी सदर प्रकरण माननीय उच्च न्यायालयात नेले. माननीय उच्च न्यायालयाने तातडीने काम सुरू करण्याचे निर्देश दिले. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे कंत्राटराने जेव्हा काम सुरू केले, त्यासाठी पूर्ण रस्ते खोदून ठेवले आहेत. शासनाने सदर कामासाठी लागणारा निधी न दिल्यामुळे त्या भागातील नागरिकांचा रोष लोकप्रतिनिधींवर आहे. आपल्या माध्यमातून नगर विकास मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, सदर कामासाठी ताबडतोब निधी उपलब्ध करून द्यावा.

अध्यक्ष महोदय, नागपूरचे जिल्हाधिकारी यांनी दलित योजनेच्या अंतर्गत विकास निधीचे आदेश दिनांक २२ मार्च २०२२ रोजी काढलेले आहेत. सदर आदेश काढण्यासाठी अनुसूचित जातीची लोकसंख्येचा आधार घेतला आहे. सदर आदेशामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येत आहे. याबाबतची सूचना जिल्हाधिकारी यांना देण्यात आली तसेच दोन वेळा पत्र देखील देण्यात आलेले आहे पण त्यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. याबाबत आपण निर्देश द्यावेत, अशी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने याबाबतची नोंद घ्यावी.

----------

असुधारित प्रत

श्री. तानाजी मुटकुळे (हिंगोली) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, हिंगोली शहरात ड्रेनेज लाईनचे मोठ्या प्रमाणात काम सुरु आहे. यासाठी तेव्हा १०१ कोटी रुपये माननीय श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मंजूर केले होते. डीपी प्लॅनमध्ये असलेल्या १२ मीटर व १५ मीटर रस्त्यांचे काम आता अंतिम टप्प्यात आहे. परंतु तेथील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत आहे. याबाबतच्या सूचना नगर विकास विभागाला देण्यात याव्यात, अशी मी यामाध्यमातून विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने याबाबत दखल घ्यावी.

-----

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर (जोगेश्वरी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील आरे कॉलनी परिसरात सन १९९५ पासून अनेक बिगर आदिवासी लोक झोपडपट्टीत वास्तव्य करीत असून त्याची नोंद आरेच्या कार्यालयात नसल्याने त्यांना मुलभूत सुविधेपासून वंचित ठेवले जात आहे. एकीकडे शासन सांगत आहे की, सन २००० पर्यंत संरक्षित केली आहेत. या घरांना संरक्षण दिलेल आहे, असे सांगितले जाते. परंतु आरे कॉलनीतील त्या घरांना सुविधा दिल्या नाहीत. त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण मिळण्यासाठी वीज उपलब्ध नाही. शासनाने झोपडपट्टयांना सन २००० पर्यंत संरक्षण दिले आहे. असे असेल तर तेथील घरांना वीज देणे आवश्यक आहे. सन २००० पर्यंतच्या सर्व झोपडपट्टीधारकांना विजेचे कनेक्शन देण्यात यावे व त्याची नोंद आरे प्रशासनाने घ्यावी, अशी मी आपल्यामार्फत विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने याबाबत दखल घ्यावी.

-----

असुधारित प्रत

श्री. भास्कर जाधव (गुहागर ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणात आरपीपीएल नावाने जुना एनरॉन प्रकल्प सुरु आहे. हा प्रकल्प १९९० मेगा वॅट पॉवर निर्माण करु शकतो इतकी त्याची क्षमता आहे. परंतु मागील तीन वर्षापासून तेथे ५०० मेगा वॅट वीज विकत घेतली जात होती व तो प्रकल्प सुरु होता. आता ५०० मेगा वॅट वीज घेण्याचा करार दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी संपणार आहे. नवीन करार करण्यासाठी अनेक प्रयत्न करुनही केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून प्रतिसाद मिळालेला नाही. दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजीच्या आत हा करार पुनर्जिवित केला नाही तर तेथे काम करणारे ४ हजार ६३० लोक रस्त्यावर येतील व तो प्रकल्प बंद पडेल. म्हणून मी सरकारला आपल्या माध्यमातून विनंती करतो की, याकडे तात्काळ लक्ष देऊन हा प्रक्ल्प बंद पडणार नाही व ४ हजार ६३० लोक रस्त्यावर येणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

धन्यवाद !

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने याबाबत दखल घ्यावी.

------

असुधारित प्रत

श्री रईस शेख (भिवंडी पूर्व) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, मौजे टिटवाला, कल्याण में २०० साल पुरानी एक दरगाह है. पीर हाजी काशी पीर बाबा की दरगाह है. सभी धर्मों के लोग वहां पर जाते है. ये हिंदू-मुस्लिम एकता का प्रतीक है. दि. २३ फरवरी, २०२२ को दोपहर १२.०० बजे वहां पर कुछ लोग चादर चढ़ाने के लिए गए थे, तो कुछ लोगों ने उस दरगाह को नुकसान पहुंचाया और इसकी शिकायत भी ग्रामस्थ मंडल, टिटवाला ने की है. वहां पर सभी धर्म के लोग जाते है. वहां पर दरगाह को जिस तरह से डॅमेज किया गया है, उसके बारे में मैं आपके माध्यम से सरकार को निवेदन दे रहा हूं. इस पर तुरंत कार्रवाई की जाए, ताकि वहां पर जो सद्भावना है, वह बनी रहे. धन्यवाद.

-------

असुधारित प्रत

श्री.राजेश पाटील (बोईसर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या बोईसर मतदारसंघातील एमआयडीसी ही आशिया खंडातील सर्वात मोठी एमआयडीसी आहे. या इंडस्ट्रीला जोडणारा मुंबई-अहमदाबाद हायवे ते बोईसर हा रस्ता चौपदरीकरणासाठी मागील आठ वर्षापासून रखडलेला आहे. त्याचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात अपघात होऊन लोकांना त्यांचे प्राण गमवावे लागत आहेत. या माध्यामातून मी शासनाला विनंती करतो की, एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना हा रस्ता तात्काळ पूर्ण करण्याची सूचना करावी. तसेच तेथे मोठ्या प्रमाणात नागरिकरण होत आहे. असे असताना तेथे डम्पींग ग्राऊंडची सुविधा नाही. एमआयडीसीने यासाठी प्लॉट आरक्षित केले नाहीत. याबाबत आपण सूचना करावी, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने याबाबत दखल घ्यावी.

------

श्री. प्रशांत ठाकूर : अध्यक्ष महोदय, पनवेल महानगरपालिकेची स्थापना सन २०१६ मध्ये झाली आहे. महानगरपालिकेच्या त्यावेळच्या आयुक्तांनी जीएसटीचे अनुदान मिळण्याकरिता चुकीची कागदपत्रे सादर केल्यामुळे जीएसटीचे अनुदान कमी मिळत आहे. यात आता कपात करण्यात आली आहे. पनवेल महानगरपालिकेचे यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. महानगरपालिकेला २८.८९ कोटी रुपयांचे जीएसटीचे अनुदान मिळावयास हवे होते. नंतर ते ७ कोटी रुपये मिळत होते. आता प्रतिमहा ४ कोटी रुपयांपर्यंत अनुदान मिळत आहे. त्यामुळे महानगरपालिकेला आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. शासनाने याबाबत तातडीने लक्ष देऊन महानगरपालिकेला दिलासा द्यावा.

-----

असुधारित प्रत

ॲड.आशिष जैस्वाल (रामटेक) : अध्यक्ष महोदय, राज्यात इमारत व बांधकाम मजुराच्या खात्यात १२ हजार कोटी रुपये आहेत. या योजनेतून पेटी किंवा जेवण वाटप होत आहे. यात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. या योजनेच्या खऱ्या लाभार्थ्याला लाभ मिळाला पाहिजे. शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. राज्यातील बांधकाम मजूर किंवा वेगवेगळया क्षेत्रातील मजुरांना लाभ मिळाला पाहिजे. याकरिता शासनाने मार्गदर्शक सूचना तयार करावयास पाहिजेत. तसेच याकरिता सर्व सन्माननीय सदस्यांसोबत बैठक घेण्यात यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने याबाबत दखल घ्यावी.

----

असुधारित प्रत

प्रा. डॉ. अशोक उइके : अध्यक्ष महोदय, यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव मतदारसंघातील बाभुळगाव तालुक्यातील खरडा प्रकल्पाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी नाशिक येथे पाठविण्यात आला आहे. तो मंजूर करण्याबाबत आपण शासनाला सूचना द्याव्यात, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने याबाबत दखल घ्यावी. आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

-----

असुधारित प्रत

**पृ.शी. :** पारनेर तालुक्यातील बिगर आदिवासी योजनेंतर्गत वनक्षेत्रात मृद व जलसंधारणाच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत

**मु.शी. :** पारनेर तालुक्यातील बिगर आदिवासी योजनेंतर्गत वनक्षेत्रात मृद व जलसंधारणाच्या कामात झालेल्या अनियमितता यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. निलेश लंके, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्री. निलेश लंके (पारनेर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील जिल्हास्तरीय बिगर आदिवासी योजनेअंतर्गत वन विभागामार्फत वनक्षेत्रात मृद व जल संधारणाच्या कामातून गॅबियन बंधारे व मातीनाल बंधाऱ्यांच्या कामासाठी जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी १ कोटी २२ लाख ४२ हजार रुपये सुपे, वाळवणे, रुईछत्रपती, पळवे बुद्रुक या गावांतील कामासाठी मंजूर करुन जिल्हा उपवन संरक्षक यांचेकडे वर्ग करणे, या कामात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून या कामाची चौकशी करण्याची मागणी संबंधित लोकप्रतिनिधींनी व तेथील नागरिकांनी नुकतीच केलेली असणे, यासर्व कामाची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

श्री. दत्तात्रय भरणे (मृद व जलसंधारण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**(प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. निलेश लंके : अध्यक्ष महोदय, अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील जिल्हास्तरीय बिगर आदिवासी योजनेअंतर्गत वन विभागामार्फत वनक्षेत्रात मृद व जल संधारणाच्या कामातून गॅबियन बंधारे व मातीनाल बंधाऱ्यांच्या कामासाठी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मंजूर केलेल्या १ कोटी २२ लाख ४२ हजार ११७ रुपयांच्या निधीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची बाब माझ्या निदर्शनास आल्यानंतर संबंधित सहायक वन संरक्षक श्री. रमेश देवखिळे व वनक्षेत्रपाल श्री. प्रताप जगताप यांच्या विरुद्ध कारवाई व्हावी म्हणून मी मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी तक्रार केली आहे. दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी माननीय राज्यमंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांच्याकडे तक्रार केली आहे. असे असताना तक्रार करुन ६ महिन्यांचा कालावधी उलटून गेला असतानाही शासनाने भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठिशी घातले आहे. शासनाने त्यांच्यावर अजूनही कोणतीही कारवाई केली नसल्याची बाब अतिशय दुर्दैवी आहे.

अध्यक्ष महोदय, मी माननीय वन मंत्र्यांकडे मागणी करतो की, पदाचा गैरवापर करुन मोठा भ्रष्टाचार करुन मोकाट असलेले अधिकारी श्री. रमेश देवखिळे व श्री. प्रताप जगताप यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी व त्याची वरिष्ठ पातळीवर चौकशी करावी. तसेच मागील १६ वर्षापासून अहमदनगर जिल्ह्यात कार्यरत असलेले श्री. देवखिळे हे मे महिन्यामध्ये निवृत्त होत असल्याने त्यांच्या निवृत्तीनंतरचे व आधीचे सर्व मानधन तात्काळ थांबवावे. तसेच त्यांनी नार्को चाचणी करावी. सदर प्रकरणाची चौकशी करुन योजनेत भ्रष्टाचार करणाऱ्या सर्वांची नावे समोर आणावित व दोषींवर कडक कारवाई करावी, ही विनंती करतो.

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद केलेल्या चार गावांमध्ये ३७ गॅबियन बंधारे व मातीनाल बंधाऱ्याची कामे हाती घेण्यात आली होती. याकरिता डीपीडीसीच्या माध्यमातून निधी दिला होता. ६७ लाख ६२ हजार ९०७ रुपयांची रक्कम तेव्हा मंजूर केली होती. या कामासाठी ६१ लाख २८ हजार १९३ इतका निधी वितरित करण्यात आला होता. सन्माननीय सदस्यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी व दिनांक १३ मार्च, २०२२

रोजी माझ्याकडे तक्रार केली होती. पहिली तक्रार सहायक वन संरक्षक श्री. देवखिळे यांच्याबाबत होती. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मुख्य वनसंरक्षक, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली त्यांची चौकशी करण्यात येत आहे. मुख्य वन संरक्षक यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राप्त अहवालानुसार दोषींवर कडक कारवाई केली जाईल.

श्री. निलेश लंके : अध्यक्ष महोदय, या प्रकरणाची चौकशी सुरु आहे, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु मी मागणी करतो की, सदर अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करावे.

श्री. दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, त्यांची चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांच्याकडील असलेला चार्ज काढून घेतला आहे. त्यांची निष्पक्षपणे चौकशी केली जाईल.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी सन्माननीय सदस्यांनी राज्यमंत्री महोदयांकडे तक्रार केलेली आहे. मंत्री महोदय उत्तरामध्ये सांगत आहेत की, चौकशी झाल्यानंतर आम्ही कारवाई करु. चौकशी केली जाईल हे ठीक आहे परंतु या अधिकाऱ्यांना निलंबित करुन चौकशी करणार का, हा आमचा प्रयत्न आहे.

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिनांक १३ मार्च, २०२२ रोजी माझ्याकडे तक्रार अर्ज केलेला आहे. त्यांची पूर्वीची तक्रार दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजीची होती. त्यासंदर्भात सी.सी.एफ., नाशिक यांच्याकडून चौकशी केली जात आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, चौकशी अंती या प्रकरणी कडक कारवाई केली जाईल.

श्री.निलेश लंके : अध्यक्ष महोदय, विभागीय चौकशी तर सुरु ठेवावीच परंतु संबंधित अधिकाऱ्यास तात्काळ निलंबित करावे, अशी आमची मागणी आहे. कारण अधिकारी असे मोकाट सोडले तर त्यामुळे भ्रष्टाचाराला खतपाणी मिळेल.

श्री.दत्तात्रय भरणे : अध्यक्ष महोदय, सदर प्रकरणी ८ दिवसांत चौकशी करुन दोषी आढळल्यास संबंधितावर कठोर कारवाई करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडित जमिनींबाबत.

**मु.शी.:** श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडित जमिनींबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडित जमिन मुंबई सरकार अधिसुचना गॅझेट क्रमांक ७८८४ दिनांक १ ऑगस्ट, १९१८ अन्वये जमिनींची सुधारणा करणे, लोकांच्या सार्वजनिक हितासाठी विकसीत करुन, पुन्हा फेरवितरण करण्यासाठी भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ६ अन्वये अधिसुचित करण्यात येणे, दिनांक २३ जुलै १९२० च्या करारनाम्यानुसार सदर बेलापूर सिंडीकेट कंपनी लिक्वीडेशन मध्ये गेल्यामुळे सदर कंपनीकडील जमिनी या दि.बेलापूर कंपनी हरेगांव या नवीन कंपनीकडे तत्कालीन जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्यामार्फत वर्ग होणे, सदर जमिनींचे अधिकार अभिलेख हक्क नोंदणी रजिस्ट्रारला मालकाचे नाव कमी होवून सदर जमिनीस आकारी पडीत जमिन म्हणून नाव दाखल होणे, महाराष्ट्र शेतजमिन १९६१ च्या तरतुदीनुसार राज्यातील ११ खासगी साखर कारखान्यांच्या ताब्यातील अतिरिक्त घोषीत झालेल्या जमिनी या देखील ताब्यात घेण्यात येवून सरकार जमा करण्यात आल्यापैकी बेलापूर शुगर अलाईड कंपनीकडील अधिक जमिन म्हणून सदर जमिनीचा ताबा महाराष्ट्र सरकारने १९६५ साली कंपनीचे नावे कमी करुन, सरकार नाव दाखल करुन, जमिन सरकारने ताब्यात घेणे, सदरच्या जमिनी दिनांक २ ऑगस्ट, १९६५ रोजी महाराष्ट्र स्टेट फार्मींग कॉर्पोरेशनकडे फक्त उस उत्पादन करुन, बेलापूर शुगर इंडस्ट्रीला कच्चा माल पुरविण्यासाठी ३ वर्षांसाठी देणे, ३ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही प्रकारची वाढीव मुदत महामंडळास

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

न देण्यात येणे, वरील जमिनी या महाराष्ट्र सरकारकडून व्यवस्थापन करण्यासाठी सरकारने महाराष्ट्र स्टेट फार्मींग या नावाने महामंडळ दिनांक १३ ऑगस्ट, १९७० रोजी कलम २८-1AA अधिकाराचा वापर करुन, राज्य सरकारने सिलींग आदेश व १९७० अन्वये औद्योगिक अस्थापनांकडून घेतलेल्या जमिनी महामंडळाकडे सुपूर्द करताना नियमावली ठरविणे, सदर जमिनी कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करण्यास, ताब्यात देण्यास व कोणत्याही त्रयस्त इसमास शासनाच्या परवानगी शिवाय देण्यास मज्जाव करण्यात येणे, सदरच्या जमिनी शेतीमहामंडळाकडे वर्ग असून, महाराष्ट्र स्टेट फार्मींग हरेगाव अशी नोंद कब्जेदार सदरी असून, पीकपाहाणी सदरी देखील महामंडळाचे नाव दाखल असणे, महाराष्ट्र शासनाने जमिन धारणा कायद्यामध्ये दुरुस्ती करुन शेती महामंडळाकडे असलेल्या जमिनी परत करण्याचा निर्णय पुर्वी घेण्यात येणे, त्या अनुषंगाने श्रीरामपूर तालुक्यातील बऱ्याच जमिनी मुळ मालकांना परत करण्यात येणे, परंतू आकारी पडीत जमिनी ६० ते ७० वर्षे होवूनही मुळ मालकांना परत करण्यात आलेल्या नसणे, त्यामुळे ९ गावातील शेतकरी मुळ मालक भूमिहीन किंवा अल्पभूधारक होणे,शेती महामंडळाकडे आकारी पडीत जमिन ७ हजार एकरपेक्षा जास्त असून, पुर्वी महामंडळाकडे देण्याचा उद्देश आता साध्य होत नसल्याने जमिनी महामंडळाने ताब्यात ठेवण्याचा आधिकार गमावला असणे, असे असताना अचानकपणे सदरच्या जमिनी टेंडर काढून वाटप करण्याचा घाट महामंडळाने चालविणे, सदर जमिनी या इतर व्यक्तिंना, संस्थांना, कंपन्यांना कसण्यासाठी देण्याच्या उद्देशाने ही प्रक्रीया चालू करणे, सामुदायीक शेतीच्या गोंडस नावाखाली धनदांडग्या व्यक्तिंना वाटप करण्याची प्रक्रीया सुरु असणे, या संदर्भात न्यायालयीन प्रक्रीयाही सुरु असून, शासनाच्या वतीने दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी शपथपत्र दाखल करण्यात येणे, सदर शपथपत्र हे याच विषयामध्ये यापुर्वी दाखल झालेल्या याचिका क्र.२९१७/२०१५ मध्ये अप्पर सचिव श्री.प्रकाश बोरवे यांनी दाखल केलेल्या शपथपत्राच्या पुर्णपणे विरोधात असणे, शासनाची ही भूमिका दुटप्पी असून, शेतकऱ्यांना न्यायापासून वंचित ठेवणारी असणे, राज्यात अशा स्वरुपात शासनाने धारण केलेल्या,

असुधारित प्रत

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

जमिनी या शेतकऱ्यांना परत देण्यात आलेल्या असताना श्रीरामपूर तालुक्यातील अकारी पडीत जमिनींबाबत शासनाची भूमिका विरोधी असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडित जमिनींचा हा प्रश्न आहे. गेल्या अनेक वर्षांपासून यासाठी शेतकऱ्यांचा संघर्ष सुरु आहे. मूळ जमीन मालकांना जमीनी परत करण्याचा हा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, खंडकरी शेतकरी चळवळीच्या रुपाने मोठे आंदोलन करण्यात आले. कै.माधवराव गायकवाड यांच्यासह अनेक जणांचा त्यामध्ये सहभाग होता. माजी सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव ससाणे यांनीही यामध्ये विशेष पुढाकार घेतला होता. तसेच माननीय श्री.विजयसिंह मोहिते पाटील, श्री.हर्षवर्धन पाटील, स्व.खा.बाळासाहेब विखे-पाटील आणि मी स्वत: देखील यासाठी प्रयत्न केले. यासाठी आम्ही सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा दिला. शेवटी खंडकऱ्यांच्या जमिनी सिलिंग मर्यादेपर्यंत परत करण्याचा निर्णय झाला व त्याप्रमाणे वाटप करण्यात आले. आकारी पडित जमिनींचा देखील असाच मुद्दा आहे. त्यावेळच्या खासगी कारखान्यांना या जमिनी घेतल्या होत्या. आता ते कारखाने बंद पडले आहेत, काही कारखाने विकले गेले आहेत. परंतु अद्यापही आकारी पडित जमिनी शेतकऱ्यांना परत मिळत नाहीत.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी निवेदनात नमूद केले आहे की, एखादी जमीन भुसंपादित झाल्यानंतर मूळ जमीन मालकांना परत करता येत नाही असे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने केरळ राज्य विरुध्द भास्करन पिल्लई प्रकरणात दिलेले आहेत. तसेच सदर जमिनी संपादित असल्याने या जमीन मालकांना परत करता येणार नाहीत, असेही म्हटले आहे. परंतु पन्नास, साठ, सत्तर वर्षांपूर्वी या शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या त्यावेळी त्यांना कायद्याचे ज्ञान नव्हते. हा सुमारे साडे सात हजार शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. त्यामुळे आकारी पडित जमिनी शेतकऱ्यांना परत करण्यासंदर्भात शासन ताबडतोब कारवाई करील का ?

अध्यक्ष महोदय, भाडेपट्टयावर जमिनी देण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यासाठीच्या कारणांमध्ये सरकार म्हणते की, महामंडळाला उत्पन्न मिळाले पाहिजे किंवा इतर.

असुधारित प्रत

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

माझा प्रश्न आहे की, आतापर्यंत किती लोकांना भाडेपट्टयाने जमिनी देण्यात आल्या व त्यासाठीची निविदा प्रक्रिया कशी राबविली ? ही माहिती मंत्री महोदयांकडे आता नसल्यास पटलावर ठेवावी, ही विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मला एक विसंगती मंत्री महोदयांच्या लक्षात आणून द्यायची आहे. सन २००१ साली मा.राजराजे निंबाळकर समितीचा अहवाल स्विकारण्यात आला. त्यानंतर सन २००५ साली एका उप सचिवांनी उच्च न्यायालयात लिहून दिले की, या जमिनी आम्ही शेतकऱ्यांना परत करीत आहोत. परंतु नंतर पुन्हा दुसरे प्रतिज्ञापत्र देण्यात आले की, या जमिनी परत करता येत नाहीत. म्हणजे दोन्ही प्रतिज्ञापत्रांमध्ये विसंगती आहे. मला वाटते की, याच्या तांत्रिक कारणांमध्ये जाण्यापेक्षा आकारी पडित शेतकऱ्यांना तात्काळ जमिनी परत करण्याचा निर्णय सरकार घेणार का ?

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, श्रीरामपूर तालुक्यातील आकारी पडित जमीन मूळ शेतकऱ्यांना पुन्हा मिळाली पाहिजे, या मताचा मी देखील आहे. मला सुध्दा वाटते की, त्या शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. मा.रामराजे निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात नेमलेल्या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे सदस्य होते. त्यावेळी खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याचा निर्णय झाला परंतु आकारी पडित जमिनींचा निर्णय राहिला होता. भास्करन पिल्लई प्रकरणाच्या निकालावरुन सन २००४ मध्ये शासन निर्णय काढण्यात आला. जी जमीन संपादित केली जाते ती परत करण्यात यामुळे निर्बंध आले. त्यापूर्वी असे करणे शक्य होते. परंतु दुर्दैवाने काही कोर्टबाजी होऊन न्यायालयाने निर्देश दिले की, याबाबत आठ महिन्यांमध्ये निर्णय घ्यावा. त्यानुसार दिनांक ०३.१२.२०१६ रोजी शासनाने निर्णय घेतला की, "महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या हरेगाव मळयातील प्रस्तुत प्रकरणातील जमिनी या आकारी पड नसून त्या सन १९१८ मध्ये तत्कालिन ब्रिटिश शासनाद्वारे भुमी संपादन अधिनियम, १८९४ नुसार भुसंपादित करण्यात आल्या असून त्यानंतर सदर जमिनी दि.बेलापूर लि. कंपनी

श्री.बाळासाहेब थोरात.....

यांच्याकडे कराराने देण्यात आल्या. महाराष्ट्र शेत जमीन अधिनियम, १९६१ अस्तित्त्वात आल्यानंतर सदर जमिनी बेलापूर कंपनीकडे अतिरिक्त ठरल्या असल्याने सदर जमिनी कोणत्याही परिस्थितीत मूळ मालकांना परत करता येणार नाहीत. सदर जमिनी संपादित असल्यामुळे या जमिनी महाराष्ट्र शेत जमीन अधिनियम, १९६१ कलम २८-१ अअ च्या तरतुदी लागू होत नसल्यामुळे जमिनी मालकांना परत करता येणार नाही, असा निर्णय घेतलेला आहे."

अध्यक्ष महोदय, तरीही आम्हाला असे वाटते की, या शेतकऱ्यांवर खरोखर अन्याय होत आहे. यातून मार्ग कसा काढता येईल याचा आम्ही विचार करीत आहोत. या सर्व बाबींच्या संदर्भात पुन्हा एकदा राज्याच्या महाधिवक्ता यांचेकडून अभिप्राय घेऊन मूळ शेतकऱ्यांना विषयांकीत जमीन वाटप करणे कामी मार्ग काढण्यासाठी निश्चित स्वरुपात प्रयत्न केला जाईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, महाधिवक्ता यांचेकडून अभिप्राय घेऊन मूळ शेतकऱ्यांना विषयांकीत जमीन वाटप करणे कामी मार्ग काढण्यासाठी निश्चित स्वरुपात प्रयत्न केला जाईल. परंतु मार्ग निघण्याआधीच या जमिनींचे १००-१०० एकरांचे प्लॉटस् करुन धनदांडग्या लोकांना देण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयास माननीय उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. एकदा भूसंपादित केलेल्या जमिनी परत मिळणार नाहीत असे आपण सांगता तर दुसऱ्या बाजूला त्या जमिनी भाडेतत्त्वावर देण्याचा प्रयत्न सुरु आहे. सरकारच्या भूमिकेतील ही विसंगती आहे. अर्थात, न्यायालयाने आता याला स्थगिती दिलेली आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, शेतकऱ्यांना जमिनी मिळाव्यात ही माझी मनापासून इच्छा आहे. माझा प्रश्न आहे की, आपण याबाबत किती दिवसांमध्ये कार्यवाही कराल ? कारण महाधिवक्ता यांचे मत घेण्यास फार वेळ लागत नाही. किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या एखाद्या सिनिअर कौन्सिलचे मत घ्यावे. आता आकारी पड शेतकऱ्यांचा अंत पाहू नका. याबाबत किमान एक महिन्यात निर्णय करावा, अशी आमची विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य व मी असा आम्हा दोघांचाही या विषयाचा अभ्यास आहे. यामध्ये काय होऊ शकते व काय होऊ शकत नाही याबाबत आमचे एकमत आहे. यामध्ये काय होऊ शकते व काय केले पाहिजे याचा आम्ही सातत्याने विचार करत असतो. त्यामुळे आम्ही यातून मार्ग काढण्याचा परोपरीने प्रयत्न करु.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.कुणाल पाटील)**

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब थोरात...

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी आणखी एक प्रश्न विचारला की, आपण पुन्हा त्या जमिनी शेतकऱ्यांना भाडेपट्ट्याने देत आहात. शेती महामंडळाच्या असलेल्या हजारो एकर जमीन उत्पादित करणे आणि त्यामधून उत्पन्न मिळविणे ही गरज होती. त्या दृष्टीने विचार केला तर मी सन २०१४ पूर्वी महसूल मंत्री असताना निर्णय घेतले. शेतकऱ्यांना त्या जमिनी कसण्याकरिता भाडेपट्ट्याने तात्पुरत्या काळासाठी दिल्या. त्यातून उत्पन्न आले आणि आता शेती महामंडळाने शासनाचे जवळपास सर्व कर्ज फेडले आहे. आता ते महामंडळ नफ्यामध्ये आले आहे. एवढेच नाही तर आम्ही कामगारांना पुढील वेतन आयोग देण्यास सुरूवात केली आहे. शेवटी ती जमीन त्यांना तात्पुरत्या स्वरुपात देत आहोत. ती कायम स्वरुपी देत नाही. परंतु ती जमीन उत्पादित करण्यात आपण यशस्वी झालो आहोत. दुसरे म्हणजे शेती महामंडळाची सुमारे ९० टक्के इतर जमीन आपण शेतकऱ्यांना सन २०१२ ते २०१४ या कालावधीत वाटप केली आहे. आकारी पड हा विषय या जमिनीपुरता शिललक राहिलेला आहे. त्यामुळे याबाबत तातडीने काही तरी व्हावे याकरिता प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत

**पृ. शी. :** शेतकऱ्यांच्या सातबारावरील देवस्थान इनाम जमिनीची नोंद कमी करणेबाबत

**मु. शी. :** शेतकऱ्यांच्या सातबारावरील देवस्थान इनाम जमिनीची नोंद कमी करणेबाबत या विषयासंबंधी श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना

असुधारित प्रत

श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"देवस्थान इनाम जमिनीबाबतचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असून या इनाममध्ये जमिनी रेव्हेन्युग्रेट किंवा ग्रँट ऑफ रेव्हेन्यू व सॉईल ग्रँट या दोन प्रकारात मोडतात त्यानुसार ज्या जमिनीचा शेतसारा देवस्थानास पूर्वापार देणेत येतात, त्यास रेव्हेन्यु ग्रान्ट किंवा ग्रान्ट ऑफ रेव्हेन्यु तसेच ज्या जमिनी देवस्थानास देखभालीसाठी मालकी हक्काने पुर्वापार दिलेली आहे त्यास सॉईल ग्रान्ट असे संबोधले जाणे, ज्या गावाचा संपूर्ण महसूल देवस्थानास देणेत येतो म्हणजे संपूर्ण गावाचा महसूल हा देवस्थानाचा इनाम म्हणजे रेव्हेन्यु ग्रान्ट असेल तर अशा गावास दुमालागाव (Alienated Village) म्हणतात आणि अशा दुमाला गावाच्या नोंदी ॲलिनेशन रजिस्टरमध्ये घेणेत आलेल्या आहेत व त्यामध्ये देवस्थानास किती महसूल देणेत येतो त्याची नोंद देखील घेणेत आलेली असल्यामुळे या दुमाला गावातील जमिनी देवस्थानाच्या मालकीच्या नसून त्या त्रयस्थ व्यक्तीच्या / शेतकऱ्यांच्या मालकीच्या आहेत हे स्पष्ट होते, परंतु असे असताना सन १९७२ मध्ये महाराष्ट्र शासनाने परिपत्रक निर्गमित करून त्यामध्ये इनामदार हे सुपिरीअर होल्डर Superior Holder असतील त्यांच्या नोंदी ७/१२ वर कब्जेदार सदरी रेषेवर घेण्याचे निर्देश दिले, परंतु दुमाला गावातील जमिनीमध्ये देवस्थानाचा मालकी हक्क नसताना देवस्थान देखील दुमाला गावातील जमिनीचे Superior Holder नसतानाही त्यांना

Superior Holder समजून नाशिक जिल्हयातील विहितगाव, मनोली, बेलतगव्हाण, तिरडशेत वगैरे हया गावातील जमिनीचे ७/१२ वर कब्जेदार सदरहू रेषेवर घेण्याबाबत श्री. व्यंकटेश बालाजी देवस्थानचे नाव स्वतंत्र फेरफार घेऊन नमूद

श्रीमती सरोज अहिरे...

करणेत आले, तथापि सदर फेरफारच्या कोणत्याही नोटीसा जमिनी मालक/शेतकरी यांना देणेत आलेल्या नव्हत्या, त्यामुळे त्या जमिन मालकाचे जमिनीचे खरेदी-विक्री हस्तांतरण यावर कोणतेही बंधन नसणे, त्या जमिनीचे मालकांना बँकेत कर्ज मिळत असणे, जमिनी बिगरशेती परवानगी पण देणेत येत असत. परंतु मधले काही काळात तात्कालिन मा.जिल्हाधिकारी नाशिक यांनी विहितगाव, मनोली, बेलतगव्हाण, तिरडशेत गावातील जमिनी देवस्थानच्या संमतीशिवाय विकता वा विकसित करता येणार नाही,अशी चुकीची धारणा केल्यामुळे तेव्हापासून या गावातील जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार करणेस,जमिनीची बिगरशेती परवानगी देणेस देवस्थानाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी महसूल विभागाकडून केली जाऊ लागली व असे ना हरकत प्रमाणपत्र देणेस देवस्थानाकडून त्याबद्दल पावती देताना "श्री" चरणी अर्पण अशी पावती देणेत येते. १) विहितगाव, २) बेलतगव्हाण, ३) मनोली, ४) तिरडशेत ही गावे दुमाला गावे असतांना व या गावातील जमिनीचा महसूल फक्त देवस्थानास मिळणेचा हक्क असताना व या गावातील जमिनी त्रयस्थ व्यक्तींच्या/शेतकऱ्यांच्या मालकीच्या असताना शासनाने अधिकाऱ्यांचे चुकीचे या गावातील जमिनीचे ७/१२ वर कब्जेदार सदरी देवस्थानाचे नाव नमुद करण्यात येणे, शेतकऱ्यांची अडवणूक करुन जमिनीवर कर्ज काढण्यास, जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार नाहरकत दाखला देणेस शेतकऱ्यांकडून अनाधिकाराने पैसे घेतले जाणे, त्यामधून देवस्थानाने आतापर्यंत अशा बेकायदेशीरपणे शेतकऱ्यांकडून लाखो रुपये घेतले जातात त्यामधून ७/१२ चे संगणक प्रणालीमध्ये शेतकऱ्याबरोबर सह मालक म्हणून देवस्थानचे पण नाव नमूद करण्यात येणे, हा सर्व महसूल अभिलेखामधील गैरप्रकार हा महसूल अधिकाऱ्याचे चुकीमुळे झालेला असणे, परंतु सदर अभिलेखामध्ये झालेल्या चुका दुरुस्त करुन देवस्थानचे अनाधिकाराने ७/१२ वर लागलेले नाव

कमी करणेकामी जमिन मालकांनी वारंवार अर्ज विनवण्या करुनही त्यांचे विनंतीकडे दुर्लक्ष केले जाणे, नुकतेच मुंबई उच्च न्यायालयाने रॉबर्ट डायस विरुध्द महाराष्ट्र सरकार या रिट पिटीशनमध्ये निर्णय दिलेला असून त्या निर्णयामध्ये देवस्थानाचे सॉइल ग्रान्ट व रेव्हेन्यु ग्रान्ट चा उहापोह करणे, त्यामुळे शासनाने त्वरीत दुमाला गावातील जमिनीचे ७/१२ वरील देवस्थानाचे नाव कमी करणेच्या सूचना देऊन १) विहितगाव, २) बेलतगव्हाण, ३) मनोली, ४) तिरडशेत या गावातील

श्रीमती सरोज अहिरे...

शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कुणाल पाटील)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------

असुधारित प्रत

श्रीमती सरोज अहिरे : अध्यक्ष महोदय, माझ्या देवळाली मतदार संघातील विहितगाव, बेलतगव्हाण, मनोली, तिरडशेत या चारही गावांच्या ७/१२ उताऱ्यावर जवळपास १९३० ते १९७२ पर्यंत या कालावधीत कोणत्याही देवस्थानाच्या नावाचा उल्लेख नव्हता. तसेच कुठल्याही जमिनीचा मालकीहक्क, स्वामित्व देवस्थानकडे बहाल केल्याची कुठलीही नोंद नाही. असे असताना माझ्या मतदार संघातील विहितगाव, बेलतगव्हाण, मनोली, तिरडशेत या चारही गावांतील शेतकऱ्यांच्या कब्जातील जमिनीच्या ७/१२ सदरी रेघेच्या वर देवस्थानचे नाव असल्याकारणाने व भोगवटादार वर्ग २ व इनाम वर्ग ३ असे शेरे असल्याने शेतकऱ्यांना कोणतीही राष्ट्रीयीकृत बँक, पतसंस्था पीक कर्ज किंवा अन्य कोणतेही कर्ज देत नाही. त्यामुळे या भागातील जवळपास १४ ते १५ हजार शेतकऱ्यांवर वर्षानूवर्षे हा अन्याय होत आलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोषाची व नाराजीची भावना पसरली आहे. तरी सदर देवस्थानचे नाव कमी करुन भोगवटादार वर्ग २ व इनाम वर्ग ३ असे शेरे कमी करण्याबाबत मी वारंवार मंत्री महोदयांना भेटून समक्ष विनंती केली आहे. त्यांनी देखील वेळोवेळी मला अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. मात्र ते म्हणतात की, याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. परंतु माझा त्यांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, हा धोरणात्मक निर्णय शासन कधीपर्यंत घेणार आहे. नेमका आपण काय निर्णय घेणार आहात, तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, गेल्या २ वर्षापासून मी पाठपुरावा करीत आहे. त्यामुळे या धोरणात्मक निर्णयास विलंब होत असल्यास या चारही गावांमधील देवस्थानची नोंद रद्द करण्याकामी आम्ही रिव्हीजन अपिल दाखल केली आहे. त्यावर सुनावणी होऊन ६ महिन्यांचा कालावधी गेला आहे. परंतु आजतागायत ती प्रकरणे निर्णयासाठी बंद करण्यात (क्लोज फॉर ऑर्डर) आलेली नाहीत. म्हणून मंत्री महोदयांनी याचाही खुलासा करावा की या प्रकरणांचा न्याय निर्णय आपण किती दिवसात देणार आहात ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, हा विषय देखील वर्षानूवर्षापासून सुरू आहे. यामधील काही बारकावे असे आहेत की त्याचा निर्णय कसा करावा, हा विचार त्यात असतो. सन्माननीय सदस्यांनी ज्या पध्दतीने मांडणी केली आहे त्यात एक गोष्ट खरी आहे की, या सर्व जमिनी देवस्थानला सरकारने किंवा पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी दिलेल्या आहेत. काही जमिनी कायमच्या दिलेल्या आहेत तर काही जमिनी सारा वसुलीकरिता दिलेल्या आहेत. याबाबतच्या नोंदी विशेष करुन इंग्रजांचे सरकार आले होते तेव्हा जमाबंदी करण्यात येऊन नवीन रजिस्ट्रर निर्माण करण्यात आले. जमाबंदी आयुक्तांनी सन १९३६ मध्ये असा निर्णय दिला होता की देवस्थान ईनामाच्या जमिनींबाबत ज्या Alienation Register मध्ये नोंद घेतलेल्या आहेत त्या नोंदी ७/१२ वर देखील करण्यात याव्यात. त्यानुसार देवस्थानचे नाव वर आले आणि वहिवाटदार शेतकऱ्यांचे नाव एक रेघ मारुन त्या खाली नोंदविण्यात आले आहे. सन १९३६ च्या या निर्णयाची अंमलबजावणी ही सन १९७२ मध्ये झाली आहे. त्यामुळे काही प्रश्न निश्चितपणे निर्माण झाले आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती सरोज अहिरे यांनी २ प्रश्न विचारले आहेत. एक म्हणजे धोरणात्मक निर्णय काय करणार आहात, मी त्यांना सांगू इच्छितो की, आता आपली अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आपली समिती गठीत आहे. त्यामध्ये कायम स्वरुपी प्रश्न मिळण्याच्या दृष्टीने निर्णय करायचा विचार सुरु आहे. म्हणून ज्या पध्दतीने गुजरात राज्याने देवस्थान ॲबॉल्यूशन ॲक्ट केला त्यादृष्टीने आपला अभ्यास सुरू आहे. दुसरे म्हणजे याबाबत काही सुनावण्या घेतल्या आहेत. त्यामधून कसा मार्ग काढायचा याचा माझा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे मी एक महिन्यात तो देखील निर्णय देईल.

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. मी चुकत नसेल तर मघाशी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश आबिटकर यांच्या देवस्थान ईनाम जमिनीबाबतच्या प्रश्नासंबंधी या ठिकाणी चर्चा झाली आहे.

ॲड आशिष शेलार...

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे एक प्रकरण आहे आणि त्याबाबत मी माननीय मंत्री महोदयांशी सुध्दा चर्चा केलेली आहे. महड, ता. खालापूर, जि. रायगड येथे महडच्या गणपतीची देवस्थानची जागा आहे. त्या सातबारावर पुजारी टिळक यांचे नाव आहे. त्यानंतर ही जमीन शिला सिताराम दळवी यांनी १९९६ साली खरेदी केली. तहसिलदाराने त्याची रितसर नोंदणी केली. घरपट्टी, पाणीपट्टी हे सर्व नावावर केले. पण सातबारावर विकत घेणाऱ्या शिला सिताराम दळवी यांचे नाव आले नाही. याबाबत आपण या ठिकाणी १९३६ पासून ब्रिटीशांनी काय केले किंवा राज्यांनी काय केले हे सांगत १९७२ पर्यंत आलात. त्यानंतर आपण म्हणालात की, सुरूवातीला २००१ मध्ये तत्कालीन राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. आता ते कॅबिनेट मंत्री सुध्दा झाले. पण या विषयावर निर्णय झाला नाही. त्यानंतर आपण सन २०१६ मध्ये अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली. त्या समितीचा रिपोर्ट काय आला ते आम्हाला माहिती नाही. शेवटी आपण उत्तरातून असे म्हणता की शासन स्तरावर हे विचाराधीन आहे. त्यामुळे विचार करायची आपली भूक केवढी मोठी आहे सन २००१ मधील राज्यमंत्री आता कॅबिनेट मंत्री झालेत. तत्कालीन अपर मुख्य सचिव सेवानिवृत्त झाले. पण विचार करण्याची भूक अजून भागली नाही. पण आपण एक चांगले सांगितले की, गुजरातच्या धर्तीवर आपण देवस्थान ॲबॉल्यूशन ॲक्ट आणण्यासाठी महिन्यात निर्णय करणार आहात. म्हणून माझी आपल्याला विनंती राहील की, आज सदनामध्ये आपण हे घोषित करा की १५ दिवसामध्ये अशी ज्यांची ज्यांची जमीन सातबारामध्ये विकत घेऊन देवस्थानचे नाव लागले असेल त्यांच्या बाबतीत संपूर्ण राज्याची माहिती घेतली जाईल, ज्यामध्ये शिला सिताराम दळवीसारखी प्रकरणे असतील... आणि त्यानंतर उरलेल्या १५ दिवसात आपण निर्णय कराल. अशा पध्दतीने संबंधिताने विकत घेतलेली जमीन त्या व्यक्तीच्या नावावर कराल. सन्माननीय सदस्या श्रीमती सरोज अहिरे यांनी सांगितलेल्या प्रकरणांमध्ये चुकीच्या देवस्थान ईनामाच्या झालेल्या नोंदी

कमी कराल व हे सर्व काम एक महिन्यात पूर्ण करु, असे ठोस आश्वासन आपण द्यावे, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, यामध्ये व्यक्तीगत अभ्यास करण्याची गरज नाही. सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार यांनी किती जवळचे आणि प्रेमाचे नाते आहे तसेच घरात त्रास होऊ नये म्हणून त्या प्रकरणी आम्ही निश्चितपणे बारकाईने अभ्यास करु. इतर बाबतीत आम्ही धोरणात्मक निर्णय करीत आहोत. याबाबत सन २०१६ मध्ये समिती गठीत करण्यात आली होती. परंतु आताच्या अतिरिक्त मुख्य सचिवांसमवेत आमची चर्चा झाली आहे की, गुजरातच्या धर्तीवर आपण ॲबॉल्यूशन ॲक्ट लागू केला तर त्याचे काय काय परिणाम होतील, आणि तसा अभ्यास त्यांनी करावा, अशा सूचना त्यांना दिलेल्या आहेत. त्याबाबत त्यांचा अभ्यास सुरू आहे. त्याबाबत आम्ही या महिनाभरात त्यासंबंधीचा निर्णय घेऊ हे मी आपल्याला स्पष्टपणे सांगतो.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, सदरच्या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी माननीय मंत्र्यांकडून माझ्या दोन प्रश्नाच्या उत्तराची अपेक्षा करतो. पहिला प्रश्न असा आहे की, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदूर्ग या तीन ठिकाणी ३० हजार एकरच्या जमिनी अनेक वर्ष म्हणजे चार ते पाच पिढयापासून कसल्या जात आहेत. परवाच्या दिवशीपासून आपण ई-नोंदणी करण्यासाठी सुरु केल्यापासून ई ७/१२ झाला आहे. पीक पाण्यावरील त्यांचे नाव कमी झाल्यानंतर ती मालकी पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थान समितीची आहे, असे चित्र तयार झाले. आपण नवीन करीत आहोत आणि कायद्यात त्या लोकांचे अधिकार सुरक्षिण ठेवण्यात येत आहेत, असे मी ऐकले आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, या संदर्भात एक कालबद्ध कार्यक्रम करुन या सर्व शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत सरकार ठोस भूमिका घेईल काय ?

अध्यक्ष महोदय, आता मी एक दुसरा प्रश्न विचारणार आहे. परवाच्या दिवशी चर्चेच्या अनुषंगाने मी आपल्याला विनंती केली होती आणि त्याबाबत आपण उत्तर दिले. परंतु त्यातील स्पष्टता आणि आदेश आपण दिले तर अतिशय महत्त्वपूर्ण काम होईल. माझ्या मतदारसंघात शंकराचार्य कोल्हापूर आणि मोहनी महाराज ट्रस्ट पाडगाव यांच्या माध्यमातून मध्यंतरीच्या काळात जिल्हाधिकाऱ्यांनी एक आदेश काढलाकी, या सर्व देवस्थानच्या आहेत आणि प्रांतांना सांगितले की, सन २०१० च्या कायद्याप्रमाणे त्यावर देवस्थान असे नोंद करा. प्रत्यक्षात त्या जमिनी देवस्थानच्या नाहीत परंतु त्याची सत्यता पडताळून विधी व न्याय विभागाकडून योग्य त्या पद्धतीच्या आदेश आपण कराल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न लक्षवेधी सूचनेपेक्षावेगळा असला तरी देखील आम्ही शेतकऱ्यांचे हित पाहून त्यांच्यावर विनाकारण अन्याय होणार नाही याची पूर्णपणे काळजी घेईल. यासाठी आपण नवीन कायदा आणत आहोत. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला दुसरा प्रश्न देखील स्कोपच्या बाहेरचा आहे. तरी देखील त्यांचे जे प्रश्न आहेत ते शासकीय पातळीवर तपासले जातील.

श्री. हिरामण खोसकर : अध्यक्ष महोदय, नाशिक तालुक्यातील सन्माननीय सदस्या श्रीमती सरोज अहिरे यांनी जो विषय मांडला त्याबाबत मी एक प्रश्न विचारणार आहे. माझ्या मतदारसंघातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील मुलवड येथे शेतकऱ्यांच्या ३०० एकर आणि खैरापल्ली येथील १०० जागेमध्ये जहागिरी असे नाव लागलेले आहे. याबाबतीत माननीय मंत्र्यांनी बैठकीमध्ये विचार करुन तेथील शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांकडून एक पत्र किंवा निवेदन घेऊनत्यावर निर्णय करण्यात येईल.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री हे फार अनुभवी आणि अनुभव संपन्न आहेत त्यामुळे मी त्यांना लक्षवेधी सूचनेच्या स्कोपच्या बाहेरचा एक प्रश्न विचारणार आहे. आपल्याला माहीत आहे की, विकासाची कामे करण्यासाठी बऱ्याच वेळेला पाण्याची टाकी, समाज मंदीर किंवा स्टोअर टँक बांधायचे असेल तर ते गावाच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी ते काम मंजूर होते. तसेच देवराहटी येथे एखादी देवाची कमान बांधायची असेल तर सन १९८६ चा फॉरेस्ट ॲक्ट आडवा येऊन तिथे कोणत्याही प्रकारच्या कामाला मंजूरी दिली जात नाही. त्यामुळे खाजगी कामासाठी नाही तर शासकीय कामासाठी खास बाब म्हणून सरकारी पैशातून होणाऱ्या कामाला देवराहटीमध्ये काम करण्यासाठी परवानगी म्हणून रिलॅक्सेशन देणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, देवराहटी हा कोकणाचा वेगळा विषय आहे. तिथे फॉरेस्ट तर खूप कठीण आहे तिथे एक साधा इलेक्ट्रीक पोल सुद्धा उभा करता येत नाही. या हा वेगळा असल्यामुळे आम्ही सन्माननीय सदस्यांसोबत चर्चा करुन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करु.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** दहिवडी (ता.माण) येथे होत असलेली वाळू तस्करी

**मु.शी.:** दहिवडी (ता.माण) येथे होत असलेली वाळू तस्करी या संबंधी सर्वश्री. जयकुमार गोरे, अभिमन्यु पवार, ॲड राहूल कुल, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.जयकुमार गोरे (माण) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दहिवडी (ता. माण) येथे उपविभागीय अधिकारी माण-खटाव यांनी अवैध गौण खनिज व वाहतूक रोखण्यासाठी तलाठी व मंडल अधिकारी याचे गस्त पथकांची नेमणूक केली असणे, वाकी (ता. माण) येथे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजी रात्रीच्या सुमारास माणगंगा नदी पात्र येथे १ ट्रॅक्टर वाळू चोरी करताना पकडला असून त्यांना कोणत्याही शासकीय प्रक्रिया न करता सोडण्यात आले असणे, त्याचे ऑडिओ व विडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाले असणे, त्यानंतर संबंधित तहसीलदार यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येणे, त्या अगोदर तहसीलदार यांचेवर लाचलुचपत प्रतिबंध खातेची कार्यवाही झाली असणे, शासनाकडून तहसीलदार, मंडल अधिकारी व ट्रॅक्टर मालकावर कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, यामध्ये फक्त ४ तलाठीचे निलंबन झाले असणे, तसेच कडेगाव, जि. सांगली येथे येरळा नदीतील वाडीयेराबाग येथे देखील असा प्रकार घडल्याचे निदर्शनास आले असणे, येथील एका पत्रकाराने वाळू तस्करीची माहिती अधिकाऱ्यांना दिली म्हणून त्याच्यावर वाळू तस्करांनी हल्ला केल्याची धक्कादायक बाब दिनांक २० फेब्रुवारी, २०२२ रोजी घडलेली असणे, संबंधित पत्रकाराने तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांचेकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला असणे, परंतु संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नसणे, यामुळे

श्री.जयकुमार गोरे....

स्थानिक ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणवर भीतीचे वातावरण व नाराजीची भावना पासरलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. कुणाल पाटील)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये बऱ्याच बाबी मान्य केल्या आहेत. वाळू तस्करांनी खूप उच्छान मांडला आहे. माण तालुक्यातील वाकी गावात वाळू चोरीच्या संदर्भात पाच तलाठयांचे पथक नेमले होते. त्या पथकाने एक वाळू ट्रॅक्टर, जेसीबी, पोर्कलॅन पकडला. यानंतर सर्व वाळू तस्कर मिळून तिथे आले आणि तलाठयांच्या कारवायांना विरोधी केला. तो विरोध करताना त्यांनी सांगितले की, आम्ही तहसिलदारांना, जिल्हाधिकाऱ्यांना आणि पोलिसांना देखील हफ्ता देतो. अशा प्रकारे हफ्ता घेत असताना आमच्यावर अशी कारवाई करता येणार नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे एक पेनड्राईव्ह आहे. त्यामध्ये तिथे झालेल्या प्रत्येक चर्चेचा तपशील आहे. त्याचे व्हिडिओ आणि ऑडिओ रेकॉर्डिंग देखील आहे. वाळू तस्कर सांगतात की, आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना २० लाख रुपयांचा हफ्ता देतो. आजपर्यंत आमची गाडी पकडण्याची हिंमत झाली नाही. तुम्ही आमची गाडी पकडायला कसे येता आणि हे करण्यासाठी तुमची ताकद कशी झाली ? अशा पद्धतीने वाळू तस्कर तलाठयांना दम देतात. नंतर तस्करांनी तिथून पोर्कलॅन, जेसीबी वाळू आणि गाडया काढून नेली. त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करता त्यांनी सर्व वाहने काढून नेली. त्यानंतर या सर्व क्लिप सोशल मिडियावर व्हायरल झाल्या. मग मी स्वत: जिल्हाधिकारी, प्रांत आणि तहसिलदार यांच्याशी बोललो. परंतु या संदर्भात कोणतीही कार्यवाही होत नव्हती. वर्तमानपत्रामध्ये याच्या मोठमोठया बातम्या छापून आल्या तेव्हा तलाठयांवर कारवाई झाली. तहसिलदारांना हफ्ता देतो म्हणून त्यांनी तिथून गाडया काढून नेल्या. तहसिलदारांना फोन लावून ते म्हणतात की, आम्ही दिलेले आमचे हफ्ते परत द्या. तस्कऱ्यांचे एवढे धाडस कसे काय होते. हे फक्त मी सांगतो असा मुद्दा नाहीतर याचे सर्व रेकॉर्डिंग आहे. हे रेकॉर्डिंग मी आपल्याकडे पाठवतो.

अध्यक्ष महोदय, या प्रकरणामध्ये ५ तलाठी निलंबित करण्यात आले. वाळू पकडण्याच्या ८ दिवसांपूर्वी या तहसिलदारावर ॲन्टी करप्शनची कारवाई झाली. त्याच्या ड्राइव्हरला २५ हजार रुपयांची लाच घेताना पकडले. परंतु त्या बहद्दराने ५०

श्री. जयकुमार गोरे...

लाख रुपये देऊन ॲन्टी करप्शनचे अधिकारी मॅनेज केले. तरी देखील त्याच्यावर कारवाई न होता फक्त कोतवालावर कारवाई झाली. एवढी मोठा कारवाई झाल्यानंतर सुद्धा हा प्रकार सुरुच आहे. ४ तलाठी निलंबित करण्यात आले परंतु तहसिलदारवर आजपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. वाळू तस्करीच्या बाबतीत लक्षवेधी सूचना लागल्यानंतर सुद्धा त्यांच्यावर कारवाई झाली नाही. ते वाळू तस्कर कोण आहेत ज्यांच्यासाठी आपण विधानसभेमध्ये एवढा वेळ वाया घालवत आहोत. आजपर्यंत अनेक चौकशा झाल्या आहेत परंतु वाळू तस्करांवर कारवाई करण्याचे कोणाचेही धाडस झाले नाही. असे कोण ते आपले जावई, पाहूणे किंवा मेहूणे आहेत काय ? त्याच्यावर कारवाई का केली नाही. माझा प्रश्न असा आहे की, संबंधीत वाळू तस्करावर आपण काय कारवाई करणार आहात, त्यांच्याबाबत तातडीने गुन्हे दाखल करुन त्यांना मोक्का लावणार आहात काय ? संबंधीत तहसिलदारावर भ्रष्टाचाराचे खूप मोठे आरोप आहेत. त्याच्यावर ॲन्टी करप्शनची कारवाई झाली. यामध्ये देखील पहिल्याच दिवशी याच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता असताना देखील आज अखेरपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. त्या सदंर्भात आपण संबंधीत तहसिलदारांना निलंबित केले पाहिजे ते आपण करणार काय ? हे प्रकरण एवढया पुरतेच मर्यादीत नाही तर वाळूचे प्रकरण खूप मोठे आहे. आपण जे तलाठी निलंबित केले आहेत त्यांचा किती दोष होता याची देखील चौकशी झाली पाहिजे. मूळ जे हफ्ते घेतात त्यांना निलंबित करण्याच्या ऐवजी जे कारवाई करण्यासाठी गेले होते त्यांच्यावरच कारवाई झाली आहे. त्यामुळे याबाबत चौकशी होण्याची आवश्यकता आहे. एसआयटी मार्फत आपण याची चौकशी करणार काय ? माननीय मंत्र्यांनी यावर कार्यवाही करुन तातडीने अपेक्षित उत्तर द्यावे.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्या ठिकाणच्या बऱ्याच बाबी सांगून पेनड्राईव्ह सुद्धा दिलेला आहे. त्या पेनड्राईव्हमध्ये तस्कर बोलत आहे. त्यावर विश्वास ठेवून आपण कारवाई करायची काय,याचा विचार करावा लागेल. परंतु त्या पेनड्राईव्ह चा आणि त्यांच्या सर्व तक्रारींचा जाणीवपूर्वक

श्री. बाळासाहेब थोरात....

अभ्यास केला जाईल. या प्रकणाची पूर्ण चौकशी करण्यासाठी मी विभागीय आयुक्तांवर जबाबदारी देतो. तस्कर बोलत आहे म्हणून सर्वच अधिकाऱ्यांना दोषी समजता येत नाही जो कोणी दोषी असेल त्याच्यावर जरुर कारवाई केली जाईल.

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब थोरात....

५ तलाठी निलंबित झालेले आहेत. तहसीलदार राहिलेले आहेत. त्यांच्या संबंधी काही पुरावे असतील तर त्यांच्यावर देखील निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, पेनड्राईव्ह आपल्याकडे दिला आहे. कारवाईसाठी गेलेल्या तलाठ्यांचे त्यामध्ये रेकॉर्डींग आहे. कारवाई करीत असताना तो स्वत: तहसीलदार यांना फोन लावत आहे. तहसीलदार यांचा फोन लागत नाही हे देखील तो सांगत आहे. असे असताना मंत्री महोदय असे सांगतात की, तो दोषी असेल तर.. तहसीलदार यांच्यावर ८ दिवसांपूर्वी लाचलुचपत विभागाची रेड पडली. त्यांच्या गाडीचा चालक २५ हजार रुपये घेत असताना सापडला. त्याने तहसीलदार करिता पैसे घेतले होते. तेव्हा या तहसीलदारावर काही कारवाई झाली नाही. त्याचे तातडीने निलंबन करणे अपेक्षित आहे. तसेच संबंधित वाळू तस्करावर काय कारवाई केली आहे ? वाळू तस्करांना आपण का वाचवत आहात ? सामान्य माणसाने जर एखादा ट्रॅक्टर वाळू घर बांधण्यासाठी नेली तर त्यांच्यावर कलम ३७० अंतर्गत गुन्हा दाखल केला जातो.

**तालिका सभाध्यक्ष** : थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, वाळू तस्करांवर काय कारवाई केलेली आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, विभागीय आयुक्त या सर्व प्रकरणाची चौकशी करतील. विभागीय आयुक्त हे मोठे पद आहे. मोठा अधिकारी आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे आपण नाव घेतले म्हणून मी विभागीय आयुक्त सांगत आहे. वाळू उचल करणारे जे असतील त्यांच्यावर देखील कारवाई होईल.

ॲड. राहुल कुल : अध्यक्ष महोदय, वाळू या विषयावर आपण वर्षानुवर्षे चर्चा करीत आहोत. मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, आता पर्यंत आपण या संबंधी काय निर्णय घेतले आहेत ? वाळू तस्करोन सांगितले तर त्याच्यावर विश्वास कसा ठेवायचा

ॲड. राहुल कुल.....

असे मंत्री महोदयांनी सांगितले. आम्हालाही सांगा की, अधिकाऱ्यां शिवाय वाळू तस्कर, हे वाळुची तस्करी करीत आहेत, याच्यावर आम्ही तरी कसा विश्वास ठेवायचा ? वरुन खाल पर्यंत सर्वांशी संबंध ठेवून सुरु आहे हे प्रथम सदनाने मान्य केले पाहिजे. महसूल विभागाला कडक सूचना करुन त्या ठिकाणची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच जेथे आवश्यकता असेल तेथे पोलीस बंदोबस्त दिला पाहिजे. त्यांच्यावर जोपर्यंत जबाबदारी निश्चित केली जाणार नाही तोपर्यंत अशा चर्चा सदनात वर्षानुवर्षे होत राहतील, आपला वेळ जाईल व काहीही निष्पन्न होणार नाही. प्रथम तहसीलदार यांना निलंबित करा, घोषणा करा व धोरण ठरवा. तसेच वाळू तस्करांच्या विरुध्द कारवाई करा.

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, एक गोष्ट सदनाला माहिती आहे. वाळू संदर्भातही सर्व सदस्यांना माहीत आहे. या बाबत कोणाला माहीत नाही असे नाही. प्रत्येकाच्या मतदारसंघात वाळुचा वापर केला जात आहे. हे वर्षानुवर्षापासून सुरु आहे. सन २०१५ ते २०१९ या काळात सर्व आलबेल होते असे नाही. हा सतत सुरु असलेला विषय आहे. यामध्ये आपण कसे निर्बंध लावतो, यामुळे अनेक गोष्टी होत असतात. नागरिकांना वाळू स्वस्त मिळावी म्हणून आपण एक निर्णय घेतला. ऑफ सेट प्राईस ६०० रुपयांवर आणली. ( अडथळा ) सन्माननीय सदस्यॲड. कुल यांनी असा प्रश्न विचारला की,शासनाने कोणते निर्णय घेतले म्हणून मी सांगितले. असे अनेक निर्णय घेतले जात आहेत. या संबंधी कडक कारवाई केली जात आहे. आणखी काय कडक कारवाई करावी, असा प्रश्न आहे. बेकायदेशीरपणे वाळूची उचल होते त्या बाबत आम्ही निर्णय घेऊ. तहसीलदाराच्या संबंधी आपला आक्षेप आहे. मी सांगतो की, विभागीय आयुक्त आहेत..... ( अडथळा ) तशी कारवाई झालेली असेल, तसा पुरावा सापडल्यास त्या अधिकाऱ्याचे निलंबित केले जाईल.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. कुणाल पाटील ) :** माननीय मंत्री यांनी आयुक्तांच्या स्तरावर पूर्णपणे चौकशी करु असे सांगितले आहे. जर एसीबी यांनी काही आरोप ठेवले असतील तर संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबत होते असे अतिशय सकारात्मक उत्तर दिलेले आहे. यामध्ये कोणालाही पाठीशी घातल्याचे दिसत नाही.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री यांच्या उत्तरावर माझी हरकत आहे. आपण आमचे संरक्षक आहात. ५ तलाठ्यांना निलंबित केले आहे. मंडल अधिकाऱ्यांनी पाठवलेला रिपोर्ट खोटा आहे असे उत्तरात नमूद केले आहे. रात्री १ वाजून २० मिनिटाला ट्रॅक्टर अंधाराचा लाभ घेऊन पळून गेला असा रिपोर्ट केला आहे तो देखील खोटाआहे. याचा अर्थ आपण वॉट्सॲपच्या आधारे कारवाई केली आहे. मंडळाचा रिपोर्ट खोटा आहे कारण तो वॉट्सॲपवर व्हायरल झाला. या व्हिडीओमध्ये दिसत आहे. प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. तहसीलदाराच्या विरोधात लाचलुचपत विभागाची कारवाई सुरु आहे. यामुळे तो आपोआप निलंबित झाला पाहिजे. ज्या तहसीलदाराच्या विरुध्द लाचलुचपत विभागाची कारवाई सुरु आहे त्याला निलंबित करण्याची मागणी केली जात आहे, यामध्ये काय चुकीचे आहे ? आपण संरक्षण करावे. या सर्वोच्च सदनात जर आम्हाला न्याय मिळणार नसेल तर ते योग्य नाही. या ठिकाणी माननीय मंत्री वेळ मारुन नेण्यासाठी उत्तर देणार असतील तर ही व्यवस्था व यंत्रणा कशी चालेल ? माझी माननीय मंत्री यांना विनंती आहे. या तहसीलदाराच्या विरोधात लाचलुचपत विभागाची कारवाई सुरु आहे. त्याला तातडीने निलंबित केले जाईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, तहसीलदार यांच्यावर लाचलुचपत विभागाची कारवाई सुरु आहे, याची माझ्याकडे आता माहिती नाही. (अडथळा ) उत्तर ऐकून घ्या. मी असे सांगितले की, अशा प्रकारचे आरोप त्यांच्यावर असतील तर त्यांना निलंबित करु. कोणालाही पाठीशी घालण्याचे कारण नाही. तस्कर, तस्कर असे म्हणून कसे चालेल ? जे काही निष्पन्न होईल, त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल केला जाईल.

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, त्यांच्यावर लाचलुचपत विभागाची कारवाई सुरु आहे. असे असताना तो जर पदावर असेल तर त्या कारवाईला काही अर्थ राहत नाही. आपली ही व्यवस्था व परंपरा आहे की, ज्या अधिकाऱ्याच्या विरुध्द, तहसीलदाराच्या विरुध्द लाचलुचपत विभागाची कारवाई सुरु असेल तर त्यांना पदावर ठेवता येणार नाही. माझी माननीय मंत्री यांना विनंती आहे. आपण कोणाच्या दबावाखाली काम करीत आहात ? आपण वरिष्ठ मंत्री आहात. शक्तीशाली मंत्री आहात. निर्णय करणारे मंत्री आहात. ज्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द लाचलुचपत विभागाची कारवाई सुरु आहे त्यांना तत्काळ निलंबित केले पाहिजे. हे मंत्री महोदय करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, मी स्पष्टपणे सांगितले आहे की, जर त्यांच्यावर कारवाई सुरु असेल तर त्यांना निलंबित केले जाईल.

--------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : जोगेश्वरी ( पूर्व ) स्थानकाजवळ असलेल्या महानगरपालिकेच्या नवलकर मंडईचा पुनर्विकास करणे

**मु. शी. :** जोगेश्वरी ( पूर्व ) स्थानकाजवळ असलेल्या महानगरपालिकेच्या नवलकर मंडईचा पुनर्विकास करणे, या संबंधी श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रविंद्र वायकर ( जोगेश्वरी - पूर्व ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जोगेश्वरी (पूर्व) रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या महानगरपालिकेच्या नवलकर मंडईचे संरचनात्मक सल्लागार व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार समितीने दिलेल्या अहवालानुसार सदरहू मंडई ही धोकादायक घोषित करून मंडई रिक्त करून तोडण्याचे अभिप्राय दिले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, सदरहू मंडईच्या पुनर्विकासाच्या दृष्टीकोनातून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेसमवेत घेतलेल्या संयुक्त बैठकीत सदरहू पुनर्विकासाच्या कामाच्या अनुषंगाने सूचना करून सदरहू पुनर्विकासाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या असणे, तसेच सदरहू मंडईतील अनुज्ञापनधारकांना मंडईमध्येच तात्पुरते संक्रमण शिबिर बांधुन देण्याच्या अनुषंगाने महापालिका वास्तुविशारद यांच्याकडे आराखडे बनविण्याचे काम माहे डिसेंबर, २०२० रोजीपासून सुरू असून सदरहू काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसणे, परिणामी सदरहू मंडईच्या पुनर्विकासाचे काम नाहक प्रलंबित राहिलेले असल्याची बाब निदर्शनास येणे, अद्याप सदरहू आराखडे तयार

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर ...

झालेले नसल्यास या प्रकरणी आराखडे तयार करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे जाणून सदरहू विलंबास जबाबदार असलेल्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कारवाई करून तसेच सदरहू आराखडे तातडीने तयार करून मंडईतील अनुज्ञापनधारकांना मंडईमध्येच तात्पुरते संक्रमण शिबिर बांधून देण्याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसून या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांना हेतू:पुरस्सरपणे पाठिशी घालण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच किरकोळ मंडईकरिता आरक्षित असलेल्या या ठिकाणचे नगर भूमापन क्रमांक २५५, २५६, २५७, २५८ व २५९ पैकी नगर भूमापन क्रमांक २५६, २५७ व २५८ हे भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावावर झाल्यानंतर मंडईच्या मुख्य इमारतीचे आराखडे मंजुरीकरिता सादर करण्यात येणार असल्याने सदरहू भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावावर करण्याबाबतही शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, सदरहू मंडईच्या पुनर्विकासाच्या कामास होत असलेल्या विलंबामुळे येथील स्थानिक नागरिक व मंडईतील गाळेधारक यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांचेमध्ये तीव्र नाराजी पसरलेली असणे, सदरहू मंडईचा पुनर्विकास तातडीने करण्याबाबत स्थानिक नागरीक तसेच मंडईतील गाळेधारक यांच्या मागणीच्या अनुषंगाने या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबत शासनाने या प्रकरणी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. एकनाथ शिंदे ( नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. *

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, हा विषय माझ्या जोगेश्वरी मतदारसंघातील आहे. जोगेश्वरी स्टेशनला लागून नवलकर मंडई आहे. जवळजवळ ५० ते ६० वर्षांपूर्वीची मंडई आहे. हे मार्केट मोडकळीस आले आहे. सन २००९ पासून या मंडईचे काम व्हावे या करिता मी प्रयत्नशील आहे. येथील काही भाग तोडला गेला व त्याची दुरुस्ती केली गेली. या संबंधी मी अनेक बैठका घेतल्या. तेव्हाचे आयुक्त श्री. कुंटे यांच्या सोबत बैठका झाल्या. ही मंडई स्टेशनला लागून असल्यामुळे हाँगकाँगच्या धर्तीवर त्याचा पुनर्विकास करता येईल काय या दृष्टीने त्याचे नियोजन करण्यात आले.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर ...

परंतु,आर्किटेक्टने हे प्लॅनिंग बरोबर केले नव्हते. त्यामध्ये आणखी सूचना देण्यात आल्या. त्यानंतर त्यांनी कारपार्किंग म्हणजे मंडई स्टेशनच्या जवळ असल्याने स्टेशन जवळ कारपार्किंग असणे महत्वाचे होते. याकरिता ३ माळे अंडरग्राऊंड कारपार्किंग करण्यात आले व बाकीचे वर १७ माळे अशा पध्दतीने करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, यामध्ये माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. मंडई होणे अत्यंत गरजेचे आहे. ही मंडई झाली तर, आतमध्ये असलेल्या डी.पी.रोडवर असलेली दुकाने देखील आपल्याला शिफ्ट करता येतील. मुंबई महानगरपालिकेला ४ एफएसआय मिळेल व ही मंडई व्हावी, याकरिता मी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे.

अध्यक्ष महोदय, ही मंडई ४ वर्षांत पूर्ण होईल असे सांगितले गेले. सदरहू इमारतीचे आराखडे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाकडे अंतिम मंजुरीकरिता केव्हा पाठविण्यात आले आहेत, सदरहू आराखड्यास अपेक्षित अंतिम मंजुरी किती कालावधीत मिळणार असून, प्रत्यक्ष कामाला केव्हा सुरुवात होणार आहे?

अध्यक्ष महोदय, डी.पी. रोडला लागून काही दुकाने आहेत, त्याच्या मागे हे मार्केट आहे. त्या डी.पी. रोडला लागून असलेल्या बाधित होणाऱ्या दुकानांना आपण त्या मंडईमध्ये जागा देणार काय, त्यांना जागा दिली तर डायरेक्ट डी.पी.रोडला लागून ती मंडई उभी राहील. एखादी जमीन मुंबई महानगरपालिकेच्या किंवा कोणाच्याही ताब्यात आल्यानंतर तिचा ७/१२ नावावर होणे गरजेचे आहे. ही मंडई जर ६० वर्षांपूर्वीची असेल तर अजूनपर्यंत तिचा ७/१२ मुंबई महानगरपालिकेच्या नावावर का झाला नाही?

अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, "सन २०१२ पासून अधीक्षक, भूमी अभिलेख यांच्याशी आवश्यक पत्रव्यवहार करण्यात येत आहे", अशा अनेक जागा मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. परंतु, त्या अजूनपर्यंत ७/१२ ला लागलेल्या नाहीत. अशा जागा मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. परंतु, त्या नावावर करण्यात आलेल्या

श्री.रविंद्र वायकर ...

नाहीत. महसूल मंत्री महोदय, नगरविकास मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. अशा जागा जर मुंबई महानगरपालिकेच्या असतील तर त्या मुंबई महानगरपालिकेच्या नावावर येणे गरजेचे आहे, तर ही कामे लवकर होतील.

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, जोगेश्वरी पूर्व स्टेशन जवळील मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या नवलकर मंडईच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांनी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. ही मंडई जुनी आहे. सन १९६५ मध्ये ही मंडई बांधलेली आहे. सद्य:स्थितीत त्या मंडईत २३१ गाळेधारक आहेत.

अध्यक्ष महोदय, जे सुरुवातीचे प्रस्तावित नकाशे होते त्यामध्ये तळमजला + १८ मजले होते. इमारतीलगत पार्किंगसाठी कारलिफ्ट व टॉवर पार्किंग अशा प्रकारचे नकाशे बनवले होते. त्यानुसार तळमजला + १८ मजले, त्यामध्ये पहिला व दुसरा मजला पीएपीसाठी होता. तिसरा मजला सर्व्हीसेससाठी आहे. तसेच, त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे याचे नकाशे तयार केले होते.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर त्या विभागातील माननीय आमदार श्री.रविंद्र वायकर यांनी अधिकाऱ्यांसमवेत दि.२४.७.२०२१ रोजी एक बैठक घेतली. त्या बैठकीत यामध्ये काही बदल सुचविले. त्यामध्ये बेसमेंटमध्ये पार्किंग असले पाहिजे. हे मार्केट अद्ययावत असे झाले पाहिजे, अशा काही सूचना केल्या. अतिशय महत्वाच्या स्टेशनजवळ ही मंडई असल्याने इमारत तयार करताना एक अद्ययावत अशी चांगली इमारत उभी रहावी, अशी त्यांची भूमिका होती. त्यानंतर या मंडईचे पुन्हा नवीन नकाशे तयार केले. दि.१५.२.२०२२ रोजी महानगरपालिकेकडे ते सादर झालेले आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.बाळासाहेब थोरात सभागृहात उपस्थित आहेत. ७/१२ च्या संदर्भात मला हे सांगावयाचे आहे की, सन २०१२ पासून आमच्या महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी आपल्याकडे या मंडईचा ७/१२ महानगरपालिकेच्या नावावर करण्याकरिता सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे ....

आज आपण योगायोगाने सभागृहात उपस्थित आहात. आपण भूमी अभिलेखचे अधिकारी व आपल्या अधिकाऱ्यांसमवेत तातडीने एक बैठक घेऊन त्याला तत्काळ मंजुरी द्यावी. ती एक बैठक आपल्या मार्गदर्शनाखाली घ्यावी.

अध्यक्ष महोदय, तेथे काही गाळेधारक आहेत. याला उशिर देखील झाला. ही मंडई सन २०१५ मध्ये धोकादायक म्हणून घोषित झाली. त्यानंतर तिचा धोकादायक भाग, शेड काढून टाकली, तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्त केली. त्यानंतर काही वेळेस त्या लोकांना नोटिसा देखील दिल्या. परंतु, तेव्हा त्यांचा विरोध झाला. सद्य:परिस्थितीत ते जुने गाळेधारक त्याच ठिकाणी आपला व्यवसाय करीत आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांनी मंजुरीचे नकाशे दि.१५.२.२०२२ रोजी महापालिकेकडे सादर झाले आहेत, त्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. त्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, एका महिन्यामध्ये त्या नकाशांना मंजुरी दिली जाईल. त्याच बरोबर हे नकाशे मंजूर झाल्यानंतर याचे टेंडर काढले जाईल व त्या इमारतीचे नवीन सुधारित नकाशाप्रमाणे बांधकाम सुरु होईल आणि जुन्या मंडईचे काम तत्काळ सुरु होईल.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, डी.पी. रोडला लागून त्याच्या मागेच दुकाने आहेत. तो डी.पी. रोड खुला करावयाचा असेल तर दुकानांना देखील त्यामध्ये समाविष्ट करुन घेतले तर ती मंडई ओपन होईल, डी.पी. रस्ता देखील ओपन होईल, खुला होऊन जाईल. त्या बाधित लोकांना देखील त्यामध्ये समाविष्ट करुन घेणार काय?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, त्या डी.पी.रोडवरील जे पात्र दुकानदार असतील त्यांना देखील त्यामध्ये ..... करता येईल. स्कोप आहे. दुसऱ्या मजल्यावर त्यांना आपल्याला जागा देता येणे शक्य होईल.

ॲड.पराग अळवणी : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु, याचे केवळ आराखडे व टेंडर हा विषय नसून जोपर्यंत महानगरपालिकेच्या नावावर ही जमीन येणार नाही, तोपर्यंत त्याचे टेंडरही

ॲड.पराग अळवणी ...

काढता येणार नाही. पुढची कोणतीही कार्यवाही करता येणार नाही. विषय गंभीर आहे. मंत्री महोदयांनी या नवलकर मार्केटचे जे काही ५-६ भूखंड आहेत, त्याबाबतीत माननीय महसूल मंत्र्याकडे बैठक लावण्याबाबत आता येथे सांगितले. परंतु, संपूर्ण महानगरामध्ये महानगरपालिकेच्या मालकीचे भूखंड ज्यावर आरक्षण आहेत, ती आरक्षणे महानगरपालिकेच्या मालकीचे भूखंड असून देखील डेव्हलप होत नाहीत. याचे प्रमुख कारण हे आहे की, महानगरपालिकेचे नाव आजही त्या प्रॉपटी कार्डवर आलेले नसते. जुन्या मालकाचेच नाव असते त्यामुळे असंख्य अनधिकृत बांधकामांच्या विरोधातील केसेसमध्ये न्यायालयातून स्टे या मुद्द्यावर मिळतो की, महानगरपालिका मालकच नाही, मालक दुसरा कोणी तरी आहे.

अध्यक्ष महोदय, हा विषय केवळ या नवलकर मार्केटच्या विषयावरील लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांनी उपस्थित केला आहे. परंतु, हा मुंबई शहरासाठी खूप गंभीर मुद्दा आहे. माझा मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न आहे की, मुंबई महानगरपालिकेच्या तमाम भूखंडांच्या ७/१२ वर, प्रॉपर्टी कार्डवर महानगरपालिकेचे नाव चढविण्यासाठी एक विशेष मोहीम राबविण्याचे आदेश शासन महानगरपालिकेला देणार काय?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, बिलकुल देणार. कारण अशा प्रकारचे जे काही प्रस्ताव आहेत... गेल्या अनेक वर्षांपासून प्रॉपर्टी कार्डवर महानगरपालिकेचे नाव नाही. परंतु, ती जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे, अशा काही वास्तू आहेत. जे जे असे प्रलंबित विषय आहेत त्याकरिता महानगरपालिकेने तत्काळ एक डेडिकेटेड नोडल ऑफिसर नेमून त्यांनी जे प्रस्ताव प्रलंबित आहेत, त्या सर्वांवर तत्काळ निर्णय घ्यावा. ज्याबाबत काही अडचणी असतील तर त्याबाबत संबंधित मंत्री महोदयांसमवेत आपल्याला बोलता येईल. परंतु, हे करणे गरजेचे आहे, नाही तर पुनर्विकासामध्ये अनेक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे आपण या ठिकाणी हा निर्णय घेत आहोत की, त्यांनी हे प्रलंबित विषय तत्काळ मार्गी लावावेत.

...........

**पृ. शी. :** ठाणे जिल्ह्यातील १४ गावे आणि परिसर गेल्या अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित असणे

**मु. शी. :** ठाणे जिल्ह्यातील १४ गावे आणि परिसर गेल्या अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित असणे या संबंधी श्री. प्रमोद पाटील, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. प्रमोद पाटील (कल्याण ग्रामीण) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील १४ गावे आणि परिसर गेल्या अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित असणे, जिल्ह्यामध्ये पाणी, शिक्षण, आरोग्य, रुग्णालय, रस्ते अशा मूलभूत सुविधांची ही असलेली वाणवा, भौगोलिक परिस्थितीने ही सर्व गावे नवी मुंबई महानगरपालिकेला जोडलेली असल्यामुळे या गावातील नागरिकांचा नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट होण्यासाठी असलेला कल, त्यासाठी गेली अनेक वर्ष शासन स्तरावर सुरू असलेले प्रयत्न, त्यासाठी वारंवार ग्रामपंचायत निवडणूकांवर घातला गेलेला बहिष्कार, सर्व ग्रामपंचायतींनी रितसर ठराव करून शासनाकडे पाठविला असणे, नवी मुंबई मनपा ही याबाबत सकारात्मक असल्याने महासभेत १४ गावे समाविष्ट करण्यासाठी केलेला प्रशासकीय ठराव, दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी तत्कालीन राज्यमंत्री (नगर विकास) यांच्यासमवेत दिनांक १५ ऑगस्ट, २०१९ रोजी ही सर्व गावे नवी मुंबई मनपा मध्ये समाविष्ट केल्याचे घोषणा करण्यात येईल असे दिलेले आश्वासन, भौगोलिक परिस्थिती, सर्व गावांचे एकमत नवी मुंबई मनपा सकारात्मक असताना शासनाकडून निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई व वारंवार

श्री.प्रमोद पाटील ...

आश्वासन देऊनही होत असलेली फसवणूक यामुळे ग्रामस्थांचा शासनावरील उडत चाललेला विश्वास व निर्माण झालेली चीड पाहता शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन या गावांच्या भवितव्यासाठी व विकासासाठी तातडीने नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करण्यासाठी घ्यावयाचे निर्णय, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.एकनाथ शिंदे (नगरविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.कुणाल पाटील)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..............

यानंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.प्रमोद पाटील : अध्यक्ष महोदय, कल्याण ग्रामीण मतदारसंघातील पूर्वी नवी मुंबई महानगरपालिकेत असलेल्या व आता जिल्हा परिषदेमध्ये असलेल्या १४ गावांचा प्रश्न आहे. तो अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. आज या गावातील रहिवासी मंत्री महोदयांच्या उत्तराची आतुरतेने वाट पाहत आहेत. मागच्याच महिन्यात माननीय मंत्री महोदयांनी ही १४ गावे नवी मुंबई महानगरपालिकेत घेतली जातील, असे एका बैठकीत आश्वासन दिले होते.

अध्यक्ष महोदय, सदरहू सर्व गावे पूर्वी नवी मुंबई महानगरपालिकेत होती,असे उत्तरात नमूद आहे. परंतु काही कारणास्तव महापालिकेतून ही गाव बाहेर काढली होती. आता या गावांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. मंत्री महोदयांना याची कल्पना आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये या गावांच्या जोड रस्त्याची अडचण सांगितली आहे. ही बाब पूर्वी महानगरपालिकेत होती त्यावेळची असल्याने ती आता गैरलागू आहे. आता रस्त्यांची अडचण सांगण्यात अर्थ नाही, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, या १४ गावांचा समावेश करुन घेण्यास नवी मुंबई महानगरपालिका, नगरविकास विभाग व मंत्री महोदय सकारात्मक आहेत.

अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवदेनामध्ये सदरहू गावांना सुविधा देण्याकरिता ६,१०० कोटी रुपये खर्च येण्याची शक्यता सांगितलेली आहे. तसेच गावठाणातील नागरिकांना सोयी सुविधा पुरविण्यासाठी ५११ कोटी रुपये साधारणत: खर्च येऊ शकतो, असे नमूद आहे. हा खर्च फक्त नवी मुंबई महानगरपालिकेसाख्या महानगरपालिकेस परवडू शकतो व ते भविष्यात हा खर्च करू शकतात.

अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवदेनामध्ये नमूद आहे की, सदरहू गावांच्या जवळ ठाणे किंवा पनवेल महानगरपालिका आहेत. परंतु त्यांना हा खर्च झेपणार नाही, जिल्हा परिषदेलाही उक्त खर्च करणे झेपणार नाही. अशी माझी भावना आहे आणि परिस्थिती आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रमोद पाटील...

अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवदेनामध्ये नमूद आहे की, सदरहू गावांच्या सर्वेक्षणानंतर निर्णय घेऊ. उक्त सर्वेक्षण करण्यास कोणतीही अडचण येणार नाही ती प्रक्रिया सुरूच राहील. परंतु महानगरपालिका पुढे गेलेली आहे, त्यामुळे निवडणूक आयोगाच्या हद्दवाढ या तांत्रिक मुद्यावर या गावांचा प्रश्न अडकू नये. म्हणून प्राधान्याने अधिवेशन संपण्यापूर्वी उक्त १४ गावे नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करण्याची अधिसूचना काढण्यात येईल काय ?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी १४ गावांच्या संदर्भामध्ये लक्षवेधी सूचना मांडली आहे. सदरहू १४ गावे नवी मुंबई महापालिकेमध्ये समाविष्ट करण्याची मागणी काही काळापासून गावकारी, संघर्ष समिती करीत आहे. ही वस्तुस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, पूर्वी सदरहू गावे नवी मुंबई महानगरपालिकेत होती. त्यावेळी उक्त गावे महानगरपालिकेतून बाहेर काढा, अशी मागणी करुन आंदोलने करण्यात आली होती. त्यांच्या मागणीनुसार त्यांना नवी मुंबई महानगरपालिकेतून बाहेर काढण्यात आले होते. त्यानंतर आता बराच काळ गेला आणि पुन्हा समावेश करण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यावेळी तत्कालीन नेत्यांनी त्या भागातील ग्रामस्थांना व पुढारी यांना समजावून सांगावयास पाहिजे होते. परंतु त्यावेळच्या परिस्थितीनुसार उक्त निर्णय घेण्यात आला असेल. आता त्या गावांना रस्ते, पाणी, दिवाबत्ती या गोष्टी भेडसावत आहेत. त्यामुळे सदरहू गावे पुन्हा महापालिकेमध्ये वळवण्यासंदर्भात अनेक बैठका झाल्या, आंदोलने झाली. माझ्या बरोबरही बैठक व चर्चा झाली. या बाबतीत सरकार सकारात्मक आहे. शेवटी नागरिकांना सोयी सुविधा देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. काही चुका पूर्वी झाल्या असतील. परंतु आपल्याला त्या चुका दुरुस्त करता येणे शक्य असेल तर त्या केल्या पाहिजेत. या विचाराने सरकार सकारात्मक आहे. यासंदर्भात सर्वेक्षण करावे लागेल. आता निवडणूक जाहीर

असुधारित प्रत

श्री.प्रमोद पाटील...

झाल्याने प्रभाग रचनेचे काम झाले आहे. सेन्सेसचा देखील एक निर्णय असतो. अशा परिस्थितीत हद्दवाढ करणे किंवा कमी करणे, किंबहुना एखादा भाग समाविष्ट करणे किंवा काढणे, अशा बाबी कायदेशीर व तांत्रिक असल्याने त्या तपासून शासन सकारात्मक निर्णय घेईल.

डॉ.बालाजी किणीकर : अध्यक्ष महोदय, सन २०१५ मध्ये महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये या गावांच्या संदर्भात ठराव झाला आहे. यासंदर्भात शासन सकारात्मक आहे असे उत्तर तत्कालीन मंत्री महोदयांच्या काळातील मागील ५ वर्षापासून ऐकत आहोत. तत्कालीन राज्यमंत्री यांचेकडेही बैठका झाल्या आहेत. या १४ गावांचा मोठा प्रश्न आहे. या गावांमध्ये पाणी, रस्ते, गटारी, दवाखाने अशा अनेक समस्या आहेत. त्यामुळे लोक त्रासलेले आहेत. सदरहू भागाचे माननीय खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी देखील याप्रकरणी पाठपुरावा केला आहे. सदरहू गावांचा समावेश नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये करण्यात येत असल्याची घोषणा आज सभागृहात करण्यात येईल काय ?

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांच्या भावना मी समजू शकतो. मी दोन वर्षापासून नगरविकास मंत्री आहे. हा विभाग त्यापूर्वी माझ्याकडे नव्हता. या विषयाच्या संदर्भात मी सकारात्मक आहे. सदरहू प्रकरणी निर्णय घेताना आपण सर्व बाबी तपासून घेऊ.

श्री.गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, नवी मुंबईचा संपूर्ण मतदारसंघ एकेकाळी माझा होता. त्यावेळी ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री.मिठालाल जैन होते. त्यांचे अध्यक्ष पद जाऊ नये, ठाणे तालुक्याचे पूर्ण नागरीकरण होऊ नये म्हणून १४ गावे बाजूला ठेवली होती. त्यावेळी नवी मुंबई शहराशी कनेक्टिविटी दोन्ही बाजूने नव्हती. उत्तरेकडून येताना ठाणे महापालिकेची हद्द क्रॉस करुन व आता पनवेल महापालिकेची हद्द क्रॉस करुन नवी मुंबई महानगरपालिकेत यावे लागते. म्हणून नवी मुंबई

असुधारित प्रत

श्री.गणेश नाईक...

महापालिकेने दिनांक २० जुलै, २०१५ रोजी ठराव केला की, उक्त गावांचा समावेश महानगरपालिकेत करण्यात यावा. परंतु तो ठराव कंडिशनल आहे. अडवली, भुतावली येथून पारशी डोंगराला बोगदा करून वीस किलो मीटरच्या १४ गावांच्या हद्दीला कनेक्टिव्हिटी तयार करून द्यावी. त्या भागात मोठ्या प्रमाणामध्ये भंगारवाल्यांचे अतिक्रमण झाले आहे. त्यांनी संपूर्ण शासकीय जागा व्यापलेली आहे. किंबहुना केमिकलचे ड्रम जाळले व त्यातील पाणी सीफेज होऊन १४ गावांच्या विहिरींचे पाणी दूषित झाले आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदय यांनी निवेदनात म्हटले की, या परिसराचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्यासाठी ६,१०० कोटी रुपये खर्च येईल. तो दरवर्षी १ हजार कोटी रुपये याप्रमाणे ६ टप्पे पाडून देण्यात यावा. या गावांच्या सुविधांसाठी ५९१ कोटी रुपये रक्कम सुरुवातीला देण्यात यावी. अशी माझी मागणी आहे. सदरहू गावे नवी मुंबई महापालिकेला जोडण्यासबंधी मंत्री महोदयांनी आज घोषणा करावी, अशी माझी विनंतीवजा सूचना आहे. आपण त्याचा स्वीकार करावा.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गणेश नाईक यांनी या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, नवी मुंबई महानगरपालिका ही इतकी दिवस सन्माननीय सदस्य श्री.गणेश नाईक यांच्याच छत्रछायेखाली होती आणि ते नवी मुंबई जिल्ह्याचे पालकमंत्री देखील होते. ही सर्व वस्तुस्थिती आपणा सर्वांना माहिती आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या विरोधात मी नाही. ज्या भागाचा पूर्णपणे विकास करावयाचा असेल, त्या भागामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या असतील तर यासाठी लागणाऱ्या खर्चाचे नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच मघाशी मी सांगितले की हद्द वाढविणे किंवा कमी करणे यामध्ये कायदेशीर आणि तांत्रिक बाबी आहेत. आता निवडणुकीची प्रक्रिया सुरु झालेली आहे. या सर्व बाबी तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. उक्त प्रश्नाच्या बाबतीमध्ये शासन सकारात्मक आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये सदर गावांचा समावेश करण्याबाबत शासनाचा कोणताही आक्षेप नाही. परंतु शासन सर्व बाबींचा विचार करुन निश्चितपणे निर्णय घेतला जाईल.

श्री.रविंद्र चव्हाण : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरातून सदर गावांचा समावेश महानगरपालिकेमध्ये करणार आहेत की नाही, याबाबतची त्यांची भूमिका स्पष्ट होत नाही. यासंदर्भात पुन्हा एकदा सर्व्हे करण्यात येईल, असे सांगितले गेले आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये असलेल्या २७ गावांचे ९ आणि १८ असे विभाजन या सरकारने केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, तेथील भूमिपुत्राचे मत व महानगरपालिकेचे मत लक्षात घेतले तर त्या गावांचा समावेश नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये करावा, असे दिसून येत आहे. दुसरी बाब अशी आहे की, आता निवडणुकीची कोणतीही प्रक्रिया सुरु झालेली आहे. यापूर्वी देखील असाच प्रकार झाला होता. जेव्हा निवडणुकीची प्रक्रिया सुरु होते. त्यावेळी यासंदर्भातील निर्णय घेतला जात नाही. सन २०१५ मध्ये राज्य मंत्री महोदयांनी निर्णय घेतला होता. परंतु ही बाब माननीय न्यायालयामध्ये गेल्यानंतर सरकारने निवेदन केले होते की, सदर निवडणुकीची प्रक्रिया सुरु झालेली आहे.

श्री.रविंद्र चव्हाण.......

आता नवी मुंबईची प्रक्रिया सुरु झालेली नाही आणि कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या निवडणुकीची देखील प्रक्रिया सुरु झालेली नाही. इतकेच नव्हे तर एमएमआर रिझनमध्ये अशा प्रकारची कोणतीही प्रक्रिया सुरु झालेली नाही. सर्व लोकप्रतिनिधींच्या भावना नगर विकास मंत्री महोदयांनी लक्षात घेऊन सदर १४ गावांचा समावेश नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये करावा, अशी मी विनंती करतो.

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन २०१५ मध्ये याबाबतचा ठराव घेण्यात आला होता. तेव्हा माननीय श्री.योगेश सागर राज्य मंत्री होते. मागील काळामध्येच ही प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु ती झाली नाही. सन २०१५ ते सन २०२२ म्हणजे मागील सात वर्षामध्ये ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकती नाही. मी कोणाला दोष देत नाही. परंतु ती दुदैवाने झाली नाही, एवढेच मला म्हणावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, प्रभाग रचनेचे काम सुरु झालेले नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, महानगरपालिकेतील प्रभाग रचनेचे काम सुरु झालेले आहे. ठाणे येथे संघर्ष समिती आली होती. तेव्हा देखील मी सांगितले होते की, आम्ही आपल्या विकासाच्या विरुद्ध नाही. मागील काळामध्ये काय झाले, यावर मी बोलू शकतो. परंतु मला आता त्या विषयामध्ये जायायचे नाही. आम्ही कोणत्याही निर्णयामध्ये सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. अशा प्रकारच्या निर्णयामध्ये राजकारण आणण्याची आवश्यकता नाही आणि मी कधीही आणलेली नाही. शेवटी ते तेथील भूमिपुत्र आहेत. त्यांनी संघर्ष समिती स्थापन केलेली आहे. या समितीच्या माध्यमातून त्यांनी अनेक आंदोलने देखील केलेली आहेत. तसेच त्यांनी वेळोवेळी शासनाला सहकार्य देखील केलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन उक्त १४ गावांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यकच आहे. या सर्व बाबींसह सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन उक्त १४ गावांचा समावेश नवी मुंबई महानगपालिकेमध्ये करण्यात येत आहे, अशी मी घोषणा करतो. यामधील तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासून उक्त प्रकरणी पुढील कार्यवाही करावी, अशी मी आयुक्तांना सूचना देतो.

डॉ.बालाजी किणीकर : अध्यक्ष महोदय, सदर १४ गावांच्या व एमएमआर रिझनमधील सर्व आमदार महोदयांच्या वतीने मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. आज आपण १४ गावांना न्याय दिला. त्यामुळे त्या १४ गावांतील लोकांचा आपणास आशीर्वाद लागेल, असे मी सांगू इच्छितो.

श्री.गणेश नाईक : अध्यक्ष महोदय, माननीय नगर विकास मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी १४ गावांबाबत जो सकानात्मक निर्णय घेतला आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्यांनी त्यांच्या उत्तरामध्ये जे ६ हजार १०० कोटी रुपये देऊ केलेले आहेत, ते कोणत्या टप्प्यामध्ये किती उपलब्ध करुन दिले जाणार आहेत, याची रचना करावी व नवीन मुंबई महानरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी याबाबतची घोषणा करावी. असे केले तर सभागृहाला देखील आनंद होईल.

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, कोरोनामुळे राज्याची व नवी मुंबई महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कशी आहे हे आपणास सर्वांना माहिती आहे. मी नमूद केलेला निधी एकाच वेळी लागणार नाही. सदर गावांमध्ये टप्प्या-टप्प्याने मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. सर्व प्रथम त्या गावांमध्ये पाणी, दिवाबत्ती, रस्ते अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देणार आहोत. मी मघाशी सांगितले आहे की, महानगरपालिकेने व नगर विकास विभागाने यामधील सर्व तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही सुरु करण्याच्या सूचना दिलेले आहेत. त्या गावांना सोयी-सुविधा देण्यासाठीच त्या गावांचा समावेश महानगरपालिकेमध्ये केलेला आहे. या सर्व बाबींचा विचार करुन प्रशासन पुढील कार्यवाही सुरु करेल.

श्री.विश्वनाथ भोईर : अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षी अतिवृष्टी झाल्यानंतर मी दहिसर आणि पिंपरीगावामध्ये गेलो होतो. माझ्या मतदारसंघातील आठ-दहा हजार लोक त्या ठिकाणी राहतात. सन्माननीय सदस्य श्री.गणेश नाईक यांनी सांगितलेली बाब खरी आहे. त्या ठिकाणी अतिवृष्टी व केमिकल लिचिंगमुळे लोकांच्या घरामध्ये पाणी शिरले होते. त्या पाण्यामुळे तेथील नागरिकांच्या अंगावर फोड आले होते. ही मी माझ्या नजरेने पाहिलेले आहे. सदर गावांचा समावेश करण्यात येत असल्याची घोषणा केली. परंतु फक्त घोषणा करुन काहीच उपयोग होत नाही. ठोस कृती करणे

श्री.विश्वनाथ भोईर........

आवश्यक आहे. उक्त प्रकरणी आपण किती दिवसांमध्ये अधिसूचना निर्गमित करणार आहात? तेथील खूप गंभीर परिस्थिती आहे. त्यामुळे याबाबत लवकरात लवकर निर्णय घेणे आवश्यक आहे.

श्री.एकनाथ शिंदे : सदर १४ गावे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबतची आताच घोषणा केलेली आहे. तसेच याबाबतची सर्व बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देखील दिलेल्या आहेत.

-----------

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत

श्री.अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये महावितरणचा अनागोंदी कारभार सुरु आहे. मी माझ्या मतदारसंघातील शकडो वीज देयके सोबत आणलेली आहेत. तीन एचपीच्या लोकांना सात एचपीची वीज देयके देण्यात आलेली आहेत आणि सात एचपीच्या लोकांना तीन एचपीचे वीज देयके देण्यात आलेली आहेत. इतकेच नव्हेतर ज्या लोकांचे १०-१५ वर्षांपासून वीज कनेक्शन बंद आहेत, अशा लोकांना देखील लाखो रुपयांचे वीज देयके देण्यात आलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, मी माझ्या मतदारसंघातील काही उदाहरणे देऊ इच्छितो. एका व्यक्तीचे मागील १५ वर्षांपासून वीज कनेक्शन नाही. त्यांना दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी १ लाख ३७ हजार ५०० रुपयांचे वीज देयक देण्यात आलेले आहे. दुसऱ्या व्यक्तीचे १२ वर्षांपासून वीज कनेक्शन बंद आहे. त्यांना देखील त्याच तारखेला ९७ हजार २१० रुपयांचे वीज देयक देण्यात आले आहे. महाराष्ट्रमध्ये काय सुरु आहे? महाविरणचा एवढा अनागोंदी कारभार असू शकतो काय? अशा प्रकारच्या कारभाराकडे लक्ष देण्यास कोणाकडेही वेळ नाही. याबाबत आम्ही वेळोवेळी सी.ई. व एस.ई यांना भेटून माहिती दिलेली आहे. तरी देखील अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत दोन महिन्यापूर्वीच बैठक घेतलेली आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आपण निदेश देण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** उक्त प्रकरणी शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

यानंतर श्री.कुलकर्णी.........

**तालिका सभाध्यक्ष :** आता नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. सदानंद सरवणकर यांनी भाषणाला सुरुवात करावी.

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सकाळी मांडण्यात आलेले विधेयक आता घेण्यात येणार आहे किंवा नाही, याबाबत मला माहिती द्यावी, अशी मी आपणास विनंती करते. कारण सकाळी ते विधेयक घेण्यात आले होते. मला विधान परिषद सभागृहामध्ये ते विधेयक मांडावयाचे आहे. तेथेही हे विधेयक दर्शविण्यात आलेले आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** मी आपणास सांगू इच्छितो की, सदरहू विधेयकावर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार हे ऑनलेग आहेत.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सदरहू विधेयक रात्री मंजुरीला घेण्यात यावे. आता म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु करावी. या चर्चेकरिता कमी वेळ शिल्लक आहे. याचे कारण असे की, दुपारी ०३.०० वाजता त्यावर तीन मंत्री महोदय उत्तर देणार आहेत. त्यानंतर पुन्हा सायंकाळी ४.३० वाजता विरोधी पक्षाचाही प्रस्ताव चर्चेला घ्यावयाचा आहे. मी माननीय उपाध्यक्षांसोबत चर्चा केली आहे. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी एक तासाचा वेळ शिल्लक आहे. ती चर्चा आता पूर्ण करावी. शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्या विधेयकावर बोलण्यासाठी मी ऑनलेग आहे. इतर विधेयके मंजूर करण्यात आलेली आहेत. दोन्ही बाजुच्या काही सन्माननीय सदस्यांना नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर बोलावयाचे आहे. काल समोरील बाजुचे काही सन्माननीय सदस्य नव्हते. ते बैठकीसाठी गेले होते. त्यामुळे या प्रस्तावावर एक तास चर्चा करण्यात येईल त्यानंतर एक तास उत्तराकरिता दिला जावा. त्यानंतर पुन्हा सायंकाळी ४.३० वाजता विरोधी पक्षाचा अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घ्यावा व रात्री या विधेयकाला मंजुरी देण्यात येईल.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, हे विधेयक मंजूर होण्यासाठी अधिक वेळ लागणार नाही. जर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची संमती असेल तर ते आता मंजूर करावे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, या विधेयकावर बोलण्यासाठी मी ऑनलेग आहे. म्हणून मी विनंती करतो की, आता एक तास नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा करावी. त्यावर अधिक सदस्य बोलणार नाहीत.

**तालिका सभाध्यक्ष** : आता नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात येईल.

श्री. संदीप क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनवर बोलणार आहे. माझ्या मतदारसंघातील अनेक महिला मला सकाळपासून दुरध्वनीद्वारे संपर्क करीत आहेत. माझ्या शहरात पिण्याच्या पाण्याची अतिशय बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. तेथे मुबलक पाणी उपलब्ध असूनही १५ ते २० दिवसातून एकदा पाणी येत आहे. माझ्या मतदारसंघातील लोकांनी सांगितले की, ही अडचण सोडविली नाही तर ते लोक उद्या माझ्या घरावर मोर्चा काढणार आहेत. मला या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. तेथे ११४ कोटी रुपयाची योजना मंजूर झाली आहे. एमएआरसीच्या गाईडलाईनप्रमाणे एमएसईबीसीचे बिल न भरल्यामुळे ती योजना सुरु होत नाही. ती योजना सुरु करण्यासाठी १२ कोटी रुपये भरावयाचे आहेत आणि जवळपास १४ कोटी रुपये बिलाचे व्याज आहे. मी मननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार विनंती करतो की, हे व्याज माफ करुन दिले तर ते तेथील प्रशासन १२ कोटी रुपये टप्प्याटप्प्याने भरण्यासाठी तयार आहे. तेथील योजना मंजूर आहे. बीड शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय बिकट झाला आहे. तो आपण सोडवावा, अशी मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने नोंद घेतलेली आहे. आता नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. सदानंद सरवणकर यांनी चर्चेला सुरुवात करावी.

असुधारित प्रत

**पृ.शी.:** मुंबईसह राज्यातील इतर ठिकाणच्या इमारतींचा पुनर्विकास करणे.

**मु.शी.:** मुंबईसह राज्यातील इतर ठिकाणच्या इमारतींचा पुनर्विकास करणे या विषयावर सर्वश्री सुनिल प्रभू, अमिन पटेल, अनिल पाटील, रविंद्र वायकर, नाना पटोले, यशवंत माने, अजय चौधरी, पृथ्वीराज चव्हाण, प्रकाश सोळंके, सदा सरवणकर, सुरेश वरपुडकर, ॲड अशोक पवार, सर्वश्री मंगेश कुडाळकर, झीशान सिद्दीकी, रोहित पवार, सुनील राऊत, संग्राम थोपटे, दीपक चव्हाण, प्रकाश सुर्वे, कैलास गोरंट्याल, दौलत दरोडा, रमेश लटके, अमित झनक, ॲड माणिकराव कोकाटे, सर्वश्री संजय पोतनीस, कुणाल पाटील, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, शिरीष चौधरी, शेखर निकम, प्रताप सरनाईक, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री बाबासाहेब पाटील, भास्कर जाधव, सुभाष धोटे, बाळासाहेब आजबे, रमेश कोरगावकर, माधवराव जवळगांवकर-पाटील, संग्राम जगताप, राजन साळवी, पी.एन.पाटील (सडोलीकर), संजय राठोड, शिरीषकुमार नाईक, डॉ.किरण लहामटे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री राजेश एकडे, निलेश लंके, ज्ञानराज चौगुले, बळवंत वानखडे, संदिप क्षीरसागर, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री विकास ठाकरे, सुनिल शेळके, अनिल बाबर, रणजित कांबळे, संजय जगताप, भरतशेठ गोगावले, नितीन पवार, धीरज देखमुख, वैभव नाईक, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री सुनिल टिंगरे, दिलीप लांडे, विक्रमसिंग सावंत, जितेश अंतापूरकर, दिपक केसरकर, चेतन तुपे, संजय शिरसाट, राजू पारवे, सहसराम कोरोटे, चिमणराव पाटील, मोहनराव हंबर्डे, लहु कानडे, प्रकाश आबिटकर, ऋतुराज पाटील, राजू आवळे, किशोर पाटील, चंद्रकांत नवघरे, शांताराम मोरे, डॉ.राहुल पाटील, श्री.श्रीनिवास वनगा, ॲड.शहाजी पाटील, सर्वश्री संजय गायकवाड, नितीन देशमुख, बालाजी कल्याणकर, उदयसिंग राजपूत, रमेश बोरनारे, सुहास कांदे, महेंद्र थोरवे, विश्वनाथ भोईर, संतोष बांगर, योगेश कदम, श्रीमती लता सोनवणे, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, महेश शिंदे, महेंद्र दळवी, वि.स.स. यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु.....

श्री. सदानंद सरवणकर (माहिम) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९३ अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहारातील समस्यांबाबत मुंबईतील सर्व सन्माननीय सदस्य या सभागृहाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधावे, यादृष्टीने बोलतोत. मुंबई शहराचे क्षेत्रफळ ७२४ चौरस कि.मी. आहे. मुंबई हे शहर सात बेटांनी तयार झाले आहे. या शहराची ओळख बहुरुपी आणि औद्योगिक शहर अशी आहे. या शहरात सुरुवातीला कोळी समाज आला त्यानंतर आगरी समाज येथे स्थायिक झाला. कोळी, आगरी, माळी या समाजाचे मुंबई शहराच्या विकासामध्ये मोठे योगदान आहे. या लोकांना रोजगार संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. स्वातंत्र्यपूर्व काळात असलेल्या शासनाने अण्ण, वस्त्र, निवारा या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध योजना तयार केल्या

श्री. सदानंद सरवणकर ....

होत्या. याचा एक भाग म्हणून मुंबई शहरातील जमिनीवर गिरणी व्यवसाय सर्वप्रथम सुरु करण्यात आला होता. या व्यवसायात लाखो गिरणी कामगारांना रोजगार मिळाला होता. मुंबईतील या जमिनी श्रीमंत माणसांना मुंबई इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट या संस्थेने लिजवर दिल्या होत्या. तेव्हा रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत होत्या. त्याच वेळेस येथे निवाऱ्याचीही व्यवस्था आवश्यक होतर. तेव्हा काही इमारती उभ्या राहिल्या होत्या. तेव्हा आताच्या सारखे काँक्रीटचे जंगल मुंबईमध्ये नव्हते. या इमारती उभ्या करण्याच्या कामाकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहिले गेले. तेव्हाच्या इमारती माती आणि सिमेंट मिश्रीत होत्या. आज त्या इमारती धोकादायक स्थितीत आहेत. या इमारतीमध्ये राहणारे लोक मुंबई शहराच्या अवतीभवती असलेल्या वस्त्यांमधून तेथे आलेले होते. यांना राहण्यासाठी बांधलेल्या इमारती तेव्हाच्या लोकांनी व्यवसायाच्या दृष्टीकोनातून बांधल्या होत्या.

अध्यक्ष महोदय, या इमारती आज धोकादायक आहेत. त्यांना आता उपकर प्राप्त इमारतीच्या नावाने ओळखले जाते. मुंबई शहराच्या समस्या मुंबई शहर आणि मुंबई उपनगर अशा आहेत. सुरुवातीच्या काळात मुंबई शहर विकसित झाले होते. त्यानंतर उपनगरात या वस्त्या वाढत गेल्या होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी ज्या वास्तू उभ्या केल्या आहेत त्यामध्ये रेल्वे स्टेशन, रुग्णालये, सरकारी कार्यालये आजही तितक्याच दिमाखाने उभी आहेत. तेव्हाच्या सरकारी बांधकामाचा दर्जा अतिशय चांगला होता. आज १५० वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या सरकारी इमारती या दिमाखात उभ्या आहेत. असे असताना म्हाडा आणि एसआरएने बांधलेल्या किंवा अन्य यंत्रणेने रहिवाशांकरिता बांधलेल्या इमारती या धोकादायक का झाल्या आहेत ? याकडे लक्ष वेधण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात उपकर प्राप्त इमारती असून त्यांची अवस्था अतिशय खराब आहे. या इमारती तेव्हा एका विशिष्ट समाजाने बांधल्या होत्या.

यानंतर श्री. चौधरी..

श्री.सदानंद सरवणकर.....

बोरी समाजाने व्यवसाय म्हणून या इमारती बांधल्या होत्या. त्या समाजाच्या मालकीच्या या इमारती आहेत. या इमारतींमध्ये राहणारे भाडेकरु आजतागायत गरीबच आहेत. छोटे-छोटे व्यवसाय, नोकरी करणारे लोक या इमारतींमध्ये राहतात व ते आज या इमारतींच्या पुनर्विकासाकडे डोळे लावून बसले आहेत. या इमारतींचे प्लॉटस् अगदी छोटे आहेत आणि तुलनेत तेथे राहणाऱ्या भाडेकरुंची संख्या खूप जास्त आहे. त्यामुळे या इमारतींचा योग्य रितीने पुनर्विकास करता येत नाही. बऱ्याचदा या इमारती कोसळून मनुष्यहानी झाल्याचे आपल्याला दिसते. त्यामुळे या इमारतींची पुनर्बांधणी करणे अत्यंत आवश्यक आहे. उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी पुनर्विकासाच्या धोरणामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. मी ज्या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतो तेथे गेल्या १० वर्षांपासून पुनर्विकासाचे २७ प्रकल्प पुर्णपणे बंद आहेत. हे प्रकल्प उपकरप्राप्त इमारतींचे असून त्यांना म्हाडाने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. म्हाडाच्या देखरेखीखालीच त्या इमारतींचा पुनर्विकास सुरु होता. परंतु आज परिस्थिती अशी आहे की, यापैकी बरेच विकासक मृत झाले आहेत तर कोणी तुरुगांत आहेत. अशा स्थितीत या प्रकल्पांचे काम थांबलेले आहे. भाडेकरुंना केवळ पहिली एक-दोन वर्षे संक्रमण शिबिरामध्ये राहण्यासाठी पैसे देण्यात आले. गेल्या दहा-बारा वर्षांपासून त्यांना भाडे मिळत नाही, ज्या इमारतीमध्ये त्यांना घरे मिळणार आहेत त्या इमारतींची कामेही अर्धवट आहेत. जे रहिवाशी संक्रमण काळात तात्पुरत्या कोणाच्या घरात राहत असतील तर त्यांनाही एवढी वर्षे झाल्यामुळे त्या घरातून हकलून दिले जात आहे. अशा प्रकारची विचित्र परिस्थिती मुंबईच्या मूळ नागरिकांवर ओढवली आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्षात कामे अपूर्ण असलेल्या प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी गेल्या चार-पाच वर्षांपासून आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. मंत्री महोदयांकडून आम्हाला उत्तर दिले जाते की, आपला प्रस्ताव माननीय राष्ट्रपतींकडे प्रलंबित आहे. परंतु मला असे वाटते की, हे सांगून आता चालणार नाही. आता आपल्याला नवीन मार्ग शोधावे लागतील.

श्री.सदानंद सरवणकर.....

हे प्रकल्प शासनाला ताब्यात घेऊन पूर्णत्वाकडे नेण्याची नैतिक जबाबदारी म्हाडासह घ्यावी लागेल. देशोधडीला लागलेल्या भाडेकरुंना आज कोणीही मदत करण्यास तयार नाही. अतिवृष्टी, भूकंप, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तीवेळी आपत्तीग्रस्तांना शासनाकडून मदत केली जाते. मात्र, मुंबई शहरातील अशा हवालदिल व गरीब रहिवाशांना मदत करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. माझ्या मतदारसंघातील ५ ते ७ हजार कुटुंबे या संकटामुळे देशोधडीला लागलेली आहेत. या बाबीला नैसर्गिक आपत्ती समजून रहिवाशांना भाडे देणे, प्रकल्पांचे काम पूर्ण करणे या जबाबदाऱ्या शासन स्विकारेल का हा या निमित्ताने माझा प्रश्न आहे. या सर्व बाबींची जबाबदारी शासनाने घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये ६० टक्के जनता झोपडपट्टीत व ४० टक्के लोक चाळी व इमारतींमध्ये राहत होते. माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ४० लाख झोपडपट्टीवासियांना मोफत घर मिळावे या उदात्त हेतूने एसआरए सारखी महत्त्वाकांक्षी योजना आणली. माननीय श्री.शरद पवार यांचे या योजनेला आशीर्वाद मिळाले. परंतु आज या योजनेमध्ये नेमके काय चालले आहे यावर संशोधन करण्याची गरज आहे. मुंबई शहरातील एसआरए योजना अतिशय सुलभपणे चालू शकतात. परंतु उपनगरामध्ये तसे सांगता येणार नाही. कारण आमच्याकडे एसआरए योजनेतून विक्रीसाठी बांधल्या जाणाऱ्या १ चौरस फूट बांधकामाची किंमत १ लाख रुपये एवढी आहे. त्यामुळे मुंबई शहरातील एसआरए ची कोणतीही स्किम अयशस्वी होता कामा नये हे आपल्याला सहजरित्या सांगता येईल. तरीही आजची परिस्थिती अशी आहे की, विकासकांनी विक्रीसाठी बांधलेल्या इमारती भव्यदिव्य, उत्तुंग व मुंबई शहराच्या सौंदर्यामध्ये भर टाकणाऱ्या आहेत. परंतु ज्या झोपडपट्टीवासियांच्या जीवावर हा एफएसआय त्यांना मिळाला आहे त्या झोपडपट्टीवासियांची मात्र घोर चेष्टा सुरु आहे. झोपडपट्टीवासियांसाठी बांधलेल्या घरांमध्ये गळती सुरु आहे.

श्री.सदानंद सरवणकर.....

अनेक घरांमध्ये लाईट, पंखा, टी.व्ही. लावू शकत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे वैभवशाली व महत्त्वाकांक्षी अशा योजनेच्या मुळाशी जाऊन संशोधन करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, एसआरए अंतर्गत एखादी पुनर्विकास योजना केली जात असताना त्याचे नेमके किती लाभार्थी आहेत हे कळण्याची गरज आहे. या योजनेमध्ये खूप काही आहे की ज्यावर बोलले गेले पाहिजे. आम्ही मुंबईतील आमदार आहोत. आम्ही केवळ उपकरप्राप्त इमारती आणि झोपडपट्टयांवरच बोलू शकतो अशी स्थिती आहे. कारण या दोन समस्याच मुंबईच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. एसआरए योजना, म्हाडा यांच्यामध्ये आज केवळ धंदा सुरु आहे. ज्या गोर-गरीब भाडेकरुंनी या मुंबई शहरावर प्रेम केले, या शहरासाठी त्याग केला त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, एसआरए योजनेमध्ये १ हजार भाडेकरु असतील तर पहिल्या वेळी त्यातील ५०० भाडेकरु पात्र केले जातात. उर्वरित अपात्र ५०० भाडेकरुंना पात्र करण्यासाठी चार-चार लाख रुपये द्यावे लागतात. यामध्ये प्रचंड मोठा भ्रष्टाचार आहे. मंत्री महोदयांकडून आम्हाला खूप मोठया अपेक्षा आहेत. त्यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : अध्यक्ष महोदय, नियम २९३ च्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये महाकाली एसआरए ही ९०० टेनेन्टसची स्किम आहे. या स्किमची १३ (२) ची कार्यवाही करण्यात आली आहे. येथील लोकांनी सुंदर घरांची स्वप्ने पाहिली होती. झोपडपट्टीतून आम्ही ३०० स्क्वे.फुटांच्या घरामध्ये राहायला जाऊ असे त्यांचे स्वप्न होते परंतु आज अशी परिस्थिती आहे की त्यांना चार-चार वर्षांपासून भाडेही मिळत नाही आणि घरही मिळत नाही. भाडे मिळत नाही या कारणाने एक-दोन जणांनी आत्महत्या देखील केल्या तर काहीजण गावी निघून गेले आहेत.

अध्यक्ष महोदय, बाजूलाच देवीपाडा एसआरए ही १८०० टेनेन्टसची स्किम आहे. त्यांची देखील स्थिती अशीच आहे. विकासकाने विक्रीचा भाग विकला व पैसे घेऊन मजा करीत आहे. परंतु ज्या गरीब जनतेने शौचालय, भरपूर पाणी, बाथरुम असणाऱ्या फ्लॅटमध्ये सुखाने राहण्याचे स्वप्न पाहिले होते त्यांचे ते स्वप्न मात्र धुळीस मिळाले आहे. या विभागाच्या डॅशींग मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, एसआरए च्या अशा विकासकांवर गुन्हे दाखल करावेत. एक-दोन जणांना तुरुंगात टाकावे, त्याशिवाय ते सुधारणार नाहीत. आज गरीब जनतेचा कोणीही वाली नाही. हे लोक आमच्या कार्यालयावर मोर्चा काढतात, आम्हाला शिव्या घालतात. परंतु लोकप्रतिनिधी तरी त्यांना कुठून भाडे देईल ? त्यामुळे माझी विनंती आहे की, महाकाली एसआरए, देवीपाडा एसआरए योजनांच्या विकासकांवर गुन्हे दाखल करुन त्यांना तुरुंगात डांबा. तसे केल्यास ते बरोबर लोकांना पैसे देतील. एका प्रकल्पातील पैसे दुसऱ्या ठिकाणी वापरुन हे विकासक पैसे कमवितात परंतु गरीब जनतेला पैसे देत नाहीत. चार-चार वर्षे भाडे न मिळाल्यामुळे या लोकांची परिस्थिती हलाखीची झाली आहे. ते मुलांना शिक्षण देऊ शकत नाहीत, वीज बिल देखील भरु शकत नाहीत. एखाद्या ठिकाणी भाडयाने राहायला गेल्यानंतर भाडे थकले तर घरमालक घरातून बाहेर काढतो. दुसऱ्या ठिकाणी भाडयाने घर घ्यायचे म्हटले तर दलाली द्यावी लागते. परंतु पैसे द्यायचे कुठून हा प्रश्न त्यांच्यासमोर आहे.

श्री.प्रकाश सुर्वे.....

माझी मंत्री महोदयांना पुन्हा विनंती आहे की, ज्या विकासकांनी भाडेकरुंना जेरीस आणून आत्महत्येस प्रवृत्त केले आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत व भाडेकरुंना भाडे मिळवून द्यावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. मिहीर कोटेचा (मुलुंड) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये सत्ताधारी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये सर्वप्रथम विकास आराखडा १९६७ ला आला. त्यानंतर सुधारित विकास आराखडा १९९१ मध्ये आला. आता २०३४ चा विकास आराखडा मंजूर झाला आहे. सन २०३४ चा डीसीपीआर प्रसिध्द झाल्यानंतर निवडक श्रीमंत विकासकांना आपण कशाप्रकारे सवलती देतो, याबद्दल काही मुद्दे मी या ठिकाणी मांडणार आहे.

अध्यक्ष महोदय, कोविडच्या काळात रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी गृहनिर्माण विभाग व नगरविकास विभागाने काही चांगली पावले उचलली आहेत. पण हे फार मोजके आहेत. यातील पहिलाच मुद्दा पाहिला तर मुंबई शहरात ३३(७) व ३३(९) अंतर्गत आपण ज्या योजना राबवितो... पण मुंबई शहरात आपण जेव्हा घर विकत घेण्यासाठी जातो तेव्हा ते ८० हजारापासून १ लाखापर्यंत प्रति चौरस फूटांचे असते. म्हणून मुंबई शहरात या २ योजनांसाठी हायराईजच्या इमारतींकरिता फायर एनओसीमधून विशेष सूट दिली. म्हणजे ७० मिटरच्या वर एक इमारतीमध्ये २ जिने लागतात. पण त्याला आपण ९० मिटरपर्यंत एकच जिना असला तरी चालेल अशी सुधारणा करणारे परिपत्रक काढले. पण हा नियम मुंबई उपनगरात लागू होत नाही. म्हणजे अग्नी देवतेचे स्वरुप एखाद्या इमारतीमध्ये आग लागली की धनाढ्य मुंबई शहरात त्याचे नियम वेगळे आणि मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी वेगळे नियम. त्यानंतर मी याबाबत संशोधन केले. त्यानंतर मला लक्षात आले की मुंबई शहरातील मोठ्या विकासकांची जी लॉबी आहे ते लोक कि.टी. पोहोचवतात. कि.टी. म्हणजे काय तर ८-१० मोठे प्रकल्प यांचे विकासक मिळून ८-८, १०-१० कोटी रुपये जमा करतात. साधारणपणे ८० ते १०० कोटी रुपयांची एक कि.टी. बनते. ही कि.टी. कन्फर्म झाल्यानंतर आपल्या विधान भवनाच्या शेजारील इमारतीमधून निर्देश निघतात आणि जीआर निघतो.

श्री. मिहीर कोटेचा...

अध्यक्ष महोदय, हल्ली मुंबईतील वातावरण खूप गरम आहे आणि भितीपोटी आता ही एवढी मोठमोठी कि.टी. घेतल्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना कळेल आणि पुन्हा एकदा एक बॉम्ब फुटेल म्हणून आता हे ८०-१०० कोटी रुपयांची कि.टी. बिटक्वॉईनमध्ये घेतात. बिटक्वॉईनची खाती विदेशामध्ये असतात. बिटक्वॉईनची कि.टी. कन्फर्म झाली की रिलॅक्सेशन येते. आज एका बिटक्वॉईनची किंमत ३२ लाख ३८ हजार रुपये आहे. म्हणून मला असे वाटते की मुंबई उपनगरामध्ये राहणाऱ्या मुंबईकरांना व तेथील विकासकांनाही उपनगरामध्ये होणारा दुजाभाव मिटवायचा असेल तर या बिटक्वॉईनच्या कि.टी.वर संशोधन करावे लागेल आणि तरच उपनगराचा विकास होईल.

अध्यक्ष महोदय, आपल्याला मुंबईत डीसीपीआर २०३४ वेळेत राबवायचा असेल तर जवळपास १ लाख पीटीसी आपल्याला लागेल. पीटीसी मोठ्या प्रमाणात निर्माण करणारी योजना म्हणजे एसआरए अंतर्गत ३३ (११) आहे. यामध्ये विसंगती किती आहे ते आपण पहावे. एसआरएमध्ये ३३ (१०) अंतर्गत योजना राबविताना ९ मिटर रुंदीच्या रोडसाठी ४ एफएसआय दिला जातो. पण ३३ (११) अंतर्गत आपल्याला लागणाऱ्या पीटीसीच्या निर्मितीसाठी आपण तेथे १२ मिटर रुंदीच्या रोडसाठी ३ एफएसआय आणि १८ मिटर रुंदीच्या रोडसाठी ४ एफएसआय देतो. म्हणून माझा प्रश्न आहे की, आपल्याला मुंबईचा विकास महत्त्वाचा आहे की, बिटक्वॉईनची कि.टी. महत्त्वाची आहे. त्यामुळे आपण बिटक्वॉईनची कि.टी. ठरल्यानंतर या भागात सूट देणार आहात. म्हणून मी निवेदन करतो की, अशी जी विसंगती आहेत ती संपवावी आणि मुंबईचा खराखुरा विकास करायचा असेल तर ३३ (११) मध्ये सुध्दा आपण ३३ (१०) नुसार १२ मिटर रुंदीच्या रस्त्यसाठी ४ चा एफएसआय द्यावा. असे जर झाले तर आपल्या मुंबई शहरात १ लाख घरांची निर्मिती होईल आणि तो घरांचा साठा शासनाकडे येईल. इतकेच नव्हे तर एसआरएमध्ये हजारो कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होईल. म्हणून ही "विन विन्ड सिच्यूएशन" आहे.

श्री. मिहीर कोटेचा...

त्यामुळे आपण बिटक्वॉईन कि.टी.ची वाट न पाहता मुंबईचा विकास लक्षात घेऊन आपण यावर सकारात्मक विचार करुन निर्णय घ्यावा.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात मकान मालक आणि बिल्डर हे जुन्या इमारतीसंबंधी कट रचतात. महापालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत साटलोटं करुन एका जुन्या इमारतीला सी-१ कॅटॅगरीमध्ये घोषित करुन घेतात. मग एकदा का ती इमारत सी-१ म्हणजे धोकादायक इमारत घोषित झाली की साधारणपणे ६ महिने ते १ वर्षात महापालिका ती इमारत तेथील भाडेकरुना खाली करुन तोडून टाकतात. त्यामुळे आमचे १८० ते २०० फुटांच्या घरामध्ये २०-२०, ४०-४० वर्षापासून राहणारे मुंबईकर नागरिक रातोरात रस्त्यावर येतात. त्यानंतर हे बिल्डर आणि मकाल मालक त्यांना "ब्लॅकमेल" करतात. ते म्हणतात की, "आपल्याला जर घर हवे असेल तर भाडे मिळणार नाही. तसेच आपल्याला बांधकामाची किंमत ५ हजार रुपये प्रती चौरस फुट याप्रमाणे द्यावी लागेल नाही तर रहा रस्त्यवर." म्हणून लाचार व गरीब मुंबईकर या अटीला मान्यता देऊन करार करतो. आपण जर अशा पध्दतीने एखाद्या इमारतीला धोकादायक असल्याचे प्रमाणपत्र दिले आणि पुढे पुन:र्तपासणीमध्ये असे लक्षात आले की, त्या इमारतीची दुरुस्ती होऊ शकते आणि ते काम होऊ शकते, तसेच सदरचे प्रमाणपत्र मॅनेज होऊन घेतले असेल तर संबंधित बिल्डर, मकान मालक, महापालिका अधिकारी आणि आरसीसी कन्सल्टंट यांच्याविरुध्द आयपीसी अंतर्गत गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कारवाई करावी व जेलमध्ये टाकावे. भाडेकरु मुंबईकरांचे ब्लॅकमेलिंग बंद झाले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराला झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी व मुंबईमध्ये जो गरीब माणूस झोपडपट्टीमध्ये राहतो त्यांना संरक्षण देण्यासाठी शासनाने एसआरए योजना सुरू केली आहे. आपला मूळ हेतू मुंबईला झोपडपट्टी मुक्त करणे हा असताना तो बाजूला राहिला आणि आता आपले लक्ष उत्पन्न कसे वाढवावे याकडे केंद्रित झाले आहे. सन १९९५ मध्ये जेव्हा एसआरए योजना लागू झाली त्यावेळी आपण ४ ते ५ याप्रमाणे प्रिमियम आकारणी करीत होतो. आज आपण ५५ पेक्षा जास्त

श्री. मिहीर कोटेचा...

प्रिमियम आपण एका एसआरए योजनेमध्ये घेतो. झोपडपट्टी मुक्त मुंबई हे आपले उद्दिष्ट आता बाजूला ठेऊन आपले उत्पन्न कसे वाढेल, हे उद्दिष्ट ठेवले आहे.

अध्यक्ष महोदय, आज मुंबई महापालिकेच्या ७५ हजार कोटींच्या ठेवी आहेत. एसआरएच्या ठेवी देखील ३ हजार कोटींच्या झाल्या आहेत. म्हणून माझे निवेदन आहे की, गेल्या ३-४ वर्षात आपण जी नवीन प्रिमियमची आकारणी केली आहे त्यामध्ये शासनाने सूट द्यावी. कारण मुंबईकरांना त्यांच्या हक्काचे घर मिळाले पाहिजे.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. दीपक चव्हाण)**

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

श्री. चेतन तुपे (हडपसर) : अध्यक्ष महोदय, सर्वसामान्य माणसांना त्यांच्या हक्काचे घर मिळावे यासाठी सन १९६० साली म्हाडाचा कायदा अस्तित्वात आला. १० टक्केपेक्षा जास्त नफा न कमविता सर्वसामान्य माणसांना घर द्यावे अशा प्रकारची योजना त्या कायद्यात आणली. म्हाडाच्या घरांची लॉटरी काढली जाते हे आपल्या सर्वांनाच माहीती आहे. परंतु गिरणी कामगारांच्या घराबाबत लॉटरी काढण्यासाठी उशिर का होतो हा माझा प्रश्न आहे. कारण कोन, पणवेल येथे डिसेंबर, २०१६ मध्ये म्हाडाने २४१८ घरांची सोडत काढली ती गिरणी कामगारांसाठी होती. जानेवारी, २०२० मध्ये पूर्ण प्रक्रिया करुन ७०० च्या वर घरांची रक्कम म्हाडाकडे भरण्यात आली. मात्र या गिरणी कामगारांना अद्यापपर्यंत घराचा ताबा का मिळाला नाही, हा माझा प्रश्न आहे. आधी कोरोना रुग्णांसाठी ही घरे राखीव ठेवण्यात आली असे सांगितले गेले आणि आता दुरुस्तीचे कारण दिले जात आहे. त्यामुळे नक्की काय खरे आहे याची ही उलगडा झाला पाहिजे. म्हाडाची ही घरे गिरणी कामगारांच्या ताब्यात कधी देण्यात येणार आहेत, हे ही सांगितले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, त्यातीलच एक विषय आहे की, कल्याण-भिवंडी रस्त्यावर टाटा हाऊसिंग कंपनीने आणि विनय अग्रवाल या बिल्डरने गिरणी कामगारांसाठी बांधलेली २५०० घरे तयार आहेत. परंतु म्हाडा या घराची लॉटरी का काढत नाही, हा देखील माझा माननीय मंत्र्यांना प्रश्न आहे. म्हाडाच्या बाबतीत आता २.५ एफएसआय दिलेला आहे. ४० ते ५० वर्षापूर्वी पुणे शहरामध्ये म्हाडाच्या अनेक वसाहती बांधण्यात आल्या त्या चाळवजा आहेत. त्यामुळे आज त्या छोटया पडत आहेत.याचा पुनर्विकास झाला पाहिजे, अशी तेथील लोकांची मागणी आहे. हा पुनर्विकास होत असताना एक बेडरुम फ्लॅटधारक असेल तर त्याचे म्हणणे आहे मला दोन बेडरुमचा फ्लॅट मिळाला पाहिजे. तसेच तिथे पार्किंग आणि चांगल्या सोयीसुविधा मिळाल्या पाहिजे. परंतु आता आपण एक बाब लक्ष घेतली पाहिजे की, वाढीव एफएसआय दिला असला तरी एकात्मिक विकास नियंत्रण नियमावलीनुसार आता शहरामध्ये सर्वच जागी एफएसआय वाढलेला आहे. पुणे शहरामध्ये मेट्रो सुद्धा आलेली आहे आणि त्या झोनमध्ये ४ एफएसआय मिळतो. त्यामुळे आता या वाढीव २.५ एफएसआयची नवलाई विकासकांना राहिलेली नाही. एखादा प्लॉट शेजारी

श्री. चेतन तुपे....

असेल आणि त्यावर मेट्रो झोनमध्ये ४ एफएसआय मिळणार असेल तर म्हाडाच्या २.५ एफएसआयचे काय नवल आहे. यामुळे या नियमावलीमध्ये आता सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराची परिस्थिती वेगळी आहे. तिथे गाळे म्हाडाच्या ताब्यात दिल्या जातात. त्याच्या किंमती खूप प्रचंड आहेत की १० गाळे विकले तरी पुण्याच्या ५० गाळयाच्या बरोबर आहेत. त्यामुळे पुणे शहराचा पुनर्विकास करण्याचा विचार असेल तर त्याबाबत मी काही बाबी सुचवू इच्छितो. युडीसीआर प्रमाणेअसणारा एफएसआय दिला जाईल काय, यावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे अशी मी मागणी करीत आहे. त्याचप्रमाणे गाळे घेण्यापेक्षा विकासकाला प्रिमियम भरुन पीपी मॉडेलवर म्हाडाचा पुनर्विकास करायचा आहे तर या बांधलेल्या चाळी विकसित करता येतील काय ?

अध्यक्ष महोदय, पुण्यातील पुरग्रस्तांचा पुनर्विकास करणे सुद्धा महत्त्वाचे आहे. पाणशेतचे धरण फुटल्यानंतर पुण्यात पुरग्रस्तांना जागा देण्यात आली. या सर्व लोकांना ९९ वर्षाच्या भाडेकराराने जागा दिली होती. ती आता त्यांना मालकीची करुन देण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. सन १९७६ सालच्या रेडीरेकनरवर अल्प व्याज आकारुनत्या ठिकाणच्या नागरिकांना त्यांच्या भूखंडाची मालकी मिळणार आहे. पाणशेत येथील सर्व धरणग्रस्तांच्या वतीने मी सर्वप्रथम महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो व आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, टप्पा क्रमांक एक, २५०० स्क्वेअर फुट, टप्पा क्रमांक दोन २२०० स्क्वेअर फुट, टप्पा क्रमांक चार २००० स्क्वेअर फुट आणि टप्पा क्रमांक चार १२०० स्क्वेअर फुट असे प्लॉटचे चार टप्पे केले आहेत. यांचा पुनर्विकास करायचा असताना त्यांच्या जागेची मालकी झाली तरी खूप छोटे प्लॉट आहेत तर याच्या बाबतीत आपण क्लस्टर डेव्हलपमेंटसारखा पर्याय या नागरिकांना देणार काय ? क्लटर डेव्हलमेंट झाली तर जास्तीचा एफएसआय वापरता येईल. यामुळे पाणशेत धरणग्रस्तांना एवढया वर्षापासून जी वाट बघायला लावली तर महाविकास आघाडी

असुधारित प्रत

श्री. चेतन तुपे....

सरकारने त्यांच्या मालकीची जागा करुन दिल्यामुळे त्यांचा नक्की फायदा होईल. अवघ्या ७० हजार ते १.५ लाख रुपयांमध्ये त्यांना ही मालकी मिळणार आहे. त्यामुळे मी शासनाचे पुन्हा एकदा अभिनंदन करणार आहे.

अध्यक्ष महोदय, शेवटी मी एसआरएच्या विषयावर बोलणार आहे. ३०० स्क्वेअर फुटचे घर एसआरएधारकांना मंजूर केलेले आहे त्याबद्दल सर्व झोपडपट्टीवासियांच्या वतीने शासनाचे जेवढे स्वागत केले जाते तेवढे कमीच आहे. पुणे शहरामध्ये एसआरएच्या विषयाबाबत बोलत असताना मी सांगू इच्छितो की, शहर कोणते आहे किंवा तेथील भौगोलिक जागा कोणती आहे अशा अनेक घटकांवर एसआरएचे यश अवलंबून असते. दर एक किलोमीटर जागेचे भाव आणि मूल्य बदलत असते. त्यामुळे आज अनेक प्रकल्प रखडलेले आहेत. याचे कारण असे आहे की, विकासक त्याच्या टीडीआरचा कंपोनंट बघून त्याप्रमाणे काम करतो.

अध्यक्ष महोदय, मी पुणे शहरातील काही आकडेवारी सांगणार आहे. पुणे शहरात एकूण ४८६ आणि पिंपरी चिंचवडमध्ये ७१ अशी एकूण ५५७ झोपडपट्ट्यांची संख्या आहे. १ लाख ६५ हजार ६११ झोपडयांची संख्या आहे. त्यापैकी पिंपरी चिंचवडमध्ये ३५ हजार २६१ असून एकूण २ लाख ८७२ आहे. पुण्यातील झोपडपट्टीमध्ये ८ लाख ७२ हजार आणि पिंपरी चिंचवडमध्ये २ लाख ५५ हजार असे एकूण ११ लाख ७० हजार एवढे रहिवाशी राहतात. लोकसंख्येशी २८ टक्के प्रमाणात पुणे शहरात आणि १५ टक्के पिंपरी चिंचवडमध्ये असे दोन्ही शहराचे मिळून २५ लोक झोपडपट्टीमध्ये राहतात.

अध्यक्ष महोदय, एसआरएचा विषय खूप महत्त्वाचा आहे त्यामुळे आपण मला दोन मिनिटांचा वेळ द्या. आजपर्यंत २८५ प्रस्ताव दाखल झाले. परंतु फक्त ६७ प्रस्ताव पूर्ण झाले आहेत त्यातील ५१ ते ५२ पूर्ण झाले आहेत आणि १५ ते १६ प्रस्ताव अंशत: पूर्ण आहेत. ६ हजार ८२५ घरे पूर्ण बांधून झाली.४ हजार १६६ घरे अंशत: बांधून झाली आहेत. अशा प्रकारचे काम सुरु आहेत. बांधकाम सुरु असलेल्या ४४योजना आहेत. या माध्यमातून १७ हजार लोकांना घरे मिळणार आहेत. याचा

श्री. चेतन तुपे....

जर आपण एकत्रित विचार केला तर आपल्याला अशी परिस्थिती दिसते की, सन २००५ पासून सन २०२२ पर्यंत १११ प्रकल्प पूर्ण किंवा सुरु अवस्थेत आहेत आणि १० हजार ९९१ लोकांना घरे मिळाले आणि १७ हजार ८५१ लोकांची प्रतिक्षेत आहेत. याचा अर्थ प्रत्यक्षात २ लाखापेक्षा जास्त आहेत. याला जर वेग द्यायचा असेल तर यामध्ये सुधारण करणे गरजचे आहे. तो विकासक कमी एफएसआय बांधत आहेत. एसआरएची योजना करीत असताना झोपडपट्या आहेत तेवढीच टेनामेंट बांधली जाते आणि तो त्याचा टीडीआर घेऊन बाहेर जातो. परंतु जागा वाढून मिळणार नाहीत कारण शासनाच्या जागा तेवढयात आहेत. त्यामुळे मुंबईच्याधर्तीवर करण्यात यावे.

अध्यक्ष महोदय. मुंबईमध्ये असा फरक आहे की, इथे ५१ टक्के तर पुण्यामध्ये ७० टक्के लोकांची संमती लागते. मुंबईमध्ये उंचीची बंधन नाही पण पुण्यामध्ये ४० मीटर उंचीचे बंधन घातले जाते. त्याचप्रमाणे पुण्यामध्ये एफएसआयचे बंधन आहे तर मुंबईमध्ये नाही. त्यामुळे मुंबईमध्ये असणारे चांगले नियम पुण्याच्या एसआरएला सुद्धा लागू केले पाहिजे. अध्यक्ष महोदय, मी एक उदाहरण देतो. पुण्यामध्ये एक झोपडपट्टी विकसित होत आहे. त्या झोपडपट्टीची घनताच कमी आहे परंतु शासकीय प्लॉट प्रचंड आहेत. त्यामुळे शासनाला २५टक्के भरलेले आहेत. तिथे जी+२, जी+३ ची इमारत बांधली जाते परंतु तिथे जी+२० ची इमारत बांधली जाऊ शकते. असे जर केले जर संपूर्ण झोपडपट्टी २५ टक्के जागेमध्ये बसेल आणि उरलले अतिरिक्त घरे शासनाला मिळतील आणि इतर प्रकल्पबाधितांना देता येतील.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. चेतन तुपे .....

मला असे वाटते की, यामध्ये लवकरात लवकर सुधारणा करावी. जानेवारी, २०२२ मध्ये पुण्याची नियमावली दाखल झाली असून ती लवकर मंजूर झाली तर पुण्याच्या एसआरएला चालना मिळेल. येथील विकासकांवर बंधन घातले पाहिजे की, त्यांनी पूर्ण एफएसआय वापरला पाहिजे. त्यांनी जर पूर्ण एफएसआय वापरला व एमआयजी, एलआयजी करिता घरे बांधली तर शहरात अतिरिक्त घरे मिळू शकतील. यामुळे पुण्याच्या विकासाला चालना मिळेल.

अध्यक्ष महोदय, आपण सस्टेनेबल गोलचा विचार करुन जिनिव्हा करार केलेला आहे. यामध्ये भारताने सन २०३० पर्यंत सर्व झोपडपट्टीवासीयांना घरे देण्याचे मान्य केले आहे. पुण्याच्या एसआरएला नवसंजीवनी दिली तर हा विकास करता येईल. माझ्या सूचना ऐकून घेतल्या, त्या बद्दल माननीय मंत्री यांचे आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद

--------

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष** : दुपारी ३.०० वाजता माननीय मंत्री यांचे उत्तर आहे. यामुळे सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात मुद्दे मांडावेत.

श्री. रविंद्र वायकर ( जोगेश्वरी –पूर्व ) : अध्यक्ष महोदय, नियम २९३ अन्वये या ठिकाणी मुंबई शहर, मुंबई उपनगर या संबंधी चर्चा उपस्थित करण्यात आली असून या चर्चेत भाग घेण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई ही मायानगरी आहे, ती कष्टकरी माणसांची आहे. मुंबईला इतिहास आहे. मुंबईतील एसआरए, फनेल, मोडकळीस आलेल्या इमारतींचा विषय आहे. सन १९६० मध्ये मुंबईत औद्योगिक क्रांती झाली. येथे मिल्स अनेक आल्या. येथे काम करण्यासाठी महाराष्ट्रातून अनेक लोक उद्योगधंद्यासाठी मुंबईत आले. येथे १-२ -३ मजल्याच्या चाळी बांधल्या गेल्या. आज सन २०२२ सुरु आहे. मुंबई शहरात पूर्वी मिल कामगार होते. त्यांच्याकरिता खानावळ पद्धत सुरु झाली. एका खोलीत १०-१० लोक राहायची. ते रस्त्यावर झोपायचे. अशा वेळी रामन राघव यांची एन्ट्री झाली. फुटपाथवर, रस्त्यांवर झोपणारे जे लोक होते ते उपनगरामध्ये घरांकरिता जाऊ लागले. यामुळे पूर्व व पश्चिम उपनगरात लोकसंख्या वाढू लागली. अशा प्रकारे मुलुंड पर्यंत पूर्व उपनगर व वांद्रे पासून दहिसर पर्यंत बृहन्मुंबई तयार झाली.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहराचे अनेक प्रश्न आहेत. मोडकळीस आलेल्या इमारतींचे प्रश्न सोडवण्याकरिता मागील वेळी ८ आमदारांची समिती तयार केली. मालकी हक्क असणाऱ्या उपकर प्राप्त इमारतींबाबत काय निर्णय घ्यावा या बाबत समितीने सखोल अभ्यास केला. या समितीला दोनदा मुदतवाढ देण्यात आली. मालक असतील तर त्यांनी आपल्या इमारतीचा विकास केला नाही तर त्यांना ६ महिन्यांचा अवधी द्यावा. या ६ महिन्यांमध्ये त्यांनी विकास केला नाही तर तेथील गृहनिर्माण संस्थेने विकास करावा. त्यांनी देखील ६ महिन्यांत विकास केला नाही तर म्हाडाने विकास करावा. असा ८ आमदारांच्या समितीने निर्णय केला. पावसाळी अधिवेशन, २०२० मध्ये सदनाने यास मान्यता दिली. या नंतर माननीय राज्यपाल

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर....

यांनी मान्यता दिली. या नंतर आताच असे सांगण्यात आले की, राष्ट्रपती यांच्याकडे ते विधेयक गेले असून त्यांच्याकडून निर्णय होणे गरजेचे आहे. आपल्याला असे करायचे असेल तर सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार आपण देखील प्रयत्नशील राहणे हे मुंबईच्या विकासाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईचा विकास करताना प्रामुख्याने संक्रमण शिबिरे बांधणे गरजेचे आहे. माझ्याकडे आकडेवारी आहे. मुंबई बेटावर अस्तित्वात असलेल्या १९ हजार ६४२ इमारतींना उपकर लागू केला आहे. अधिनियम १९७६ च्या कलम ८४(१) अनुसार त्याचे वर्गीकरणही केले आहे. यामध्ये अ,ब,क असे केले होते. आता आपण सरसकट घेतो. ३० वर्षापूर्वीची इमारत असेल तर ती पुनर्विकासाकरीत घेऊ शकतो. मूळ उपकर प्राप्त इमारतींची संख्या१६ हजार ५०२ होती. सध्याची संख्या १२ हजार २५७ आहे. सुरुवातील १९ हजार ६४२ इमारती उपकरप्राप्त होत्या. या आपल्याला विकसित करायच्या असतील तर संक्रमण शिबिर बांधणे गरजेचे आहे. मुंबईमध्ये त्यावेळी देखील संक्रमण शिबिर बांधले होते. शहरात तात्पुरत्या निवासाची सोय करण्यासाठी ४० संक्रमण शिबिरे बांधली होती. यामध्ये २२ हजार ६३४ गाळे होते. ८ हजार ४४८ अनधिकृत घुसखोर गेले होते. या बाबत आपल्याला निर्णय घ्यायचा आहे. ८ आमदारांच्या समितीने तेव्हा निर्णय घेतला होता की,यासाठी कोणती योजना तयार करावी. जे मूळ रहिवासी होते त्यांना ट्रान्सफर केले होते. संक्रमण शिबिर ऐवजी मूळ इमारत बांधली असेल तर तेथे त्यांना घर मिळणे क्रमप्राप्त असते. मात्र काही लोक जर तेथे गेले नसतील व अजूनही संक्रमण शिबिरमध्ये राहत असतील तर त्यांना घरकुल दिले पाहिजे. या संक्रमण शिबिराचाही विकास होणे गरजेचे आहे. या लोकांना राहण्यास घर दिले पाहिजे. काही लोकांनी संक्रमण शिबिरामधील घरे विकले असतील तर त्यांनाही घर दिले पाहिजे. घुसखोरांकरिता एक योजना तयार केली पाहिजे. त्यांना बांधकामाच्या माध्यमातून घरकुल देऊ असा त्यावेळी निर्णय घेण्यात आला होता. एवढया मोडकळीस आलेल्या इमारतींचा

श्री. रविंद्र वायकर ....

विकास करण्याकरिता बीपीटीच्या १०० एकर जागा मिळाली तर आपण तेथे तात्पुरते संक्रमण शिबिर बांधू शकू. या संबंधी माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांना दि. ८.९.२०१७ रोजी मी पत्र दिले व मागणी केली होती. दक्षिण मुंबईत संक्रमण शिबिराची आवश्यकता आहे. अनेक इमारती धोकादायक झालेल्या आहेत. यामुळे संक्रमण शिबिर बांधणे गरजेचे आहे. म्हणून बीपीटीची १०० एकर जमीन दिली तर तेथे संक्रमण शिबिरे बांधता येतील. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार आपण याचा फॉलो अप घेतला पाहिजे, लक्ष घातले पाहिजे. माननीय मंत्री तर या करिता लक्ष देतीलच.

अध्यक्ष महोदय, नियम ३३ (५) अंतर्गत म्हाडाच्या जागेवर इमारतीचे बांधकाम करतो. नियम ३३(६) अंतर्गत मोडकळीस आलेल्या व आग लागलेल्या इमारतींचे बांधकाम केले जाते. नियम ३३ (७) अंतर्गत उपकर प्राप्त इमारती व नॉन सेस इमारतींचा विकास केला जातो. नियम ३३(९) अंतर्गत क्लस्टर डेव्हलपमेंट केले जाते. नियम ३३(६), ३३(७), आणि ३३(९) या माध्यमातून म्हाडाच्या इमारतींचा विकास केला जातो.

यानंतर श्रीमती गिरप...

श्री.रविंद्र वायकर ...

मी मागच्या वेळेस देखील हा विषय उपस्थित केला होता की, माझ्या येथे पीएमजीपी कॉलनी आहे. त्या पीएमजीपी कॉलनीबाबत मंत्री महोदय आपण एक महिन्यामध्ये बैठक लावू असे सांगितले होते. ती बैठक झाली नाही. परंतु, आपण ती लावावी. आपण त्यावेळेस असे सांगितले होते की मे.एलोरा प्रोजेक्ट कन्सल्टंट या कंपनीची नेमणूक झालेली आहे. सदर कंपनीचा अहवाल दि.२७.१०.२०२१ रोजी म्हाडाला सादर केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाच्या नगरविकास विभागाने दि.२८.२.२०२२ रोजीच्या सूचनेद्वारे मुंबई शहरातील ३८८ इमारतींबाबत निर्णय घेतला होता. विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे. परंतु, प्रस्तावितामध्ये त्यांनी जो प्रोत्साहनपर चटई क्षेत्र निर्देशांक दिलेला आहे, तो खाजगी विकासकांनी पुनर्विकास केल्यास...

( माननीय तालिका सभाध्यक्ष बेल वाजवतात )

अध्यक्ष महोदय, हा महत्वाचा विषय आहे. त्यांना ३० ते ५० टक्के निर्देशांक देण्यात येईल, म्हाडाने केल्यास ५० ते ८० टक्के प्रमाणे त्यांना चटईक्षेत्र देण्यात येईल. परंतु, ६६ इमारतींच्या बाबतीत त्यांनी जो निर्णय केला आहे, त्याच्या अनुषंगाने म्हाडा जर ते करणार असेल तर ५० ते ८० टक्के अशा पध्दतीने प्रोत्साहनपर चटईक्षेत्र मिळणार आहे. प्राईम मिनिस्टर ग्रँड प्रोजेक्ट अंतर्गत माझ्या विभागातील अंधेरी येथील पुनम नगरच्या बाबतीत आपण त्या नियमाच्या आधारे तो निर्णय घेतला तर बरे होईल असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील फनेल झोनच्या बाबतीतील अत्यंत महत्वाचा विषय आहे. यामध्ये एअरपोर्ट ... या फनेल झोनच्या बाबतीत ३ कि.मी.ची रेडिअस आहे. या ३ कि.मी.च्या रेडिअसमध्ये हा फनेल झोन म्हणजे बफर झोन निर्माण झालेला आहे. हा बफर झोन निर्माण झाल्यामुळे फक्त पार्ले ईस्ट-वेस्ट नाही, सांताक्रुझ ईस्ट-वेस्ट नाही, कुर्लाच्या तिकडचा येतो व चेंबुरच्या बाजूचा भाग त्याठिकाणी,

श्री.रविंद्र वायकर ...

कुर्ला व घाटकोपरच्या येथील भाग येतो. जोगेश्वरीचा अर्धा भाग येत आहे. जोगेश्वरी मेघवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीपर्यंत तो येत आहे. ज्या ज्या वेळेस एसआरएने निर्णय दिले, त्या एसआरएच्या निर्णयाच्या बाबतीत त्यांनी इमारत बांधून झाली, रिहॅबची इमारत बांधून झाली. सेलची इमारत बांधायला गेल्यावर त्यांना असे सांगण्यात आले की, तुमचे त्या ३ कि.मी. च्या परिघात येत आहे. तुम्ही रिहॅबच्या इमारतीचा वरचा एक मजला काढूनच टाका. ... (अडथळा)... ते तुम्ही करायचे आहे. सिव्हिल एव्हिएशन हा केंद्राचा विषय आहे. ... (अडथळा)... महानगरपालिकेपासूनचे सन १९९२ पासून ते माझे सहकारी आहेत.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील उपनगरामध्ये इंटरनॅशनल व डोमेस्टिक विमानतळ आहे. मी आता ३ कि.मी.च्या रेडिअसबाबतचा विषय सांगितला. मुंबई शहरातील पहिले विमानतळ सन १९३२ ते सन १९६० पासून ..... ते नानावटी हॉस्पिटलच्या समोर होते. त्यानंतर सन १९४५ मध्ये दुसरे महायुध्द झाले. त्यावेळेस ब्रिटिश शासनाने जपानने आपल्यावर हवाई हल्ला करु नये यासाठी एक विमानतळ केले. त्याचेच नाव आपण आता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असे केले आहे...(अडथळा)... अध्यक्ष महोदय, माझे ९ ते १० विषय आहेत. मला पूर्ण बोलावयाचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : सन्माननीय सदस्य आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये देखील मुंबईचा विषय आहे. त्यावेळेस आपण आपले विचार मांडावेत. आता आपल्याला मंत्री महोदयांचे उत्तर ३ वाजता घ्यायचे आहे.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, जे लोक त्या फनेल झोनमध्ये, बफर झोनमध्ये आलेले आहेत, त्यांचे बांधकाम होत नाही. त्यांचे बांधकाम आपल्याला करायचे असेल तर, माझी सूचना आहे, जसा इतर ठिकाणी बांधकामाला त्यांना त्या पध्दतीचा एफएसआय मिळतो तसा यांना दिला जात नाही. यांना त्या पध्दतीचा

श्री.रविंद्र वायकर ...

एफएसआय द्या. त्या पध्दतीचा एफएसआय त्यांना दिल्यानंतर त्यांची आता जेवढी हाईट आहे, तेवढे ते बांधू शकतील. बाकीचा टीडीआर रुपाने त्यांनी जर बांधून घेतला...

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर आपण आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, ८-९ मिनिटांमध्ये माझे सर्व मुद्दे मांडून होणार नाहीत. काल आपण प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्याकरिता अर्धा तास दिला होता.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण पुढच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना आपले राहिलेले विषय मांडावेत. आता सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर आपण आपल्या भाषणास सुरुवात करावी.

......

असुधारित प्रत

ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या चर्चेमध्ये मी माझे मत मांडण्याकरिता व सहभागी होण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आपण महाराष्ट्रातील मुंबई, पुणे अशा प्रमुख शहरांशी निगडित असणाऱ्या समस्यांवर आज येथे चर्चा करणार आहोत. माझ्या मते त्यातील एक सर्वात महत्वाची व अत्यंत कठीण समस्या म्हणजे मोडकळीस आलेल्या इमारतींची समस्या आहे. आज मुंबई महानगरपालिकेच्या डिझास्टर मॅनेजमेंटच्या डेट्यानुसार सन २०१८ ते सन २०२१ या दरम्यान १८१० इमारती कोसळल्या आहेत. त्याच प्रमाणे ९९ लोकांचा यात बळी गेलेला आहे आणि ३७६ लोक गंभीर जखमी झालेले आहेत.

अध्यक्ष महोदय, आजच्या स्थितीत मुंबईत किमान ५०० इमारती या अत्यंत धोकादायक परिस्थितीत आहेत. प्रत्येक पावसाळी अधिवेशनामध्ये किमान २ इमारती कोसळल्याची माहिती आपण सभागृहात माहितीच्या मुद्दयाद्वारे मांडतो. या कोसळणाऱ्या इमारतींमध्ये जे लोक मृत्युमुखी पडतात त्याचे कारण केवळ शासनाकडून आणि आपल्याकडून होणारे दुर्लक्ष हे असते. या संपूर्ण मृत्यूंकरिता मला असे वाटते की, कल्पेबल होमिसाईड देखील कमी आहे. या सर्व मृत्यूंकरिता आपण सर्व राज्यकर्ते, शासन जबाबदार आहे. आपण म्हाडामार्फत ३ हजार प्रती चौ.फुटांची जी मर्यादा होती ती वाढवून ४ हजार केली आहे. ती कमी आहे. परंतु, ही वाढीव अमाऊंट आज इमारत दुरुस्तीकरिता उपलब्ध नाही.

अध्यक्ष महोदय, आपण पाहिले तर डिफेन्स एनओसीचा एक मोठा मुद्दा आहे. कुलाब्या सारख्या ठिकाणी जेथे नेव्ही नगर सारख्या आस्थापना जवळ आहेत तेथे २०० मीटर पर्यंत आपण कोणतेही बांधकाम करु शकत नाही. या २०० मीटरमध्ये अनेक मोडकळीस आलेल्या इमारती आहेत. त्यांची दुरुस्ती होऊ शकत नाही. कारण डिफेन्स एनओसी नाही.

अध्यक्ष महोदय, मी राज्य शासनाकडे, नगरविकास विभागाकडे विनंती करतो की, त्यांनी त्वरित केंद्र शासनाशी संपर्क साधून या विषयावर तोडगा काढून ज्या मोडकळीस आलेल्या इमारती असतील त्यांच्या दुरुस्तीकरिता एक एक्सेप्शन केंद्र

ॲड.राहुल नार्वेकर ....

सरकारकडून प्राप्त करावे. आपण पाहिले तर म्हाडामध्ये संक्रमण शिबिरे उपलब्ध नसल्याने नोटिस दिल्यानंतरही बरेच भाडेकरु घरे रिकामी करीत नाहीत. कारण आपण त्यांना ट्रॅन्झीट अकोमेडेशन देऊ शकत नाही. हे ट्रॅन्झीट अकोमेडेशन वाढविण्याची अत्यंत गरज आहे.

अध्यक्ष महोदय, कुलाबा संक्रमण शिबिरात गेल्या ७ वर्षांपासून ७ मजल्यांच्या ४ इमारती तयार झाल्या. परंतु, त्या इमारतींना ३ मजल्यापासून ७ मजल्यापर्यंत ओ.सी. नसल्यामुळे त्यामध्ये ऑक्युपेशन होऊ शकत नाही. आपण त्या इमारती रिकाम्या ठेवलेल्या आहेत. एका बाजूला अपघात होत आहेत. इमारती कोसळत आहेत. लोकांचे जीव जात आहेत. दुसऱ्या बाजूला आपण या ट्रॅन्झीट ॲकोमेडेशन मध्ये तयार झालेल्या इमारती रिकाम्या ठेवत आहोत. आपण त्या लोकांना देऊ शकत नाही.

अध्यक्ष महोदय, कुलाब्यातील सुमारे २१० इमारती मोडकळीस आलेल्या असल्यामुळे ४० वर्षांपूर्वी निष्कासित केल्या गेल्या होत्या. ४० वर्षांपासून म्हणजे १९८० पासून संक्रमण शिबिरात ते लोक राहत आहेत. त्यांच्यासाठी या ७ मजली इमारती तयार झाल्या आहेत. परंतु, आपण त्या वापरु शकत नाही. ऑक्युपेशन देऊ शकत नाही. कारण म्हाडाने अजून त्याची ओ.सी. प्राप्त केलेली नाही, ओ.सी. दिलेली नाही.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी या एरियाची प्लॅनिंग ऑथॉरिटी एमएमआरडीए असताना म्हाडाने हीच विनंती केली होती की, या इमारती बांधताना सीसी म्हणजे कमेन्समेंट सर्टिफिकेट सन २००८ च्या आधी दिले होते. त्यामुळे ओ.सी. देण्यास कोणतीही अडचण नाही.

नंतर श्री.शिंदे ...

ॲड.राहुल नार्वेकर...

आता म्हाडा प्लानिंग अथॉरिटी झाल्यानंतर त्यांनी त्यांचे मत बदलले आहे. त्यामुळे आता ओसी न दिल्यामुळे या सगळ्या दनिका रिकाम्या राहिल्या आहेत. शासनाने या प्रकरणी त्वरीत लक्ष घालून कुलाबा संक्रमण शिबिरातील इमारतींना ताबडतोब ओसी द्यावी. आपण त्या भागातील लोकांना ४० वर्षापासून मालकी हक्काच्या घरापासून वंचित ठेवले आहे, त्यांना त्वरीत त्यांची घरे मिळवून द्यावेत.

अध्यक्ष महोदय, मुंबई उपनगरांमध्ये एनए टॅक्स हा सुल्तानी टॅक्स लावण्यात आला होता. त्याच पद्धतीने मुंबई शहरामध्ये कलेक्टर टॅक्स वसूल करण्यात येतो. नरिमन पॉईंट, कफ परेड, मरीन ड्राईव्ह येथील संपूर्ण जमीन कलेक्टर लॅण्ड असून ती Occupants यांना लीजवर देत असताना बाजार भावानुसार सर्व Lease Premium collect करण्यात आला होता. सदरहू भागामध्ये भराव टाकण्यापूर्वी समुद्र होता. तेथे डी-मार्केशन करुन प्लॉट विकासीत करण्यासाठी दिले होते. विधान भवन, ओबेरॉय हॉटेल, बख्तावर इमारत, मित्तल कोर्ट, मित्तल टावर, या भागात रेक्लमेशन करुन सर्व इमारती विकासकाने स्वत: बांधल्या आहेत. तरीही आज या भागातील सदनिका हस्तांतरित करण्यात येतात त्यावेळी जिल्हाधिकारी त्यांचेकडून खरेदी किंमतीच्या/बाजार भावाच्या २ टक्के Premium recover करतात. शासनाने वन टाईम पेमेंटची पॉलिसी मध्यंतरी आणली होती, conversion from tenure 2 to tenure 1. त्याकरिता वसूल करण्यात आलेली Premium ची रक्कम खूप अधिक होती. एवढी रक्कम देणे या भागातील सामान्य व्यक्तींना शक्य नव्हते.

अध्यक्ष महोदय, कुलाबा विधानसभेच्या ए वॉर्डमध्ये निवासी लोकसंख्या १३ लाख इतकी आहे, परंतु या भागामध्ये रोज ४८ लाख लोक येतात. या भागामध्ये विधान भवन, मंत्रालय, पोलीस मुख्यालय, मुंबई उच्च न्यायालय, स्टॉक एक्स्चेंज इत्यादी कार्यालये आहेत. भारतातील काही उद्योगांचे प्रमुख केंद्र या विधानसभा मतदारसंघात आहेत. त्यामुळे या मतदारसंघावर खूप ताण येतो. त्यामुळे केंद्रामध्ये ज्याप्रमाणे National Capital Region तयार करण्यात आला आहे त्या धर्तीवर कुलाबा विधानसभेला State Capital Region जाहीर करुन नियोजनासाठी अधिक निधीची तरतूद करावी, अशी माझी शासनाला विनंती आहे.

ॲड.राहुल नार्वेकर...

अध्यक्ष महोदय, नरिमन पॉईंट ते वडाळापर्यंत बीपीटी लॅण्डचा खूप इश्यू आहे. या जागेवर मोठ्या संख्येने मोडकळीस आलेल्या इमारती आहेत. बीपीटीकडून ना-हरकत मिळत नसल्याने त्यांचा पुनर्विकास करणे शक्य होत नाही. बीपीटीची लॅण्ड पॉलिसी तयार आहे. राज्य शासनाने या प्रकरणी हस्तक्षेप करुन लॅण्ड पॉलिसी तयार करण्यासाठी योग्य ते सहकार्य केले पाहिजे, त्यासाठी बीपीटीकडे मागणी केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एसआरए हा निफ्टी किंवा बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज सारखा ट्रेडींग प्लॅटफॉर्म झाला आहे. माझ्या मतदारसंघामध्ये किमान १६ झोपडपट्ट्या आहेत. त्यामध्ये एलओआय ५ ते १५ वर्षापूर्वी दिला आहे.... (अडथळा)... दोन रद्द करण्यात आले आहेत. डीफेन्सची ना-हरकत नसल्याने आंबेडकर नगर येथील रद्द करण्यात आला आहे. तो त्यांना द्यावयास नको होता. सदरहू १६ झोपडपट्ट्यांपैकी एकाही झोपडपट्टीच्या पुनर्विकासाचे काम मागील १५ वर्षापासून झाले नाही. प्रत्येक झोपडपट्टीचे किमान दोन विकासक बदलले गेले आहेत. first come first basis असल्याने दुसऱ्याला देता येत नाही. विकासक लॉग-ईन करुन आरक्षण करुन ठेवतात. लॉगीन झाल्यानंतर एलओआय देण्यात येतो त्यानंतर तो विकासक दुसऱ्या विकासकाला ती जागा विक्री करतो.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, हा प्रस्ताव चर्चेला आला त्यावेळी यावर भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय सदस्य काल त्यांची मते मांडणार होते. त्यांचे काल संख्याकाळी २-३ सन्माननीय सदस्य सभागृहात होते. शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर व श्री.मंगेश कुडाळकर हे दोघेच बोलणार होते. हा प्रस्ताव मुंबईचा असल्याने या भागातील सन्माननीय सदस्यांना यावर बोलण्यासाठी संधी देण्यात यावी. या प्रस्तावाचे उत्तर देण्यास दुपारी तीन किंवा सव्वा तीन वाजता सुरुवात करण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर यांचे २-४ मुद्दे मांडावयाचे राहिले आहेत. त्यासाठी त्यांना पुन्हा संधी देण्यात यावी. कारण सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य बोलण्याचे राहिलेले नाहीत.

ॲड.राहुल नार्वेकर : अध्यक्ष महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री यांनी सांगितले की, प्रत्येकाला आपली महत्त्वाची भूमिका मांडावयाची आहे, ती त्यांना मांडू द्यावी. त्यापूर्वी माझे भाषण पूर्ण होऊ द्यावे.

ॲड.राहुल नार्वेकर...

अध्यक्ष महोदय, या राज्यासाठी सन २०१२ मध्ये मॅन्ग्रोव्हज् सेल निर्माण करण्यात आला. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या सन २००५ मधील निर्णयानुसार जेवढे मॅन्ग्रोव्हज् आहेत त्यांना रिज्युव्हीनेट करण्याची जबाबदारी शासनाला दिली होती. मॅन्ग्रोव्हज् वर मागील २० वर्षापासून झोपडपट्ट्या आहेत. शासनाने झोपडपट्ट्यांना सन २००० पर्यंत व त्यानंतर सन २०११ पर्यंत संरक्षण दिले आहे. या मॅन्ग्रोव्हज् वर रिज्युव्हीनेशन करणार असाल तर त्या भागामध्ये राहणाऱ्या झोपडपट्टीधारकांची सोय केल्याशिवाय मॅन्ग्रोव्हज् मधील त्यांच्या झोपड्या हटविणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या विरुध्द असेल. मॅन्ग्रोव्हज् वरील झोपड्यांची पर्यायी व्यवस्था केल्याशिवाय त्या हटवू नयेत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

------------

असुधारित प्रत

श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) : अध्यक्ष महोदय, सत्ताधरी पक्षाने म.वि.स.नियम २९३ अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, म्हाडाचा विस्तार तालुकानिहाय करण्यात यावा, अशी माझी मागणी आहे. ग्रामीण भागामध्ये घरकुल, सदनिका यांची खरेदी केल्यास प्रधान मंत्री आवास योजनेंतर्गत २.५ लाख रुपये देण्यात येतात. आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून १.५ लाख रुपये देण्यात येतात. आदिवासी विकास योजनेतील शबरी घरकुल योजनेचे १.५ लाख रुपये, प्रधान मंत्री आवास योजनेचे २.५ लाख रुपये मिळून ४ लाख रुपये होतात व विभागाच्या माध्यमातून आणखी १ लाख रुपये दिले तर ५-६ रुपये रकमेचे चांगले घरकुल मिळेल. जव्हार, मोखाडा, विक्रमगड, पालघर, तलासरी यांचेसह पुणे व मुंबईतही आदिवासी समाजाचे लोक वाईट परिस्थितीत राहतात. उक्त योजनेतून जिल्हास्तरावर राहणारे आदिवासी, नव बौद्ध, मागासवर्गीय समाजातील या दुर्बल घटकांतील लोकांना म्हाडाच्या माध्यमातून घरे बांधून दिली पाहिजेत. त्यासाठी एक चांगली योजना तयार करता येईल. सदरहू घरांचे बांधकाम म्हाडाच्या माध्यमातूनच करण्यात आले पाहिजे. कारण आपण लाभार्थींच्या खात्यावर पैसे देतो, ते लोक कुठे तरी मजुरीच्या कामाला जात असतात. त्यामुळे उक्त घरे टाईप प्लॅन करुन योजनेच्या माध्यमातून बांधून देण्यत यावीत, अशी माझी आग्रही मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

----------

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सत्ताधरी पक्षाने म.वि.स.नियम २९३ अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर मी यापूर्वी मुद्दे मांडले आहेत. माझे काही मुद्दे मांडावयाचे राहिले होते. त्यासाठी आपण परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, फनेल झोनसाठी इतरांप्रमाणे एफएसआय देण्यात येत नाही. फनेल झोनमधील इमारतींच्या पुनर्विकासाचा खर्च भरुन निघण्यासाठी आजच्या अधिकृत बिल्डअपच्या आधारे टीडीआर देण्यात यावा. जेणेकरुन आज त्या भागात राहत असतील तेवढेच नागरीक नवीन इमारतींमध्ये राहू शकतील आणि विकासक टीडीआरच्या माध्यमातून इतर भाग विकसीत करेल.

अध्यक्ष महोदय, भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या व वर्षानुवर्षे प्रतिक्षेत असलेल्या इमारतींचा भोगवटा प्रमाणपत्राांबाबत क्षमापित करण्यासाठी निर्णय घेणे, हा एक मुद्दा आहे. मुंबई शहर व मुंबई उपनगरांतील अनेक इमारतींमध्ये एफएसआय, स्ट्रक्चरल, शुल्क न भरणे, अग्निशमन विभागाची एनओसी नसल्यामुळे व्हायलेशन होते.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.रविंद्र वायकर........

अशा अनेक कारणाने इमारतींना ओ.सी. मिळत नाही. विकासक बांधकाम करतो, विकासकाकडे ओ.सी. नसताना देखील संबंधित लोकांना इमारतीमध्ये राहण्यास विकासक परवानगी देतो. पुन्हा घर मिळणार नाही या भीतीपोटी लोक त्या इमारतीमध्ये राहायला जातात. ओ.सी. असल्याशिवाय कोणत्याही इमारतींना किंमत येत नाही. अशा प्रकारच्या अनेक समस्यांचा विचार करुन राज्य शासनाने दिनांक १ मे २०१७ पासून महारेरा कायदा लागू करण्यात आलेला आहे. महारेरा कायदा अस्तित्त्वात येण्यापूर्वी मोफा, त्यानंतर एओए, त्यानंतर एमएचए कायदा लागू होता. महारेराच्या अगोदर जेवढ्या इमारती असतील त्या सर्व इमारतींसाठी क्षमापित धोरण आणणे अत्यंत आवश्यक आहे. त्या प्रकारे तसे धोरण आणावे जेणेकरून सदर इमारतींचा पुनर्विकास करताना अडचणी येणार नाहीत. आता डिम कन्व्हेन्स देखील झालेले आहे. यामध्ये प्रामुख्याने संबंधितांकडे पेपर्स मागण्याची गरज नाही. २५-२५ वर्षापासून सदर इमारती आहेत. संबंधित लोक तेथे राहत आहेत. त्यांच्याकडे रेशन कार्ड्स आहेत. डिम कन्व्हेन्सचे धोरण आणले होते, त्या पद्धतीने डिम कन्व्हेन्स करण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, एकदा बांधकाम झाल्यांनतर तुम्ही पुन्हा पुन्हा अकृषिक कर कसा लावू शकता. त्यामुळे तो कर रद्द करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पाच मुख्यमंत्री होऊन गेले तरी देखील धारावी पुनर्विकास झालाच नाही. धारावी हा २३९ हेक्टरचा परिसर आहे. या भागात १० लाख लोक राहतात. या भागामध्ये २० हजार लघुउद्योग आहेत. वर्षाकाठी या ठिकाणी १ अब्ज डॉलरची उलाढाल होत असते. यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांकडून खूप अपेक्षा आहेत. धारावीच्या विकासाबाबत प्रामुख्याने निर्णय घेणे महत्त्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, म्हाडाचे थकित शुल्कासाठी अभय योजना आणणे अत्यंत गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.मंगेश कुडाळकर यांनी त्याबाबीसाठी उपोषण देखील केलेले आहे. म्हाडासाठी अभय योजना आणावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.रविंद्र वायकर........

अध्यक्ष महोदय, वांद्रे येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करावा, अशी त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांची मागणी आहे. २० ते २५ वर्षापासून शासकीय वसाहतीमध्ये संबंधित लोक राहत आहेत. वसाहतीचा पुनर्विकास व्हावा यासाठी तेथील रहिवाशांनी मुख्यमंत्री महोदयांना पत्रव्यवहार केलेला आहे, तसेच त्यांची भेट देखील घेतलेली आहे. याबाबतीत निर्णय होणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, रखडलेल्या SRA च्या बाबतीत अनेक कारणे आहेत. यामध्ये Annexure 1, Annexure 2 व Annexure 3 होते. त्यातील Annexure 2 पात्रता सिद्ध करण्यासाठी असते. पात्रता सिद्ध केल्यानंतर काही लोक तशीच अपात्र राहतात. त्यांनी तीन महिन्यांच्या कालावधीत आपली पात्रता सिद्ध करणे अत्यंत गरजेचे असते. ते आपण करत नाहीत. Annexure 3 च्या बाबतीमध्ये सांगायचे म्हणजे ज्यावेळेला एखादा विकासक सबमिशन करतो त्यावेळेला त्याची आर्थिक स्थिती बरोबर नसेल आणि तो सबमिशन करणार असेल, गावोगाव भटकून SRA योजना विकायला काढणार असेल तर यावर बंधन येणे गरजेचे आहे. Annexure 1 आणि Annexure 3 हे एकत्र असणे प्रामुख्याने महत्त्वाचे आहे.

अध्यक्ष महोदय, सन १९९५ मध्ये SRA योजनेला मान्यता दिलेली आहे. त्यावेळी सन १९९५ पर्यंतच्या झोपडपट्ट्या पात्र करण्यात निर्णय घेण्यात आला. त्यानंतर त्यामध्ये वाढ करुन सन २००० पर्यंतच्या झोपपट्ट्या पात्र करण्यात निर्णय घेण्यात आला होता. त्या निर्णयामध्ये पुन्हा सुधारण करुन सन २०२१ पर्यंतच्या झोपडपट्ट्या पात्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परंतु या झोपडपट्ट्यांना सशुल्क भरण्याबाबत अट घातलेली आहे. आता सशुल्क कोणी भरावे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. काल सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी सांगितले की, सदर सशुल्काची रक्कम संबंधित विकासकानी भरावी. परंतु माझे असे म्हणणे आहे की, कायद्याने सन १९९५ चे सन २००० केले नंतर सन २०११ पर्यंत म्हणजे सेन्सस च्या वर्षापर्यंत आपण आलो आहे. त्यांचे कडुन कन्स्ट्रक्शन प्राईस घेऊन केले तर ते तयार होतील. त्यामुळे एसआरए योजना एक्स्पीडाईट करता येतील.

श्री.रविंद्र वायकर........

अध्यक्ष महोदय, म्हाडाच्या लेआऊटमधील आरक्षण मुंबई महानगरपालिकेला तत्काळ हस्तांतरित करण्यात यावेत. त्यामध्ये PG असतील, RG असतील हॉस्पिटल असतील अनेक वर्षापासून प्लॉट असतात. सदर प्लॉटवर अनधिकृत बांधकाम होतात. म्हणून ते तत्काळ हस्तांतरित करण्यात यावेत, अशी मी विनंती करतो आणि मी माझे संपवितो. धन्यवाद.

-----------

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार (वांद्रे-पश्चिम) : अध्यक्ष महोदय, आमच्या मतदारसंघातील महत्त्वाचे विषय असल्यामुळे आम्ही ते मांडणार आहोत. परंतु ते ऐकण्यासाठी माननीय गृहनिर्माण मंत्री उपस्थित नाहीत व नगर विकास मंत्री देखील उपस्थित नाहीत. या दोन्ही विभागावर विशेष चर्चा सुरु आहे. तरी देखील दोन्ही विभागाचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील दोन-तीन प्रश्न मांडून दोन-तीन प्रकरणांबाबत माहिती देणार आहे. माझ्या मतदारसंघामध्ये नगर भू क्रमांक १०७, १२४, १२५ बांद्रा A या भूखंडावर प्लानिंग अथॉरिटी MMRDA कडून सदर भूखंडावर सुपर स्पेशालिटी कॅन्सर हॉस्पिटलच्या आरक्षणाचा प्रस्ताव BMC कडे सादर केलेला आहे. परंतु BMC कडून अद्याप उत्तर आलेले नाही. माननीय मंत्री महोदयांनी त्याबाबत उत्तर दिले तर योग्य होईल.

अध्यक्ष महोदय, SRA च्या योजनांबाबत या सदनातील दोन्ही बाजूचे सदस्य बोलले. या योजनेतील Annexure 3 चा मुद्दा आताच सन्माननीय सदस्य श्री.रविंद वायकर यांनी मांडला आहे. आपल्याला Annexure 3 म्हणजे आर्थिक स्थिती याकडे यासाठी लक्ष द्यावे लागेल की, आता हळूहळू अंडरवर्ल्डचा पैसा SRA च्या डेव्हलपमेंटमध्ये यायला लागलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामधील SRA मध्ये सिमला हाऊस आहे. मुकेश तलरेजा, त्यांचे बंधू गुल तलरेजा, या गुल तलरेजा याची मुलगी रिंकू देशपांडे यांना हवाला केसमध्ये इकबाल मिर्ची बरोबर रिकू देशपांडेला पकडण्यात आले. मुकेश तलरेजा याने रिंकू देशपांडेच्या इनव्हेस्टमेंटची SRA स्कीम ज्याला ईडीने समन्स केले आहे. सिमला हाऊसची SRA स्कीम २ हजार कोटी रुपयांची आहे. त्यामध्ये अंडरवर्ल्डचा पैसा वापरला जातो आहे. याबाबतचे सर्व पेपर्स मी आपल्याला देतो. या विषयाची आपण चौकशी करावी, अशी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, ईडीचे नाव घेतल्यावर खूप चर्चा होते. या विषयावर मंत्री महोदय, ईडीवर मोर्चा काढावा. आम्ही तुमच्याबरोबर येऊ. मुंबई शहरातील ज्या योजनेमध्ये विकासक जेलमध्ये गेले आहेत, ईडीने, सिबीआयने उचलले आहेत, त्या

असुधारित प्रत

ठिकाणच्या रिहॅबच्या लोकांना घरे मिळाली नाहीत. ते ट्रान्झिट कॅम्पमध्ये आहेत. यामध्ये नसलेले काही लोक भाड्यावर आहेत. विकासकाने भाडे देणे बंद केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या हातामध्ये दिनांक १५ जानेवारी २०२१ चे SRA चे पत्र आहे. ते ईडीच्या सहाय्यक संचालकाला पत्र लिहून रेराची इमारत बांधण्यासाठी परवानगी मागत आहेत.

अध्यक्ष महोदय, ईडीचा मुद्दा बरोबर आहे. चौकशी करण्यासाठी चार गोष्टी लागणार आहेत. परंतु रिहॅब भाग पुर्ण करायला सरकारने काहीतरी योजना केली पाहिजे. किमान त्यांचे भाडे दिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे दुसरे पत्र यश बँकेचे आहे. बांद्रा रेक्लेमेशनच्या नित्यानगर योजनेमध्ये विकासकाने यश बँकेकडून ७५० कोटी रुपये नेले, आता ईडी त्याची चौकशी करीत आहे. विकासक जेलमध्ये आहे. यश बँक म्हणते आमचा अधिकार आहे. लोकांना, गरिबांना भाडेही मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, या विषयावर ईडीकडे चला, तुमची साथ द्यायला आम्ही तयार आहोत. इतर विषय तुम्ही तुमचे निपटून घ्या.

अध्यक्ष महोदय, या प्रकरणामध्ये सुद्धा सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस काळामध्ये फनेल झोन या विषयाला गती मिळाली. जे फनेल झोनमध्ये राहत आहेत, त्यांचा पुनर्विकास होऊ शकत नाही. एका निश्चित मर्यादेच्या उंचीच्यावर ते जाऊ शकत नाहीत म्हणून त्यांचा पुनर्विकास अडकला आहे. ते जर फनेलच्या झोनमध्ये नसते तर त्यांना जो FSI मिळाला असता तेवढयाचा TDR त्यांना देण्यात यावा, असा आम्ही प्रस्ताव दिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सरकार बदलले की जनहिताची भूमिका कशी बदलते याचे हे उदाहरण आहे. त्या काळात वेगळा DCR बनवायला सुरूवात झाली, ३३(७) CA

ॲड.आशिष शेलार........

आणि मुंबई एअरपोर्ट पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर अफेक्टेड झोन, सदर झोनमध्ये पुनर्विकासाला लागणारा निधी, एवढेच नव्हे तर पर्यायी घरे जी भाड्यावर राहायला लागतील त्याची किंमत पकडून तरतूद करण्यात येत होती. पण आता फनेल झोनचा फालुदा झोन करून टाकला गेलेला आहे. या सरकारचा जो प्रस्ताव आहे, केवळ जो ३५ टक्के फंजीबल आम्हाला मिळणारच होता,

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार..

संपूर्ण इमारत पुनर्विकसित होण्यासाठी माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कार्यकाळात जी भूमिका घेतली होती त्याप्रकारे तेवढा टीडीआर मिळण्याची भूमिका घेतली पाहिजे, असे माझे म्हणणे आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात एचआयजी फेज – ३ च्या सात इमारती आहेत. युनेस्को वांद्रे रेक्लेमेशन एचआयजी फेज १ व फेज ३ च्या २३ इमारती आहेत. तसेच म्हाडाच्या फेज १, फेज २ आणि फेज ३ अशा सर्व इमारतींच्या कन्व्हेअन्सचा प्रश्न प्रलंबित आहे. मी याबबत वारंवार बैठक घेत आहे. तो प्रस्ताव अंतिम टप्प्यामध्ये आहे. मंत्री महोदयांनी यबाबत बैठक घेऊन कन्व्हेअन्सचा विषय मार्गी लावावा. वांद्रे ट्रान्झिट कॅम्पच्या विकासाबाबत माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी धोरण तयार केले होते. याद्वारे सर्वांना घरे मिळणार होते. परंतु याबाबतची नस्ती मागील अडीच वर्षापासून प्रलंबित आहे. यात कोण विकासक आहे, काम करणारे कोण आहेत, ही नस्ती पुढे का जात नाही, याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, रामकृष्ण नगर, खार येथील ले-आऊट म्हाडाचा आहे. याबाबत एमआयजी ते एलआयजी असे रुपांतर करण्याबाबतची नस्तीही प्रलंबित आहे. म्हणून रामकृष्ण नगर येथील विकासही थांबलेला आहे. याबाबत मंत्री महोदयायंनी उत्तर दिले आहे. मोतीलाल नगर, गोरेगाव येथे सीडीए केले आहे. ही बाब अतिशय चांगली आहे. वांद्रे रेक्लेमशनचा माझ्या मतदारसंघातील सर्व भाग म्हाडाचा आहे. तेथे अशाच प्रकारे सीडीए करण्यात येणार आहे काय ? तेथील निवासी गाळाधारकांना दुप्पट किंवा तिप्पट जागा दिली जाणार आहे काय ? तेथे १०० फुटाच्या घरामध्ये राहणाऱ्यास ३०० फुटाचे घर किंवा जागा मिळत असेल तर त्यासाठी आमचा होकार आहे. याबाबतच्या प्रस्तावाची माहिती मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये द्यावी.

अध्यक्ष महोदय, वांद्रे ट्रान्झिट कॅम्पच्या नागरिकांना सेवा शुल्काची नोटीस देण्यात आली आहे. मंत्री महोदयांनी तेव्हा याबाबत बैठक घेतली होती. सेवा शुल्काचे व्याज त्यांनी माफ केले होते व सेवा शुल्क भरण्यासाठी सवलत दिली होती.

ॲड. आशिष शेलार..

असे असतानाही तेथील लोकांना नोटीस दिल्या जात आहेत. याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद !

-------

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्य श्री. रईस शेख यांना विनंती करतो की, त्यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर आपले मत मांडावे. त्या प्रस्तावावर बोलण्यासाठी सन्माननीय विरोधी पक्षनेते यांचे भाषण झाल्यानंतर प्राधान्याने आपणास बोलण्यासाठी संधी दिली जाईल. आता माननीय मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी उत्तरास सुरुवात करावी.

असुधारित प्रत

डॉ. जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९३ अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनिल प्रभू, योगेश सागर, अमिन पटेल, झिशान सिद्धीकी, ॲड. पराग आळवणी, श्री मंगलप्रभात लोढा, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. सदानंद सरवणकर, प्रकाश सुर्वे, मिहिर कोटेचा, चेतन तुपे, रविंद्र वायकर, अमित साटम, सुनिल भुसारा आणि ॲड. आशिष शेलार या सर्वांनी आपापले बहुमूल्य मत मांडले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांनी त्यांच्या भाषणात मुंबई शहराची महती आणि मुंबई शहराचे निर्माण याबाबत माहिती दिली होती. यात कष्टकऱ्यांचे योगदान त्यांनी अधोरेखित केले आहे. मी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या शब्दात एवढेच सांगू इच्छितो की, "पृथ्वी म्हणजेच मुंबई, ही शेष नागाच्या मस्तकावर तरली नसून ती कष्टकऱ्यांच्या व श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे. "

अध्यक्ष महोदय, मी या चर्चेच्या माध्यमातून एक घोषणा करणार आहे. माझ्या माहिती प्रमाणे जागतिक दर्जावर मुंबईतले कोणते ठिकाण असेल तर ते कामाठीपुरा हे आहे. येथे जवळपास २०० ते ३०० वर्षापूर्वीचे घरे, चाळी आहेत. येथे अतिशय छोट्या जागेमध्ये, घरांमध्ये लोक आजही राहत आहेत. ते कशा प्रकारे राहत आहेत, ते देवालाच माहिती. कामाठीपुऱ्याचा इतिहास जगासमोर काय आहे, हे मला माहित नाही. परंतु या कामाठीपुऱ्यास सर्वात आधी लाल बाजार म्हणून ओळखले जात असे. कामाठीपुरा नाव म्हटले की लोक शंकेने पाहत असतात. याची कारणे वेगवेगळी आहेत. या इतिहासाचा कोणीतरी अभ्यास केला पाहिजे. मुंबईतील पिला हाऊसचे नाव प्ले हाऊस आहे. परंतु अपभृंशाने किंवा मुंबईच्या भाषेत त्याला पिला हाऊस म्हटले जाऊ लागले. आता ते याच नावाने ओळखले जाते. कामाठीपुरा सुरुवातीला दलदलीचा भाग होता. मुंबईच्या रेक्लेमेशनवर तेव्हा जोर द्यावयाचा होता. मुंबईचे जे मालक होते त्यांना मुंबईचे सात बेटं हुंड्यामध्ये मिळाले होते. त्या बेटांची जोडणी करावयाची होती. तेव्हाच्या काळात मुंबईमध्ये कष्टकरणारे अधिक लोक नव्हते. तेव्हा मुंबईची लोकसंख्या कमी होती. तेव्हाच्या काळात ९ ते १० लोक अस्तित्वात होते. तेव्हा ब्रिटीशांनी शोध घेऊन तेलंगाणातून कामाठी लोक येथे आणले व येथील

डॉ. जितेंद्र आव्हाड ....

भागामध्ये त्यांना जागा दिली व त्यांनी तेथे घरे बांधली. तेव्हापासून या भागाला कामाठीपुरा या नावाने ओळखले जाते. या कामाठी लोकांचे मुंबईतील बांधकामामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. रेल्वे स्टेशन, मुंबई महानगरपालिका व परिसरातील सर्व इमारती गॉथिक स्ट्रक्चरने बांधल्या आहेत. या इमारती बांधण्यामागे त्या कामाठ्यांचे हात होते. आज कामाठीपुरा येथे १ ते १५ गल्ली, ९४३ उपकर प्राप्त इमारती, पुनर्रचित इमारती ११, एकूण भाडेकरु ८ हजार ३४४ आहेत. प्रस्तावित क्षेत्रफळ २७.९१ एकर आहे. या सर्वांचा कलम ३३(९) अंतर्गत विकास करण्यात येत आहे. याकरिता म्हाडा नोडल एजन्सी आहे. याकरिता स्पेशल प्लॅनिंग ॲथोरिटी म्हणून घोषित केले जाणार आहे. कामाठीपुरा प्रमाणेच मुंबई उपनगरातील दाटीवाटीच्या क्षेत्रातील मिन्नत नगर व उमरखाडी या प्रकल्पांचाही विकास केला जाणार आहे. माझ्याकडे कामाठीपुरा येथील विकास आराखडा आहे. तो तयार आहे.पुढील तीन महिन्यामध्ये येथील कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी गृहनिर्माण मंत्री झाल्यापासून कोकण मंडळामध्ये ८ हजार ९८४ सदनिकांची लॉटरी काढण्यात आली होती. त्यामध्ये १:२७ असे प्रमाण होते. पुणे मंडळामध्ये ९ हजार ८२२ सदनिकांची लॉटरी काढण्यात आली होती. त्यामध्ये १:२० प्रमाण होते. औरंगाबाद शहरात ८६४ सदनिकांची लॉटरी काढण्यात आली होती. त्यामध्ये १:१० असे प्रमाण होते. मिल वर्कर्स येथे १ हजार ४०४ घरांची लॉटरी काढण्यात आली असून त्यास १:४ असे प्रमाण होते.

अध्यक्ष महोदय, म्हाडा प्रिमियमबाबत मी बोलणार आहे. सन २०११ ते सन २०२१ पर्यंत १,९०२ कोटी रुपये प्रिमियमचे जमा झाले होते. सन २०२१ ते सन २०२२ पर्यंत विभागाने १,८७३ कोटी रुपयांचे प्रिमियम जमा केले आहे. मला सांगण्यास आंनद वाटतो की, दहा वर्षात जेवढा प्रिमियम जमा झाला तेवढा प्रिमियम माझ्या विभागाने एका वर्षात जमा केला आहे. याबाबत मी माझ्या विभागाच्या अधिकाऱ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांच्यामुळे गृहनिर्माण विभाग वेगाने पुढे जात आहे.

डॉ. जितेंद्र आव्हाड.....

अध्यक्ष महोदय, मागील दहा वर्षात ५९८ ऑफर लेटर दिली आहेत. सन २०२१-२२ मध्ये ४१८ ऑफर लेटर दिले गेले. हे सर्व अभिनंदनीय आहे. गृहनिर्माण विभागाने ज्या योजना तयार केल्या आहेत, त्यामध्ये विभागाचे सचिव, अध्यक्ष, मुंबई मंडळाचे अध्यक्ष, आर.आर. बोर्डाचे अध्यक्ष या सर्वांचे यात योगदान आहे.

यानंतर श्री. चौधरी ...

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड....

अध्यक्ष महोदय, मुंबईच्या या प्रस्तावावर जेवढे सन्माननीय सदस्य बोलले त्या सर्वांनीच एसआरए चा उल्लेख केला. मागील पाच वर्षांमध्ये एसआरए ने १५१ एलओ जारी केले होते तर मागील वीस महिन्यांमध्ये ९१ एलओ जारी केले आहेत. तसेच मागील पाच वर्षांमध्ये ४१२ रिव्हाइज्ड् एलओआय व मागील वीस महिन्यांमध्ये ४९१ जारी करण्यात आले. मागील पाच वर्षांमध्ये एकूण ५६३ तर मागील वीस महिन्यांमध्ये ४८२ जारी करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, मागील पाच वर्षांमध्ये ७२ हजार ६७५ झोपडया मंजूर करण्यात आल्या तर मागील वीस महिन्यांमध्ये १ लाख ५९ हजार ४३९ झोपडया मंजूर करण्यात आल्या. गृहनिर्माण विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी खरोखरच अतिशय कौतुकास्पद काम केले आहे, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, कामाठीपुरा नंतर सर्वात महत्त्वाचा विषय बीडीडी चाळीचा आहे. अनेक वर्षे बंद असलेल्या बीडीडी चाळीच्या कामाला सुरुवात होईल की नाही असे वाटत होते. अशा वेळी माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे आणि मी तेथील चाळकऱ्यांशी अनेक वेळा संवाद साधला. आता तेथील विकास योजना पूर्णपणे कार्यान्वित झाली असून काम सुरु झाले आहे. तेथे किती गाळे आहेत किंवा इतर सविस्तर माहिती मी आता देणार नाही. परंतु सर्वात कौतुकास्पद बाब म्हणजे २५ वर्षांपूर्वी सुरु झालेल्या योजनेच्या कामास आज प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. पुढील सहा-सात वर्षांमध्ये हे पुनर्विकासाचे काम पूर्ण होईल व मुंबईची पूर्ण स्कायलाईन बदलेल याचा मला निश्चितपणे आनंद आहे.

अध्यक्ष महोदय, मी आज या ठिकाणी एक महत्त्वाची घोषणा करीत आहे. या चाळींना लोक १०० वर्षांपासून बीडीडी चाळी म्हणून ओळखत होते. आता तेथे नव्याने नगर निर्माण केले जात असल्यामुळे त्याचे नामकरण केले पाहिजे. १८०, १२० स्क्वे. फुटांच्या घरात राहणाऱ्या तेथील लोकांना आता ५०० स्क्वेअर फुटांचे घर दिले जाणार आहे. त्याची किंमत किती आहे हे मला या ठिकाणी सांगायचे नाही. परंतु जे लोक शंभर-शंभर वर्षे तेथे राहिले, ज्यांचा घाम तेथे गळाला,

डॉ.जितेंद्र आव्हाड....

जेथे अनेक चळवळी झाल्या, अनेक संघर्ष झाले ही देखील बीडीडी चाळींची एक वेगळी ओळख आहे. या बीडीडी चाळींचे नामकरण आपण करत आहोत. बीडीडी वरळी चाळींचे बाळासाहेब ठाकरे नगर, बीडीडी नायगाव चाळींचे शरद पवार नगर आणि ना.म.जोशी बीडीडी चाळींचे राजीव गांधी नगर असे नामकरण करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, सिध्दार्थ नगर, गोरेगाव, पत्रा चाळ पुनर्विकासाच्या मुद्दयावर मी बोलत आहे. मी गृहनिर्माण खात्याचा ताबा घेतल्यानंतर जॉनी जोसेफ समितीची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्यासोबत आम्ही अनेक बैठका घेतल्या व ६७२ पुनर्वसन सदनिकांची वर्कऑर्डर रेलिकॉन नावाच्या कंपनीला दिली. येत्या सुमारे २ वर्षांमध्ये हे ६७२ सदनिकाधारक तेथे राहण्यास जाऊ शकतील. एचडीआयएल ने वाटलेले सर्व प्लॉटस् ताब्यात घेण्याच्या तयारीत म्हाडा असून त्यासाठीची कायदेशीर लढाई आम्ही लढत आहोत. लॉटरीद्वारे काढलेली ३०६ घरे देखील बांधून देण्याच्या तयारीत म्हाडा आहे व ती दिली पाहिजेत अशी आमची भूमिका आहे. हा प्रकल्प देखील गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून बंद होता. आता याचे काम सुरु झाले असून म्हाडा या पत्रा चाळीला अत्यंत वेगाने न्याय देत आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे तेथील एका भाषणावेळी या चाळीच्या नावावरुन म्हणाले होते की, "पत्रा चाळ पत्रा चाळ काय लावले आहे..." परंतु यापुढे पत्रा चाळीला सिध्दार्थ नगर म्हणून ओळखले जाईल, अशी मी घोषणा करतो.

अध्यक्ष महोदय, थकल्या-भागल्या गरिबांना निवारा देणे हे म्हाडाचे काम आहे. यातूनच सामाजिक जाणिव जागी होते. लहानपणापासूनच परळला जाताना टाटा कॅन्सर हॉस्पिटलपासून जाण्याचा योग यायचा. टाटा कॅन्सर हॉस्पिटल हे कॅन्सरवरील भारतातील सर्वात उच्च दर्जाचे रुग्णालय आहे. बिहार असो किंवा केरळमधील व्यक्ती असो त्याच्या कॅन्सरचा आजार सर्वोच्च टप्प्यावर गेल्यानंतर एकच आशेचा किरण असतो आणि तो म्हणजे टाटा कॅन्सर हॉस्पिटल. अशा रुग्णांसाठी आपण काही करु शकतो का यावर मी खूप विचार केला.

डॉ.जितेंद्र आव्हाड....

शेवटी निर्णय घेतला की, दुसरे काही करता आले नाही तरी हरकत नाही किमान आपण त्यांच्यासाठी १०० खोल्या तरी देऊ. बॉम्बे डाईंग परिसरातील एका इमारतीमध्ये आम्ही १०० खोल्या कॅन्सर हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी ठेवलेल्या आहेत. या खोल्यांच्या चाव्या त्यांना सुपूर्त केल्या असून लोक तेथे राहण्यासाठी येत आहेत.

अध्यक्ष महोदय, तळिये, रायगड येथे दिनांक २२ व २३ जुलै रोजी अतिवृष्टी होऊन दुर्घटना घडली. मी त्याच्या दुसऱ्या दिवशीच घोषणा केली की, तळिये गावाची पुनर्बांधणी म्हाडाकडून करण्यात येईल. आज रोजी यासंदर्भातील सर्व औपचारिकता पूर्ण झाल्या आहेत. आम्ही तेथील प्रत्येक कुटुंबाला ६०० स्क्वे. फुटांचे घर देणार आहोत. त्यामध्ये सोलार पॅनेल, पाण्याची टाकी, सेप्टिक टँक, रेन वॉटर हार्वेस्टिंग, पाणी पुरवठा पाईपलाईन अशा सर्व बाबींचा समावेश असून त्यासाठी म्हाडाने सध्या ५२ कोटी रुपये तरतूद केलेली आहे. या कामाची वर्क ऑर्डर देखील देण्यात आली आहे. या घरांचे संकल्पचित्र मी सभागृहाला दाखवू इच्छितो. (मंत्री महोदय घरांचे संकल्पचित्र दाखवितात.) आम्ही गावकऱ्यांना केवळ विटा व पत्र्यांची खराब होणारी घरे देणार नसून अतिशय चांगल्या दर्जाची ही घरे असतील. सामाजिक जाणीव म्हणून महाविकास आघाडी सरकारतर्फे ही घरे बांधून दिली जाणार आहेत. येत्या जून महिन्यापर्यंत ही घरे ताब्यात देण्याचा माझा प्रयत्न आहे. आता ही घरे तयार आहेत. आता केवळ त्या गावामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर उभे करायचे आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये गेल्या पन्नास-साठ वर्षांपासून शासनातर्फे व खासगीरित्या देखील होस्टेलची निर्मिती झालेली नाही. परंतु राज्यभरातून आणि देशातून मुंबईमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांना राहण्यासाठी जागा मिळत नाही. आम्ही याचा विचार करुन सामाजिक जाणिवेतून होस्टेलची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी आम्हाला काळा चौकी, परेल, शिवडी येथे चांगला भूखंड मिळाला.

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड....

गरीब, मराठी विद्यार्थ्यांना राहण्याची चांगली सोय व्हावी यासाठी आम्ही तेथे १९ मजल्यांची इमारत बांधत आहोत. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा या इमारतीमध्ये असतील. २४ महिन्यांच्या कालावधीत या इमारतीचे काम पूर्ण करण्यात येईल. बांधकामासाठी १९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या इमारतीचे संकल्पचित्र मी सभागृहाला दाखवू इच्छितो. (मंत्री महोदय इमारतीचे संकल्पचित्र दाखवितात.) केवळ खोटी आश्वासने न देता सर्व प्रक्रिया पूर्ण करुन आम्ही हे काम सुरु केलेले आहे. गृहनिर्माण विभाग सदर काम लवकरात लवकर पूर्ण करुन विद्यार्थ्यांच्या ताब्यात देईल अशी मी या ठिकाणी ग्वाही देतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.भारती लव्हेकर आणि श्रीमती मनिषा चौधरी यांनी वर्किंग वुमेन्स होस्टेलची मागणी केली होती. आपण येथून चौपाटीवर जाऊन वरच्या बाजूला पाहिले तर ट्विन टॉवर दिसतात. ते नेमके मलबार हिलमध्ये आहेत की कुठे आहेत हे कळत नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, ते ताडदेव येथे आहेत. या टॉवरच्या बाजूला एक ट्रान्झिट कॅम्प होता. तेथे ३२ कोटी रुपये खर्च करुन ९२८ महिला राहू शकतील असा प्रकल्प आपण करीत आहोत. त्याचा प्लॅन आम्ही तयार करुन तो पास देखील झाला आहे. सदर ठिकाणी वैद्यकीय सुविधेसह सर्व बाबी उपलब्ध असतील. सदर होस्टेलचे संकल्पचित्र मी आपणास दाखवू इच्छितो. (मंत्री महोदय होस्टेलचे संकल्पचित्र दाखवितात.)

यानंतर श्री.धुमाळे.....

श्री. जितेंद्र आव्हाड..

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांनी खूप चांगले मुद्दे मांडले आहेत. त्यांचा याबाबत अभ्यासही चांगला आहे. आपण आजकाल बघतो की ज्यांची मुले अमेरिकेत आहेत. खासकरुन आपण कोविडच्या संकटात हे अनुभवले आहे. ज्यांची मुले अमेरिकेमध्ये होती आणि ज्यांचे आईवडिल येथे काही झाले तर कोणी मदत करायला जात नव्हते. प्रेत उचलायलाही कोणी जात नव्हते. म्हणजे माणुसकी नावाची चीज लोक विसरली होती, असे मी स्पष्टपणे म्हणतो. त्यावेळी कोण मदतीला आले आणि काय झाले, त्यावर मी काही बोलत नाही. पण तेव्हापासून एक मागणी येत आहे की, म्हाडाने कुठे तरी निसर्गरम्य अशा ठिकाणी "ओल्ड एज होम" बांधावे आणि तेथे म्हाडाने पूर्णपणे हॉस्पिटॅलीटी स्वीकारावी. ती खाजगी कंपनीला चालवायला द्यावी आणि तेथे आजी आजोबांना चांगले राहण्याचे ठिकाण निर्माण करावे. मी पालघर येथील जागा बघितली आहे. तेथील जिल्हाधिकारी यांच्याशी मी बोललो. तेथे जाऊन आलो आहे. तेथे जर आपल्याला २० एकर चांगली जागा मिळाली तर शासन एक चांगले "ओल्ड एज होम" सामाजिक जाणिवेतून बांधले जाईल. म्हणजे ते विकले जाईल. पण महाराष्ट्रात पहिल्यांदा एक "ओल्ड एज होम" शासनातर्फे बांधू.

अध्यक्ष महोदय, लिलावती हॉस्पिटलच्या बाजूला एक ११२५ चौरस मिटरचा भूखंड आहे. त्यावर पशुवैद्यकीय रुग्णालयाचे डीपी आरक्षण आहे. डीसीपीआर ३३ (२) नुसार तेथे ५ चा एफएसआय लागू आहे. त्या भूखंडाचे ५६२५ चौरस मिटर इतके क्षेत्रफळ होते. त्यासंबंधी स्वारस्य असणाऱ्यांकडून आवेदने मागविण्यात आली आहेत. तेथे जागतिक दर्जाचे पशुवैद्यकीय रुग्णालय लिलावती रुग्णालयाच्या बाजूला मध्य वस्तीमध्ये उभारले जाईल. जोगेश्वरी येथे एका रुग्णालयाचा भूखंड आहे. तो भूखंड ८८५९ चौरस मिटर इतक्या क्षेत्रफळाचा आहे. पश्चिम उपनगरामध्ये वैद्यकीय सुविधा देण्यासाठी रुग्णालये कमी पडतात आणि पश्चिम उपनगरामध्ये लोकसंख्या देखील वाढत जाणार आहे. सध्या हा भूखंड म्हाडाच्या ताब्यात आहे. त्यासंबंधी आम्ही स्वारस्य असणाऱ्यांकडून आवेदने मागविली आहेत. जागतिक

असुधारित प्रत

श्री. जितेंद्र आव्हाड..

दर्जाचे रुग्णालय तेथे निर्माण होईल आणि मुंबईकरांची सेवा आमच्या महाविकास आघाडी सरकारच्या हातून होईल, असे मी जाहीर करतो.

अध्यक्ष महोदय, म्हाडाची इमारत सन १९६९ मध्ये उभारली गेली होती. आज त्या इमारतीचे वय ५२ वर्षे झाली आहे. त्या इमारतीची जागा पाहिली तर ती अत्यंत प्रॉमिनन्ट जागा आहे. जवळपास १० लाख चौरस फूटाचे बांधकाम होईल इतके क्षेत्रफळ तेथे उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या म्हाडा इमारतीचा पुनर्विकास केला जाईल आणि एक आयकॉनिक इमारत मुंबईच्या ओपिंगला म्हणजे जेव्हा पश्चिम उपनगरातून मुंबईकडे जातो तेथे अत्यंत मोक्याच्या जागेवर ही इमारत आहे. त्या इमारतीचे अत्याधुनिक बांधकाम आपण लवकरात लवकर उभे करु. सन्माननीय सदस्य श्री. अमित साटम आणि इतरांनी मुंबईतील म्हाडाच्या जमिनी अनेकांकडून ताब्यात घेतल्या जात असल्याचे नमूद केले. मुंबईतील म्हाडाच्या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होत आहेत. तसेच काही जमिनी शेजारील विकासकांकडून हडप केल्या जात आहेत. त्यावर उपाय म्हणून यापुढे त्यांचे संरक्षण करण्यासाठी खाजगी सुरक्षा कंपनीला अधिकार दिले जातील आणि मुंबईतील सर्व म्हाडा प्लॉटला कुंपण घालून त्या जमिनींचा बचाव केला जाईल. या अनुषंगाने मी जॉनी जोसेफ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे ती खासकरुन रोमेल नावाच्या एका विकासकाकडून आपल्या जागा वाचविण्यासाठी केली. कारण या रोमेल नावाच्या विकासकाने म्हाडाचा अडीच ते तीन एकरचा भूखंड गिळला असा माझा अंदाज आहे. त्याने कोणी काही काम दिले असले तरी आमचा निश्चय पक्का आहे की, त्याने घशात घातलेली प्रत्येक जमीन त्याच्या घशातून काढून घेऊ आणि त्यामुळे जॉनी जोसेफ यांची समिती नेमली आहे. ते आम्हाला त्यावर कारवाई करण्यासाठी अहवाल देतील.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये पीएमजेपीच्या ६६ वसाहती आहेत. पण त्या ज्या डेन्सीटीमध्ये आहेत त्या डेन्सीटीचा विचार केला तर त्या भागाचा कोणी पुनर्विकास करेल, असे मला वाटत नाही. या मुंबईतील उमरखाडीमध्ये ९, ईराणी चाळ, लोअर

असुधारित प्रत

श्री. जितेंद्र आव्हाड..

परेलमध्ये काही आहेत, पिंपळेश्वर, करीरोडमध्ये ५, प्रभाकर नगर, माझगावमध्ये ५, बकरीअड्डा येथे ४, मरीन लाईन्स येथे ३ इमारती आहेत. त्यांच्या मागण्या पाहिल्या तर मला त्यांचा पुनर्विकास होणे अशक्य वाटते. कारण त्यांच्या बाबतीत निर्णय घेऊन पीएमजेपीला किती द्यायचे हे ठरवावे लागेल. कारण त्यांची घरे अत्यंत छोटी म्हणजे १८० किंवा १२० चौरस फुटांची आहे. त्यांना किती जागा द्यायची हे निश्चित करुन पीएमजेपीचा विकास केला पाहिजे. पण काही ठिकाणी काही विकासकांनी या पीएमजेपीच्या इमारती आपल्या ताब्यात घेऊन ठेवल्या आहेत. जसे मुलूंडमध्ये टाटा आणि रुचा डेव्हलपर नावाचे एक प्रकरण आहे. तसेच सांताक्रुझ यांच्या मतदार संघात चतुर्वेदी नावाच्या व्यक्तीने एक इमारत घेऊन ठेवली आहे. पण यामध्ये सर्वात जास्त कौतुक करायचे असेल तर ते सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांचे करावे लागेल. कारण त्यांनी नुसती लक्षवेधी मांडून किंवा तक्रार करुन त्यांची भूमिका न मांडता मला डेव्हलपमेंटचा प्लॅन सबमिट केला आहे. शासन त्यांच्या डेव्हलपमेंट प्लॅनला मान्यता देऊन उमदखाडीचा विकास सुरू करु.

अध्यक्ष महोदय, डीसीपीआरमध्येही काही सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यामधील ३३ (५), ३३(७), ३३(९) मध्ये सुधारणा करुन पुनर्विकास प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. म्हाडा वसाहतींमधील अंतर्गत पुनर्विकासाचे बांधकाम सुरू करताना पूर्वी टेनन्ट आणि विकासकाचा करारनामा होत होता. आता तसे होणार नाही. आता म्हाडा, टेनन्ट आणि विकासक यांचे संयुक्त ॲग्रीमेंट होईल. त्यामुळे विकासकाला कोणालाही फासविता येणार नाही. म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पांना चालना देण्याकरिता अधिमुल्यात दिनांक १३.१२.२०२१ पर्यंत ५० टक्के सूट प्रदान करण्यात आली होती. या शासन सवलतीत ४१८ पुनर्विकासाच्या सहकारी संस्थांनी लाभ घेतला आणि म्हाडाला त्यातून जवळपास १९०० कोटी रुपये मिळाले.

अध्यक्ष महोदय, डीसीपीआर ३३ (९) मध्ये क्लबिंगला मान्यता देऊन कामाठीपुरासारखे क्लस्टर डेव्हलपमेंट करता येईल. या माध्यमातून माझी सर्व मुंबईकर सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, मुंबई जर आपल्याला विकसित

श्री. जितेंद्र आव्हाड..

करायची असेल तर क्लस्टरशिवाय पर्याय नाही.  त्यामुळे आपण सर्वांनीच हा क्लस्टरचा मार्ग स्वीकारुन आपापल्या भागामध्ये एकमत केले तर म्हाडा आपल्याला नक्की सहकार्य करेल आणि त्या सहकार्यातून आपल्याला एक नवीन मुंबई उभारता येईल.  जशी आम्ही कामाठीपुरामध्ये करण्याचा प्रयत्न करीत आहोत.  तसाच प्रयत्न मिल्लतनगरमध्येही सरकार करीत आहे. तसे आपल्याही नजरेला काही असू शकतील.  सन्माननीय सदस्या डॉ. भारती लव्हेकर यांच्या मतदार संघामध्ये तसे ले-आऊट खूप आहेत.  आपण त्यामध्ये लक्ष घातले तर त्यांनाही फायदा होईल आणि म्हाडालाही फायदा होईल.

अध्यक्ष महोदय, पुणे येथील जुन्या व जीर्ण झालेल्या म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासाबद्दल कोणीही विचार केला नव्हता.  तेथे २६ ले-आऊट आहेत.  १३२ हेक्टर जमिनी आपल्या ताब्यात आहेत.  प्राप्त प्रस्ताव ४ असून त्यापैकी मंजूर प्रस्ताव २ आहेत.  पण येणाऱ्या काळात मुंबई मंडळाच्या धर्तीवर पुणे मंडळास प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून घोषित करण्यासाठी मार्च २०२१ मध्ये नगरविकास विभागाकडे प्रस्ताव दिला आहे.  नगरविकास विभागाकडून ती परवानगी मिळणे अपेक्षित आहे. म्हाडामधून प्रस्ताव फार गतीने जातात आणि त्यातून बिल्डरला रिलीफ मिळतो.  पैसे अडकत नाहीत.  कारण जमीन आणि पैशाचे व्यवहार त्यामध्ये गुंतलेले असतात. म्हणून आपण म्हाडाला प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून घोषित केले तर जसा मुंबईचा म्हाडामार्फत वेगाने विकास झाला तसा पुण्यामध्येही विकास करता येईल.  कारण पुण्यातील म्हाडाचे मोठमोठे ले-आऊट आहे.  येरवडाच्या बाजूला जो मोठा ले-आऊट आहे.  त्यावर सुंदर काही तरी उभारता येईल, अशी माझी इच्छा आहे. काल मी माननीय उपमुख्यमंत्री यांच्यासमवेत बोलत असताना २ वर्षापूर्वी "तालुका तेथे म्हाडा" अशी मी घोषणा केली होती. म्हाडामध्ये महाराष्ट्राच्या नावाने सुरूवात आहे. पण महाराष्ट्रात आपण म्हाडाचा पाहिजे तसा विस्तार करु शकलो नाही.  मागे तालुका तेथे गृहसंकूल योजना असा प्रस्ताव सादर केला होता.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

डॉ. जितेंद्र आव्हाड....

त्यावेळेस माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार यांनी आमच्या विभागासाठी १०० कोटी रुपये जाहीर केले होते. यासाठी मी त्यांना काल विनंती केली तर ते मला म्हणाले की, तू जाहीर कर की, अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद करुन गाव तिथे म्हाडा यासाठी वित्त विभागाकडून १०० कोटी रुपये मिळतील. मग आम्ही हा प्रस्ताव पुढे घेऊन जाऊ. माननीय मंत्री श्री. शंकराराव गडाख आता सभागृमध्ये उपस्थित नाहीत. मी त्या दिवशी घोषणा केली त्याच दिवशी त्यांनी मला सांगितले होते की, "पहिला प्रस्ताव माझ्याकडे दे आणि मी तुला जागा देतो. त्याप्रमाणे आपण पहिला प्रकल्प माझ्या भागात करुया." त्यामुळे याचा पहिला पायलेट प्रकल्प तिथे करण्यात येईल. त्यांनी मला हे दोन वर्षापूर्वी सांगितले होते आज मी त्यांना दिलेला शब्द पूर्ण करतो. हे पहिले संकूल आम्ही माननीय मंत्री श्री. शंकरराव गडाख यांच्या मतदारसंघात सुरु करु. हे मी थोडे अवघड बोलत आहे. परंतु ही माननीय मुख्यमंत्र्यांची देखील इच्छा होती.

अध्यक्ष महोदय, बृहन्मुंबई महानगरपालिका जेव्हा आपल्याले आऊटशी पुनर्बांधणी किंवा पुनर्विकास करते तेव्हा १००० रुपये स्टॅम्प फी घेते. आपले ५६ ले आऊट आहेत आणि ते पूर्ण मध्यमवर्गीय आणि मराठी माणसांचे आहेत. या ले आऊटसाठी देखील १००० रुपयेच स्टॅम्प फी करावी अशी मागणी मी गृह निर्माण मंत्री या नात्याने माननीय वित्त मंत्र्यांना आणि माननीय मुख्यमंत्र्यांनाही करीत आहे. अभ्युदय नगर येथील स्टॅम्प डयुटीच आता १५६ कोटी रुपये झाली आहे. पहिल्याच दिवशी विकास सुरु करण्यापूर्वीच १५६ कोटी रुपये भरायचे हे आजच्या बाजारात कोणाला जमेल असे मला वाटत नाही. त्यामुळे काहीतरी सवलत देऊन शेवटी विकास महत्त्वाचा आहे. विकास झाल्यानंतर १५६ कोटी रुपये नाहीतर १५०० कोटी रुपये शासनाला मिळतील. त्यामुळे याबाबत शासनाने आणि खास करुन वित्त विभागाने काहीतरी विचार करावा, अशी जाहीर मागणी मी करतो.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील हाऊसिंग स्टॉक आता हळूहळू कमी होत जाईल. कारण इथे जमिनी उरलेल्या नाहीत. त्यामुळे एमएमआर रिजनकडे लक्ष द्यावे लागेल.

डॉ. जितेंद्र आव्हाड....

एमएमआर रिजनमध्ये अनेक मोठया विकासकांनी १००, २०० किंवा ३०० एकर असे अनेक मोठे पॉकेट घेऊन ठेवलेले आहेत.त्यांच्याशी म्हाडाचे जॉइंट व्हेंचर करुन त्यांना काही फायदा देऊन गरीब माणसांसाठी, मुंबईकरांसाठी मुंबइच्या जवळच परत गृहनिर्माण करता येईल काय, यासाठी प्रयत्न सुरु केला आहे. हाऊसिंग पॉलिसीचा हा भाग आहे. येत्या तीन महिन्यात आम्हाला यामध्ये यश येईल. आमच्याकडे चार ते पाच ऑफर लेटर्स देखील आलेले आहेत. त्यावर आम्ही काम करीत आहोत ते जर पूर्ण झाले तर एक जॉइंट व्हेंचर पॉलिसी आपल्याला देता येईल.

अध्यक्ष महोदय, गणपत पाटील नगरच्या सर्व्हेबाबत मी सांगू इच्छितो की, तो लवकरच सुरु केला जाईल. माझ्या अंदाजाने एसआरएमार्फत तो सुरु देखील केलेला असेल. नसेल केला तर तो पूर्ण केला जाईल याचे मी आपल्याला आश्वासन देतो.

अध्यक्ष महोदय, मुंबई उपनगरमध्ये राहणारे जे लोक आहेत त्या सर्वांसाठी मी एक घोषणा करीत आहेकी, सद्य:स्थितीतील आरआर बोर्ड हे मुंबई शहरातील सेस इमारतींची देखभाल, दुरुस्ती व पुनर्विकासासाठी आहे. मुंबई उपनगरमध्ये बऱ्याच इमारती मोडकळीस आलेल्या असून पुनर्विकास व दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने आरआर बोर्डाची क्षेत्र मर्यादा ही मुंबई उपनगरापर्यंत वाढवून दहिसर आणि मुलुंडपर्यंत नेत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर यांनी रिपेअर बोर्डाबाबत तक्रार केली होती त्याबाबत मी सांगू इच्छितो की, रिपेअर बोर्डामार्फत येणारे शुल्क संक्रमण शिबिराचे भाडे या पुढे मॅन्युअली घेतले जाणार नाही. यापुढे सर्व पेमेंट हे नेट बँकिंग तर्फे किंवा गुगल पे तर्फे करावे असे आदेश देण्यात आले आहेत आणि त्याचे इम्पिमेंटेशन एका महिन्यात करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, म्हाडाच्या ५६ वसहतीतील संस्थांना थकित सेवाशुल्कासाठी अभय योजना लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे या योजनेवरील पेनल्टी आणि व्याज माफ करण्यात आलेले आहे.जी ओरिजनल रक्कम भरायची आहे त्याला सुद्धा आम्ही चार हफ्ते दिले आहेत. आता थकित रक्कम ३९५ कोटी रुपये असून व्याज ७१ कोटी रुपये आहे. हे ७१ कोटी रुपये रद्द करण्यात येतात.

डॉ. जितेंद्र आव्हाड....

आतापर्यंत आम्ही ३१.६५ कोटी रुपये जमा केले आहेत याचा अर्थ लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे लोक सेवाशुल्क भरण्यासाठी तयार आहेत म्हणून आम्ही ते माफ करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, एन.ए. कराची आकारणी ही महसूल विभागाकडून होत असल्याने तो कर रद्द करायचा असेल तर महसूल विभागामार्फत कार्यवाही होणे अपेक्षित आहे. पण आम्ही दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी महसूल विभागाने दिलेल्या आदेशानुसार एन कर वसुलीला रोख लावला होता त्याला स्थगिती दिलेली आहे. विद्यमान म्हाडा कायद्यात रखडलेले प्रकल्प ताब्यात घेण्याची तरतूद नाही. हे प्रकल्प ताब्यात घेण्यासाठी म्हाडा अधिनियम कलम ७७, ७९ व ९१ मध्ये सुधारणा प्रस्तावित आहे. शासनाची मान्यता सन २०२० च्या पावसाळी अधिवेशनामध्ये मिळालेली आहे. त्यानंतर राष्ट्रपतींकडे कायदा करण्यासाठी पाठवले आहे. हा कायदा काही सत्ताधारी किंवा विरोधक यांचा नसून यासाठी ८ सदस्यांची समिती होती. माझ्या माहितीप्रमाणे यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. मंगलप्रभात लोढा आणि सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल सुद्धा सदस्य होते. हा कायदा पूर्ण झाला तर आपण मुंबईकरांना मोठा न्याय देऊ शकू. म्हणजे भूसंपादनासाठी परवानगी मिळेल आणि पुनर्विकास जोरात सुरु होईल. यामध्ये वेस्टेड इंटरेस्ट असलेला माणूस आहे ज्याला आपण सर्वच उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालय अशा सर्वच जागी हरवलेले आहे. त्याचे नाव आहे श्री. भट्टड. आपको मालूम होगा. वह सब खेल खेल रहा है. वह कैसा करता है, क्या करता है, खुदा जाने. लेकिन आप लोगों की अब इतनी पहचान है, हम लोग तो मुंबई के बाहर भी नहीं जाते है. माननीय विरोधी पक्ष नेते यांना मी आज प्रामाणिकपणे विनंती करीत आहे की आपण यामध्ये लक्ष घालून हे विधेयक माननीय राष्ट्रपतींनी पास करुन द्यावे. सार्वभौम सभागृहाने एकमताने हा कायदा पारीत केलेला आहे. त्या कायद्यावर शिक्कामोर्तब करुन मुंबईकरांना त्याचा लाभ देता यावे यासाठी आपण प्रयत्न करावा.

डॉ. जितेंद्र आव्हाड....

अध्यक्ष महोदय, माननीय महसूल मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. महसूल विभागाने सन १९६० साला नंतर अनेक शासकीय जमिनी गृहनिर्माण संकुलाला दिलेल्या आहेत. म्हाडाने आता स्पष्ट पर्याय दिलेला आहे की, ज्या शासकीय जमिनींवर गृहनिर्माण संकुल आहेत त्या गृहनिर्माण संकुलाला म्हाडाला घेऊन पुनर्विकास करायचा असल्यास म्हाडाच्या पूर्ण सवलती गृह संकुलास देऊन म्हाडा त्याच्या पुनर्विकास करेल. या घोषणा पूर्ण एमएमआर रिजनला लागू होतील. त्यामुळे सरकारचा आणि तेथील रहिवाश्यांचा देखील फायदा होईल.

अध्यक्ष महोदय, चिराग नगरचे डिझाईन पूर्ण केलेले आहे. येथे साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे स्मारक एसआरएतर्फे केले जाईल हे मी जाहीर करतो. म्हाडा वसाहतीतील रहिवाश्यांना प्रशासकीय सुधारणा याबाबत मी सांगू इच्छितो की, येथील रहिवाश्यांना सेवा  इतर शुल्क भरण्यासाठी ई-बिलींग प्रणाली सुरु केलेली आहे. म्हाडा वसाहतीतील बांधकामांना विविध परवानग्या आता ऑनलाईन पद्धतीने देण्यात येतात. मुंबई प्रदेशात सेसला स्ट्रक्चरल दुरुस्तीसाठी ३ हजार रुपये देण्यात येत होते. ते आता ४ हजार रुपये करण्यात आले आहेत. कलम ३३(७) अंतर्गत विकासकाची आर्थिक व तांत्रिक क्षमता तपासूनच यापुढे एनओसी दिली जाईल तसेच भाडेकरु आणि रहिवाशी यांच्या भाडयापोटीची रक्कम आगाऊ स्वरुपात घेऊन एस्क्रो अकाऊंटमध्ये जमा करुन रहिवाश्यांना वेळेत देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये बऱ्याच रखडलेल्या योजना आहेत असा विषय सर्वच सन्माननीय सदस्यांनी मांडला आहे. त्यासाठी एक विशेष ॲमनेस्टी स्कीम आज आम्ही जाहीर करीत आहोत.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. जितेंद्र आव्हाड....

जेव्हा पासून एसआरए स्थापन झाले व जेव्हापासून रिॲलिटी मार्केट फॉर्ममध्ये आले तेव्हापासून रिॲलिटी मार्केटमध्ये गुंतवणूकदार येऊ लागले. त्यांनी मार्केटमध्ये बराच पैसा लावला. यापैकी काहींनी पैसे घेऊन पलायन केले. यामध्ये आपल्या गरिबांचे नुकसान झाले. एक अभय योजना अशी आणली जात आहे की, जो लपलेला चेहरा आहे त्याला पुढे आणायचे. त्याच्याशी चर्चा करुन त्यांना हवा तो विकासक द्यायचा व त्यांच्याकडून पहिले करार करुन पूर्ण रिहॅब बांधून घ्यायचे. अशा प्रकारे रिहॅब बांधून गरीब माणसाला सवलत दिली जाणार आहे. या नंतर त्याचा प्रोजेक्ट केला तर हरकत नाही. मुंबईच्या एसआरएमध्ये जवळजवळ ३० हजार कोटी रुपये अडकले आहेत. ते पुन्हा मार्केटमध्ये आले तर पुन्हा हा व्यवसाय तेजीत येईल. बांधकाम व्यवसायामध्ये सर्वात जास्त रोजगार दिला जातो. या व्यवसायाला आपण जर वाव दिला, संधी दिली तर आपला फायदा होईल. आम्ही ३-४ उपाययोजना केल्या आहेत. त्याचा अंमल करुन ॲमनिस्टी स्कीम पुढे नेली जाईल.

अध्यक्ष महोदय, धारावीचा पुनर्विकास हा महत्त्वाचा मुद्दा आहे. आम्हाला धारावीचा विकास करायचा आहे, टेंडर तयार आहे. जेव्हा तुम्ही पुनर्विकास करणार होता तेव्हा काही एकर जमिनीकरिता केंद्र शासनाला तत्कालीन सरकारने ८०० कोटी रु. दिले होते. सरकार बदलत असते. सरकार ही कंटीन्युअस प्रोसेस असते. आता हा विकास आम्हाला करायचा आहे. ही जमीन जोपर्यंत ताब्यात येत नाही तोपर्यंत पुनर्विकास होऊ शकत नाही. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस, आपण जर रेल्वे मंत्रालयाची वेळ घेतली, आपण दोघे किंवा मंत्रिमंडळातील सहकारी घेऊन गेलो.. कोव्हिडच्या काळात सर्वात जास्त मृत्यू धारावीत झाले. येथे प्रचंड वेगाने कोरोना पसरला. धारावी एक वेगळीच वस्ती आहे. जगातील नावाजलेल्या ब्रँड म्हणजे गुची, आदिदास इ. ब्रँडची फर्स्ट कॉपी तेथे तयार होते. आपल्याला ओळखताही येणार नाही एवढी कारागिरी आपल्याकडे धारावीमध्ये उपलब्ध आहे. येथे कमर्शियल सेंटर कम रेसिडेन्शियल करता येईल. धारावी बीकेसीला लागून आहे. एक ब्रीज तयार केला तर आपण बीकेसीमध्ये जातो. यामुळे सेकंड बीकेसी म्हणून

असुधारित प्रत

श्री. जितेंद्र आव्हाड....

धारावीचा विकास करता येईल. अर्थकारणाच्या दृष्टीने मुंबईला पुन्हा महत्व प्राप्त होईल या करिता आम्हाला मदत करावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाच्या जमिनीवर अनेक झोपडपट्टया अडकल्या आहेत. आपण सर्वांनीच याकडे लक्ष दिले पाहिजे. रेल्वे, एअरपोर्ट ॲथॉरिटी, डिफेन्स, बीपीटी यांच्या जागेवर अनेक झोपडपट्टया आहेत. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी रेल्वेच्या बाजुला असलेल्या झोपडपट्टयांना नोटीसेस देण्यास सुरुवात केली आहे. अनेक हेक्टर जागेवर झोपड्या आहेत. मात्र त्याच्या दहा पट मोकळी जागा रेल्वेकडे आहे. मी रेल्वे मंत्री महोदयांशी बोललो, त्यांना पर्याय दिला व सांगितले की, असे करु नका. एकही झोपडी खाली होणार नाही. मी गृहनिर्माण मंत्री म्हणून सांगतो की, कायदा अमलात आहे त्याचा वापर करा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात लिहिलेले आहे. जर महाराष्ट्रात किंवा कोणत्याही राज्यात पुनर्विकासाचे धोरण राबवायचे असेल तर तेथील झोपडपट्टीवासीयांनाही ते धोरण लागू करा. जर रेल्वे आडमुठेपणाने वागणार असेल तर आपल्याला विचार करावा लागेल. मी स्वत: रेल्वेच्या सर्व अधिकाऱ्यांना घेऊन बसलो होतो. त्यांना हे समजून सांगितले. ते म्हणाले की, आमचे वरिष्ठ ऐकत नाहीत. मी त्यांना सांगितले की, आपल्या वरिष्ठांना सांगा की, खालचे ऐकत नाहीत. शासन म्हणून मी सांगतो की, एकाही गरिबाची झोपडी शासन म्हणून आम्ही तोडू देणार नाही. एसआरएकडे रखडलेल्या जवळजवळ ६०० योजना आहेत. या रखडलेल्या योजनांनाच अभय योजना लावली जाणार आहे. अभय योजना जर यशस्वी झाली तर मुंबईतील अनेक गरिबांना घरे मिळतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश सुर्वे यांनी प्रश्न मांडला की, विकासकाने सेल इमारत बांधली व रिहॅब अर्धवट सोडून पळून गेले. यावर कठोर कारवाई करावी लागेल. जे विकासक सेल इमारत बांधून रिहॅब तसेच सोडून निघून गेले असतील त्यांना कायद्यानुसार कलम ४२० लावता येईल काय याचा विचार करु.

असुधारित प्रत

श्री. जितेंद्र आव्हाड....

ज्या विकासकांनी गरिबांना फसवले आहे. सेल इमारत बांधून माल खिशात घातला असेल तर त्यांचा माल काढून गरिबांना द्यावा लागेल. या करिता कोणतेही कठीणातील कठीण लावून त्यांना आतमध्ये घालावे लागेल.

अध्यक्ष महोदय, ॲनेक्श्चरला उशीर होतो, यामध्ये भ्रष्टाचार होतो, या करिता २ ते ४ लाख रु. घेतात असे अनेकदा सांगितले जाते. यापुढे एसआरएमध्ये ऑटो डीसीआर असेल व ऑटो अनॅक्श्चर असेल. मुंबईचे पूर्ण मॅपिंग एसआरए करीत आहे. पूर्ण ड्रोन झोपडपट्टीवर फिरवले जात आहेत. गुगलवरुन इमेजेस काढल्या आहेत. या माध्यमातून प्रत्येक घरातील व्यक्ती कोण आहे याची ओळख ऑटो मध्ये असेल. मॅन्युअल काम  होते तेव्हा २ लाख रुपये दे, तुला पात्र करतो, असे होते. मात्र तसे आता होणार नाही. व्यक्तीचे नाव टाकले की, त्याची झोपडी कोठे होती, कधी आली त्याची ओळख काय हे त्यामध्ये असेल. यामुळे पात्रतेकरिता व्यक्तीशी येणारा संबंध आता एसआरएने काढून टाकलेला आहे.  एक महिन्यात  याचा रिझल्ट येईल.ये थील भ्रष्टाचाराला मातीत घालू, हा शब्द मी आपल्याला देतो.

अध्यक्ष महोदय, येथे महत्त्वाचा प्रश्न कायम चर्चेला येत होता. एसआरए मधील झोपडी विक्रीची तरतूद १०  वर्षाची होती. माननीय मंत्री सर्वश्री आदित्य ठाकरे, अस्लम शेख, मी व  माननीय मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड,  यांची एक कमिटी होती. यामध्ये आम्ही  निर्णय घेतला आहे. १२ ते १५ लाख रु गरिबांकडून घरांसाठी पूर्वी घेतले जात होते. आता त्यांना केवळ अडीच लाख रुपयांमध्ये घर देण्यात येईल. त्यांना त्यांची झोपडी पाडल्यानंतर ३ वर्षात विकता येईल. यामुळे झोपडीधारकांचा फायदा झाला. सन २०१० ते सन २०११ मध्ये घरे देणार असे जाहीर केले होते. त्याची किंमत अवाढव्य होती. १२ ते १५ लाख रु. किंमत होती. ती कमी करुन अडीच लाख रु. मध्ये घर देण्यात येईल. ज्यामुळे एसआरएला उशीर होतो ते सर्व इज ऑफ डुईंग बिझनेसमध्ये काढून टाकले आहे. धार्मिक स्थळ हा वादाचा विषय असतो. त्याला या पुढे  पोलीस परवानगीची आवश्यकता राहणार नाही. त्याकरिता ६ महिने जातात.

अप्रकाशित प्रत

श्री. जितेंद्र आव्हाड....

जो लेआऊट मंजूर होतो, त्या नुसार सहकाऱ्यांचे, विकासकांचे, सीईओ एसआरए यांचे जे फायनल होईल या नंतर त्यास मान्यता दिली जाईल. या करिता पेपर येथे द्या, तेथे द्या, असे होणार नाही. हे लवकरात लवकर संपवले जाईल. हा सर्वात मोठा वादाचा विषय असतो. एसआरएची योजना पूर्ण राज्यात लागू केलेली आहे. मी पुन्हा एकदा जाहीर करतो की, मुंबईतील कोळीवाड्यांचे सीमांकन करुन त्यांना झोपडपट्टीचा कायदा लावला जाणार नाही. माननीय मुख्यमंत्री, माननीय नगर विकास मंत्री यांना विश्वासात घेऊन डीसीपीआरमध्ये बदल करुन कोळीवाड्याला नवीन डीसीपीआर, नवीन एफएसआय लागून विकास केला जाईल. कोळीवाड्यातील रहिवासी हे येथील आद्य रहिवासी आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

डॉ.जितेंद्र आव्हाड...

समुद्रकाठावर वसलेले जे मुंबईचे आद्य रहिवासी आहेत त्यांना न्याय देण्यासाठी म्हणून नवीन डीसीपीआर केला जाईल व त्यांचा पुनर्विकास ... (अडथळा)... तो केलेला आहे. परंतु, त्याला मान्यता देत नाही. ते सीमांकन करुन घेऊन त्यांना देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मिहिर कोटेचा यांनी काही मुद्दे मांडले. सध्या कलम ३३ (१०) अंतर्गत ९ मीटर रस्त्यांच्या रुंदीला मान्यता दिली जाते. त्याच धर्तीवर ३३ (११) अंतर्गतच्या योजनेसाठी ९ मीटर रस्त्याचीच परवानगी दिल्यास मोठ्या प्रमाणात पीटीसी उपलब्ध होईल. मला हे समजत नाही की, तुम्ही ३३ (१०) ला ९ मीटर रस्त्याची परवानगी देता मग ३३ (११) ला देण्यास काय हरकत आहे? तापावरचे एकच इंजेक्शन आहे परंतु, एकाला एक द्यायचे व दुसऱ्याला द्यायचे नाही, हे चुकीचे आहे. संविधानानुसार सगळयांना समान न्याय असला पाहिजे. त्यामुळे ३३ (१०) व ३३ (११) या दोघांना समान न्याय लावला पाहिजे. तसा प्रस्ताव आम्ही नगरविकास विभागाकडे पाठविला आहे. नगरविकास विभाग लवकरात लवकर त्याला मान्यता देईल असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चेतन तुपे यांनी काही विषय सांगितले. मी आताच माननीय श्री.अजित पवार यांच्यासमवेत बोललो. मुंबईचे जे एसआरएचे फायदेशीर रुल्स आहेत ते सर्व रुल्स पुण्याला लागू होतील खास करुन क्लबिंगचा रुल. क्लबिंगचा रुल जर आपण पुण्याला लागू केला तर पुण्याचा पुनर्विकास गतीने होईल. आपण त्यावर बैठक घेऊ.

अध्यक्ष महोदय, गिरणी कामगारांची सोडत होतच असते. माननीय श्री.अजित पवार यांनी मला परवानगी दिली आहे. पुण्याच्या एसआरएमध्ये मुंबईचा जो कायदा आहे तोच कायदा लागू करुन पुणेकरांना व पिंपरी चिंचवडला कसा फायदा करुन देता येईल त्याकरिता प्रयत्न केले जातील. मुंबई व पुण्याचा एसआरए हे समान पातळीवर आणले जाईल. तशी आपली इच्छा होती.

डॉ.जितेंद्र आव्हाड..

अध्यक्ष महोदय, ग्रामीण शिरुरला आम्ही ऑलरेडी जाहीर केलेले आहे. महाराष्ट्राला जाहीर केलेले आहे. त्यामुळे जे पूर्वीपासून सांगत होता की, माझ्या हायवेला झोपडपट्टी आहे. त्याला प्रचंड कमर्शिअल किंमत येईल आपण तपासून पहा, एखादा बिल्डर घेऊन जा परवडत असेल तर त्या योजनेला दोन महिन्यांत मान्यता देतो.

अध्यक्ष महोदय, मी आता शेवटच्या पानाकडे वळत आहे. हे मला माहीत नाही परंतु, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून अनेक आमदार मुंबईमध्ये येतात. ...(अडथळा).. तलरेजाचा जो प्रकल्प आपण म्हणालात त्याला त्वरित स्टॉप नोटिस दिली जाईल. जोपर्यंत त्याचा क्लिअरन्स येत नाही. जोपर्यंत तो आम्हाला क्लिअर करुन देत नाही. तोपर्यंत आम्ही त्याला मान्यता देणार नाही, हा मी शब्द देत आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांचे मन शांत व्हावे याकरिता आज मी येथे सांगत आहे की, यापुढे एकाही सिंगल इमारतीला कामाठीपुरामध्ये डेव्हलपमेंट म्हणजे एनओसी दिली जाणार नाही. नजिकच्या काळात दिलेल्या ज्या एनओसी असतील त्या रद्द केल्या जातील. आता मला असे वाटते की, सर्वांचे प्रश्न झाले असतील.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील ग्रामीण विभागातून खूप आमदार मुंबईमध्ये येतात. आमदार हे आमदार असतात. ते कुठल्या पक्षाचे आहेत हे महत्वाचे नाही. परंतु, आपले उत्तरदायित्व हे त्या सर्वांसाठी असते, आपण सर्वांसाठी जबाबदार असतो. त्यामुळे गोरेगाव येथे एका भूखंडावर ३०० एलआयजी ... एचआयजी हाऊसेस निर्माण करुन ती आमदारांना देण्याचा विचार म्हाडाने केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सर्वांना घरे देणार परंतु, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार आपल्याला देणार नाही. कारण आपले मुंबईमध्ये घर आहे. ज्यांना मुंबईमध्ये घर नाही, ज्याचे मुंबईमध्ये वास्तव्य नाही, जो मुंबईचा आमदार नाही, कदाचित मी एमएमआरला देखील लागू करेन की, जो एमएमआरच्या भागातील आमदार नाही,

डॉ.जितेंद्र आव्हाड...

त्याच्या बाहेर राहणाऱ्या सर्व आमदारांना घरे मिळावीत, ही माझी मनापासूनची इच्छा आहे. महाविकास आघाडी सरकारचा हा महत्वपूर्ण निर्णय आहे.

अध्यक्ष महोदय, एक नवीन घोषणा ... घोषणा नाही, हा निर्णय आहे. मी कुठलीही इच्छा सांगत नाही. मी निर्णय जाहीर करीत आहे. मी प्लॉट तयार केलेला आहे, प्लॉट घेतलेला आहे, ताब्यात आहे, जमीन म्हाडाच्या ताब्यात आहे. त्यामुळे ३०० आमदारांना घरे देण्याची योजना आम्ही निश्चितपणे आखत आहोत. ती कार्यान्वित करण्यात येईल. मला असे वाटते की, मी सर्वांच्या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. एवढेच बोलतो व येथेच थांबतो. जय हिंद. जय महाराष्ट्र. जय भीम.

.......

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा येथे झाली. .. (अडथळा).. तुम्ही सह कुटुंब, सह परिवार राहू शकाल. मी काल सांगितले की, जागा दाखवा, जागेची जबाबदारी... आणि ती बांधकामाची जबाबदारी...

अध्यक्ष महोदय, बिगरशेतीच्या संदर्भातील चर्चेचा काही भाग या प्रस्तावामध्ये होता. बिगरशेतसाऱ्याच्या बाबतीत जी लक्षवेधी सूचना झाली त्यामध्ये त्याला तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यामध्ये अनेक विषय नव्याने उपस्थित केल्याचे दिसत आहे. वाढीव दराने आकारणी केलेली बिनशेती कराची, अकृषिक कराची थकबाकी, चालू रक्कम जादा असल्याने सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन शासनाने तात्पुरती स्थगिती दिलेली आहे.

अध्यक्ष महोदय, या चर्चेमध्ये २-३ मुद्दे सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रकर्षाने मांडले. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील प्रभू, योगेश सागर, ॲड. पराग अळवणी, श्री.झीशान सिद्दिकी, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्री सदा सरवणकर, मिहिर मोटेचा, चेतन तुपे, रविंद्र वायकर, ॲड.राहुल नार्वेकर, सुनील भुसारा, ॲड.आशिष शेलार या सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

अध्यक्ष महोदय, त्या दिवशी लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळेस मी तात्पुरती स्थगिती दिलेली आहे. साधारणत: या अकृषिक कराची जी आकारणी आहे, तिचा हमी कालावधी काय आहे, कोणत्या सुधारित पध्दतीने ती करायची, यात जर काही बदल करायचा ठरला तर कायद्यात व नियमात देखील आपल्याला पुन्हा एकदा दुरुस्ती करावी लागणार आहे, ही वस्तुस्थिती यामध्ये आहे. याचा परिणाम राज्याच्या महसुली उत्पन्नावर देखील होणार आहे. त्यामुळे बिगर शेती कराच्या बाबतीत एकरक्कमी आकारणी करता येईल किंवा कसे, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात कराची वसुली मालमत्ता करासोबत कशी निगडित करता येईल, सदर रक्कम माफ करुन व अन्य स्त्रोतातून उत्पन्नाची तूट भरुन काढता येईल का, अशा अनेक विषयांवर विचार मंथन करणे अत्यंत आवश्यक आहे.

श्री.बाळासाहेब थोरात ...

अध्यक्ष महोदय, एक गोष्ट सर्वांनी सातत्याने सांगितली की, काही ठिकाणी वसुलीची सक्ती करीत असताना बँक खाती सील केलेली आहेत. ती तातडीने खुली करुन देण्याच्या संदर्भात देखील आज आपण येथे निर्णय देत आहोत. त्यामध्ये दोन पध्दतीने जावे लागणार आहे काही शॉर्ट टर्म म्हणजे काही निर्णय आम्हाला तातडीने द्यावे लागतील आणि लाँग टर्म अशा प्रकारचे निर्णय आम्हाला द्यावे लागतील.

अध्यक्ष महोदय, मी या निमित्ताने सांगतो की, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आम्ही ही समिती गठित करु. त्यामध्ये कोण सदस्य असावेत याबाबतीत माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्यासमवेत चर्चा करुन, त्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. काही निर्णय तातडीने घ्यावयाचे असतील तर ते निर्णय तातडीनेच घेतले जावेत. लाँग टर्म निर्णय हे ३ महिन्यांमध्ये त्यांनी द्यावेत, अशा प्रकारची अपेक्षा मी या निमित्ताने ठेवली आहे.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात...

सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी भोगवटदार वर्ग २ चे वर्ग १ मध्ये रुपांतर करण्याचा मुद्दा मांडला आहे. हा निर्णय घेऊन ३ वर्ष झाले, त्यानंतर आपण थांबलो असलो तरी त्याचा फायदा कोणाला झाला, कसा झाला, विशेषत: किती हाऊसिंग सोसायटींनी सहभाग घेतला, नसेल तर का घेतला नाही, त्यांना आणखी काही मदतीची आवश्यकता आहे काय, यासाठी पुनर्परिक्षण होणे गरजेचे आहे, असे मला वाटते. सामान्य नागरिकांना मदत व्हावी या दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात येत आहे. त्यानंतर यासंदर्भात योग्य निर्णय घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.झिशान सिद्दीकी यांनी एनए टॅक्सच्या बाबतीत त्यांचे विचार मांडले आहेत. बहीराम नगरची ३३ एकर जागा रेल्वेला देण्यात आली आहे, त्यामुळे एसआरए योजना लागे करणे शक्य होत नाही. या कारणास्तव उक्त जागा राज्य सरकारने परत घ्यावी, असा मुद्दा मांडलेला आहे. या सर्व बाबी तपासून घेण्यात येतील व त्यानंतर त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.योगेश सागर, सदा सरवणकर, अमीन पटेल, रविंद्र वायकर, पराग अळवणी, झिशान सिद्दीकी, मंगलप्रभात लोढा, मिहिर कोटेचा,ॲड. राहुल नार्वेकर, चेतन तुपे यांचेसह अनेक सन्माननीय सदस्य यांनी सहभाग घेतला व अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमीन पटेल यांनी हॅंकॉक पुलाचा मुद्दा उपस्थित केला आहे. उक्त पुलाच्या पुनर्बांधणीचे काम महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरु आहे. रेल्वे मार्गावरील तुळे या स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. साडे सात मीटर रुंदीच्या पोहोच काम माहे मे अखेरीस पूर्ण होऊन दोन्ही मार्गिका खुल्या होतील.

श्री.एकनाथ शिंदे...

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.झिशान सिद्दीकी यांनी प्रमुख वैद्यकीय अधीक्षक, वांद्रे पूर्व परिसरातील नागरिकांसाठी २ कि.मी. अंतरावरील सांताक्रुझ येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या संदर्भात मुद्दा मांडला आहे. या रुग्णालयात न्युरो सर्जरी, हृदय रोग विभाग यांचा अंतर्भाव करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा प्रस्ताव आल्यास त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.भारती लव्हेकर यांनी म्हाडा वसाहतीमधील पाण्याची लाईन दुरुस्त करणे, म्हाडाचे महानगरपालिकेच्या जागेवर रुग्णालयाचे आरक्षण आहे तेथे अधिकाधिक आरोग्य सुविधा देण्यात याव्यात, अग्निशमन केंद्र बांधण्यात यावे, गार्डनमध्ये पिण्याच्या पाण्याची व शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, असे अनेक मुद्दे मांडले आहेत. यासंदर्भात महानगरपालिकेच्या माध्यमातून कार्यवाही सुरु असून या अडचणी लवकरात लवकर सोडविण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू, ॲड.आशिष शेलार, श्री.सुनिल प्रमुख यांनी विकासक अनेक इमारती बांधून गेला व त्यांना ओसी नसल्याबाबत सांगितले आहे. त्यामधील रहिवाशांना वॉटर, सिव्हरेज चार्जेस दुप्पट भरावे लागतात. बँक लोन, खरेदी-विक्री व्यवहार यासर्व बाबतीत त्या रहिवशांना भुर्दंड सहन करावा लागत आहे. याकरिता एक धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. हा मुद्दा सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी अगोदर मांडला आहे. या भागामध्ये जे रहिवासी राहतात त्यांच्या सोसायट्या निर्माण झाल्या आहेत. या प्रकरणी एक समिती गठीत करण्याची सूचना करण्यात आली आहे. ती एक महिन्याच्या आत गठीत करण्याचे ठरले आहे. या समितीमध्ये संबंधित अधिकारी, त्या भागातील सर्वपक्षिय आमदार यांचा समावेश करण्यात येईल. हजारो इमारती विना ओसीच्या आहेत. त्यामुळे त्यांना भुर्दंड सहन करावा लागत असून त्यांच्यावर कायमस्वरुपी

श्री.एकनाथ शिंदे...

टांगती तलवार आहे. ती दूर करण्यासाठी जाचक अटी शिथील कराव्या लागणार आहेत. त्यांच्यासाठी अभय योजना जाहीर करावी लागेल. प्रिमिअमची रक्कम कमी करावी लागेल. जेणेकरुन उक्त रक्कम भरणे सोसायटीला शक्य होईल. सदरहू समिती निर्णय घेईल त्यानुसार विकासकाला एक नोटीस देऊन एक ठराविक कालावधी देण्यात येईल. त्यानंतरही तो आला नाही तर सोसायटीने पुढाकार घेतल्यानंतर व प्रिमिअमची रक्कम भरल्यानंतर अभय योजनेच्या माध्यमातून दिलासा देता येईल. यामुळे विना ओसीच्या हजारो इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा होईल व हजारो लोकांना दिलासा मिळेल.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी फनेल झोनचा विषय मांडला आहे. विमानतळ फनेल झोन असलेल्या सांताक्रुझ, पार्ले, कुर्ला या भागात मोठ्या प्रमाणत इमारती आहेत. त्यांच्या उंचीवर मर्यादा असल्याने त्यांचा पुनर्विकास होऊ शकत नाही. त्यांना अनुज्ञेय असलेल्या उंचीपर्यंतच बांधकाम करता येते. इतर काही इमारती धोकादायक झाल्या आहेत, त्यांचा पुनर्विकास करणे शक्य झाले नाही. या पुनर्विकास योजनेला चालना देण्याकरिता काही इन्सेन्टीव्ह द्यावे लागणार आहेत. ३३/७, सहकारी इमारतींसाठी ३३/७ बी, क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी ३३/९, बीडीडी चाळीच्या विकासासाठी ३३/९, म्हाडाच्या स्वत:च्या इमारतींच्या विकासासाठी ३३/५, झोपडपट्टी पुनर्विकासासाठी ३३/१० या तरतुदी उपलब्ध आहेत. परंतु उक्त इमारतींच्या उंचीवर मर्यादा आल्यामुळे त्यांच्या पुनर्विकासासाठी एक वेगळा निर्णय घ्यावा लागेल. याबाबत संबंधित आमदार महोदयांच्या समवेत अनेक बैठका घेण्यात आल्या आहेत. मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०१४ चे विनियमन ३३ मध्ये तरतूद अंतर्भुत करण्यासाठी खंड २५ चा समावेश करण्यासाठी नगरविकास विभागाने प्रारुप आराखडा प्रस्ताव तयार केला आहे. सदरहू इमारतींची उंची वाढविता येणार नाही. काही लोकांनी त्यांच्या संदर्भात टीडीआरची मागणी केली होती. तो फनेल झोनसाठी देय केला तर सीआरझेड मधील इमारती, डिफेन्सच्या इमारत

श्री.एकनाथ शिंदे...

यांचेसंबंधीची मागणी होऊ शकते. त्यामुळे फनेल झोनच्या संदर्भातील निर्णय मर्यादित ठेवावा लागेल. आपण उभा विकास करु शकत नाही त्यामुळे आडवा स्पेस कमी करता येईल. ३३/७ च्या धर्तीवर सवलती देता येतील. सन २०१३ मध्ये फंजीबल एफएसआय देय झाला. तो प्रिमियममध्ये रुपांतरीत करता आला तर प्रिमिअम एफएसआय तयार होईल. त्यामधील स्कोप असेल तेवढा त्या भागात वापरता येईल. उर्वरित एफएसआयची बाजारात विक्री करता येईल काय, याबाबत विचार करुन निर्णय घ्यावा लागेल. आपण निर्णय घेऊन तो कागदावर राहिला तर त्याचा फायदा होणार नाही. या विषयाच्या संदर्भात नगरविकास विभाग सकारात्मक आहे. पुनर्विकास करणाऱ्या विकासकाची बांधकामाची रक्कम जरी निघाली तरी ठिक आहे. या माध्यमातून आपण त्या भागातील नागरिकांना न्याय देऊ शकू, त्यांचा पुनर्विकास करु शकू. यासर्व बाबी नगरविकास विभागाकडून तपासण्यात येत आहेत. याप्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३७ (१) (क)(क) अंतर्गत सूचना व हरकती मागावता येतील. समितीमध्ये आणखी काही सूचना असतील तर त्या घेता येतील. फनेल झोनमध्ये उंची वाढविता येत नाही, तेथील इमारतींच्या पुनर्विकासाची मागणी अनेक वर्षापासूनची आहे. हा मुद्दा आपल्या सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचा असून यासंदर्भात आपल्याला निर्णय घ्यावा लागेल.

यानंतर श्री.तेलंग...

श्री.एकनाथ शिंदे........

नफ्याचा विषय सोडा, पुनर्विकासासाठी जी कॉस्ट ऑफ कन्स्ट्रक्शन आहे ती जरी त्यामधून निघाली तर माझ्या माहितीप्रमाणे त्या भागातील लोकांना आपण न्याय देऊ शकतो, त्यांचा पुनर्विकास होऊ शकतो. सदर सर्व बाबी नगर विकास विभाग तपासून पाहत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७/१ क क अंतर्गत सूचना, हरकती प्रसिद्ध केल्यानंतर, कमिटीमध्ये आणखी काही सूचना असतील तर त्यामध्ये घेता येऊ शकतील. फनेल झोनमध्ये आपल्याला उंची वाढविता येत नाही. पुनर्विकास केला जाऊ शकत नाही. लोकांची मागणी गेल्या अनेक वर्षापासूनची आहे. हा मुद्दा आपल्या सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे म्हणून यावर आपल्याला निर्णय घ्यावा लागेल.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये पूर्वी म्हाडाने PMGP योजनेअंतर्गत पुनर्विकास केलेला आहे. तीस वर्षामध्ये एकदा फायदा दिल्यानंतर पुन्हा तीस वर्षानंतर आपल्याला पुनर्विकास करता येत नव्हता. परंतु त्यामध्ये अधिनियम १९६६ च्या कलम ३३/७ अन्वये पुनर्विकास करण्याची परवानगी अनुज्ञेय केलेली आहे. उपकर प्राप्त इमारतींचे पुनर्विकासास प्राधान्य देण्यासाठी इन्सेटिव्ह क्षेत्रामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. पूर्वीचे ५० टक्के जमिनीचा दर आणि बांधकामाचा खर्च विचारात घेऊन त्यामध्ये ७५ टक्के ते १०० टक्के इन्सेटिव्ह FSI वाढविलेला आहे. पुनर्विकासाचे जे प्रकल्प आहेत, ते FSI मुळे थांबू नयेत, त्यांना गती मिळाली पाहिजे हाच उद्देश समोर ठेवण्यात आलेला आहे. उपकर प्राप्त मिळकतीमध्ये अधिनियम १९६६ च्या कलम ३३/७ अन्वये पुनर्विकासामध्ये बिगर उपकर इमारतीचे क्षेत्र देखील २५ टक्केच्या ऐवजी ४५ टक्के चटई निर्देशांकाचे फायदे लागू केलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, त्याच बरोबर अधिनियम १९६६ च्या कलम ३३/७ अन्वये वेगवेगळया क्लबिंग स्कीममध्ये देखील सवलत देण्यात आलेली आहे. पूर्वी असा निर्णय झालेला नव्हता. परंतु शासनाने सारासार विचार करुन अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे.

श्री.एकनाथ शिंदे........

अधिनियम १९६६ च्या कलम ३३/७ अंतर्गत क्लस्टर डेव्हलपमेंटला चालना देण्यासाठी भाडेकरू, रहिवासी यांना पुनर्वसन सदनिकांचे क्षेत्र पूर्वी २७.८८ चौ.मीटर होते ते ३०० चौ.फुटाऐवजी ३७६ चौ.फूट एवढे करण्यात आलेले आहे. क्लस्टरचे क्षेत्र जेवढे मोठे तेवढा सुनियोजित विकास करता येतो, याकरिता मोठ्या क्लस्टरला चालना देण्यासाठी या क्षेत्रामध्ये देखील वाढीनुसार Incentive FSI दिला आहे. ४ हजार चौ.मीटरपर्यंत क्लस्टर डेव्हलपमेंट करण्याची मुभा आहे. ४ हजार चौ.मीटरपेक्षा मोठ्या भूभागावर, १० हेक्टरपेक्षा मोठ्या क्षेत्रावर अधिनियम १९६६ च्या कलम ३३/९ अन्वये Incentive क्षेत्र ३५ टक्के करण्यात आलेले आहे. एकंदरित अधिनियम १९६६ च्या कलम ३३/९ योजनेमध्ये Incentive एरियामध्ये वाढ केली आहे. पूर्वीचे क्षेत्र ५५ टक्के ते १०० टक्के ऐवजी जमिनीचा दर तसेच बांधकामाचा खर्च विचारात घेता ८५ टक्के ते ११३ टक्के पर्यंत Incentive केलेला आहे. या Incentive क्षेत्राच्या ३० टक्के वाणिज्य वापरात वाढ करून ५० टक्केपर्यंत वाणिज्य वापरास परवानगी देण्याचे अधिकार देखील महापालिका आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. याबाबत अनेक निर्णय घेण्यात आलेले आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी, श्री.सुनिल प्रभू यांची मागणी होती की, म्हाडाने पुनर्बांधणी केलेल्या ३८८ इमारती आहेत. या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत तरतूद करण्याची त्यांनी विनंती केली होती. त्या अनुषंगाने सदर इमारतींचा पुनर्विकास करण्यासंदर्भात अधिनियम १९६६ च्या कलम ३३/२४ मध्ये स्वतंत्र तरतूद करण्यात आलेली आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये नवीन तरतूद करण्याची मागणी मान्य करण्याचा निर्णय दिनांक २८.०२.२०२२ रोजी घेण्यात आलेला आहे. मुंबई शहरात म्हाडाने बांधलेल्या ३८८ इमारती भाडेपट्ट्याने दिलेल्या आहेत. या इमारती ३० वर्षे जुन्या आहेत. त्यामुळे या इमारतींचे देखील महापालिकेच्या इमारतींचे पुनर्विकास या तरतुदीच्या अंतर्गत पुनर्विकास करणे शक्य होणार आहे. सदर रहिवाशांचे पुनर्वसन मालकी हक्कावर ३०० चौ.फूट कार्पेट क्षेत्राच्या रहिवासी सदनिकेत करण्यात येईल. त्या व्यतिरिक्त ३५ टक्के फंजिबल

श्री.एकनाथ शिंदे........

क्षेत्राचा देखील यामध्ये वापर करता येईल. असे अनेक निर्णय नगर विकास विभागाने घेतलेले आहेत. त्यामुळे पुनर्विकासाला कोठेही बाधा येणार नाही.

अध्यक्ष महोदय, कोळीवाड्याच्या संदर्भात आपण निर्णय घेत आहोत. त्यासाठी एक धोरण ठरवावे लागणार आहे. काही लोकांची क्लस्टर डेव्हलपमेंट करण्याची मागणी आहे. काही लोकांचे म्हणणे आहे की, आहे तसेच नियमित करा. नवी मुंबईतील गावठाणमध्ये गरजेपोटी जी बांधकामे केलेली आहेत, ती बांधकामे नियमित करण्यात आलेली आहेत. कोळीवाड्याच्या क्षेत्रामध्ये राहणारे जे भूमीपुत्र आहेत, त्यांना देखील न्याय देण्याची आवश्यकता आहे. सगळया बाबींचा विचार करून कोळीवाड्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. ५०० चौ.फुटापर्यंतचा मालमत्ता कर शासनाने माफ केलेला आहे. त्यावर देखील काही सन्माननीय सदस्यांनी भाष्य केलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेता यांना माहिती आहे की, सन २०१९ मध्ये ५०० चौ.फुटापर्यंत सामान्य कर माफ करण्याचा निर्णय घेतला होता. आता जो निर्णय घेतला आहे त्यामध्ये ५०० चौ.फुटापर्यंतचा पूर्ण मालमत्ता कर माफ केलेला आहे. कोळीवाड्यातील जी ५०० चौ.फुटाची जी घरे आहेत त्यांनाही याचा फायदा होणार आहे. यामध्ये ३५ लाख घरांपैकी १६ लाख घरांना या निर्णयाचा फायदा होणार आहे.

अध्यक्ष महोदय, सफाई कामगारांसाठी महापालिकेच्या माध्यमातून १२ हजार घरे बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे. याबाबतचे कामही सुरू झालेले आहे. परंतु २९ हजार सफाई कामगार आहेत. त्यांना एकाच वेळी मालकी हक्काची घरे देता येणार नाहीत. त्यामुळे सर्व्हिस क्वार्टर म्हणजे जो मुंबई महापालिकेमध्ये कामाला लागला त्याच्या वारसाला पुढील नोकरी मिळत असते. त्याची पत्नी, मुलगा, भाऊ, भावाचा मुलगा, नातेवाईक किंवा यापैकी कोणीही नसेल तर संबंधिताने एखाद्या विषयी माझा सांभाळ करणारा आहे असे शपथपत्र दिल्यास त्या व्यक्तिला देखील नोकरी लावण्याची त्यामध्ये तरतूद आहे. त्यामुळे सर्व्हिस क्वार्टर एकदा मिळाला तर तो काही वाऱ्यावर जाणार नाही. सर्व्हिस क्वार्टरमध्ये त्याचे नातेवाईक राहतील.

श्री.एकनाथ शिंदे........

सर्व्हिस क्वार्टरचे टार्गेट पूर्ण झाल्यानंतर मालकी हक्काची घरे त्यांना देता येतील. यासाठी आश्रय योजना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना अशा योजना आहेत. या योजनांच्या माध्यमातून त्यांना न्याय देता येऊ शकेल. सफाई कर्मचारी हे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. त्यासाठी आपण निर्णय घेतो आहोत.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी मेट्रोच्या संदर्भात देखील प्रश्न उपस्थित केले होते. मेट्रोमध्ये सध्या मार्ग १ वर्सोवा-अंधेरी–घाटकोपर हा ८ जून २०१४ पासून कार्यरत आहे. मार्ग २ अ दहिसर -डीएन नगर हा अंतिम टप्प्यात आहे. ९९.२ टक्के स्थापत्य कामे पूर्ण झालेली आहेत. डीएन नगर- मनाळे १६.१ टक्के स्थापत्य कामे पूर्ण झालेली आहेत. मार्ग ३ कुलाबा – वांद्रे या मार्गाचे ७२ टक्के काम पूर्ण झालेले आहे. वडाळा- कासरवडोली ३५ टक्के स्थापत्य कामे पूर्ण झालेली आहेत. कासरवडोली-गायमुख २६.१४ टक्के स्थापत्य कामे पूर्ण आहेत.

अध्यक्ष महोदय, ठाणे – भिवंडी – कल्याण ५१ टक्के काम पूर्ण झालेले आहे. विक्रोळी – स्वामी समर्थ नगर ४८ टक्के स्थापत्य कामे पूर्ण झालेले आहे. अंधेरी पूर्व-दहिसर पूर्व यामधील काम अंतिम टप्प्यात असून ९९ टक्के काम पूर्ण झालेले आहे. दहिसर – मिरा भाईंदर – अंधेरी २३.९ टक्के स्थापत्य काम पूर्ण झालेले आहे. विमानतळ DMRC कडून DPR प्राप्त झालेला आहे. गायमुख रोड यामध्ये सल्लागारची नियुक्ती करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. जवळपास ३३७ किलोमीटरचा मेट्रोचा प्रकल्प आहे. सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर या मुंबई शहरातील वाहतूक कोंडी दूर होईल. त्यामध्ये लोकांना मेट्रोतून प्रवास करता येऊ शकेल आणि मोठ्या प्रमाणावर रेल्वेवर असलेला ताण कमी होईल.

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. एकनाथ शिंदे....

मुंबई शहराची लाईफलाईन म्हणून लोकल आणि रेल्वेकडे पाहिले जाते. तसेच मेट्रोदेखील लोकांच्या उपयोगासाठी येईल. ही सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. मी सांगू इच्छितो की, आज नवी मुंबईमध्ये १४ गावांचा समावेश केला आहे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र चव्हाण यांची आग्रही मागणी होती. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, १४ गावांबाबतचा अतिशय महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतला आहे. या गावांना मुलभूत सुविधा नव्हत्या. आता त्या देण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील जनतेला मुलभूत सुविधा दिल्या जाणार आहेत. मी कोळीवाड्याचाही उल्लेख केला आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागाने युनिफाईड डीसीपीआर प्रसिद्ध केला आहे. राज्यातील विविध शहरांमध्ये विविध नियम आणि तरतुदी होत्या. या तरतुदींचे वेगवेगळे अर्थ (इंटपप्रिटेशन) काढले जात असे. यात लोकांना अडचणींचा सामना करावा लागत असे. यामुळे नगर विकास विभागाने युनिफाईड डीसीपीआर लागू केल्यानंतर संपूर्ण राज्यात समान नियंत्रण नियमावली करण्यात आली आहे. डेव्हलपमेंट कंट्रोल रुल (डीसीआर) न करता प्रोत्साहन दिले आहे. (..अडथळा...) मी सांगू इच्छितो की, आमदार निवासाचा एफएसआय वाढविण्यात आला आहे. मनोरा आमदार निवासाचे काम प्रगतीपथावर आहे. त्यावर आपण स्वतंत्रपणे चर्चा करु. हे काम युद्धपातळीवर झाले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, युनिफाईड डीसीपीआरच्या माध्यमातून चांगले निर्णय घेतले आहेत. हे करीत असताना या नियमांचा सर्वांना फायदा झाला पाहिजे. शेत जमिनीसाठीही सुरुवातीला ०.२० इतका एफएसआय होता. तो आता १ इतका केला आहे. त्या जमिनीवर व्यवसाय करता येईल, रोजगार उपलब्ध करता येईल. शेतकऱ्यांनाही याचा फायदा होणार आहे. अशा प्रकारचे निर्णय घेतले आहेत. एफएसआय वाढविल्यामुळे परवडणाऱ्या घरांची मागणी आणि पुरवठा वाढल्यामुळे लोकांना घरे मिळत आहेत. तसेच शासनाने ५० टक्के प्रिमियअमचाही निर्णय घेतला आहे. कोरोना संकट असतानाही मागील दहा वर्षात जेवढे खरेदी, विक्रीचे व्यवहार

श्री. एकनाथ शिंदे....

झाले नाहीत, तेवढे या काळात झालेले आहेत. यह बाबत सम्माननीय सदस्य श्री. मंगलप्रभात जी को अच्छी तरह से पता है. उनके पास हिसाब-किताब रहता है. प्रिमियम का फायदा हुआ या नहीं ? क्या स्टॅम्प ड्युटी, प्रिमियम का फायदा हुआ ना? अन्य राज्यों ने भी पूछा है कि ये कैसे हुआ है? कोविड के समय में अपनी इकॉनॉमी पूरी खत्म हो चुकी थी. यासर्वांना चालना दिली आहे. कृषि विभागानंतर सर्वाधिक रोजगार रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये आहे. या क्षेत्रावर अवलंबून जवळपास २०० ते २५० छोटे-मोठे उद्योग आहेत. इसमें बुरा मानने की क्या जरुरत है? आप लोग तो रोजगार भी देते है. याला शासनाने चालना दिलेली आहे. हे सर्व करीत असताना कोणतीही अडचण राहू नये, यासाठी प्रयत्न करण्यात आले आहे. मला अनेक लोकांनी सांगितले की, विकासकाला सपोर्ट करीत आहेत. परंतु मी सांगितले की, डेव्हलपर जिंदा रहेगा तो लाखों लोगों को रोजगार मिलेगा. लोगों को रोजगार मिलेगा. युनिफाईड डीसीआर तयार करीत असताना सर्वांच्या सूचना घेतल्या आहेत. यात क्रेडाई, एमसीए, नरेडको यांच्याही सूचना घेतल्या आहेत. या सूचना केवळ कागदावर राहू नयेत, म्हणून हा निर्णय शासनाने घेतला आहे. याचा फायदा झालेला आहे. आपला हेतू शुद्ध असला तर आपणास घाबरण्याचे कारण नसते. यात असलेल्या काही अडचणीही दूर केल्या आहेत. जसे की, रिमोल ऑफ डिफिकल्टीज (आर.ओ.डी.) केले आहे. 'फ्रिक्वेंटली आस्क क्वश्चन' हे पूस्तक तयार केले आहे. आर्किटेक्ट नहीं रहेगा तो भी लोगों को मालूम पड़ेगा. आपको भी मालूम पड़ेगा कि इसमें अपने को क्या करना है. आपका वह भी खर्चा बचत किया है. कोरोना काळात या क्षेत्राला आपणास मदत करावयाची होती. काही अडचण आली तर विभागाने तयार केलेल्या पुस्तकाचे मार्गदर्शन घ्यावे. यात सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण दिले आहे.

अध्यक्ष महोदय, अशा प्रकारे नगर विकास विभागाने निर्णय घेऊन एफएसआय वाढविला आहे. एकेका गृहसंकुलामध्ये एकेक मजला एफएसआय फ्री केला आहे. तेथे त्या गृहनिर्माण संकुलाकडून विविध कार्यक्रम तेथे घेता येतील. मी सांगू इच्छितो की, नगर विकास विभागाच्या माध्यमातून अनेक प्रयत्न केले आहेत.

श्री. एकनाथ शिंदे....

माननीय मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांना त्यांच्या विभागाचे किंवा म्हाडाचे काही नियम बदलावयाचे असतील तर ते माझ्याकडे थेट फाईल घेऊन येत असतात. मी त्यावर लगेच सही देत असतो. म्हाडाच्य पुनर्विकासाकरिता ज्या ज्या अडचणी होत्या त्या नगर विकास विभागाच्या माध्यमातून दूर केल्या आहेत. मी कोणावरही टीका करणार नाही. नगर विकास विभगाने अनेक निर्णय केले आहेत. विकासक, शेतकरी, सर्व सामान्य माणसांना दिलासा दिला आहे. सर्वसामान्य माणसांना दीड हजार फुटाचे घर बांधावयाचे असेल तर कोणतीही परवानगी लागणार नाही. यात केवळ त्यांना त्या घराचा प्लॅन सबमिट करावा लागेल. ३ हजार फुटाचे घर बांधावयाचे असेल तर दहा दिवसांमध्ये डीम्ड सॅक्शन दिले जाणार आहे. यामुळे त्यांचा त्रास कमी होणार आहे. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात कोरोना काळातही आर्थिक परिस्थितीचा ताळमेळ बसला पाहिजे, याचा विचार करुन हे निर्णय घेतले आहेत. देशात आणि राज्यात कोरोना संकट, निसर्ग चक्रीवादळ, तौक्ते चक्री वादळ आले होते. या सर्वातही राज्य सरकारने विकास कामांना कात्री लावलेली नाही. आजही विकासाची कामे वेगाने सुरु आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्या कार्यकाळात स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे काम सुरु झाले होते. त्या प्रकल्पात आता वाढ करुन तो गडचिरोली, भंडारा, गोंदिया, जालना, नांदेडपर्यंत करण्यात येत आहे. समृद्धी महामार्ग राज्याच्या विकासाकरिता अतिशय महत्त्वाचा आहे. हा राज्यातील गेम चेंजर प्रोजेक्ट आहे. माननीय मुख्यमंत्री आणि इतरही सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य भावनेतून काम केले आहे. म्हणून कोरोना संकटातही विकासाला कात्री लावली नाही, हे मी यानिमित्ताने सांगतो. ज्या सन्माननीय सदस्यांच्या भाषणांचा मी येथे ऊहापोह केला नसला तरीही त्यांची नोंद घेतलेली आहे. त्याबाबत नगर विकास विभागाकडून सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. राज्याच्या विकासाला गती देणारा अर्थसंकल्प माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी काही दिवसांपूर्वी सादर केला आहे. हा अर्थसंकल्प केवळ महाराष्ट्राचाच नव्हेत तर देशाचा आर्थिक भार सोसणाऱ्या मुंबईची पुढील रुपरेषा कशी असणार आहे, हे ठरविण्याच्या दृष्टीने तो सादर केला आहे. मुंबईत राहणारे कष्टकरी लोक दुसऱ्याची घरे बांधतात. परंतु त्यांना रहाण्यासाठी स्वत:चे घर नसते. अन्न वस्त्र आणि निवारा या माणसांच्या मुलभूत गरजा आहेत. आज लोकांना अन्न आणि वस्त्र मिळते. परंतु दिवसभर काम केल्यानंतर विसावा घेण्यासाठी स्वत:चे घर नसते.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे.....

सन १९९५ साली युतीचे सरकार आले तेव्हा आदरणीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुखांनी झोपडपट्टीवासियांना त्यांच्या हक्काची मोफत घरे मिळाली पाहिजेत हा विचार मांडून त्या दिशेने पावले टाकण्यात सुरुवात केली. त्याला किती वर्षे उलटून गेली आहेत याची आपणा सर्वांना कल्पना आहे. झोपडपट्टी पुनर्विकासाचे अनेक प्रकल्प सुरु झाले परंतु त्याची गती कासवाच्या गतीपेक्षाही मंद राहिली. आपण असे मानतो की, आजोबांनी लावलेल्या नारळाचे फळ त्यांच्या नातवाला मिळत असते. परंतु यादृष्टीने झोपडपट्टीवासियांचा विचार केला तर त्यांच्या नातवंडांच्याही पुढची पिढी येत आहे. अर्थात, या योजनेला देखील फळे लागत आहेत परंतु मलई कोण खात आहे हा संशोधनाचा विषय आहे. अनेक वर्षे हे लोक स्वत:च्या हक्कांची घरे विसरुन संक्रमण शिबिरांमध्ये राहत आहेत, काबाडकष्ट करीत आहेत. अशा लोकांना घरे मिळवून देण्यासाठी ज्या योजना आणल्या आहेत त्याबद्दल मी तिन्ही सहकारी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो आणि त्यांचे आभार देखील मानतो.

अध्यक्ष महोदय, मुंबईचा एवढा गांभिर्याने विचार... यामध्ये गांभिर्याने हा शब्द अतिशय महत्त्वाचा आहे. कारण आतापर्यंत विचार करण्यात आला परंतु बऱ्याचदा मुंबई ही सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे या दृष्टीकोनातून तिच्याकडे पाहिले गेले. ही कोंबडी सोन्याचे अंडे देत आहे व लोक ते घेऊन जात आहेत परंतु या कोंबडीची निगा कोण राखणार हा मुद्दा होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून मुंबईसाठी संघर्ष करणाऱ्यांपासून ते गिरणी कामगार, इतर काबाडकष्ट करणारे लोक, ज्यांनी या ठिकाणी घाम गाळला, रक्त सांडले त्यांचा कोणीही विचार केला नव्हता. त्यांचा विचार करुन केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्षात आणणाऱ्या या सरकारकडून विविध योजना आखून त्यांच्या कामांना गती दिली जात आहे त्याबद्दल मला शिवसेनाप्रमुखांचा पुत्र म्हणून अभिमान वाटतो.

अध्यक्ष महोदय, हे जाहीर केलेल्या योजनांबद्दल झाले. काही योजना करायच्या मनात आहेत परंतु त्या केवळ आपल्या हातात नाहीत.

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे.....

उदाहरणार्थ, धारावीचा पुनर्विकास. मला आठवते आणि मी अनेकदा सांगितले असेल की, ज्यावेळी आम्ही कलानगरमध्ये राहायला आलो त्यावेळी तेथे चौफेर खाडी पसरलेली होती. पुढे तेथे विकास झाला. मोठमोठी ऑफिसेस झाली. आज तेथे बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स आहे. असे म्हणतात की, जगातील सर्वात महागडया जागांपैकी ती एक जागा आहे. त्याच्या बाजूलाच धारावी आहे. धारावीचा देखील विकास झाला पाहिजे. परंतु धारावीचा अजूनही विकास होऊ शकत नाही. याबाबत आपली केंद्रासोबत बोलणी सुरु आहे. रेल्वेच्या जमिनीचे सुमारे ८०० कोटी रुपये आपण त्यांना दिलेले आहेत. मी स्वत: माननीय रेल्वे मंत्र्यांशी यासंदर्भात बोललो आहे परंतु अद्यापही सदर जमीन आपल्याकडे हस्तांतरित होत नाही. अशा काही अडचणीच्या गोष्टी आहेत. केंद्र सरकारच्या मुंबईतील जागांचे काय केले पाहिजे, त्यांचा कसा विनियोग केला पाहिजे याचा केवळ विचार करुन चालणार नाही तर केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन त्याचा निकाल लावला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आपण मुंबईतील लोकांसाठी या योजना जाहीर केल्या. परंतु लोकप्रतिनिधींचे काय ? मला हे सांगायला आनंद वाटतो आहे की, आपण जवळपास ३०० आमदारांसाठी घरे बांधणार आहोत. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींशी चांगले संबंध असले पाहिजेत. राज्याच्या हिताचे विषय मांडणाऱ्या लोकप्रतिनिधीला देखील चांगले घर असावे ही भूमिका यामागे आहे. आमदार असेपर्यंत... (अडथळा...) आमदार असेपर्यंत असे बोलून मी सभागृहाची प्रतिक्रिया पाहत होतो. आपण आमदारांना कायमस्वरुपी घरे देत आहोत याचा मला आनंद वाटतो आहे.

अध्यक्ष महोदय, झोपडपट्टी पुनर्वसनाच्या रखडलेल्या योजनांना कशी गती द्यायची याबाबत आम्ही अनेकदा विचार केला. काही विकासकांनी अशा योजनांमध्ये लुटमार केली, लुबडणूक केली, हे विकासक कोण आहेत याचीही चौकशी केली जाईल. परंतु ज्यांची घरे अडली आहेत त्यांचा यामध्ये काहीही दोष नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी आपण ॲमनेस्टी स्किम आणत आहोत. ही योजनादेखील अशा रहिवाशांना घर देणाऱ्या योजनांना चालना देणारी असेल.

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे.....

अध्यक्ष महोदय, म्हाडाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या घरांसाठी येणाऱ्या अडचणी दूर करुन देशात सर्वात उत्तम उदाहरण उभे करण्याचा आमचा केवळ विचार नाही तर प्रयत्न करुन आम्ही ते करुन दाखविणार आहोत. कारण आम्ही घोषणा करण्यापूर्वी विचार करतो आणि घोषणा केल्यानंतर काम करतो. त्यामुळे घोषणा झालेली आहे व आता काम करणार आहोत... (अडथळा...)

अध्यक्ष महोदय, माननीय गृहनिर्माण मंत्र्यांनी या ठिकाणी गोरेगाव येथील पत्रा चाळ-सिध्दार्थ नगरचा उल्लेख केला. त्याबाबतचा बखेडा देखील आपण सोडवला आहे. कित्येक वर्षे बीडीडी चाळींचा पुनर्विकास करु.. करु.. हे सुरु होते. त्याचा झिम्मा.. फुगडी.. सुरु होती. परंतु आता या कामाला देखील प्रत्यक्ष सुरुवात झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, नोकरदार आणि शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थिनींनी राहायचे कुठे हा प्रश्न होता. त्यांच्यासाठी देखील आपण वसतीगृहे बांधत आहोत. तसेच म्हाडाचे सेवा शुल्क किंवा अकृषिक कर यामुळे अडकलेल्या रहिवाशांनाही आपण दिलासा देत आहोत.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहर स्वच्छ ठेवणाऱ्या सफाई कामगारांचे आयुष्य खूप वाईट असते. ते जे काम करतात त्यामुळे आपण सुखाने राहू शकतो. असे असतानाही आपण त्यांना स्वत:चे घर देऊ शकत नसू तर आपल्याला लाज वाटली पाहिजे. त्यामुळे त्यांचा देखील या धोरणामध्ये आपण विचार केला आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई आणि महाराष्ट्रातील जनतेला मी सांगू इच्छितो की, ज्याप्रमाणे आपण ग्रामीण भागातील जनतेला घरे देत आहोत त्याप्रमाणे शहरात राहणाऱ्या आणि कष्ट करणाऱ्या लोकांना देखील घरे देत आहोत. अनेकदा असे होते की, निवडणुकीच्या वेळी आपण घोषणा करतो, निवडून येतो आणि नंतर विसरुन जातो. नंतर आपण सांगतो की, "असे बोलावेच लागते. अशा अनेक गोष्टी असतात."

श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे.....

परंतु महाविकास आघाडी सरकार हे केवळ बोलणारे नाही तर जे बोलतो ते करुन दाखविणारे सरकार आहे. आज या ठिकाणी मुंबईकरांच्या हिताच्या बोललेल्या गोष्टी देखील आम्ही करुन दाखविल्याशिवाय राहणार नाही, हे वचन पुन्हा एकदा माझ्या मंत्री मंडळाच्या आणि सरकारच्या वतीने मी देतो. धन्यवाद. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---------

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मला एक बाब मंत्री महोदयांच्या लक्षात आणून द्यायची आहे. आपण रिडेव्हलपमेंटच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा केली. रिडेव्हलपमेंटमध्ये नॉन-कन्सेटिंग मेंबरच्या संदर्भात आपण मागील सरकारच्या काळात बदल करुन ५१ टक्के लोकांची मान्यता असेल तर आपण मंजूर करतो. मुंबईमध्ये सहकारी संस्था जास्त आहेत. परंतु इतरत्र ज्या फ्लॅट स्किम्स किंवा रहिवाशी संकुले आहेत ते अपार्टमेंट ओनरशिप ॲक्टच्या अंतर्गत येतात. ते सहकार कायद्यांतर्गत येत नाहीत. त्यामुळे जोपर्यंत आपण अपार्टमेंट ओनरशिप ॲक्टमध्ये देखील अशा प्रकारे सुधारणा करीत नाहीत तोपर्यंत पुणे, नागपूर, इत्यादी ठिकाणी पुनर्विकास होऊ शकणार नाही. खूप पूर्वी म्हणजे दहा-बारा वर्षापूर्वी यासंदर्भात एक अध्यादेश काढण्यात आला होता परंतु नंतर तो लॅप्स झाला. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण यासंदर्भात एक अध्यादेश काढावा किंवा पुढील अधिवेशनामध्ये याबाबतचे विधेयक आणावे. अर्थात, अध्यादेश काढला तर ते अधिक चांगले होईल. आम्ही त्याला मान्यता देऊ. ज्या तरतुदी सहकार कायद्यामध्ये केल्या आहेत त्याच तरतुदी अपार्टमेंट ओनरशिप ॲक्टमध्ये देखील कराव्यात, ही माझी विनंती आहे.

डॉ.जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. पुण्यामध्ये या बाबीमुळे अडचणी येत आहेत. त्यामुळे अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट व सहकार कायद्यातील तरतुदी सारख्या केल्या जातील.

श्री.अभिमन्यू पवार : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे हे मघाशी बोलताना म्हणाले की, "माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांना कदाचित वाटत नव्हते की समृध्दी महामार्ग होईल." परंतु चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी हे बोलत आहे. मुळात समृध्दी महामार्गाची संकल्पनाच तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेली आहे. त्यावेळी देखील माननीय श्री.एकनाथ शिंदे हे मंत्री होते. त्यामुळे ज्यांची संकल्पना आहे त्यांनाच हा प्रकल्प होईल की नाही याबाबत कशी शंका असेल ? माझी विनंती आहे की, चुकीची गोष्ट रेकॉर्डवर येऊ नये म्हणून ती रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावी.

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अभिमन्यू पवार यांनी सांगितले की, समृध्दी महामार्गाची संकल्पना तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांची होती. माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे हे बोलताना असे म्हणाले होते की, "समृध्दी महामार्गाला पुढे गडचिरोलीपर्यंत नेण्याचे काम मी केले. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या मार्गावरुन चालण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत व तो पुढे घेऊन चाललो आहोत." त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी वाईट वाटून घेण्याचे काहीही कारण नाही. तसेच ही बाब रेकॉर्डवरुन देखील काढून टाकण्याची गरज नाही.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सभागृहाची परवानगी असेल तर..

**तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) :** सभागृहाची परवानगी असेल तर कोणता शब्द रेकॉर्डवरुन काढायचा आणि कोणता काढायचा नाही, हा विषय फार गंभीर असतो. सर्रास हे रेकॉर्डवरुन काढा किंवा ते रेकॉर्डवरुन काढा इतका हा मामुली विषय नसतो. पण सध्या आपण कोणताही शब्द काढा असे म्हणतो. त्यावर कधी तरी बोलू.

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, एका गंभीर विषयाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. या ठिकाणी गृहमंत्री सुध्दा उपस्थित आहेत. येत्या १० एप्रिलला रामनवमी आहे आणि मर्यादा पुरुषोत्तम राम यांचे सोहळे संपूर्ण महाराष्ट्रात होतात. मिरवणुका सुध्दा निघतात. त्यामुळे श्रीरामाच्या मिरवणुकांवर कुठे तरी मर्यादा घालण्याचे काम प्रशासनाकडून होते की काय...

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आधी आपण सभागृहासमोर प्रस्तावाचा असलेला विषय आधी संपवू.

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मला वाटले की, आपण आता पुढे गेला आहात म्हणून मी बोलण्याचा प्रयत्न केला.

**तालिका सभाध्यक्ष :** नाही. मला वाटले की, आपण प्रस्तावावर काही प्रश्न विचारता म्हणून मी आपल्याला बोलण्याची संधी दिली. ठीक आहे. आपण नंतर विचारा. परंतु आता आपण हा प्रस्ताव पूर्ण करु.

सभागृहाने या विषयावर विचार केला आहे. आता प्रस्ताव संपला आहे. आता सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार प्रश्न विचारु शकतात.

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मी विषय मांडला आहे की, येत्या १० एप्रिलला रामनवमी सण आहे. आपल्या राज्यात आणि देशात रामनवमीचे मोठे कार्यक्रम होतात. मर्यादा पुरुषोत्तम श्री रामाच्या मिरवणुकीत आपण मर्यादा घालू नये, जशी आपण शिवजयंतीची परवानगी दिली तशा रामनवमीच्या बाबतीत सुध्दा सरकारने परवानग्या दिल्या पाहिजेत. यामधून आपल्या सर्वांना पुढे एकत्रित जायचे

असुधारित प्रत

आहे. गुढीपाडव्याला सुध्दा मिरवणूका असतात आणि रामनवमीला सुध्दा असतात. त्यामुळे याबाबत सरकारने आपली भूमिका स्पष्ट केले तर वातावरण चांगले होईल आणि चांगल्या वातावरणात आपण हे सण साजरे करु.

श्री. दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, या संदर्भात मी उद्या स्टेटमेंट करीन.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला आपल्याला सामोरे जायचे नाही, अशी आपल्या सर्वांची इच्छा आहे. पण "काश्मीर फाईल" या सिनेमाच्या बाबतीत सोशल मिडियामध्ये एक व्हीडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या बाबतीत काही थिएटर मालकांना अशा धमक्या दिल्या जात आहेत की, जेथे जेथे हा चित्रपट सुरू असेल तेथे पुढील चित्रपट आपल्याला व्हॉलीवूडकडून दिल्या जाणार नाहीत. दुसरे म्हणजे थिएटरमध्ये सर्व जागा रिक्त असताना बाहेर "हाऊसफूल"चा बोर्ड लावून लोकांना जाऊ दिले जात नाही, अशा प्रकारचे व्हीडीओ व्हायरल झाले आहेत. म्हणून गृहमंत्र्यांनी या व्हीडीओ संदर्भातील सत्यता पडताळणी करावी. जर अशी परिस्थिती मुंबई, पुणे किंवा इतर कुठे असेल तर त्याबाबत माहिती घेऊन सभागृहाला अवगत करावे, अशी आपल्याला विनंती आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, सत्यता पडताळून पाहण्यात येईल.

असुधारित प्रत

**पृ. शी. :** मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे

**मु. शी. :** मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे या विषयासंबंधी सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीष महाजन, नितेश राणे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, अतुल भातखळकर, अमित साटम, योगेश सागर, रणधीर सावरकर, प्रशांत ठाकूर, ॲड पराग अळवणी, ॲड राहूल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री सुनील राणे, संजय केळकर, रविंद्र चव्हाण, मिहिर कोटेचा, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री पराग शहा, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री महेश बालदी, सुभाष देशमुख, हरिभाऊ बागडे, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री कालिदास कोळंबकर, विजय देशमुख, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, संभाजी पाटील-निलंगेकर, अभिमन्यु पवार, राणाजगजितसिंह पाटील, सचिन कल्याणशेट्टी, राम सातपुते, डॉ.सुरेश खाडे, श्री मोहन मते, सर्वश्रीमती सीमा हिरे, नमिता मुंदडा, श्वेता महाले, ॲड राहूल कुल, श्री दादाराव केचे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री.शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार रावल, जयकुमार गोरे, डॉ.विजयकुमार गावित, डॉ.संजय कुटे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, डॉ.देवराव होळी, श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, प्रा.डॉ.अशोक उईके, सर्वश्री मदन येरावार, राजेश पवार, संतोष दानवे, बबनराव लोणीकर, डॉ.तुषार राठोड, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री. अतुल सावे, प्रशांत बंब, किसन कथोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. गणपत

गायकवाड, कुमार आयलानी, प्रकाश आवाडे, समाधान आवताडे, धनंजय गाडगीळ, प्रताप अडसड, समिर मेघे, हरिष पिंपळे, नामदेव ससाने, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री. राजेश पाडवी, कीर्तीकुमार भांगडिया, भिमराव केराम, गोवर्धन शर्मा, प्रकाश भारसाकळे, लखन मलिक, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, कृष्णा गजबे, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, डॉ. राहूल आहेर, श्री. दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री. मंगेश चव्हाण, नारायण कुचे, तान्हाजी मुटकुळे, महेश चौघुले, रविशेठ पाटील, लक्ष्मण पवार, काशिराम पावरा, संजय सावकारे, सुरेश भोळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव

श्री. देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्ष नेता) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम २९२ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असूनही मूलभूत पायाभूत सुविधा या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नसणे, गेल्या पंचवीस वर्षात मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान अडीच लाख कोटींपेक्षा जास्त कामांच्या निविदा मंजूर होऊन मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होणे, कोव्हीडच्या काळामध्ये मुंबई महानगरपालिकेमध्ये हजारो कोटींचा भ्रष्टाचार झालेला निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेतील इमारत प्रस्ताव व बांधकाम विभागामार्फत ५० हजार कोटींपेक्षा जास्त रकमेचा भ्रष्टाचार होणे, मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षांच्या विविध मालमत्तांवर आयकर विभागाच्या धाडी पडल्यावर त्यांच्या ३८ बेनामी मालमत्ता जप्त केल्या असल्याचे उघडकीस येणे, राजकीय आश्रयाशिवाय हे सर्व शक्य नसणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार, जिजामाता उद्यान व प्राणीसंग्रहालयाच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रिक बसेसचे कंत्राट यासारख्या प्रक्रियांमध्ये घोटाळा झाला असणे, मुंबईच्या कोळीवाडा व गावठाणाकरिता वेगळा डीसीआर तयार करण्याची प्रक्रिया प्रलंबित राहिल्यामुळे मुंबईचे कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था,

श्री. देवेंद्र फडणवीस...

तत्कालीन सरकारच्या कालावधीमध्ये मुंबई मेट्रोपॉलिटन रिजनमध्ये २५६ किलोमीटरच्या मेट्रोच्या जाळयाचे काम सुरू होणे, मात्र या सरकारच्या कार्यकाळात मेट्रोच्या कामाचा झालेला खोळंबा व मेट्रोच्या कामांच्या किंमतीमध्ये १० हजार कोटींपेक्षा जास्त वाढ झालेली असणे, मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने गेल्या १० वर्षांमध्ये ३८,८९९ झाडे तोडण्याची परवानगी दिलेली असतानाही फक्त २७०० झाडांसाठी व अहंकारापोटी आरेची कारशेड रोखली असल्यामुळे मेट्रोचा खोळंबा होऊन हा प्रकल्प दीर्घ काळाकरिता प्रलंबित राहणार असणे, १५ लाख घरांची आवश्यकता असताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत फक्त सुमारे २ लाख घरे तयार झालेली असणे, मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयांमध्ये व खात्यामध्ये होणारा भ्रष्टाचार, सन २०११ पर्यंतच्या सर्व झोपडपट्ट्यांमधील घरांना प्रधानमंत्री आवास योजनेच्याअंतर्गत घरे देण्याचा कायदा सन २०१८ मध्ये पारित होऊनही सदर कायद्याची अंमलबजावणी न होणे, पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पातील भाडेकरुंना बेघर करुन त्यांना भाडेही न मिळणे, म्हाडामध्येही मोठ्या प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार, मुंबईचे डबेवाला भवन व मराठी भाषा भवन अद्याप दृष्टिपथातही नसणे, मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळांची पटसंख्या रोडावून ७० टक्क्यांपेक्षा खाली गेलेली असणे, मुंबईकरांच्या सोयीसुविधांकडे दुर्लक्ष करत असताना मुंबई क्लायमेट ॲक्शन प्लॅनच्यामार्फत पर्यावरण विभागाचे दुटप्पी धोरण हे मुंबईकरांच्या समोर आलेले असणे, पवई तलावामध्ये भराव टाकून पर्यावरणाचे नुकसान करुन हट्टापायी पवई सायकल ट्रॅकचा प्रस्ताव आणणे, सदर सायकल ट्रॅकला मुंबई हायकोर्टाकडून चपराक मिळणे, मुंबई शहरातील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट होत नसल्यामुळे मुंबईचे वातावरण व हवामान दूषित झालेले असणे, मुंबई शहरातील ग्रीन बिल्डिंग्जना मालमत्ता करातून सूट देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे, ठाणे शहरातील स्मार्ट सिटी व अन्य प्रकल्पांतर्गत झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनेक मोठ्या व जनोपयोगी प्रकल्पांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार व अनियमितता, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला ज्येष्ठ नेते दिवंगत श्री.दि.बा.पाटील यांचे नाव देण्याबाबत स्थानिक जनता व भूमिपुत्रांकडून सातत्याने होत असलेली मागणी, या

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस...

मागणीबाबत तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती ही कधी नव्हे एवढी खालच्या स्तराला गेलेली असणे, मुंबईमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटामधील आरोपींशी या सरकारमधील मंत्र्यांनी केलेल्या आर्थिक व्यवहाराच्या संदर्भामध्ये सदर मंत्र्याना अटक होऊनही त्यांचा राजीनामा न घेऊन सरकार त्यांना पाठीशी घालत असणे, सचिन वाझे व ॲन्टीलिया प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर पोलिसांच्या प्रतिमेला तडा गेलेला असणे, अलिकडेच मुंबईतील एक पोलीस उपायुक्त एका वसुली प्रकरणामध्ये फरार असणे, नुकतेच सोलापूर येथे पोलीस उप निरीक्षकच वरिष्ठांतर्फे वसुली करत असल्याचे माहिती अधिकार कार्यकर्त्यांने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये उघड होणे, विदर्भ, मराठवाडा या मागास भागाचा अनुशेष दूर करण्यास वैधानिक विकास मंडळाचा मोठा वाटा असताना दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी मुदत संपल्यानंतर सरकारने वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ दिलेली नसणे, परिणामी या भागांचा खुंटलेला विकास व शिल्लक अनुशेषात झालेली वाढ, सरकारने तातडीने वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अध्यक्ष महोदय, मी हा संपूर्ण प्रस्ताव वाचण्यापेक्षा फक्त कामकाजाचा भाग झाला असे म्हणतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.भास्कर जाधव) :** ठीक आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आज आनंदाची गोष्ट आहे. कारण छोटे का होईना, पण माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण आम्हाला या सभागृहात ऐकायला मिळाले.

अध्यक्ष महोदय, एकूणच महाविकास आघाडी सरकारच्या संदर्भात त्यांनी मुद्दे मांडताना आम्ही चांगले काम करीत आहोत, आम्ही असे म्हणण्यापैकी नाहीत की आम्ही निवडणुकीपुरते असे म्हटले, पण आता हे करणार नाही. ठीक आहे. कदाचित ते विसरले असतील की, ५० हजार रुपये हेक्टरी शेतकऱ्यांना बांधावर जाऊन देणार

श्री. देवेंद्र फडणवीस...

वगैरे. आता तो विषय आपण काढू नये. मात्र मला आनंद आहे की, आज या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण ऐकायला मिळाले.

अध्यक्ष महोदय, माननीय विं.दा. करंदीकर यांची आत्ताच्या सरकारच्या एकूण परिस्थितीवर कविता आपल्याला ऐकवावी, असे मला वाटते. सरकार नावाची यंत्रणा किती उदास झाली आहे आणि कशा प्रकारे लोकांच्या संदर्भात या सरकारला काही घेणंदेणंच नाही. नवीन प्रकल्प नाहीत. नवीन योजना नाहीत. योजनांची अंमलबजावणी नाही. सुरू असलेले प्रकल्प बंद पडले आहेत. केवळ टीका, आरोप, टोमणे या पलिकडे या सरकारच्या माध्यमातून काहीच होताना दिसत नाही. म्हणून कविवर्य विं.दा. करंदीकर असे म्हणतात की,

"सकाळपासून रात्रीपर्यंत तेच ते !! तेच ते !!
माकडछाप दंतमंजन,
तोच चहा, तेच रंजन,
तीच गाणी, तेच तराणे,
तेच मूर्ख, तेच शहाणे,
सकाळपासून रात्रीपर्यंत,
तेच ते, तेच ते.
खानावळीही बदलून पाहिल्या
कारण जीभ बदलणं शक्य नव्हतं.
काकूपासून ताजमहाल,
सकळीकडे सारखेच हाल,
नरम मसाला, गरम मसाला,
तोच तो भाजीपाला
तीच ती खवट चटणी,
तेच ते आंबट सार
सुख थोडे, दु:ख फार"

अशा प्रकारची अवस्था या सरकारची आपल्याला पहायला मिळते.

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस...

एक हिंदीचे देखील कवि आहेत. त्यांचे नाव पी. एल. बामनिया आहे. त्यांच्या कवितेत सध्याच्या सरकारचे काम कसे चालले आहे त्याची जाणीव आपल्याला होते. आम्ही जे म्हणू तेच खरे आहे किंवा आमचा कारभार उत्तमच चालला आहे, अशी जी भावना या सरकारची झालेली आहे. त्याबाबत ते असे म्हणतात की,

"तुम चाहों तबेलों को बाजार कह दो |
तुम चाहों पतझड़ों को बहार कह दो ||
तुम्हारा ही राज है अभी यहाँ पर |
तुम चाहों तो स्कूटर को कार कह दो ||
छुट्टी का दिन बितने लगा यहीं पर |
अपने दफ्तर को तुम घर बार कह दो ||
इसी पर मिलने लगी अब हर खबर |
अपने मोबाइल को अखबार कह दो ||
तुम्हारी इस सहुलियत भरी जिंदगी मे |
मुसीबत खड़ी करें उसे सरकार कह दो ||
फर्जी डिग्रियां खुब ले ली अब लोगों ने,
तुम चाहों तो पढ़े-लिखे को गवार कह दो |"

अध्यक्ष महोदय, आमचे मुख्यमंत्री असे म्हणतात की, प्रश्न विचारायला अक्कल थोडी लागते. आम्हाला हे माहितीच नव्हते. आम्ही उगीच या सभागृहामध्ये तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न आणि इतर काय काय प्रश्न विचारत बसलो. आधीच

श्री. देवेंद्र फडणवीस...

हे समजले असते तर नसते विचारले. पण काही लोकांना अधिक प्रश्न विचारल्याबद्दल संसदेमध्ये संसदरत्न पुरस्कार मिळतो. काही लोकांना अधिक प्रश्न विचारल्याबद्दल इथेही पुरस्कार मिळतो. पण आज आम्हाला समजलं की प्रश्न विचारायला काही अक्कल लागत नाही. आमची चूक झाली.

अध्यक्ष महोदय, आम्ही आधी म.वि.आ.चा अर्थ महाविकास आघाडी समजलो. नंतर लक्षात आले की हे महाविकास आघाडी नाही तर महाविनाश आघाडी आहे. त्यानंतर लक्षात आले की, महावसुली आघाडी. पण अलिकडच्या काळामध्ये तर ही मद्य विक्री आघाडी झाली आहे. म्हणजे किती दूरचा विचार करुन आपण हे नाव ठेवले, ते आज लक्षात आले. आपण पेट्रोल आणि डिझेलचा कर कमी केला नाही. पण दारुवर ५० टक्के केला. बार लायसन्सच्या नूतनीकरणावर ५० टक्के सूट दिली. नव्याने दारु विक्रीचा परवाना दिला. चंद्रपूरची दारुबंदी मागे घेतली. म्हणजे कोरोनाच्या काळात मंदिरे बंद, मदिरालये सुरू होती. क्लास बंद होते आणि ग्लास सुरू होते. या महाराष्ट्राचे 'मद्यराष्ट्र' करण्याचे काम सुरू आहे. या संदर्भातील अनेक विषय माझ्याकडे आहेत. पण एकच मुद्दा मला विशेषत्वाने मांडावासा वाटतो की, ज्यांनी व्यसनमुक्तीसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले त्या कै. अनिल अवचट यांना सकाळी श्रध्दांजली दिली आणि दुपारी मंत्रिमंडळ बैठकीत आपण वाईन विक्रीचा निर्णय घेतला की आता आपण दुकानातही वाईन विकू शकू. आता आमच्यासमोर प्रश्न एवढाच आहे की... जरी प्रश्न विचारायला अक्कल लागत नाही तरी काही प्रश्न आमच्या डोक्यात येतात.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

श्री. देवेंद्र फडणवीस....

कारण तिथे वाईन विकली जाणार आहे. आमचे एक प्रवक्ते म्हणतात की, वाईन ही दारु नाही तर मग Drund and Drive मधून वाईन वगळली जाणार आहे काय ? हे माननीय गृह मंत्र्यांनी सांगितले पाहिजे. कारण वाईन ही दारु नाही. त्यामुळे वाईन पिऊन ड्राईव्हिंग केले तर, No fine, if you have wine. ती दारु नसल्यामुळे आता वेगवेगळ्या बैठकांमध्ये आपण वाईन सर्व्ह करणार काय असा प्रश्न उपस्थित झाला. त्यामुळे मला एका व्यक्तीने खूप छान लाईन बनवून पाठवल्या. तो म्हणाला की,

"किराणाच्या यादीत आता वाढणार एक लाईन,

बाकीच्या सामानासोबत एक बाटली वाईन,

झिंगत झिंगत येतील मंत्री स्वागत होईल फाईन,

यालाच म्हणतात विकासाचे चालते बोलते साईन,

हळुहळु विकतीलही बहुतेक उघड रम आणि व्हिस्की,

राज्य कारभार करणे आता होणारा रिस्की."

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी वाईनचा निर्णय घेतला, असे सांगण्यात आले. परंतु जर शेतकऱ्यांना मदत करायची होती तर ५० हजार रुपये आपण घोषित केले होते ते द्यायला पाहिजे होते किंवा टोमॅटो केच अप, मोरावळा, जेली, जॅम,ज्युस, ग्रेप्स, सब सीड ऑईल, द्राक्ष मनुका, फळांचे पल्क अशा सर्व बाबी सोडून आपण वाईनच्याच मागे का लागलो आहे हे मला कळत नाही. तरी मी या बाबत अधिक काही बोलणार नाही. आज अनेक विषय चर्चेसाठी आहेत. त्यातील काही विषय माझे सहकारी मांडणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार या विषयावर बोलताना विशेषत: अनुशेषाचा आणि विदर्भाचा विषय मांडणार आहेत. त्यामुळे मी मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात बोलणार आहे.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, देशातील सर्वांत श्रीमंत महानगरपालिका असे मुंबई महानगरपालिकेचे वर्णन केले जाते. यासाठी बरेच रिसोर्सेस आहे त्यामुळे याचा

श्री. देवेंद्र फडणवीस....

विकास झाला पाहिजे, महानगरपालिका पुढे गेली पाहिजे. पण अशी परिस्थिती दिसत नाही. आताच केंद्र शासनाने एक इंडेक्स घोषित केला "Million Plus Municipality and Municipal Performance Index" असे त्याचे नाव आहे. सन २०१७ साली हा इंडेक्स आल्यानंतर आताचे माननीय मुख्यमंत्री आणि तेव्हाचे माननीय पक्षप्रमुख याचाच हवाला देत होते की, बघा, आम्ही या इंडेक्समध्ये किती चांगले काम केलेले आहे. त्यामुळे आपण या इंडेक्सवर विश्वास आहेच. यातील अवस्था अशी आहे की, चौथ्या क्रमांकावर पिंपरी चिंचवड, पाचव्या क्रमांकावर पुणे आणि मुंबई आठव्या क्रमांकावर गेली आहे. तेव्हा आपण पहिला क्रमांक म्हणत होते पण ते ठीक आहे. यामध्ये महत्त्वाचे हे आहे की, आम्ही सातत्याने म्हणतो मुंबईमध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. मघाशी माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, काही जण मुंबईला सोन्याचे अंडे देणारी कोंबडी समजतात. परंतु माझे मत आहे की, महानगरपालिकेत जे सत्ता चालवत आहेत ते महानगरपालिकेला सोन्याचे अंडे देणारी कोंबडी समजतात. अशी महानगरपालिकेची परिस्थिती आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल की, देशातील सर्वांत श्रीमंत महानगरपालिकेचे आणि ज्यांचा क्रमांक देशात आठवा आहे त्याचे "Rank in Financial Management" मध्ये देशात ४५ वा क्रमांक आहे. यामध्ये आठ क्रमांकावर नवी मुंबई, चौदाव्या क्रमांकावर पुणे आणि सतराव्या क्रमांकावर पिंपरी चिंचवड आहे. नागपूर महानगरपालिका सुद्धा आपल्यापेक्षा वरच्या क्रमांकावर गेली आहे. ही महानगरपालिका कोणत्याही महानगरपालिकेच्या तुलनेत गरीब महानगरपालिका आहे आणि रिसोर्सेस कमी आहेत त्याचा ही क्रमांक आपल्यापेक्षा वर आहे. "Financial Resourse Management" मध्ये मुंबई ४५ क्रमांकावर आहे. याचा ग्रॅन्युअल डाटा आपण बघितला तर आपल्या लक्षात येते की, किती प्रकारचे मिस मॅनेजमेंट आपण मुंबईमध्ये करीत आहोत. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या बजेटला लुटून नेण्याचे काम कशाप्रकारे मुंबई शहरामध्ये होत

आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण छोटे होते पण चांगले होते. भावना कितीही चांगली होती की, मुंबईकरांना, गरिबांना, श्रमिकांना आपल्याला काहीतरी द्यायचे आहे. परंतु हे देण्याच्या नावाखाली आपण घेत आहोत.

श्री. देवेंद्र फडणवीस....

अध्यक्ष महोदय, सफाई कामगारांना घरे देण्याच्या संदर्भातील भ्रष्टाचार आमचे सहकारी मांडणार आहेत. "सफाई कामगारांना घर" असा चांगला चेहरा आपण त्याला दिला आहे. पण प्रत्यक्षात सफाई कामगारांच्या नावावर आपल्या स्वत:च्या तिजोऱ्या कशा भरल्या आहेत याबाबत सन्माननीय सदस्य श्री. अमित साटम योग्य प्रकारे माहिती देतील. या योजनेमध्ये आपण केवढा मोठा भ्रष्टाचार केला म्हणजे सफाई कामगाराला देखील आपण सोडायला तयार नाही अशी परिस्थिती दिसून येते.

अध्यक्ष महोदय, जम्बो कोविड सेंटर, बीकेसी, मुलुंड, दहिसर, वरळी, नेस्को, भायखळा, एकही सेंटर भ्रष्टाचारातून सुटलेले नाही. आमचे युएनने आणि न्यायालयाने तारिफ केली असे सांगितले जाते. परंतु हे सर्व घोटाळे कधीतरी न्यायालयासमोर गेले पाहिजे. कारण न्यायालय एखाद्या मुद्यावर बोलल्यानंतर आपण आपली पाठ थोपटवून घेतो. त्याचवेळी कोविड सेंटर उभारणी तसेच त्यातील साहित्य खरेदी, उपकरण खरेदी, संचालन कंत्राट, मनुष्यबळ पुरवठा, डेडबॉडी कव्हर खरेदी, फेस मास्क-सॅनिटायझर-फेसशिल्ड खरेदी, पदाधिकाऱ्यांच्या कंपन्यांनाच कशी कामे दिली, रेमडिसिव्हिर खरेदी, भंगार, रस्ते चरभरणी, आश्रय योजना, पेंग्विन देखभाल, ई-टेंडर, नालेसफाई, उद्यान विकास, पम्पिंग स्टेशन, मालमत्ता कर वसुली, के.ई.एम रुग्णालयात, बेस्टच्या डिजिटल तिकिट निवेदेत, विद्यार्थ्यांच्या टॅब खरेदीत आणि बदल्या या सर्व प्रकरणात घोटाळे झालेले आहेत. याचा अर्थ मुंबई मेली तरी चालेल पण आपले घर भरणे मात्र जोरात सुरु आहे. या विषयावर आम्ही बोललो तर आम्ही महाराष्ट्राचे, मुंबईचे आणि मराठी माणसाचे शत्रू आहोत. मराठी माणसाच्या मुंबईला लुटुन खाणारे मराठी माणसाचे दैवत, मराठी माणसाचे हितचिंतक आणि जे भ्रष्टाचाराचा आवाज उठवितात त्यांचा आवाज दाबण्यासाठी आम्ही शत्रू. पण काळजी करु नका मुंबईतील मराठी माणूस असो किंवा अमराठी माणूस असो या

कोविडच्या काळात प्रत्येकाच्या लक्षात आले आहे की, प्रेताच्या टाळुवरील लोणी कोणी खाल्ले आहे, आपला शत्रू कोण आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस....

अध्यक्ष महोदय, कोविडच्या काळात मेडिकल इमर्जन्सीच्या नावाखाली कोविड सेंटर सुरु करण्यात आले. ते आवश्यक होते. There was an emergency. पण मुंबईमध्ये अनेक नामांकित आणि रेप्युटेड संस्था होत्या की ज्यांना हे काम देण्यात येऊ शकले असते. पण आपल्या पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना हे काम देण्याचा जो घाट घालण्यात आला. त्याचा काय परिणाम झाला तर पाच कोविड सेंटरचा १०० कोटी रुपयांचे कंत्राट पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना देण्यात आला. कोणतेही टेंडर काढले नाही किंवा अर्ज घेतले नाही. त्या ठिकाणी जी कागदपत्रे दिली ती कंपनी चार दिवसांपूर्वी तयार करण्यात आली. रेप्युटेड कंपनीचे आणि या कंपनीचे नाव सारखे आहे. त्यांच्याच नावाने ही कंपनी आणि त्यांनाच हे कंत्राट दिले असे लोकांना वाटावे. परंतु ती कंपनी नाही. पार्टनरशिप झालेली आहे. ते करतानाही हे लोक इतक्या घाईत होते की, स्टॅम्प पेपर जुने आहेत, काही ठिकाणी तारखा चुकलेल्या आहेत. काही ठिकाणी कट-पेस्ट केलेले आहे. याचा अर्थ दुसऱ्याचा अनुभव घेण्यासाठी झेरॉक्स, फोटोकॉपी काढूनच तिथे लावलेली आहे. अशा प्रकारे केवळ हे कंत्राट देऊनच थांबले नाही तर यामध्ये ३८ कोटी रुपयांचे अधिकचे पेमेंट सुद्धा केलेले आहे. फार चांगल्या प्रकारे हे सर्व केलेले आहे. अनुभवाने अशा लोकांना काम द्यायचे आणि तिथे पेशंट येवो किंवा न येवो त्यांना ५० टक्के पेमेंट मिळेलच.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. देवेंद्र फडणवीस....

अनेक सेंटर असे आहेत की, जे पूर्ण रिकामे होते मात्र आपण त्यांना पेमेंट केले आहे. याचे कारण कोणाचे, कोणी तरी जवळचे लोक हे सेंटर चालवत होते. लाईफलाईन हॉस्पिटल मॅनेजमेंट सर्व्हिसेस कंपनीला पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शिवाजी नगरचे जम्बो कोव्हिड सेंटरचे काम दिले. मात्र त्यांना १५ दिवसांत तेथून हाकलले. तेथे एका पत्रकाराचा मृत्यू झाला. मग लक्षात आले की, त्यांच्याकडे काहीच व्यवस्था नाही. मग या कंपनीला हाकलले व त्यांना काळ्या यादीत टाकले. मात्र नंतर पुन्हा त्यांनाच मुंबईमध्ये ५ कोव्हिड सेंटरचे काम दिले. या घोटाळयांच्या अनेक तक्रारी केल्या गेल्या आहेत मात्र त्यावर कोणतीही कारवाई होत असल्याचे दिसत नाही.

अध्यक्ष महोदय, मुलुंड कोव्हिड सेंटर येथे तडकाफडकी काम दिले. सत्तारुढ पक्षाचे एक नेते आहेत, त्यांची ही एक ट्रस्ट आहे. आशा कॅन्सर ट्रस्ट अँड रिसर्च सेंटर यांना कोव्हिड सेंटरचे काम दिले. आम्हाला वाटले की, काही तरी चांगली संस्था असेल. मात्र त्याची माहिती घेतल्या नंतर असे लक्षात आले की, अशी कोणतीही संस्था कोठेच रजिस्टर्ड नाही. त्यांनी केवळ नाव तयार केले, सुंदर लेटर पॅड तयार केले. महिन्याभरात मुलुंड कोव्हिड सेंटरचे अधिष्ठाते यांनी तक्रार केली की, या कंपनीची लायकी नाही, क्षमता नाही. डॉक्टर, नर्स पुरवले जात नाहीत. ४ महिन्यानंतर त्यांचा करार रद्द करण्यात आला.

अध्यक्ष महोदय, कोव्हिडच्या काळात ऑक्सिजनच्या संबंधी आपण निर्णय केला. १० रुग्णालयामध्ये ऑक्सिजन जनरेशन प्लांट लावायचा होता. प्लांट उभारण्याचे काम ३ निविदाकार, पुरवठादार यांना देण्याची फाईल तयार झाली. मग ऑक्सिजन जनरेशन प्लांट तयार करण्याकरिता ८४ कोटी रुपयांचे कंत्राट दिले. आता या तिन्ही कंपन्या ज्या आहेत त्या काळ्या यादीत होत्या. मला तर आश्चर्य वाटते की, एका दिवसात या कंपनीने जाऊन जिल्हा कोर्टातून त्याच्या विरुध्द ऑर्डर आणल्या. खरे म्हणजे अशा प्रकारच्या काळ्या यादीच्या संबंधी जिल्हा कोर्टाचे ज्युरिस्डीक्शन

श्री. देवेंद्र फडणवीस....

कोठे आहे हे मला समजत नाही. खरे तर ते नाही ,त्याची एक प्रोसेस आहे. पण कंटेस्ट केले नाही. हायवे नावाची एक कंपनी आहे. हे एकच उरलेले आहे असे सांगून त्यांना काम देऊन टाकले. ते प्लांट शेवटपर्यंत लागले नाहीच. हायवे काय आहे मला माहीत नाही. पण हे हायवे कधीच बांधत नाहीत. ते पेंग्विन आणतात, पिंजरे बांधतात. जेव्हा आम्ही या विषयाच्या खोलात गेलो तेव्हा असे दिसून आले की, त्यांच्याकडे साधा जीएसटी नंबर नाही. हे एका डिपार्टमेंटल स्टोअरचा जीएसटी नंबर वापरत आहेत. आता डिपार्टमेंटल स्टोअर ऑकिसजन पुरवठा करणार आहे. खूप मोठया घोषणा झाल्या मात्र काहीच झाले नाही. ही फाईल माझ्याकडे आहेच. ती वाचली तर आपल्या लक्षात येईल की, किती सुरस व चमत्कारिक आहे. ही रोलर कोस्टर फाईल आहे. ती कशी बदलत गेली आहे, हे आपल्या लक्षात येईल. या कोव्हिडच्या काळात जे घोटाळे झाले ते आमचे सहकारी मांडतील. मी सर्व मांडणार नाही. मी कमी वेळात भाषण संपवणार असून अनेकांना बोलायचे आहे. मला आश्चर्य वाटते की, कोव्हिडच्या काळात एवढे भयानक घोटाळे होत असतील.

अध्यक्ष महोदय, सप्टेंबर २०२० मध्ये काय होते ते मी सांगतो. वजन पडल्याशिवाय फाईलच हलत नाहीत. मुंबई महापालिकेच्या वतीने गरिबांकरिता ७३ औषधे खरेदीची फाईल महापौरांकडे मान्यतेला गेली. हा कोरोनाचा काळ होता. मे,२०२१ पर्यंत १८ स्मरणपत्रे गेली. या नंतर मग त्यांच्या कार्यालयाने सांगितले की, फाईल गहाळ झाली. कोव्हिडने लोक मरत आहेत. औषध खरेदी करण्याऐवजी एकमेकांना पत्र पाठवले जात आहे. मग नवीन फाईल नोव्हेंबर, २०२१ मध्ये म्हणजे एक वर्ष दोन महिन्यांनी तयार झाली. १५ महिने १८ स्मरणपत्रे. गरिबांकरिता काय औषध खरेदी होणार आहे ? कोठेही औषध नव्हते, खरेदी होत नव्हती. मग आपापसात भांडण झाले. स्थायी समितीच्या बैठकीत पोलीस चौकशीची मागणी करण्यात आली. आयुक्तांनी विशेष उपायुक्त, आरोग्य उपायुक्त यांची दोन सदस्यीय

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस....

समिती गठीत करण्याची मागणी मान्य केली. १४ दिवसात अहवाल येणार होता. अजूनही तो अहवाल आला नाही. तो येऊ शकत नाही. फाईल गहाळ झाल्याची तक्रारही नाही. ही फाईल कोणाची वाट पहात होती, हे सांगण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबई महापालिका ही सर्वात श्रीमंत महापालिका आहे. schedule १ इंजेक्शन व सर्वसाधारण लसी, जुलै, २०२१ मध्ये करार संपला. नवीन निविदा अद्यापही काढण्यात आली नाही. यामुळे रुग्णांना खाजगीतून औषध खरेदी करावी लागतात schedule २ ची औषधे जुना करार जानेवारी २०२२ मध्ये संपला. नवीन खरेदी नाही. यामुळे टॅबलेट व कॅप्सूल रुग्णालयात उपलब्ध नाही. schedule ३ ची औषधे सीरप व ऑईंटमेंट- फेब्रुवारी २०२२ मध्ये निविदा संपुष्टात आली. नवीन निविदा नाही. एक्सरे फिल्मचे २५० साहित्य, जून २०२१ मध्ये १०० प्रकारच्या साहित्यांची निविदा अजूनही प्रलंबित आहे. ती १० महिने प्रलंबित आहे. schedule ५ – डिसइन्फेक्टंट आणि अन्य. या काळात ज्यांची सर्वात जास्त आवश्यकता होती त्या करिता ५०टक्क्यांची निविदा झाली उर्वरित निविदा अद्यापही प्रलंबित आहे. schedule ६ संबंधी मघाशी मी सांगितले की, त्याची निविदा कशा प्रकारे थांबवली. schedule ७ कॉटन बँडेज. ही किती बेसिक गोष्ट आहे. डिसेंबर २०१९ मध्ये निविदा जारी केली. अद्यापही ती अंतिम झालेली नाही. schedule ८ निडल व सिरींज ५० टक्के यावर खरेदी नाही. schedule ९ सर्जिकल उपकरणे. केवळ ५० टक्के अंतिम. schedule १० लॅब उपकरणे, ब्लड कलेक्शन निडल जानेवारी २०२१ पासून निविदाच निघालेल्या नाहीत. ही आपल्याकडे परिस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, महापालिकेला कशात रस आहे. पेग्विंनमध्ये, प्राणी संग्रहालयामध्ये, इमारतींमध्ये, चौकांच्या सजावटीमध्ये. ते केले पाहिजे. नाही असे नाही. मात्र त्यामध्ये अधिक रस आहे. मलबार हिलकडे जाताना दर वेळेस कोठे नवीन

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस....

रेलिंग दिसते,नवीन काचा लावलेल्या दिसतात. हे चांगले दिसते. मुंबई सुंदर दिसली पाहिजे. दर ३ महिन्यांनी काही तरी नवीन दिसते. चांगले आहे. नवीन बस स्टॉप , नवीन स्ट्रीट फर्निचर दिसते. आता मुंबई रंगवली जात आहे. चांगले आहे. मात्र त्याच वेळी महापालिकेच्या रुग्णालयात येणाऱ्या गरीब माणसाला कोरोनाच्या काळात अशा प्रकारे जर काहीही उपलब्ध करुन दिले जाणार नसेल तर त्यांची काय स्थिती होईल ? अध्यक्ष महोदय, आंधळे दळते व कुत्रे पीठ खाते अशी आपल्याकडे म्हण आहे. ती परिस्थिती या ठिकाणी दिसून येत आहे.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अजमेरा बिल्डर यांनी सन २०१० मध्ये मस्केऱ्हान्स परिवाराकडून २.५५ कोटीमध्ये दहिसर येथील संपूर्ण १०० टक्के अतिक्रमण असलेली जमीन विकत घेतली. त्यानंतर ती ॲक्वायर करा, असा तगादा त्यांनी लावला. सातत्याने तो तगादा सुरु होता. प्रथम श्री.सीताराम कुंटे हे आयुक्त होते, मग श्री.अजॉय मेहता हे आयुक्त होते, त्यानंतर श्री.प्रवीण परदेशी हे आयुक्त होते. या तीनही महापालिका आयुक्तांनी ही जमीन ॲक्वायर करु नये, अशा प्रकारचा आदेश दिला.

अध्यक्ष महोदय, नवीन सरकार आल्याबरोबर जी जमीन २ कोटी ५५ लाख रुपयांना घेतली होती, जी पूर्ण अतिक्रमित जमीन होती, त्या जमिनीचे ३४९ कोटी रुपयांचे पेमेंट आपण केले. त्यावर तो बिल्डर समाधानी नाही. तो कोर्टामध्ये गेला आहे. तो म्हणत आहे की, मला ९०० कोटी रुपये पाहिजे. कदाचित कोर्टामध्ये संगनमत करण्याचा प्रयत्न झाला, कोर्टाच्या लक्षात येईल परंतु, नाही आले आणि संगनमत झाले तर, ९०० कोटी रुपये देखील त्याला मिळतील.

अध्यक्ष महोदय, काय सुंदर संकल्पना असते. माहुल पंपिंग स्टेशनच्या उभारणीसाठी पुन्हा अजमेरा बिल्डर. भूखंडाची अदलाबदली. आता माहुल पंपिंग स्टेशन बांधण्याकरिता अजमेराचाच भूखंड योग्य आहे, अशा प्रकारचा निर्वाळा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिला. हा भूखंड सीआरझेडने बाधित होता. त्यावर कुठलेही बांधकाम अजमेरा करु शकत नव्हते. जवळ पालिकेची जागा होती. त्यावर उद्यान व बगिच्याचे आरक्षण होते. मग भूखंडांची अदलाबदल केली.

अध्यक्ष महोदय, भूखंडाची अदलाबदल करताना ही अनबिल्डेबल जागा आम्हाला पंपिंग स्टेशन बांधायचे आहे म्हणून महानगरपालिकेने घेतली. पालिकेच्या जागेवर जे उद्यान व बगिच्याचे आरक्षण होते ते काढून त्याला निवासी प्रकल्पाचे आरक्षण करुन दिले. याचा अर्थ भूखंडाची अदलाबदलही नॉन बिल्डेबल ... तेथे खरे तर उद्यान व बगिच्याचे आरक्षण होते तरी त्याला डीसीआरप्रमाणे खूप पैसे मिळाले असते परंतु, "अल्लाह मेहरबान तो गधा पहलवान" त्यामुळे अशी परिस्थिती या

श्री.देवेंद्र फडणवीस ...

ठिकाणी आली की तेही आरक्षण बदलवून त्याला अशा प्रकारचा लाभ देण्यात आला. महानगरपालिकेतील सर्व विरोधी पक्षांनी म्हणजे तुमच्या सोबतच्या काँग्रेसने आमच्या भाजपाने सर्वांनी याचा विरोध केला. सन्माननीय सदस्य श्री.रईस शेख भाई, सही बात है? आप को पता है. सर्वांनी विरोध केला

अध्यक्ष महोदय, कोरोनाच्या काळात बैठका झाल्या. विधानसभेचे अधिवेशन झाले परंतु, महानगरपालिकेची बैठक ऑनलाईन होती आणि विरोधी पक्ष बोलायला गेला की, त्याचा माईक म्युट होत असे. चर्चा होत नव्हती. "हम करे सो कायदा." हजारो कोटी रुपयांचे काय टेंडर निघाले आहेत, आश्चर्य आहे.

अध्यक्ष महोदय, खरे तर आता या कोरोनाच्या लॉकडाऊनमुळे सर्व व्यवहार बंद होते. मंत्री महोदयांनी मघाशी बिल्डरांना सूट कशी दिली वगैरे सांगितले. चांगले केले. ठीक आहे. चला मान्य करु. तुम्ही अतिशय चांगले, सुंदर काम केले. त्याचवेळेस सामान्य माणसाने एक रुपया थकवला तर तुम्ही त्याचे विजेचे कनेक्शन कापता, तुम्ही त्याच्यावर कारवाई करता. मात्र सामान्य माणसावर कारवाई करणारी मुंबई महानगरपालिका बिल्डरांकडे २३०० कोटी रुपयांचा मालमत्ता कर थकलेला आहे. मोठमोठे लोक आहेत. यातील एक पैसा वसूल करीत नाही. हा वेगळा न्याय त्यांच्याकरिता का आहे, हे या ठिकाणी माझ्या लक्षात येत नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबईच्या एसटीपीच्या संदर्भात पहा. मुंबईमध्ये एवढी महत्वाची ही महानगरपालिका आहे. या महानगरपालिकेचे प्रक्रिया न केलेले सर्व पाणी आपण इतकी वर्षे झाली समुद्रात सोडतो. मी ज्यावेळेस मुख्यमंत्री झालो, त्यावेळेस मी याचा पाठपुरावा केला. या देशातील सर्वात मोठा प्रश्न असा होता की, डिस्चार्ज स्टँडर्ड्स तयार झाले नव्हते. त्यामुळे तेव्हाचे गोव्याचे मुख्यमंत्री श्री.मनोहर पर्रीकर व मी आम्ही दोघे केंद्र सरकारकडे गेलो आणि पूर्ण देशाकरिता डिस्चार्ज स्टँडर्ड्स तयार झाले पाहिजेत व एसटीपी कम्पलसरी झाला पाहिजे, याबाबत आम्ही मागणी केली.

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, त्यानंतर सातत्याने मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना दिल्लीला बोलावून मी ६ बैठका घेतल्या. त्या बैठकांमध्ये डिस्चार्ज स्टँडर्ड्स फायनल करायला लावले. त्यानंतर हरित लवादाचा एक कार्यक्रम पुणे येथे झाला. त्यामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाचे व हरित लवादाचे सर्व न्यायाधीश होते. मी त्या ठिकाणी खंत व्यक्त केली की, आम्ही इतका प्रयत्न करुन डिस्चार्ज स्टँडर्ड्स तयार करीत आहोत, मात्र कोणीतरी लवादामध्ये जाते व त्यावर स्थगिती आणते. त्यामुळे काही लोकांना हे होऊच द्यायचे नाही. तेथे देखील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या व हरित लवादाच्या न्यायाधीशांनी सकारात्मकता दाखविली व हे सर्व डिस्चार्ज स्टँडर्ड्स आपण तयार केले.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर मुंबई महानगरपालिकेने याच्या निविदा काढल्या. परंतु, याच्या निविदांमधील घोळ खूप आहे. मी येथील निविदा पाहिल्या. महानगरपालिकेला प्राप्त निविदेची किंमत ७.४७ कोटी पर एमएलडी होती. मी बँगलोर वगैरे जेथे छोट्यातील छोटा असेल, मोठ्यातील मोठा असेल, जेवढे एसटीपी रेकॉर्डवर आहेत, त्या देशभरातील एकूण एक १०० टक्के एसटीपीची किंमत आणली. मुंबई महानगरपालिकेला मी एक पत्र दिले. आपल्याला आश्चर्य वाटेल की, साधारण भारतातील सरासरी किंमत १.७० कोटी पर एमएलडी इतकी आहे. एका एमएलडीला १ कोटी ७० लाख व मुंबई महानगरपालिकेचे टेंडर आले ७.४७ कोटी म्हणजे ७ पटीने जास्त आहे.

अध्यक्ष महोदय, त्यावेळेस मी यावर ऑब्जेक्शन घेतले. मी असे म्हटले की, ही लूट आहे. आजही खरे म्हणजे हा सर्व विषय माननीय सर्वोच्च न्यायालयात गेला. सर्वोच्च न्यायालयाने चपराक दिली, ते रद्द करायला लावले. आता माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली ही निविदा होत आहे. परंतु, माझ्या समोरचा प्रश्न एवढाच आहे की, माननीय सर्वोच्च न्यायालय हे काही याच्या स्टँडर्ड्समध्ये जाणार नाही. ते प्रक्रियेवर जाणार आहे.

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, मी आजही दाव्याने सांगतो की, या ठिकाणी जे एस्टीमेट तयार केले आहे, ते इनफ्लेटेड एस्टीमेट्स आहेत. ते एस्टीमेट कसे केले तर, माझ्याकडे एखादे इक्वीपमेंट आहे, एखादी टेक्नॉलॉजी आहे तर मी गेलो आणि मी सांगितले की, ही देखील ॲड करा. समजा माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकडे एखादी टेक्नॉलॉजी आहे त्यांनी सांगितले तर ती देखील ॲड करा. असे इतके ॲड ऑन यामध्ये केले आहेत. ज्या गोष्टींची आज आवश्यकता देखील नाही. ते असे सांगतील की, हे ॲडव्हान्स आहे, ते ॲडव्हान्स आहे. मात्र ज्याची आज आवश्यकताच नाही अशाही गोष्टी त्यामध्ये ॲड करुन इतके भयानक इनफ्लेटेड अशा प्रकारचे टेंडर तयार करण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, हे तर ठीक आहे की, आता ते माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली आहे. परंतु, आम्ही देखील नजर ठेवून आहोत. ज्या क्षणी मुंबईची लूट करण्याचा प्रयत्न होईल, त्यावेळेस आम्ही आवश्यकता पडली तर माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या देखील निदर्शनास आणून देऊ. जी गोष्ट दीड कोटीमध्ये पर एमएलडी होते आणि आपण किती एमएलडी करणार, २००० एमएलडी? २५ हजार कोटी रुपयांचे टेंडर? त्यामुळे ही जी काही लूट आहे, ती कुठे तरी थांबली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज तुम्ही सांगा. आपण पर्यावरणाच्या संदर्भात या ठिकाणी एवढे बोलतो. परंतु, अवस्था काय आहे, एकीकडे आपण पर्यावरणाचा एवढा उदोउदो करतो. दिनांक २२ जानेवारी रोजी पर्यावरण कार्यकर्ते श्री.अभय आझाद या नागरिकाला अटक झाली. विलेपार्ले या भागातील एक १०० वर्षे जुने झाड कापण्यात येत होते. श्री.अभय आझाद तेथे गेले त्यांनी विचारले की, झाड कापण्याची परवानगी आहे का, तर सराईत गुन्हेगारासारखे त्याला मारुन अक्षरश:गाडीत कोंबले व त्याला जेलमध्ये टाकले. आपण हेरिटेजच्या एवढ्या गोष्टी करतो. परंतु, एखाद्याने प्रश्न विचारला तर त्यावर आपले ऑब्जेक्शन आहे.

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस ...

अध्यक्ष महोदय, आपण सांगितले की, सॉल्ट पॅन जागेवर कोणतेही बांधकाम करु देणार नाही. चांगली गोष्ट आहे. बांधकाम करु देणार नाही, अतिक्रमण झाली तरी आम्हाला चालतील. परंतु, या इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये आम्ही सत्तारुढ पक्षाच्या एका सन्माननीय आमदारांचे फलक पाहिले.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस...

त्या फलकावर लिहिले होते की, "मिठागाराच्या जमिनीवर मुंबईतील पहिला अम्युजमेंट पार्क व थीम पार्क उभारणार". हे फलक आम्ही पाहिले आहेत. हे प्रकरण माननीय उच्च न्यायालयामध्ये गेले असून मिठागार विभागाने अवमान याचिका दाखल केली आहे. सन २०१४ पूर्वी असाच प्रयत्न करण्यात आला होता. त्यावेळी तो अयशस्वी झाला व सन २०१८ मध्ये माननीय उच्च न्यायालयाने "जैसे थे" आदेश दिले होते. आमच्या बोलण्यात व कृतीमध्ये काय फरक आहे, हे यातून लक्षात येते.

अध्यक्ष महोदय, भायखळा प्राणी संग्रहालयाची निविदा काढण्यात आली होती. त्यामध्ये १०६ कोटी रुपये वाढ होती. एक निविदा ९४ कोटी रुपयांची होती व दुसरी ९१ कोटी रुपयांची होती. कंपन्यांनी १४५ व १४६ कोटी रुपयांची निविदा सादर केली होती. श्री.विनोद मिश्रा यांनी या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली आहे. सीव्हीसीने सांगितले आहे की, अंदाजित रकमेच्या जास्तीत जास्त १५ टक्के अधिक रकमेने निविदा देऊ शकतो. हा बेंच मार्क नाही. परंतु ही लूट अंदाजित ५० टक्क्यांपेक्षा अधिक सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, हाय-वे कंपनी शाळांमध्ये जलशुद्धीकरण यंत्राचा पुरवठा करते. पिंजरा तयार करणारे आता जलशुद्धीकरण यंत्रही तयार करतात. जलशुद्धीकरण यंत्र पुरवठा करणाऱ्या ॲक्वा कुल सारख्या नामांकित कंपन्यांना अपात्र करण्यात आले. केवळ हाय-वे कंपनी पात्र झाली व त्यांना ३२६ शाळांमध्ये जलशुद्धीकरण यंत्राच्या संदर्भातील काम देण्यात आले. त्यांनी सुरुवातीला १७ टक्के कमी दराने निविदा भरली व त्यानंतर २ वर्षांचे मेंटनन्स कंत्राट घेऊन ते पैसे परत घेतले आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.अस्लम शेख यांनी राणीच्या बागेच्या संदर्भात हरकत घेतली आहे. त्यामुळे याबाबत मी अधिक सांगू इच्छित नाही. या संदर्भातही हाय-वे कंपनीचा संबंध आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस...

अध्यक्ष महोदय, १० वीचे वर्ष संपत आले असताना ३९ कोटी रुपये रकमेच्या टॅबची खरेदी करण्यात येत आहे. एक टॅब २०,५३२ रुपयांचा आहे. शैक्षणिक वर्ष संपत आले असताना ही खरेदी करण्यात येत आहे व संबंधीत कंपनी २ महिन्यांनी पुरवठा करणार तोपर्यंत ते विद्यार्थी १० वीच्या वर्गातून निघून जातील. "टेंडर पे टेंडर आणि नो सरेंडर", अशी अवस्था पाहण्यास मिळत आहे.

अध्यक्ष महोदय, स्थायी समितीच्या अध्यक्षांकडे धाड पडली त्यावेळी सुरुवातीला १३० कोटी रुपयांवरुन वाढत वाढत ३०० कोटी रुपयांची बेहिशेबी संपत्ती सापडली आहे. त्यांच्या २ वर्षांतील ३८ संपत्तींचे रेकॉर्ड मिळून आले आहे...(अडथळे)... असे प्रशिक्षण घेऊ नका. ते घेतल्यानंतर ऑर्थर रोड जेलमध्ये जावे लागते. त्यामुळे चांगले प्रशिक्षण घ्या.

अध्यक्ष महोदय, एका बाजूला लोकांचा कोरोनामुळे मृत्यू होत होता व दुसऱ्या बाजूला मालमत्तांची खरेदी सुरु होती. २४ महिन्यांमध्ये ३८ मालमत्ता खरेदी करण्यात आल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या शेवटच्या स्थायी समितीच्या बैठकीत ६००० कोटी रुपयांचे ३७० प्रस्ताव ३० मिनिटांत मंजूर करण्यात आले आहेत. त्यामध्ये निम्नस्तर जलाशय भूमिगत जल बोगदा, आर दक्षिण महापालिका रुग्णालय इमारत बांधकाम, वैशिष्ट्यपूर्ण रुग्णालयाचे बांधकाम, रुग्णालयातील विविध कामे, अग्निशमन वाहन खरेदी, मलनि:सारण विभागासाठी शीघ्र वाहन खरेदी, जलाशयाची पुनर्बांधणी, या प्रस्तावांना मंजूरी दिली. परंतु यामध्ये नाले सफाईचा विषय घेण्यात आला नाही. स्थायी समितीच्या शेवटच्या सभेत आता पावसाळा येणार आहे तरी नालेसफाईचा कोणताही विषय घेण्यात आला नाही. उन्हाळ्यानंतर मुंबईची काय परिस्थिती होते, आपण सर्वांनी पाहिले आहे. परंतु बांधकामाचे विषय मोठ्या प्रमाणात घेऊन त्यांना मंजुरी दिली आहे. आपण तेथील दिनांक ७ मार्च, २०२२ रोजीचे सीसीटीव्ही फुटेज पहावे. त्या ठिकाणी खूप मोठी रांग लागली होती. त्यामध्ये कोणकोण होते हे पहावयाचे असेल तर मी पेन ड्राईव्ह देण्यास तयार आहे. आजकाल मी पेन ड्राईव्ह दिल्यानंतर लोकांना राग येतो.

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस...

अध्यक्ष महोदय, खंदकांसाठी ५५९ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात येत होते. यामध्ये घोटाळा असल्याचा मुद्दा आमच्या सदस्यांनी लावून धरला त्यामुळे महानगरपालिकेचे १३६ कोटी रुपये वाचले, ते कोणाच्या खिशात जाणार होते, हे लक्षात येत नाही. यासंदर्भात आमच्या लोकांनी संघर्ष केला त्यामुळे ते कंत्राट ४३६ कोटी रुपयांवर आले.

अध्यक्ष महोदय, राज्यात भ्रष्टाचार बोकाळला आहे. धुळे येथील उप निबंधक श्री.अभिजित देशपांडे यांना त्यांच्या वरिष्ठ लिपीकाने लाच मागितली आहे. हा प्रकार दिनांक २४ ते २७ डिसेंबर या कालावधीतील आहे. श्री.आनंद शिंदे, वरिष्ठ लिपीक हा श्री.अभिजित देशपांडे यांना म्हणाला की, आपण एका सहकारी बँकेच्या निवडणुकीचा एक अर्ज बाद करण्यासाठी १५ लाख रुपये घेतले आहेत, त्यातील दोन लाख रुपये मला द्या. ते दिले नाही तर त्यापेक्षा जास्त पैसे देऊन तुमची बदली करेन किंवा पत्नी आणि मुलीला बोलवून विनयभंगाची तक्रार करीन. अशा धमक्या त्याने दिल्या. शेवटी त्यांच्यामध्ये चर्चा होऊन १.४० लाख रुपयांमध्ये समझोता झाला. यासंदर्भात कोणी तरी तक्रार केली व ३० हजार रुपये देत असताना त्याला रंगेहात पकडण्यात आले.

अध्यक्ष महोदय,ॲड.आशिष शेलार यांनी अंगडियांकडून कशी वसुली सुरु आहे, हे काल सांगितले आहे. त्यावर मी बोलून वेळ घेणार नाही.

अध्यक्ष महोदय, सोलापूर येथेही एक सचिन वाझे आहे. तो क्राईम ब्रांचसाठी दरमहा ६० लाख रुपये हप्ता जमा करतो. त्याचे स्टींग ऑपरेशन करण्यात आले आहे. तो पेन ड्राईव्ह माझा नसून तेथील एका पत्रकाराने सरकारकडे दिला आहे. श्री.योगेश पवार, माहिती अधिकार कार्यकर्ता यांनी सदरहू क्लीप मुख्यमंत्री महोदय व गृह मंत्री महोदयांना पाठविली आहे. त्यामध्ये पोलीस कर्मचारी व अवैध धंदेवाला व्यक्ती यांचा संवाद आहे. तो म्हणतो की, उपर तक देना पडता है. त्याने कितीही वर म्हटले तरी हा विषय मंत्री महोदयांपर्यंतचा नाही. मी माननीय गृह मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस...

यांना मागील २५ वर्षांपासून ओळखतो, त्यामुळे मी खात्रीपूर्वक सांगू शकतो. पोलीस आयुक्तालयाकडून सुरु असलेल्य वसुलीची तक्रार एसीबीकडे करण्यात आली आहे. ती प्रलंबित आहे. त्या संदर्भात पोलीस आयुक्तांनी समिती नेमण्याची घोषणा केली होती परंतु पुढे काही झाले नाही.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.......

अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्यांच्यावर प्रशासन डूग धरणार असेल तर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित करावेत की नाही, असा प्रश्न निर्माण होतो.

अध्यक्ष महोदय, बार्शीचे आमदार श्री.राजेंद्र राऊत यांनी तेथील अवैध व्यवसायाच्या संदर्भात सभागृहामध्ये विषय मांडला. त्यानंतर राज्यमंत्री महोदयांनी बैठक घेण्यात येईल असे आश्वासन दिले. त्यानुसार राज्यमंत्री महोदयांनी तेथे जाऊन बैठक घेतली. त्यावेळी लोकप्रतिनिधी देखील सदर बैठकीस उपस्थित होते. त्यावेळी तेथे कसे अवैध धंदे सुरु आहेत, याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी पुराव्यासह काही तक्रारी केल्या होत्या. तेव्हापासून लोकप्रतिनिधींना टार्गेट करण्याचे काम सुरु आहे. माननीय श्री.राजेंद्र राऊत यांना तर उघडपणे सांगितले आहे की, कोणत्याही परिस्थितीमध्ये कोणत्यातरी गुन्ह्यामध्ये अडकवणार. तसेच त्यांच्या मुलाला देखील फसवणार असल्याचे उघडपणे सांगितले जात आहे. तेथील पोलीस निरीक्षक यांचे रेकॉर्ड काय आहे, हे मी आपणास सांगतो. ते किती वेळा व कोणत्या कारणांनी निलंबित झाले होते, याची सर्व माहिती माझ्याकडे आहे. त्या ठिकाणी अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करीत असाल तर आणि त्या आशीर्वादाने अवैध धंदे चालू असतील तर तेथील लोकप्रतिनिधींनी गप्प बसावे काय? मी स्वत: तत्कालीन व विद्यमान पोलीस महासंचालक यांच्याकडे त्या अधिकाऱ्याची तक्रार केलेली आहे. याबाबतचे सर्व पुरावे देखील दिलेले आहेत. तरी देखील कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. त्यांच्यावर कारवाई न करण्याचे कारण काय आहे? कारण एवढेच आहे की, सन्माननीय श्री.राजेंद्र राऊत अपक्ष म्हणून निवडून आले आणि त्यांनी भारतीय जनता पार्टीला पाठिंबा दिला, म्हणून त्या अधिकाऱ्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. काही लोकांना तर असे वाटत आहे की, माननीय श्री.राजेंद्र राऊत यांना त्रास दिला तर चांगलेच आहे. परंतु अशा प्रकारचा दृष्टिकोन बरोबर नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस.......

अध्यक्ष महोदय, गृह राज्यमंत्री महोदयांनी छातीवर हात ठेवून सांगावे किंवा त्यांना एकांतात विचारावे की, उक्त बैठकीवेळी त्यांच्याकडे काय-काय तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या सभागृहामध्ये अवैध धंद्याविरुद्ध आवाज उठविला म्हणून किंवा बैठकीमधील एखादा संदर्भ दिला म्हणून पोलीस अधिकारी अशा प्रकारचा दंडूकेशाही करीत असतील तर ही गंभीर बाब आहे.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र राऊत यांच्या मुलाचा जीव धोक्यात आहे. तसे पत्र देखील दिलेले आहे. त्या पत्रावर कोणतीही कार्यवाही होणार नाही, हे आम्हाला माहिती आहे. त्या पत्रावर कोणतीही कार्यवाही केली नाही तर आमची काही हरकत नाही. मी निर्णय घेतला आहे की, जर अशा प्रकारची वागणूक मिळणार असेल तर मी स्वत: हजारो माणसांचा मोर्चा घेऊन पोलीस स्टेशनला घेराव घालणार आहे. आम्हाला संरक्षण आहे, असे काही पोलीस अधिकाऱ्यांना वाटत असेल. परंतु अशा प्रकारचे वागणे योग्य नाही.

अध्यक्ष महोदय, नाशिकमध्ये गंगापूर रोडवरील दादोजी कोंडदेव नगरच्या बागेमध्ये अश्लील चाळे सुरु असल्याची तक्रार घेऊन काही नागरिक पोलीस चौकीमध्य गेले होते. त्या पोलीस चौकीतील परिस्थिती तर फारच गंभीर होती. त्या चौकीतील पाच-सहा पोलीस दरवाजा बंदकरुन दारुची पार्टी करीत होते. लोकांनी बंद दारावर आवाज का दिला, म्हणून मद्यधुंद पोलिसांनी तक्रार देण्यासाठी आलेल्या नागरिकांना बदडून काढले. शेवटी त्या नागरिकांनी आरडा-ओरड केली. त्यानंतर त्या ठिकाणी जमाव जमला. तेव्हा दारु पार्टी करणारे पोलीस फरार झाले. या घटनेची तक्रार नाशिकचे पोलीस आयुक्त यांच्याकडे अनेक वेळा दिलेली आहे. ते कायद्याचे अतिशय तज्ज्ञ आहेत. त्यामुळे ते त्या पोलीस अधिकाऱ्यांवर नेमके केव्हा कारवाई करणार आहेत, हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, बीडमध्ये बांधकाम विभागात कंत्राटदार धमक्या देतात. कट्यार दाखवितात. अधिकाऱ्यांकडून कागदावर सह्या करुन घेतात, म्हणून

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.......

आम्हाला पिस्तुल बाळगण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता श्री. संजय कुमार कोकडे यांनी जिल्हाधिकारी यांना केली आहे. आम्हाला जर पिस्तुल बाळगण्याची परवागनी दिली नाही तर आम्ही जिवंत राहू शकणार नाही, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. अशी अवस्था महाराष्ट्रामध्ये पाहायला मिळत आहे.

अध्यक्ष महोदय, स्पेशल-२६ हा सिनेमा निघाला होता. त्यामध्ये बनावट अधिकारी होते. त्या सिनेमाप्रमाणे आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे बनावट आदेश काढण्यात आले आहेत. पाच आयपीएस अधिकाऱ्यांना समायोजित करुन पदोन्नती कोट्याच्या रिक्त पदांवर पदोन्नती व पदस्थापना दिल्याचा बनावट आदेश काढण्यात आलेला आहे. या आदेशामध्ये दोन सचिवांची नावे होती. सह सचिव श्री.माधव वीर यांच्या नावाने हा बनावट आदेश काढण्यात आलेला आहे. शेवटी उक्त प्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशनमध्ये सरकारला तक्रार करावी लागली. सदर बनावट आदेश काढल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना व्हॅटसॲपवर अभिनंदनाचे संदेश प्राप्त झाले आणि त्यांनी अभिनंदन देखील स्वीकारले.

अध्यक्ष महोदय, गुन्हेगारांची मजल कोठपर्यंत गेली त्याचा आपण विचार देखील करु शकत नाही. पुणे येथे माननीय श्री.अजित पवार यांचा नंबर फोर्ज करुन खंडणी वसूल केली. आजकाल कोणाचाही नंबर फोर्ज करता येतो. करायचा होता तर दुसरे कोणाचा तरी करायचा होता. त्यांनी चक्क माननीय श्री.अजित पवार यांचाच नंबर फोर्ज केला. गुन्हेगारांच्या हिंमतीला दाद दिली पाहिजे. नंबर फोर्ज करुन २० लाख रुपयांची खंडणी मागितली होती. त्यापैकी २ लाख रुपये स्वीकारले देखील होते. संबंधित व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे. परंतु अशा प्रकारची प्रकरणे वाढत आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे.

अध्यक्ष महोदय, पुणे येथे लॅन्ड ग्रॅबिंग आणि फेक माथाडींची वसुली सुरु आहे. माथाडी कायद्याला आमचे केव्हाही समर्थनच आहे. फेक माथाडी वसुलीमुळे पुणे

श्री.देवेंद्र फडणवीस.......

येथील उद्योजक प्रचंड धास्तावलेले आहेत. या फेक माथाडींना काम न करण्याचे पैसे दिले जात आहेत. आम्हाला अमूक इतके पैसे द्या, आम्ही आपणास येऊन त्रास देणार नाही, अशी मागणी केली जात आहे. त्यामुळे त्यांना काम करु नका पण पैसा घ्या, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

अध्यक्ष महोदय, या सभागृहाने शक्ती विधेयक मंजूर केले. ही अतिशय चांगली बाब आहे. परंतु राज्याची आता काय अवस्था आहे ते मी सांगू इच्छितो. बलात्काराचा आरोप होऊन देखील पुण्याचे शिवसेना उप नेते श्री.रघुनाथ कुचिक यांना अटक करण्यात आली नाही. या प्रकरणातील सर्व माहिती गृह मंत्री महोदयांकडे सादर करणार आहे. त्यांचे व्हॅटसअॅपचे चॅट देखील सादर केले जातील. या संदर्भातील सर्व माहिती माझ्याकडे आहे. २४ वर्षीय महिलेला लग्नाचे अमिष दाखवून सन २०२० व २०२१ मध्ये विविध ठिकाणी नेऊन महिलेचे शोषण केले. त्यासंदर्भात भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६, ३१३ व ५०६ अन्वये एफआयआर दाखल करण्यात आला. पुन्हा गोवा येथे नेऊन त्या महिलेचे शोषण केले. गोव्यातील ही परिस्थिती लक्षात अल्यानंतर मी स्वत: गोव्यातील पोलीस स्टेशनला फोन करुन त्या पीडित महिलेल्या रुग्णालयात दाखल करण्याची विनंती केली. त्यानंतर त्या महिलेला रुग्ण्यालयात दाखल केले. ती महिला दोन दिवस रुग्णालयामध्ये दाखल होती. एवढे होऊन देखील श्री.रघुनाथ कुचिक यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

अध्यक्ष महोदय, पीडित महिलेच्या कुटुंबातील सदस्यांवर दबाव आणून त्यांच्याकडून जबाब तयार करुन घेतलेला आहे. पोलिसांनी कितीही जबाब तयार केला तरी व्हॅटसअॅपचे चॅट अतिशय बोलके आहेत. त्यात अॅडमिशन्स आहेत. त्या महिलेवर किती वेळा अत्याचार झाला आहे, हे देखील त्यामध्ये आहे. सत्तापक्षातील व्यक्तींनी कोणताही गुन्हा केला तरी चालेल, असा नियम आहे काय? भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अन्वये गुन्हा दाखल केल्यानंतर देखील अटक न करणे हा

श्री.देवेंद्र फडणवीस.......

कोणता नियम आहे? कलम ३७६ अन्वये गुन्हा दाखल झाल्यानंतर अटक करावीच लागते. असा नियम आहे. ज्यांनी अटक केली नाही, त्यांच्यावर कारवाई करण्याची तरतूद देखील आहे. तरी देखील उक्त प्रकरणी कोणतीही कारवाई केली जात नाही.

अध्यक्ष महोदय, विरार येथील जितू खाडे नावाचा एक व्यक्ती आहे. तो महिलांना फोन करुन अश्लील मागणी करतो. विरार येथील महिलेने त्याला ऑटोमध्ये झोडपून काढले होते. तरी देखील त्याच्यावर कारवाई केली जात नाही.

अध्यक्ष महोदय, मागील काळामध्ये अमरावती येथे ज्या प्रकारची घटना घडली होती, तशीच घटना साक्रीमध्ये देखील पाहण्यात मिळालेली आहे. धुलिवंदन साजरे करताना काही नागरिक डी.जे. लाऊन आनंद साजरा करीत होते. अजानची वेळ झाली तेव्हा डी.जे बंद करण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी डी.जे.बंद करतो असे सांगितले. तेव्हा प्रभू श्रीरामाचे गीत सुरु होते आणि अचानक दगडफेक सुरु झाली. काही लोक मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करीत होते. तेवढ्यात थेट तलवारीने हल्ला करण्यात आला. सदर हल्ल्यातील सर्व फोटो मी गृह मंत्री महोदयांकडे पाठविणार आहे. तलवारी, कोयते, गुप्ती, लोखंडी रॉड अशा शस्त्रांनी त्या ठिकाणी हल्ले केलेले आहेत.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

श्री.देवेंद्र फडणवीस ....

ज्यांच्यावर हल्ला झाला आणि ज्यांनी हल्ला केला आहे, अशा दोघांच्याही तक्रारी पोलिसांनी घेतल्या आहेत. दोघांवरही गुन्हे दाखल केले आहे. परंतु ज्यांनी हल्ले केले त्यांना तात्काळ सोडले आणि ज्यांच्यावर हल्ला झाला त्यांना रात्रभर पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले होते. त्यांना अटक करुन दुसऱ्या दिवशी चार वाजता जामिनावर सोडले. ते आरोपी आता फरार आहेत. ज्यांच्यावर हल्ला झाला ते जामिनावर बाहेर आले आहेत. तसेच ज्यांनी हल्ला केला ते सापडत नाहीत. कारण त्यांना त्याक्षणीच सोडून दिले गेले. आपण प्रत्येक धर्माचा आदर केला पाहिजे. अजान सुरु होतेवेळेस त्यांनी विनंती केली तर डीजे बंद करणे योग्य आहे. यात काही अडचण नाही. परंतु त्यानंतर प्रभू श्रीरामाचे गीत ऐकने हा जर अपराध होत असेल तर ते वाईट आहे. त्यामुळे याबाबत कडक कारवाई करण्याची आश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मी मध्यंतरी ॲड. प्रविण चव्हाण यांचा विषय मांडला होता. मी त्यादिवशीच सांगितले की, माननीय गृह मंत्री हे हुशार आहेत. त्यांनी यातून अतिशय चांगला मार्ग काढला आहे. आम्हाला वाटले की, अशा प्रकारे षडयंत्र करणारे, त्यात सामील असलेले ॲड. प्रविण चव्हाण यांचा मंत्री महोदयांनी राजीनामा घेतला आहे. ते आता सरकारचे विशेष वकील नाहीत, असे नाही. त्यांचा केवळ एकाच प्रकरणात राजीनामा घेतला आहे. इतर सर्व केसेस त्यांच्याकडेच आहेत. ते सर्व प्रकरणात वकील आहेत. तसेच गृह मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांची सीआयडी चौकशी केली जाईल. परंतु सीआयडीच्या अनेक प्रकरणात तेच वकील म्हणून नियुक्त आहेत. असे असेल तर कशा प्रकारे न्याय मिळेल ? ॲड. प्रविण चव्हाण यांचे प्रकरण सुरु असताना आणखी एक प्रकरण माझ्या लक्षात आले आहे. हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे.

अध्यक्ष महोदय, पुण्यातील कोथरुड पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ५ सप्टेंबर, २०२० रोजी एक गुन्हा उघड झाला होता. त्यावेळेस कोणीतरी लोकांकडून पैसे घेऊन सिमबॉयसीस कॉलेजचे फोर्ज ॲडमिशन लेटर दिले होते. ते लेटर सिमबॉयसिस कॉलेजचे नव्हते. याबाबत गुन्हा दाखल झाला होता. हा गुन्ह्याचा तपास पोलीस करीत

श्री.देवेंद्र फडणवीस ....

होते. त्यासाठी काही तज्ज्ञांची मदत घेण्यात आली होती. यातून अनेक गंभीर बाबी समोर आल्या होत्या. या प्रकरणात अंबर नावाचा गुन्हेगार होता. तो मूळ पुण्यातील असून सध्या तो मिरा-भाईंदर येथे राहतो. त्याने अनेकांची फसवणूक केली आहे. एका रेस कारची बनावट कागदपत्रे तयार करुन ती विकण्याच्या आरोपात सध्या तो ठाणे येथील केंद्रीय कारागृहात आहे. त्याचा शफिक अन्सारी नावाचा एक सहकारी आहे. हा देखील ठाणे येथील कारागृहात शिक्षा भोगत आहे. अंबर हा हवाला एजंट आहे. दाऊद इब्राहिमसाठी जो मनी लाँडरींग करणाऱ्या हसन अली बाब यांच्याशी त्यांचे जवळचे संबंध आहेत. यात अजून एक पात्र निदर्शनास आले आहे. अंबर नावाच्या व्यक्तीची टिया सुनार ही गर्लफ्रेंड आहे. ती जम्मू येथील आहे. भारतात राहण्यासाठी तिच्याकडे वैध कागदपत्रे नाहीत. सन १९९० पासून ती बनावट कागदपत्राद्वारे भारतात राहत आहे. सुरुवातीला ती बार डान्सर म्हणून काम करीत होती. आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल राज्यात एजंट नियुक्त करण्याचे काम ती करीत असते. तिच्या आणि इतर अनेक सहकाऱ्यांच्या बँक खात्यातून पैसे ट्रान्सफर झाल्याची कबुली तिने दिली आहे. तसेच श्री. निलेश शेट्टी नावाचा एक बार मालक आहे. यांचे टिया सुनारसोबत नजीकचे संबंध आहेत. विक्रम मलकानी, डॉन ब्रिगेन्झा व इतरांच्या माध्यमातून रशियन आणि युक्रेनियन टोळयांशी यांचा संबंध आहे. यात अजून एक पात्र आहे. अर्पित चतुर्वेदी हा अंबरचा कौटुंबिक जवळचा मित्र आहे. पुण्यातील त्याचे बस्तान हलविल्यानंतर तो आता नोएडा येथून ऑपरेट करीत आहे. दुबईला तो नित्य प्रवास करीत असतो. हे सर्व तपासामध्ये समोर आले आहे. त्याच्या एटीएम लोकेशनवरुन तो वेगवेगळया ठिकाणी जेथे मोठ्या प्रमाणात अल्पसंख्याक समाज आहे अशा भागातून कॅश डिपॉझिट करतो. त्याचे सीडीआर तपासल्यानंतर बहुतेक कॉल्स घाना, बेल्जिअम येथून झालेले आहेत. त्याचे बँक अकाऊंट आणि केवायसीचे कागदपत्रेही इतरांच्या नावे आहेत. यात बिहार येथील प्रत्युश सिंग नावाचे आणखी एक पात्र आहे. त्याचे नेपाळ, पिपरीया, बंगाल सीमा येथे लिंक्स आहेत. तो नेपाळला नित्यनेमाने प्रवास करीत असतो. ही सर्व प्रकरणे दाबण्यासाठी त्याने भरपूर पैसे खर्च केले आहेत. हा व्यक्ती निशा सिंग आणि फराज काझी यांच्या संपर्कात आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस ....

जम्मू-कश्मिरमध्ये ऑपरेट करणाऱ्या अशा ३५ लोकांची लिंक आहे. तसेच यात निखिल काजबे नावाचा एक व्यक्ती आहे. तो प्रोफेशनल हॅकर आहे. बँकेत केवायसी, इलेक्ट्रॉनिक पुरावे नष्ट करणे, डार्क नेटचा वापर करणे अशी कामे तो करीत असतो. यांची लिंक सलीम मर्चंटपर्यंत जात आहे. सलीम मर्चंट हा दाऊदसाठी काम करीत असतो. हे सर्व सांगण्याचे कारण असे की, ही प्रोफेश्नल गँग आहे. यात ३०० हून अधिक सदस्य असून ते आठ राज्यात काम करीत असतात. त्यांची कामे नार्कोटिक्स, सेक्स ट्रॅफिकिंग, टेरर फंडींगची आहेत. हे लोक विविध बँकेमध्ये डॉरमन्ट अकाऊंट, मृत व्यक्तींची खाते शोधून काढतात. त्यांचे खोटे आयडी तयार करुन त्यांच्या खात्यात पैसे जमा करतात. त्याच दिवशी जम्मू-कश्मिर, पश्चिम बंगाल येथून दुसऱ्या खात्यातून पैसे विड्रॉ होतात. यांनी अशा प्रकारे मोडस ऑपरेंडी तयार केली आहे. बँकिंग सॉफ्टवेअर कसे काम करते, याची त्यांना संपूर्ण माहिती आहे. त्यामुळे संध्याकाळ होण्यापूर्वी हा सर्व पैसे ट्रान्सफर झालेला असतो. माझ्याकडे याचा एक रिपोर्ट आहे. तो कदाचित मंत्री महोदयांकडेही असेल. तो पाहिला तर असे लक्षात येईल की, अनेक गंभीर गोष्टी सुरु आहेत. हा सर्व पैसा, हे प्रकार आपल्या लक्षात आले आहे. मध्यंतरी पुणे पोलीस या प्रकरणात वेगाने काम करीत होते. यात १०० लोकांना अटक करण्याचेही ठरले होते. परंतु नंतर कोणाचा दबाव आला, हे मला माहित नाही. सध्या या प्रकरणाचे काम थांबले आहे. या प्रकरणाचा आता क्लोजर रिपोर्ट तयार होत आहे. हा सर्व रिपोर्ट पोलिसांकडे उपलब्ध आहे. तो पोलिसांनीच तयार केला आहे. त्यामध्ये सर्व गोष्टी एस्टॅब्लीश झाल्या आहेत. असे असताना पोलिसांनी या प्रकरणाचा क्लोजर रिपोर्ट तयार करण्याऐवजी हे प्रकरण एनआयए किंवा सीबीआयकडे दिले पाहिजे. याचे कारण असे की, हे प्रकरण केवळ महाराष्ट्रात होत नाही. देशातील आठ राज्यात हे होत आहे. सर्वात महत्त्वाचे असे की, पैसे आपल्या राज्यातून भरले जात असून जम्मू-कश्मिरमध्ये हे पैसे काढले जात आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. माननीय गृह मंत्र्यांनी स्वत: याची माहिती घेतली पाहिजे. माझ्याकडे या प्रकरणाचे कोणी-कोणी ब्रिफिंग घेतले आहे, याची माहिती आहे. तसेच मार्च, २०२२ पर्यंतची टाईमलाईन आहे. परंतु मी त्याबाबत येथे माहिती देणार नाही. याची स्वतंत्र

श्री.देवेंद्र फडणवीस ....

माहिती मी मंत्री महोदयांना प्रत्यक्षात देईल. परंतु मला एक गोष्ट लक्षात येत नाही, हे प्रकरण कोणाच्या दबावामुळे बंद केले जात आहे? पुणे पोलीस या प्रकरणात चांगले काम करीत होते. परंतु आता अचानाक हे काम बंद करण्यात येत आहे. याबाबत माननीय गृहमंत्र्यांनी लक्ष दिले पाहिजे. (...अडथळा....) सगळ्याच गोष्टी सभागृहात सांगावयाच्या नसतात. याची माहिती आपल्याकडे असते. या प्रकरणातील गुन्हा सन २०२० मध्ये दाखल करण्यात आला आहे. जरी समजा हा गुन्हा मी मुख्यमंत्री असल्यापासून सुरु झाला असेल तर तो आपण सोडून देणार आहोत काय? जर गुन्हा उघडकीस आला नाही तर ठीक आहे. परंतु गुन्हा उघडकीस येऊनही आरोपींना सोडून दिले तर आपण दोषी ठरू. मला वाटते की, राष्ट्रीय हिताच्या बाबीमध्ये आपण गौण असून यात देशाचे हित महत्त्वाचे असते.

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे एक तक्रार प्राप्त झाली होती. त्या तक्रारीचा एक पेनड्राईव्ह माझ्याकडे आहे. तो मी केवळ माननीय गृह मंत्र्यांना देणार आहे.

यानंतर श्री. चौधरी........

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.....

माननीय अध्यक्षांनी त्या दिवशी आक्षेप घेतल्यामुळे मी असे करीत आहे, असे नाही. अध्यक्ष महोदय म्हणाले होते की, "तुम्ही आम्हाला पेन ड्राईव्ह दिल्यानंतर लगेच बाहेर मिडियाला देखील देता." परंतु मी सांगू इच्छितो की, तो आमचा अधिकारच आहे. एवढेच नव्हे तर बोलण्याच्या आधी देखील देण्याचा अधिकार आहे. परंतु आज हा पेन ड्राईव्ह मी माननीय गृह मंत्र्यांना यासाठी अगोदर देणार आहे की, मी अद्याप याचे फॉरेन्सिक ऑडिट केलेले नाही. प्रत्येक गोष्टीचे जोपर्यंत व्हेरिफिकेशन होत नाही तोपर्यंत मी कोणावरही आरोप लावत नाही.

अध्यक्ष महोदय, श्री.इसाक बागवान नावाचे मुंबई पोलीस दलातील एक सेवानिवृत्त ए.सी.पी. आहेत, हे आपल्याला माहिती आहे. ते सेलिब्रेटेड आहेत. कारण ते एन्काउंटर स्पेशालिस्ट होते व त्यांना काही पुरस्कारही मिळालेले आहेत. परंतु आता त्यांच्या बंधुंनी त्यांची एक तक्रार केली आहे... (अडथळा...) होय, त्यांनी पुस्तक देखील लिहिले आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना मी सांगू इच्छितो की, त्यांचे बारामती कनेक्शन आहे. अर्थात, आपल्याशी हे कनेक्शन नाही. परंतु ते बारामतीचे आहेत.

अध्यक्ष महोदय, ते सेवेत असताना त्यांनी मोठया प्रमाणात संपत्ती जमा केली आहे. एकटया बारामतीमधील गट क्रमांक ६९ मधील १६ हेक्टर ४८ आर म्हणजे ४२ एकर एन.ए. जमीन आहे. बारामतीमधील जमिनीचे दर किती आहेत हे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना माहिती आहे. कदाचित माननीय उप मुख्यमंत्र्यांची देखील एवढी बिगर शेती जमीन तेथे नसेल. असली तरी शेतजमीन असेल कारण ते शेतकरी आहेत. बारामतीमधील गट क्रमांक ६९, अशोक नगर अशा वेगवेगळया ठिकाणी श्री.बागवान यांच्या जमिनी आहेत. बारामतीपासून मुंबईपर्यंतच्या त्यांच्या संपत्तीची पूर्ण माहिती मी आपणास देतो.

अध्यक्ष महोदय, श्री.इसाक बागवान यांचे सख्खे भाऊ श्री.नसीर बागवान, वडील श्री.इब्राहिम माणिक बागवान आणि चुलत भावजय श्रीमती बिल्कीस गुलाब हुसेन बागवान यांच्या नावावर नोकरीत असताना

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.....

या जमिनीच्या खरेद्या करण्यात आल्या. पुढे सेवानिवृत्त झाल्यानंतर एक साधा अर्ज देऊन त्याआधारे या मालमत्ता आपल्या स्वत:च्या नावावर करुन घेतल्या. श्रीमती बिल्कीस बागवान, श्री.सोहेल बागवान यांनी देखील साधे अर्ज देऊन त्या मालमत्ता दिल्या. एवढेच नव्हे तर श्री.इसाक बागवान यांनी श्री.कपूर नावाच्या व्यक्तीला ही जमीन विकली आणि दोन महिन्यांनी तिच जमीन पुन्हा परत घेतली. यातील काही जमिनी फरीद मोहम्मद अली वेल्डर याच्या नावाने घेतल्या होत्या. हा फरीद मोहम्मद अली वेल्डर कोण आहे तर ज्यावेळी सन २०१७ मध्ये दाऊद इब्राहिम याचा भाऊ इक्बाल कासकर याला ठाणे क्राईम ब्रँचने अटक केली होती त्यावेळी त्याने सांगितले होते की, "फरीद मोहम्मद अली वेल्डरला मी पैसे दिले आहेत. मी त्याला १० लाख रुपये दिले आहेत." त्याचा accomplice म्हणून फरीद मोहम्मद अली वेल्डरचे नाव आलेले आहे. फरीद मोहम्मद अली वेल्डर याची चौकशी झाल्यानंतर सात दिवसांनी तो मृत्युमुखी पडला. महत्त्वाची गोष्ट अशी की, फरीद मोहम्मद अली वेल्डर हा श्रीमंत माणूस नव्हता. हा त्याच्यासोबत काम करणारा व्यक्ती होता परंतु यानेच ४१ लाख रुपयांना सदर प्रॉपर्टी विकत घेतली. मजेची गोष्ट अशी की, ही विकत घेतलेली संपत्ती १० वर्षे नावावर ठेऊन दिनांक ३०.१२.२०२० रोजी फरीद मोहम्मद अली वेल्डरच्या मुलाने ही सर्व संपत्ती श्री.इसाक बागवान यांना बक्षिसपत्र करुन दिली.

अध्यक्ष महोदय, हा पेन ड्राईव्ह देण्याचे कारण असे की या सर्व प्रकरणात एका राजकीय नेत्याने मध्यस्थी केली आहे. श्री.नसीर बागवान यांच्या भावाचे हे स्टिंग ऑपरेशन आहे. यामध्ये सदर राजकीय नेता बारामतीला कसा गेला... अर्थात, बारामतीचा नेता नाही... उगीच संशय तयार करायचा नाही... मुंबईचा एक मोठा नेता कसा बारामतीला गेला आणि कशा प्रकारे मध्यस्थी केली आहे त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे. त्यामध्ये हे देखील सांगितले आहे की, "मुंबईतील कुख्यात डॉन हाजी मस्तान याने मुंबईतील एक नामांकित बांधकाम व्यावसायिक श्री.आर.के.शाह यांचे अपहरण केले होते.

श्री.देवेंद्र फडणवीस.....

त्यावेळी इसाकने हाजी मस्तानसोबत मध्यस्ती करुन त्या बांधकाम व्यावसायिकाला सोडले होते. त्याच्या बदल्यात त्याला भावाच्या नावाने मुंबई सेंट्रलला एक फ्लॅट मिळाला."

अध्यक्ष महोदय, हे सांगण्याचे कारण म्हणजे आम्ही या सभागृहात सातत्याने माननीय मंत्री श्री.नवाब मलिक यांच्या संदर्भातील मुद्दा मांडत आहोत. मागील वेळी हे प्रकरण उच्च न्यायालयात होते. उच्च न्यायालयाने यामध्ये अतिशय प्रायमा फेसी निर्णय दिला आहे. मंत्री महोदयांनी या सभागृहामध्ये जे आर्ग्युमेंटस् केले होते ते उच्च न्यायालयाने दुसऱ्या दिवशी सर्व फेटाळले. असे असतानाही एवढी जिद्द का, हा खरा प्रश्न आहे. एखादे दुसरे प्रश्न असते तर कदाचित आम्ही त्याचा पाठपुरावा कमी केला असता. परंतु देशाच्या सुरक्षेशी संबंधित आणि मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपीकडून मनी लाँडरिंग करुन जमिनी घेतल्यानंतर, ईडी ने अटक केल्यानंतर, ट्रायल कोर्टाने कस्टडी दिल्यानंतर, उच्च न्यायालयाने देखील ती कायम केल्यानंतर हा अट्टाहास का आहे की, आम्ही त्यांचा राजीनामा घेणार नाहीत? सरकारच्या प्रतिमेवर याचा परिणाम होत आहे. कदाचित तुम्हाला असे वाटत असेल की हा केंद्र सरकार विरुध्द राज्य सरकार असा संघर्ष आहे. परंतु तसे काही नाही. हा सामान्य माणसाचा प्रश्न आहे. सामान्य माणसाचा प्रश्न आहे की, एक मंत्री तुरुंगात असताना त्याचा राजीनामा का घेतला जात नाही ? खरे तर, मी आता माझे भाषण संपविणार आहे. परंतु माझी एक अपेक्षा आहे. महाराष्ट्राने एक परंपरा पाळलेली आहे. तुम्ही आमच्यावर आरोप लावत आहात आणि आम्ही तुमच्यावर आरोप लावत आहात. तुम्ही सांगितले की, हे सर्व केंद्रीय एजन्सी करीत आहेत. माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रविण दरेकर यांच्याबाबतीत सहकार विभागाची काहीही तक्रार नाही, बँकेची काहीही तक्रार नसताना पोलिसांनी सुमोटो तक्रार दाखल करुन घेतली, त्याबाबत मी सकाळीच बोललो आहे. अर्थात, त्याविरुध्द आम्ही न्यायालयात जाऊ व न्यायालय जो निर्णय देईल तो मान्य करु. आम्ही त्याबाबत काहीही म्हणणार नाहीत. परंतु आज सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांनी टिप्पणी केली आहे की,

श्री.देवेंद्र फडणवीस.....

"कालच महाराष्ट्राच्या सरकारमधील काही लोक असे बोलले की, न्यायालय एकतर्फी निर्णय देते. असा आरोप झाला तर आम्ही त्याला कचऱ्याची पेटी दाखवतो. परंतु आम्ही त्याची नोंद घेतली आहे."

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेचा भ्रष्टाचार असो किंवा ही सर्व प्रकरणे असोत यासंदर्भात कारवाई झाली पाहिजे. ती झाली नाही तर हे सरकार नेमके कोणासोबत उभे आहे हे आम्हाला सांगण्याची आवश्यकता पडणार नाही. ते जनतेला निश्चित समजेल. जय हिंद. जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.कुणाल पाटील)**

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** ता.प्र.क्र.४३१२८ च्या उत्तराबाबत माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशास अनुलक्षून मा.मंत्री (रोहयो) यांचे निवेदन

श्री. संजय बनसोडे (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभा ता.प्र.क्र.४३१२८ च्या उत्तराबाबत माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशास अनुलक्षून पुढील निवेदन करतो.

( **प्रेस :** येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

-------

असुधारित प्रत

**पृ. शी. :** शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO. XIV OF 2022**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF FEES) ACT, 2011)

विचार, खंडश: विचार, (पुढे सुरू..

ॲड आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय आपल्याला हे विधेयक मंजूर करायचेच आहे. त्याला आमचा विरोध नाही. कारण हे राज्याच्या हिताचे आहे. पण आमचे दोनच प्रश्न आहेत. पहिली गोष्ट म्हणजे विभागीय शुल्क नियमन समिती आणि पुनरिक्षण समिती या दोन समित्यांना आपण आता वेतनाऐवजी मानधन देणार आहात आणि त्यातून राज्याचा वित्तीय भार कमी होईल. आमची त्याला हरकत नाही. ही चांगली गोष्ट आहे. पण आमचा सवाल आहे की, कोरोनाच्या काळात या २ समित्या कुठे गेल्या होत्या. कारण या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर कोर्टामध्ये गेले आहेत. ते कोर्टात का गेले हे देखील आपण विचारात घेतले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या या विधेयकामागील ३ प्रकारची उद्देश व कारणे आपण स्पष्ट केली आहेत. पहिला मुद्दा म्हणजे या राज्यात भरमसाठ आकारण्यात येत असलेल्या शुल्काला आळा देणे आहे. दुसरे कारण म्हणजे शिक्षणाच्या व्यापारीकरणास प्रभावीपणे आळा घालण्याची गरज आहे. तिसरे कारण म्हणजे शिक्षणाचा दर्जा उंचाविण्याच्या दृष्टीने हे विधेयक महत्त्वाचे आहे. आपल्याला या तिन्ही गोष्टी सफल करायच्या असतील तर यातील विभागीय शुल्क नियामक समिती आणि पुनर्रिक्षण समिती या दोन समित्यांच्या बैठकांची संख्या, त्यासाठी त्यांची असलेली उपस्थिती पूर्वी विचारात न घेता आपण त्यांना वेतन देत

ॲड आशिष शेलार..

होतो. त्याऐवजी आता आपण त्यांना मानधन देणार आहोत. हे करण्याचे कारण म्हणजे आपल्यावर जो वित्तीय भार पडतो तो कमी करायचा आहे आणि त्यासाठी हे विधेयक आणले आहे. आमचे त्याला समर्थन आहे. पण आमचे काही प्रश्न आहेत. कारण हा विषय राज्यातील सामान्य पालकांचा आहे. राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाशी, आयुष्याशी संबंधित असा विषय आहे. या २ समित्यांचे मानधन सुध्दा का दिले जाते, हा प्रश्न आमच्यासमोर आहे. कारण विभागीय शुल्क नियमन समिती आणि पुनर्रिक्षण समिती या दोन्ही समित्या कधी काम करतात, तर ज्यावेळी शाळा स्तरावर शाळेची फी ठरविण्यासाठी पालकांची एक समिती असते त्या पालकांच्या समितीसमोर शाळेचे संस्थाचालक पुढील वर्षी फी काय असली पाहिजे याचा प्रस्ताव देतात. बरेचदा शाळेबरोबर कोणी झंझट करायला जात नाही आणि पालक तर बिलकूलच जात नाहीत. पण त्यासंबंधी जी पालकांची समिती असते त्यांनी संस्था चालकांना जस्टीफाय करावे लागते की, आम्ही ही वाढ का करतो तर आमचे अमुक हे खर्च वाढले आहेत आणि म्हणून आम्ही ही वाढ करतो. त्याउपर ज्या पालकांना असे वाटते की, पालकांच्या तत्कालीन समितीने योग्य निर्णय केला नाही, तो विद्यार्थी हिताचा नाही, पालकांच्या हिताचा नाही, तो संस्था चालकांच्या हिताचा आहे. त्यावेळी पालकांना ज्या समितीसमोर जायचे असते, विद्यार्थ्यांना ज्या समितीसमोर जायचे असते ती समिती म्हणजे विभागीय शुल्क नियमन समिती आहे. त्या समितीसमोर संस्था चालकांना सुध्दा जावे लागते. पण आमचा सवाल आहे की, कोरोनाच्या काळात या २ समित्या कुठे गेल्या होत्या ? कोरोनाच्या काळात शाळा बंद, पण शाळेच्या फी वाढलेल्या होत्या. कोरोनाच्या काळात कॅन्टीन बंद, पण कॅन्टीनचे पैसे संस्थाचालक घेत होते. कोरोनाच्या काळात शाळेत जाण्याचा विषयच नव्हता. त्यामुळे बस वापराचा प्रश्न आला नाही. तरी देखील बसचे चार्ज घेत होते. या वाढीव फीबद्दल घरातले शिक्षण आणि वाढीव फी, त्यात कोरोनामध्ये पालकांची अवस्था अशी होती की रोजगार टिकेल की नाही माहिती नाही. धंदे करणारांच्या धंद्यांवर परिणाम आणि मग या वाढीव फीच्या विरोधात आम्ही कोरोनाच्या काळात

ॲड आशिष शेलार..

सुध्दा आंदोलन केले. सन्माननीय सदस्य श्री. अतुल भातखळकर हे कोर्टात गेले. कोर्टात काय झाले त्याबद्दल ते स्वत: सांगतील.

अध्यक्ष महोदय, या समित्यांच्या बैठका कधी होतात, त्यांची संख्या किती, त्यांची उपस्थिती किती आहे, त्यांचे इतिवृत्त कोणाकडे जाते, ते इतिवृत्त सरकारकडे येत असेल तर त्याची छाननी केली जाते काय, यांना मानधन देण्याची गरज काय, वेतन तर दूरच राहिले. म्हणून कोरोनाच्या काळात या डिफंग होत्या काय, ॲक्टीव्ह असतील तर त्यांनी कोणते काम केले, याचे उत्तर आम्हाला हवे आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार....

दुसरे असे की, केंद्र शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणले. हे धोरण २० वर्षानंतर पुन्हा एकदा या देशातील पुढच्या २० ते २५ वर्षाच्या किंवा त्यापेक्षा काळाची आवश्यकता, जगाची रिक्वायरमेंट या आधारावर आणले आहे. ते शैक्षणिक धोरण संसदेमध्ये मांडून आणि मंजूर करुन १.५ ते २ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त काळ झाला असेल. आपल्या राज्यामध्ये नवीन शैक्षणिक धोरणाच्या इम्प्लिमेंटेशनच्या बाबतीतील तयारी काय झाली ? त्याबाबत राज्य शासनाने नेमके काय केले आहे, यातून आपल्याला काही साध्य करायचे आहे का केवळ शैक्षणिक धोरण बाजूला आणि आपली पद्धत आपल्या ठिकाणी असे करायचे आहे ? आपण त्या दिवशी म्हणाले की, पहिली आणि दुसरीचा अभ्यासक्रम बदलणार आहात. यासाठी काही हरकत नाही, जो येईल तो आपण बघू. पण या मग शैक्षणिक धोरणाचे काय झाले आहे ? या धोरणाचे इम्प्लिमेंटेशन करताना हे देशातील अन्य राज्यांबरोबर आपण समान पद्धतीने पुढे जात आहोत. जगातील उद्याच्या आवश्यकतांना पूर्ण करण्यासाठी अन्य राज्यतील मुले महाराष्ट्राच्या पुढे जाऊ नयेत असा प्रयत्न आपल्याला करावा लागणार आहे. त्यामुळे अन्य राज्य राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पुढे गेली आहेत तर त्याच्या तुलनेत आपण कुठे मागे पडलो आहोत काय ? त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणबद्दल राज्याची प्रतिपुर्ती काय आहे ? आतापर्यंत केलेली तयारी काय आहे ? कोरोनाच्या काळात विभागीय शुल्क समिती आणि पुनरीक्षण समिती या दोन समित्यांनी काय केले आहे ? या दोन बाबींची आपण आम्हाला माहिती द्यावी.

--------

श्री. अतुल भातखळकर (कांदिवली)) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन, २०१८ मध्ये सुधारणा करण्यासाठी हे सदरचे विधेयक आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी ज्या बाबींचा उल्लेख केला त्या अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. सरकारने हे विधेयक कशासाठी आणले आहे तर विभागीय शुल्क समिती आणि राज्य स्तरावरील पुनरीक्षण समिती यांना मानधन देणे बंधनकारक आहे. Irrespective of their meetings. यामुळे सरकारवरील वित्तीय भार कमी व्हावा म्हणून बैठका झाल्या तरच त्याचे भत्ते आणि मानधन या लोकांना मिळावे ही या विधेयका मागची आणि जे सांगितले गेले आहे त्या मागची कल्पना दिसत आहे.

अध्यक्ष महोदय, मी स्वत: उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. फी वाढ कमी करावी, सवलत देण्यात यावी अशी त्याची कारणे होतीच. परंतु फी नियंत्रण कायद्याप्रमाणे ज्या विभागीय समिती गठीत करणे आणि राज्य स्तरावरील पुनरीक्षण समिती गठीत करणे शासनाला बंधनकारक आहे. त्या समित्या सुद्धा या सरकारने कोरोनाच्या काळात गठीत केल्या नाहीत. मग सरकारचा या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टीकोन काय आहे ? या विषयी माझ्या मनामध्ये शंका निर्माण होत आहेत. या विधेयकामध्ये ही तरतूद केल्यामुळे राज्य शासनाचा असा किती मोठा वित्तीय भार कमी होणार आहे, याचा माननीय मंत्र्यांनी खुलासा केला पाहिजे. ज्या समित्या दोन वर्ष अस्तित्वातच नव्हत्या त्यांना कोणते मानधन, वेतन किंवा भत्ते आपण दिले आहेत ? त्यामुळे कोरोनाच्या काळात उच्च न्यायालयात गेल्यावर त्यांना फटकारल्यानंतर कायद्याची तरतूद पूर्ण करण्याची सरकारवर पाळी आली आहे आणि आता बैठका घेतल्या तरच मानधन मिळणार असा तर शासनाचा डाव नाही ना ? त्यामुळे आता बैठकाच घेऊ नका असे म्हणण्यासाठी वाव आहे. कारण सरकारची या विषयामध्ये चांगली नियत नाही. पालकांनी ठिकठिकाणी आंदोलने केली, फीच्या बाबतीत खाजगी शाळा चालकांनी किती मनमानी केली हे आपल्याला माहीत आहे. मी पहिल्या दिवसापासून मागणी करीत होतो की, फी नियंत्रण समितीचा कायदा आहे त्यामुळे वटहुकूम काढून त्यामध्ये १५टक्के, १० टक्के किंवा ३० टक्के फी कमी केली पाहिजे. अशा प्रकारे कायद्यात बदल केला पाहिजे. पण हे सरकार खूप हुशार आहे. यांनी कायद्यातील बदल हा शासन निर्णयाने केला. परंतु असे होऊच शकत नाही ही

श्री. अतुल भातखळकर...

बाब शाळकरी मुलाला समजेल एवढी साधी होती. आज शासन निर्णय काढला आणि नंतर दोन दिवसाने लोक उच्च न्यायालयामध्ये गेले. एका माननीय मंत्र्यांशी संबंधीत असेलेली शैक्षणिक संस्था उच्च न्यायालयामध्ये गेली. अर्ध्या तासात उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. कारण हे साधे लॉजिक होते. कारण कायद्यातील बदल शासन निर्णयाने होऊ शकत नाही. आता माझ्याकडे ती माहिती उपलब्ध नाही.

अध्यक्ष महोदय, खाजगी शिक्षण संस्था चालकांची एक आखिल भारतीय संघटना आहे. त्यांनी आपल्या अहवालामध्ये सरकारला प्रशस्तीपत्र दिलेले आहे. ते प्रशस्तीपत्र असे आहे की, देशातील ३० राज्यांमध्ये एकमेव राज्य महाराष्ट्र आहे की ज्यांनी कोरोनाच्या काळात फी कमी केली नाही. मग उच्च न्यायालयाकडून चपराक बसली. राजस्थानच्या संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला की, कोरोनाच्या काळात तुम्ही शाळेच्या फीमध्ये कमी करण्याची आवश्यकता आहे. मग यांना जाग आली आणि परत एक निर्णय घेतला. त्या निर्णयाच्या अंमलबजामध्ये राज्यात पूर्ण बोंब होती. पुण्यातील घटना आहे की, शाळेने बाऊन्सर आणले आणि पालकांना मारहाण केली. सर्व पालक संघटनांचे फी नियंत्रण कायद्याच्या बाबतीत अनेक आक्षेप होते.

अध्यक्ष महोदय, मी मघाशी म्हटले की, या विषयात सरकारची नियत साफ नाही. तयाचे मी एकच उदाहरण सांगतो की, सरकारने काही महिन्यापूर्वी या कायद्यात बदल करण्याची आवश्यकता आहे असा पालकांचा वाढता दबाव लक्षात घेऊन एक समिती नेमली. त्या समितीसमोर पालक संघटना आल्या आणि मी स्वत: आमदार या नात्याने समितीला पत्र दिले की, मला या समितीसमोर माझे म्हणणे मांडायचे आहे. परंतु या समितीने आमदारांना सुद्धाआपले म्हणणे मांडण्यासाठी अलाऊ केले नाही. पालक संघटनांनी या संदर्भात त्यांच्याकडे मागणी केली की आम्ही जे निवेदन दिले त्या संदर्भात कायद्यातील सुधारणांसाठी आपल्या ज्या बैठका झाल्या त्याचे मिनिटस आम्हाला द्या. परंतु ते मिनिटस् सुद्धा पालक संघटनांना दिले नाहीत. अद्यापपर्यंत या समितीचा अहवाल महिने उलटल्यानंतर सभागृहासमोर मांडला नाही किंवा

श्री. अतुल भातखळकर....

लोकांसमोर जाहीर केला नाही. त्यामुळे सरकारची या विषयातील नियत साफ, स्वच्छ आहे असे मला वाटत नाही. शिक्षण सम्राटांचे भले करणारे, त्यांची बाजू घेणारे हे सरकार आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांची किंवा सर्वसामान्य लोकांची बाजू घेणारे हे सरकार आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे हे स्पष्ट झाले पाहिजे की, या तरतुदींमुळे असा किती मोठा वित्तीय भार कमी होणार आहे.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर ....

हे बदल केल्यानंतर शुल्क नियंत्रण समितीच्या बैठका किमान ३ वेळा, ४ वेळा झाल्या पाहिजेत असे बंधन आपण आणणार आहोत काय, हा माझा दुसरा प्रश्न आहे. या समितीचा रिपोर्ट आला पाहिजे. या संबंधी पालक संघटनांनी सांगितलेले बदलही झाले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने मी आणखी एका गोष्टीकडे माननीय मंत्री यांचे लक्ष वेधू इच्छितो. कोरोनाचे संकट मार्च, २०२० मध्ये या देशावर आले. एका महिन्याच्या आत केंद्र शासनाने २० लाख कोटी रु.पॅकेज जाहीर केले. या सरकारला माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजींच्या विषयी मनात अढी आहे. केंद्र शासनाचे कौतुक केले पाहिजे. एका महिन्यात २० लाख कोटी रु. पॅकेज जाहीर केले. त्यातील एक तरतूद ही होती. केंद्र शासनाच्या लक्षात आले होते की, याचा सर्वात मोठा फटका शिक्षण क्षेत्राला, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला होणार आहे. कोरोनामुळे शाळा भरवणे अशक्य होणार आहे. पंतप्रधान ई -विद्या योजनेकरिता केंद्र शासनाने २ सॅटेलाईट राखीव ठेवले. मी या ठिकाणी महत्त्वाच्या प्रश्नावर बोलत असताना शिक्षण मंत्री अन्य कोणाशी चर्चा करीत आहेत. मी महत्त्वाचे मुद्दे मांडत आहे. याचा अर्थ आपल्याला या मुद्यांबाबत आस्था नाही. हे आपल्या व्यवहारातून सिध्द करीत आहे की, काय अशी शंका येऊ शकते. २० लाख कोटी रु. पॅकेज दिले. तसेच सॅटेलाईट बेस शिक्षणाकरिता केंद्र शासनाने त्याच वर्षी एप्रिल – मे मध्ये २ सॅटेलाईट डेडीकेट केले. देशातील सर्व राज्य शासनाला सांगितले की, आपापल्या भाषेतील अभ्यासक्रम पाठवा, तयार करा. सॅटेलाईटच्या माध्यमातून तुम्ही ते प्रक्षेपित करु शकाल. ज्यांच्याकडे नेट नसेल अशा विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार होता. जसे सह्याद्री वाहिनी आपल्याकडे दिसते तशा प्रकारे मुलांना शिक्षण घेता येईल. माझ्या माहितीनुसार देशातील २-३ राज्यांनी या योजनेचा लाभ घेऊन ते काम केले. आपल्याला ऐकायला थोडे वाईट वाटेल. गुजरात राज्याने यात आघाडी घेतली. त्यांनी सॅटेलाईट बेस एज्युकेशन देण्यास सुरुवात केली. माझी विनंती आहे. या

श्री. अतुल भातखळकर ....

विधेयकावर बोलत असताना राज्य शासनाने केंद्र शासनाकडे किमान अर्ज तरी केली आहे काय याची माहिती द्यावी. ही महत्त्वाची गोष्ट आहे. राज्य शासनाचा शिक्षण विभाग व युनीसेफ यांनी दोन वर्षाच्या कालखंडात शिक्षणावर काय परिणाम झाला याचा एक अभ्यास केला. यामध्ये असे दिसून आले की, १/३ मुलांना त्यांच्याकडे मोबाईल, नेट नसल्यामुळे शिक्षणाचा फायदा मिळू शकला नाही. काही विद्यार्थी नेटवर्क मिळवण्याकरिता झाडावर चढले. पंतप्रधान ई-विद्या योजनेच्या संबंधी राज्य शासनाने काय विचार केला आहे, याची माहिती द्यावी. वित्तीय भार किती कमी होणार आहे, हे या ठिकाणी सांगावे अशी मी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

असुधारित प्रत

श्री. योगेश सागर ( चारकोप ) : अध्यक्ष महोदय, वि.स.वि.क्र १४ – महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन ) ) सुधारणा विधेयका संबंधी माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या संबंधी माननीय मंत्री यांनी खुलासा करण्याची आवश्यकता आहे. विभागीय शुल्क नियामक समिती व पुनर्निरीक्षण समिती गठीत केली आहे. त्याच्या नियंत्रणात एसएससी बोर्ड आहे. आयसीएसई, सीबीएसई, आयबी हे बोर्ड याच्या नियंत्रणात येणार नाही. मंत्री महोदयांनी सांगावे की, राज्याचे एसएससी बोर्ड लागू आहे. या बोर्डच्या तक्रारी ऐकण्याकरिता ही समिती आहे. ज्या बाहेरचे आयसीएसई, सीबीएसई, आयबी असतील त्यांच्यावर राज्य शासनाचे नियंत्रण नाही. फी ची तक्रार आहे. या तिन्ही बोर्डाच्या शाळांमधून भरमसाठ फी आकारली जाते, अशा तक्रारी या समितीपर्यंत जात आहेत. या संबंधी समिती गठीत करुन कायद्याच्या अधिनियमात समावेश केला आहे. आयसीएसई, सीबीएसइ, आयबी बोर्ड आपल्या नियंत्रणात काम करीत नसतील व त्यांच्या फीच्या संबंधी अडचणी व तक्रारी असतील तर या बाबत राज्य शासनाकडे काय मार्ग आहे ? केंद्र शासनाशी किंवा इतर राज्यामध्ये या बाबत काय व्यवस्था आहे याचा विचार केला जाणार आहे काय ?

अध्यक्ष महोदय, माननीय शिक्षण मंत्री येथे आहेत. ज्या ठिकाणी एसएससी बोर्ड आहेत तेथे या समितीच्या मार्फत... जसे आपण Telecommunication Regulatory Authority (TRAI) केली आहे त्याप्रमाणे शिक्षण नियंत्रण करण्याची समिती राज्य शासना पुरती तयार केली. मी आपल्याला माहिती देतो की, मुंबई शहरात एसएससी बोर्डच्या अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पहिली ते दहावी पर्यंत कमीत कमी ४० ते ५०हजार रु प्रति वर्षाची फी द्यावी लागते. अधिकाधिक ८५ हजार रु. पर्यंत फी आहे. इतर ॲक्टीव्हिटी, बस सेवा, युनिफॉर्म चार्जेस, पुस्तके, प्रयोगशाळा, लायब्ररी, संगणक क्लासेस या करिता ५० ते ८५ हजार रुपये पर्यंत राज्यात एसएससी बोर्डाच्या शाळांकडून फी घेतली जात आहे. जिल्हा परिषदेच्या

श्री. योगेश सागर .....

शाळा, ट्रस्टच्या माध्यमातून चालणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या शाळा सोडून दिल्या तर अनुदानित खाजगी शाळांना आपण परवानगी देत होतो त्यांनी इंग्रजी माध्यामाच्या शाळा सुरु केल्या आहेत. ते आपल्याकडून ग्रँड घेत नाहीत त्यांची फी ५० ते ८५ हजार रु प्रति वर्ष एवढी वसूल केली जाते. माननीय मंत्री यांनी या संबंधी खुलासा करावा. शासनाने ज्या समित्या स्थापन केल्या जाणार आहे, त्यांचे मानधन व भत्ते निश्चित केले आहेत या समितीला कोणते निर्देश शासन देणार आहे ? सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार यांनी सांगितले की, पीटीए ( Parent Teacher Association ) हे कधीच त्या समितीपर्यंत पोहचू शकणार नाहीत. त्याची मर्यादा शाळेच्या संचालकांपर्यंत आहे. त्यांची सुनावणी होते तेव्हा त्यांचे विद्यार्थी त्या शाळेत शिकत आहेत म्हणून पीटीए शाळेच्या विरोधात जाऊ शकत नाहीत. यामुळे या संबंधी एक स्लॅब राज्य शासनाने ठरवून दिला पाहिजे तसेच शासनाने हस्तक्षेप केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आयसीएसई, सीबीएसइ, आयबी बोर्डच्या शाळांना फी नियंत्रणा संबंधी ऑथॉरिटी आहेत. या शिक्षण संस्थांना आपण जेथे प्लॉट दिले आहेत उदा. मुंबई शहराचा मी उल्लेख करतो. शिक्षणासाठी राखीव प्लॉट आपण दिले आहेत. त्या प्लॉटवर शाळा उभारण्यात आल्या आहेत. त्यांना अट घातली होती की, एसएससी बोर्ड व्यतिरिक्त त्यांना संलग्न करता येणार नाही. मात्र आता मुंबई महापालिका सर्व बोर्डच्या शाळांना संलग्न करुन घेत आहे. महापालिकेचे बंधन राहिले नाही व राज्य शासनाचेही बंधन राहिले नाही. यामुळे त्यांच्यावर नियंत्रण कशा प्रकारे केले जाणार आहे याचा उल्लेख करावा अशी विनंती मी करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

असुधारित प्रत

प्रा. वर्षा गायकवाड ( शालेय शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, वि.स.वि.क्र १४ – महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन ) ) सुधारणा विधेयका संबंधी माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री योगेश सागर, अतुल भातखळकर, सन्माननीय सदस्य ॲड . आशिष शेलार यांनी येथे मते व्यक्त केली. या विषयासंबंधी सर्वांची तळमळ दिसून आली. शुल्काच्या संबंधी काही पालकांची तक्रार असेल तर त्या संबंधी काही व्यवस्था असली पाहिजे. या करिता कायद्यांतर्गत व्यवस्था तयार करण्यात आली आहे, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार यांनी केला.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड ...

समजा भरमसाठ फी असेल किंवा एखाद्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत काही चुकीचा व्यवहार असेल तर अशा ठिकाणी एक समिती व्हावी. या कायद्याच्या माध्यमातून असे होते की, त्यांना वेतन व भत्ते द्यावेत. त्यामध्ये बदल करण्याकरिता आज हे दुसरे विधेयक बदल करुन आणलेले आहे.

अध्यक्ष महोदय, वेतन व भत्ते असे नमूद न करता मानधन व भत्ते करणे, एवढ्या मर्यादित स्वरुपात हे विधेयक आहे. आपण हे का केले, हा निर्णय का घेतला असा प्रश्न मला सर्वांनी विचारला. मला हे सांगावयाचे आहे की, आपल्याकडे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन), अधिनियम २०११ दि.१ डिसेंबर, २०१४ रोजी लागू झाला. त्यानंतर आपली पुनरीक्षण समिती गठित झाली.

अध्यक्ष महोदय, आपल्याला देखील माहीत आहे की, कायद्यांतर्गत आपल्याला प्रथम पुनरीक्षण समिती स्थापन करावी लागते. त्यानंतर ती समिती विभागीय स्तरावरील शुल्क नियंत्रण समितीची निवड करण्याचे काम करते. दि.१९ ऑगस्ट, २०१५ रोजी राज्याची पुनरीक्षण समिती गठित झाली. माननीय उच्च न्यायालयाचे तत्कालीन माजी न्यायमूर्ती डॉ.एस. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली ही पुनरीक्षण समिती निर्माण केली गेली. मग त्या ठिकाणी विभागीय समित्या झाल्या. त्यामध्ये दि.१ एप्रिल, २०१६ अन्वये मुंबई, पुणे आणि नाशिक या ३ विभागात त्यावेळेस विभागीय नियंत्रण शुल्क समितीची स्थापना करण्यात आली.

अध्यक्ष महोदय, नंतरच्या काळात सातत्याने विचारले गेले की, कोरोनाच्या परिस्थितीमध्ये काय होते? ज्यावेळेस सरकार आले त्यावेळेस आम्ही पुनरीक्षण समितीच्या संदर्भात माजी सेवानिवृत्त न्यायाधीशांची मागणी केली. विधी व न्याय विभागाच्या माध्यमातून उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश श्री.ए.एन. ढवळे यांची आम्हाला दि. २० फेब्रुवारी, २०२० रोजी मान्यता मिळाली.

अध्यक्ष महोदय, मग आम्ही असा विचार केला की, पुनरीक्षण समिती आपली गठित झालेली आहे. आता आपण विभागीय स्तरावरील शुल्क नियंत्रण समित्या स्थापन केल्या पाहिजेत. ज्यावेळेस आम्ही अशासकीय सदस्यांसाठी जाहिराती

प्रा.वर्षा गायकवाड ...

दिल्या. एकदा जाहिरात दिली, कोणी मंडळी आली नाहीत. दुसऱ्या वेळेस जाहिरात दिली, कोणी मंडळी आली नाहीत, तिसऱ्या वेळेस जाहिरात दिली कोणी मंडळी आली नाहीत.

अध्यक्ष महोदय, मग आम्ही याची माहिती घेण्यास सुरुवात केली की, अशासकीय सदस्य व बाकीची मंडळी यामध्ये का येत नाहीत. तुम्ही जो सातत्याने प्रश्न विचारता की, मागील काळात या लोकांना कुठल्याही तऱ्हेचे वेतन किंवा कुठलेही भत्ते दिले गेले नव्हते. त्यासाठी कुठलीही आर्थिक तरतूद नव्हती, त्याचा कुठला जी.आर. निघाला नाही. त्यामध्ये कुठल्याही पैशांची व्यवस्था केली गेली नाही.

अध्यक्ष महोदय, अशासकीय सदस्य आम्हाला मिळत नव्हते. अशावेळेस आम्ही वित्त विभागामध्ये जाऊन त्यासाठीचे लेखाशीर्ष निर्माण केले. त्याकरिता पुरवणी मागणी मागण्याचे काम केले. चर्चा करीत असताना आम्हाला असे आढळले की, सद्य:स्थितीत विभागीय स्तरावरील तक्रारी पाहिल्या तर मुंबईमध्ये २३ तक्रारी आहेत. पुण्यामध्ये २२ तक्रारी आहेत. औरंगाबादमध्ये मागील काळापासून किती तक्रारी आहेत असे आपण विचारले आहे, तेथे ४ तक्रारी आहेत. उर्वरित नाशिक, कोल्हापूर, लातूर, अमरावती या विभागस्तरावर शून्य तक्रारी आम्हाला मिळाल्या.

अध्यक्ष महोदय, सर्वसाधारणपणे ह्या तक्रारी कोठून येत आहेत तर आयसीएसई, सीबीएसई अशा मोठ्या शहरातील ज्या मोठ्या शाळा आहेत त्या माध्यमातून जी भरमसाठ लादली जाते त्यामुळे या ३ विभागीय स्तरांवर फक्त तक्रारी आहेत. बाकीच्या स्तरावर शून्य तक्रारी आहेत. तक्रारीच्या बाबतीत आपण पाहिले तर जून ते नोव्हेंबरपासून वर्षभरात या इतक्याच तक्रारी आम्हाला प्राप्त झालेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मग यावर लागणारा खर्च किती आहे, या संदर्भात आम्ही विचार केला. जेव्हा आम्ही खर्चाच्या संदर्भात अभ्यास केला त्यावेळेस आम्हाला असे दिसले की, सेवानिवृत्त शिक्षण संचालकांना जर अशासकीय सदस्य म्हणून

प्रा.वर्षा गायकवाड ...

घ्यायचे असेल तर त्यांना वेतन व भत्ते द्यायचे झाल्यास ते जवळपास ६० हजार रुपये होतात. वर्षाला त्याचा खर्च ७ लक्ष २० हजार रुपये आहे. त्या ऐवजी समजा आम्ही हे जे मानधन व भत्त्यांचे बोलत आहोत. त्यामध्ये आम्ही मानधन ३० हजारांचे म्हणत आहोत. त्या व्यतिरिक्त भत्ते १५ हजारांचे म्हणत आहोत. त्याचा वार्षिक खर्च जवळपास ५ लाख ४० हजार इतका येत आहे.

अध्यक्ष महोदय, याचा अर्थ आपण पाहिले तर एका सदस्याच्या मागे १ लाख ८० हजार रुपये बचत होत आहे. हा विचार केल्यानंतर असे समजले की, ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जर कोणाची तक्रार असेल कारण आपल्याला देखील माहिती आहे की, तक्रार करायची म्हटली तर २५ टक्के पालक एकत्र आले पाहिजेत. २५ टक्के पालकांनी तक्रार केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, तक्रारींचा आम्ही जेव्हा अभ्यास केला तेव्हा आम्हाला असे जाणवले की, काही ठिकाणी तक्रारी होतात. त्या ठिकाणी या बैठका झाल्या पाहिजेत. बैठका झाल्यानंतर त्यांना मानधन दिले गेले पाहिजे. त्यांना लागणारे भत्ते दिले गेले पाहिजेत म्हणून या ठिकाणी हे विधेयक आणण्याचे आम्ही ठरवले व त्याप्रमाणे आज हे विधेयक आपल्या सर्वांसमोर आणण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर यांनी हे तरी स्वीकारले की, आम्ही त्या काळात विविध मार्ग अवलंबिले. त्या काळात मला असे वाटते की, शिक्षण देणे किंवा जीवन जगणे या दोन्ही गोष्टीमध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये संघर्षाचे वातावरण होते. खूप मोठ्या प्रमाणावर आव्हाने होती. तरी त्या कोरोनाच्या काळात आम्ही विविध माध्यमे वापरली. ज्याचा आपण उल्लेख केला. सॅटेलाईटचा उल्लेख आपण केला. परंतु, आपण हे बोलला नाहीत की, भारतामध्ये गुगल बरोबर टायअप करणारे आपले राज्य होते.

अध्यक्ष महोदय, आम्ही दूरदर्शनच्या माध्यमातून सह्याद्री चॅनेलवरुन सगळीकडे गेलो. आपण वॉटसअॅप वापरले, आपण युटयूबमध्ये कंटेंट केले. आपण मोठ्या प्रमाणात ऑफलाईन, ऑनलाईनच्या माध्यमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न

प्रा.वर्षा गायकवाड ...

केला. मी तुम्हाला सांगते की, मी चॅनेल मिळावे याकरिता देखील माननीय केंद्रीय मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांच्या समवेत बोलण्याचा प्रयत्न केला.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांसमवेत बोलल्यानंतर देखील मी सातत्याने बैठका घेतल्या. केंद्रीय दूरसंचाराचे काम पाहणाऱ्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली की, आम्हाला हे चॅनेल मिळाले पाहिजेत. ते चॅनेल जर आम्हाला फ्री मिळाले कारण आम्हाला प्रायव्हेट जिओ म्हणत होते की, आम्ही तुम्हाला चॅनेल देतो. बाकीचे लोक म्हणत होती की, आम्ही तुम्हाला चॅनेल देतो. परंतु, आमचा हा प्रयत्न होता की, गावखेड्यामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, यावर्षी त्यांनी आम्हाला सांगितले आहे की, आम्ही तुम्हाला यावर्षी १२ चॅनेल देण्यास तयार आहोत. पुढच्या वर्षापासून आपण १२ चॅनेलच्या संदर्भामध्ये निर्णय घेत आहोत. मला त्यांनी सांगितले, एक उल्लेख केला की, पुण्यामध्ये ज्या तऱ्हेच्या गोष्टी झाल्या... सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर यांनी बाऊंसरचा उल्लेख केला. ते चुकीचे आहे. ज्या शाळा अशा चुकीच्या गोष्टी करतात ... अध्यक्ष महोदय मला या ठिकाणी आपल्या माध्यमातून काही गोष्टी निदर्शनास आणावयाच्या आहेत.

अध्यक्ष महोदय, ज्यावेळेस कोरोनाचे संकट आले तेव्हा आम्ही पहिला जी.आर. दि. ३० मार्च, २०२० रोजी काढला. त्यातील काही गोष्टींचा उल्लेख आपण केला की, या काळात फी जमा करु नये. कोणतीही सक्ती करु नये अशा तऱ्हेचे आम्ही सांगितले. आपल्याला माहीत आहे की, आम्ही जो दिनांक ८ मे रोजी जी.आर. काढला त्यात आम्ही असे सांगितले की, फी ३ टप्प्यांमध्ये घ्यावी. यावर्षी फीची कुठलीही वाढ करु नये. ज्या गोष्टीचा वापर केला जात नाही, त्या गोष्टीच्या बद्दल चार्ज करु नये असा देखील जी.आर. आम्ही काढला. एवढेच नाही तर त्याबाबत माननीय उच्च न्यायालय, माननीय सर्वोच्च न्यायालयापर्यंत आम्ही गेलो.

अध्यक्ष महोदय, त्या ठिकाणी दि. २६ जून, २०२० ते दि. १ मार्च, २०२१ पर्यंत त्या जी.आर.वर लढण्याचे काम आम्ही केले. आम्ही पहिल्यांदाच त्यासाठी

प्रा.वर्षा गायकवाड ...

स्पेशल वकील नेमले व प्रयत्न केला. मी आपल्या सभागृहाच्या निदर्शनास एक गोष्ट आणू इच्छिते. २५ टक्के पालकांनाच फक्त जाण्याचा अधिकार आहे. त्यामुळे जर ४-५ पालकांना तक्रारी करायच्या असतील तर त्यांनी कोणाशी संपर्क साधावा, कारण २५ टक्के पालक एकत्र येणे तसे फार कठीण होते. त्यामुळे प्रत्येक पालकाची तक्रार लक्षात घ्यावी याकरिता आम्ही तक्रार निवारण समित्या निर्माण केल्या. कोणत्या अधिकाऱ्यापर्यंत आपण पोहाचले पाहिजे, तक्रार असेल तर कोणत्या अधिकाऱ्याला आपण भेटलो पाहिजे याकरिता आम्ही अशा सर्व अधिकाऱ्यांचे नंबर दिले की, ज्यांच्याकडे तुम्ही पोहोचू शकता. तुमची कुठली तक्रार असेल तर ज्या अधिकाऱ्यांपर्यंत तुम्ही जाऊ शकता ते नंबर आम्ही त्या ठिकाणी पासऑन करण्याचे काम केले.

अध्यक्ष महोदय, सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की, आम्ही त्या काळात खूप निर्णय घेतले. आपण ज्या कमिटीचा उल्लेख केला... खरे तर येणाऱ्या अधिवेशनात आमचा प्रयत्न राहील. या विधेयकामध्ये खूप बदल करण्याची आवश्यकता आहे. कारण हे विधेयक आपल्या सर्वांना माहीत आहे की, घराघरामध्ये सर्वांच्या जिव्हाळ्याचे आहे. प्रत्येक घरामध्ये एक मूल असते. त्यामुळे प्रत्येक घराशी संबंधित असणारे हे विधेयक आहे.

अध्यक्ष महोदय, आपण सांगितले त्याप्रमाणे आम्ही आमच्या सह सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी केली. त्यामध्ये खूप पालक संघटनांसमवेत बैठक झाली. मोठमोठे अधिकारी तसेच बाकीच्या लोकांसमवेत चर्चा केली. मला आठवते आहे की, मागच्यावेळेस विधानसभेमध्येच या प्रश्नावर आपण बोललो होतो. त्यानंतर मी पुन्हा सह सचिवांना म्हटले की, आपल्याला कायद्यामध्ये जे बदल करायचे आहेत ते काम कोठपर्यंत पोहोचले आहे, आपला अहवाल कशातऱ्हेने झालेला आहे? तेव्हा त्यांनी मला असे सांगितले की, आपण एकदा विधी व न्याय विभागाच्या सचिवांशी बोलावे कारण कायदेशीर करीत असताना त्या समितीवर ते देखील सदस्य आहेत. त्यामुळे त्यांचे देखील मत घेतले गेले पाहिजे.

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड ...

अध्यक्ष महोदय, ती नस्ती आता विधी व न्याय विभागाच्या सचिवांकडे गेलेली आहे. मी त्यांच्या समवेत देखील ३ दिवसांपूर्वी बोलले. त्यांनी सांगितले की, मी सध्या १-२ विधेयकाच्या कामात आहे. अधिवेशनानंतर २-३ दिवसानंतर मी या विधेयकावर अभ्यास करतो आणि जे नवीन विधेयक आपल्याला करावयाचे आहे किंवा या विधेयकामध्ये जे बदलाव आपल्याला करावयाचे आहेत, त्याबाबत माझे व्ह्यू देतो. ते येणाऱ्या भविष्यकाळात येईल. परंतु, आजच्या या विधेयकाच्या माध्यमातून मी सभागृहाला विनंती करु इच्छिते की, हे सर्वांच्या दृष्टिकोनातून महत्वाचे असे विधेयक आहे. जसे मी सांगितले की, ...

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड ...

या विधेयकामध्ये थोडासा बदल करण्यात आला आहे. वेतन व भत्ते न ठेवता मानधन व भत्ते ठेवण्यात आले आहेत. ज्या ज्यावेळी ते बैठकीस हजर राहतील त्याच वेळी त्यांना त्यांचे मानधन व भत्ते देण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, आयसीएससी, सीबीएससी आणि इतर शाळांच्या संदर्भात या समितीकडे दाद मागता येईल. या समितीचे अध्यक्ष माननीय उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश राहतील, ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे या समितीचे म्हणणे न्यायालयासमोरही टीकू शकणार आहे. या समितीच्या बैठकीच्या माध्यमातून मुलांना व पालकांना न्याय मिळणे अपेक्षित आहे. यादृष्टीकोनातून हे विधेयक खूप महत्त्वाचे आहे.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, एसएससी बोर्डाच्या शाळा राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असतात. त्या शाळांमधील ५वी ते १० वी या वर्गांतील विद्यार्थ्यांची फीस ५० हजार रुपये ते ८५ हजार रुपये आहे. यासंदर्भात सरकारने धोरण जाहीर केले पाहिजे. एका वर्षाला ८५ हजार रुपये फी म्हणजे दरमहा ७ हजार रुपये फीस ऑदर ॲक्टीव्हीटीच्या नावाखाली एसएससी बोर्डाच्या शाळांकडून घेण्यात येत असून ती सामान्य माणसाला परवडणारी नाही. याची दखल घेऊन यासंदर्भात एक बैठक घेऊन चर्चा केली पाहिजे व उक्त समितीकडे सरकारने गेले पाहिजे.

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, या संदर्भात बैठक घेण्यात येईल. परंतु सर्वांना कायदा माहिती आहे. फी रेग्युलेटरी ॲक्ट अंतर्गत ईपीटीआयमध्ये फी निश्चित करण्यात येते. ईपीटीआयच्या संदर्भात कोणाची तक्रार असेल तर सदरहू समितीकडे दाद मागता येते. त्यामध्ये सरकार थेट हस्तक्षेप करु शकत नाही. वैयक्तिक तक्रार असेल तर तक्रार समितीला सांगता येऊ शकते. २५ टक्के पालकांची संयुक्तिक तक्रार

प्रा.वर्षा गायकवाड...

आली तर समितीकडे दाद मागता येऊ शकते. या व्यतिरिक्त आपले काही म्हणणे असेल तर येणाऱ्या कायद्यात सुधारणा करावयाची असेल तर न्याय देण्याकरिता त्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष (दीपक चव्हण)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड २ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १४ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडत‍े.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १४ संमत झाले आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ. शी.** : डॉ.पी.ए.इनामदार विद्यापीठ, पुणे विधेयक

L.A. BILL NO. III OF 2022

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF DR. P.A. INAMDAR UNIVERSITY, PUNE FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.प्राजक्त तनपुरे (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता, डॉ.पी.ए.इनामदार विद्यापीठ, पुणे याची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता, डॉ.पी.ए.इनामदार विद्यापीठ, पुणे याची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

श्री.देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्ष नेता) : अध्यक्ष महोदय, स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठाच्या संदर्भात सभागृहामध्ये अनेक कायदे तयार केले आहेत. आता डॉ.पी.ए. इनामदार विद्यापीठाचा कायदा तयार करण्यात येत आहे.

अध्यक्ष महोदय, हे विधेयक मी वाचले आहे. यामध्ये मला एक अडचण दिसत आहे. आपण स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठाचा अम्ब्रेला कायदा तयार केला, त्यानंतर वेगवेगळे कायदे तयार केले आहेत. त्यावेळी सातत्याने एक संकल्पना मांडलेली आहे की, पारंपारिक शासकीय विद्यापीठांच्या स्पेसमध्ये स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठ येणार नाही. स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठ हे कोणत्या तरी स्पेशलाईझ कोर्सशी संबंधित असली पाहिजेत. मग ती मेडिकल, स्पेस टेक्नॉलॉजी, सायन्स संदर्भातील इनोव्हेशनची असू शकतात. हा मुद्दा सभागृहाने सातत्याने स्वीकारला आहे. कारण आपले पारंपारीक विद्यापीठे गरीबांना सेवा देतात. आपल्याला त्याच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी वेळ लागतो. भरती प्रक्रिया करण्यासाठी वेळ लागतो. आपली विद्यापीठे गरीब व सामान्य माणसांसाठी आहेत. ती अडचणीत येऊ नये या कारणास्तव आपण पारंपारिक विद्यापीठांच्या स्पेसमध्ये ही विद्यापीठे येऊ नयेत हा विचार मांडला आहे. या सरकारच्या काळात मागील वेळी विद्यापीठांच्या संदर्भात चर्चा झाली त्यावेळीही हेच ठरविण्यात आले.

अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या उद्दीष्टामध्ये सर्वच बाबींचा समावेश करण्यात आला आहे. त्यामधे नमूद करण्यात आले आहे की, या विद्यापीठाची उद्दीष्ट्ये पुढील प्रमाणे असतील, "बांधकाम, स्थावर, संपदा, पायाभूत प्रकल्प यांच्यावर भर देण्यासह अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, व्यवसाय आणि वाणिज्य, उपयोजित व सृजनात्मक कला, व्यवसायिक शिक्षण, प्रसार माध्यम, माहिती व दळणवळण तंत्रज्ञान, मुलभूत शिक्षण व त्यांचा आंतर विद्याशाखीय अभ्यासक्रम व विकास यांसारख्या मुक्त कला, मानव्य विद्या, सामाजिक शास्त्रे, जीवन शास्त्रे आणि जैव तंत्रज्ञाने, लघुत्तम शास्त्रे व तंत्रज्ञाने, व्यवसायिक विद्याशाखा यांचा अंतर्भाव असलेली उच्च व तंत्रशिक्षणामधील अध्ययन, अध्यापन, क्षमता, कर्तृत्व व

श्री.देवेंद्र फडणवीस...

कौशल्य विकास आणि संशोधन व विकास याकरिता तरतूद करणे, उच्च व तंत्रशिक्षण, कला, क्रीडा, संस्कृती, चित्रपट, अवकाश तंत्रज्ञान, सागरी संशोधन, या विषयांमधील शिक्षण, अध्यापन व प्रशिक्षण देणे आणि संशोधनासाठी तरतूद करणे, उच्चस्तरीय अशी बोधात्मक, भावात्मक आणि मनोकारक क्षमता निर्माण करणे, उच्च प्रतीची बौद्धिक क्षमता निर्माण करणे, विकास व सामाजिक पुनर्रचना आणि परिवर्तन यांकरिता नवीन मार्ग शोधून त्याद्वारे सर्जनशीलता, अभिनव उपक्रम, उद्यमशीलता यांना चालना देण्यासाठी नवनवीन शैक्षणिक कार्यक्रम निर्माण करणे, त्यांचा जास्तीत जास्त वापर करणे, शिक्षण व विकास यांसाठी आधुनिक विकास करणे " या व्यतिरिक्त अनेक बाबी आहेत. सुमारे २५ बाबींसाठी अनुमती देण्यात येत आहे. यामध्ये एक ही बाब सुटली नाही.

अध्यक्ष महोदय, सदरहू विद्यापीठ पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये येईल. पारंपारिक विद्यापीठांचे सर्व कोर्स सुरु करण्यास आपण या विद्यापीठास अनुमती देऊ लागलो आहोत. आपली संकल्पना होती की, ज्या क्षेत्रात सरकार गुंतवणूक करीत नाही, ज्या क्षेत्रामध्ये अधिक गुंतवणुकीची आवश्यकता आहे, जेथे हाय टेक्नॉलॉजी आहे, जेथे अत्याधिक मनुष्यबळ तयार करावयाचे आहे, अशी विद्यापीठे यावीत यासाठी अम्ब्रेला ॲक्ट तयार करण्यात आला आहे. त्याचे उल्लंघन होत आहे. पुणे विद्यापीठाशी समकक्ष डॉ.पी.ए.इनामदार विद्यापीठास मंजुरी देण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. त्याअंतर्गत पारंपारिक विद्यापीठातील सर्व कोर्सेस सुरु करण्याची परवानगी देण्यात येत आहे. याचा परिणाम पुणे विद्यापीठावर होईल, सामान्य माणसांच्या विद्यापीठावर होईल. आपली मूळ संकल्पना होती की, ज्या क्षेत्रात सरकार गुंतवणूक करीत नाही त्याक्षेत्रात खाजगी गुंतवणूक आली पाहिजे व ती उच्च तंत्रज्ञानामध्ये आली पाहिजे, हा उद्देश पूर्ण होत नाही. या विद्यापीठामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान या शाखेतील सर्व कोर्सेस सुरु करण्यात येत आहेत.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस......

जरुर हे विद्यापीठ करावे. परंतु आपण याबाबतचा पुनर्विचार करावा, असे मला वाटते. त्यांना स्पेसिफिक क्षेत्रांची निवड करण्याची सूचना द्यावी. त्याच क्षेत्रापुरते विद्यापीठ मंजूर करावे. ही क्षेत्र पारंपरिक विद्यापीठापेक्षा वरची असावीत. त्यामुळे आपण या विद्यापीठाचा पुनर्विचार करावा, अशी मी पुनश्च एकदा विनंती करतो.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, उच्च शिक्षणामध्ये खाजगी क्षेत्रांचा अंतर्भाव करुन चांगल्या दर्जाचे विद्यापीठे स्थापन व्हावीत. तसेच खाजगी क्षेत्राला देखील प्रोत्साहन मिळावे व आणखी शिक्षणाच्या सुविधा या राज्यातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने हे विधेयक मांडण्यात आले आहे. यामध्ये शासनाला कोणाही वित्तीय भार पडू नये, याची देखील शासनाने काळजी घेतली आहे. बहुतांश धोरणे याच्याशी सुसंगत आहेत. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, सभागृहाने या विधेयकाला मान्यता द्यावी.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, खाजगी विद्यापीठासंदर्भात या सभागृहाने एक धोरण मंजूर केलेले आहे. तसेच एक अँब्रेला ॲक्ट देखील मंजूरी केलेला आहे. यासंदर्भात वारंवार त्या धोरणाचा पुनरुच्चार आपण केलेला आहे. त्यामध्ये खाजगी गुंतवणूक ही स्पेसिफाईड क्षेत्रात येईल, असा उल्लेख करण्यात आलेला आहे. मला अजून ही आठवते की, माननीय श्री.दिलीपराव वळसे-पाटील उच्च व तंत्र शिक्षण मंत्री होते, तेव्हा यासंदर्भातील धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. यासंदर्भात आपले असे धोरण आहे की, स्वीपिंग विद्यापीठास शासन मान्यता देणार नाही. हे विधेयक स्वीपिंग आहे. म्हणजे पुणे विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये हे शासन अजून एक विद्यापीठ निर्माण करीत आहे. या विद्यापीठामध्ये कोणताही कोर्स सुरु करता येतो. खाजगी विद्यापीठामध्ये, खाजगी गुंतवणुकीमध्ये, स्वंय अर्थसहाय्यितामध्ये शासनाची अपेक्षा स्पेसिफाईड सेक्टरची आहे. स्पेशलाईज सेक्टरची आहे. यामध्ये स्पेशलाईज सेक्टरचा उल्लेख कमी आहे. सर्वसाधारण उल्लेख अधिक आहे. या संदर्भातील अधिक माहिती आपणा घ्यावयाची असेल तर आपण घेऊ शकता. हे विधेयक मंजूर करण्यास आम्ही मदत करु.

श्री.देवेंद्र फडणवीस........

त्याबद्दल आपण काळजी करु नका. विधेयके अडवून ठेवण्यासाठी आम्ही येथे बसलेले नाहीत, ही बाब आपण लक्षात घ्यावी. आपण पुन्हा एकदा यासंदर्भातील सविस्तर माहिती घ्यावी, असे मला वाटते. अँब्रेला विद्यापीठाचा कायदा काय केला आहे, याबाबतचे धोरण काय केले आहे या सर्व बाबींचा विचार करावा. हे विधेयक मंजूर करण्यास आम्ही उद्या निश्चित मदत करु. मी उपस्थित केलेले मुद्दे डावलून अशा प्रकारचे विद्यापीठ स्थापन केले तर पारंपरिक विद्यापीठे राहणार नाहीत. कारण खाजगी विद्यापीठांकडे पैसा आहे. त्यांच्याकडे डिसिजन मेकिंगची पॉवर आहे. या खाजगी संस्था आहेत. पुणे विद्यापीठामध्ये प्राध्यापकाचे एक पद भरावयाचे असेल तर ५-५ वर्षे जातात. म्हणून कला वाणिज्य अशा रेग्यूलर सेक्टरमध्ये खाजगी विद्यापीठांना प्रवेश देणे भविष्यामध्ये अडचणी ठरणार आहे. त्यामुळे मी आपणास विनंती करतो की, हे विधेयक ऑनलेग ठेवण्यात यावे. आज किंवा उद्या माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करुन उद्या हे विधेयक चर्चेला घ्यावे. या विधेयकावर आम्ही मतदानाची मागणी करणार नाही किंवा अडवणूक देखील करणार नाही. शासन धोरणाच्या विरुद्ध हे विद्यापीठ स्थापन होत आहे म्हणून मी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे याबाबत वरिष्ठ मंत्री महोदयांशी चर्चा करुन हे विधेयक उद्या मांडावे, अशी मी विनंती करतो.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, आतापर्यंत राज्य शासनाने अनेक विद्यापीठांना मान्यता दिलेली आहे. या विषयाच्या खोलात आता मला जायायचे नाही. हे विधेयक आज ऑनलेग ठेवून उद्या मांडण्यास काहीही हरकत नाही.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक-३ आता ऑनलेग ठेवण्यात येत आहे.

---------

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत

श्री.आशुतोष काळे : अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील कोपरगाव नगरपरिषदेमध्ये अतिक्रम काढण्याची मोहिम सुरु केलेली आहे. तो प्रशासनाचा विषय आहे, त्यामुळे याबाबत माझे काहीही म्हणणे नाही. सदर अतिक्रमण काढल्यानंतर त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होऊ नये, म्हणून शासनाने गाळे किंवा व्यापारी संकुल अशा प्रकारची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जे नियमित व्यापारी आहेत, त्यांचे अतिक्रण काढू नये. परंतु जे अनियमित व्यापारी आहेत, त्यांचे अतिक्रमण काढण्यास काहीही हरकत नाही, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** उक्त प्रकरणाची शासनाने नोंद घ्यावी.

-------

असुधारित प्रत

**पृ. शी. :** मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे

**मु. शी. :** मुंबईच्या समस्या, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार, मुंबईतील पर्यावरणाची स्थिती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आणि अनुशेष दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे या विषयासंबंधी सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड आशिष शेलार, सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, गिरीष महाजन, नितेश राणे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री गणेश नाईक, मंगलप्रभात लोढा, अतुल भातखळकर, अमित साटम, योगेश सागर, रणधीर सावरकर, प्रशांत ठाकूर, ॲड पराग अळवणी, ॲड राहूल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री सुनील राणे, संजय केळकर, रविंद्र चव्हाण, मिहिर कोटेचा, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री पराग शहा, राम कदम, डॉ. भारती लव्हेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री महेश बालदी, सुभाष देशमुख, हरिभाऊ बागडे, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री कालिदास कोळंबकर, विजय देशमुख, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, लक्ष्मण जगताप, महेश लांडगे, संभाजी पाटील-निलंगेकर, अभिमन्यु पवार, राणाजगजितसिंह पाटील, सचिन कल्याणशेट्टी, राम सातपुते, डॉ.सुरेश खाडे, श्री मोहन मते, सर्वश्रीमती सीमा हिरे, नमिता मुंदडा, श्वेता महाले, ॲड राहूल कुल, श्री दादाराव केचे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री.शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार रावल, जयकुमार गोरे, डॉ.विजयकुमार गावित, डॉ.संजय कुटे, सर्वश्री

असुधारित प्रत

राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, डॉ.देवराव होळी, श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, प्रा.डॉ.अशोक उईके, सर्वश्री मदन येरावार, राजेश पवार, संतोष दानवे, बबनराव लोणीकर, डॉ.तुषार राठोड, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री. अतुल सावे, प्रशांत बंब, किसन कथोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. गणपत गायकवाड, कुमार आयलानी, प्रकाश आवाडे, समाधान आवताडे, धनंजय गाडगीळ, प्रताप अडसड, समिर मेघे, हरिष पिंपळे, नामदेव ससाने, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री. राजेश पाडवी, कीर्तीकुमार भांगडिया, भिमराव केराम, गोवर्धन शर्मा, प्रकाश भारसाकळे, लखन मलिक, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, कृष्णा गजबे, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, डॉ. राहूल आहेर, श्री. दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री. मंगेश चव्हाण, नारायण कुचे, तान्हाजी मुटकुळे, महेश चौघुले, रविशेठ पाटील, लक्ष्मण पवार, काशिराम पावरा, संजय सावकारे, सुरेश भोळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु........

श्री रईस शेख (भिवंडी पूर्व) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९२ के अंतर्गत पेश किए गए प्रस्ताव पर बोलने के लिए मैं खड़ा हूं. आपने मुझे बोलने के लिए अवसर प्रदान किया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं.

अध्यक्ष महोदय, सम्माननीय गृहनिर्माण मंत्री ने यहाँ पर विस्तार से निवेदन किया है कि मुंबई में किस तरह से जर्जर इमारतों का पुनर्विकास हो रहा है. मुंबई में जब पुनर्विकास का काम शुरु हुआ, तो तब १९ हजार सेस और जर्जर इमारतें थी. २१ सालों में ३ हजार इमारतों का पुनर्विकास हुआ है. १६ हजार इमारतों का पुनर्विकास

श्री रईस शेख........

होना बाकी है. जिस गति से पुनर्विकास का काम हो रहा है, उसको ध्यान में रखते हुए इन इमारतों का पुनर्विकास होने में १०० साल से ज्यादा समय लगेगा. सबसे ज्यादा "ए,बी,सी, और ई" वॉर्ड में सेस इमारते है. मैं पहले महानगरपालिका में नगरसेवक भी था. मदनपुरा, नागपाडा, भायखला और मुंबादेवी में सबसे ज्यादा सेस इमारते है. इन १६ हजार इमारतों का पुनर्विकास करने के लिए आज से २१ साल पहले नियम ३३(७) की सोच लायी गई थी. मुझे लगता है कि अब एक एक्सपर्ट कमिटी बिठाना चाहिए जिससे पुनर्विकास को कैसे एक्सपिडाईट किया जाए, उसका निर्णय हो सके. १०-१५ साल से ऐसी कई इमारते है जिनकी आईओडी आए, उन इमारतों को तोड़ दिया गया, बाद में ६ मीटर का नॉर्म्स आया. ये इमारते आज भी गिरी हुई है. वहां पर कोई कन्स्ट्रक्शन नहीं हो रहा है और कम से कम ३ हजार टेनेन्ट्स ट्रान्झीट कॅम्प में रह रहे है. मैं "ई" वॉर्ड की बात कर रहा हूं. इस बारे में कोई भी पॉलिसी डिसीजन नहीं हुआ है. हम क्लेम तो बहुत कुछ कर रहे है कि गृहनिर्माण विभाग बहुत काम कर रहा है, लेकिन इन विषयों की ओर ध्यान दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, जो छोटी इमारते है, उसका पुनर्विकास अब हो नहीं सकता. क्योंकि वे बड़े क्लस्टर में नहीं आते. एमबीआरआर भी पूरी तरह से फेल हो गई है. बिल्डिंग इतनी तेजी से C-1 हो रही है कि "ई" वॉर्ड में हर हफ्ते हमें पुलिस परमिशन मांगनी पड़ती है. कहना पड़ता है कि अब ये C-1 हो गई, इस इमारत को खाली कराना है. छोटी इमारतों का रिपेअर होना जरुरी है. रिपेअर के बारे में म्हाडा की, एमबीआरआरबी की हालत ऐसी है कि उनके पास पैसे नहीं होते है. विधायक ३ लाख रुपये देता है. यहाँ सम्माननीय मंत्री श्री आदित्य ठाकरे जी उपस्थित है. मैं बताना चाहता हूं कि हमने मुंबई महानगरपालिका को इन इमारतों का मायनर रिपेअर करना अलावू किया है. मतलब हम शौचालय रिपेअर कर पाते है, टाईल्स बदल पाते है. हमने पूरे मुंबई में कॉमन शौचालय के लिए पैसा दिया है. शौचालय के पोर्शन का स्ट्रक्चर रिपेअर करने दे. मुंबई महानगरपालिका इसके लिए हर साल ५०० करोड़ रुपये

असुधारित प्रत

श्री रईस शेख........

ॲलोकेट करे. मुंबई महानगरपालिका के पास पैसा है. ये भी टैक्स पेअर्स है. ये प्रॉपर्टी टैक्स, वॉटर टैक्स, सेस पे कर रहे है. इसलिए यह एक अच्छा निर्णय हो सकता है.

अध्यक्ष महोदय, खुरबानो नामक एक इमारत है. ये बारा इमाम रोड पर है. सन १९७९ में इसको वॅकेट किया गया है. ये आज तक खाली है. आज इसका पुनर्विकास इसलिए नहीं हो पा रहा है क्योंकि फिजिब्लिटी नहीं है. एक बेसिक पुनर्विकास की कॉस्ट देखेंगे तो ३३ प्रतिशत लँड कॉस्ट होती है. ३३ प्रतिशत प्रिमियम है. ३३ प्रतिशत प्रिमियम का मतलब है कि हर प्रोजेक्ट में ३३ प्रतिशत सरकार का हिस्सा है. यदि इस प्रिमियम को आप कंट्रोल नहीं करेंगे,तो हमारा जो एरिया है, मदनपुरा या नागपाड़ा हो, जहां पर रिअल इस्टेट का रेट कम है, इनका पुनर्विकास नहीं हो रहा है. सबसे ज्यादा C-1 कॅटेगरी की इमारते यहाँ पर हो रही है. सरकार ने कोविड के समय में ५० प्रतिशत कन्सेशन प्रिमियम में दिया है. इस साल मुंबई महानगरपालिका को १६ हजार करोड़ रुपये प्रिमियम से आया, जब कि सालाना २ से ३ हजार करोड़ रुपये आता था. सरकार यदि प्रिमियम कम करती है तो पुनर्विकास तेजी से होता है. मेरा निवेदन है कि इस तरह से प्रिमियम कम किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, यहाँ पर म्हाडा के बारे में बात की गई. मैंने पांच सालों में देख लिया है कि इमारतों का खस्ता हाल किस तरह से हो रहा है और वह कैसी जर्जर होती है. यदि आप मदनपुरा की बात करेंगे, तो हमारे यहाँ सन १९६९ के बाद म्हाडा ने जो इमारते बनायी है, चाहे वह अक्सा, अशरफी, इस्लामिया, नूरबार इमारत हो, ऐसी कई इमारते है, इनका पुनर्विकास नहीं हो रहा है. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए. अब ३३(२४) एक नया रेग्युलेशन म्हाडा ला रही है. इसमें कितने डिफेक्ट्स है वह मैं बता सकता हूं. मेरा कहना है कि नियम ३३(७) में ही मायनर चेंजेस करके उसके तहत ही पुनर्विकास होना चाहिए. सरकार की पॉलिसीज की वजह से मुंबई में हजारों इमारते C-1 हो रही है. एमबीआरआरबी के पास पैसा नहीं है.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्ष के नेता सम्माननीय श्री देवेंद्र फडणवीस जी ने तो ऐसा फ्लैशबॅक किया कि हमारी पांच साल की स्थायी समिति याद दिला दी.

श्री रईस शेख........

उन्होंने एक के बाद दूसरा मुद्दा यहाँ पर पेश किया है. मेरा कहना है कि दिनांक ७ मार्च को कौंसिल नहीं है. नगरसेवक नहीं है. दिनांक ७ मार्च से लेकर तो आज तक प्रशासक ने ना ही नियम बनाए और ना ही किसी प्रस्ताव को पारित किया. विरोधी पक्ष के नेता जी ने कहा है कि आखरी स्थायी समिति ने डिसिल्टिंग और ट्रेंच के प्रस्ताव पारित नहीं किए. सम्माननीय सदस्य श्री रविंद्र वायकर जी, आप भी इस बारे में बोलिए. यदि दिनांक ०१ अप्रैल से डिसिल्डिंग करनी है, मुंबई को साफ करना है, तो उसका वर्क ऑर्डर कब इश्यू होता है ? आप स्थायी समिति के अध्यक्ष रह चुके है. आपने मुंबई चलायी है. इस सदन में सम्माननीय सदस्य श्री सुनिल प्रभू जी है, सम्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार जी है. आप बताईए कि दि. ०१ अप्रैल से काम कैसे होगा ? मैं तो शहर में हूं. मशीनरी से सफाई कर लेंगे. आप पश्चिम उपनगर में है. ट्रेंच, रास्तों के चीर कैसे भरे जाएंगे ? यदि प्रशासक निर्णय नहीं ले रहे है, तो इसमें मुंबई का नुकसान हो रहा है. मैं चाहता हूं कि आप वरिष्ठ है, सरकार से कहिए कि एक सप्ताह में सारे निर्णय होने चाहिए. दवाओं के बारे में कहा गया. एक साल से दवाओं के शेड्युल में परचेस नहीं है. आप जैसे लोग सदन में है. हम भारतीय जनता पार्टी को जवाब कैसे दें? आप बताईए. यदि आज मुझे काऊंटर करना है, तो मैं क्या बोल पाऊंगा? एक साल से हमने दवाई नहीं खरीदी. .... (व्यवधान)... आपका समर्थन तो कभी नहीं करेंगे. लेकिन जो गलत बात है वह मैं बता रहा हूं. मुझे पूरी उम्मीद है कि आज सदन में बोलने के बाद सम्माननीय सदस्य श्री रविंद्र वायकर, सम्माननीय सदस्य श्री सुनिल प्रभू जी सम्माननीय मंत्री श्री आदित्य ठाकरे जी को समझायेंगे कि यह निर्णय लेना कितना जरुरी है. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं.

---------

यानंतर श्री कुलकर्णी.....

श्री. रविंद्र वायकर (जोगेश्वरी) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९२ अन्वये विरोधी पक्षाकडून मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, काल म.वि.स. नियम २९३ अन्वये सत्तारूढ पक्षाने प्रस्ताव मांडला होता. त्यावर आजपर्यंत चर्चा झाली आहे. तसेच आज विरोधी पक्षाच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. तो सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मांडला आहे. हा प्रस्ताव मांडत असताना ते नेहमी ज्या पद्धतीने सभागृहाला संबोधित करतात, मार्गदर्शन करतात त्याप्रकारे आज त्यांचा जोश आम्हाला पहावयास मिळाला नाही. त्यांनी हा प्रस्ताव मांडत असताना केवळ आरोपांची एक जंत्रीच तयार केली होती. काल सत्तारुढ पक्षामार्फत म.वि.स. नियम २९३ अन्वयेचा प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांनी मुंबई शहरासंदर्भात मते मांडली आहेत. मुंबई शहरात गृहनिर्माण संस्थांसाठी विविध कायदे आहेत. मुंबई शहरात मोडकळीस आलेल्या इमारती आहेत. मुंबई शहरातील कायदे, नियम हे मुंबई उपनगराकरिता का नाहीत ? या कायद्याच्या माध्यमातून मुंबईतील १९ हजार इमारतींबाबतही सांगण्यात आले. सेस आणि नॉन सेस इमारतीबाबत सांगण्यात आले आहे. याबाबत घेण्यात येणाऱ्या सकारात्मक निर्णयाची माहिती आज सभागृहामध्ये मंत्री महोदयांनी सांगितली आहे. दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांनी त्या निर्णयांचे स्वागत केले आहे. मंत्री महोदयांनी सर्वांच्या प्रश्नाला सकारात्मक उत्तरे दिली आहेत. या सभागृहातील जे सन्माननीय सदस्य मुंबई शहराबाहेरील आहेत, राज्यातील इतर भागातून येतात त्यांच्या राहण्याचा प्रश्न होता. याकरिता ३०० घरांचा निर्णय घेतला आहे. नगर विकास मंत्री महोदयांनी आणि महसूल मंत्री महोदयांनी त्यांचे विचार मांडले आहेत. हे सर्व झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे सभागृहात उपस्थित होते. माननीय मंत्री महोदयांनी जे जे निर्णय घेतले आहेत, त्यांच्या निर्णयाची अंमलबजावणी हे सरकार निश्चितपणे करणार, असे त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर....

अध्यक्ष महोदय, नियम २९२ अन्वये मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करीत असताना त्यात पहिले वाक्य असे आहे की, "मुंबई हे शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे असून..... मी सांगू इच्छितो की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहेच. जी गोष्ट जगामध्ये मिळते ती या मुंबई शहरात मिळत असते. जागतील सर्व गोष्टी या मुंबई शहरात आहेत. असे असताना या आंतरराष्ट्रीय दर्जाचे हे शहर कशा प्रकारे कमकूवत होईल, या शहरातील चांगल्या योजना, प्रकल्प मुंबई बाहेर कसे नेले जातील, ते गुजरात राज्यात कसे नेता येतील, ते दिल्ली येथे कशा प्रकारे हलविता येतील यासाठी विरोधी पक्षाकडून प्रयत्न केले जात आहेत. हे अतिशय दु:खद आहे. मुंबई शहर आपल्या सर्वांचे आहे. ते आपले दैवत आहे. मुंबई शहरातील मुंबा देवी हे आपले दैवत आहे. असे असताना या दैवताची काळजी घेतली पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणि काही सन्माननीय सदस्यांनी ट्रेंचेसबाबत सांगितले आहे. ते योग्य आहे. मार्च आणि एप्रिल महिन्यामध्ये डिसिल्टींग होणे आवश्यक आहे. आता मुंबई महानगरपालिकेवर प्रशासकाची नियुक्ती केली आहे. त्यांनी तात्काळ निर्णय घेणे हे पावसाळयाच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्त्वाचे आहे. हे काम पावसाळा सुरु होण्यापूर्वी चालू झाले पाहिजे. हे विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. ते योग्य आहे. याबबात दूमत नाही. मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून पायाभूत सुविधा.....

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमित साटम यांनी सभागृहात माननीय मंत्री महोदय उपस्थित नसल्याची बाब मघाशी माझ्या निदर्शनास आणून दिली होती. त्यावेळेस मी त्यावर हरकत घेतली नाही. परंतु आता माननीय नगर विकास मंत्री, माननीय गृह मंत्री, माननीय गृहनिर्माण मंत्री उपस्थित नाहीत. या प्रस्तावामध्ये मुंबई शहराचा विषय आहे.

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, विधान परिषद सभागृहामध्ये माननीय नगर विकास मंत्र्यांचा महत्त्वाचा विषय सुरु आहे. तरीही मी याबाबत त्यांना निरोप दिला आहे. ते थोड्याच वेळात सभागृहात येतील. आता म.वि.स. नियम २९२ अन्वयेच्या

श्री. सुनिल प्रभू ...

प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर हे नगर विकास विभागाबाबत बोलत आहेत. माननीय नगर विकास मंत्री सभागृहात उपस्थित पाहिजेत, या मताशी आम्ही सहमत आहोत. मी स्वत: त्यांना याबाबत निरोप दिला आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** मंत्री महोदयांना लवकर बोलाविण्यात यावे.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर हे अतिशय महत्त्वाचे विषय मांडत आहेत. त्यांच्याशी आम्ही सहमत आहोत किंवा नाही, हा विषय वेगळा आहे. मघाशी माननीय नगर विकास मंत्री सभागृहात उपस्थित होते. आता केवळ सहकार मंत्री महोदय उपस्थित आहेत. परंतु आमचे म्हणणे असे आहे की, या तिन विभागांपैकी एक तरी मंत्री महोदय सभागृहात उपस्थित असले पाहिजेत.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सूचना करतो की, पाच मिनिटांमध्ये मंत्री महोदयांना बोलविण्यात यावे. ते जर उपस्थित झाले नाही, तर सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी तहकूब करता येईल.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, अशा प्रकारे कामकाज रेटून नेणे योग्य नाही. मी विनंती करतो की, असे करणे योग्य नाही.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सांगू इच्छितो की, पाच मिनिटांमध्ये मंत्री महोदय उपस्थित झाले नाही तर सभागृहाची बैठक तहकूब करु. परंतु तोपर्यंत सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर यांनी भाषणास सुरुवात करावी.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे की, सभागृहामध्ये मंत्री महोदय उपस्थित असणे आवश्यक आहे. अर्थात, आपण त्यांना ५ मिनिटांमध्ये बोलावणार असल्याचे सांगितले असल्यामुळे आपण चर्चेला सुरुवात करु.

अध्यक्ष महोदय, या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य पूर्वी मुंबई महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून कार्यरत होते. त्यामध्ये सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, श्री.योगेश सागर, ॲड.पराग अळवणी, श्री.सुनिल प्रभू, मी स्वत: व इतरांचाही समावेश आहे. आपल्याला माहिती आहे की, महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये सर्वपक्षीय सदस्य असतात. असे असतानाही या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना ज्या प्रकारे आरोप केले ते ऐकून असा प्रश्न पडतो की, स्थायी समितीमधील इतर सन्माननीय सदस्य काय करतात ? कारण महापालिकेतील संख्याबळानुसार प्रत्येक पक्षाचे सदस्य स्थायी समितीमध्ये असतात. कोणताही प्रस्ताव आल्यानंतर त्यावर विचारविनिमय करुनच तो मंजूर केला जातो व नंतर तो सभागृहामध्ये जात असतो.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा कोविडच्या संदर्भातील मांडण्यात आला. आपल्याला माहिती आहे की, कोविडची साथ ही एकटया मुंबईमध्ये नव्हे तर देशभर आणि जगभर आली होती. त्यावेळी या आजाराबाबत आपण पूर्णपणे अनभिज्ञ होतो. जिवाणुपासून नव्हे तर विषाणुपासून प्रसारित होणारा हा आजार होता. त्यामुळे संपूर्ण जगभर त्याचा संसर्ग पसरला. या आजारावर कोणती औषधे द्यायची, ती कशी द्यायची याबाबत कोणालाही माहिती नव्हती. हा आजार आपल्या राज्यामध्ये आला त्यावेळी आपल्या सभागृहाचे अधिवेशन सुरु होते. परंतु आजाराचे गांभीर्य लक्षात घेता माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या आवाहनावरुन आपण नियोजित वेळेपूर्वीच अधिवेशन संपविले होते. त्यानंतर माननीय पंतप्रधान, माननीय मुख्यमंत्री आणि कोरोना संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्सने दिलेल्या सूचनांचे आपण पालन करीत होतो. त्यावेळी आपण कसे राहावे याबाबत देखील नियम ठरवून देण्यात आले होते.

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर.....

आपण लोकप्रतिनिधी असल्याने कोविडग्रस्त अनेक लोक रुग्णालयामध्ये जागा मिळत नसल्याने आपल्याला फोन करुन विनंती करीत होते की, आम्हाला उपचारांसाठी कुठे तरी दाखल करा. खासगी रुग्णालयांमध्ये मोठया प्रमाणात बिले आकारली जात असल्यामुळे नगरपालिका, महानगरपालिका, राज्य शासन यांना जाणवले की आपण मोठमोठे कोविड सेंटर्स तात्काळ उभारले पाहिजेत. त्यावेळी कार्यालये बंद होती, बैठका होत नव्हत्या. सर्व कामकाज घरुनच सुरु होते. अशा परिस्थितीत देण्यात आलेल्या कोविड सेंटरच्या मान्यतेमध्ये नक्कीच पारदर्शकता असेल. अर्थात, जेव्हा चौकशी होईल तेव्हा "दूध का दूध और पानी का पानी" होईल. परंतु गोविड सेंटर्सची त्यावेळी नितांत गरज असल्यामुळे तात्काळ निर्णय घ्यावे लागले. या माध्यमातून राज्याला दिशा देण्याचे काम माननीय मुख्यमंत्र्यांनी केले. त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेचे महापौर, आयुक्त, अधिकारी, डॉक्टर्स यांनी कोविड काळात अतिशय वाखाणण्याजोगे काम केले. तो काळ असा होता की कोणी कोणाला शिवत नव्हते, एखादा खोकला तरीही दुसऱ्याच्या मनात धस्स होत होते. आपला शेजारी खोकत आहे व त्यामुळे आपल्याला देखील संक्रमण होते की काय असे मनात येत होते. कोरोना संक्रमणानंतर आपण जे अधिवेशन घेतले त्यावेळी अधिवेशनाच्या पूर्वी सर्वांना कोविड चाचणी बंधनकारक करण्यात आली होती. दुसऱ्या आठवडयात देखील पुन्हा चाचणी करण्यास सांगण्यात आले. एकूणच काय तर समाजामध्ये एवढी भीती पसरलेली असताना मुंबई महानगरपालिकेने अतिशय सक्षमपणे काम केले.

अध्यक्ष महोदय, कचरा उचलणे, गटार साफ करणे, इत्यादी कामांसाठी मुंबई महानगरपालिकेचे कामगार अशा परिस्थितीत देखील राबत होते. ते राबल्यामुळे महापालिका हद्दीमध्ये स्वच्छता टिकून राहिली. ही सर्व कामे महापालिका अधिकारी / कर्मचाऱ्यांनी केली नाहीत का ?

श्री.रविंद्र वायकर.....

अध्यक्ष महोदय, कोरोना रुग्णांवर उपचार करण्यासाठी डॉक्टर्सची कमतरता भासल्यामुळे अतिरिक्त डॉक्टर्स, कर्मचारी घ्यावे लागले. या अतिरिक्त कर्मचाऱ्यांनी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून केलेली सेवा देखील वाखाणण्यासारखी आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या विभागातील सेवानील हॉस्पिटल, ट्रॉमा केअर सेंटर, नायर हॉस्पिटल, के.ई.एम. हॉस्पिटल यांनी कोरोना काळात आपल्याला वाचवले आहे. ज्यांनी आपल्याला वाचवले, ज्यांनी आपली सेवा करुन जीवंत ठेवले त्याच डॉक्टरांवर आणि मुंबई महानगरपालिकेवर जर आपण आरोप करीत असू तर ते योग्य नाही, असे मला वाटते. संपूर्ण यंत्रणाच खराब आहे हे बोलणे चुकीचे आहे. या यंत्रणेतील एखाद्याने काही चुकीचे काम केले असेल व त्याला दोष दिला तर समजू शकतो. परंतु ज्यांनी चांगले काम केले आहे त्यांच्या कामाचे कौतुक करणे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. केवळ सातत्याने मुंबई महानगरपालिका भ्रष्टाचारी आहे असे बोलणे योग्य नाही. मी पुन्हा सांगू इच्छितो की, कोरोना काळात मुंबई महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आलेल्या सोयी-सुविधा वाखाणण्यासारख्या आहेत व त्यांचे मी समर्थन करतो.

अध्यक्ष महोदय, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळांमधील पटसंख्येच्या बाबतीतील विषय मांडण्यात आला. मुंबई महानगरपालिकेने सी.बी.एस.ई. बोर्डाच्या ११ शाळा सुरु केल्या आहेत. या शाळा अत्यंत उत्तम दर्जाच्या व सुसज्ज आहेत. माझ्याकडे त्यांची छायाचित्रे देखील आहेत. पूर्वी मुंबई महापालिकेच्या शाळांचा निकाल खूप कमी लागायचा. आम्ही महापालिकेमध्ये कार्यरत होतो त्यावेळी तेथे पाच-साडे पाच लाख विद्यार्थी शिकत असायचे. पुढे इंग्रजी शिक्षणाची मागणी व आकर्षण निर्माण झाल्यामुळे महापालिकेच्या शाळांचा दर्जा वाढविणे आवश्यक होते. त्यातूनच माननीय मंत्री तथा मुंबईचे पालकमंत्री श्री.आदित्य ठाकरे यांच्या पुढाकारातून मुंबई महापालिकेच्या शाळांचे होणारे सक्षमीकरण वाखाणण्यासारखे आहे. यातून मुंबईतील मराठी शाळांची पटसंख्या नक्कीच वाढेल.

श्री.रविंद्र वायकर.....

महापालिकेच्या सी.बी.एस.ई. शाळांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी लोक आम्हाला फोन करतात. परंतु प्रवेश प्रक्रिया देखील ऑनलाईन करण्यात आलेली आहे व चार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा अधिकार महापौरांना देण्यात आला आहे. एकूणच काय तर मुंबई महापालिकेच्या शाळांचा दर्जा वाढला असल्यामुळे त्यातील पटसंख्या देखील वाढत जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही मुंबई महापालिकेमध्ये कार्यरत असताना गरीब मुलांना आवश्यक त्या २७ वस्तू दिल्या होत्या. खासगी शाळेत जाणाऱ्या मुलांच्या आई-वडीलांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे ते मुलांना ज्या वस्तू देतात त्याच वस्तू मुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांना मिळाव्यात यासाठी आपणच स्थायी समितीमध्ये ठराव करुन शाळांना निधी उपलब्ध करुन दिला होता. त्यावेळी आपण मुलांना गणवेश, बूट, सॉक्स, इत्यादी २७ वस्तुंचे वाटप केले होते.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर...

त्याच पध्दतीने मुंबई महापालिकेच्या विद्यार्थ्यांना बळकट करण्यासाठी आणि त्यांची भूक क्षमविण्यासाठी टेट्रापॅक दुधाची देखील मागणी पूर्ण केली होती. म्हणून ५.५० लाख विद्यार्थ्यांना टेट्रापॅकच्या सुगंधी दुधाची देखील आपण त्यावेळी व्यवस्था केली होती, हे देखील आपण आठवले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी मुंबईचे कोळीवाडे, गावठाणे याबाबत डीसीआर करण्याची प्रक्रिया प्रलंबित राहिली, ही खरी गोष्ट आहे. आपला आधीचा डीपी १९९१ साली करण्यात आला आहे त्यानंतर २० वर्षांनी तो व्हायला पाहिजे होता. पण तो करेपर्यंत आपल्याला वेळ झाला. पण आता आपण २०३४ चा डीपी तयार केला. मात्र या डीपीमध्ये कोळीवाडे आणि गावठाणांचा समावेश राहिला आहे. या कोळीवाड्यातील रहिवाशी आमच्या मुंबईचे आद्य नागरिक आहेत. समुद्रालगत त्यांची जी घरकुले असतात ती १, २ आणि ३ माळ्यापर्यंत असतात. आपण त्यांना संरक्षित करणे गरजेचे आहे. गावठाणांमध्ये जे लोक राहतात त्यांना देखील संरक्षित करणे गरजेचे आहे. त्यामुळे याचा डीसीआर लवकरात लवकर झाला पाहिजे, अशी मला आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करायची आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावामध्ये मुंबईचे डबेवाला भवन आणि मराठी भाषा भवन याचा देखील उल्लेख आहे. डबेवाला भवन प्रशासनाने सांगितल्याप्रमाणे होणार आहे. मराठी भाषा भवनची सुरूवात सुध्दा लवकरात लवकर होईल. परंतु मी दुसरे सांगू इच्छितो की, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा म्हणून मागच्या वेळी या सभागृहात ठराव झाला होता. आपण तो ठराव केंद्र शासनाला दिलेला आहे. या ठरावाच्या माध्यमातून मी माननीय पंतप्रधानांना त्यावेळी एक पत्र लिहिले होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा द्यावा म्हणून सन २०१९ मध्ये हे पत्र लिहिले होते. ती देखील आपल्या माध्यमातून मी आठवण करुन देऊ इच्छितो. मराठी भाषा भवन तर होईलच. मुंबईच्या डबेवाल्यांचे भवन तर होणारच. परंतु मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी आपण या सभागृहाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहोत. हा विरोधी पक्षाचा ठराव असला तरी या माध्यमातून मी मराठी

श्री. रविंद्र वायकर...

भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी माननीय पंतप्रधानांची भेट घेऊन त्यांना सांगता आले की, इतर ५ भाषांना असा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे आमच्या महाराष्ट्रातील मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा का मिळत नाही, याचा देखील विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावाच्या माध्यमातून मेट्रोच्या कामाच्या किंमतीत वाढ होत असल्याचे सांगितले गेले आहे. ही खरी गोष्ट आहे. कारण जगामध्ये सध्या जे वातावरण चालले आहे, त्याचा परिणाम प्रत्येक देशावर होत आहे. युक्रेन आणि रशियामध्ये सुरु झालेल्या युध्दामुळे इंधनाचे दर अतिशय कडाडलेले आहेत. स्टीलचे भाव देखील कडाडलेले आहेत आणि या परिस्थितीत जे काम केले जाते ते करताना आपल्या सर्वांना माहिती आहे की, त्यामध्ये व्हेरिएशन होत असते. व्हेरिएशन झाल्यानंतर आपल्याला पुन्हा त्याला मान्यता घ्यावी लागते. परंतु मेट्रोचे हे प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत. कारण मुंबईला मेट्रोची गरज आहे. मेट्रोच्या कामाच्या माध्यमातून आपण अंतर्गत कनेक्टीव्हीटी करीत आहोत आणि ते करीत असताना आपण कोस्टल महामार्गाचेही काम करीत आहोत. या कामामध्ये मुंबईचे पालकमंत्री यांनी लक्ष घातले आहे. ९.९८ कि.मी.च्या या कोस्टर महामार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. यामुळे सुमारे ७० टक्के इंधनाची बचत होणार आहे. त्यामुळे तो महामार्ग लवकरात लवकर पूर्ण होईल. यासाठी निधीची उपलब्धता मुंबई महानगरपालिकेच्या फंजिबल एफएसआयच्या माध्यमातून झाली आहे. ज्यावेळी आपण मुंबई महानगरपालिकेमध्ये होतात त्यावेळी कोस्टल रोड मुंबई शहरातून मुंबइच्या उपनगरापर्यंत गेला पाहिजे आणि त्यावेळी फंजिबल एफएसआयची कल्पना पुढे आली. त्या फंजिबल एफएसआयचा पैसा आपण सुरक्षित केला आणि राखून ठेवला आणि आता त्या निधीमधून आपण या कोस्टल रोडचे काम करीत आहोत. मी या रोडची लांबी रुंदी आणि अधिकची माहिती सांगण्याच्या खोलात जात नाही. पण तो कोस्टल रोड आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर...

अध्यक्ष महोदय, मेट्रो कारशेडच्या बाबतीत जो उल्लेख केला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने गेल्या १० वर्षांमध्ये ३८,८९९ झाडे तोडण्याची परवानगी दिल्याचा दाखला देऊन आरेतील २७०० झाड‍े तोडण्यास विरोध करुन करुन मेट्रोची कारशेड रोखण्यात आली असा प्रस्तावामध्ये उल्लेख आहे. आरे कॉलनीचा परिसर माझ्या मतदार संघात येतो. जोगेश्वरी विक्रोळी लिंकरोडला लागून सारीपूतनगर नावाचा विभाग आहे आणि त्या विभागामध्ये ते व्हावे अशी माझी मागणी होती. तत्कालीन मुख्यमंत्री यांच्यासमवेत मी या विषयाची चर्चा केली आणि त्यांना सांगितले की, सारीपूतनगरमध्ये पुरेशी जागा आहे. वेराव्हीला लागून हा भाग येतो आणि त्या ठिकाणी मेट्रोचे कारशेड होऊ शकते. त्यामुळे आपल्याला आतमधील झाडे तोडण्याची गरज नाही हे माझे म्हणणे त्यांच्यासमोर मांडले होते. परंतु ते न ऐकता ती जागा आतमध्ये निश्चित केली. खरं म्हणजे यासाठी पर्याय दिलेला असताना त्याचा विचार न करणे योग्य नव्हते. शेवटी आतमध्ये कारशेड करण्याचा निर्णय करुन मोठमोठी वृक्ष तोडली गेली. त्यामुळे तेथे वृक्षप्रेमी आले व त्यांनी निदर्शने केली आणि मुख्यमंत्र्यांनी त्यानंतर हा डेपो दुसरीकडे करण्याचा विचार केला. इतर मेट्रो म्हणजे मेट्रो क्र.६, ७ यांचे काम प्रगतीपथावर आहे. लवकरच मेट्रो क्रमांक ७ ही अंधेरीपासून बोरीवलीपर्यंत धावेल. त्यामुळे मुंबई महानगरपालिका आणि मेट्रोच्या बाबतीत जे आरोप केले आहेत ते अद्याप सिध्द व्हायचे आहेत. आरोप कोणालाही करता येतात. पण ते सिध्द होणे महत्त्वाचे असते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद. जयहिंद, जय महाराष्ट्र !

----------

ॲड आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावर माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे विस्तृत मत मांडले आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रविंद्र वायकर बोलत असताना म्हणाले होते की, तुमचा २९२ आणि आमचा २९३ चा प्रस्ताव आहे. पण खऱ्या अर्थाने मी सांगू इच्छितो की, हा विषय तुमचा आणि आमचा असा नाही. मघाशी त्यांचा असलेला प्रस्ताव असो की आताचा आमचा अंतिम आठवडा प्रस्ताव असो. माझ्या दृष्टीने कोणाचा २९२ आणि कोणाचा २९३ असा विषय महत्त्वाचा नाही. माझ्या दृष्टीने तुम्ही कोणाचे समर्थन कराल, मी कोणाचा विरोध करील, किंवा मी कोणाचे समर्थन करील किंवा तुम्ही कोणाचा विरोध कराल हे देखील महत्त्वाचे नाही. हा प्रस्ताव म्हणजे या मुंबईकरांची व्यथा आणि त्यांची कथा आहे.

अध्यक्ष महोदय, १ कोटी ४० लाख रेकॉर्डवर असलेल्या मुंबईकरांची जवळजवळ ४६,५०० हजार कोटी बजेट असलेल्या महानगरपालिकेच्या सेवा सुविधांची काय स्थिती, त्याची ही कहाणी आहे. म्हणून मी या प्रस्तावामध्ये सर्व विषय बोलणार नाही. गावठाण, कोळीवाडे, एसआरए, शिक्षण, मेट्रो, रस्ते, खड्डे, नालेसफाई, कायदा व सुव्यवस्थेची स्थिती आहे. आपण नेहमी मुंबई स्पिरीटवर चालली आहे असे नेहमी म्हणतो. पण १८८८ चा कायदा असलेली जी इमारत आहे त्या इमारतीसमोर जर कुठला मुंबईकर उभा राहत असेल तर त्याचे पोट, त्याची गरज आणि त्याची असलेली अडचण हे बघून तो जो रोज धावतो त्या स्पिरीटने धावणाऱ्या मुंबईकराला एक मिनिट त्या मुंबई महापालिकेच्या इमारतीसमोर उभे राहिल्यावर हेच वाटत असेल जे एका कविने त्याच्या मनातील शब्दातून लिहिले आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे..

ॲड. आशिष शेलार....

या कविने म्हटल्याप्रमाणे तो मुंबईकर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारतीसमोर उभे राहून म्हणत असेल की,

"मैंने हर गम खुशी में डाला है,

मेरा हर एक चलन निराला है,

लोग जिस हादसों से मरते है,

मुझको इन हादसों ने पाला है. "

अध्यक्ष महोदय, या कवितेप्रमाणे मुंबईकरांची स्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी केवळ टीका करण्यासाठी मी बोलत नाही. निवडणुकांमध्ये आम्ही आणि तुम्ही पण टीका करणार आहोत. काही बाबी तुम्ही मान्य कराल किंवा अमान्य कराल आणि काही बाबी आम्हीही अमान्य करु. परंतु आपल्याला हे मान्य करावे लागेल की, १ कोटी ४० लाख लोकसंख्येच्या शहरामध्ये सरासरी एका वर्षाचे ४० हजार कोटी रुपये असे एकूण पाच वर्षांचे २ लाख कोटी रुपये खर्च केले आहेत. एवढा निधी खर्च करुन आपण १ कोटी ४० लाख लोकसंख्येला काय दिले? ५० टक्के म्हणजे १ लाख कोटी रुपये प्रशासकीय खर्च आपण सोडून देऊ. अध्यक्ष महोदय, आपण सुद्धा एका मतदारसंघातून निवडून या ठिकाणी इथे येतात. तर कल्पना करा की, एका शहरात १ लाख कोटी रुपये खर्च होत असतील तर ते शहर कसे असले पाहिजे?

अध्यक्ष महोदय, या सर्व शहराची व्यथा मांडताना कोरोनाच्या काळात डॉक्टर्स, नर्सेस, अधिकारी तसेच आपल्या आणि आमच्या ही काही लोकांनी सेवा केली आहे. यामध्ये काही दुमत नाही. मग १ लाख कोटी रुपयांच्या हिशोबात त्यांच्या पदरात काय मिळाले आहे. हा प्रश्न या प्रस्तावामध्ये येतो. मुंबई हे शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे. मग या ठिकाणी सुविधा वाढायला पाहिजे की कमी व्हायला पाहिजे? माझ्या मतदारसंघात कार्टर रोडला लागून समुद्र किनाऱ्याजवळ पेटिट शाळा आहे. नगर विकास विभागाने ६ महिन्यांपूर्वी या शहराचे सुशोभीकरण करण्यासाठी त्या

असुधारित प्रत

ॲड. आशिष शेलार....

शाळेच्या बाजूला १ हजार कोटी रुपयांची किंमत असणाऱ्या मोकळया ५० हजार स्क्वेअर फुट भूखंडावरील "Municipal Market, Old Age Home, Student Hostel" हे आरक्षण काढून तेथे "Residential" आरक्षण दाखविले. केवळ एवढेच नाही तर त्यापुढे ९.१५ मीटरचा डीपी रोड होता त्याचेही आरक्षण काढून टाकण्यात आले. CTS No. 1604, 1593 इत्यादीचे आरक्षण हे प्राथमिक आणि माध्यमिक शाळेसाठी होते. याचेही एका ठिकाणचे आरक्षण काढून अडचणीच्या ठिकाणी टाकले आणि तिथे "Open Space Residential" असे आरक्षण केले.

अध्यक्ष महोदय, CTS No.1592 खेळासाठी आरक्षित असलेले २१९५ स्क्वेअर मीटरचे मोकळे मैदान कशासाठी पाहिजे तिथे डॉक्टर्स, नर्सेस काम करीत आहेत आणि त्याच्या मागे आम्हाला लपायचे आहे. त्यामुळे तेथे मैदानाचे आरक्षण काढून टाकण्यात आले. एवढी आरक्षणे काढून केवळ एका विकासकाचा प्रकल्प कार्टर रोडच्या समुद्र किनाऱ्यावर करुन त्याला गारेगार हवा मिळावी म्हणून २ हजार कोटी रुपयांचा व्यवहार आणि गडबड करण्यात आली. त्यामुळे आमचे म्हणणे आहे की, हा प्रस्ताव मुंबईकरांची व्यथा व्यक्त करणारा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले म्हणणे मांडले आहे. त्याबाबत आता काय काय कहाण्या सांगाव्यात? कारण त्या कहाण्यांना अंतच नाही. आमचे बरेच सहकारी या विषयावर बोलणार आहेत.

अध्यक्ष महोदय, पी.पी.ई किटस मिळत नव्हत्या. त्यामुळे आपण आणि आम्ही देखील या वस्तु डोनेशनवर आणून लोकांना देत होतो. महानगरपालिकेकडून अशी अपेक्षा होती की, आपण पी.पी.ई. किट परवडणाऱ्या दरामध्ये घ्याव्यात. जे डॉक्टर आमची सेवा करणार आहेत त्यांना या किट देण्यात याव्यात. महापालिका मध्यवर्ती विभागातर्फे पी.पी.ई. किट आणि एन-९५ मास्कचे टेंडर काढले. एल १ म्हणून एकात सिम्फनी मल्टी ट्रेड आणि दुसऱ्यामध्ये ॲटलास मल्टी ट्रेड ह्या कंपन्या

ॲड. आशिष शेलार....

आल्यात. तिसऱ्यात टोयो फॅशन लिमिटेडचे टेंडर दिनांक १९ मे नंतर निघाले. त्यामध्ये परत ५ लाख पी.पी.ई किट्स घेण्यात आल्या. डॉक्टरांची आवश्यकता, पेशंटना गरज असणाऱ्या पी.पी.ई. किट्स चढत्या दराने घेण्यात आल्या. याची माहिती घेतली तर या तिन्ही कंपन्यांचे रजिस्ट्रेशन एकाच घरात आहे. तो युवा सेनेचा कार्यकर्ता आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू मी आपल्याला सांगू इच्छितो की, हीच आमची चिंता आहे. केवळ आरोपासाठी आरोप करण्याचा मुद्दा नाही. "मृत्युच्या आणि मेलेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खाण्याची वृत्ती" या म्हणीप्रमाणे ही वृत्ती त्यावेळेला समजते.

अध्यक्ष महोदय, केवळ त्या माणसाला हे टेंडर मिळाले पाहिजे यासाठी अटीमध्ये असा बदल केला की, "आम्हाला बँकेची ईएमडी, बँक गॅरंटी किंवा इतर काही कागदपत्रे नको." अशा प्रकारचे पी.पी.ई. किट्स आणि एन-९५ मास्क घालून डॉक्टर्स आणि नर्सेस स्वत:च्या जीवावर उदार होऊन कामे केली आणि मुंबईकरांची सेवा केली. त्याच्या आड आपण लपू नका. हा भ्रष्टाचार त्यांच्या आड लपविण्याचे कारण नाही.

अध्यक्ष महोदय, मी "फ्रॉड" हा शब्द वापरत आहे. रोज नवीन फ्रॉड होतो. यामध्ये मी एकच बाब मांडतो. श्री. अंकुश कुराडे नावाचे व्यक्ती हे अखिल भारतीय माहिती अधिकार कार्यकर्त्याच्या महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यांनी केवळ एकच काम केले आहे की, इमारत बांधकाम विभागाचे निघणारे टेंडर आणि त्यामध्ये सुचविण्यात आलेले काम आणि त्याची किंमत बघून त्या किंमतीला ते काम झाले आहे किंवा नाही हे तपासून बघण्याचे ठरवले. या एका मुंबईकराने एका विभागातील केवळ १५ कामे बघितली. तेव्हा मुंबई महानगरपालिकेला कंत्राटदाराला दणका द्यावा लागला कारण त्यांनी बघितलेल्या १२ कामांमध्ये ५० लाख रुपये अधिक १७ लाख ८४ हजार रुपयांचे काम केलेच नसताना देयके अदा केली होती. श्री. अंकुश कुराडे नावाच्या व्यक्तीमुळे महानगरपालिकेला एवढे पैसे द्यावे लागले. अशा किती

ॲड. आशिष शेलार....

विभागामध्ये काय काय लपून ठेवले असेल याची कल्पना करवत नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशा पापांना पांघरुण घालण्यात येऊ नये. मला माहीत आहे की, हे आपल्याही मनात नाही. यामुळे अशा वैभवशाली महानरपालिकेबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण होते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. योगेश सागर आणि सन्माननीय सदस्य श्री. पराग अळवणी त्यावेळी स्थायी समितीमध्ये होते. त्यावेळी मुंबई शहरातील मालमत्ता कराचे इव्हॅल्युएशन.... आताची कर प्रणाली ही कॅपिटल बेसवर आहे. कारण शहरात आणि उपनगरात वेगवेगळे टॅक्सेशन होते हे तुम्हालाही माहीत आहे. परंतु आता रेटेबल व्हॅल्युवर कर करण्याचे ठरवले. एका माणसाने आरटीआयमध्ये माहिती मागितली की, त्याच्या कुर्ल्यातील प्रॉपर्टीला ७ वर्षांपासून प्रॉपर्टी टॅक्सच येत नाही. त्यामुळे मी ती कहानी सांगितली की, "हमें तो हादसों ने संभाला है." त्यामुळे याची चौकशी केल्यानंतर लक्षाात आले की, सन २००९-१० पासून आपण रेटेबल व्हॅल्यु कर प्रणाली स्वीकरली असतांना देखील सन २०२२ पर्यंत कुर्ल्यातील जवळपास ३,५५४ इमारतींची मालमत्ता कर आकारणी रेटेबल व्हॅल्यु कर प्रणाली नुसार करण्याचे राहून गेले. अशा कुर्ल्यातील ३,५५४ इमारती आहेत तर मुंबई शहरातील अशा किती प्रॉपर्टी तुमच्या लेखीच नाही? परंतु तेथील मुंबईकर मात्र ही प्रॉपर्टी आहे, असे समजून जगत आहेत.

यानंतर श्रीमती करंदीकर....

ॲड. आशिष शेलार...

राज्य शासन, विकासक, निमशासकीय संस्था या सर्वांकडून मुंबई महापालिकेची रिकव्हरीची थकबाकी आता पर्यत सुमारे २१ हजार ९०५ कोटी रु. आहे. एका वर्षाचे जवळजवळ ६० टक्के बजेट एवढी ही रिकव्हरी शिल्ल्क आहे. काही केसेस असतील, काही लिटीगेशन असतील. मात्र आपली कार्यक्षमता या मधून दिसून येत नाही. माननीय विरोधी पक्षनेते यांनी स्थायी समितीच्या अध्यक्षांबाबत उल्लेख केला. मी या बाबत बोलणार नाही. मुंबई महापालिकेत हे कधीच झाले नव्हते. सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू स्थायी समिती अध्यक्ष होते. मी देखील होतो. मी अन्य कोणत्या महापालिकेचे नाव घेत नाही. कारण त्यांचा अपमान हाईल. मुंबई महापालिकेत स्थायी समिती अध्यक्ष गुंडागर्दी, दादागिरी करतो हे पहिल्यांदा झाले आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष व मे. यश कॉर्पोरेशनचे रमेश सोळंकी यांची एक ऑडिओ क्लिप प्रसिध्द झाली. त्यांनाही दिली. ऑडिओ क्लिपमध्ये संभाषण आहे. स्थायी समिती अध्यक्षांच्या ई वॉर्डामध्ये civic repair ची कामे एका कंत्राटदाराला मिळाली. स्थायी समिती अध्यक्षांच्या मनात आले की, माझ्या विभागात तू कसा. मेरे इलाके में तु क्या कर रहा है ? स्थायी समिती अध्यक्षांनी त्याला फोन करुन सांगितले की, काम मागे घे अन्यथा त्याचे परिणाम वाईट होतील. तुला कळत नसेल तर तुझ्या घरी येऊन माझी भाषा सांगेन. ही कोणती भाषा आहे. स्थायी समिती अध्यक्ष, एका माणसाला दम देतो की, तुझ्या घरी येऊन माझी भाषा सांगेन. ' इन हादसों ने हमें संभाला है. ' या ३०० कोटी रु. च्या मालमत्तेबाबत मी काही बोलत नाही. माणसाला भूक –भूक किती असली पाहिजे. माझ्या विभागातील एका कंत्राटदाराला काम मिळाले व मला ते काम त्याला द्यायचे नसेल तर मी त्याला फोन करुन दम देतो. माझी भाषा काय ती तुला सांगेन. मुंबईकरांची भाषा समजण्यासाठी आता तुम्ही तयार व्हा. मुंबईकरांना ही भाषा पसंत नाही.

अध्यक्ष महोदय, मघाशी माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सांगितले की, मद्यावर व इतर अनेक बाबींवर सूट दिली. ही यादी फार मोठी आहे. केवळ मद्यावर सूट दिली

ॲड. आशिष शेलार...

नाही. कोव्हिडच्या काळात होर्डींगच्या मालकांनी पत्र दिले. या नंतर मंत्रालयात बैठक झाली. त्यांची लायसन्स फी, जाहिरात फी, डीले चार्जेस माफ करण्यात आले. ताज हॉटेल च्या समोर रोड व फुटपाथ बंद केला जातो. या करिता ताज हॉटेलला साडे ८ कोटी रु. लावले जातात. महापालिकेतील सत्ताधाऱ्यांना ताज हॉटेलकडून पैसे घेणे मान्य नाही. कालच्या वर्तमानपत्रात बातमी आहे. जशी सत्ता बदलली, तसा प्रशासक आला. आधी ठरवलेला निर्णय बाहेर आला. आता मालमत्ता करात १४ टक्के वाढ प्रपोज्ड केली आहे. निवडणूक पुढे जात असल्याचे दिसून आल्यानंतर लगेच भाववाढ केली. सामान्य नागरिकांच्या खिशातून १४ टक्के पैसे घेणार मात्र ताज हॉटेलकडून साडे ८ कोटी घेणार नाहीत. होर्डींग मालकांकडून घेणार नाहीत. विकासकांचे तर मी काही सांगणारच नाही. साडे १६ हजार कोटी रु. माफ केलेले आहेत. या पद्धतीचा कारभार आहे. केवळ फ्रॉड नाही तर त्यापुढे बोगसपणा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात ५०० कि.मी.च्या सिवर लाईन्स आहेत. मलवाहिन्यांचे जाळे तुंबते. ते तुंबू नये या करिता साफ करावे लागते. मल वाहिन्यांचे जाळे साफ केल्यावर जो गाळ निघतो त्याच्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. सांडपाण्याच्या, मलनिस्सारण वाहिनीतून निघणारा जो मल असतो, त्यावर प्रक्रिया करण्याकरिता Mahabal Enviro Engineers Pvt.Ltd या कंपनीला काम दिले. त्यांनी काम घेतले त्यांच्या स्पर्धक कंपनीने महापालिकेत तक्रार केली. महापालिका जागृत झाली व त्यांनी या कंपनीचे अनुभव प्रमाणपत्र पाहिले. त्यांचे अनुभव प्रमाणपत्रच बोगस होते. म्हणजे कंत्राटदार पैसे खातील ठीक. पण बोगस कंत्राटदाराला समर्थन करण्यासाठी असा कारभार केला जात असल्याचे महापालिकेत दिसून येत आहे. हे मुंबईकरांचे दु:ख आहे.

अध्यक्ष महोदय, अनेकदा पर्यावरणावर चर्चा केली जाते. माननीय पर्यावरण मंत्री काही गोष्टी चांगल्या करीत आहेत, त्याला आमचे समर्थन आहे. पर्यावरण या

ॲड. आशिष शेलार...

गोंडस नावाखाली घोटाळयाचे राजकारण सुरु आहे. या बाबत माननीय विरोधी पक्ष नेते यांनी उल्लेख केला. यामुळे मी पुन्हा उल्लेख करणार नाही. २५ हजार कोटी रुपयांची वेस्ट वॉटर ट्रीटमेंट फॅसिलिटी धारावी, वरळी, वांद्रे, वर्सोवा, मालाड, भांडूप, घाटकोपर या ७ ठिकाणी करण्यात आली. त्यापैकी धारावी, घाटकोपर व वर्सोवा येथे कंत्राटदाराने ३० ते ६० टक्के जास्त दराने बीड केले. भांडूप, वरळी, वांद्रे येथील कंत्रराटदाराने २७ ते ३४ टक्के अधिक दराने कंत्राट भरले. मग वाटाघाटी सुरु झाल्या. नंतर हे सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले. सर्वांनी मिळून ठरवले की, १५ ते १६ टक्के अधिक दराने घेऊ व १५ ते १६ टक्के वाटू. २५ हजार कोटी रुपयांचे १५ टक्के किती, वाटपात प्रत्येकाला किती मिळणार. शहरात काही लोक असे असतात की, ज्यांना असे वाटते की, हे शहर योग्य प्रकारे चालले पाहिजे. ते कोर्टापर्यंत गेले. सर्वांवर पाणी फिरले. हा हिशोब मलनिस्सारण वाहिनीत गेला. यामुळे आता सर्वोच्च न्यायालयाच्या अंतर्गत पर्यावरणाचे असे घोटाळे समोर येत आहेत.

अध्यक्ष महोदय, पर्यावरणाच्या गोंडस नावाखाली भ्रष्टाचार होत आहे. मुंबई महापालिकेच्या अंतर्गत येणाया बीइएसटीने पर्यावरण पूरक करण्याचे ठरवले. हे निर्णय काही शास्त्रीय नाही. नेंत्याच्या मनात आले की, फौजला कामाला लावले जाते. काय योग्य, काय अयोग्य काही नाही. यांनी असे ठरवले की, आम्हाला बीईएसटीला बायोमास ऊर्जा खरेदी करायची आहे. ती पर्यावरण पूरक आहे. सन २००८-०९ मध्ये ठरवले, तेव्हा करार केला. सन २०१० मध्ये वीज मिळण्याकरिता प्रक्रिया प्लांट अहमदनगर व सातारा येथे दाखवले. २५ मे.वॅ वीज मिळणार होती. सध्या बीइएसटीची जाहीरात येते 'पुढे चला'. पुढे चला म्हणजे मागचे विसरा. सन २००९-१० मध्ये कंत्राट केले त्या कंपनीला ८० कोटी रु. दिले. सन २०१० पासून आता २०२२ आले. २५ मे.वॅ सोडा एक युनिट मे.वॅ देखील वीज मिळालेली नाही. बीइएसटीचे ८० कोटी रु आता १०२ कोटी रु. झाले असा त्यांनी स्वत:च प्रस्ताव आणला. हे १०२ कोटी रुपये कोणाचे आहेत ? अशा प्रकारे पर्यावरणाच्या नावाखाली रोज घोळ व घोटाळा.

ॲड. आशिष शेलार...

अध्यक्ष महोदय, ईलेक्ट्रीक कार चांगल्या आहेत, पर्यावरण पूरक आहेत माननीय केंद्रीय मंत्री श्री.गडकरी साहेब या करिता पाठपुरावा करीत आहेत. महापालिकेने असे ठरवले की, आम्ही८ वर्षाकरिता ५ ई – कार घेऊ. या करिता दर महिना २७ ते ३७ हजार रु. भाडे देऊ. टाटाची नेक्सॉन ही ई-कार असून त्याची किंमत १४ लाख रु. आहे. नवीन कार घेतली तर १४ लाख रुपये लागतील. महापालिकेने ठरवले की, भाड्यावर आम्ही ३२ लाख रुपये खर्च करु. १४ लाख रुपयात नवीन गाडी घेणार नाही कारण त्यामध्ये देखील कट, कमिशन खाऊ. अशा प्रकारे पर्यावरणाचे रोज नवीन घोटाळे आहेत.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार ...

अध्यक्ष महोदय, काय काय गोष्टी करतात हे पाहिले तर सफाईत घोटाळा झाला. लॉकडाऊनच्या काळात आवश्यक असलेल्या काही शाळा ज्या आपण केंद्र म्हणून दिल्या असतील तर त्या सोडून ९८ टक्के शाळा बंद होत्या. लॉकडाऊनच्या काळात मुंबईतील बंद शाळेतील त्या खोल्यांच्या साफसफाईचा खर्च किती आहे ते आपल्याला माहिती आहे का, तो ३६८ कोटी रुपये आहे. ३६८ कोटी रुपये २ वर्षांत बंद शाळांच्या साफसफाईचा खर्च आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू साहेब, "हमें तो हादसों ने संभाला है." हे मुंबईकरांचे जे रडणे आहे ते त्यासाठी आहे.

अध्यक्ष महोदय, नालेसफाईबाबत काय बोलणार, गेल्या वर्षी नालेसफाईमध्ये यांनी विक्रमी दावा केला की, आम्ही नाले ११४ प्रतिशत साफ केले. अध्यक्ष महोदय तुम्ही देखील चक्रावून जाल की, १०० टक्क्यांमध्ये ११४ टक्के साफ कसे होतील. आता स्कॅम तेथूनच सुरु आहे. एक नाला त्या नाल्यामध्ये १० मेट्रिक टन कचरा असेल हे पहिले प्रिझम्पशन, हा पहिला घोटाळा. मग दुसरा घोटाळा काय तर, या वर्षी आम्ही असे ठरवले आहे की, या १० मेट्रिक टन मधला ७ मेट्रिक टन कचरा साफ करणार. ७ मेट्रिक टन का ठरवला, ३ मेट्रिक टन का ठेवला तर, नाही आम्ही ठरवले. मग हा ७ मेट्रिक टन म्हणजे १०० टक्के. परंतु साफ करताना आम्ही ७ मेट्रिक टनच्या ऐवजी ८ मेट्रिक टन साफ केला म्हणून ११४ टक्के साफ केला. दोन मेट्रिक टनचा हिशोब विचारु नका.

अध्यक्ष महोदय, बीएमसीने ठरवले होते की, ३.११ लाख टन कचरा काढायचा. काढला ३.२४ लाख टन म्हणजे ११४ टक्के नालेसफाई केली. १०७ कोटी रुपये कॉंट्रॅक्टरला दिले. परंतु, गेल्या पावसात काही विभागात पावसाचे पाणी १५ तास उतरले नाही. या पध्दतीच्या नालेसफाईमध्येसुध्दा आपल्याला काही मिळत आहे का ते पाहणे, कट कमिशन करणे यामध्ये मुंबईकरांचा दर्द आहे.

अध्यक्ष महोदय, चांगले काम केले तर आम्ही त्याला चांगले म्हणूच. बीएमसीची हॉस्पिटल्स या काळामध्ये... आमच्या सेव्हन हिल्स हॉस्पिटलने चांगले काम केले, तेथील डॉक्टरांनी चांगले काम केले. हॉस्पिटल मेजर ऑफेन्समध्ये

ॲड.आशिष शेलार ...

क्रिमिनल असलेल्या लोकांना ऑफिस म्हणून हॉस्पिटलमध्ये जागा वापरण्यास देत असेल तर प्रश्न निर्माण होतो. महाराष्ट्र व पंजाब नॅशनल बँकेतील आरोपी राकेशकुमार वाधवान, धीरजकुमार वाधवान हे केईएमच्या ११ व्या मजल्यावर एप्रिलपासून जूनपर्यंत अडीच महिने ॲडमिट होते. त्या ठिकाणी ॲड.इशा इराज सय्यद यांनी त्यांचा व्हीडीओ काढला व कोर्टामध्ये मुख्य न्यायमूर्ती समोर पिटिशन दाखल केली. व्हीडीओमध्ये असे दिसत आहे की, हे महाशय अडीच महिने केईएमच्या ११ व्या मजल्यावर स्वत:चे कार्यालय थाटून बसले आहेत. फोन करीत आहेत. पेपर साईन करीत आहेत. मुंबई महानगरपालिकेची हॉस्पिटल्स कोरोनाच्या काळात आरोपींना कार्यालय म्हणून वापरायला दिली गेली होती? मुंबईकरांच्या वेदना याबाबतच्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मुंबईकरांची हालत, या राज्यातील लोकांची हालत पाहिली तर, खरे तर हा प्रश्न उभा राहत आहे की, हे सरकार माननीय श्री.उद्धवजींच्या नेतृत्वात चालले आहे. हे सरकार हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या सुपूत्राच्या नेतृत्वात चालले आहे. गेल्या काही दिवसांतील, गेल्या वर्षभरातील कहाणी काय आहे तर, मुंबईमध्ये गणेशोत्सव २ वर्षे होऊ शकला नाही. मुंबईमध्ये ११ हजार गणेशोत्सव मंडळे आहेत. गेल्या वर्षी या ११ हजार गणेशोत्सव मंडळांपैकी केवळ ९५० मंडळांना परवानगी मिळाली. हिंदूचे सण मुंबईत साजरे करायचे की नाहीत, असा प्रश्न निर्माण होतो.

अध्यक्ष महोदय, केवळ एवढेच नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात उपस्थित आहेत. एक यक्षप्रश्न उभा राहिला होता. मी त्या न्यायाधीशांचे नाव घेत नाही. त्यावेळेस मुंबई व राज्यात सार्वजनिक गणेशोत्सव होतील की नाही, ते सार्वजनिक गणेशोत्सव होऊ नयेत अशा पध्दतीचा आदेश, साऊंडला परवानगी नका देऊ, मंडपाला नका देऊ, रस्त्यावर देऊ नका, पोलिसांकडून ॲफेडेव्हिट घेतले होते.

ॲड.आशिष शेलार ...

अध्यक्ष महोदय, हिंदूंचा रक्षक नेता असला की, कसे काम करतो, हे माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या रुपाने तेव्हा मी पाहिले आहे, अख्ख्या महाराष्ट्राने पाहिले आहे. काय केले माहीत आहे, खरे तर प्रायव्हेट पार्टी अर्ज करतात. परंतु येथे स्वत: मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली व पहिल्यांदा असे झाले की, मुंबई उच्च न्यायालयाच्या त्या न्यायाधीशांसमोर सरकारने अर्ज दाखल केला की, तुम्ही बायस आहात. तुम्ही एका विशिष्ट धर्माच्या विरुध्द, हिंदूंच्या विरुध्द बायस आहात आणि तुमच्या समोर न्याय मिळेल असे आम्हाला वाटत नाही.

अध्यक्ष महोदय, आम्हाला वाटले की, जे नॉर्मली होते की, सन्माननीय न्यायाधीश स्वत:वर आरोप केल्यावर ती पिटिशन दुसरीकडे पाठवतील. परंतु, तसे झाले नाही. ते न्यायाधीश म्हणाले की, तुम्ही काहीही म्हटले तरी मीच ऐकेन व मीच निर्णय देईन. आम्ही हवालदिल झालो. मी स्वत: त्यावेळेस होतो. तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांकडे आम्ही परत गेलो. आम्हाला वाटले की, या वर्षी गणेशोत्सव होणार नाही. कोणाला परवानगी देता येणार नाही.

अध्यक्ष महोदय, परंतु, मी पुन्हा एकदा माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांना धन्यवाद देईन. ते म्हणाले येथे थांबायचे नाही. तत्कालीन महिला चिफ जस्टीस चेल्लूर यांच्या समोर आम्ही गेलो. आम्ही पुन्हा एकदा अर्ज केला की, अशा बायस पध्दतीने सुरु आहे. सांगावेसे वाटते की, पूर्ण मुंबई उच्च न्यायालयाने पहिल्यांदा आमच्या विरोधात एक रिझोल्यूशन सर्व वकिलांनी पास केले. आमच्या विरुध्द ठराव केला परंतु, आम्ही मुंबईतील व राज्यातील गणेशोत्सव बंद पडू दिला नाही. दुसऱ्या बेंच समोर ती केस घेतली आम्ही ऑर्डर मिळवली व गणेशोत्सव केला. हिंदू रक्षणासाठी काम करणारा व्यक्ती कोण असतो हे माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या रुपाने त्यावेळेस अख्ख्या महाराष्ट्राने पाहिले.

अध्यक्ष महोदय, यावेळेस माननीय मुख्यमंत्री यांनी सांगितले की, लालबागचा राजा नको. त्याला १०० वर्षांची परंपरा आहे. लालबागचा राजा हे एक वर्ष बसला नाही. मुंबईकरांची खंत फक्त तेवढीच नाही. दहिहंडी नाही, गोविंदा नाही, कृष्ण जन्म

ॲड.आशिष शेलार ...

मंदिरासमोर नाही. केवळ तेवढेच नाही नवरात्र नाही, गरबा दांडियाला परवानगी नाही. होय कोरोनाचे नियम होते. परंतु, सांस्कृतिक कार्यक्रमाला परवानगी द्यायला काय झाले होते. ४ फुटांची मूर्ती असेल तर कोरोना फैलावत नाही. ती साडेचार फुटांची झाली तर फैलावतो, हे तर्क दिले?

अध्यक्ष महोदय, तेवढेच नाही तर मला दु:खाने सांगावेसे वाटते की, आमच्या दानवीर भागोजी किर यांनी १९३३ साली जे मंदिर बांधले होते ते माहिम मधील हेरिटेज मंदिर देखील तोडायला महानगरपालिकेने नोटिस दिली. दत्तमंदिर तोडायला नोटिस दिली. प्रभादेवीच्या मंदिरासमोर आमचे हेरिटेज आहे. माहिमला दुसरीकडे कुठे तरी एका विशिष्ट ख्रिश्चन धर्मीयांचा एक दगड मिळाला. महानगरपालिकेने तो क्रॉसचा दगड प्रभादेवी मंदिराच्या दरवाजात आणून लावला. या पध्दतीने या मुंबई व राज्यातील हिंदू सणांचीसुध्दा स्थिती या काळात झाली.

अध्यक्ष महोदय, त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की, मुंबईकरांची व्यथा व कथा हा प्रस्ताव आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू जर तुम्ही खुल्या दिलाने या सर्व विषयाकडे पहाल तर तुमचे देखील मतपरिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही. अशा पध्दतीच्या दु:खात हा मुंबईकर नागरिक राहत आहे, एवढेच सांगतो व थांबतो. धन्यवाद.

.......

श्री.सुनील प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्या म.वि.स. नियम २९२ च्या प्रस्तावावर मी माझे मत व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी जेथे आपले भाषण संपवले व त्यांचे भाषण ऐकताना जेथे माझे मतपरिवर्तन झाले, तेथून मी माझ्या भाषणाला सुरुवात करतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अनेक आरोप केले. माननीय विरोधी पक्ष नेते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. ते नागपूर शहराचे महापौर होते. प्रशासकीय कामकाजामध्ये त्यांना उत्तम अनुभव आहे. त्यामुळे त्यांना प्रशासनातील बारीकसारीक गोष्टी माहिती आहेत. त्यांनी ज्या १, २, ३ गोष्टींचा उल्लेख केला त्याबाबत मी स्वत:ला जे समजून घेतले व जे मला पटले व सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांच्या भाषेत माझे जे परिवर्तन झाले ते माझे मत मी त्यावेळेस व्यक्त करेन.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार बोलले की, मुंबई शहरात मागील २ वर्षे गणेशोत्सव झाले नाहीत. गणेशोत्सवाला परवानगी मिळाली नाही. दहिहंडी उत्सव झाले नाहीत. गणपती उत्सव, दहिहंडी उत्सव ही महाराष्ट्राची संस्कृती आहे.

नंतर श्री.शिंदे ....

श्री.सुनिल प्रभू...

सरकार कोणाचेही असू द्या, ही संस्कृती सातत्याने व गुण्यागोविंद्याने साजरी व्हावी, असे प्रत्येक सरकारला वाटते. मागील दोन वर्षातील परिस्थिती आपण मान्य कराल. जागतिक आरोग्य संघटनेने निर्बंध घातले होते व त्याप्रमाणे केंद्र शासनाने मार्गर्शक सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गर्दी करणे कोविडसाठी योग्य नव्हते. त्यावेळी कोविड कमी जास्त प्रमाणात वाढत असल्याने गर्दी टाळणे हा एकमेव पर्याय होता. गणेशमुर्ती ४ फूट ठेवण्या मागील कारण असे होते की, तिचे विसर्जन घराजवळील तलावात करता येईल. त्यामुळे गर्दीपासून व मिरवणुकांपासून लोक थोडे अलिप्त राहतील. याकरिता हा निर्णय केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे घेतला होता. कोविडमुळे हा निर्णय घ्यावा लागला होता. यासाठी महानगरपालिका किंवा राज्य सरकार जबाबदार नव्हते. आपल्या सर्वांचे आरोग्य चांगले रहावे या काळजीपोटी उक्त निर्णय घेण्यात आला होता. त्याबाबतीत अशा पद्धतीने दोषारोप करणे मला योग्य वाटत नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता यांनी अनेक गोष्टींचा उल्लेख केला आहे. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये भ्रष्टाचार कसा झाला याची १०-१५ उदाहरणे वाचून दाखविली. ते शेवटी म्हणाले की, [ **** ] ...(अडथळा)... मी माझे शब्द मागे घेतो, कदाचित मी ऐकले नसेल. "प्रेताच्या टाळूवरील लोणी खाणारी ?" असे म्हणाले. माननीय विरोधी पक्ष नेता यांना सभागृहाच्या माध्यमातून वैधानिक अधिकार मिळाले आहेत. त्यांना सरकारवर, स्थानिक स्वराज्य संस्थेने केलेल्या कामावर टिका करण्याचा अधिकार आहे. त्यामध्ये झालेली एखादी बाब सभागृहासमोर आणण्याचा त्यांना अधिकार आहे.

अध्यक्ष महोदय, या कोविडच्या काळात मुंबई शहरामध्ये मी लोकप्रतिनिधी म्हणून वावरत होतो. राजकीय पक्षाचा कार्यकर्ता या नात्याने लोकांशी संपर्क साधत होतो. कोविडचे प्रमाण ज्यावेळी वाढले होते, कोविड या संसर्ग रोगाने मृतांचे खच पडले त्यावेळी त्यांचे नातेवाईक घरी जात होते. त्यावेळी त्यांचा अंत्यविधी करणारे

---

**** विलोपित मजकूर (शब्द मागे घेण्यात आले.)

श्री.सुनिल प्रभू...

महानगरपालिकेचे कर्मचारी व शिवसेनेसारख्या राजकीय पक्षाचे कार्यकर्ते होते. हे मुंबईकर कधी विसरले नाहीत. आपण होता मी नव्हतो, असे मी म्हणालो नाही. मी आरोप प्रत्यारोप करीत नाही. केवळ आठवण करुन देत आहे. माननीय विरोधी पक्ष नेते बोलले म्हणून मला याची आठवण झाली....(अडथळा)... मी त्यांच्यावर आरोप करीत नाही, मला जे समजले ते सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे नगरविकास मंत्री महोदय देतील. मी संसदीय भाषेत मत मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आरोग्य विभागातील औषधे, बँण्डेज, इंजेक्शनच्या सुया यासंबंधिचे शेड्यूल १ ते ७... असतील. त्यामध्ये ५० टक्के, २० टक्के खरेदी करण्यात आली, असे सांगितले. या शेड्यूलनुसार ज्यावेळी औषधांची आवश्यकता असते त्यावेळी ती मागविण्याचा अधिकार असतो. त्यानुसार औषधे मागविण्यात आली होती. मुंबई महापालिका क्षेत्रातील रुग्णालयात औषधाविना दगावल्याचे एक तरी उदाहरण विरोधी पक्षाने सांगावे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आरोप केले असले तरी रुग्णालयात असणारे डीन किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना रुग्णांसाठी औषधांची आवश्यकता असेल तेव्हा २० लाख रुपयांपर्यंतची औषधे खरेदी करुन ती रुग्णांना देऊ शकतात. परंतु शेड्यूलचे उदाहरण देऊन ५० टक्के, २० टक्के औषधांची खरेदी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. आरोग्याच्या विषयावर मुंबई महानगरपालिकेला याबाबी खरेदी करण्यासाठी वेळ नाही. परंतु शहरातील चौक व सजावट करण्यासाठी वेळ आहे, असे सांगण्यात आले आहे. याबाबत सांगू इच्छितो की, महानगरपालिका आरोग्यासाठीही काळजी घेते. महानगरपालिकेच्या शेड्यूलनुसार निविदा प्रक्रिया राबवून किंवा वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिकारात इंजेक्शन, औषधे, गोळ्या खरेदीचा अधिकार मुंबई महानगरपालिकेच्या सन १८८८ च्या कायद्यांतर्गत आहे.

श्री.सुनिल प्रभू...

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये मोठ्या प्रमाणात आरोप करण्यात आले आहेत. मुंबई महानगरपालिकेने ऑक्सीजन प्लँटमध्ये भ्रष्टाचार केला, ॲण्टीबॉडीज खरेदीमध्ये भ्रष्टाचार केला, केंद्र सरकारने दिलेल्या औषधांमध्ये भ्रष्टाचार केला. हाय-वे कंपनीचा उल्लेख केला. त्यासंदर्भात ज्या बाबीं सांगितल्या त्याचे उत्तर माननीय नगरविकास मंत्री अधिकारवाणीने सांगतील.

अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेकडून कोविड काळात खरेदी करण्यात आलेल्या ॲण्टीबॉडीज व कोविडसाठी आवश्यक औषध व साधनसामुग्री यामध्ये भ्रष्टाचार झाल्याबद्दल राज्यपाल महोदयांकडे तक्रार केली आहे. लोकशाहीमध्ये त्यांच्याकडे तक्रार देण्याचा अधिकार आहे. राज्यपाल महोदय यांनी त्यासर्व तक्रारी लोक आयुक्त यांचेकडे पाठविल्या आहेत. विरोधी पक्षाचा लोक आयुक्तांवर विश्वास आहे काय ? लोक आयुक्त यांनी सदरहू तक्रारींची चौकशी सुरु केली आहे व अनेक तक्रारींच्या संदर्भात क्लीन चीट दिलेली आहे, हे मी सभागृहाला सांगू इच्छित आहे.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर बोलत असताना मुंबई महानगरपालिकेत शिवसेना पक्षाची सत्ता असल्यामुळे मी त्यांची बाजू मांडत आहे, अशी बाब नाही. मी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणार आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते शेड्यूलप्रमाणे खरेदी केलेल्या औषधांच्या संदर्भात आरोप केला आहे. या संदर्भातील माहिती माननीय विधानसभा अध्यक्ष मागवून घेऊ शकतात. त्यांना हा अधिकार आहे. केंद्र सरकारने कोविड काळात औषधे खरेदी करण्यासाठी दर ठरवून दिले होते. त्यापेक्षा कमी दराने मुंबई महानगरपालिकेने त्यावेळी औषध खरेदी केली आहे. मी खोटे बोलत असेल तर सत्य जाणून घेण्यासाठी कागदपत्रे मागवून घ्यावीत. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेने खरोखर भ्रष्टाचार केला का, हे आपल्याला समजू शकेल.

श्री.सुनिल प्रभू...

अध्यक्ष महोदय, ॲण्टीबॉडीज देण्याचे ठरले होते त्यावेळी निविदा काढण्यात आली नव्हती. केवळ कोणी तरी जाहीर केले होते. निविदेचा कच्चा ड्राफ्ट तयार करण्यात आला होता. या सभागृहातील एका सन्माननीय सदस्याने राज्यपाल महोदयांकडे तक्रार केली की, या प्रकरणी ६० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. ही बाब ते दाखवू शकले नाहीत, यामध्ये तथ्य नव्हते. राज्यपाल महोदयांनी ती तक्रार लोक आयुक्त यांचेकडे पाठविली आहे. ते त्याची चौकशी करुन त्यांचा निर्णय देतील.

अध्यक्ष महोदय, मी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणार आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी हाय-वे कंपनीच्या संदर्भात सभागृहाला माहिती दिली. कोविड काळात ऑक्सीजनचा तुटवडा होता त्यावेळी रेल्वेच्या माध्यमातून ऑक्सीजन मागविण्यात आला होता. यासाठी केंद्र शासनाने मदत केली होती. त्यावेळी प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांनी ऑक्सीजनची निर्मिती करावी, यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्य सरकारने प्रयत्न केला व निविदा काढली होती. हाय-वे नावाची कंपनी कोणाची आहे, त्यांना कंत्राट मिळाले किंवा नाही मिळाले, ते कंत्राट ज्यांना मिळाले ते निविदा प्रक्रियेच्या नियमानुसार मिळाले आहे.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.सुनिल प्रभू........

अध्यक्ष महोदय, या देशामध्ये ऑक्सिजनच्या निर्मितीसाठी ज्या कंपन्या काम करीत आहेत, त्या मुंबई शहरामध्ये प्लान्ट उभारणीसाठी भाग घेतील की नाही अशी शंका मुंबई महानगरपालिका प्रशासनाला होती. म्हणून जे अधिकृत पुरवठादार आहे त्यांनाही या प्रक्रियेमध्ये सहभागी होता यावे यासाठी काही अटी सदर टेंडरमध्ये समाविष्ट करण्यात आल्या होत्या. कंपन्या थेट सहभागी होणार नसतील तर यामध्ये संयुक्तरीत्या कोणीही सहभागी होऊ शकतो, अशी अट असल्यामुळे माझ्या माहिती प्रमाणे नोयडा कंपनीबरोबर हायवेने संयुक्तरीत्या यामध्ये भाग घेतला आणि पा्रणवायू पुरवठ्याचे काम मिळविले. मला जी काही माहिती मिळाली आहे ती अशी की, हायव◌ा कंपनीने मुंबई महानगरपालिकेच्या सात प्लान्टमध्ये प्राणवायू निर्मितीचे काम केले, त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ऑक्सिजनच्या टेंडरबद्दल ज◌े काही आरोप केले, त्याबद्दल निश्चित माहिती घेऊन सभागृहाला अवगत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरी देखील याबाबत माननीय नगर विकास मंत्री याबाबत सविस्तर उत्तर देतील.

अध्यक्ष महोदय, कोविडच्या काळामध्ये मुंबई महानगरपालिकेने जे काम केले त्याबाबत कर्मचारी, डॉक्टर आणि नर्सेसचे यांचे सर्व थरातून कौतुक केले जात आहे. परंतु आज या सदनामध्ये ज्या पद्धतीने मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्ट्राचाराबाबत बोलले जात आहे, त्यामुळे आपण महानगरपालिकेती अभियंते, डॉक्टर, कर्मचारी यांचे खच्चीकरण करीत आहोत, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये कोविड अतिशय वेगाने पसरत होता, त्यावेळी खऱ्या अर्थाने पोलीस कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका हे फार मोठ्या प्रमाणामध्ये हॉस्पिटलमध्ये आणि मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये काम करीत होते. त्यामुळे आपण त्यांचे कौतुक केले पाहिजे, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, लाईफ लाईन कंपनीला पुण्यामध्ये ब्लॅकलिस्ट केले आणि मुंबईमध्ये मात्र तिला काम दिले गेले, अशा प्रकारचे काही आरोप करण्यात आले

असुधारित प्रत

श्री.सुनिल प्रभू........

आहेत. मी याबाबत माहिती घेतली असता मला अशी माहिती मिळाली की, सदर कंपनीला मुंबईमध्ये अगोदर काम मिळाले आणि नंतर तिला पुण्यामध्ये ब्लॅकलिस्ट केले गेले. मुंबईमध्ये ज्या सेंटरसाठी सदर कंपनीला काम दिले गेले होते त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. त्या ठिकाणचा ऑडिट रिपोर्ट देखील अतिशय योग्य आहे. यानंतर सदर कंपनी पुण्यामध्ये गेली आणि नंतर तिला ब्लॅकलिस्ट करण्यात आलेले आहे. या ठिकाणी उल्लेख असा झाला की, पुण्यामध्ये ब्लॅकलिस्टेड झालेल्या कंपनीला मुंबई महानगरपालिकेने काम दिले. त्यामुळे ब्लॅकलिस्टेड कंपनीला मुंबई महानगरपालिकेने काम दिले हे म्हणणे योग्य नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार व मी १५ वर्षे महानगरपालिकेमध्ये एकत्र काम केले आहे. युतीमध्ये २० वर्षे भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना काम करीत होते. मुंबईकरांचे असेसमेंट टॅक्स वाढणार असे विरोधी पक्षाकडून वारंवार सांगितले जात आहे. र◌ेटेबल व्हॅल्युची कर प्रणाली नाकारुन मुंबई शहरासाठी योग्य असणारी भांडवली मूल्याची कर प्रणाली स्वीकारली. ही कर प्रणाली अस्तित्त्वात आणत असताना यातील त्रुटींवर एकमताने चर्चा केली, त्यावर सर्व सदस्यांची मते घेतली, मुंबई शहरातील जाणकारांची मते, तज्ज्ञांची मते अशा सर्वांची मते घेतली व राज्य सरकारच्या परवानगीने सदर प्रणाली मुंबई शहरासाठी लागू करण्यात आली होती. त्यावेळी आपण सुधार समितीचे सदस्य होतो व स्थायी समितीचे देखील सदस्य म्हणून एकत्र काम केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, र◌ेटेबल व्हॅल्युमुळे दर एक वर्षाने असेसमेंट व्हॅल्यु वाढविली जात होत◌े. असे न करता भांडवली मूल्यावर आधारित जी कर प्रणाली आपण स्वीकारली. या कर प्रणालीमध्ये दर पाच वर्षांनी असेसमेंट टॅक्समध्ये वाढ करण्यात येईल, असे निश्चित करण्यात आले होते. सदर नियमानुसार कर प्रणालीवर आधारित कराची सुरूवात सन २०२० मध्ये करणे आवश्यक होते. परंतु सन २०२० मध्ये कोविडची मोठ्या प्रमाणावर साथ आली होती. अशा वेळेला करवाढ करणे

असुधारित प्रत

योग्य नव्हती म्हणून सन २०२० मध्ये करण्यात येणारी कर वाढ नवीन आर्थिक वर्षापासून

श्री.सुनिल प्रभू........

म्हणजे माहे एप्रिलपासून असेसमेंट टॅक्सच्या रूपाने पुढे आलेली आहे. हा कोणत्याही प्रकारचा नवीन कर नाही. आपण युतीमध्ये स्वीकारलेल्या कर प्रणालीचा वापर करून ……

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, मी महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा सदस्य होतो. महापालिकेचे तत्कालीन अतिरिक्त आयुक्त श्री. मनुकुमार श्रीवास्तव हा प्रस्ताव मांडला होता. तेव्हा त्या प्रस्तावावर मी माझे मत मांडले होते. भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणाली स्वीकारत आहात, तेव्हा जागेची ज्यावेळेला जी किंमत असेल ती पाच वर्षांनी लागू होईल. मी जर १० लाख रुपयांमध्ये घर घेतले आणि असेसमेंट करताना त्याचे मूल्य १६ लाख रुपये होते तर ते १६ लाख रुपये प्रमाणे कर सुरू करा. मी घर विकले आणि जर त्याचे मूल्य ३० लाख रूपये असेल तर कर हा ३० लाख रुपयांवर कर लावावा. पण मी त्याच घरात राहतो तर करामध्ये का वाढ करीत आहात. केवळ माझ्या घराची किंमत वाढली. परंतु माझी क्षमता वाढत नाही. म्हणून पद्धतीने कर न लावता आपण ज्यावर्षी भांडवली मूल्य लावतो आहोत त्या वर्षापासून पुढे त्याच पद्धतीने कर आकारण्यात यावा. घराची खरेदी-विक्री झाली नवीन किंमत ठरविली गेली तर त्यावर आधारित कर लावला जावा, असे माझे मत होते. यासाठी सर्वांची सहमती होती असे नव्हते.

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय , आपले मत आपण त्यावेळी मांडले होते, मलाही माझे मत मांडण्याचा अधिकार होता. पण शेवटी सर्वांनी सदर प्रस्ताव मान्य केला होता. हे तर आपण मान्य करू शकतो. त्यामुळे आपण जो प्रस्ताव मान्य केलेला आहे आणि त्याचा परिणाम पाच वर्षाने होणार आहे. सन २०२० मध्ये कोविडमुळे सदर कर प्रणाली लावण्यात आली नाही. ती एप्रिलमध्ये लावली जाणार आहे. कोणतातरी नवीन कर मुंबई महानगरपालिकेत लावला जातो आहे, असेसमेंट टॅक्स

असुधारित प्रत

वाढते आहे असा त्याचा अर्थ होत नाही. एवढेच मला सभागृहाच्या समोर आणावयाचे होते.

श्री.सुनिल प्रभू........

अध्यक्ष महोदय, गृहनिर्माण मंत्री महोदयांनी आज उप नगरासाठी बोर्ड निर्माण केला जाणार असल्याची घोषणा केलेली आहे. 1 + 1 म्हणजे उप नगरामध्ये काही अशा चाळी आहेत की, चाळ मालकाने खालचे घर आणि त्यावर घर बांधून ज्यांना घराची आवश्यकता होती त्यांनी ते खरेदी केले. त्या घराचे वीज बिल स्वतंत्र आहे. मतदार यादीमध्ये संबंधितांची नावे आहेत. असेसमेंट टॅक्स भरतो, भाडे पावती भरतो. केवळ तो पहिल्या माळ्यावर राहतो म्हणून त्याला SRA योजनेचा लाभ दिला जात नाही.

अध्यक्ष महोदय, मी या सदनामध्ये एक अशासकीय विधेयक मांडले होते. आपण अनेकवेळा चर्चा देखील केलेली आहे. तत्कालीन गृहनिर्माण मंत्री श्री. प्रकाश मेहता यांनी यासंदर्भात शासकीय विधेयक मांडून या प्रकरणाला न्याय देऊ, असे आश्वासन दिले होते. म्हणून मी अशासकीय विधेयक मागे घेतले होते. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी सदर विधेयकाबाबत सकारात्मकता दाखविली होती.

अध्यक्ष महोदय, आज गृहनिर्माण मंत्री महोदयांनी SRA बाबत आणि मुंबई गृहनिर्माणबाबत अनेक घोषणा केल्या आहेत. त्यावेळेला 1+1 मध्ये जे लोक राहत आहेत ते असेसमेंट कर भरीत आहेत, त्यांचे मतदार यादीमध्ये त्यांचे नाव आहे, वीज बिल आहे आणि सेन्ससमधील नंबर देखील आहे. अशा लोकांच्या बाबतीत एक वेगळा आणि धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने सदर निर्णय गृहनिर्माण विभागाने घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत ा यांनी महानगरपालिकेमध्ये भ्रष्ट्राचार झाल्याचे अनेक आरोप केलेले आहेत. कोविडच्या काळामध्ये

महापालिकेमध्ये जास्तीत जास्त संसर्ग झाला. खूप मोठ्या प्रमाणावर लोक मारले गेले. कोविडच्या काळामध्ये औषधे खरेदी केली गेली, त्यामध्ये भ्रष्ट्राचार झालेला आहे. महानगरपालिकेकडून दिलेल्या टेंडरमध्ये देखील भ्रष्ट्राचार झालेला आहे. मागील पाच वर्षामध्ये ज्या प्रकारे टेंडर दिले गेले त्याबाबतही त्यांनी अनेक गोष्टी

श्री.सुनिल प्रभू........

सांगितलेल्या आहेत. परंतु अध्यक्ष महोदय, आपल्याकडे केंद्र सरकारने एक टीम पाठविली आहे. जर मुंबई महानगरपालिकेमध्ये आपण म्हणता त्या पद्धतीने चुकीची कामे होत असतील तर मुंबई मॉडेलची माहिती घेण्यासाठी केंद्र सरकारने अशा प्रकारची टीम पाठविली असती काय?

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. सुनिल प्रभू...

केंद्र सरकारने मुंबई शहरात एक टीम पाठविलेली आहे. या टीममध्ये विशेषत: टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिस ग्रुपच्या वतीने मुंबई मॉडेल या विषयावर विशेष रिसर्च करण्यासाठी पंजाब, हरियाणा, कर्नाटक, जम्मू आणि कश्मिर, दिल्ली, नीती आयोग येथून काही अधिकारी आलेले आहेत. या गटामध्ये आयएएस अधिकारी आणि वर्ग – १ चे वरिष्ठ अधिकारी आहेत. मुंबई शहरात चुकीचे काम मुंबई महानगरपालिकेने केले असेल तर केंद्र सरकारने टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिस, मुंबई येथे पंजाब, हरियाणा, कर्नाटक, जम्मू आणि कश्मिर, दिल्ली, नियोजन आयोग येथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना मुंबई मॉडेल काय आहे, हे समजून घेण्यासाठी पाठविले असते काय ? विरोधी पक्षाने अनेक आरोप केले असले तरी सत्य काय आहे, हे आपणास माहित आहे. कोविड काळात मुंबई महानगरपालिका प्रशासन, राज्याचे माननीय मुख्यमंत्री, महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधी जनतेच्या संपर्कात होते. मुख्यमंत्री महोदय हे कोविड – १९ काळात जनतेच्या पाठिशी धैर्याने उभे होते. त्यांची लोकप्रियता आहे. मुंबई शहराने कोविड – १९ काळात जे काम केले त्याचे कौतूक वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन, माननीय न्यायालयाने केलेले आहे. जगाच्या पाठिवरही अनेक वृत्तपत्रामध्ये या शहराचे कौतूक झाले आहे. म्हणून मुंबई महानगरपालिकेमध्ये काम करणाऱ्या यंत्रणेने चांगले काम केले आहे. सत्तेमध्ये केवळ शिवसेना पक्ष समोर आहे, म्हणून अशा प्रकारचे आरोप करणे चुकीचे आहे.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने मुंबई शहराबाबत जे आरोप केले आहेत ते अत्यंत चुकीचे आहेत. त्यामुळे मी याचा विरोध करतो. हा विरोध करण्याचे कारण एकच आहे. आम्ही अनेक वर्षे सत्तेत होतो. युतीमध्ये आम्ही एकत्र काम केले आहे. मागील काही काळात आपली युती तुटली आहे. या सर्वांवरुन मला एका गाण्याची ओळ येथे सांगावी वाटते.

"भातुकलीच्या खेळा मधील राजा आणिक राणी
अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी हीच कहाणी"

श्री. सुनिल प्रभू...

अध्यक्ष महोदय, अशा प्रकारे आरोप होत आहेत. असे माझे स्पष्ट मत आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद !

-----

असुधारित प्रत

श्री. अमित साटम (अंधेरी पश्चिम) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षाने म.वि.स. नियम २९२ अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावात पहिलेच वाक्य असे आहे की, मागील २५ वर्षामध्ये अडीच लाख कोटी रुपयांचे प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये संमत करण्यात आले आहेत. यावरुन मला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांनी केलेले एक वक्तव्य आठवते. ते असे म्हणाले होते की, मुंबई महानगरपालिकेची स्टँडींग कमिटी ही अंडरस्टँडींग कमिटी आहे. जेव्हा आपण गुगलवर indias bigest scam सर्च करतो तेव्हा कोल स्कॅम, टुजी स्कॅम, थ्रीजी स्कॅम, कॉमनवेल्थ स्कॅम अशा प्रकारचे वेगवेगळे स्कॅम आढळून येतात. सर्वात मोठा घोटाळा १ लाख ७६ हजार कोटी रुपयांचा आहे. हा घोटाळा रजिस्टर झालेला आहे. परंतु मागील २५ वर्षामध्ये अडीच लाख कोटी रुपयांचे प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये पारित झाले आहेत. त्या प्रस्तावांमध्ये भ्रष्टाचार झाला आहे. बिल्डींग प्रपोजलच्या प्रस्तावामध्ये ५० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचा भ्रष्टाचार झाला आहे. बदल्या, नियुक्त्या यातील भ्रष्टाचार तर अजून वेगळा आहे. मागील २५ वर्षामध्ये किमान ३ लाख कोटी रुपयांचा घोटाळा मुंबई महानगरपालिकेमध्ये झाला आहे. कदाचित जेव्हा दोन वर्षानंतर आपण गुगलवर indias bigest scam सर्च करु तेव्हा त्यावर ३ लाख कोटी रुपयांचा बीएमसी स्कॅम असे दिसेल.

अध्यक्ष महोदय, मागील चार वर्षामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये जवळपास ५० हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव पारित झालेले आहे. आता स्थायी समितीचे जे अध्यक्ष होते, त्यांच्या काळात ५० हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव पारित झाले आहेत. या पारित झालेल्या प्रस्तावांमधील मुंबईकरांचा पैसे कोठे गेला आहे ? कोविड काळात ३८ मालमत्ता कशा झाल्या आहे ? कोविड – १९ मध्ये ३ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आला आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी जे सांगितले आहे त्याचा मी

श्री. अमित साटम ....

पुन्हा उल्लेख करणार नाही. ऑक्सिमीटर, थर्मामीटर, पीपीई किट, बॉडी बॅग्स यासर्वांमध्ये भ्रष्टाचार करण्यात आला आहे. तसेच कोविड – १९ केअर सेंटरची कहानी काही वेगळीच आहे. बिल्डरकडून कोविड केअर सेंटरचे बांधकाम केले जात होते. तसेच पेंग्वीनचे एनक्लोजर बांधणाऱ्यास ऑक्सिजन प्लँट तयार करण्याचे टेंडर दिले जाते. यामुळे ८० टक्के व्यवसायिकरण आणि २० टक्के राजकारण असे आहे. अशा प्रकारे मुंबई महानगरपालिकेमध्ये काम करण्यात येत आहे. या बाबी पुराव्यासह मुंबईतील जनतेच्या समोर आल्या आहेत. कोविड – १९ चे ३ हजार कोटी रुपये कोठे गेले आहेत ? हा पैसा त्या ३८ मालमत्तांमध्ये गेला आहे. मागील २५ वर्षामध्ये मुंबईकरांचे ३ लाख कोटी रुपये कोठे गेले आहेत ? असा प्रश्न मुंबईकर आज विचारत आहेत. याचे उत्तर कोण देणार आहे ? यासाठी कोणाचा आश्रय मिळत आहे, यासाठी कोण मदत करीत आहे ? कदाचित श्री. नंदकिशोर चतुर्वेदी हेच याचे उत्तर देऊ शकतील, असे मला वाटते. "मुंबई के लूट की कहानी, सुनो नंदकिशोर की जुबानी" असे भविष्यात होऊ शकते.

अध्यक्ष महोदय, हे सर्व केल्यानंतर स्थायी समितीची शेवटची संधी होती. ७० मिनिटांमध्ये साडे सहा हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव पारित करण्यात आलेले आहे. याचा अर्थ एका मिनिटाला ८५ कोटी रुपयाचे प्रस्ताव पारित झालेले आहेत. स्थायी समितीची बैठक संपल्यानंतरही रात्रीही असे प्रस्ताव पारित केले जात होते, अशी माझी माहिती आहे. आता मुंबई महानगरपालिकेत प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. मागील ३ वर्षात मुंबई महानगरपालिकेमध्ये जे वाझेगिरी करीत आहेत, असे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त यांना सर्वाधिकार देण्यात आले आहेत. आता मुंबई महानगरपालिकेमध्ये नवीन सचिन वाझे त्यांनी नेमले आहेत. हे नवीन सचिन वाझे म्हणजेच मुख्य अभियंता श्री. विनोद चिठोरे हे होत. आता रोजचे कलेक्शन ते करीत आहेत. ज्यांच्यावर एसीबीचे गुन्हे दाखल आहेत त्यांना चिफ इंजिनिअर (व्हिजिलन्स) या पदावर नियुक्ती दिली आहे. याचा अर्थ चोराला पोलीस बनविण्याचे काम करण्यात आले आहे. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. चहल आणि श्री.

श्री. अमित साटम ....

वेलारसू हे दोन अधिकारी तेथे विरप्पन गँग चालवित आहेत. ते वाझेगिरी करीत आहेत. आता स्थायी समितीचा विषय संपल्यानंतर नवीन प्रशासनाची नवीन कहानी श्री. विनोद चिठोरे यांच्या रुपामध्ये वाझेगिरी मुंबई महानगरपालिकेत सुरु झाली आहे. त्यामुळे ही चर्चा होत आहे. मुंबई महानगरपालिकेत तीन लाख कोटी रुपयांचा भ्रष्टाचार, साडेसहा हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव ७० मिनिटांमध्ये पारित केले आहेत, अशी चर्चा होत आहे. या सर्वांवरुन मुंबईतील जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी एक नवीन कन्सेप्ट उदयास आली आहे. मुंबई क्लायमेट ॲक्शन प्लॅन ही नवीन कन्सेप्ट आहे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.अमित साटम.....

हे पाचही पॅरामिटर्स कसे बोगस आहेत व मुंबईकरांची कशी धूळफेक करीत आहेत, ते मी सांगतो.

अध्यक्ष महोदय, पहिला पॅरामिटर वेस्ट मॅनेजमेंट हा आहे. मुंबई शहर पूर्वी १० हजार मेट्रिक टन कचरा प्रोडयुस करीत होते. आता सुमारे ६ ते ७ हजार मेट्रिक टन कचरा मुंबई शहर प्रोडयुस करते. त्या कचऱ्याचे करायचे काय, असा प्रश्न मुंबई महानगरपालिकेला पडतो. युरोपमध्ये अशी काही शहरे आहेत की, जे कचरा इम्पोर्ट करतात कारण त्यांची लोकसंख्या जास्त नाही. या इम्पोर्ट केलेल्या कचऱ्यापासून ते वीज तयार करतात. परंतु दिवसाला ६ हजार टन कचरा प्रोडयुस करुन देखील मुंबई महानगरपालिकेला प्रश्न पडतो की, या कचऱ्याचे करायचे का ? म्हणजे मुंबई महानगरपालिका कचऱ्याची विल्हेवाट लावू शकली नाही परंतु "Mumbai Climate Action Plan" च्या गप्पा करतात.

अध्यक्ष महोदय, यातील दुसरा मुद्दा "Urban greening" हा आहे. मी मुंबई महापालिकेकडे माहिती अधिकार कायद्यांतर्गत एक अर्ज केला होता. त्याला महापालिकेने उत्तर दिले की, "गेल्या १० वर्षांमध्ये ३८ हजार ८९९ झाडे तोडण्याची परवानगी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने दिली." या ३८ हजार ८९९ पैकी २१ हजार झाडे तोडण्याची परवानगी खासगी प्रकल्पांकरिता म्हणजे बिल्डरांच्या प्रकल्पांसाठी देण्यात आली. माझ्या मुंबई महानगरपालिकेतील वृक्ष प्राधिकरण ३८ हजार ८९९ झाडे तोडण्याची परवानगी देणार परंतु मी मात्र "Mumbai Climate Action Plan" च्या गप्पा करणार.

अध्यक्ष महोदय, "Water Resource Management" हा यातील तिसरा मुद्दा आहे. सन २०२० साली एका दिवशी इतका पाऊस पडला व मुंबई महानगरपालिकेने एवढया पाण्याचा ऊपसा करुन ते समुद्रामध्ये सोडले की त्या पाण्याने दोन वेळा तुलसी तलाव भरला असता. हे पाणी ऊपसा करुन समुद्रामध्ये फेकण्यात आले. आता गारगाई-पिंजाळ प्रकल्प देखील रद्द करण्यात आला आहे. परंतु आम्ही मात्र "Mumbai Climate Action Plan" च्या गप्पा करणार.

श्री.अमित साटम.....

अध्यक्ष महोदय, पुढचा मुद्दा "Energy Management and Air Quality" चा आहे. सन्माननीय सदस्य श्री.अबु आजमी यांना मी विचारु इच्छितो की, आपके यहाँ डम्पींग ग्राऊंड पर एअर क्वॉलिटी कैसी है? मुंबई महानगरपालिकेवर २५ वर्षे राज्य करणाऱ्यांना डम्पिंग ग्राउंडच्या आजुबाजूच्या परिसरातील air quality index सुधारता आला नाही. परंतु Energy management च्या गप्पा मारल्या जात आहेत. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना सन २०१८ मध्ये हरित इमारतींना मालमत्ता करामध्ये १५ टक्के सवलत देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. यांनी त्याची देखील अद्यापपर्यंत अंमलबजावणी केली नाही मात्र "Mumbai Climate Action Plan" च्या गप्पा करणार.

अध्यक्ष महोदय, पाचवा मुद्दा "Mobility" चा आहे. हा मुद्दा तर सर्वात हास्यस्पद आहे. Because, Mumbai is city where distance is measured in time and not in kilometeres. अमेरिकेत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायचे असेल व एखाद्याला विचारले तर समोरचा माणूस सांगतो की, ४ माईल्स, ५ माईल्स, ६ माईल्स, ८ माईल्स... परंतु मुंबईमध्ये आपण एखाद्या व्यक्तीला जर विचारले की मला गोरेगावला जायचे आहे तर समोरचा व्यक्ती सांगतो की, अर्धा तास लागेल, पाऊण तास लागेल, एक तास लागेल, दीड तास लागेल... मोबिलिटी हा मुंबई शहराचा सर्वात क्रिटिकल मुद्दा आहे. या मुद्याचे सोल्युशन म्हणून माननीय श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना २५६ किलोमीटर अंतराच्या मेट्रो रेल्वेचे काम फक्त पाच वर्षांमध्ये सुरु झाले. परंतु एका कारशेडसाठी तुम्ही ही मेट्रो रेल्वे थांबविली. १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचा प्रकल्प थांबविण्यास कोण जबाबदार आहे, हा या निमित्ताने माझा प्रश्न आहे. मुंबई महानगरपालिकेचे वृक्ष प्राधिकरण ३८ हजार ८९९ झाडे तोडण्याची परवानगी देऊ शकते परंतु दीड कोटी मुंबईकरांचा प्रवास सुकर होण्यासाठी व मेट्रो रेल्वे होण्यासाठी मात्र २ हजार ७०० झाडांचा बाऊ केला जातो आणि गप्पा मात्र "Mumbai Climate Action Plan" च्या गप्पा करतात.

असुधारित प्रत

श्री.अमित साटम.....

अध्यक्ष महोदय, यांना न्यायालय दररोज कशा झापडा मारते याचे मी एक उदाहरण देतो. पवई येथे सायकल ट्रॅक केला जाणार आहे. या कामाला उच्च न्यायालयाने स्टे दिला. स्टे देताना माननीय उच्च न्यायालयाने असे म्हटले की, It is in violations of wet land rules, destryoing the flora and fauna of the vicinity and also affecting the Indian Marsh Crocodile." दोन पर्यावरणवादी या प्रकल्पाविरोधात उच्च न्यायालयात गेले होते. त्यावरुन उच्च न्यायालयाने दिलेला स्टे अद्याप कायम आहे. तेथे तुम्हाला पर्यावरण आठवत नाही का ? पवई येथील पर्यावरणाचा ऱ्हास करुन सायकल ट्रॅक तयार करायचा मात्र Mumbai Climate Action Plan च्या गप्पा मारायच्या.

अध्यक्ष महोदय, वांद्रे ते वरळी हा ३.७ किलोमीटर लांबीचा सायकल ट्रॅक जगातील सर्वाधिक कॉस्टली सायकल ट्रॅक असेल. यासाठी १६८ कोटी रुपये खर्च येणार आहे. समुद्रामध्ये भराव टाकून, पिलर उभे करुन हा १६८ कोटी रुपयांचा सायकल ट्रॅक आम्ही बनवणार आहोत. प्रति किलोमीटर राष्ट्रीय महामार्ग बनविण्यास जेवढे पैसे लागतात त्याच्या ५०० पट पैसे हा सायकल ट्रॅक बनविण्यासाठी खर्च केले जाणार आहेत आणि आम्ही मात्र "Mumbai Climate Action Plan" च्या गप्पा करणार.

अध्यक्ष महोदय, एस.टी.पी. बाबत माननीय न्यायालयाने सांगितले आहे की, "We will monitor the tendering process." कल्पना करा की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असताना, मुंबईतून अनेक नदी-नाले वाहत असताना, त्या नदी-नाल्यातील सर्व कचरा व गाळ समुद्रामध्ये विना प्रक्रिया जातो व अजूनपर्यंत आपण मुंबई शहरामध्ये एस.टी.पी. करु शकलो नाहीत. आम्ही २५ वर्षे मुंबई महानगरपालिकेवर राज्य करीत आहोत. यादरम्यान आम्ही एस.टी.पी. करु शकलो नाहीत परंतु आम्ही मात्र "Mumbai Climate Action Plan" च्या गप्पा मारणार.

अध्यक्ष महोदय, "Mumbai Climate Action Plan" ची बोगसगिरी ही मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्टाचारापासून मुंबईकरांचे लक्ष विचलित करण्यासाठी

श्री.अमित साटम.....

व मुंबईकरांच्या डोळयात धूळफेक करण्यासाठी केलेली एक चाल आहे. मुंबईचे महापालिका आयुक्त तर एवढे महान आहेत की त्यांनी असे विधान केले की, "सन २०५० पर्यंत ७० टक्के दक्षिण मुंबई पाण्याखाली असेल." दक्षिण मुंबई पाण्यात जाईल किंवा कसे हे मला माहिती नाही परंतु यांचा कारभार असाच सुरु राहिला तर हे निश्चितपणे पुढील एक-दोन महिन्यांमध्ये पाण्यात जातील.

अध्यक्ष महोदय, आयपीएल च्या संदर्भात काहीतरी थ्रेट आहे. अतिरेक्यांनी त्याची रेकी केल्याची बातमी आज वाचनात आली. त्यामुळे मुंबई शहरामध्ये भीतीचे वातावरण आहे.

श्री.दिलीपराव वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, काही माध्यमांमध्ये मुंबई आयपीएल ला धोका आहे किंवा कोणी रेकी केली असल्याच्या बातम्या सुरु आहेत. परंतु अशी काहीही परिस्थिती नाही. मुंबईच्या आयपीएल ला काहीही धोका नाही. कोणीही रेकी केलेली नाही किंवा कोणाचीही काही धमकी आलेली नाही. पोलीस विभागाने देखील हे स्पष्ट केले आहे.

श्री.अमित साटम : अध्यक्ष महोदय, मुंबईच्या जनतेच्या मनातील मुंबई पोलिसांच्या बद्दलची भावना आणि गेल्या दोन वर्षांमध्ये मुंबई पोलिसांची मलीन झालेली प्रतिमा हा माझा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, आम्हाला मुंबई पोलिसांचा अभिमान आहे. आम्हाला अभिमान आहे शहीद अशोक कामटे यांचा, आम्हाला अभिमान आहे शहीद हेमंत करकरे यांचा, आम्हाला अभिमान आहे शहीद विजय साळसकरांचा. परंतु आम्हाला खेदसुध्दा आहे की, शहीर अशोक कामटे, शहीद हेमंत करकरे, शहीद विजय साळसकरांची मुंबई पोलीस आता सचिन वाझेची मुंबई पोलीस झाली आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. अमित साटम...

१९६० मध्ये या महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर आम्ही असे कधीच पाहिले नव्हते की पोलीसच बॉम्ब ठेवतात. पोलीसच मर्डर करतात. पोलीस १००-१०० कोटी रुपयांची वसुली करतात. असे आम्ही यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे अशा प्रकारे पोलिसांच्या प्रतिमेला जो तडा गेला आहे, ही मुंबईकरांची खरी खंत आहे.

अध्यक्ष महोदय, मी मागच्या अधिवेशनात माननीय गृहमंत्री यांना २ क्रमांक दिले होते आणि असे सांगितले होते की, या क्रमांकावरुन मुंबईतील टॉप आयपीएस अधिकाऱ्यांना फोन केले जातात, त्यांना इन्स्ट्रक्शन दिल्या जातात. आपल्या अपरोक्ष ते केले जाते आणि ते नंबर मी रेकॉर्डवर दिले होते. आपण ते टिपूणही घेतले होते. मी आपल्या सांगू इच्छितो की, आता ते दोन्ही नंबर मी सांगितल्यानंतर बंद झाले आहेत. पण ते नंबर कोणाचे आहेत तर ते पृथ्वी चव्हाण नावाच्या एका व्यक्तीचे आहेत. तो लायझनिंग करतो आणि या शासनातील कुठल्या मंत्र्याचा तो फ्रंटएंडर आहे आणि कुठल्या मंत्र्याच्या वतीने तो व्यक्ती मुंबई पोलिसांमधील आयपीएस अधिकाऱ्यांना वेगवेगळया प्रकारचे इन्स्ट्रक्शन देतो, याची आपण माहिती घेतली पाहिजे, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरा एक विषय म्हणजे आपण पाहिले की, दिशा सालियन हिचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. आपण पाहिले की, पूजा चव्हाण नावाच्या आपल्या एका भगिनीने आत्महत्त्या केली. आपण पाहिले की, करुणा शर्माबरोबर काय होत आहे. म्हणून माझी अशी भिती आहे की, पुन्हा एकदा दिशा सालियन, पूजा चव्हाण किंवा करुणा शर्मासारखे प्रकरण या महाराष्ट्रात घडता कामा नये. कारण एका महिलेला इतके परेशान केले जाते, त्या महिलेला इतके हौंड केले जाते, त्या महिलेवर इतकी पाळत ठेवली जाते, त्या महिलेचे फोन टॅप केले जातात, त्या महिलेचे लोकेशन मॅपिंग केले जाते, आतापर्यंत त्या महिलेला मारण्याचा प्रयत्न झाला आहे, त्या महिलेवर खोटी केस करुन ५२ दिवस तिला जेलमध्ये टाकले आहे. ती महिला ज्या ठिकाणी राहते त्या परिसरातील आजुबाजूच्या मंदिराच्या भिंतीवर त्या महिलेचा फोन नंबर पेंट केला जातो. तो नंबर बघून तिला वेगवेगळ्या प्रकारचे फोन केले

श्री. अमित साटम...

जातात, त्या फोनवरुन अश्लील गोष्टी बोलल्या जातात, रस्त्यावर चालत असताना छोट्या छोट्या मुलांच्या हातामध्ये चिठ्ठ्या देऊन तिला धमक्या दिल्या जातात आणि त्या सर्व चिठ्ठ्या आणि सर्व धमक्यांमध्ये एकच म्हटलेले असते की, "आवाज बंद कर". त्यामुळे आमचा हा सवाल आहे की, आवाज कुणाचा ? या महिलेचे नाव स्वप्ना पाटकर आहे. त्या स्वप्ना पाटकर यांचा जीव धोक्यात आहे. त्यांच्या कुटुंबियांचा जीव धोक्यात आहे. त्यांना रोज हौंड केले जात आहे. रोज त्यांच्यावर पाळत ठेवली जाते. रोज त्यांना धमक्या दिल्या जात आहेत. रोज त्यांना फोन करुन अश्लील गोष्टी बोलल्या जात आहेत आणि त्यामुळे पुन्हा एकदा या महाराष्ट्रामध्ये एखादी दिशा सालियन झाली नाही पाहिजे. पूजा चव्हाणसारखे प्रकरण झाले नाही पाहिजे, किंवा करुणा शर्मासारख्या कुठल्या तरी आपल्या भगिनीने माझ्यावर अत्याचार होतोय अशा प्रकारची वाच्यता केली नाही पाहिजे आणि म्हणून मी आपल्यामार्फत गृहमंत्री महोदयांचे लक्ष वेधतो की, या संपूर्ण प्रकरणाची आपण चौकशी करा. गरज भासल्यास आपण स्वप्ना पाटकरला संरक्षण द्या आणि पुन्हा एकदा या जिजाऊंच्या महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची घटना घडणार नाही, याची काळजी घ्या, अशी विनंती करतो आणि येथेच थांबतो. जयहिंद, जय महाराष्ट्र !

-----------

यानंतर श्री. नितनवरे..

श्री अबू आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २९२ के अंतर्गत जो अंतिम आठवडा का प्रस्ताव विपक्ष की ओर से सदन में पेश किया गया है, उस प्रस्ताव पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मुंबई एक इंटरनेशनल सिटी है. यहाँ पर रोजी रोटी मिलती है इसलिए लोगों को यहां पर आना पड़ता है. इस देश में में गांव का विकास नहीं हुआ. गांव में बेचारा किसान खेती करके अपना पेट नहीं भर सकता. इसलिए जहां पर रोजी रोटी मिलती है वहां पर जाता है. फुटपाथ पर रोजी रोटी कमाता है. मैं देखता हूं कि एक तरफ हंसता और खिलखिलाता हुआ मुंबई है, तो दूसरी तरफ उदास और आँसू बहाता हुआ मुंबई है. कहा जाता है कि

"एक तन पर सोने का तार खींचे
और एक तन पर तो सूत का भी तार नहीं,
इसीलिए बगावत करता हूं,
ये अन्याय मुझे स्वीकार नहीं.
एक तरफ दो एकड़ में बनी हवेली,
रहने वाले सिर्फ दो प्राणी,
और एक तरफ दस फूट का घर है,
रहने वाले दस सो सकते है,
पर पैर पसार नहीं,
इसलिए बगावत करता हूं,
ये अन्याय मुझे स्वीकार नहीं."

अध्यक्ष महोदय, सन १९९५ में जब आदरणीय श्री मनोहर जोशी जी मुख्यमंत्री थे, तो उन्होंने कहा था कि दिनांक ०१ जनवरी तक जितने झोपड़े बने है, वह सब लिगलाईज्ड उसके बाद यदि कोई नये झोपड़े बने, तो वहां का वॉर्ड ऑफिसर, पुलिस

असुधारित प्रत

श्री अबू आजमी...

ऑफिसर, वहां के जिम्मेदार अधिकारियों पर कार्रवाई होगी. इससे ऐसा लगा था कि अब कोई नये झोपड़े नहीं बनेंगे. उसके बाद सन २००० तक के झोपड़े रेग्युजराईज किए गए. अब सन २०११ तक की बात की जा रही है. पुलिस और वॉर्ड ऑफिसर की लापरवाही के कारण ये झोपड़े बनते है. उन झोपड़ों को कहीं न कहीं संरक्षण मिलता है. भूमाफिया इसका गलत इस्तेमाल करके नये झोपड़े बनाते जा रहे है. उसके बाद वहां पर शौचालय, पानी, रास्ता, गटर, बिजली आदि सुविधाएं चाहिए. मेरे मानखुर्द-शिवाजीनगर इलाके में ऐसी स्थिति है कि मुंबई की सड़कों से जितने लोग उठाये जाते है, ज्यादा से ज्यादा लोगों को वहीं पर लाकर बिठाया जाता है. वहां पर पानी की बंदोबस्त नहीं है. वहां शौचालय नहीं है. स्लम माफिया का जबरदस्त नेटवर्क है, यह नेटवर्क खत्म होना चाहिए. एकसाथ ५० झोपड़े बनाए जाते है. अधिकारी और पुलिस से मिलकर, पैसे देकर, अधिकारी को पटाकर कोर्ट से स्टे भी ले लेते है. एक बार स्टे हो गया तो फिर उस पर कुछ नहीं होता है. इसलिए अधिकारियों और पुलिस पर गैरकानूनी काम और इसको हथियाने के बारे में एफआईआर होना बहुत जरुरी है. उसके बाद पब्लिक के पैसे से बार बार उसको डिमॉलिश किया जाता है. फिर उसको बनाया जाता है तो उसके बाद फिर झोपड़े बनाए जाते है. इसके लिए माफिया लोगों से एक रुपया भी वसूला नहीं जाता है. पब्लिक का पैसा बेमतलब खर्च किया जाता है. मेरा कहना यह है कि अब यदि कोई झोपड़ा बनाता है तो झोपड़ा बनाने वाले पर पंचनामा करके एफआईआर दर्ज होना चाहिए और उसका पूरा खर्चा बनाने वाले से वसूल किया जाना चाहिए. २५ साल पहले ४० लाख झोपड़पट्टीवासियों को घर देने की बात की गई थी. केवल दो लाख लोगों को घर मिला है. ३० सालों में झोपड़ों की तादाद लगातार बढ़ते जा रही है. इस योजना में स्लम सोसायटी के लोगों के साथ बिल्डर का जो एग्रीमेंट होता है, स्लम वालों के साथ बिल्डर अपनी बात कायम नहीं रखते है, उनको किराया नहीं देते है. सोसायटी वाले भी बार बार नई डिमांड करते है. इसलिए इस बारे में ऐसा कोई कानून बनाया जाए कि जो बात तय होती है और उससे यदि वे मुकर जाते है, भाड़ा नहीं देते है, तो ऐसे लोगों के खिलाफ क्रिमिनल केस दाखिल किया जाना चाहिए, ताकि स्लम का विकास जल्द से जल्द हो सके.

श्री अबू आजमी....

अध्यक्ष महोदय, एमएसडीपी के साथ सिवरेज का ट्रिटमेंट प्लांट मुंबई शहर में बनने वाला था. १० साल से केवल टेंडर बन रहा है. सुप्रीम कोर्ट ने वॉर्निंग देने के बाद भी ये ट्रिटमेंट प्लांट शुरु नहीं हुआ है. इसको जल्द से जल्द बनाना चाहिए. सुप्रीम कोर्ट ने यहां तक कहा है कि यदि ये काम नहीं हुआ तो महानगरपालिका पर कार्रवाई होगी. २५ हजार करोड़ रुपये का मामला है. कमिशन के चक्कर में सब काम रुक जाते है. कहां से कितना कमिशन मिलेगा, यह देखा जाता है. हम दूसरे मुल्कों में समुंदर के किनारे जाते है तो वहां पर एकदम साफ और हरा पानी, नीला पानी दिखायी देता है. यहाँ पर इतनी गंदगी है कि यहाँ बहुत ज्यादा बिमारियां फैलती है. इस बारे में ध्यान दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, सिवरेज प्लांट हो या कोई भी प्रोजेक्ट हो, वह पांच साल में पूरा नहीं होता है. हमारे एरिया में एक जमाने से काम हो रहा है. रोड का विकास नहीं हो रहा है. इस पर बंधन लगाए जाने चाहिए. सिवरेज विभाग ने जल्द से जल्द काम करना चाहिए. रोड विभाग की ओर से जो भी सीसी रोड बनते है, उसके साईज का ड्रेनेज नया नहीं बनाते है, केवल रिपेअर करते है जिससे लोकल फ्लडींग होती है. इस बारे में ध्यान दिया जाना चाहिए. सड़क पर जो टाईल्स लगी हुई है, वह टाईल्स हिलती है. दो दिन पहले मैं कुलाबा पुलिस स्टेशन गया. पूरे कम्पाऊंड में एक भी टाईल्स ऐसी नहीं है जो हिल नहीं रही हो, सभी टाईल्स हिल रही है. भ्रष्टाचार और बेईमानी पर सरकार ने ध्यान देना चाहिए.

अध्यक्ष महोदय, ४० से ५० इंजिनिअर्स विजिलेंस के है. ये क्या करते है, इनका क्या काम है ? जो विजिलेंस के अधिकारी है, वह अपनी ड्युटी सही तरह से नहीं कर रहे है. नाला वायडनिंग का काम है. ये काम ब्रिमस्टोवॅड के अंतर्गत हो रहा था. ये काम बहुत स्लो हो रहा है. पैसा इधर-उधर खर्च किया जाता है. छोटे नाले बना दिए जाते है, बड़े नालों का काम नहीं हो रहा है. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, जो विडिओकॉन अतिथी और एस.जी.केमिकल्स है, उसमें ४० इमारते, उन सभी को मिलाकर केवल "एम" ईस्ट वॉर्ड में तकरीबन ७ से ८ हजार

श्री अबू आजमी...

घर १०-१५ सालों से खाली पड़े है. एक इमारत में ११२ फ्लैट्स है, सब खाली पड़े है. जिनके पास घर नहीं है, जिनको कहीं से उजाड़ा जा रहा है, जो बाहर से आना चाहते है, उनसे भाड़ा लेकर लोगों को घर देना चाहिए. १५ सालों से लोग घरों पर कब्जा कर के बैठे है.

अध्यक्ष महोदय, कुछ समय से महाराष्ट्र शासन की जगह पर आबाद स्लम बस्तियों की झोपड़पट्टियों को फोटोपास देना बंद कर दिया गया है. ट्रान्सफर की प्रक्रिया भी बंद कर दी गई है. शासन को प्राप्त होने वाले रेवेन्यू का लॉस हो रहा है. जनता के समाधान के लिए, सरकारी रेवेन्यू बढ़ाने के लिए यह जरुरी है कि मुंबई मनपा द्वारा जो प्रक्रिया की जा रही है, कलेक्टर विभाग भी उसी तरह से काम शुरु करे. मुंबई मनपा की जगह पर आबाद स्लम बस्तियों का फोटोपास और ट्रान्सफर का काम हो रहा है, लेकिन कलेक्टर की जगह पर नहीं हो रहा है.

अध्यक्ष महोदय, मैं प्रदूषण के बारे में कहना चाहता हूं. मेरे एरिया में डम्पींग है. वहां पर हजारों ट्रक रोज आते है. एसएमएस कंपनी पर अब तक कोई रोक नहीं लग रही है. हाई कोर्ट का ऑर्डर होने के बाद भी हर साल एक्सटेंशन हो जाता है. वहां के लोगों की जिंदगी दुर्धर हो गई है. टाटा ने रिसर्च करके बताया है. मैंने सदन में कई बार बताया है कि मुंबई में लोगों के जीने का आवरेज ६५ साल है, तो उसके हिसाब से उस एरिया में लोगों के जीने का आवरेज ३९ साल है. इस बारे में जरुर कुछ न कुछ किया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, इस प्रस्ताव में श्री सचिन वाझे और श्री परमवीर सिंग के बारे में गहरी साजिश की बात हुई. श्री मुकेश अंबानी के घर के बाहर जिनेटीन से भरी गाड़ी मिली. जनता यह जानना चाहती है कि वह कहां थी, कहां से आयी, किसने रखा? इसमें कुछ भी स्पष्ट नहीं हो रहा है. पता नहीं उसको क्यों छुपाया जा रहा है. उसमें एक मुस्लिम तंजीम का नाम लाकर रख दिया. यह अच्छा हुआ कि बात खुल गई, वरना कुछ और मुस्लिम लड़के, जिस तरह से १५ सालों से कुछ मुस्लिम लड़के बेकसूर जेलों में पड़े है, कुछ और पड़े रहते. उसको पूछने वाला कोई नहीं होता है.

श्री अबू आजमी....

अध्यक्ष महोदय, ख्वाजा युनुस के केस में सन २००२ में कोर्ट में केस चल रहा था. मुझे अफसोस के साथ कहना पड़ता है कि यहां पर इंसाफ नहीं है, चाहे कोई भी सरकार हो. ख्वाजा युनुस के मर्डर के केस में सन २००२ में सीआईडी ने १४ लोगों पर केस चलाने के लिए कहा था. सरकार ने केस नहीं चलाने दिया. पता नहीं कि क्या हुआ था, क्या रिश्तेदारी थी. केवल चार लोगों पर केस चल रहा था. मैंने बहुत कोशिश की कि ख्वाजा युनुस को मारने वाले में इन लोगों का नाम है, इनको रिइनस्टेट नहीं किया जाए, लेकिन उसको रिइनस्टेट किया गया. कई पुलिस माफिया यहां पड़े हुए है, जो बड़े बड़े गुंडे और डॉन है, उनसे भी ज्यादा बदमाश ये लोग है. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए.

अध्यक्ष महोदय, मालेगाव के ब्लास्ट केस में एनआईए और एटीएस, इन दोनों ने इन्वेस्टिगेशन किया. एनआईए की प्रॉसिक्युटर श्रीमती रोहिणी सालियान का बयान आप सभी ने पढ़ा होगा. उन्होंने कहा कि मुझे ऊपर से दबाव है. मालेगाव के केस में श्रीमती प्रज्ञा सिंग ठाकूर, श्री पुरोहित, ये लोग पकड़े गए है. इनमें इनके साथ नरमी बरतो. ये सरकारी वकील कह रहे है जो कि जजों के सामने केस लेकर जाते है. वे अपना केस सही तरीके से पेश नहीं करेंगे तो सजा कहां से होगी ? यही हो रहा है. एनआईए में जो लोग पकड़े गए है, इन लोगों की सब गवाही टूट रही है, कोई गवाही सही नहीं आ रही है. मेरा निवेदन है कि जो एटीएस महाराष्ट्र सरकार में है, आप उनके गवाहों को भेजिए, ताकि इसमें दूध का दूध और पानी का पानी हो जाए. वरना अफसोस होगा.

अध्यक्ष महोदय, आपने तो बहुत कह दिया. मंदिर, गणपति... नहीं हुआ. हम भी तो यहाँ रहते है. हमारा भी नाम एक बार लेते कि कम से कम बारा रबुरला का जुलुस नहीं निकला, नमाज नहीं हो रही थी, आशुरा का जुलुस नहीं निकला. लेकिन मैं सम्माननीय मुख्यमंत्री जी को मुबारक बात देना चाहूंगा. शबेबारात के दिन कोई बाहर नहीं निकला. मैं बधाई दुंगा. जब कोर्ट ने कह दिया, बड़ी बड़ी ऑर्गनाईजेशन ने

श्री अबू आजमी.....

कह दिया कि माननीय मुख्यमंत्री जी ने जिस तरह से कोविड को कंट्रोल किया, उसके लिए मैं उनको बधाई देना चाहता हूं. उन्होंने अच्छा काम किया था.

अध्यक्ष महोदय, मेट्रो, २५६ किलोमीटर की कोस्टल रोड, सी-लिंक और जो फ्री वे बना है, ये मुंबई के लिए बहुत अच्छी चीज मिली है. फ्री वे के बारे में कहना चाहूंगा कि कुलाबा से हमारे यहाँ जाने के लिए एक घंटे का समय लग जाता है. कुलाबा से वहां तक डेव्हलपमेंट हो जाता, तो हम लोगों के लिए फ्री वे का एक अच्छा साधन हो जाता. आने जाने में अच्छा होता. हमारे यहाँ ट्राफिक की हालत बहुत खराब है.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिका में जो सहुलियते गरीब लोगों को नहीं मिल रही है, परेशानियां है, पानी, सड़कों, शौचालयों की समस्याएं है, इस पर ध्यान दिया जाना चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

-----------

असुधारित प्रत

श्री. नितेश राणे (कणकवली) :अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. हा प्रस्ताव पूर्ण वाचल्यानंतर विश्वासच बसत नाही की, हा आपल्या राज्याबद्दल आहे. कारण या प्रस्तावाच्या निमित्ताने ज्या ज्या बाबी सांगितलेल्या आहेत ते खरेच राज्यामध्ये सुरु आहे काय, खरेच एवढी संकटे आहेत काय, खरेच एवढे कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाले आहेत काय ? हे माझ्या सामोरचे प्रश्न आहेत. कारण एवढी वाईट परिस्थिती आमच्या राज्यामध्ये नाही. कारण पोलीस आणि प्रशासन ज्या पद्धतीने वागते हे बघितल्यानंतर या राज्याची एवढी वाईट परिस्थिती आहे हे ऐकल्यानंतर मला विश्वास बसत नाही. दीड महिना हे राज्य किती चांगले चालते, प्रशासन किती चांगले चालते, पोलीस किती चांगले काम करतात हे फार जवळून अनुभल्यापैकी मी एक आहे.

अध्यक्ष महोदय, काही खोटी आकडेवारी मी आपल्यासमोर मांडणार आहे. मुंबई कमिशनर श्री. हेमंत नगराळे असताना ॲन्युएल क्राईम कॉन्फरन्स झाली. त्या माध्यमातून काही खोटे आकडे आपल्या समोर मांडले आहेत. त्यांनी असे सांगितले की, सन २०२१ मध्ये ८४ हजार ६५६ गुन्हे घडलेले आहेत. सन २०२० मध्ये ५१ हजार ६८ गुन्हे घडलेले आहेत. याचा अर्थ एक वर्षात जवळपास २६ टक्के गुन्ह्यांची वाढ झाली आहे, अशी खोटी माहिती या कॉन्फरन्सच्या निमित्ताने बाहेर आलेली आहे. यामध्ये काय, काय लिहिले आहे तर खुनाचे गुन्हे १४८ वरुन, १९२ वर आले आहेत.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. नितेश राणे....

विनयभंगाच्या गुन्हांमध्ये ४९ टक्के वाढ झाली आहे. दरोडे ६१४ पासून ७४९ पर्यंत वाढले आहेत. खंडणीचे प्रकार २०४ वरुन २८० वर गेले आहेत. अशी खोटी माहिती राज्यासमोर का द्यायची ? मुंबईत, राज्यात हे प्रकार चालले आहेत काय ? पोलिसांसमोर हे सर्व विषय नाहीत. राज्या समोर, प्रशासना समोर हे विषय नाहीत. त्यांच्या समोर अजून मोठे प्रश्न आहेत. मोठमोठया गोष्टींमध्ये त्यांना लक्ष द्यायचे असते. महिलांच्या विरुध्द झालेल्या अत्याचाराबाबत ते कशाला लक्ष घालतील ? याची गरज नाही. त्यांना मोठमोठी कामे कराची आहेत. विरोधी पक्षाच्या लोकांना कोणत्या ना कोणत्या प्रकरणात गुंतवायचे. विरोधी पक्षातील लोकांवर गुन्हे नोंदवायचे, चुकीच्या केसेस लावायच्या. मुंबई महापालिकेला तर काहीच काम राहिलेले नाही. मुंबई एवढी स्वच्छ आहे. येथील गटारे एवढी स्वच्छ आहेत. मुंबईच्या रस्त्यावर खड्डेच पडलेले नाहीत. वाहतूक अतिशय सुधारलेली आहे. बीएमसी आयुक्त यांच्याकडे कोणतेच काम शिल्लक राहिलेले नाही. विशिष्ट लोकांच्या घरात किती अधिकचे बांधकाम आहे एवढेच काम त्यांच्याकडे शिल्लक राहिले आहे. बाकी काहीच काम पोलिसांकडे, राज्य शासनाकडे, मुंबई महापालिकेकडे नाही. यांच्या कोणाकडे विचारले तर एकच वाक्य येते,वरुन आदेश आलेले आहेत. वरुन आदेश कोणाकडे येतात, वरुन नेमके कोण आदेश देते याचे संशोधन या निमित्ताने झाले पाहिजे. येथे माननीय गृह मंत्री आहेत. मी त्यांना विनंती करणार आहे. पोलीस विभागाच्या माध्यमातून गुन्ह्यांवर लक्ष देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अनेक विषयांचा उल्लेख केला. दि.१२ नोव्हेंबर २०२१ रोजी नांदेड मालेगाव, अमरावती या परिसरात मोर्चे निघाले. माझ्या आधीच्या अनेक मान्यवरांनी कोव्हिडच्या संबंधी काही माहिती दिली. मागील काळात राज्यात कोव्हिडचे निर्बंध लावले होत. यामुळे गर्दी करता आली नाही. मात्र असे निर्बंध दि.१२ नोव्हेंबरच्या मोर्चामध्ये नव्हते काय ? मी मुद्दाम काही फोटो आणले आहेत. या मोर्चामध्ये हजारोंच्या संख्येने गर्दी जमली आहे. कोणाच्याही तोंडावर मास्क नाही.

श्री. नितेश राणे....

ते एकमेकांना चिकटून बसले आहेत. त्यांच्यावर काही निर्बंध नाहीत काय, हे सरकारचे जावई आहेत काय ? रझा ॲकेडमी सारख्या संस्था राज्यात वर्षानुवर्षे हैदोस घालण्याचे काम करतात. विविध पद्धतीने दंगे वाढवण्याचा प्रयत्न करतात. मग भिवंडी,नांदेड, अमरावती किंवा मालेगाव येथील दंगल असो. सर्वात पुढे नाव रझा ॲकेडमीचे येते. आतापर्यंत त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. पोलीस त्यांच्याकडे लक्ष देण्यास तयार नाहीत. हे पोलीस त्यांच्यावर कारवाई करीत नाहीत. या सरकारचे रझा ॲकेडमीच्या लोकांवर एवढा आशीर्वाद आहे. एसटी कामगारांचा संप महिन्यांपासून सुरु आहे. आपण कधी ऐकले आहे काय की, कोणता नायब तहसीलदार, तहसीलदार, जिल्हाधिकाऱ्यांनी संप करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे जाऊन निवेदन स्वीकारले. त्यांना काही विचारले असे आपण ऐकले आहे काय ? नाही ऐकले. रझा ॲकेडमीचा मोर्चा नांदेड येथील देगलूर नाक्यावर निघाला तेव्हाचा फोटो माझ्याकडे आहे. स्टेजवर तेथील नायब तहसीलदार त्यांच्या हातून निवेदन स्वीकारत आहे. याच मोर्चा नंतर नांदेड व मालेगाव येथे दंगल भडकली. यावर कारवाई करायची नाही काय ? रझा ॲकेडमी वर बंदी घालायची नाही, हे काम राज्य शासनाचे नाही ? ज्या लोकांची दुकाने फोडली, ज्यांच्या घरात दरोडे घातले, लूटमार केली त्यांना नुकसान भरपाईचा प्रस्ताव अद्याप राज्य शासनाला देण्यास वेळ झाला नाही. या बाबत लक्ष दिले जाणार आहे काय ? मुंबईमध्ये अमर ज्योत स्तंभ आहे तेथे रझा ॲकेडमीने तोडफोड केली. त्यांच्या प्रत्येक दंगलीत, मोर्चामध्ये पोलिसांना मारहाण झालेली आहे. मालेगाव, अमरावती येथे प्रत्येक मोर्चामध्ये पोलिसांना मोठया प्रमाणात मारहाण झाली. भिवंडी मोर्चानंतर गांगुर्डे नावाचे पोलीस अधिकारी यांना मारले गेले. अशा संघटनांवर बंदी घालावी, असा प्रस्ताव केंद्र शासनाला पाठवणे ही आपली जबाबदारी नाही काय ? या करिता वरतून आदेश का येत नाहीत, या साठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा का केला जात नाही ? केवळ विरोधी पक्षातील लोकांना कोणत्या ना कोणत्या कारणारे अडकवायचे, त्यांच्यावर कारवाई करायची असा एककलमी कार्यक्रम राज्य शासनाचा सुरु आहे.

श्री. नितेश राणे....

अध्यक्ष महोदय, बीएमसी आयुक्त यांच्याबाबत येथे उल्लेख केला. काय मोठमोठी कामे आहेत. विरोधी पक्षातील घरांकडे बीएमसीचे अधिकारी पाठवायचे, जसे काही मुंबईमध्ये दुसरे काही कामच राहिलेले नाही. ते सर्रास सांगतात की, आम्हाला वरतून आदेश आहेत. १२ वर्षांपूर्वी जी इमारती घरे बांधलेली आहेत. त्या बाबत आता यांना आठवले की, यामध्ये काही तरी अनियमितता आहे, चुकीचे बांधकाम केले आहे. यावर बीएमसी आयुक्त यांना विचारल्यानंतर एकच वाक्य सांगितले जाते की, वरतून आदेश आलेला आहे. माझी मागणी आहे. बीएमसी आयुक्त यांचे सीडीआर तपासले पाहिजे. त्यांना कोणाचा फोन येतो, कोणाचा दबाव येतो. केवळ विरोधी पक्षातील लोकांवर कारवाई करण्याचे आदेश त्यांना कोण देत आहे ? मुंबईमध्ये दुसरे कोणते कामच नाही, असे प्रकार सुरु आहेत.

अध्यक्ष महोदय, मागे सिंधुदुर्ग जिल्हा बँकेची निवडणूक झाली. या नंतर एका प्रकरणामध्ये मला गोवण्यात आले. या वेळी मला पोलीस व प्रशासनाचा जो अनुभव आला तो थक्क करणारा आहे. एक लोकप्रतिनिधी, आमदारासोबत कशा प्रकारे वागणूक दिली जाते, हे प्रकरण कसे हाताळले जाते या बाबत सदनाने विचार केला पाहिजे. डॉक्टर असो, पोलीस अधिकारी असो किंवा कोर्टाच्या परिसरात एसपी यांचा वावर असो. मी या निमित्ताने जबाबदारीने माननीय गृह मंत्री यांच्याकडे सदनाच्या निमित्ताने माहिती देऊ इच्छितो. कोल्हापूर येथील सिव्हील रुग्णालयात मला ॲडमिट केले होते. अचानक डॉक्टर मला येऊन आग्रह करु लागले की, नितेशजी, तुमचे सीटी अँजिओ करण्याची गरज आहे. मी म्हटले की, मला तसे काही वाटत नाही. माझे बीपी व इतर गोष्टी कमी होत्या, मला ते कळत होते. ते म्हणाले की, तुम्हाला सीटी अँजिओ करायला सांगितले आहे. सर्वच काही सरकारच्या बाजुला नसतात. काही आमच्याही ओळखीचे आहेत. काही कर्मचाऱ्यांनी मला सांगितले की, साहेब सीटी अँजिओ करु नका. त्याकरिता शरीरात इंक टाकावी लागते. ती इंक टाकून मला मारुन टाकण्याचा प्लान आहे. हे मला कर्मचाऱ्याने सांगितले. यामुळे कोणत्याही

श्री. नितेश राणे....

परिस्थितीमध्ये तुम्ह होकार देऊ नका. असा प्रकार माझ्या सोबत कोल्हापूरच्या सिव्हिल रुग्णालयात झाला आहे. माझे मेडीकल रिपोर्टमध्ये ब्लड प्रेशर कमी दाखवत होते. तसेच माझी शुगर लेव्हल कमी दाखवली जात होती. तरी देखील रात्री अडीच वाजता २०० पोलीस मला डिस्चार्ज करण्यास पाठवण्यात आले.

यानंतर श्रीमती गिरप...

असुधारित प्रत

श्री.नितेश राणे ...

रात्री अडीच वाजता आताच्या आता डिस्चार्ज करा व पोलिसांना म्हणे अरेस्ट करा व जेलमध्ये पाठवा. रात्री अडीच वाजता पोलिसांनी आल्यानंतर जेव्हा पाहिले की, या पेशंटची अवस्था खरेच खराब आहे. तेव्हा ते पोलीस बाहेर गेले. रात्री अडीच वाजता... आम्ही जेव्हा विचारायचो की, अरे बाबा समोर दिसत आहे की, माझी तब्येत खराब आहे. तुम्हाला ते दिसत आहे. रिपोर्ट सांगत आहेत. आता खोटा रिपोर्ट आणण्यासाठी त्या ईसीजी मशिनमध्ये मी बोट टाकू शकत नाही किंवा माझी शुगर लेव्हल खाली करण्यासाठी खालून चाव्या फिरवू शकत नाही.

अध्यक्ष महोदय, तरी देखील वारंवार प्रेशर येत होते. वारंवार मुंबईहून फोन येत होते. वारंवार कलानगरच्या परिसरातून फोन येत होते की, यांना कुठल्याही परिस्थितीत डिस्चार्ज करा कारण आम्हाला त्यांना अटक करायची आहे. अशा पध्दतीचे व्यवहार त्या एका केसच्या निमित्ताने सुरु होते. विरोधी पक्षाच्या नेत्यांना, विरोधी पक्षाच्या लोकांना सभागृहात यायलाच द्यायचे नाही, जिवंत ठेवायचे नाही असा प्रकार आपल्या राज्यात सुरु आहे. केवळ षडयंत्रच रचायचे नाही तर चुकीचे इंजेक्शन द्यायचे. त्यांच्या शरीरात चुकीची औषधे टाकायची आणि कायमस्वरुपी विषय संपवून टाकायचा, याला म्हणतात ठाकरे सरकार. याबाबतीत खरेच लक्ष घालण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, ३०७ कलमान्वये गुन्हा नोंदवला गेला. ज्या व्यक्तीवर हल्ला झाला असे तो म्हणतो.... माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील फार ज्येष्ठ सदस्य आहेत. कलम ३०७ अन्वयेचा गुन्हा दाखल केल्यानंतर तो माणूस दुसऱ्या दिवशी कणकवलीभर, सिंधुदुर्गभर सगळीकडे फिरत होता. कलम ३०७ अन्वयेचा गुन्हा म्हणजे Attempt to Murder असतो. त्याला काही तरी दुखापत झाली पाहिजे होती, तो २-३ महिने तरी बेडवर राहिला पाहिजे होता. परंतु, दुसऱ्या दिवशी शर्टपँट घालून तो गावभर फिरत होता. त्याच्या हाताला केवळ फ्रॅक्चर होते. स्वत:चा सत्कार करुन घेत होता जसे काही पद्मश्री जिंकला आहे की, माझ्यावर हल्ला झाला आहे, सत्कार करुन घ्या.

श्री.नितेश राणे ...

अध्यक्ष महोदय, अशा प्रकारे कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करुन तो सगळीकडे फिरत होता. तेथे काही लोक आयविटनेस होते. त्यांनी ती घटना पाहिली होती. त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावले गेले. त्यांना सांगितले की, हे स्टेटमेंट नितेश राणेंच्या विरुध्द आहे. तुला येथे खाली सही करावी लागेल. त्या संबंधित व्यक्तीने जेव्हा ते स्टेटमेंट वाचले तेव्हा ती बोलली की, अशी घटना घडलीच नाही तुम्ही का सही करायला सांगत आहात तर, नाही तुला सही करावी लागेल, नाही तर तुझ्यावर केस टाकू आम्ही असा प्रकार सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये पोलिसांकडे एवढा वेळ आहे? सर्व गुन्हे संपलेले आहेत की, याकडे पूर्णपणे लक्ष आहे. ८-८ दिवस राज्याचे डी.जी. सिंधुदुर्गमध्ये येऊन थांबतात. कोकणचे आय.जी. सिंधुदुर्गमध्ये येऊन थांबतात. जसे काही राज्यातील दरोडे, विनयभंगाचे सर्व प्रकार संपले. एकमेव काम राहिले आहे ते म्हणजे नितेश राणेला अटक करा. नितेश राणेची केस बघा म्हणून पोलीस डी.जी.व आय.जी. तेथे येऊन थांबतात व सर्व विषय तेथे सुरु राहतात.

अध्यक्ष महोदय, आमच्या माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले मुंबईचे नवीन सी.पी. आले आहेत. आम्ही असे ऐकले की, त्यांच्या हातात एक यादी दिली आहे. आमच्या काही लोकांची नावे त्यात आहेत. खूष केल्यानंतर त्यांना कदाचित सन २०२४ मध्ये आमच्या माननीय श्रीमती पुनमताई महाजन यांच्या विरुध्द शिवेसेनेचे तिकिट देखील मिळणार आहे असे आम्ही ऐकतो. काय महत्वाकांक्षा आहे ना, पोलीस खात्याला काय म्हणायचे? अशा पध्दतीने राज्य चालत असेल .. अध्यक्ष महोदय, मला ५ मिनिटांचा वेळ द्यावा. मी खूप वेळापासून थांबलो आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : सन्माननीय सदस्य ९.३० वाजता आपल्याला सभागृहाचे कामकाज थांबवायचे आहे. आपण राहिलेली चर्चा उद्या घेऊ.

श्री.नितेश राणे : ठीक आहे. मी माझे बोलणे ५ मिनिटांत संपवतो. त्यानंतर अन्य सन्माननीय सदस्यांना बोलण्याची अनुमती द्यावी.

श्री.नितेश राणे ...

अध्यक्ष महोदय, अशा पध्दतीचा प्रकार, अशा पध्दतीचे विषय आमच्या राज्यात सुरु आहेत. काही दिवसांअगोदर दिशा सालीयनच्या विषयावर माननीय केंद्रीय मंत्री श्री.नारायणे राणे व आम्ही एका पत्रकार परिषदेच्या माध्यमातून काही आरोप केले. त्यानंतर आमच्यावर केस दाखल केली गेली. दिशा सालीयनच्या आईवडिलांनी केस दाखल केली असे सांगितले. महिला आयोगाकडे ती केस गेली. महिला आयोग बाकी कुठल्याही प्रकरणामध्ये एवढ्या लवकर कधी काम करताना दिसत नाही. परंतु,२४ तासांमध्ये ती केस घेतली गेली व लगेच आमच्यावर केस दाखल केली गेली. २४ तासामध्ये अशी कलमे आमच्यावर दाखल केली की, जे गुन्हे आम्ही केलेच नाहीत. तरी पुढे जाऊन जेव्हा आम्ही इन्क्वायरी करण्यासाठी मालवणी पोलीस स्टेशनमध्ये गेलो तेव्हा पूर्ण ९ तास आमची चौकशी केली.

अध्यक्ष महोदय, एक केंद्रीय मंत्री, एक आमदार व ९ तास समोर डीसीपी बसले होते, आय.ओ. बसले होते समोर एफ.आय.आर. होता. एकही प्रश्न त्या एफआयआर संदर्भात नव्हता. आम्ही वारंवार विचारत होतो की, तुमचे इन्टेन्शन सांगा तर नाही. तुमच्याकडे दिशा सालीयनच्या पार्टीचा कोणता फोटोग्राफ आहे, तुम्हाला फोन कोण करते, रोहन राय बद्दल तुम्हाला कोणी माहिती दिली आणि प्रत्येक १५ मिनिटांनी त्या डीसीपींना कोणाचे तरी फोन येत होते. ते बाहेर जायचे फोन घ्यायचे व परत आतमध्ये यायचे असे ९ तास चालले.

अध्यक्ष महोदय, मी शेवटचा मुद्दा मुद्दामहून मांडणार आहे. हा दिशा सालीयनचा विषय.... कारण तुम्ही शक्ती कायदा आपल्या राज्यात आणत आहात. एक तर तो दिशा कायदा होता त्याचे नाव शक्ती कायदा केला. ते नाव का बदलले हे आता समजले. आपण विचार करु की, दिशा सालीयनची खरेच आत्महत्या असेल. खरेच आपण समजू की, त्या मुलीने आत्महत्या केली. मग ती ज्या इमारतीमध्ये राहत होती, तेथील सीसीटीव्हीचे फुटेज का गायब केले गेले, तिच्या इमारतीच्या वॉचमनला का गायब केले गेले, त्या ८ व ९ जूनच्या रात्री तेथील वॉचमन गायब, तेथील

श्री.नितेश राणे ...

सीसीटीव्हीचे फुटेज गायब, तेथील व्हिजीटरचे जे पुस्तक आहे, त्यातील ८ व ९ तारखेची दोन पाने गायब. तिच्या बरोबर तिचा जो रोहन राय नावाचा मंगेतर राहत होता तो आतापर्यंत कोणाच्याही संपर्कात नाही. तो त्या घटनेचा आयविटनेस आहे.

अध्यक्ष महोदय, मी आज देखील जबाबदारीने सांगतो की, ती आत्महत्या नाही, ती हत्या आहे. मला त्या दिवशी पोलिसांना पुरावे द्यायला जमले असते. परंतु, मी मुद्दामहून दिले नाहीत. कारण मुंबई पोलिसांच्या तपासावरच आम्हाला प्रश्नचिन्ह आहे. मुंबई पोलिसांनी ज्या पध्दतीने तपास केला, तो कोणाला वाचविण्यासाठी केला, तो त्या मुलीला न्याय देण्यासाठी केलेला नाही.

अध्यक्ष महोदय, आता पेन ड्राईव्हचा जमाना आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस या युनिव्हर्सिटी ऑफ पेन ड्राईव्हचे शिक्षक आहेत. आम्ही त्यांचे विद्यार्थी आहोत. आमच्या शिक्षकांनी दोन पेन ड्राईव्ह दाखवले तर शिष्यांनी एक पेन ड्राईव्ह तरी काढला पाहिजे म्हणून मी मुद्दामहून एक पेन ड्राईव्ह तयार करुन आणला आहे. हा संवादाचा पेन ड्राईव्ह आहे. या राज्याचा एक मंत्री त्या दिशा सालीयनच्या हत्येमध्ये, त्या दिशा सालीयनच्या बलात्कारामध्ये त्याची कशी इन्व्हॉल्व्हमेंट आहे याबाबत एक आयविटनेस मला व माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.अमित साटम यांना सांगत आहे.

अध्यक्ष महोदय, या पेन ड्राईव्हमध्ये ते आहे. त्याची स्क्रिप्ट देखील तयार केली आहे. परंतु, ही मी तुमच्याकडे किंवा माननीय गृह मंत्री यांच्याकडे देणार नाही. मी ती कोर्टाच्या माध्यमातून सीबीआयकडे देईन. कारण माझी अशी इच्छा आहे की, त्या मुलीला न्याय मिळाला पाहिजे, नाही तर ज्याच्या बद्दल हा पेन ड्राईव्ह आहे तो मुलगा, ती व्यक्ती जिवंत तरी राहील का याची शाश्वती मला नाही. परंतु, आमच्याकडे पुरावा आहे. आम्ही सिध्द करु शकतो की, ८ तारखेच्या रात्री महाराष्ट्र सरकारचा एक मंत्री त्या दिशा सालीयनच्या प्रकरणामध्ये होता. त्या पूर्ण प्रकरणामध्ये

असुधारित प्रत

श्री.नितेश राणे ...

त्याचा हात होता. तिची आत्महत्या नाही, हत्या आहे हे सिध्द करण्यासाठी सर्व पुरावे आमच्याकडे आहेत किंवा सुशांत राजपूतचा जो १३ तारखेच्या रात्रीचा विषय आहे, ती देखील आत्महत्या नाही, हत्या आहे. त्याचे देखील पुरावे आमच्याकडे आहेत. ते येणाऱ्या दिवसांमध्ये सीबीआयकडे मिळतील.

अध्यक्ष महोदय, तिचा प्राथमिक पोस्ट मॉर्टेम रिपोर्ट देखील माझ्याकडे पुराव्यासाठी आहे. त्या दिवशी ही सगळी माहिती आमच्याकडून काढण्याचे ९ तास प्रयत्न होत होते की, आम्हाला पुरावा द्या. जाता जाता एवढेच सांगतो की, माझे प्रकरण असो, दिशा सालीयन प्रकरण असो किंवा अन्य असोत, विरोधी पक्षाचे श्री.मोहित कंबोज असोत, श्री.किरीट सोमय्या असो, विरोधी पक्षातील जे जे बोलत आहेत... अहो त्या श्री.मोहित कंबोजला एका दिवशी मुंबई महानगरपालिकेने ५७ नोटिस पाठवल्या.

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.नितेश राणे...

महानगरपालिका आयुक्त श्री.चहल यांना दुसरी कामेच नाहीत. हे आयुष्यभर मुंबई महानगरपालिकेमध्ये सत्ता गाजवणार आहेत, असा त्यांचा गैरसमज झाला आहे. आता निवडणूक लागली असती तर भारतीय जनता पक्षाचा व्यक्ती महानगरपालिकेचा महापौर राहिला असता. हे पण घरामध्ये राहतात. कोठून कशा नोटीसा देतात, हे आम्ही देखील दाखवून देऊ.

अध्यक्ष महोदय, ही सर्व प्रकरणे पाहता हे राज्य कोणत्या दिशेने जात आहे, हे सांगण्याचा प्रयत्न मी केला आहे. पोलिसांनी, प्रशासनाने, महानगरपालिकेने कामावर, जनतेवर लक्ष दिले पाहिजे. संपूर्ण दिवस नितेश राणे सकाळचा चहा केव्हा पितात, श्री.किरीट सोमय्या कोणते शर्ट घालतात, श्री.मोहित कंबोज संध्याकाळी कोणा बरोबर जेवणासाठी जातात, याकडे लक्ष न देता राज्याच्या प्रगतीवर लक्ष द्यावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभारी आहे. धन्यवाद !

---------

असुधारित प्रत

श्री.अतुल भातखळकर (कांदिवली (पूर्व)) : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाने म.वि.स.नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला आहे. त्यावर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये मागील २ महिने, ६ महिने या कालावधीतील व विशेषत: मुंबई एमएमआर रीजनमधील अनेक बाबींचा उल्लेख आहे. सत्ताधारी पक्षाने प्रस्ताव मांडला होता त्यावेळी त्यांनी मुंबई शहर व एमएमआर रीजनच्या संदर्भात बऱ्याच गोष्टी मांडल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे दै.सामना वृत्तपत्राचे एक कात्रण आहे. दै.लोकमत या वृत्तपत्राने मुंबई व राज्याच्या व्हीजन विषयी एक कॉन्क्लेव्ह आयोजित केला होता. त्यामधील माननीय पर्यावरण मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांचे विधान दै.सामना वृत्तपत्राने छापले आहे, ते कात्रण माझ्याकडे आहे. मुंबईकरांना सन २०२३ पासून कोस्टल रोड, मेट्रो, शिवडी-न्हावाशेवा मार्गाने प्रवास करता येणार, असे त्यामध्ये नमूद केले आहे. हे तीन प्रकल्प तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सुरु केले आहेत. या प्रकल्पांची वर्षानुवर्षापासून मुंबईकर व एमएमआर रीजनमधील लोकांना प्रतिक्षा होती ते प्रकल्प सन २०२३ मध्ये पूर्ण करणार. हे विधान २ वर्षे सत्तेत राहिल्यानंतर माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे मुंबईकर व राज्यातील जनतेला सांगत आहेत. या सरकारने दोन वर्षात आयत्या पिठावर रेघोट्या मारण्याचे काम केले.

अध्यक्ष महोदय, यासर्व प्रकल्पांमध्ये मलिदा कसा मिळेल, यासाठी मागील दोन अडीच वर्षाच्या कालखंडात प्रयत्न झाले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांनी माननीय विरोधी पक्ष नेता यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देण्याचा केविलवाना प्रयत्न केला आहे.

अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेने एका कंपनीला कोविड सेंटर चालविण्याचे कंत्राट दिले. तिची सुरस कथा आहे. लाईफलाईन मॅनेजमेंट सर्व्हीसेस या कंपनीच्या संदर्भात कोविड सेंटरची प्री-बिड मिटींग दिनांक २५ जून, २०२० रोजी झाली होती. लाईफलाईन मॅनेजमेंट सर्व्हीसेस या कंपनीशी दिनांक २६ जून, २०२० रोजी भागीदारी

श्री.अतुल भातखळकर...

करण्यात आली. या कंपनीला महालक्ष्मी रेस कोर्स, एनएससीआय, नेस्को, दहिसर, मुलुंड या ठिकाणचे जम्बो कोविड सेंटर चालविण्याचे कंत्राट मिळाले. हे कंत्राट सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांनी सांगितले की, ज्यावेळी पीएमआरडीएने त्यांना ब्लॅकलिस्ट केले त्यापूर्वी मिळाले होते. पीएमआरडीएचे अध्यक्ष राज्याचे मुख्यमंत्री आहेत. पीएमआरडीएने सदरहू कंपनीला दिनांक ९ सप्टेंबर, २०२० रोजी टर्मिनेट केले नाही तर ब्लॅकलीस्ट केले आहे. एवढेच नव्हे तर सर्व स्टेट अथॉरिटींनी या कंपनीला ब्लॅकलीस्ट केले पाहिजे, असे ही आदेशात नमूद केले. माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत. जम्बो कोविड सेंटरसाठीच्या निविदेमध्ये डॉक्टर, नर्सेस, वॉर्ड बॉय यांच्या मनुष्यबळाची अट होती. मंबई महानगरपालिका व सदरहू कंपनीचे ॲग्रीमेंट माझ्याकडे आहे. पीएमआरडीएने ब्लॅकलिस्ट केल्यानंतरही उक्त कंपनीला दिनांक २१ जुलै, २०२१ रोजी सर्व जम्बो कोविड सेंटर चालविण्यासाठी महानगरपालिकेने दिली. राज्याचे मुख्यमंत्री हे उक्त कंपनीला ब्लॅकलीस्ट करण्यासाठी सांगतात. मात्र, या कंपनीला मुंबई महानगरपालिकेने कंत्राट देऊन शेकडो कोटी रुपयांचे पेमेंट केले आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता यांनी या कंपनीचा उल्लेख केला आहे. उक्त कंपनीने घाई घाईमध्ये २ हजार रुपयांचा स्टॅम्प पेपर घेऊन रस्त्यावरील कोणा तरी वकीलमार्फत त्यावर ॲग्रीमेंट कॉपी पेस्ट केले. याप्रकारे मुंबई महानगरपालिकेसोबत ॲग्रीमेंट तयार केले त्यावर "ट्रस्ट डीड" असा उल्लेख आहे. त्यानंतर या ॲग्रीमेंटचे नुतनीकरण १ हजार रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करण्यात आले आहे व कंत्राटे १००-१०० कोटी रुपयांची होती. सन्माननीय सदस्य श्री.अमित साटम यांनी सांगितले आहे की, या कंपनीचा भागीदार ज्या महिलेचे चहाचे दुकान आहे तिचे पती श्री.पाटकर हे आहेत. त्यामुळे यासर्व भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची नितांत गरज आहे. प्रेताच्या टाळूवरील लोणी खाणे म्हणजे काय असते, याचे सर्वात मोठे उदाहरण मुंबई महानगरपालिकेत घडले आहे.

श्री.अतुल भातखळकर...

अध्यक्ष महोदय, मी यासंदर्भातील कागदपत्रे आपणाकडे पाठवीन. या प्रश्नाला उत्तर देण्यासारखे सरकारकडे काही नाही. मुख्यमंत्री महोदयांनी कंपनीला ब्लॅकलीस्ट केल्यानंतर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तिचे नुतनीकरण दिनांक २१ जुलै रोजी करुन दिले आहे. ते खाजगीत सांगतात की, आम्हाला बंगल्यावरुन फोन आला म्हणून या कंपनीला ब्लॅकलीस्ट केलेले असतानाही नुतनीकरण करुन देण्याची आवश्यकता निर्माण झाली.

अध्यक्ष महोदय, पुणे महानगरपालिका प्रदेश प्राधिकरणाचे टर्मिनेशन व ब्लॅकलीस्टचा आदेश मी आपणाकडे जरुर देईन. मुंबई महानगरपालिकेचा कारभार किती खालच्या स्तरावर गेला याचा याचा विरोधी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने योजना आखली आहे त्या माध्यमातून ज्या घरामधील व्यक्ती कोविडमुळे मयत झाली त्यांना ५० हजार रुपये देण्यात येणार आहे. त्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडे हजारो लोकांनी अर्ज केले आहेत. पण त्यांच्या पैकी १० टक्के लोकांना अद्यापपर्यंत ५० हजार रुपयांचे अनुदान दिले नाही. एवढेच नव्हे तर COVID ex-gratia 'paid', but no money in bank. म्हणजे ज्यांनी अर्ज केले त्यांना योजनेंतर्गत ५० हजार रुपये दिले, अशी नोंद महानगरपालिकेच्या खात्यावर आहे.

यानंतर श्री.तेलंग....

श्री.अतुल भातखळकर.......

परंतु संबंधित माणसाच्या खात्यावर ५० हजार रुपये जमा झाले नाहीत. कदाचित या लोकांनी हे पैसे खाण्याचे महापाप केले असेल. त्यामुळे या प्रकरणाची देखील चौकशी करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, आरे कॉलनीमधील ते झाड अखेर तोडल्या गेले. त्या झाडाची कत्तल मुंबई मेट्रो ॲथॉरिटीने केली, अशी माहिती मिळालेली आहे. मराठी भाषेची कथा काय सांगावी, हा माझ्यासमोर मोठा प्रश्न पडला आहे. महानगरपालिकेमध्ये सत्ता आणण्यासाठी यांचा मराठीचा बाणा असायचा. परंतु मागील पाच वर्षामध्ये मुंबई महानगरपालिकेमधील मराठी शाळेतील पटसंख्या ५० टक्के कमी झालेली आहे. मराठीच्या ठेकेदारांनी स्वत: इंग्रजी माध्यमामध्ये शिक्षण घेतले. मुंबई महानगरपालिकेच्या मराठी शाळा इंग्रजी माध्यम करण्याची मागणी केली आहे. ते एवढ्यावर थांबले नाहीत तर त्यांनी माझ्या मतदारसंघातील मालाड पूर्वमध्ये दप्तरीरोड लागून मुंबई महानगरपालिकेची चार मजली मुख्य ठिकाणी मराठी शाळा होती. ही मराठी शाळा इंग्रजी माध्यमामध्ये चालविण्यासाठी एका लाल नावाच्या व्यक्तीला देण्यात आली. यासाठी कोणतेही निविदा प्रक्रिया न राबविता सुधार समितीच्या माध्यमातून अत्यंत कमी दराने ही शाळा दिलेली आहे. महानगरपालिकेच्या लोकांनी मराठीची अशी अवस्था केलेली आहे आणि आपण मराठी भाषेच्या अभिमानाविषयी चर्चा करीत आहात.

अध्यक्ष महोदय, मागील ९ महिन्यांपासून आझाद मैदानावर दीडशे विद्यार्थी धरणे आंदोलन करीत आहेत. मागील सरकारच्या काळामध्ये मुंबई महानगरपालिकेने पवित्र पोर्टलवर शिक्षक पदाची जाहिरात दिली. त्यानंतर अनेक उमेदवारांनी अर्ज केले होते. परीक्षा दिली. त्या परीक्षमध्ये १५० विद्यार्थी पास देखील झाले. त्यानंतर त्यांची तोंडी परीक्षा घेण्यात आली. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी त्या पात्र उमेदवारांना सांगितले की, आपण पात्र होत असलात तरी आम्ही आपणाा नोकरी देऊ शकत नाही. त्यावर संबंधित उमेदवरांनी त्याचे कारण विचारले असता त्या अधिकाऱ्यांनी लेखी सांगितले की, आपले माध्यमिक शिक्षण मराठी माध्यमातून झाले असल्यामुळे

श्री.अतुल भातखळकर.......

आम्ही आपणास नोकरी देऊ शकत नाही. अशा प्रकारचे गंभीर कारण सांगण्यात आले आहे. मुंबई महानगरपालिकेतील लोक मराठी मतांचे ठेकेदार समजतात, अशा लोकांनी त्यांना अशा प्रकारे लेखी उत्तर द्यावे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत, परंतु आता तेवढा वेळ नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना स्वतंत्र स्वायत्त वाहनतळ प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. आज दोन वर्षे पूर्ण झाली तरी वाहनतळ प्राधिकरण स्थापन झाले नाही. परंतु स्थापन करण्याच्या तयारीसाठी ४ कोटी रुपयांचा खर्च केलेला आहे. यासाठी अजून एक वर्षाचा कालावधी लागेल. त्यामुळे आम्हाला अतिरिक्त निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणी केली जात आहे. एक वाहनतळ प्राधिकरण निर्माण करण्यासाठी तीन-तीन वर्षे लागतात, ही गंभीर बाब आहे. वाहनतळ प्राधिकरण स्थापन करण्यासाठीच चार कोटी रुपये खर्च केला तरी ते काम पूर्ण होऊ शकले नाही. मुंबईमधील वाहनतळाची समस्या सर्वात मोठी आहे. वाहनतळ निर्माण कोणी करावे, याबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. या सरकारने आरे येथील मेट्रो कारशेडला स्थगिती देऊन मुंबई शहराच्या विकासाचा मट्याबोळ केला, त्याप्रमाणे वाहनतळ प्राधिकरण स्थापनेस विलंब करुन मुंबईचा विकास मंदाविण्याचे काम करण्यात आले आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेने याबाबत उत्तर देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, आरेमध्ये मेट्रो कारशेड चालणार नाही. परंतु आरेमध्ये आरटीओ ऑफिस चालत आहे. वृद्धाश्रम चालत आहे. परंतु तुटलेल्या झाडांसाठी कारशेड नको, अशी मुंबई महानरपालिकेची आणि सरकारची भूमिका आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यावरण विभागावर सन्माननीय सदस्य अमित साटम यांनी भाष्य केलेले आहे. मुंबईतील ई-कचरा संपविण्यासाठी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही योजना नाही. त्यामुळे मुंबई महानगरपालिका केवळ भ्रष्टाचारा करण्याबरोबर विकास प्रकल्पांना खो घालण्याचे काम करीत आहे. Manual scavenging is still an open secret. मुंबई महानगरपालिका सन २०५०

श्री.अतुल भातखळकर.......

पर्यंतचा पर्यावरण कृती आराखडा तयार करीत आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातल्यानंतर देखील मुंबई शहरातील मैला साफ करण्याकरिता बेकायदेशीर पद्धतीने कामगारांना ड्रेनेजमध्ये उतरविले जात आहे. त्यात कामगारांचे मृत्यू होत आहेत. दोन दिवसांपूर्वी चार कामगारांचा मृत्यू झालेला आहे. खोटी आश्वासने देऊन सन २०५० च्या वातावरणीय कृती आराखड्याच्या गप्प मारल्या जात आहेत.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील हवेच्या गुणवत्तेबाबत काय बोलावे, हा प्रश्न आहे. मुंबई शहरातील हवेचा दर्जा अत्यंत खाली गेलेला आहे. सन २०१७ मध्ये ईलेक्ट्रीक व्हेईकल पॉलिसी आणली. परंतु हे सरकार आम्ही पॉलिसी आणल्याचे सांगत आहे. पॉलिसी आणण्याच्या नावाखाली केवळ चमकोगिरी करण्याचे काम सुरु आहे. एमएमआरडीए, एसआरएबाबत मोठ-मोठी भाषणे करण्यात आली. सन २०११ च्या कायद्यामध्ये दोन बाबींचा उल्लेख करण्यात आला होता. सन २०११ पर्यंतच्या लोकांना सशुल्क घर उपलब्ध करुन देण्यात येईल. परंतु मागील दोन वर्षापासून सदर घरांची किंमत निश्चित करण्याचा शासन निर्णय काढणे शक्य झाले नाही. दुपारी मंत्री महोदयांनी सांगितले की, ज्यांनी १० वर्षांच्या आत घरे विकली आहेत....समिती आपल्या सरकारच्या काळामध्ये नेमली होती. परंतु अजूनही शासन निर्णय काढलेला नाही. कारण यासंदर्भात कोणतेही काम करण्याची त्यांना इच्छा नाही.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिका कशी काम करीत आहे, याचे मी माझ्या भाषणातील शेवटचे उदाहरण देतो. माझ्या मतदारसंघामध्ये Videocon Tower नावाची एक इमारत आहे. योगायोगाने या व्हिडिओकॉन इमारतीचे मालक शिवसेना पक्षाचे राज्यसभा खासदार होते. सदर इमारत यूएलसीअंतर्गत बांधण्यात आली होती. इमारत प्रस्तावामध्ये छोट्या सदनिकांचे प्रपोजल सबमिट करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात ग्राहकांना ॲग्रीमेंटमध्ये मोठ्या सदनिका देण्यात आल्या. त्यासोबत वाहनतळ देखील देण्यात आले. जेव्हा इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले तेव्हा वाहनतळासाठी लोकांनी आरडा-ओरड सुरु केली. त्यावेळी असे लक्षात आले की, ती इमारत दोन-तीन वर्षांपूर्वी वॉर्डाकडे सुपूर्त करण्यात आली होती.

असुधारित प्रत

श्री.अतुल भातखळकर.......

यामध्ये इमारतीमध्ये अल्ट्रेशन झाले आहे, अशी नोटीस देण्यात आली. मुंबई महानगरपालिकेने संबंधित सदनिका धारकांवर गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्या ग्राहकांनी माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. उक्त याचिकेवर निर्णय देताना माननीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश चंद्रचूड यांच्या खंडपीठाने सांगितले की, पुढील सुनावणीच्या वेळी मुंबई महानगरपालिकेने न्यायालयामध्ये हजर राहावे.

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

श्री. अतुल भातखळकर.....

मुंबई महानगरपालिकेला वारंवार सूचना देऊन सुद्धा ऐकले जात नव्हते. लोकांनी मोठ्या सदनिकेचे करार केले आणि छोट्या सदनिका दाखविण्यात आल्या होत्या. लोकांनी पैसे खर्च करुन सदनिका विकत घेतल्या आहेत. लोकांवर अत्याचार करण्यात आले आहेत. आरजी प्लॉट विकसित करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध आणि महानगरपालिकेच्या विरोधात कारवाई केली पाहिजे, अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो आणि थांबतो.

धन्यवाद !

-----

असुधारित प्रत

श्री. संजय केळकर (ठाणे) : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षनेता सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या नियम २९२ अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईशिवाय एमएमआर भागावर बोलण्यासाठी मी पहिला सदस्य म्हणून उभा आहे. मी ठाणे जिल्ह्यासंदर्भात बोलू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मी माननीय नगर विकास मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. माननीय नगर विकास मंत्री महोदयांना आम्ही वेळोवेळी मागणी करुनही ठाणे महानगरपालिकेतील विविध प्रश्नांची उत्तरे विचारली होती. परंतु त्यांनी उत्तर दिले नाही. ठाणे महानगरपालिकेमध्ये अनेक प्रकारचे प्रश्न आहेत, घोटाळे आहेत. यात थीम पार्क घोटाळा, बॉलिवूड पार्क घोटाळा, डीजी ठाणे घोटाळा, नालेसफाई घोटाळा, रस्ता घोटाळा, बीएसयुपी घोटाळा, सायकल स्टँड घोटाळा, टीडीआर घोटाळा, असे अनेक घोटाळे हे सभागृहामध्ये सांगून देखील माननीय नगर विकास मंत्री जे ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत त्यांनी यावर कधीही कोणतीही चौकशी केली नाही. त्यांनी कधीही यबाबात माहिती दिली नाही व त्यावर कोणतीही कारवाई केली नाही.

अध्यक्ष महोदय, करुन दाखविले आणि आम्ही विकासाचे राजकारण करतो, असे सांगणारे आज ठाणे महानगरपालिकेत मागील ३० वर्षापासून सत्तेत आहेत. परंतु त्यांना ठाणे जिल्ह्याच्या पाण्यासाठी साधे धरणदेखील यांना बांधता आलेले नाही. मागील ३० वर्षापासून धरण बांधण्यात येईल, असे सांगण्यात येत आहे. मुंबई महानगरपालिकेने मध्य वैतरणापर्यंत धरण बांधलेले आहेत. परंतु ठाणे शहरासाठी हक्काचे धरण बांधण्यात आलेले नाही. तेथील लोकांना पाण्यासाठी न्यायालयात धाव घ्यावी लागली आहे. आज त्यावर सुनावणी होती. सन २०१७ मध्ये माननीय उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करण्यात आली होती. त्यात सांगण्यात आले होते की, ठाणे शहरातील लोकांना जर पुरेसे पाणी मिळत नसेल तर नवीन बांधकामांना परवानगी देता कामा नये. परंतु ठाणे महानगरपालिकेने खोटे प्रतिज्ञापत्र माननीय उच्च न्यायालयात दाखल केले व सांगितले की ठाणे शहरासाठी पाण्याची व्यवस्था

श्री. संजय केळकर .....

करण्यात येईल, पाण्याच्या टाक्या बांधण्यात येतील. त्यानंतर न्यायालयाने ठाणे शहरात बांधकामासाठी परवानगी दिली होती. परंतु आज तेथे काय परिस्थिती आहे ? आज तेथील नागरिकांना टँकरच्या विरोधात वॉर अगेंस्ट टँकरमाफिया, वॉर अगेंस्ट टीएमसी, वॉर अगेंस्ट रुलिंग पार्टी अशा प्रकारची आंदोलने करावी लागत आहेत. महानगरपालिकेतील गृह संकुलामध्ये राहणाऱ्या लोकांना रोज १५ ते २० हजार रुपये खर्च करावे लागत आहेत. एकीकडे घराचे हफ्ते भरावे लागत असून दुसरीकडे पाण्यासाठी पैसे खर्च करावे लागत आहेत. अशा प्रकारे तेथील परिस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, जोपर्यंत ठाणे शहरातील पाण्याचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत नवीन बांधकामांना परवानगी दिली जाऊ नये. तसेच जर पाणी नसेल तर मालमत्ता करदेखील भरावयाचा नाही, अशी भूमिका ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील लोकांनी घेतली आहे. त्यामुळे पाण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. याबाबत मंत्री महोदयांनी माहिती द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, क्लस्टर डेव्हलपमेंटसंदर्भात ४२ आराखडे मंजूर झालेले आहेत. परंतु लोकांना या क्लस्टर योजनेसंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे, याची माहिती दिली जात नाही. तेथील लोकांची दडपशाहीने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून बायोमेट्रीक नोंदणी केली जात आहे. महानगरपालिकेच्या क्लस्टर योजनेत जे अधिकारी काम करीत आहेत त्यांनी लोकांना विश्वासात घेऊन या योजनेची माहिती दिली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, ठाणे महानगरपालिकेमध्ये अनधिकृत बांधकामांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याची मी अनेक उदाहरणे देऊ शकतो. राबोडी येथे जे बांधकाम सुरु होते, तेथे सहायक आयुक्त आणि आयुक्त यांना बैठकीमध्ये बोलावून चालू बांधकामांबाबतची माहिती मी दिली होती. तेथे आजही दोन-दोन मजल्यांचे बांधकाम सुरु आहे. याबाबत सांगूनदेखील कोणतीही कारवाई केली जात नाही. यासाठी कोणाचा आश्रय आहे. तेथील सहायक आयुक्तांना निलंबित केले पाहिजे. अशा प्रकारची माझी मागणी आहे. या अनधिकृत बांधकामांना पाठिशी घालण्याचे

असुधारित प्रत

श्री. संजय केळकर .....

काम करण्यात येत आहे. शासनाकडून कोणत्याही अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जात नाही. ठाणे महानगरपालिकेतील कर्तृत्ववान महिला अधिकाऱ्यास यामुळे तिच्या हाताची दोन बोटे गमवावी लागली आहेत. त्या महिला अधिकाऱ्यांनी सांगितले की, अनधिकृत बांधकामवाल्यांनी माझ्यावर हा हल्ला केला आहे. याबाबत नगर विकास विभागाच्या मंत्री महोदयांनी माहिती दिली पाहिजे. ठाणे येथील डीसीआर तयार झाला आहे. परंतु या नगर विकास खात्यामध्ये सॉफ्टवेअर डिफेक्टीव्ह असल्यामुळे ऑनलाईन परवानगी मिळत नाही. दिनांक ३१ डिसेंबर, पर्यंत ऑफलाईनसाठी परवानगी दिली होती. ही परवानगी वाढविण्याची आवश्यकता आहे. धोकादायक इमारती, मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव अजूनही प्रलंबित आहेत. यातील सॉफ्टवेअर चुकीचे असल्यामुळे ऑफलाईनची मुदत मंत्री महोदयांनी वाढवावी, अशी मी यानिमित्ताने विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, ठाणे शहरामध्ये कोणती इमारत धोकादायक म्हणून जाहीर करावयाची आणि कोणती करावयाची नाही, यासाठी एक रॅकेट तयार झाले आहे. हे रॅकेट मोडून काढण्याची आवश्यकता आहे, हे मी वारंवार सांगितले आहे. याची चौकशी झाली पाहिजे. ठाणे शहरातील जवळपास ८० टक्के इमारतींच्या गच्चीवर वेदर शेड बांधण्यात आले आहे. परंतु ते अजूनही नियमित केले जात नाही. हे हफ्ते मिळविण्याचे एक साधन आहे. वेदर शेडचे कारण दाखवून ठाणे महानगरपालिकेकडून हप्फ्ते वसुलीचे प्रकार सुरु आहेत.

अध्यक्ष महोदय, ठाणे महानगरपालिकेमध्ये अनियमित बदल्या, बेकायदेशीर नियुक्ती केली जात आहे. याबाबत वेळोवेळी पत्र दिले तरीही 'आम्ही म्हणू तेच धोरण आणि आम्ही बांधू तेच तोरण' अशी भूमिका घेतली जात आहे. याबाबत नगर विकास मंत्री महोदयांनी माहिती द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मघाशी मी लतीफ चाळीचे उदाहरण दिले आहे. मालमत्ता क्र. १०५०१४७ याबाबत मंत्री महोदयांनी माहिती दिली पाहिजे.

श्री. संजय केळकर .....

अध्यक्ष महोदय, आता पेनड्राईव्हशिवाय काम होत नाही. असा एक पेनड्राईव्ह घेऊन मी माननीय गृह मंत्र्यांकडे गेलो होतो. ठाणे शहरात हुक्का पार्लर, क्लब, पब, डान्स बार याबाबतची माहिती मी पेनड्राईव्हमध्ये दिली होती. परंतु त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. ठाणे शहर हे सांस्कृतिक शहर आहे. असे असताना हुक्का पार्लरचे शहर बनविण्यात येणार आहे. ठाणे शहरास ऐतिहासिक ठेवा आहे. याबाबत माननीय गृह मंत्री कोणती कारवाई करणार आहे, हे त्यांनी उत्तरामध्ये सांगावे, अशी मी त्यांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, माननीय गृहनिर्माण मंत्री हे ठाणे शहरातील आहेत. ठाणे शहरासाठी स्वतंत्र सीईओ असले पाहिजेत, अशी आम्ही मागणी केली आहे. एसआरएबाबत लाखो लोक बेघर झाले असून त्यांना भाडेही मिळत नाही. याबाबत ठोस निर्णय मंत्री महोदयांनी घ्यावा. तेथे कोणतीही कारवाई केली जात नसून बिल्डर लॉबीला पाठिशी घातले जात आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक २३/१०/२०१९ रोजी राबोडी येथे जमीर शेख नावाच्या माहिती अधिकारचे काम करणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्याची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. या घटनेला एक वर्षाचा कालावधी होत आहे. आजही त्या हत्येचा सुत्रधार सापडला नाही. मी यानिमित्ताने माननीय गृहमंत्र्यांना विनंती करतो की, हे प्रकरण सीबीआयकडे देण्यात यावे. या प्रकरणात पोलिसांवर कोणाचा दबाव आहे काय ? त्या सुत्रधाराला शोधून काढावे. इक्बाल कासकरला ठाणे येथे खंडणी पथकाने अटक केली होती. तो विविध बिल्डरकडून खंडणी वसूल करीत होता. त्यांला मदत करणारी मंडळी कोण आहेत ? त्याची फाईल अजून अपूर्ण आहे.

यानंतर श्री. चौधरी....

श्री.संजय केळकर.....

ही पूर्ण फाईल अद्याप उघडली गेली नाही. त्याला मदत करणारा ठाणे महानगरपालिकेतील एक नगरसेवक आहे, नेता आहे. परंतु त्याची कुठलीही चौकशी झाली नाही. त्याची चौकशी करण्यात कुठला दबाव आहे ? इक्बाल कासकर हा तर आहेच परंतु त्याच्याकडून आपण माहिती घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, कौसा येथे हॉस्पिटल बांधण्यासाठी सन २०१३ मध्ये मंजुरी देण्यात आली. त्यावर १५७ कोटी रुपये खर्च करुनही हे रुग्णालय कार्यान्वित झालेले नाही. या हॉस्पिटलच्या उभारणीसाठी तीस महिन्यांची मुदत देण्यात आली होती परंतु आठ वर्षे उलटून देखील ही स्थिती आहे. त्यामुळे याबाबत देखील चौकशी व्हावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.महेश बालदी (उरण) : अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षी संपूर्ण देश कोविडचा सामना करीत असताना दिनांक १५ एप्रिल रोजी नगरविकास विभागांतर्गत येणाऱ्या सिडको महामंडळाने एक प्रस्ताव पारित केला की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात येत आहे. संपूर्ण देश कोरोना महामारीमध्ये होरपळत असताना व मुंबई शहरामध्ये कोरोनामुळे सर्वाधिक मृत्यू होत असताना सिडकोने हा प्रस्ताव पारित केला. सदर प्रस्ताव भूमीपुत्र आणि स्थानिकांच्या भावनांच्या विरुध्द होता. कारण सर्व भूमीपुत्रांची इच्छा आहे की, नवी मुंबई वसण्यामध्ये सिंहाचा वाटा असणाऱ्या लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव या आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे. स्व.दि.बा.पाटील यांनी महाराष्ट्राला साडे बारा टक्क्यांचा कायदा दाखविला. परंतु भूमिपुत्रांची मागणी लक्षात न घेता ऑनलाईन पध्दतीने ठराव करण्यात आला. सदर ठराव विखंडित करावा या मागणीसाठी गेल्या जून महिन्यापासून किमान १० वेळा आंदोलने झाली आहेत. स्थानिक जनतेच्या रेटयाला घाबरुन राज्य सरकारने सदर प्रस्ताव अद्याप कॅबिनेटसमोर आणलेला नाही. माझी या निमित्ताने राज्य सरकारला विनंती आहे की, स्व.बाळासाहेब ठाकरे हे मोठे व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे दुसऱ्या १०० ठिकाणी नाव द्यावे परंतु माझ्या मतदारसंघात होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला फक्त आणि फक्त लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव द्यावे. ही स्थानिकांची, प्रकल्पग्रस्तांची आणि आम्हा सर्व लोकप्रतिनिधींची मागणी आहे. ही मागणी शासनाने विचारात घ्यावी.

अध्यक्ष महोदय, पाच-सहा दिवसांपूर्वी नवी मुंबई आणि विशेषत: पनवेल परिसरातील डान्स बारसंदर्भात या सदनामध्ये चर्चा झाली. परंतु ज्या पोलीस निरीक्षकांच्या अखत्यारित हे डान्स बार येतात त्यातील एकालाही अद्याप पोलीस आयुक्तांनी कारणे दाखवा नोटीस दिलेली नाही. नवी मुंबईतील कायदा व सुव्यवस्था जेवढी बिघडलेली आहे तेवढी महाराष्ट्रातील कुठल्याही ठिकाणची बिघडलेली असेल, असे मला वाटत नाही.

श्री.महेश बालदी.....

आम्ही वीस-वीस वर्षांपासून सामाजिक क्षेत्रामध्ये काम करीत आहोत. तेथे नियुक्तीवर येणारे पोलीस निरीक्षक आम्हाला सांगतात की, तेथे बदली मिळविण्यासाठी करोडो रुपये द्यावे लागतात. माननीय श्री.दिलीपराव वळसे-पाटील यांच्याकडे आता राज्याच्या गृह मंत्री पदाचा कार्यभार आहे. त्यांच्यासारखे कर्तव्यदक्ष गृह मंत्री राज्याला मिळाले असल्यामुळे त्यांची सर्वजण स्तुती करीत आहेत. मी माननीय गृह मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आठ दिवसांपूर्वी सभागृहामध्ये नवी मुंबई परिसरातील डान्सबार संदर्भात चर्चा झाली त्यावेळी आपण उत्तर दिले होते. परंतु त्यानुसार अद्याप एकाही पोलीस निरीक्षकाला कारणे दाखवा नोटीस देखील दिली गेली नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण यामध्ये लक्ष घालावे.

अध्यक्ष महोदय, नवी मुंबई परिसरात विकसित होत असलेल्या द्रोणागिरी क्षेत्रामध्ये उलवे नोड हा भाग येतो. त्या ठिकाणी सुमारे १ लाख लोकवस्ती वसणार आहे. आतापर्यंत तेथे सुमारे ६० ते ७० हजार लोक राहण्यासाठी आले आहेत. परंतु तेथे पोलीस स्टेशन नाही. तेथील अर्धे सेक्टर एनआरआय पोलीस स्टेशनला तर अर्धे सेक्टर न्हावाशेवा पोलीस स्टेशनला जोडलेले आहेत. माझी या निमित्ताने माननीय गृह मंत्र्यांना विनंती आहे की, नवी मुंबईतील उलवे नोडसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशनची निर्मिती करावी.

अध्यक्ष महोदय, एमएमआरडीए कडून मच्छिमारांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये देखील तफावत आहे. तसेच माझ्या भागातील मच्छिमारांना आजपर्यंत डिझेल परतावा मिळालेला नाही. या मच्छिमारांना न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे. आपण एका बाजूला अनेक निर्बंध घालतो परंतु दुसऱ्या बाजूला आवश्यक सुख-सुविधा मात्र दिल्या जात नाहीत. गावठाण विस्तार आणि नवी मुंबईतील पनवेल-उरण परिसरामध्ये सिडको व नयना प्रकल्पाच्या माध्यमातून वाढणाऱ्या नागरिकरणामुळे पाण्याचा तुटवडा येत आहे.

श्री.महेश बालदी.....

कोकणात आभाळातून पडणारे पाणी आम्ही पाहतो, शेतामध्ये साचलेले पाणी पाहतो परंतु लोकांच्या घरात मात्र पाणी येत नाही. त्यामुळे याकडे लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

असुधारित प्रत

श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात करताना अनेक विषयांचा उहापोह केला आहे. नवी मुंबई येथे नव्याने निर्माण होत असलेल्या विमानतळाला त्या परिसरातील लोकनेते स्व.दि.बा. पाटील यांचे नाव दिले पाहिजे, याचा आग्रह धरण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सदर विमानतळ सिडकोच्या माध्यमातून बनविले जात आहे. विमानतळ बनविणारे सिडको महामंडळ सन १९७० मध्ये नवी मुंबईच्या निर्मितीसाठी तेथे आले. नवी मुंबईसाठी रायगड आणि ठाणे जिल्यातील ९५ गावांची गावठाणे संपादित करण्यात आली. त्या गावांचे गावठाणांसहित स्थलांतर करण्याची योजना होती. त्यावेळी स्थानिकांच्या बाजूने भक्कमपणे उभे राहिले ते दि.बा.पाटील साहेब.

अध्यक्ष महोदय, स्व.दि.बा.पाटील साहेबांविषयी मी या सभागृहाला वेगळे सांगण्याची गरज नाही. ते पाच वेळा विधानसभा सदस्य, दोन वेळा खासदार, एकदा विधानपरिषद सदस्य म्हणून निवडून आले होते. सन १९७२ ते १९७७ दरम्यान ते या सदनाचे विरोधी पक्षनेते होते. तसेच १९६७ ते १९७२ दरम्यान महाराष्ट्र राज्य शेतकरी सभेचे अध्यक्ष होते. त्यांनी सीमा प्रश्नासाठी एक वर्षाचा कारावास सोसला. सन १९८४ मध्ये आंदोलन पेटले त्यावेळी पनवेल-उरण जमीन बचाव समितीचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. सन १९८४ साली शेतकरी आंदोलन दाबून टाकण्यासाठी गोळीबार झाला व त्या दोन दिवसांमध्ये ५ शेतकरी हुतात्मे झाले. स्व.दि.बा. पाटील साहेबांनी आयुष्यभर शेतकऱ्यांसाठी लढा दिला. शेतकऱ्यांनी एकेक वीट जोडून त्यांना 'संग्राम' हे घर बांधून दिले. त्या घरामध्ये कोणत्याही देवांचे फोटो नसून या ५ हुतात्मा शेतकऱ्यांचे फोटो आहेत.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेऊन आयुष्यभर लढणारे लोकनेते म्हणजे स्व.दि.बा.पाटील साहेब होय. ज्या भुमीवर हा लढा लढला गेला ती जमीन सिडकोने जेएनपीटी ला देऊ केली आहे. परंतु तेथील प्रकल्पग्रस्तांना आजही साडे बारा टक्क्यांचा लाभ मिळालेला नाही.

श्री.प्रशांत ठाकूर.....

आयुष्याच्या शेवटापर्यंत म्हणजे रुग्णवाहिकेतून जाऊन आंदोलन करुन स्व.दि.बा.पाटील साहेबांनी संघर्ष केला. त्या परिसरामधील शेतकऱ्यांसाठी केवळ आमदार-खासदार म्हणून नव्हे तर विधायक भूमिकेतून त्यांनी प्रयत्न केले.

अध्यक्ष महोदय, ते आगरी समाजाचे नेते होते. आगरी समाजाच्या खर्चिक चाली-रिती, रुढी-परंपरा बदलण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे ते प्रकल्पग्रस्तांच्या हृदयात आहेत. प्रकल्पग्रस्तांनी स्व.दि.बा. पाटील साहेबांना दैवत मानलेले आहे. त्यामुळेच आज भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त त्यांच्यासाठी एकवटलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, या विमानतळाच्या नावाचा विषय आला त्यावेळी ठाणे, रायगड, मुंबई येथील सर्व भूमिपुत्रांनी एकवटून मागणी केली आहे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व.दि.बा.पाटील साहेबांचेच नाव दिले पाहिजे. इतर अनेक प्रकल्प होतील. त्या प्रकल्पांना सन्माननीय स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देता येईल. परंतु नवी मुंबई विमानतळ ही स्व.दि.बा.पाटील साहेबांची जन्मभूमी आणि कर्मभूमी आहे. त्यामुळे विमानतळाला नाव फक्त दि.बा.पाटील साहेबांचेच दिले पाहिजे. यासाठी आम्ही संघर्ष करीत राहू.

अध्यक्ष महोदय, आम्ही याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती. परंतु त्यांनी आमचे ऐकले नाही. मराठवाडा विद्यापिठाचा नामांतर प्रश्न १२ वर्षे चालला. त्याप्रमाणे या विमानतळाला देखील स्व.दि.बा. पाटील साहेबांचे नाव देईपर्यंत आम्ही लढत राहणार आहोत, ही बाब राज्य सरकारने लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या भावनेचा सन्मानपूर्वक विचार करावा ही माझी विनंती आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

---------

यानंतर श्री.धुमाळे.....

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) :** आजच्या कामकाजपत्रिकेतील दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना उद्या घेण्यात येतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दिनांक २५ मार्च २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या बैठकीत सकाळी ९.०० ते १०.४५ या वेळेत लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ १० वाजून १ मिनिटांनी शुक्रवार दिनांक २५ मार्च २०२२ रोजीच्या सकाळी ९.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

असुधारित प्रत